प्रथमवर्ष कला, वाणिज्य / विज्ञान
पायाभूत अभ्यासक्रम - १
(कला, वाणिज्य, विज्ञान)

Revised Syllabus

Foundation Course – I
(For F.Y.B.A. / B.Com. / B.Sc.)

Semester I **Hours 60**
Marks 100

Unit 1
Overview of Indian Society :

Understand the multi-cultural diversity of Indian society through its demographic composition : population distribution according to religion, caste, and gender; Appreciate the concept of linguistic diversity in relation to the Indian situation; understand regional variations according to rural, urban and tribal characteristics; understanding the concept of diversity as difference. **(5 hours)**

Unit 2
Concept of Disparity – 1 :

Understand the concept of disparlly as arising out of stratification and inequality; Explore the disparities arising out of gender with special reference to violence against women, female foeticide (declining sex ratio), and portrayal of women in media;
Appreciate the inequalities faced by people with disabilities and understand the issues of people with physical and mental disabilities. **(10 hours)**

Unit 3
Concept of Disparity – 2:

Examine inequalities manifested due to the caste system and inter-group conflicts arising thereof.
Understand inter-group conflicts arising out of communalism.
Examine the causes and effects of conflicts arising out of regionalism and linguistic differences. **(10 hours)**

Unit 4
The Indian Constitution :

Philosophy of the Constitution as set out in the Preamble.
The structure of the Constitution the Preamble, Main Body and Schedules;
Fundamental Duties of the Indian Citizen, tolerance, peace and communal harmony as crucial values in strengthening the social fabric of Indian society;
Basic features of the Constitution. **(10 hours)**

Unit 5
Significant Aspects of Political Processes :

The party system in Indian politics;
Local self-Government in urban and rural areas; the 73rd and 74th Amendments and their implications for inclusive politics;
Role and significance of women in politics. **(10 hours)**

Unit 6
Growing Social Problems in India :

Substance abuse – impact on youth & challenges for the future
HIV/AIDS – awareness, prevention, treatment and services
Problems of the elderly – causes, implications and response
Issue of child labour – magnitude, cause, effects and response
Child abuse – effects and ways to prevent
Trafficking of women – causes, effects and response **(15 hours)**

❖❖❖❖

Semester II **Hours 60**
Marks 100

Unit 1
Globalisation and Indian Society :

Understanding the concepts of liberalization; privatization and globalization;

Growth of information technology and communication and its impact manifested in everyday life;

Impact of globalization on industry : changes in employment and increasing migration;

Changes in agrarian sector due to globalization; rise in corporate farming and increase in farmers' suicide. **(7 hours)**

Unit 2
Human Rights

Concept of Human Rights; origin and evolution of the concept;

The Universal Declaration of Human Rights;

Human Rights constituents with special reference to Fundamental Rights stated in the Constitution; **(10 hours)**

Unit 3
Ecology

Concept of Ecology and Environment;
Ecosystems – their structure and functions; food chain, food webs and ecological pyramids;
Environmental degradation – causes and impact on human life.
Sustainable Development – concept and components; **(10 hours)**

Unit 4
Understanding Stress and Conflict :

Causes of stress and conflict in individuals and society;
Agents of socialization and the role played by them in developing the individual;
Significance of values, ethics and prejudices in developing the individual;
Stereotyping and prejudice as significant factors in causing conflicts in society.
Aggression and violence as the public expression of conflict.
(10 hours)

Unit 5
Managing Stress and Conflict in Contemporary Society :

Types of conflicts and use of coping mechanisms for managing individual stress;
Maslow's theory of self-actualisation;
Different methods of responding to conflicts in society;
Conflict-resolution and efforts towards building peace and harmony in society. **(8 hours)**

Unit 6
Contemporary Societal Challenges :

a) Increasing urbanization, problems of housing, health and sanitation;
b) Changing lifestyles and impact on culture.
c) Farmers' suicides and agrarian distress.
d) Debate regarding Genetically Modified Crops.
e) Development projects and Human Rights violations.
f) Increasing crime / suicides among youth. **(15 hours)**

❖❖❖❖

विभाग - १

१

भारतीय समाजाचे आकलन

पाठाची रचना :

१.० पाठाची उद्दिष्ट्ये
१.१ प्रास्ताविक
१.२ धर्मानुसार लोकसंख्या विभागणी
१.३ लिंगभेदावर आधारित विषमता
१.४ भारताची भाषिक विविधता
१.५ भारताची प्रादेशिक भिन्नता, ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची गुण वैशिष्ट्ये
१.६ तफावत एक विषमता या दृष्टीकोनातून विचार
१.७ सारांश
१.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१.० पाठाची उद्दिष्ट्ये

- ❖ भारताची धर्मानुसार लोकसंख्या विभागणी समजावून घेणे.
- ❖ भारताची लिंगभेदावर आधारित विषमता समजावून घेणे.
- ❖ भारतातील भाषिक विविधता ही संकल्पना समजावून घेणे.
- ❖ भारताची प्रादेशिक भिन्नता समजावून घेणे.
- ❖ ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची गुण वैशिष्ट्ये समजावून घेणे.
- ❖ भारतातील विविधतेतील विषमता ही संकल्पना समजावून घेणे.

१.१ प्रास्ताविक

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. आकाराच्या दृष्टीने विचार केल्यास भारत हा जगातील सातवा देश आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगामध्ये चीन खालोखाल भारताचा दुसरा क्रमांक लागतो. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या सोळा टक्के लोकसंख्या भारतात आहे. जगाच्या वाटणीला आलेल्या भूभागापैकी फक्त २.४ टक्के भूभाग भारताच्या वाट्याला आला आहे. त्यामुळे भारतात लोकसंख्येची घनताही जास्त आहे. येथे भिन्न धर्म, पंथ, जाती, उपजाती, भाषा, देव-देवता, उपासना पद्धती, चालीरीती आहेत. येथे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विविधता आहे. येथे ग्रामीण, आदिवासी आणि नगरांमध्ये राहाणाऱ्या नागरिकांचीही विविधता आहे.

भारत हा भाषा, धर्म, प्रादेशिकता, जाती, वंश इ. अनेक दृष्टीने विविधता असणारा देश आहे. भारताच्या प्रत्येक राज्याची भाषा वेगळी आहे. प्रत्येक भाषेच्या अनेक बोलीभाषा अस्तित्वात आहेत. जगातील सर्व मोठ्या धर्माचे अनुयायी थोड्याफार प्रमाणात भारतात आढळून येतात. भारतात प्रत्येक प्रदेशातील, धर्मातील, जातीतील चालीरीती, रूढी, परंपरा व संस्कृती वेगवेगळी आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात भौगोलिक विविधता प्रकर्षाने आढळून येते. प्रचंड मोठ्या क्षेत्रफळामूळे भारतात प्राकृतिक विविधता ही फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. या विभिन्न वैशिष्ट्यांचा भारतीय जीवन पद्धतीवर प्रभाव पडलेला दिसून येतो.

१.२ धर्मानुसार लोकसंख्या विभागणी

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. राष्ट्र म्हणून भारतीय राज्यघटना कुठल्याही धर्माचा पुरस्कार करीत नाही. त्याचबरोबर एखाद्या धर्माला विरोधही करीत नाही. भारत हा बहुधार्मिक देश आहे. अनेक धर्माचे लोक त्यांच्या वैशिष्ट्यांसह येथे राहतात. भारतात हिन्दू, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध, जैन व इतर अनेक धर्माचे लोक राहतात.

भारतात सर्वात जास्त हिन्दू धर्माचे लोक राहतात. त्यानंतर इस्लाम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन व इतर धर्माचे लोक राहतात. हिन्दू धर्म हा येथील अतिप्राचीन धर्म आहे. या धर्मामध्ये चार पुरुषार्थ, चार आश्रम, चार वर्ण, चार योग इ. शी निगडीत तत्वज्ञान आहे.

हिन्दू धर्मानंतर लोकसंख्येने मोठा असलेला धर्म म्हणजे इस्लाम होय. परमेश्वर एकच आहे. त्याच्या आज्ञा पोहोचविणाऱ्याच्या सांगण्याप्रमाणे लोकांनी वागले पाहिजे हा उपदेश इस्लाम धर्मात प्रमाण मानला जातो. अल्लाहला शरण जाणे, मानव प्राण्यावर प्रेम करणे, अहिंसा धर्माने वागणे इ. इस्लाम धर्म शिकवतो.

ख्रिस्ती धर्मात व्यक्तीगत तसेच सामुहिक अशी दोन प्रकारे उपासना केली जाते. त्यांच्यामध्ये रोमन कॅथॉलिक पंथ, प्रॉटेस्टंट पंथ आणि ईस्टर्न ऑर्थोडॉक्स हे तीन पंथ आढळतात. त्यांच्या धार्मिक श्रद्धा आणि विधी यात फरक आहे.

भारतामध्ये वैदिक काळापासून बौद्ध धर्माचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. बौद्ध तत्वज्ञान हा धर्म नसून ती एक वैयक्तिक, सामाजिक आचरण पद्धती आहे. प्रत्येकाने व्यवहारात पाळायची पाच तत्वे म्हणजेच 'पंचशील' ही प्रत्येक अनुयायाने पाळण्याची एक संहिता आहे. बौद्ध धर्मामध्ये हीनयान व महायान हे दोन पंथ आहेत.

भारतामध्ये शीख धर्माचे अनुयायी असून हा धर्म मुख्यत: हिन्दु धर्म व इस्लाम धर्मातील निवडक तत्वांचे एकत्रीकरण करून बनलेला आहे. १५ व्या शतकात गुरुनानक यांनी या धर्माची स्थापना केली. शीखांमध्ये पाच 'क' कारांना म्हणजेच केस, कंगवा, कृपाण, कडे आणि कच्छया यांना महत्त्व आहे.

जैन हा भारतातील अत्यंत अल्पसंख्य असा धर्म आहे. या धर्मात प्रामुख्याने श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन पंथ आहेत. भारतामध्ये पारशी हा लोकसंख्येने कमी असलेला धर्म असून या धर्माच्या लोकांनी प्रामुख्याने औद्योगिक विकासाला हातभार लावला.

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतीय लोकसंख्येत विविध धर्माच्या लोकांचे प्रमाण (प्रतिशत) पुढील प्रमाणे आहे.

धर्म	प्रतिशत	दशलक्ष लोकसंख्येमध्ये
हिन्दू	८०.५	८२७.६
इस्लाम	१३.४	१३८.२
ख्रिश्चन	२.३	२४.१
शीख	१.९	१९.२
बौद्ध	०.८	८.००
जैन	०.४	४.२
इतर	०.७	६.७
एकूण	१००.००	१०२८

भारतात सर्वात जास्त लोकसंख्या हिन्दूंची असली तरीही इतर धर्माच्या लोकांनाही भारतीय घटनेने समान दर्जा दिला आहे. भारताच्या घटनेत धर्म निरपेक्ष किंवा निधर्मी हा शब्द आहे.

आपली प्रगती तपासा.

१) भारतीय समाजाचे लोकसंख्येच्या आधारे बहुधार्मिक स्वरूप स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१.३ लिंगभेदावर आधारित विषमता

लिंगभेदावर आधारित विषमता संपूर्ण जगभर अस्तित्वात आहे. दक्षिण आशियाई देशातील आणि देशांतर्गत लिंगभेदावर आधारित विषमतेच्या एका अलिकडच्या अभ्यासावरून असे दिसून आले आहे की, भारतामध्ये लिंगभेदावर आधारित विषमतेत फार विविधता दिसून आली आहे.

१.३.१ लिंगभेदावर आधारित विषमतेचे स्वरूप :

१) स्त्रियांचा मृत्युदर : जगातील काही देशांमध्ये स्त्रियांचा मृत्युदर पुरुषांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. ज्या ठिकाणी लिंगभेदावर आधारित विषमता आहे. अशा देशांमध्ये

स्त्रियांचा मृत्युदर पुरुषांपेक्षा अधिक आहे. ज्या ठिकाणी ही विषमता नाही आणि आरोग्य दक्षता आणि आहार याबाबतीत भेद केला जात नाही त्या देशात मृत्यूदरात विषमता नाही.

२) जन्माच्या बाबतीत विषमता : पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत मुलीच्या जन्मापेक्षा मुलाच्या जन्माला प्राधान्य दिले जाते. पूर्वीच्या काळी ही बाब माता-पित्याच्या इच्छेपुरती मर्यादित होती. पण आधुनिक तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे गर्भाचे लिंगनिदान करणे शक्य झाले आहे. त्यामुळे स्त्रीभृणहत्या काही देशांत सामान्य बाब झाली आहे.

३) प्राथमिक सोयींबाबत विषमता : लोकशाही देशांमध्येही लिंगभेदावर आधारित विषमता फार मोठ्या प्रमाणावर दिसून येते. अफगाणिस्तानसारख्या देशामध्ये मुलींना शाळेत जाण्यासाठी प्रतिबंध केला जातो. भारतामध्ये मुलांच्या तुलनेत मुलींच्या शिक्षणाला कमी महत्त्व दिले जाते. इतर प्राथमिक सोई सुविधांच्या बाबतीतही फार मोठी विषमता असल्याचे दिसून येते.

४) संधीच्या बाबतीत विषमता : प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर जरी विषमता दिसत नसली तरी उच्च शिक्षणाच्या बाबतीत ही विषमता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. फारच थोड्या मुलींना उच्च शिक्षणाची संधी मिळते.

५) व्यावसायिक विषमता : रोजगाराच्या संधी आणि बढती यामध्येही पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना डावलले जाते, भारतामध्ये अशा प्रकारची विषमता मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते.

६) मालकी हक्का बाबत विषमता : भारतात पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमुळे स्त्रियांना संपत्तीच्या मालकी हक्कापासून वंचित ठेवले जाते. घर, जमीन इ. मालमत्तेच्या बाबतीत स्त्रियांना अत्यंत विषम अधिकार असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना व्यावसायिक, आर्थिक आणि समाजिक उपक्रमांमध्ये प्रवेश मिळविणे व प्रगती करणे कठीण होते.

७) कौटुंबिक पातळीवरील विषमता : कौटुंबिक पातळीवरही स्त्रियांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर विषमता असल्याचे दिसून येते. कौटुंबिक पातळीवर ग्रामीण भागात फार मोठ्या प्रमाणात स्त्री-पुरुष विषमता दिसून येते. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने बाहेर काम करीत असल्या तरी त्यांना घरकाम आणि मुलांचे संगोपन यांचा अतिरिक्त भार सहन करावा लागतो.

आपली प्रगती तपासा.

१) लिंगभेदावर आधारित विषमतेचे स्वरूप स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१.४ भारताची भाषिक विविधता

भारत हा बहुभाषिक देश आहे. भारतीय राज्य घटनेचे २२ मुख्य भाषा मान्य केलेल्या आहेत. मात्र भारतात प्रत्यक्षात १६५२ भाषा व पोटभाषा अस्तित्वात आहेत. भारतीय राज्यघटनेने ज्या २२ भाषांना अधिकृत भाषांचा दर्जा दिलेला आहे. त्या भाषा पुढीलप्रमाणे आहेत - (भारतीय संविधान परिशिष्ट-८)

१)	असामी	१२)	मळ्यालम
२)	बंगाली	१३)	कन्नड
३)	हिन्दी	१४)	बोडो
४)	उर्दू	१५)	डोग्रा
५)	मराठी	१६)	कोंकणी
६)	गुजराथी	१७)	मणिपुरी
७)	पंजाबी	१८)	ओरिया
८)	संस्कृत	१९)	संथाली
९)	काश्मिरी	२०)	नेपाळी
१०)	तेलुगू	२१)	सिंधी
११)	तामिळ	२२)	मैथिली

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक राज्याला त्यांच्या बोली भाषेस कार्यालयीन भाषा म्हणून मान्यता दिली आहेच. भारतामध्ये काही राज्यांची निर्मितीच मुळात भाषेच्या आधारे झाली. स्वातंत्र्यानंतर काही राज्यांची निर्मिती भाषिक तत्वावरच झाली. उदा. पंजाबची विभागणी पंजाब आणि हरियाणा अशी झाली तर संयुक्त महाराष्ट्राची विभागणी भाषेच्या आधारवर महाराष्ट्र आणि गुजराथ अशी झाली.

भारतामध्ये सर्वात जास्त प्रमाणात हिंदी भाषा बोलली जाते. लोकसंख्येनुसार भाषांची क्रमवारी पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१	हिन्दी	४०%	७	गुजराथी	४.८०%
२	बंगाली	८.२%	८	कन्नड	३.८०%
३	तेलुगु	७.८०%	९	मल्याळम	३.६०%
४	मराठी	७.४०%	१०	उडिया	३.३०%
५	तामिळ	६.३०%	११	पंजाबी	२.८०%
६	उर्दू	५.१%	१२	असामी	१.६०%

इतर भाषा बोलणारांचे प्रमाण १% पेक्षाही कमी आहे.

प्रशासकीय कारभारात सुव्यवस्था यावी यासाठी १९५६ मध्ये राज्य पुनःर्रचना आयोगाच्या शिफारशीनुसार भाषावार राज्यांची निर्मिती करण्यात आली. परंतु त्यामुळे स्वतःच्या भाषेच्या फाजील अभिमानाची निर्मिती झाली व त्यातून अनेक वाद निर्माण झाले. उदा. महाराष्ट्र-

कर्नाटक सीमा प्रश्न. राष्ट्रभाषा म्हणून उत्तरेकडील राज्यांनी हिंदीचा आग्रह धरला तर दक्षिणेकडील राज्यांनी त्याला मोठ्या प्रमाणावर विरोध केला. यातून फार मोठ्या प्रमाणावर भाषिक दंगे झाले. वास्तविक सर्वच भारतीय भाषा हा भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. आणि तो आपण जपला पाहिजे.

आपली प्रगती तपासा.

१) भारतीय समाजाचे बहुभाषिक स्वरूप स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१.५ भारताची प्रादेशिक भिन्नता, ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची गुण वैशिष्ट्ये

भारत हा भौगोलिक विविधतेने समृद्ध असणारा खंडप्राय देश आहे. भारताच्या उत्तरेला हिमालय, दक्षिणेला हिन्दी महासागर, पूर्वेला बंगालचा उपसागर आणि पश्चिमेला अरबी समुद्र आहे. भारतातील नद्या, उत्तरेला हिमालयातून, मध्य भारतात विंध्य पर्वतातून, सातपुडा तसेच सह्याद्री पर्वतातून उगम पावलेल्या आहेत. त्यापैकी गंगा, यमुना, ब्रम्हपुत्रा, नर्मदा, गोदावरी, कावेरी, कृष्णा महानदी या प्रमुख नद्या आहेत. काश्मीर ते कन्याकुमारी आणि कच्छ ते आसाम अशा विशाल भूप्रदेशात भू-प्रकृती, हवामान, पर्जन्यमान यामध्ये विविधता आढळते. उत्तरेला हिमालय पर्वत रांगा, मधला प्रदेश गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा सतलज या नद्यांनी सखल बनलेला. दक्षिणेला पठारांचा तसेच पूर्वेला व पश्चिमेला समुद्र किनारपट्ट्याचा असे भारताचे प्रमुख चार प्राकृतिक विभाग आहेत. भौतिक पर्यावरणातील विविधतेमुळे भारतीय जीवनात देखील मोठी विविधता दिसून येते.

भारतीय संघराज्यात २८ राज्ये आणि ७ केंद्र शासित प्रदेश आहेत. भारतात ६ लाख खेडी आहेत. भारतामध्ये फार मोठ्या प्रमाणात भौगोलिक आणि हवामानविषयक, विविधता दिसून येते या विविधतेमुळे वनस्पती, प्राणी, दुर्मिळ औषधी वनस्पती, पक्षीजीवन यामध्ये फार मोठ्या प्रमाणात विविधता आढळते. भारतातील काही विभाग आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि काही आर्थिकदृष्ट्या अविकसीत आहेत. काही राज्यांमध्ये संरचनात्मक सोयी अत्यंत चांगल्या आहेत तर काही राज्यात त्या अत्यंत कमकुवत आहेत. प्रादेशिक विविधता आणि त्यानुसार असणारी विषमता भारतामध्ये नवीन नाही. अनेक विकसनशील देशात प्रादेशिक विषमता फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. भारतातील प्रादेशिक विषमता गेल्या १० वर्षात फारशी कमी झालेली नाही.

१.५.१ ग्रामीण समाज :

भारतीय समाजाची ग्रामीण समाज, शहरी समाज आणि आदिवासी समाज अशी तीन मागात विभागणी करण्यात येते. औद्योगिकरण आणि नागरीकरण सोडून लोकसंख्येचा मोठा भाग

ग्रामीण भागात राहतो. २००१ च्या जनगणनेनुसार भारताच्या १०२.८६ कोटी लोकसंख्येपैकी ७२.२१ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर २७.७९ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते. याचा अर्थ ७४ कोटी १६ लाख एवढी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते.

ग्रामीण समाजाची व्याख्या :

१) त्रि. ना. अत्रे : खेडणे म्हणजे जमीन कसणे, जमीन कसणारा तो खेडूत आणि अशा खेडूतांची वस्ती म्हणजे खेडे किंवा गाव होय.

२) पौराणिक व्याख्या : ज्या वसाहतीच्या भोवती किर्रसार झाडी आहे, शेती योग्य जमीन आहे आणि ज्या वसाहतीमध्ये मातब्बर शेतकरी व पुष्कळ मजुर राहतात अशी वस्ती म्हणजे गाव होय.

३) हॅरॉल्ड पिक : ज्या वसाहतीमध्ये एका कुटुंबापेक्षा मोठा समुदाय जवळ-जवळ वास्तव्य करतो. शेतीची मशागत करतो, पडित जमिनीत गुरे चारतो आणि शेजारच्या गावाच्या सीमेपर्यंत हक्क सांगतो असा समुदाय म्हणजे गाव होय.

४) शासनाची व्याख्या : शासनासमोर गाव म्हणजे महसुली गाव (शेतसारा वसुलीसाठी ठरविलेले गाव) व प्रशासकीय घटक (राज्य कारभाराच्या सोयीसाठी ठरविलेले क्षेत्र) म्हणजे गाव होय. पूर्वीचे गाव, ग्रामपंचायत असल्यास ती चालू ठेवण्याचा, बंद करण्याचा किंवा फेरफार करण्याचा शासनास अधिकार आहे.

१० हजारापेक्षा कमी लोकसंख्या असणारी कोणतीही वसाहत ग्रामीण भाग म्हणून विचारात घेतली जाते.

ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये :

१) शेती प्रधानता : ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. पूर्वीच्या काळी शेती व्यवसायासाठी आवश्यक सेवा बलुतेदारांमार्फत पुरविल्या जात होत्या. त्याचा मोबदला शेतकरी बलुतेदारांना देत असत. ग्रामीण समाजातील जास्तीत जास्त लोकांचा व्यवसाय शेती असल्यामुळे ग्रामीण जीवनावर शेतीचा प्रभाव अधिक आहे. ग्रामीण समाजात ज्याच्या मालकीची जमीन अधिक असेल त्याचा ग्रामीण समाजात आणि राजकीय जीवनावर प्रभाव असतो.

२) कुटुंबावर आधारित सामाजिक जीवन : कुटुंब हा पहिला सामाजिक समूह आहे. कुटुंब हा ग्रामीण समाजाचा मुख्य आधार आहे. व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक गरजांची पूर्तता कुटुंबातच होते. सदस्यांची ओळख कुटुंबानुसार होते. सदस्याची प्रतिष्ठा, सामाजिक संबंधांचे स्वरूप कुटुंबाने ठरते. ग्रामीण समाजात व्यक्तीवादापेक्षा कौटुंबिकता अधिक महत्त्वाची असते. कुटुंबामुळे समाजाचे सातत्य आणि स्थैर्य टिकून राहते. समाजाच्या सर्व अवस्थांमध्ये आणि सर्व समाजात कुटुंबसंस्था अस्तित्वात होती. व्यक्तीचे समाजिकरण करण्याच्या प्रक्रियेत कुटुंब महत्त्वाची भूमिका पार पाडते.

३) जातिप्रथेवर आधारित समाज रचना : ग्रामीण समुदाय अनेक जातींमध्ये विभागलेला आहे. कायद्याने जाती व्यवस्था नष्ट करण्यात आली असली तरी ग्रामीण समाजातून जाती व्यवस्था पूर्णपणे नाहिशी झालेली नाही. ग्रामीण समाजात व्यक्तीचे पद, दर्जा, सामाजिक सबंधांचे स्वरूप जातीनुसार निश्चित होते. जात हा सामाजिक स्तरीकरणाचा बंद वर्ग आहे. जातीच्या सभासदाच्या वर्तनावर संबंधीत जातीकडून नियंत्रण ठेवले जाते. पूर्वी जातीनुसार परंपरागत व्यवसाय लोकांना करावा लागत असे. खेड्यातील वस्त्यांची रचना जातीनुसार झालेली दिसते. आज ही पद्धती बरीचशी शिथील झालेली आहे.

४) नैसर्गिक वातावरण : ग्रामीण भागातील वातावरण नैसर्गिक असते. गावाच्या सभोवताली शेतजमीन, वृक्षवल्ली, जलाशय, नद्या आणि ओढे असतात. हवा आणि पाणी स्वच्छ असते. ग्रामीण लोकांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन सभोवतालच्या नैसर्गिक घटकांशी निगडीत असते.

५) लहान आकार : नागरी समुदायाच्या तुलनेत ग्रामीण समुदायातील लोकसंख्या कमी असते. त्यामुळे गावाचा आकार लहान असतो. ग्रामीण समुदायातील व्यक्ती एकमेकांना ओळखणारे असतात. एकमेकांचे स्वभाव, एकमेकांची सुखदु:खे एकमेकांना माहीत असतात.

६) सण, समारंभ व धार्मिक उत्सव यांचा प्रभाव : ग्रामीण समाजात सण, समारंभ आणि धार्मिक उत्सवांना महत्त्व असते. या निमित्ताने गावातील लोक एकत्र येतात. ग्रामीण ऋतुचक्राशी आणि शेतीव्यवसायाशी घनिष्ठ संबंध असतो. सणसमारंभामध्ये, निसर्गातील विविध तत्वांची पूजा केली जाते. उदा. अग्नीपूजा, सुर्यपूजा, नागपूजा, वटपौर्णिमा इ. नैसर्गिक प्रकोपाच्या निराकरणासाठी पूजापाठ, व्रतवैकल्य, अनुष्ठान, यज्ञयाग इ. विधी केले जातात. ग्रामदेवतेच्या कृपेमुळे गावाची भरभराट होते. गावाचे स्थैर्य टिकून राहते अशी ग्रामीण लोकांची श्रद्धा असते.

७) स्त्रियांची पराधीनता : पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमध्ये आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण पुरूषांच्या हातांत झालेले असते. कौटुंबिक पातळीवर आणि ग्रामीण समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. ग्रामीण समाजात स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल यापुरते मर्यादित मानले जाते. कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांना सामावून घेतले जात नाही. कष्टांच्या कामामध्ये मात्र स्त्रिया अग्रस्थानी असतात. आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतीत ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना पुरूषांच्या आज्ञेतच रहावे लागते. स्त्रियांच्या दुय्यम दर्जामुळे आजार, आरोग्य आणि राहणीमान या बाबतीत त्यांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होते.

८) श्रमिक बाजारपेठ व तंत्रज्ञान : ग्रामीण समाजात श्रमाचे फारसे विशेषीकरण झालेले नाही. ग्रामीण समाजातील लोकांना केवळ शेतीसंबंधी तंत्रज्ञान अवगत असते. त्यामुळे श्रमाची उत्पादकता अतिशय कमी राहते. ग्रामीण समाजव्यवस्थेमध्ये उत्पादन, वितरण आणि विनिमय या सर्व प्रक्रियांचे स्वरूप अतिशय साधे आणि सरळ असते. बाजारपेठेचा विचार करता शेतीतून उत्पादित होणाऱ्या मालाच्या विक्रीसाठी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी मध्यवर्ती गावाच्या बाजारपेठेवर अवलंबून राहावे लागते.

९) निसर्गशक्तीचा प्रभाव : ग्रामीण समाजाचा निसर्गाशी दैनंदिन संबंध येतो. शेती आणि पशुपालन निसर्गावर अवलंबून असल्याने ग्रामीण लोकांवर निसर्गशक्तीचा प्रभाव अधिक असतो. बऱ्याचदा ग्रामीण समाजाला निसर्गापुढे हार पत्करावी लागते. त्यातूनच दैवी शक्तीचे अस्तित्व आणि श्रेष्ठत्व ग्रामीण समाज मान्य करतो. निसर्गापुढे माणसाचे अपूर्णत्व तो मान्य करतो. पारलौकिक व अतिमानवी शक्तीवर आधारित श्रद्धात्मक आचारविचारांना प्राधान्य दिले जाते. संघर्षाऐवजी निसर्गाला शरण जाणे हे लोक पसंत करतात.

१०) सामाजिक जीवनातील एकविधता : ग्रामीण समुदायातील सर्व लोकांचा व्यवसाय जवळपास सारखा असतो. आचार-विचार आणि जीवनपद्धती सारखी असते. राहणीमान थोड्या फार फरकाने सारखे असते. अशा प्रकारे ग्रामीण सामाजिक जीवनात एक प्रकारची समानता दिसून येते.

११) प्राथमिक संबंधाची तीव्रता : ग्रामीण समाजातील लोकांचे संबंध घनिष्ठ आणि अनौपचारिक स्वरूपाचे असतात. ग्रामीण सामाजिक संबंध साधे आणि प्रामाणिक असतात. एकमेकांच्या सुखदुख:मध्ये अनौपचारिकपणे ते सहभागी होत असतात. एकमेकांचे स्वभाव आणि खाजगी आयुष्य एकमेकांना माहित असते. परस्परांच्या दैनंदिन सान्निध्यामुळे हे संबंध घनिष्ठ, प्रामाणिक आणि जिव्हाळ्याचे असतात.

१२) साधे व प्रामाणिक जीवन : ग्रामीण भागात बहुतांश निर्वाह शेतीवर अवलंबुन असतो. शेतीत परंपरागत उत्पादनतंत्राचा अवलंब केला जातो. अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचा ग्रामीण समाजावर मोठा प्रभाव असतो. उत्पन्न कमी असल्याने दैनंदिन जीवन व राहणीमान यामध्ये साधेपणा असतो. कुटुंबसंस्थेचा प्रत्येक व्यक्तीवर प्रभाव असतो. प्राथमिक संबंधाची तीव्रता असल्याने ग्रामवासियांच्या जीवनात प्रामाणिकपणाला फार महत्त्व असते.

आपली प्रगती तपासा.

१) ग्रामीण समाजाची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१.५.२ शहरी किंवा नागरी समाज :

भारतीय जनगणनेनुसार ज्या वसाहतीची लोकसंख्या १०,००० पेक्षा अधिक आहे आणि ज्या ठिकाणी महानगरपालिका, नगरपालिका किंवा नगरपरिषद अस्तित्वात आहे तसेच ज्याठिकाणीच्या एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के लोकसंख्या बिगरशेती व्यवसायात गुंतलेली आहे आणि लोकसंख्येची घनता प्रती चौरस किलोमीटरला ४०० पेक्षा अधिक आहे. अशी वसाहत म्हणजे शहर किंवा नगर होय. लुइस वर्थ या समाजशास्त्रज्ञाच्या मते सामाजिक विजातीयता असलेल्या व्यक्तींचा तुलनात्मकदृष्ट्या मोठा व दाट आणि स्थायी स्वरूपाचा समुदाय म्हणजे शहर किंवा नगर होय. २००१ च्या जनगणनेनुसार २७.७८ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्य करते.

नागरी समाजाची वैशिष्ट्ये :

१) व्यवसायांचे विविधकरण : शहरी भागात बिगर शेती व्यवसायात म्हणजेच उद्योग आणि सेवाक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्या गुंतलेली असते. शहरातील विविध औद्योगिक वसाहतीमध्ये विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये फार मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग काम करीत असतो. तसेच सेवाक्षेत्राचा विचार करता व्यापार आणि वाणिज्य, वाहतुक आणि दळणवळण, बैंकिंग, विमा, शिक्षण, आरोग्य, शासकीय आणि अशासकीय, धार्मिक, करमणूक या विविध क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात लोकसंख्या गुंतलेली असते. शहरामध्ये फार मोठ्या प्रमाणात व्यावसायिक विविधता आढळते.

२) मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव : पर्यावरणाचे नैसर्गिक पर्यावरण आणि मानवनिर्मित पर्यावरण असे दोन भाग पडतात. शहरी भागात उंच इमारती, कचेऱ्या, मनोरे, रस्ते, वाहने, कारखाने, व्यापारी पेठा, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था, विद्यापीठ या मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव अधिक जाणवतो. शहरातील लोकसंख्येचा या मानवनिर्मित पर्यावरणाशी दैनंदिन संबंध येतो. शहरी समाजाचा मानवी प्रयत्नांवर अधिक विश्वास असतो. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रभाव या लोकसंख्येवर अधिक असतो.

३) समाजाचा मोठा आकार व दाट वस्ती : ग्रामीण समुदायाच्या तुलनेने शहरी समाजाचा आकार मोठा असतो. सहाजिकच येथे उद्योग व्यवसायांचे केंद्रिकरण फार मोठ्या प्रमाणात झालेले असते. या उद्योग व्यवसायांसाठी, शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरीत होते. मुख्य शहराला जोडून उपनगरांचा विकास होतो. ज्याप्रमाणे उंच इमारती बांधल्या जातात त्या प्रमाणे झोपडपट्ट्यादेखील निर्माण होतात. वाहतुक आणि दळणवळणाच्या सोयींच्या विकासामुळे शहरांचा विस्तार वेगाने होत आहे.

४) लोकसंख्येची अधिक घनता : ग्रामीण भागात लोकसंख्येची घनता अत्यंत कमी असते तर शहरी भागात लोकसंख्येची घनता प्रती चौरस किलोमीटर ४०० पेक्षा अधिक असते. उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती शहराच्या मध्यवर्ती भागात उंच इमारतींमध्ये सदनिका विकत घेऊन राहतात. अतिशय कमी उत्पन्न गटातील व्यस्ती झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करतात. शहरातील दाट लोकवस्तीमुळे सार्वजनिक सुविधांवर फार मोठ्या प्रमाणात ताण पडतो.

५) लोकसंख्येची विजातीयता : शहरांमध्ये सामाजिक विजातीयता मोठ्या प्रमाणात दिसून येते. विविध जाती-जमातीचे लोक एकाच वसाहतींमध्ये राहत असतात. धर्म, जात, पंथ, प्रांत, भाषा हे सर्व भेद शहरांमध्ये पुसट होतात. शहरांची अशी एक वेगळी संस्कृती त्याठिकाणी असित्वात येते. ज्याप्रमाणे शहरात सामाजिक विविधता फार मोठ्या प्रमाणात आढळते. त्याप्रमाणे व्यवसायिक विविधताही फार मोठ्या प्रमाणात आढळते. अनेकविधता हे शहरी समाजाचे अभिन्न अंग आहे. आचार, विचार, वेशभूषा, सामाजिक मूल्ये, जीवनपद्धती याबाबतीत शहरांमध्ये फार मोठ्या प्रमाणात विविधता आढळते.

६) दुय्यम संबंधाचे प्राबल्य : सामाजिक, सांस्कृतिक, व्यावसायिक विविधतेमुळे शहरातील लोकांचे संबंध दुय्यम आणि औपचारिक स्वरूपाचे असतात. या संबंधाचे स्वरूप प्रासंगिक आणि तात्पुरत्या स्वरूपाचे असते. शहरातील व्यक्ती कारणमात्र आणि साधनमात्र या स्वरूपाचे संबंध ठेवतात. एकाच इमारतीमध्ये वेगवेगळ्या सदनिकांमध्ये राहणाऱ्या लोकांना एकमेकांचे खाजगी

जीवन, व्यवसाय, सामाजिक संपर्क याबाबत माहिती नसते. प्रत्येक व्यक्ती आपले खाजगी जीवन, स्वतंत्रपणे आणि आपल्या इच्छेप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य शहरामध्ये उपभोगते.

७) व्यक्तिप्रधान जीवन : ग्रामीण जीवन ज्याप्रमाणे कुटुंबप्रधान असते, त्याप्रमाणे शहरी जीवन व्यक्ती प्रधान असते. लाखो लोकांच्या समुदायात एकमेकांच्या जीवनात डोकावण्याचा कोणीही प्रयत्न करीत नसल्याने व्यक्ती पुरेसे व्यक्तीस्वातंत्र्य शहरामध्ये उपभोगू शकते. कुल, कुटुंब, जात याबाबींना शहरात काहीही महत्त्व नसते. प्रत्येक व्यक्ती आपल्या अंगी जास्तीत जास्त कौशल्ये प्राप्त करून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करते. व्यक्तीला आवडीनिवडी जोपासता येतात. इच्छा आणि पात्रतेनुसार निर्णय घेता येतात. तो स्वतःच्या सुखाचा जास्तीत जास्त विचार करतो.

८) छंद व गरजेनुसार समुदाय निर्मिती : शहरामध्ये फार मोठी सामाजिक विजातीयता असली तरी लोक आपला छंद आणि हितसंबंधाच्या जोपासनेसाठी ऐच्छिक मंडळे स्थापन करतात. त्यातील प्रवेश आणि निर्गमन पूर्णपणे ऐच्छिक असते. त्यांचे स्वरूप हास्य क्लब, लायन्स क्लब, रोटरी क्लब, नाट्यमंडळ, साहित्य मंडळ अशा स्वरूपाचे असते.

९) मोठ्या प्रमाणात सामाजिक गतिशीलता : शहरी भागामध्ये भौगोलिक, सामाजिक आणि व्यावसायिक गतीशीलता फार मोठ्या प्रमाणात आढळते. व्यक्तीला आपला दर्जा आणि भूमिका यात परिवर्तनास मोठा वाव असतो. या गतिशिलतेचे स्वरूप सामाजिक, व्यावसायिक, भौगोलिक स्तरीय त्याचप्रमाणे प्रादेशिक असू शकते. व्यक्ती स्वतः कष्टाच्या जोरावर आपल्या दर्जामध्ये परिवर्तन करीत असते.

१०) सामाजिक सहिष्णुता : सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक स्तरीय विविधतेच्या परिस्थितीत प्रत्येक व्यक्ती एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती स्विकारतो. सामाजिक विविधतेमुळे व्यक्तिगत निर्माण होणारी अस्थिरतेची भावना कमी करण्यासाठी लोक एकमेकांना मदत करतात. स्पर्धात्मक वातावरणात सहकार्याच्या आधारे टिकून राहण्याचा सर्वजण प्रयत्न करतात. मुंबई शहरामध्ये बॉम्बस्फोट, महापूर या संकटसमयी ही सहिष्णुता फार मोठ्या प्रमाणात प्रत्ययास येतांना दिसते.

११) श्रमविभाजन व विशेषी करणास वाव : शहरामध्ये उद्योग, व्यापार, व्यवसाय, शिक्षण, साहित्य, कला, राजकारण, करमणूक अशी निवडीची मोठी श्रेणी प्रत्येकासमोर असते. प्रत्येकाला आपल्या क्षमता सिद्ध करण्यास याठिकाणी मोठा वाव असतो. स्पर्धाही मोठी असते. प्रत्येक क्षेत्रामध्ये श्रमविभाजनास आणि विशेषीकरणास मोठा वाव असतो. प्रत्येकाची आवडनिवड, पात्रता, क्षमता, शैक्षणिक अर्हता यानुसार शहरात संधी उपलब्ध असतात.

१२) आर्थिक निकषावर आधारित सामाजिक स्तरीकरण : शहरात आर्थिक निकषावर आधारित सामाजिक स्तरीकरण उदयास आलेले असते. गरीब, माध्यम, श्रीमंत अशी समाजाची वर्गव्यवस्था अस्तित्वात आलेली असते. आर्थिक परिस्थितीवरून समाजातील व्यक्तीचा दर्जा ठरत असतो. निवासस्थान, व्यवसाय, आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्थान हे वर्गव्यस्थेचे निकष प्रभावी असतात.

१३) दुय्यम नियंत्रण : किंग्जले डेव्हिस यांनी नागरी समुदायांच्या दुय्यम नियंत्रण या विशेष वैशिष्ट्याचा उल्लेख केला आहे. मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे केंद्रीकरण, विविध प्रांतातून आलेली आणि विविध भाषा बोलणारी लोकसंख्या, सामाजिक विजातीयता, सामाजिक संबंधातील औपचारिकता यामुळे नागरी समुदायाचे नियंत्रण करण्यासाठी कायदा आणि पोलिस यंत्रणा यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी बऱ्याचदा कठोर उपाययोजना करावी लागते.

आपली प्रगती तपासा.

१) शहरी समाजाची वैशिष्ट्ये सांगा.

_____

_____

_____

_____

१.५.३ आदिवासी समाज :

आदिवासी समाज नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त, जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यात तुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीपेक्षा वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरिती किंवा संस्कृती आदिवासी समाजाची असते. आदिवासी समाजाला वनवासी, गिरीजन असे पर्यायी शब्द वापरले जातात. आदिवासी समाजाच्या बोली भाषेला लिपी नसते. आदिवासी समाजाबद्दल अनेक गैरसमज आहेत. प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे, स्वच्छंद लैंगिक संबंध ठेवणारे, वनफळे व मांस भक्षण करणारे, जादूटोण्यावर श्रद्धा ठेवणारे उघडेनागडे लोक असे अनेक गैरसमज आदिवासी समाजाबद्दल आहेत. वास्तविक निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या, स्वच्छंदी व स्वतंत्र वृत्तीच्या आणि आधुनिक जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट न झालेल्या आदिवासींचे जीवन सुखमय व अनुकरणीय आहे. भारतात आदिवासी समाज आसाम, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड, मणिपूर, त्रिपूरा, हिमाचल प्रदेश, पूर्व पंजाब, पूर्व काश्मिर, उत्तर प्रदेशाचा उत्तरभाग, बंगाल, बिहार, उत्तर महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरिसा, आंध्रप्रदेश, म्हैसूर, केरळ आणि तामिळनाडू या राज्यात आहे. आदिवासी समुदायांची भारतातील संख्या ४२७ आहे. महाराष्ट्रात ४७ आदिवासी जमाती आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये आदिवासींचे प्रमाण ८.२० टक्के आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम ३४१ आणि ३४२ नुसार राष्ट्रपतींच्या आदेशानुसार जी सूची तयार करण्यात आली त्या सूचीमध्ये समाविष्ट समुदायांना अनुसूचित जमाती असे म्हटले जाते.

आदिवासी समाजाची व्याख्या

१) डॉ. रिव्हर्स : आदिवासी समूह हा साधा, सरळ सामाजिक समूह असून त्यातील सदस्य हे एकाच समान बोलीचा वापर करतात. समान उद्दिष्ट्यांच्या पूर्ततेसाठी एकत्र येऊन कार्य करतात.

२) गिलीन आणि गिलीन : एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, समान बोली भाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा परंतु अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी होय.

३) डॉ. डी. एन्. मुजुमदार : समान नाव धारण करणाऱ्या, विशिष्ट भू-प्रदेशावर निवास करणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या, विवाह, व्यवसाय याबाबत समान निषेध नियमांचे पालन करणारा व निश्चित अशा काही मूल्यांची, विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबाचा समूह म्हणजे आदिवासी होय.

भारतातील प्रत्येक आदिवासी समुदायाची संख्या फार कमी असली तरी ते सर्व भारतभर आढळतात. ते दुर्गम डोंगराळ भागात, दऱ्याखोऱ्यात रानावनात राहतात म्हणून त्यांना वन्यजाती, जनजाती, वनवासी, गिरीजन असे म्हटले जाते. बहुतेक समाजशास्त्रज्ञांच्या मते भारतातील आदिवासी हे भारतातील मूळचे निवासी, अगदी मूळचे रहिवासी आहेत.

आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये :

१) विशिष्ट भूभागावर वास्तव्य : आदिवासी हा प्रादेशिक समूह आहे. एका आदिवासी समाजाचे वास्तव्य विशिष्ट भूप्रदेशावर असते. सामान्यतः डोंगराळ प्रदेश, दऱ्याखोऱ्या, घनदाट जंगल, पाण्याने वेढलेले बेट अशा भूप्रदेशावर त्यांचे कायमचे वास्तव्य असते. नैसर्गिक तटबंदी आणि दुर्गम भूभाग यामुळे सुधारलेल्या जगाशी त्यांचा फारसा संपर्क येत नाही.

२) प्रमाण लघुता : आदिवासी समुदायाचा आकार लहान असतो. समुदायातील कुटुंबाची संख्या मर्यादित असते. आदिवासींचे पाडे किंवा छोटी गावं विखुरलेली असतात. सामाजिक संपर्काचे प्रमाण अत्यंत मर्यादित असते.

३) समान रक्तसंबंध समान नाव : प्रत्येक आदिवासी जमातीतील लोक परस्परांना एकाच रक्त नात्याचे मानतात. उत्पत्ती एकाच पूर्वजापासून झाली आहे अशी त्यांची श्रद्धा असते. बऱ्याचदा आदिवासी जमातीच्या नावाचा संबंध पूर्वजांशी असतो. प्रत्येक आदिवासी जमातीला तिचे स्वतंत्र नाव असते. उदा. कोरळू, भिल्ल, वारली, नागा, गोंड इ.

४) समान बोली भाषा, लेखनकलेचा अभाव : प्रत्येक आदिवासी जमातीची बोलीभाषा स्वतंत्र असते. परस्पर विचारांची देवाण-घेवाण ते या बोलीभाषेतून करतात. त्यामुळे त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण आणि समूहभावना अधिक मजबूत होते. त्यांच्या भाषेला लिपी नसते. त्यामुळे लिखाण कलेचा अभाव असतो. त्यामुळे ज्ञान, कला, साहित्य, तंत्र यांच्या विकासावर फार मर्यादा पडतात. लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, उखाणे, चालीरीती, परंपरा या त्यांच्या संस्कृतींचे हस्तांतरण बोलीभाषेतून होत असते.

५) साधी अर्थव्यवस्था : इव्हान्स प्रिचर्ड यांच्या मते आदिवासींची अर्थव्यवस्था अत्यंत साधी असते. पोटापुरते अर्थोत्पादन किंवा निर्वाह प्रधानता हे त्यांच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. बहुतेक आदिवासी जमाती शिकार, मासेमारी, वनफळांचे संकलन, अत्यंत प्राथमिक स्वरूपाची

शेती इ. व्यवसाय करतात. त्यांच्याकडे आवश्यकतेपेक्षा अधिक शिलकीसाठा आढळत नाही. बहुतेक आदिवासी जमातीमध्ये वस्तूविनिमयावर अधिक भर असतो. बाजाराभिमुख अर्थव्यवस्था नसल्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात कमालीची समानता आढळते. आदिवासीमध्ये श्रमविभाजन लिंगभेदावर आधारित आहे. व्यावसायिक विशेषीकरणाचा त्यांच्यामध्ये अभाव आढळतो.

६) मर्यादित तंत्रज्ञान : आदिवासींची अर्थव्यवस्था साधी असते. कारण त्यांची तंत्रविद्या अत्यंत मर्यादित असते जी फक्त तोंडी देवाण-घेवाणीतून एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमित होते. सुधारलेल्या समाजातील तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचलेलेच नाही. शिकार, मासेमारी, खाद्यसंकलन, शेती याबाबतचे त्यांचे तंत्रज्ञान अत्यंत मर्यादित असते. अवजारे जुनाट असतात. जमीन उकरण्याची हत्यारे, धनुष्यबाण, मासेमारीसाठीची आणि शिकारीसाठीची जाळी यापलिकडे त्यांचे तंत्रज्ञान गेलेले नाही. उत्पादन कार्यासाठी स्वतःच्या कष्टावरच आदिवसी जास्त भर देतो.

७) समान धर्म आणि जादूचा प्रभाव : आदिवासींना निसर्गातील घडामोडीतील कार्यकारणभाव कळत नसल्याने ते निसर्गाची, पूर्वजांची, भूताखेतांची पूजा करतात. आदिवासींचे धर्मसुद्धा समान असतात. धार्मिक बाबीसंबंधी त्यांची प्रतिक्रिया सामूहिक असते. त्याबाबत त्याच्यात मतभेद किंवा तात्विक काथ्याकूट आढळत नाही. आदिवासी निसर्गाला शरण जातो. व्यावहारिक घडामोडींवर आपले नियंत्रण राहावे आणि आपल्या कार्यात यश यावे म्हणून जादूटोणा, मंत्रतंत्र यांचा वापर ते करतात.

८) वेगळी जीवनपद्धती : आदिवासींचे सामाजिक संबंध औपचारिक व कराराच्या स्वरूपाचे नसतात. त्यांच्या जीवनात रक्तसंबंध, कुटुंब आणि समुदाय यांना महत्त्व असते. एका बाजूला खूप स्वातंत्र्य उपभोगतांना त्यांचे जीवन सामूहिक स्वरूपाचे असते. सामूहिक जीवन जगतांना समुदायाची नियमनव्यवस्था, आचारविचार, प्रथापरंपरा यांचे पालन आदिवासींना करावेच लागते. धार्मिक श्रद्धा, जादूटोणा, आचार-विचार, अन्न संस्कृती, वेशभूषा यामध्ये कमालीची समानता असते. समाजमान्य जीवनपद्धतीपेक्षा वेगळ्या पद्धतीने जीवन जगणे केवळ अशक्य असते. एखाद्याने त्याचे उल्लंघन केल्यास त्याला त्याच्या जमातीच्या शिक्षेला सामोरे जावे लागते. आदिवासी समाजामध्ये कमालीचे ऐक्य दिसून येते.

९) जमातकेंद्रित आत्मीयता : आदिवासी जमातीचे समान भू-प्रदेशावरील वास्तव्य, समान बोली भाषा, समान व्यवसाय, समान वेशभूषा, समान अन्नसंस्कृती, समान धर्मश्रद्धा यामुळे त्यांच्यात एक जमात केंद्री आत्मीयता निर्माण झालेली असते. त्यांच्या आचार-विचारात आणि जीवनविषयक दृष्टीकोनात कमालीचे साम्य आढळते.

१०) जमात प्रमुखाला महत्त्वाचे स्थान : प्रत्येक आदिवासी जमातीचा एक प्रमुख असतो. तो त्यांचा नायक असतो. त्यांच्या शब्दाचे सर्वजण पालन करतात. युद्ध संरक्षण, स्थानिक व्यवस्था, जमातीच्या कायद्याचे प्रशासन, न्यायदान ही राजकीय कार्ये तो पार पाडतो. काही वेळा अशा कारणांसाठी जमातीतील वृद्ध व अनुभवी लोकांची समिती असते.

आपली प्रगती तपासा.

१) आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१.५.४ आदिवासी, ग्रामीण व नागरी समाजातील फरक :

क्र.	फरक घटक	आदिवासी समाज	ग्रामीण समाज	नागरी समाज
१.	प्रमाण लघुत्तम	समुदायाचा लहान आकार, कुटुंबाची मर्यादित संख्या, जमातीची कमी लोकसंख्या	१०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या लोकवस्तीला ग्रामीण लोकवस्ती म्हणतात.	१०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या लोकवस्तीला नागरी लोकवस्ती म्हणतात.
२.	प्रादेशिक विलगता	विशिष्ट भू-प्रदेश, डोंगराळ प्रदेश, घनदाट जंगल, पाण्याने वेढलेले बेट यासारख्या नैसर्गिक तटबंदीमुळे बाह्य जागाशी संपर्काचा अभाव	वाहतुक व दळण-वळणाच्या साधनांमुळे बाह्य जगाशी मोठ्या प्रमाणात संपर्क शहरी-ग्रामीण सीमारेषा पुसट तरीही शहराच्या मानाने कमी संपर्क.	वाहतुक व दळण-वळणाची अद्यायावत साधन बाह्य जगाशी मोठ्या प्रमाणात संपर्क अद्ययावत माहिती संपर्क व्यवस्था.
३.	पर्यावरण	पूर्णपणे नैसर्गिक निसर्गशक्तीचा प्रभाव	नैसर्गिक पर्यावरणा-बरोबर मानव निर्मित पर्यावरणाचा प्रभाव	मानवनिर्मित पर्यावरणाशी संबंध मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव मानवी प्रयत्न व वैज्ञानिक ज्ञानाचा प्रभाव.
४.	व्यवसाय	निर्वाह प्रधान व अत्यंत मागासलेले प्राथमिक व्यवसाय,खाद्यसंकलन, शिकार, मासेमारी, पशूपालन, मागासलेली शेती	शेती आणि बिगर शेती व्यवसाय आदिवासीं पेक्षा प्रगत शेती, पशु-पालन, उद्योग, व्यापार व इतर बिगर शेती व्यवसायाचे अस्तित्व	औद्यौगिक उत्पादन, व्यापार, वाहतुक, दळणवळण अशा दुय्यम आणि तृतीय क्षेत्रातील सर्व व्यवसायांचे अस्तित्व.
५.	लोकसंख्येची घनता	लोकसंख्या अत्यंत विरळ	आदिवासी क्षेत्रापेक्षा लोकसंख्येची घनता अधिक पण शहरी भागापेक्षा लोकसंख्येची घनता कमी असते.	प्रतीचौरस किलोमीटरला ४०० पेक्षा अधिक लोकसंख्या राहते. समुदायाचा आकार मोठा लोकसंख्येची घनता

				अधिक.
६.	सामाजिक विविधता	पूर्णपणे सजातीय कारण समान नाव, समान वस्ती, स्थान, समान भाषा, धर्मदाय, प्रभागत कायदे, समान व्यवसाय, सामाजिक समानता	अनेक जातीजमातीचे लोक राहतात. तरीही रूढी परंपरा, चालीरीती, जीवनविषयक दृष्टीकोन याबाबत सभासदात एकजिनसीपणा.	अनेक जाती, जमाती, विविध भाषा, विचार, वेगवेगळ्या, जाती, धर्माची माणसे आढळतात. पण त्याच्यात सहकार्याची भावना आढळते.
७.	सामाजिक गतिशीलता	सामाजिक व्यावसायिक, भौगोलिक गतिशीलता अजिबात नाही.	सामाजिक, व्यावसायिक, भौगोलिक गतिशीलता कमी प्रमाणात आढळते.	सामाजिक, व्यावसायिक, भौगोलिक गतिशीलता फार मोठ्या प्रमाणात आढळते.
८.	सामाजिक आंतरक्रिया	सामाजिक आंतरक्रिया समुदायापुरती मर्यादीत-बोलीभाषा लिपी आणि लोककलेचा अभाव एकच भाषा-अनौपचारिक प्राथमिक साधे प्रामाणिक टिकाऊ सामाजिक संबंध	सामाजिक आंतर-क्रिया समुदाया-बरोबरच समुदायाच्या बाहेर ही अस्तित्वात प्रमाण भाषा व बोलीभाषा दोन्हींचा वापर लेखनकला मर्यादीत प्रमाणात अनेक भाषा सामाजिक संबंध अनौपचारिक प्राथमिक टिकाऊ स्वरूपाचे	मोठ्या प्रमाणात सामाजिक संबंध, राज्यभाषा, राष्ट्र भाषा आणि आंतर राष्ट्रीय भाषा याचाही वापर त्यांची लेखनकला दुय्यम आणि औपचारिक सामाजिक संबंध त्यांचे स्वरुप प्रासंगिक आणि तदर्थ स्वरूपाचे
९.	तंत्रज्ञान	साधी अर्थव्यवस्था मर्यादित तंत्रविद्या-पुरातन पद्धतीची मर्यादित व साधी अवजारे शारीरिक कष्टावर भर.	शेती, ग्रामोद्योग, सेवाक्षेत्र याठिकाणी परंपरागत तंत्राबरोबर आधुनिक तंत्राचा वापर, अनेक प्रकारची यंत्रे व अवजारे, उत्पादना अनेकांचा एकमेकांशी समन्वय	उद्योग, व्यापार, सेवाक्षेत्र याठिकाणी आधुनिक तंत्राचा वापर, अनेक प्रकारची यंत्रे व अवजारे यांचा वापर श्रमविभागणी व विशेषीकरण, बाजारभिमुख उत्पादनपद्धती
१०.	धर्मश्रद्धा	धर्माबद्दल टोकाची मते नाहीत. तात्विक काथ्याकूट नाही. संघर्ष नाही, निसर्गपूजा, भूत पूजा, पूर्वजपूजा, जादूटोणा, मंत्रतंत्र, भगत यावर विश्वास	धर्माबद्दल मतमतांतेर पंथभेद, जातीभेद, आचारभेद, द्वेष, निसर्गातील कार्यकारणभाव समजल्याने त्याबद्दल आदर नाही. मात्र निसर्गातील काही तत्वांची पूजा, जादूटोणा,	वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात धर्म या कल्पनेला कमी महत्त्व जातीभेद, पंथभेदाला थारा नाही. प्रत्येक जण स्वतःच्या धर्मानुसार आचरण करतो पण टोकाची मते नाहीत. अंधश्रद्धेला थारा नाही.

			मंत्रतंत्रावर विश्वास नाही.	
११.	समाज केंद्रीयता	समाज केंद्रीय आत्मीयता जीवन-विषयक दृष्टीकोनात एकवाक्यता समाजात एकजीनसीपणा	जमात केंद्रीयतेचा अभाव जीवनविषयक दृष्टीकोन विविधता-समाजात एकजीनसीपणाचा अभाव	विविध धर्म, जाती, पंथ, भाषा प्रांतातून आलेले लोक जमात केंद्रीयतेला थारा नाही जीवनविषयक दृष्टीकोनात कमालीची विविधता
१२.	कायदा	लोकनीती, लोकरूढी, रीतीरिवाज, सामाजिक नियमांनी वर्तणूक-जातपंचायत न्याय व्यवस्था	रीतीरिवाज, परंपरा, प्रथा, रूढी, सण यांचे पालनपण कायद्याचे व्यक्तीच्या वर्तनाचे नियमन-जातपंचायतीला गौण स्थान	कमालीच्या सामाजिक विविधतेमुळे रीतीरिवाज, परंपरा, प्रथा, रूढी पुसट होतात. कायद्याने व्यक्तीच्या वर्तनाचे नियमन जात पंचायत कल्पना कालबाह्य

आपली प्रगती तपासा.

१) ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजातील फरक स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१.५.५ विविधतेचा एक फरक या दृष्टीकोनातून विचार :

विविधतेतून भिन्नता प्रत्ययाला येते. तर तफावत किंवा असमानता यातून विषमता प्रत्ययाला येते. विविधता ही एक नैसर्गिक घटना आहे तर विषमता तफावत ही मानवनिर्मित कृती आहे. तफावत ही मानवीसंस्कृती इतकीच जुनी घटना आहे. जातीच्या बाबतीत ही विषमता दिसून येते. सध्याच्या लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये विविधता मूल्य मोलाचे मानले जाते. त्याचवेळी विविध कायदेशीर उपाययोजना आणि जाणीवजागृतीच्या माध्यमातून तफावत किंवा विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

विविधता हे भारताचे अभिन्न अंग आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये ही विविधता दिसून येते. नैसर्गिक आणि भौगोलिक परिस्थितीमध्येही ही विविधता अस्तित्वात आहे. विविधता मानवी जीवनात रंगत निर्माण करते पण त्याचबरोबर संभाव्य संघर्षाचा स्त्रोत मानली जाते. भारताच्या विविध भागात भौगोलिक वैशिष्ट्ये जशी वेगवेगळी आहेत त्याठिकाणी वनस्पतीजीवन आणि प्राणी जीवनही विविध प्रकारे आहे. त्यानुसार त्याठिकाणची संस्कृती, अन्नसवयी, धर्म, भाषा, केशभूषा, वेशभूषा, जीवनशैली, कला आणि संगीत वेगवेगळे आहे. ही विविधता हा अभ्यासाचा एक मोठा स्त्रोत आहे. त्यामुळे विदेशी विद्वान भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाकडे आकर्षित

होतात. विविधतेमुळे भिन्नता प्रत्ययाला येते. या भिन्नतेला समजून घेऊन प्रत्येक व्यक्तीला तिच्याशी समायोजन करावे लागते. जागतिकीकरण, दूरध्वनी संदेशवहनामध्ये झालेली क्रांती, इंटरनेट यामुळे या विविधतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रवेश आणि आंतरराष्ट्रीय दळणवळण यामध्ये झालेली वाढ यामुळे विविधतेच्या मुद्याला आणखी महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या त्याचप्रमाणे विद्यापीठे त्यांचे कर्मचारी आणि विद्यार्थी त्यांच्यासाठी विविधता प्रशिक्षणाचे आयोजन करीत आहेत की ज्यामुळे विविध गट, विविध समाज, विविध संघटना यांच्यातील फरक त्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजेल, ज्याद्वारे ते नवीन परिस्थितीशी लवकर समायोजित होऊ शकतील. या विविधतेच्या स्वीकारामुळे मानवी संघर्ष कमी होतात. परस्परसंबंधामध्ये वाढ होते. त्यामुळे कार्यक्षमतेमध्ये होणारी वाढ, प्रगती आणि समृद्धी यामध्ये वाढ घडवून आणते. भारत हा बहुवांशिक, बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक, बहुप्रादेशिक देश आहे. या बहुविधतेशी प्रत्येकाने समायोजन साध्य केल्यास संघर्षाऐवजी समृद्धिमध्ये वाढ होईल.

१.६ तफावत एक विषमता या दृष्टीकोनातून विचार

तफावत या संकल्पनेतून विषमता प्रत्ययास येते. तफावत ही नैसर्गिक प्रकृती नाही तर विविध मानवी प्रकृतीमुळे निर्माण झालेली आहे. काही मानवी प्रकृती विषमता निर्माण करण्यासाठी तफावत निर्माण करतात. तफावतीमुळे, विषमतेमुळे संघर्षाची निर्मिती होते. या विषमतेचा बळी असणारा जो सामाजिक गट आहे तो जाणीव जागृतीमुळे तिला विरोध करतो. समाजाच्या तळाच्या गटाच्या कल्याणाला आणि विकासाला विषमता, वर्गव्यवस्था, वंशभेद, वर्णभेद, लिंगभेद ही विषमतेची उदाहरणे आहेत. मानवी समाजाच्या सर्व अवस्थामध्ये आणि सर्व समाजामध्ये विषमता वेगवेगळ्या स्वरूपात अस्तित्वात असलेली दिसून येते. विषमता अनेक मार्गानी कमी करता येते. सरकारी प्रयत्नाने आणि उपाययोजनांनी विषमता कमी करता येते. सरकार आपले धोरण, नियोजन आणि कल्याणकारी उपाययोजना याद्वारे विषमता कमी करू शकते. विषमता कमी करण्याच्या कामामध्ये सरकार कायदा आणि स्वयंसेवी संस्थाची मदत घेऊ शकते. विषमता हे मानवी समूहातील संघर्षाचे मूळ आहे. त्यांचे स्वरुप-आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, राखीव जगांबाबतचे सरकारचे धोरण, विशिष्ट धर्माला दिल्या जाणाऱ्या विशेष सवलती असे असते.

आपली प्रगती तपासा.

१) 'विविधतेतील एक फरक' यावर सविस्तर लिहा.

_____

_____

_____

_____

१.७ सारांश

भारत हा भाषा, वंश, धर्म, संस्कृती, प्रादेशिकता इ. दृष्टिकोनातून विविधता असणारा देश आहे. येथे अनेक धर्माचे लोक आपली धार्मिक विविधता जपूनही एकोप्याने राहतात. भारतात प्रत्येक धर्मातील चालीरीती, रुढी, परंपरा आणि संस्कृती वेगवेगळी आहे. भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये भौगोलिक विविधता ही मोठ्या प्रमाणावर दिसून येते. लोकसंख्या विभागणीच्या दृष्टीने विचार केल्यास आजही लोक खेड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करीत असल्याचे दिसून येते. ग्रामीण लोकांनी मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर केल्याने भारतातील शहरांची संख्या झपाट्याने वाढत आहे. या ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजाची वेगवेगळी वैशिष्ट्ये असल्याचे दिसून येते.

१.८ पाठावर आधारित प्रश्न

१) भारतीय समाजाचे लोकसंख्येच्या आधारे बहुधार्मिक स्वरूप स्पष्ट करा.
२) लिंगभेदावर आधारित विषमतेचे स्वरूप स्पष्ट करा.
३) भारताची भाषिक विविधता स्पष्ट करा.
४) भारतीय ग्रामीण समाजाची व्याख्या सांगुन वैशिष्ट्ये लिहा.
५) शहरी समाज म्हणजे काय ? वैशिष्ट्ये सांगा
६) आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये लिहा.
७) ग्रामीण, शहरी व आदिवासी समाजातील फरक स्पष्ट करा.
८) टिपा लिहा.
   १) विविधतेतील विषमता
   २) आदिवासी समाज
   ३) भाषिक विविधता
   ४) शहरी समाज
   ५) ग्रामीण समाज

❖❖❖❖

2

लिंग भिन्नता व स्त्रीयांवरील अत्याचार
(Gender Disparity and Female Violence)

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता
२.३ लिंग भिन्नतेमुळे निर्माण होणारी भिन्नता
२.४ भारतीय समाजातील स्त्रीयांचे स्थान
२.५ स्त्रीयांवरील अत्याचार
२.६ स्त्री-भ्रुणहत्या
२.७ लिंग-गुणोत्तर प्रमाण
२.८ स्त्रीया आणि प्रसारमाध्यमे
२.९ भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय
२.१० सारांश
२.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न

२.० उद्दिष्टे

- लिंग भिन्नतेची संकल्पना समाजवून घेता येईल.
- स्त्रीयांवरील अत्याचाराचा सविस्तर अभ्यास करता येईल.
- भ्रुणहत्या व लिंग गुणोत्तर प्रमाणाचा अभ्यास करता येईल.
- प्रसार माध्यमांच्या स्त्रीयांविषयीच्या भूमिके संदर्भात जाणून घेता येईल.

२.१ प्रस्तावना

तात्विक दृष्टिकोनांतून 'समानता' हा सदगुण (Virtue) आहे, म्हणून मानवी समाजामध्ये नेहमी समानतेची अपेक्षा केली जाते. किंबहुना ज्या समाजामध्ये समानता आहे. तोच समाज सुदृढ असतो व अनेक समस्येपासून मुक्त असतो. परंतु आपण सद्यपरस्थितीचा विचार

केल्यास अनेक प्रकारच्या समस्या आज समाजामध्ये दिसत आहेत. समाजातील सर्व प्रकारच्या समस्या. लिंगभेद, जातीभेद, वर्णभेद, भाषाभेद, प्रांतभेद, वंशभेद इत्यादी प्रकारच्या भेदामुळे निर्माण झालेल्या दिसून येतात. हे सर्व प्रकारचे भेद समानतेच्या अथावामुळे म्हणजेच असमानतेमुळे अस्तित्वात येतात. यामुळे असमानतेला दुर्गुण (Vice) समजले जाते.

समाजाचा सुमारे अर्धाभाग पुरुष आणि अर्धाभाग स्त्री असल्याने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्री आणि पुरुष हे दोन्हीही खऱ्या अर्थाने विकसित असणे गरजेचे आहे. त्यासाठी स्त्री – पुरुष समानता आवश्यक आहे. वैदिक काल खंडामध्ये स्त्री – पुरुष समानता होती. परंतु वैदिक काल खंडानंतर स्त्री-पुरुष समानता न राहता लिंगभेद ही समस्या उभी राहिली. स्त्रीयाना हीन, दीन लाचार समजून एक भोग्य वस्तू समजले जावू लागले. आधुनिक काळामध्ये अनेक समाजसुधारक व प्रबोधनकार यांनी स्त्रीची अनेक समस्येतून मुक्तता करण्यासाठी प्रयत्न केले, परंतु आजही स्त्री पूर्णपणे समस्येतून मुक्त झालेली नाही. आजही तिच्यावर अनेक प्रकारचे अत्याचार होत आहेत.

२.२ असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता

समाजामध्ये स्त्री –पुरुष, गरीब – श्रीमंत, उच्च – नीच, श्रेष्ठ – कनिष्ठ, इत्यादी अनेक प्रकारच्या विषमता म्हणजेच भिन्नता दिसतात. या भिन्नता असमानातामुळे निर्माण होतात. परंतु अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे असमानतेला सकारात्मक व नकारात्मक (Positive & Negative) असे दोन दृष्टिकोन आहेत. सकारात्मक दृष्टीकोनातून असमानतेचा विचार केल्यास असमानता मानवी जीवनासाठी म्हणजेच समाजासाठी हानीकारक असू शकत नाही. त्यासाठी असमानतेचा तात्विक दृष्टिकोनांतून विचार केला पाहिजे.

वास्तविक पाहता निसर्गामध्ये असमानता राहणाराच, परंतु त्या असमानतेमध्ये समन्वय व सहकार्य (Co-ordination & Co-operation) या दोन्हींची ही आवश्यकता आहे. असमानतेमध्ये समन्वय व सहकार्य हे दोन्हीही एकाच वेळी कार्यान्वित होत असतील, तर असमानतेमुळे विधायक कार्य होऊ शकते. यालाच 'विविधतेतील एकता' (Unity in Diversity) असे म्हटले जाते. भारतामध्ये अशा प्रकारे विविधतेत एकता दिसून येत होती. परंतु यासाठी समन्वय व सहकार्य या दोन्हींचीही आवश्यकता आहे. परंतु सद्यपरस्थितीमध्ये. एकता आपल्या देशांमध्ये दिसत नाही कारण समन्वय व सहकार्य (Co-ordination & Co-operation) या दोनही बाबीचा अभाव आहे.

निसर्ग नियमानुसार एखादे कार्य होण्यासाठी असमानतेची आवश्यकता आहे. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे हाताच्या बोटांची लांबी असमान आहे, म्हणून हाताच्या बोटांनी आपणांस कोणतेही कार्य आपण करु शकतो. जर हाताच्या बोटांची लांबी समान असती तर आपणांस हाताने व्यवस्थित कार्य करता आले नसते. या दृष्टीकोनातून विचार केल्यास निसर्गामध्ये आणि मानवी जीवनांमध्ये असमानता असणार. मग या ठिकाणी एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे 'असमानता बाधक, हानिकारक, विध्वंसक मानवी जीवनाला व निसर्गाला बाधक केव्हा ठरते ?

या प्रश्नांचा खोल विचार केल्यास एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे, जेव्हा असमानतेचा उपयोग मानव जेव्हा स्वार्थासाठी करतो, स्वतःचा अहंकार पुष्ट करण्यासाठी करतो. अनैतिक मार्गाने पद, सत्ता, प्रतिष्ठा, पैसा इत्यादी मिळवण्यासाठी प्रयत्न करतो, तेव्हा असमानता मानवी जीवन आणि समाजासाठी बाधक, हानिकारक व विध्वसंक ठरते. हीच असमानतेची नकारात्मक बाजू होय. असमानतेच्या या नकारात्मक बाजूमूळे वेगवेगळया प्रकारचे जातीभेद, वंशभेद, प्रांतभेद, भाषाभेद, लिंगभेद इत्यादी अनेक प्रकारच्या भेदांची निर्मिती होऊन मानवी समाजामध्ये भिन्नता उभी राहते. अशा वेगवेगळया प्रकारच्या भिन्नतेमुळे मानवी जीवन अध : पतित मार्गाकडे जाते.

आज सगळीकडे आर्थिक विषमता (भिन्नता) दिसून येते. गरीबी व श्रीमंती यांच्यातील दरी वाढतच चालली आहे. सद्यपरीस्थितीमध्ये गरीबाची गरीबी वाढतच आहे आणि श्रीमंताची श्रीमंती वाढतच चालली आहे. त्यामुळे पराकोटीची गरीब –श्रीमंत ही भिन्नता आज समाजामध्ये दिसून येते, म्हणून सर्व स्तरावर, सर्व प्रकारे आर्थिक समानता आणण्याचा प्रयत्न चालू आहे. सर्वांना समान वित्त कसे मिळेल ? यासाठी प्रयत्न चालू आहे. परंतु खरोखर प्रत्यक्ष व्यवहारामध्ये प्रत्येकाला समान वित्त मिळून आर्थिक समानता येईल का ? या प्रश्नांचे उत्तर नकारार्थी मिळते, कारण प्रत्येकाची बुध्दीशक्ती, शारिरीक शक्ती, वेगवेगळी राहणार . त्यामुळे प्रत्येकाला समान वित्त येऊन आर्थिक समानता येणं. ही गोष्ट अशक्य प्राय वाटते. मग आर्थिक समानता याचा नेमका अर्थ काय ?

तात्विक दृष्टिकोनातून आर्थिक समानतेमध्ये प्रथम अत्यंत महत्त्वाची गोष्ट येते,की प्रत्येकांने पैसा म्हणजेच अर्थ प्रामाणिकपणे कष्ट करुन मिळवला पाहिजे. आळसामध्ये जीवन घालवून फुकटचे मिळवण्याचा प्रयत्न करु नये. वाईट मार्गाने पैसा मिळवला, तर एकाच ठिकाणी संपत्तीचा संग्रह होतो. तेव्हा प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्याला पैसा मिळू शकत नाही. ही खऱ्या अर्थाने आर्थिक असमानता आहे. म्हणून आर्थिक समानतेमध्ये प्रामाणिकपणे कष्ट करुन पैसा मिळवणे म्हणजेच 'कर्म देवो भव। (Work is Worship)' प्रत्यक्ष व्यवहारामध्ये येऊन खरी श्रमप्रतिष्ठा उभी राहते. अशा प्रकारे आर्थिक समानतेमध्ये श्रमप्रतिष्ठा उभी राहणं, ही प्रथम आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे समाजामध्ये प्रत्येक मानवांत दैवी भ्रातृभावाचा संबंध आहे, तो मानवाला समजणं खूप गरजेचे आहे. वास्तविक पाहता प्रत्यक्ष व्यवहारामध्ये प्रत्येकांकडे समान वित्त नसणार. आहे रे नाही हे (Haves and Havenots) असे वर्ग असतात, तेव्हा दैवी भ्रातृभावाच्या नात्याने एक नैतिक कर्तव्य म्हणून आहे. आहे रे (Haves) हे नाही रे (Have nots) ची केअर – टेकरच्या भूमिकेतून काळजी घेऊ शकतात. हीच अपरिग्रहाची कल्पना समाजामध्ये रुजवण्याचा प्रयान महात्मा गांधीनी करताना त्यांनी विश्वस्त (Trusteeship) ची संकल्पना सांगितलेली आहे. आर्थिक असमानतेचा हा सकारात्मक दृष्टिकोन आहे. परंतु आर्थिक असमानतेचा नकारात्मक दृष्टीकोन म्हणजे कोणत्याही वाईट मार्गाने, भ्रष्ट मार्गाचा वापर करुन सामान्य जनतेची पिळवणूक करुन पैसा मिळवणे हा आहे, म्हणून आर्थिक समानता याचा अर्थ श्रम प्रतिष्ठा उभी राहून आर्थिक असमानतेचा सकारात्मक दृष्टिकोन होय.

याच प्रकारे समाजामध्ये निर्माण होण्याऱ्या प्रत्येक भिन्नतेचा विचार करता येतो. समाजामध्ये निर्माण होणारी प्रत्येक भिन्नता ही असमानतेच्या नकारात्मक दृष्टिकोनांमुळे निर्माण होते. असमानतेमुळे निर्माण होणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या भिन्नता समाजाच्या सुदृढतेसाठी समूळ नष्ट होणे खूप गरजेचे आहे. यासाठी असमानतेच्या सकारात्मक बाजूचा उपयोग करुन ही

सर्व प्रकारची भिन्नता नष्ट करता येते. तोच खरा व प्रामाणिक मार्ग होय. म्हणजेच दुसऱ्या शब्दांमध्ये आपण असे म्हणू शकतो की असमानतेचा सकरात्मक दृष्टीकोन म्हणजेच खरी समानता होय. या प्रकारच्या समानतेमुळे सर्व भिन्नता नष्ट होतात.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न "असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता" ही संकल्पना असमानतेचा सकारात्मक व नकारात्मक दृष्टीकोनाच्या साहयाने सविस्तर स्पष्ट करा.

२.३ लिंग भिन्नतेमुळे निर्माण होणारी भिन्नता

स्त्री आणि पुरुष मिळून समाज तयार होतो. स्त्री आणि पुरुष या दोघांच्या गुणांचा एकत्रित विचार केल्यास पूर्ण व्यक्ती बनते. अर्धनारी नटेश्वर हे याचेच प्रतिक आहे. जन्मतःच पुरुषांमध्ये पराक्रम, धाडसी वृत्ती इत्यादी आणि स्त्रियांमध्ये सहनशिलता, प्रेमळपणा, आत्मीयता, दयाळूपणा इत्यादी गुण असतात.

स्त्रियांच्या विकासामध्ये प्रामुख्याने जन्मजात मिळालेल्या गुणांचे संवर्धन आणि पुरुषांकडे असलेले पराक्रम, धाडसीपणा यासारखे गुण विकसित करणे या बाबींचा समावेश होतो.

परंतु स्त्रियांच्या विकासामध्ये फक्त भौतिक विकासाच्या दृष्टिकोनातून केवळ आर्थिक विकासाचाच विचार केला जातो आणि आज नेहमी एक प्रश्न उपस्थित केला जातो स्त्री श्रेष्ठ की पुरुष श्रेष्ठ? आज स्त्री शिक्षणांमुळे स्त्रीया शिकल्या पुरुषांपेक्षा श्रेष्ठ बनत आहेत, असे मानले जाते परंतु वेदकाळामध्येही स्त्रियांना सांस्कृतिक पध्दतीचे शिक्षण मिळत असे व स्त्री –पुरुष समानता होती. पण काळाच्या ओघामध्ये ही स्त्री – पुरुष समानता नष्ट झाली आणि लिंगभेद निर्माण झाला. पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ अशी विचारधारा समाजामध्ये रुढ झाली आणि स्त्री वरती अन्याय, अत्याचार, जुलुम इत्यादी अनेक प्रकारच्या अनिष्ट गोष्टी ओढवल्या गेल्या. तिला फक्त भोगवस्तू समजून हीन लेखले जाऊ लागले. अशा प्रकारे लिंग भेदामुळे पुरुष आणि स्त्रीयांमध्ये श्रेष्ठ –कनिष्ठ, उच्च – नीच इत्यादी प्रकारची भिन्नता, असमानता निर्माण झाली. स्त्रीयांवर अनेक प्रकारची वाईट बंधने आली. तिचे खऱ्या अर्थाचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. अशा विपरीत काळामध्ये स्त्री – पुरुष, समानता येण्यासाठी खूप प्रयत्न झाले व आजही चालू आहेत. परंतु आज स्त्री – पुरुष समानतेचा अर्थ अतिशय विपरित घेतलेला दिसतो. तो म्हणजे पुरुष जे जे काम करतो. ती सर्व कामे स्त्रीयांही करु शकतात. वास्तविक पाहता उपजात गुणांनुसार

कामाची विभागणी स्त्री – पुरुषांमध्ये झालेली दिसते. स्त्रीयांकडे प्रेम, आत्मीयता, सहनशीलता इत्यादी गुण असल्याने ती कुटुंबाची काळजी घेणे व सदगुणांच्याा दृष्टीने कुटुंबातील सर्वांचा विकास ती उत्कृष्ट पध्दतीने करु शकते व पुरुष शौर्य, पराक्रम, धाडसी वृत्ती यांच्या साह्याने तो कुटुंबासाठी कमावतो, त्याचे विनिमय घरातील जेष्ठ महिलांनी करायचे. परंतु आजच्या काळात स्त्री – पुरुष समानता यांचा अर्थ पुरुष जे करतो. ते स्त्रीने करणे, असा घेतला जात आहे.

स्त्री – पुरुष समानतेचा नेमका व अचूक अर्थ वेद, उपनिषदे (वेदांत) गीता इत्यादींनी सांगितलेला आहे, तो खऱ्या अर्थाने आधुनिक विचार आहे. या विचारधारेनुसार स्त्री व पुरुष हे आध्यत्मिक दृष्टिकोनातून समान आहेत. जी भगवदशक्ती पुरुषांमध्ये आहे, तीच शक्ती स्त्रियांमध्ये आहे. म्हणून मनुष्यामधील मनुष्यत्वाच्या अर्थाने 'एक व्यक्ती' या नात्याने स्त्री – पुरुष समान आहेत. आध्यात्मिक विकास करण्याचा अधिकार स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान आहे. म्हणून स्त्रीसुध्दा एक मनुष्य आहे, व्यक्ती आहे तिलाही मन,बुध्दी, भाव आहे. तिच्यावर कोणत्याही प्रकारे अत्याचार, जूलूम होऊ नयेत ही विचारधारा म्हणजे. स्त्री – पुरुष समानता होय. आज सुधारणेच्या नावाखाली, आधुनिकतेच्या नावाखाली पुरुषी स्त्री (Manly Woman) बनत आहे. गांधीजीचा स्त्री – पुरुष समानतेचा विचार सांगतांना बी. के. लाल लिहितात.

"Gandhi says, men and women have the same soul, and therefore are equal. The work assigned to one is not inferior to the work assigned to the other. Man, by nature, is physically strong and therefore. He puts in hard labour to support and protect the family. Women, by nature are loving and therefore, they are equipped by nature to play the role of a mother and the caretaker of the home. Both these duties are equally important and necessary. This must be realized by both men and women."

स्त्रियांच्या उपजत गुणांच्या विकासाच्या दृष्टिकोनांतून आज स्त्री –शिक्षणाची आवश्यकता आहे. आजची स्त्री फक्त बाहय सौंदर्य वाढवण्यासाठी खूप प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नात ती आंतरिक सौंदर्य असते. हेच विसरुन जाते. आंतरिक सौंदर्य म्हणजे मन, बुध्दी, भाव यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे. यासाठी जीवनांमध्ये आत्मविश्वास प्रामाणिकपणा, त्याग,सहनशिलता ही मूल्ये यावीत. या दृष्टीकोनातून विचार केल्यास लिंग भिन्नता राहणार नाही. त्यामुळे वेगवेगळया प्रकारच्या भिन्नता समाजातून समूळ नष्ट होतील.

बुध्दिमान, कर्तत्त्ववान, स्त्रिया सर्व काळात, सर्व संस्कृतीत दिसून येतात, परंतु तरीही सामान्य स्त्रीचे महत्त्व पुरुषांच्या तुलनेत सर्वत्र दुय्यम मानले गेले. आधुनिक विज्ञान व यंत्रयुगाचा उदय (औद्योगिक क्रांती) यामुळे उत्तरोउत्तर स्त्री स्वातंत्र्याला योग्य असा काळ येऊ लागला. २० व्या शतकाच्या उत्तराधीत माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे ज्ञान – बुदधिमता यांना असाधारण महत्त्व झाले आहे. शरीर सामर्थ्यात स्त्री – पुरुषात फरक असला तरी बुध्दिमत्तेच्या बाबतीत स्त्रिया पुरुषां इतक्याच बुध्दिमान असल्याचे आढळते. यामुळे २१ व्या शतकात स्त्रीयुक्ती, योग्य अर्थाने स्त्री – पुरुष समानता, ही ध्येये साध्य करणे सोपे होणार आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - लिंग भिन्नतेमुळे निर्माण होण्याच्या भिन्नता सांगा व स्त्री – पुरुष समाजतेचा खरा अर्थ स्पष्ट करा.

२.४ भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान

भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान समजण्यासाठी खालील तीन कालखंडाचा विचार करावा लागेल.

३.४.१ वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे समाजातील स्थान.
३.४.२ वैदिक कालखंडानंतर स्त्रीयांचे समाजातील स्थान.
३.४.३ सध्याचे स्त्रीयांचे समाजातील स्थान

२.४.१ वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे समाजातील स्थान.

वैदिक कालखंडामध्ये भारतीय स्त्रीयांना समाजामध्ये गौरवाचे व शक्तिशाली स्थान होते. त्या काळी स्त्रीयांना आपले विचार व्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते निरनिराळया कार्यक्रमांमध्ये, उत्कृष्ट पध्दतीने कृतिशील असत. प्राचीन हिंदू धार्मिक ग्रंथामध्ये सक्तीचे वर्णन शक्ती आणि प्रकृती म्हणून केले आहे.

- शक्ती

शक्ती म्हणजे वैश्विक तत्त्वाला गतीशिल करणारी उत्तेजना देणारी ऊर्जा होय. उदा. कालिका देवी ही उर्जायुक्त, शक्तिमान व दुष्टांचा नाश करणारी आहे.

- प्रकृति

प्रकृति म्हणजे निसर्ग होय. प्रकृति ही कतिशील आहे.

महत्त्वाचे म्हणजे भारतातील इतिहासाला ज्ञात असलेल्या वैदिक कालखंडात स्त्रियांचे समाजातील स्थान पुरुषांच्या बरोबरीचे होते. विविध उपक्रमामध्ये, कार्यक्रमांमध्ये स्त्रियांना भाग घेण्याचे व स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याचे व्यक्ती स्वातंत्र्य होते. उदाहरणार्थ स्वयंवराची प्रथा होय. स्वयंवराच्या प्रथेमुळे स्त्रियांना विवाहविषयक निर्णय घेण्याचे व बालविवाह अस्तित्वात नसल्याचे निर्दशनास येते. या कालखंडात मुलांप्रमाणे मुलीवरही उपनयन संस्कार करत असत.

त्याचप्रमाणे मुलींना शिक्षणही घेता येत होते. विवाह जुळवण्यास कुटुंबाचा पुढाकार असला तरी मुलींचे मत विचारात घेतले जात होते. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रियांना पुर्न विवाह करण्याची त्याचप्रमाणे विवाह विच्छेदनाचा अधिकार होता. ग्रहस्थाश्रमातील सामाजिक व धार्मिक कार्यात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत असत.

वैदिक कालखंडातील स्त्रिंया वेद वाङमयाचा अभ्यास करीत आणि वेगवेगळया प्रकारच्या वाद-विवादामध्ये त्या पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत असत. तपोवन शिक्षण पध्दती चालवण्यामध्ये त्यांचा सहभाग पुरुषांच्या बरोबरीने असत. उदाहरणार्थ मैत्रेयी, गार्गी इत्यादी विद्वान स्त्रिंया वादविवादामध्ये निपूण असून इतरही अनेक सांस्कृतिक कार्यक्रमामधील सहभाग महत्त्वपूर्ण होता. अशा प्रकारे वैदिक कालखंडातील स्त्रिया विकसित असून एक मानव या संबंधाने स्त्री – पुरुष समानता दिसून येते. त्यामुळे त्याकाळी समाज व्यवस्थाही सुदृढ असल्याचे दिसते. स्त्रियांवरती अन्याय, जुलूम इत्यादी अनिष्ट प्रकारच्या कोणत्याही बाबी दिसून येत नाहीत. त्यामुळे या काळामध्ये संतुलित अशी विकसित समाज रचना दिसून येते.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न - वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे स्थान स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२.४.२ वैदिक कालखंडानंतर स्त्रीयांचे समाजातील स्थान

वैदिक कालखंडानंरचा काळ हा स्त्रीयांच्या स्थित्यंतरातील दुसरा कालखंड होय. या कालखंडात स्त्रीयांची भूमीका मर्यादित करण्यात आली. आई, बहिण, बायको व मुलगी एवढयापुरतीय सिमीत करण्यात आली. मनुस्मृती आणि अन्य धर्म - शास्त्राप्रमाणे स्त्रीला परावलंबी करण्यात आले म्हणजे तिला पुरुषांवर अवलंबून राहावे लागले. त्यामुळे तिच्या हक्कांवर, व्यक्ती स्वातंत्र्यावर संकट आले. मनुस्मृती आणि धर्मशास्त्रांनी स्त्रीच्या वागण्यावर बंधने घातली, वेगवेगळया प्रकारचे नियम केले त्यावर नियंत्रण पुरुषांचे ठेवण्यात आले. सामाजिक सुरक्षिततेच्या नावाखाली तिच्यावर अनेक बंधने लादण्यात आली, 'चूल आणि मूल' हे स्त्रीचे कार्यक्षेत्र बनले. स्त्री ही उपभोग्य वस्तू समजली जावु लागली. या दुसऱ्या कालखंडात स्त्रीवर पुढीलप्रमाणे अनेक बंधने घालण्यात आली.

- हुंडापध्दती सुरु झाली.
- स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले.
- देवदासी ही अनिष्ठ प्रथा रुढ झाली.
- सती जाण्याची पध्दत प्रस्थापित झाली.

- विधवा स्त्रीयांना पुनर्विवाहाचा अधिकार नाकारण्यात आला.
- बहुपत्नीत्व प्रथा अस्तित्वात आली.
- स्त्रीयांचे सामाजिक स्थान व दर्जा खालावला.
- स्त्री दुर्बलतेचे प्रतिक बनली.

वरील प्रमाणे सर्वप्रकारची बंधने या कालखंड स्त्रीयांवर लादल्यामुळे लिंगभेद निर्माण होऊन स्त्री –पुरुष असमानता समाजामध्ये निर्माण झाली. पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ असे समजले जाऊ लागले व पितृस्ताक समाज निर्माण झाला. स्त्रीला हीन, दीन, लाचार समजले गेल्यामुळे समाज व्यवस्था असंतुलित होऊन अध:पतित झाल्याचे दिसून येते.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - वैदिक कालखंडावर स्त्रीयांचे समाजातील स्थान स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२.४.३ सध्याचे स्त्रीयांचे समाजातील स्थान

आधुनिक समाजाने स्त्री – पुरुष समानता मान्य केली आहे. स्त्री व पुरुष यांच्यात भेदभाव करु नये. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळायला हवे. एक व्यक्ती म्हणून स्त्रीला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. या सर्वांना विचार करुन भारतामध्ये राजा राममोहन रॉय यांच्यापासून ते महात्मा गांधीपर्यंत अनेकांनी स्त्रीयांच्या प्रश्नांना वाचा फोडली. स्त्रीवर्गांच्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. महाराष्ट्रात महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या समाजसुधारकांनी स्त्रीयांच्या सामाजिक गुलामगिरीच्या विरोधात सतत आवाज उठवला. स्त्रीयांना पुढील हक्क मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यांच्या प्रयत्नामुळे स्त्रीयांच्या समस्येसंबंधी जागृती निर्माण झाली. पुढील समस्ये संबधी वरील समाज सुधारकांनी विचार करुन त्यातून स्त्रीयांची सुटका करण्याच्या कसोसीने प्रयत्न केलेला दिसून येतो.

- केशवपन
- विधवा – विवाहबंदी
- बाल विवाह
- सतीची प्रथा
- स्त्रीयांचे शिक्षण
- स्त्रीयांचे स्वातंत्र्य इत्यादी.

त्याचप्रमाणे राजा राममोहन रॉय यांनी सतीची प्रथा बंद करण्यासाठी संघटित चळवळ केली. त्यांच्या प्रयत्नांना यश झाले आणि १८२९ साली सतीची प्रथा बंद करण्याचा कायदा अमलात आला.

स्वांतत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने स्त्री – पुरुष मूलभूत हक्क दिले व दुष्ट प्रथांवर कायदयाने बंदी घातली. ती पुढील प्रमाणे.

- पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना शिक्षणाच्या व रोजगाराच्या समान संधी उपलब्ध करुन दिल्या.
- मताधिकारासारख्या महत्त्वाचा हक्क मिळाला.
- सती, हुंडा, कन्याविक्रय, बहुपत्नीत्व यासारख्या दुष्ट प्रथावर बंदी घालण्यात आली.
- स्त्रीयांना घटस्फोटाचा अधिकार देण्यात आला.
- मालमत्तेतही कायदेशीर वाटा देण्यात आला.
- मालमत्तेतही कायदेशीर वाटा देण्यात आला.
- स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये १/३ जागा राखून ठेवण्यात आल्या.
- क्यक्तीगत स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला.

या सर्व तरतूदीमुळे सर्व स्त्रीया शिक्षण घेऊन अर्थाजन करु लागल्या आहेत सार्वजनिक जीवनात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या उचलत आहेत. लोकशाहीच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची बाब आहे.

अर्थात वरील तरतूदीमुळे स्त्रीयांचे सर्व प्रश्न सुटले नाहीत. हुंडाबळी, कुटुंबात होणारा छळ, मारहाण यासारख्या समस्या अनेक स्त्रीयांच्या वाटयाला येत आहेत. ज्या ठिकाणी स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे उदा. केरळ, मिझोराम व गोवा या राज्यात स्त्रीयांची पिळवणूक व अत्याचार यांचे प्रमाण कमी आहे.

भारतातील काही जाती – धर्मामध्ये पुरुषांना प्रत्येक बाबतीत प्राधान्य दिले जाते. उदा. शिक्षण, आहार, सामाजिक कार्यक्रम व काही धार्मिक प्रथा इत्यादी बाबीमध्ये पुरुषांना प्राध्यान्य दिले जाते. व स्त्रीयांना गौण समजले जाते. फक्त गरीब कुटुंबामध्येच हे पाहावयास मिळत नाही. तर श्रीमंताच्याही घरी हीच परिस्थिती दिसून येते.

अनेक साक्षर कुटुंबामध्येही स्त्रीच्या गर्भाची गर्भजल परिक्षेद्वारा चाचणी करुन ती मुलगी असेल तर गर्भपाताद्वारे भृणहत्या करण्यात येते. मुलीच्या लग्नाच्या वेळी हुंडा देता येणार नाही या विवंचणेतून नवजात मुलीची हत्या (Female Infenticide) केली जाते. ही प्रथा उत्तर भारतात मोठया प्रमाणात आहे. शहारामध्ये तर विविध प्रकारे स्त्रीयांची पिळवणूक केली जाते.

स्वांतत्र्यानंतर आपण स्त्री – पुरुष समानता या दिशेने जाण्याचा निर्धार केला आहे. त्यासाठी ठोस पावलेही उचलली आहेत. त्याचे काही चांगले परिणाम ही आपल्याला दिसून येत आहेत. शिक्षण, अर्थार्जन, प्रशासन, राजकारण या सर्व क्षेत्रांत स्त्रीया आता हिरिरीने भाग घेऊ लागल्या आहेत. परंतु याचबरोबर स्त्री – पुरुष समानतेचा खरा गर्थितार्थही लक्षात घेणे आवश्यक आहे. स्त्री – पुरुष समानता याचा अर्थ स्त्री सुध्दा पुरुषाप्रमाणे एक व्यक्ती आहे.

तिला सुध्दा मन, भाव, भावना, आहे. त्यामुळे तीलाही एक मानव म्हणून गौरव मिळाला पाहिजे.या अर्थाने स्त्री – पुरुष समानतेचा अर्थ आज समाजात अस्तित्वात आल्यास वरील सर्व क्षेत्रांमध्ये ती खऱ्या अर्थाने यशस्वी होणार आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - भारतीय समाजातील स्त्रीयांचे काळातील स्थान स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

२.५ स्त्रीयांवरील अत्याचार

२.५.१ स्त्रीयांवरील अत्याचाराचा अर्थ

सन १९९३ मध्ये युनाईटेड नेशन्स् ने स्त्रीयांवरील अत्याचाराची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे. “any act of gender- based violence that results in, or is likely to result in physical, psychological or sexual harm or suffering to a woman, including threats of such acts, coercion or arbitrary deprivations of liberty whether occurring in public or private life.”
थोडक्यात स्त्रीयांवरील अत्याचार अथवा हिंसाचाराची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येते.

स्त्रीयांच्या ईच्छेविरुध्द, मनाविरुध्द काही कृती करण्यास भाग पाडणे, त्यांची मुक्त संमती नसतानाही भाग पाडणे, की जेणे करुन त्यांना शारीरिक ईजा होईल किंवा मानसिक धक्का बसेल त्या कृतीस अत्याचार किंवा हिंचासार असे म्हणता येईल. स्त्रीयांवरील अत्याचाराचे वर्गीकरण पुढील तीन प्रकारात करता येते.

अ) कुटुंबाच्या अंतर्गत : कुटुंबामधून स्त्रीयांवर पुढील अत्याचार होतात.

- हुंड्यासाठी छळ.
- वाईट वागणूक (विशेषत : स्त्रीयांना)
- घरातील सभासदांकडून सतत निंदा – नालस्ती इत्यादी प्रकारचे बोलणे.
- संपत्तीतील हिस्सा देण्यास नकार
- उपासमार व मारहाण

ब) कायदयाने दंडणीय अत्याचार : कायदयाने दंडनीय स्वरुपाचे किंवा फौजदारी स्वरुपाचे अत्याचारामध्ये पुढील अत्याचारांचा समावेश होतो.

- विनयभंग आणि बलात्कार
- अपहरण आणि खून
- नववधूला जाळणे
- छळ करुन आत्महत्येस प्रवृत्त करणे.
- स्त्रीयांची विक्री किंवा लिलाव
- वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणे.

क) सामाजिक अत्याचार - स्त्रीयांवर सामाजिक स्वरुपाचे अत्याचार पुढील प्रमाणे होतात.

- तरुण विधवेला सती जाण्यास बळजबरीने सांगणे.
- कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ
- सार्वजनिक वाहतुक व इतर ठिकांणी लैंगिक टोमणे मारणे.
- स्त्रीयांविरुध्द कोर्टात खोटी साक्ष देणे.
- तरुण स्त्रीयांना डोळा मारणे व चावट चेष्टा – मस्करी करणे इत्यादी.

अत्याचार करण्यास जबाबदार व्यक्ती -

स्त्रीयांवर अत्याचार करण्यात तिच्याच कुटुंबातील सभासद पुढाकार घेतात व काही अपरिचीतही त्यामध्ये असतात. एका सर्वे नुसार ६०% स्त्रीयांवरील अत्याचार तिच्या घरातील व्यक्तीकडूनच केले जातात तर ४०% अत्याचार हे बाहेरील अपरिचित व्यक्तीकडून केले जातात. घरातील व्यक्तींमध्ये पालक व त्यांचे नातेवाईक किंवा सासरचे लोक असू शकतात अनेकदा आपण वर्तमान पत्रात वाचतो की, बापाने स्वत:च्या मुलीवर बलात्कार करुन तिचा बळी घेतला. अनेकदा हुंडा किंवा बापाकडून पैसे आणण्यासाठी सासरच्या लोकांकडून नववधूचा छळ केला जातो. कुटुंबाबाहेरील व्यक्ती म्हणजे शेजारी किंवा इतर अपरिचीत व्यक्ती होय.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - अत्याचार किंवा हिंसाचाराचा अर्थ / व्याख्या सांगून अत्याचाराचे वर्गीकरण करा.

_____

_____

_____

_____

२.५.२ भारतीय स्त्रीयांवरील अत्याचाराचे किंवा समस्येचे प्रकार

भारतीय संविधनाने स्त्रीयांना मूलभूत हक्क दिले तसेच स्त्रीयांच्या सामाजिक सुरक्षेसाठी काही कायदेही करण्यात आले तरी सुध्दा भारतीय स्त्रीला विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. हया अत्याचाराचे किंवा समस्येचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

(१) **कनिष्ठ दर्जा** - भारतीय स्त्रीला अजूनही समाजामध्ये दुय्यम स्थानच दिले जाते. स्त्रीयांचा कनिष्ठ दर्जा दर्शविणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

- साक्षर आणि श्रीमंत कुटुंबामध्येही त्रयस्थांसारखी वागणूक दिली जाते. अनेकदा कुपोषणही केले जाते.
- भारतातील काही भागात विशिष्ट जमातीत अजुनही सतीची प्रथा चालू आहे.
- मूलीची गर्भ असेल तर गर्भपात केला जातो.
- समाजातील स्त्रीच्या वागणूकीवर मर्यादा असतात.
- अनेक कुटुंबामध्ये किंवा काही ठराविक धर्मामध्ये स्त्रीला नोकरी करण्याची परवानगी नाही.

(२) **साक्षरता** – स्वातंत्र्यानंतर भारतातील साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. १९५१ मध्ये भारतातील साक्षरतेचे प्रमाण १८% होते तर २००१ मध्ये ते ६५% इतके झाले. पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण ७६% आहे तर स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी म्हणजेच ५४% आहे. भारतातील काही राज्यामध्ये स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण राष्ट्रीय साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा कमी आहे. स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण कमी असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मुलींच्या सुरक्षिततेचा अभाव हेच आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून मुलींच्या गळतीचे प्रमाणही जास्त आहे. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पालकांनाही नसते. त्यांना फक्त एवढेच समजते की मुलगी कितीही शिकली तरी तिला चूल आणि मूल हे चुकणार नाही. केरळ, गोवा व मिझोराम या राज्यांमध्ये स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

(३) **स्त्रीयाविरुध्द हिंसाचार** – स्त्रीयाविरुध्द मोठया प्रमाणावर हिंसाचार होतो. घरात आणि घराबाहेरही स्त्रीयांची छळवणूक मोठया प्रमाणावर होते. पुढील घटनांवर हे समजण्यास मदत होते.

- हुंडा : हुंडा विरोधी कायदा १९६१ संमत करुनही भारतामध्ये काही जमातीमध्ये मोठया प्रमाणावर हुंडा घेतला जातो. हुंडा न दिल्याने अनेक नववधूंना सासरी त्रास होत असल्याच्या तक्रारी पोलीस स्टेशनला नोंदविल्या जातात. काही ठिकाणी तर मुलींना जाळण्याच्याही घटना घडतात. यातील अनेक हुंडाबळीच्या नोंदी भीतीमुळे व कायदयाचा ससेमिरा चुकविण्यासाठी पोलीस स्टेशनला केल्याच जात नाहीत.

- **बलात्कार व लैंगिक अत्याचार :** शहारात या समस्येला स्त्रीयांना सातत्याने तोंड द्यावे लागते. दिवसेदिसव लैंगिक शोषण व बलात्काराच्या घटना वाढतच आहेत. प्रत्येक दोन तासाला आपल्या देशात एक बलात्कारीत घटनेची नोंद होते. लाजेमुळे किंवा शरमेने कित्येक बलात्कारीत घटनेची नोंदी केल्या जात नाहीत. भारतात सर्वात जास्त बलात्काराच्या घटना मध्यप्रदेशात घडतात, तर शहरांमध्ये सर्वात जास्त बलात्कार दिल्लीत होतात.

  लैंगिक शोषण व बलात्कार ह्या घटना अनेकदा तिच्या सासरच्या घरातील पुरुष सभासदांकडूनही होतात. तरुण मुलींना शहारामध्ये अशा प्रकारच्या घटनांना रोज सामोरे जावे लागते.

(४) **बायकोला मारणे** – काहीही अगदी किरकोळ कारणावरुन बायकोला मारणे ही भारतातील सर्वसामान्य अशी बाब आहे. दुदैवाने अनेक बायकां हे स्वीकारतात. गरीब कुटुंबातच नव्हे तर श्रीमंत व साक्षर कुटुंबामध्येही असे प्रकार होत असतात. अगदी साक्षर असलेल्या स्त्रीयाही हे प्रकार निमूटपणे सहन करतात. बायकोला मारणे हा आपला मूलभूत हक्क आहे असेच पुरुष मानतात.

(५) **विधवांच्या समस्या** – भारतीय समाजांमध्ये विधवांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. कायदयाने जरी विधवांना पुर्न विवाहास परवानगी दिली असली तरी प्रत्यक्षात त्यांच्याशी विवाह करण्यास कोणीही तयार होत नाही. ज्याची बायको मरण पावली आहे अशा व्यक्तीही विधवेशी लग्न करण्यास तयार होत नाहीत.

विशेष म्हणजे समाजामध्ये विधवांच्या वागण्यावर अनेक बंधने धर्माने घातलेली आहेत. काही जमातींमध्ये तर विधवांना कोणत्याही सामाजिक कार्यक्रमात सहभागीच होता येत नाही. त्याचप्रमाणे ठराविक रंगाचेच कपडे किंवा रितीरीवाजाप्रमाणे कपडे परिधान करावी लागतात.

(६) **कामाच्या ठिकाणच्या समस्या** – नोकरी करणाऱ्या महिलांच्या बाबतीत ही समस्या आहे. उच्च शिक्षणांमुळे स्त्रीयांनी संघटीत क्षेत्रात नोकरीसाठी प्रवेश केला. शहरामध्ये व निमशहरामध्ये स्त्रीयांच्या नोकरीचे प्रमाण जास्त आहे. स्त्री कामगारांना कामाच्या ठिकाणी पुढील समस्यांना तोंड द्यावे लागते.

- **लैंगिक शोषण** – प्रत्येक संघटनेत संस्थेत कामाच्या ठिकाणी स्त्री कामगाराचे, मोठ्या प्रमाणावर लैंगिक शोषण होत आहे. अगदी शैक्षणिक संस्थाही त्यास अपवाद नाहीत. या विरुध्द तक्रार नोंदविल्यास न्याय मिळू शकतो. परंतु प्रसार माध्यमाद्वारे नको ती प्रसिध्दी, कायद्याची औपचारिकता पूर्ण करणे आणि कागदोपत्री पुरावे गोळा करणे या कटकटीपासून सुटका म्हणून शक्यतो तक्रार केली जात नाही.

- **वेतनातील विषमता** – विशेषतः असंघटीत क्षेत्रामध्ये स्त्रीयांना पुरुषांच्या तुलनेत कमी वेतन दिले जाते. भारतीय संविधानातील कलम -३९ प्रमाणे समान कामासाठी स्त्री – पुरुषांना समान वेतन देण्यात यावे अशी तरतूद असूनही अनेक ठिकाणी याची अंमलबजावणी होत नाही आणि स्त्रीयांचीही कोणत्याही प्रकारची तक्रार नसते. अनेकदा भारतीय संविधानातील हा कायदाच अनेक स्त्रीयांना माहित नसतो.
- **पदोन्नती** – अनेकदा स्त्रीयांना सर्वोच्च पदापर्यंत बढती दिली जात नाही. ठराविक पातळीपर्यंतच स्त्रीयांनी काम करावे अशी पुरुषांची अपेक्षा असते. बॉस म्हणून स्त्री असणे हे पुरुष मान्यच करीत नाहीत. त्यामुळे स्त्रीयांना पदोन्नतीच्या मर्यादा असतात.

- **मातृत्व** – अनेक ठिकाणी स्त्रीयांना बाळंतपणासाठी रजा द्यावी लागते म्हणून कमी प्राधान्य दिले जाते. काही ठिकाणी तरी स्त्रीयांना घेतलेच जात नाही. त्याचप्रमाणे घरची सर्व जबाबदारी सांभाळून स्त्रीयांना नोकरी करावी लागते. यामुळे कामावर उशीरा येणे, अनेकदा कामावर गैरहजर राहणे इत्यादी कारणांमुळे स्त्रीयांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

- **विभक्त कुटुंबातील समस्या** – विभक्त कुटुंब म्हणजे नवरा –बायको व मुले. सध्या विभक्त कुटुंब पध्दतीच स्त्रीयांना आवडतात. परंतु विभक्त कुटुंब पध्दतीमध्ये स्त्रीयांना जास्त समस्या उद्‌भवतात घटस्फोटाचे सर्वात जास्त प्रमाण विभक्त कुटुंब पध्दती मध्येच दिसून येते. मुल झालेल्या स्त्रीयांनी घटस्फोट दिल्यास तिला विविध समस्यांचा सामना करावा लागतो.

- **मर्यादित राजकीय सहभाग -** स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग अगदी नगण्य आहे. केंद्र व राज्य दोन्ही पातळीवर विचार केल्यास हीच परिस्थिती दिसून येते. यामुळे विधान सभेत किंवा लोकसभेत स्त्रीयांच्या समस्या ज्या काही थोडयाफार स्त्रीया आहेत त्या मांडतच नाहीत आणि पुरुष नेतृत्व योग्य प्रमाणात त्या समस्यांना न्याय देत नाही.

  राजकीय पक्ष स्त्रीयांना उमेदवारी देण्यास उत्सुक नसतात. ज्या काही स्त्रीयांना उमेदवारी मिळते त्यातील थोड्याच निवडून येतात. बऱ्याच ठिकाणी ग्रामीण भागामध्ये निवडणुकीमध्ये काही स्त्रीया निवडून आल्या तरी त्या फक्त नामधारी असतात, सर्व कारभार अप्रत्यक्ष रीतीने पुरुषच करत असतात. त्यामुळे स्त्रीला स्वतंत्रपणे, स्वतःच्या विचारांनी कारभार करता येत नाही.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - भारतीय स्त्रीयांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे (हिसांचाराचे) किंवा समस्येचे वेगवेगळे प्रकार सांगा.

_____

_____

_____

_____

२.५.३ स्त्रीयांवरील अत्याचाराची कारणे

स्त्रीयांवर होणारे अत्यांचार हे पुढील कारणांसाठी होत असतात.

- पैशाशी संबंधीत – हुंड्यासाठी तसेच इतर अनेक कारणांसाठी पैसे आणावे म्हणून नवरा किंवा सासरचे लोक नववधूवर अत्याचार करीत असतात. काही ठिकाणी नवरा दारुडा किंवा जुगारी असेल तर बायकोकडे सतत पैशाची मागणी करतात. बायकोच्या कमाईवर उदरनिर्वाह करणारे अनेक लोक आहेत.
- व्यक्तीमत्वसंबधीत - अनेकदा व्यक्तीमत्वावरुन स्वभावाची चुकीची ओळख केली जाते आणि स्त्रीचा छळ सुरु होतो. संशयी स्वभावाचा नवरा बायकोच्या लहान – सहान हालचालीवरुन तिच्यावर संशय घेतो. अशावेळी संबधीत स्त्रीचा छळ केला जातो.

- तणावाची परिस्थिती – घरातील तणावग्रस्त वातावरणाने स्त्रीला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. घरातील मुले व्यवस्थित वागत नसतील तर वडील आईलाच संपूर्ण दोष देतात. वडिलांच्यावर तणाव येतो त्यामुळे ते त्यांचा राग बायकोवर काढतात.
- मद्यपान – दारुची किंवा अंमली पदार्थाची नशा करणाऱ्या व्यक्ती बायकोचा छळ मोठया प्रमाणावर करतात. नशेमध्ये या व्यक्ती बायकोच्या शारीरिक व मानसिक छळ करीत असतात.
- पुरुषी अहंकार – प्रत्येक कुटुंबामध्ये नेहमी पुरुषांचेच वर्चस्व असते. त्यामुळे नवऱ्याची चूक दाखवण्याची व ती सुधारण्याचा प्रयत्न बायकोने केल्यास पुरुषी अहंकार दुखावला जातो. अशावेळी संबधीत स्त्रीला विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.
- प्रसार माध्यमांचा अतिरेक – विविध प्रसारमाध्यमाद्वारे दाखविले जाणारे कार्यक्रम, फिल्म व मालिका यामध्ये स्त्रीयांवरील अत्याचार वारंवार दाखवले जातात. याचाही परिणाम स्त्रीयांवरील अत्याचार वाढवण्यात होतो.
- सूडाची भावना – सूडाच्या भावनेने पेटून उठलेल्या लोकांकडून स्त्रीयांवर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होतात. उदा. एकादया निरापराध पुरुषाला एखादया स्त्रीने बलात्कारासारख्या गुन्हयात अडकविल्यास संबधीत व्यक्ती सूडाने पेटून उठते आणि मग अशा व्यक्तीकडून मोठया प्रमाणावर स्त्रीयांवर अत्याचार होतात.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न - स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराची कारणे सविस्तर सांगा.

_____

_____

_____

_____

२.५.४ अत्याचाराचे स्त्रीवर होणारे परिणाम

अत्याचाराचे स्वरुप कसे आहे यावरुन स्त्रीवर होणाऱ्या परिणामांचे स्वरुप ठरते. अत्याचारामुळे स्त्रीवर खालील प्रमाणे परिणाम होतात.

- मानसिक परिणाम – अत्याचार मोठ्या प्रमाणावर होत असेल तर निश्चितपणेच स्त्रीच्या मानसिक तेवर त्याचा परिणाम होतो. अपहरण व बलात्कार सारख्या घटना असतील तर त्याचा स्त्रीच्या मनावर खोल परिणाम होतो. अनेकदा स्त्री अशा धक्यातून स्वत:ला सावरु शकत नाही. अशा घटनांमुळे स्त्री आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होतात.

- शारीरिक परिणाम – सासरच्या लोकांकडून मारहाण किंवा शारीरिक ईजा पोहोचल अशा स्वरुपाच्या घटना घडल्यास त्याचा परिणाम स्त्रीच्या शरीरावर होतो. अनेकदा अशा प्रकारच्या मारझोडीमुळे स्त्रीला अपंगत्व येण्याचीही शक्यता असते.
- आरोग्यावर परिणाम - स्त्री लग्नाअगोदर तिच्या घरच्यांनी किंवा लग्नानंतर तिच्या सासरच्या लोकांनी योग्य आहार दिला नसेल किंवा तिच्या आजारपणात योग्य दवाखाना केला नसेल आणि या घटना वारंवार घडत असतील तर त्याचा स्त्रीच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो.
- सामाजिक परिणाम – बलात्कारासारखी घटना घडली असेल तर स्त्रीच्या सामाजिक जीवनावर त्याच्या मोठा परिणाम होतो. अशा घटनांची समाजातील लोकांकडून नको ती बोलणी व टोमणे ऐकून घ्यावे लागतात. समाज अशा व्यक्तीना नीटपणे जगूच देत नाही.
- कुटुंबातील सभासदावर होणारा परिणाम – नवरा किंवा सासरच्या इतर सभासदांकडून स्त्रीचा छळ होत असेल तर त्याचा परिणाम तिच्या मुलांवरही होतो. आईवरील अत्याचार, छळ या विचारांमुळे मुलांचे तारुण्य उदासिनतेत जाते. अनेकदा मुले प्रौढ झाल्यानंतर समाजात त्याच्या प्रतिष्ठेला धक्का बसतो.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न - अत्याचाराचे स्त्रीवर होणारे परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

२.६ स्त्री – भृणहत्या

गर्भजल परिक्षेद्वारा जन्माला येणाऱ्या संततीचे लिंग तपासले जाते आणि मुलगी असेल तर साक्षर कुटुंबात गर्भपाताद्वारे भृणहत्या मोठया प्रमाणात केल्या जातात.

अतिशय धक्कादायक बातमी २२ सप्टेंबर १९९९ च्या टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात आली होती. ती म्हणजे 'राजस्थानमधील देवरा गावात ११० वर्षात प्रथमच एका मुलीचे लग्न झाले.' म्हणजेच गेल्या १०० वर्षात या गावात एकही मुलगी जन्माला आली नाही. किंबहुना स्त्रीभृणहत्येद्वारा मुलगी जन्माला येऊ दिली नाही.

२.६.१ स्त्री- भृणहत्त्येची कारणे –

- पितृसत्ताक समाज रचनेमुळे मुलाला प्राधान्य दिले जाते .- पितृसत्ताक समाज रचेनमुळे मुलीपेक्षा मुलाला श्रेष्ठ समजले जाते. पितृसत्ताक सत्तेमध्ये कुटुंबप्रमुख पुरुष असल्याने मुलीपेक्षा मुलांची अपेक्षा केली जाते. याचबरोबर समाजामध्ये निरनिराळया प्रकारच्या रुढी

परंपरा आहेत उदा. श्राध्दाची संकल्पना, मृत्यु पावलेल्या व्यक्तीचे श्राध्द घरातील मोठया मुलानेच घालायचे असते. या विचारामुळे मुलीपेक्षा मुलालाच महत्त्व दिले जात.

- सामाजिक गरज आणि आर्थिक व्यवहार हे मुलांच्या संदर्भात संबंधित असल्याचे समजले जाते.- सामाजिक –आर्थिक विकास आणि स्त्री- भृणहत्या यांचा संबंध व्यस्त असल्याचे दिसून येते. दि नॅशनल फॅमिली ॲण्ड हेल्थ सर्वे यांनी १९९८ -९९ मध्ये अहवालामध्ये नमूद केले आहे की मुलगा असावा याची अपेक्षा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये जास्त आहे. प्रत्येक कुटुंबामध्ये कमीत कमी एक तरी मुलगा असावा. ही सामाजिक गरज समजली जाते. तसेच समाजामध्ये जो मुलगा कमावतो, तेच आपल्याला उपयोगी पडणार आहे. असाही विचार केला जातो.
- मुलाला वंशाचा दिवा समजला जातो. – समाजामध्ये मुलगा असेल तरच आपला वंश टिकेल, त्यामध्ये सातत्य राहील. असा विचार केला जातो. म्हणून प्रत्येक कुटुंबात मुलगा असावा हया विचारानेही स्त्रीभृण हत्या होते.
- इतर कारणे – भारतामध्ये मुलाला मालमत्ता (assats) समजले जाते तर मुलीला 'देणे' (Liability) समजले जाते. आणि महत्त्वाचे कारण म्हणजे मुलीला विवाहात हुंडा द्यावा लागतो. काही राज्यामध्ये तर मूलीला जन्मानंतरही मारले जाते यामुळे भारतातील काही राज्यांत लिंग गुणोत्तरात स्त्रीयांची संख्या मोठया प्रमाणात घटत आहे. राजस्थान, बिहार, पंजाब आणि हरियाना इत्यादी राज्यांमध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रीयांचे प्रमाण अतिशय कमी होत आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - स्त्री – भृण हत्येची कारणे सांगा.

_____

_____

_____

_____

२.७ लिंग –गुणोत्तर प्रमाण

२.७.१ सातत्याने घटत जाणारे लिंग गुणोत्तर –

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान आहे. भारतातील काही ठराविक जाती वगळता सर्व जातींमध्ये कुटुंबाचा प्रमुख हा पुरुषच असतो. भारताच्या उत्तर पूर्व भागातील काही आदिवासीमध्ये कुटुंबप्रमुख म्हणून वयोवृध्द स्त्रीचा विचार केला जातो. परंतु तुलनात्मकदृष्ट्या कुटुंब प्रमुख म्हणून पुरुषांचाच जास्त विचार केला जातो भारतातील सतत घटत जाणाऱ्या लिंग गुणोत्तराचे प्रमुख कारण म्हणजे पुरुष प्रधान संस्कृती आहे.

भारतातील लिंग गुणोत्तर

वर्षे	दर हजारी पुरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण
१९०१	९७२
१९११	९६४
१९२१	९५५
१९३१	९५०
१९४१	९४५
१९५१	९४६
१९६१	९४१
१९७१	९३०
१९८१	९३४
१९९१	९२७
२००१	९३३

Source : Census Report

वरील तक्त्यावरुन आपल्या लक्षात येते की १९०१ मध्ये दर हजारी पुरुषामागे ९७२ स्त्रीया होत्या तर २००१ च्या जनगणनेप्रमाणे हे प्रमाण ९३३ एवढे खाली आलेले आहे. वरील आकडेवारी वरुन लिंग गुणोत्तर सतत घटत नाही. तर ते कमी जास्त होत आहे. भारतात फक्त केरळ राज्य असे आहे की तिथे सर्वात जास्त स्त्रीयांचे प्रमाण आहे. तर हरियाना हा प्रदेश असा की तिथे सर्वात कमी स्त्रीयांचे प्रमाण आहे.

भारतातील काही राज्यांचे लिंग गुणोत्तर प्रामण पुढील तक्यात दाखविले आहे. (दर – हजारी पुरुषामध्ये स्त्रीयाचे प्रमाण)

राज्य	लिंग गुणोत्तर प्रमाण
केरळ	१०५८
तामीळनाडू	९८७
आंध्रप्रदेश	९७८
उत्तर प्रदेश	८९८
हरयाना	७६१

आपली प्रगती तपासा

प्रश्न - सातत्याने घटत जाणारे लिंग गुणोत्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

२.७.२ लिंग –गुणोत्तर कमी असण्याची कारणे –

भारतामध्ये लिंग गुणोत्तर कमी असण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

(१) **मुलाला प्राधान्य** – भारतातील सर्व धर्म आणि संस्कृतीमध्ये मुलगा जन्माला येणे भाग्याचे समजले जाते. मुलीचा जन्म अनिष्ट घटना समजली जाते. अनेक कुटुंबामध्ये मुलगाच व्हावा यासाठी प्रार्थना, पूजा करतात यामध्ये नवरा, बायको व सासरचे सर्वजण असतात. प्रामुख्याने स्त्रीला सुध्दा मुलगा व्हावे असेच वाटत असते मुलगा झाला तर पेढे वाटले जातात. परिस्थिती नसूनही बारसे मोठया धामधूमीत केले जाते. परंतु मुलगी झाल्यास दु:ख व्यक्त केले जाते.

(२) **गर्भमत्ताद्वारे भृणहत्या** – मुलगा हा वारसा असतो. म्हातारपणी आधार असतो. मुलगी दुसऱ्याच्या घरी जाणार. जाताना हुंडाच्या स्वरुपामध्ये संपत्ती घेऊन जाणार. या विचारामुळे मुलगी असेल तर भृणहत्या केली जाते.

(३) **मुलींच्या मृत्यूचे प्रमाण** – मुलीचे संगोपन व्यवस्थित केले जात नाही. तिच्या आजाराकडे दुर्लक्ष केले जाते. या कारणांमुळे भारतात लहान मुलींच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. सध्या भारतामध्ये दर हजारी जन्मासारखे मुलींच्या मृत्यूचे प्रमाण ६० आहे. तर भारतातील दर हजारी जन्मामध्ये एकूण बालकांच्या मृत्यूचे प्रमाण ४८ इतके आहे.

(४) **मातृत्वपणात देखभाल -** स्त्रीयांना समाजात दुय्यम स्थान असल्याने त्यांच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन पुरुषांसारखा नसतो. त्यामुळे अनेकदा स्त्रीया गर्भार असतांना त्यांच्या आहाराकडे लक्ष दिले जात नाही. गरीब कुटुंबामध्ये ही समस्या मोठ्या प्रमाणांवर उद्‌भवते. त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढत जाते आणि स्त्रीच्याही आरोग्याला धोका निर्माण होतो.

(५) **द्रारिद्रय** – गरीब कुटुंबामध्ये मुलाला अतिशय महत्त्वाचे स्थान असते.सर्व संपत्तीचा वारस आणि म्हातारपणांतील आधार म्हणून मुलाकडे पाहिले जाते. मुलगी झाली तर तिच्या आहाराकडे व आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे लहान मुलींच्या मृत्यूचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त आहे.

(६) **हुंडा पध्दती** – मुलगी मोठी झाल्यानंतर लग्नात तिला हुंडा द्यावा लागेल. भारतातील ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर हुंडा दिला जातो व घेतला जातो. भारताच्या काही

भागात गरीब कुटुंबामध्ये मुलगी झाली की लगेच तिला अजूनही मारले जाते. हुंडा पध्दतीचे खूप मोठे परिणाम स्त्री – पुरुष गुणोत्तरावर होतात.

(७) **लहान कुटुंब** – विशेषत : शहरी भागामध्ये लहान कुटुंब ही फॅशनच झाली आहे. अनेक सुशिक्षित कुटुंबामध्ये प्रथम मुलगा झाला तर दुसरे मुल त्यांना नकोच असते कारण 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' ही संकल्पना सर्वांना पटत चालली आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - लिंग –गुणोत्तर प्रमाण कमी असण्याचे कारणे सविस्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

२.८ स्त्रीया आणि प्रसारमाध्यमे

समाज दर्शन मोठया प्रमाणावर घडवून आणणाऱ्या कोणत्याही साधनास प्रसार माध्यम असे म्हणतात. टी.व्ही. रेडिओ, वर्तमानपत्र, मासिक, सिनेमा व आपल्या आजूबाजला झळकणाऱ्या मोठया प्रमाणावरील जाहिराती इत्यादीचा समावेश प्रसार माध्यमामध्ये होतो. प्रसारमाध्यमे समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे काम करतात. त्याचप्रमाणे शिक्षण, सामाजिक हक्क इत्यादीची जाणीव समाजामध्ये प्रसार माध्यमे करुन देतात. स्त्रीया संबधीत विषय, यामध्ये स्त्रीयांवरी अन्याय व अत्याचार याविषयी समाज जागृती करणे हे सुध्दा प्रसारमाध्यमांचे काम आहे. स्त्रीयाविषयी प्रसारमाध्यमे सकारात्मक भूमिका बजावू शकतात, त्याच प्रमाणे नकारात्मक ही भूमिका बजावू शकतात.

२.८.१ प्रसारमाध्यमांची स्त्रीयाविषयक सकारात्मक भूमिका

(अ) **स्त्रीयांच्या समस्यांना प्राधान्य देणे** – भारतातील स्त्रीयांना येणाऱ्या समस्या दूरदर्शन आणि वर्तमानपत्रे विविध कार्यक्रमाद्वारे प्रसारीत करीत आहेत. स्त्रीयांवर होणारे अत्याचार यांना विविध कार्यक्रमाद्वारे प्रसारीत केले जाते. यामुळे स्त्रीयांच्या समस्याविषयी पोलीस, सरकार, व न्यायदान संस्था लक्ष केंद्रीत करतात. उदा. एखादया बलात्काराच्या घटनेत संबधीत पुरुषाला गुन्हाच्या प्रमाणापेक्षा कमी शिक्षा दिली आणि प्रसारमाध्यमांनी हा विषय जनतेसमोर आणला तर निश्चितच त्यास योग्य न्याय मिळेल.

स्त्रीयांवर अत्याचार करणाऱ्या अनेक गुन्हेगारांना पोलीस दूर्लक्षीत करतात. गुन्हेगार श्रीमंत असेल किंवा राजकीय पार्श्वभूमी असलेला असेल तर पोलीस अशा गुन्हेगारास शिक्षा

करण्यास धजावत नाहीत परंतु प्रसारमाध्यमांनी हा विषय प्रखरतेने समाजासमोर आणल्यास त्यांना योग्य कृती करावीच लागेल. थोडक्यात समाजासमोर सत्य आणण्याचे कार्य अनेक प्रसार माध्यमे प्रामाणिकपणे करत आहेत.

(ब) प्रसारमाध्यमांनी स्त्रीयांना पाठींबा देणे – भारतातील स्त्रीयांना येणाऱ्या अनेक समस्या, त्यांच्यावर होणारे अत्याचार, त्यांचा होणारा छळ इत्यादीसाठी प्रसारमाध्यमांनी स्त्रीयांना पाठिंबा दिला तर स्त्रीयांच्या समाजातील स्थानात नक्कीच वाढ होईलच. प्रसारमाध्यमांनी स्त्रीयांमध्ये जागृती करण्यासाठी स्त्रीयांचे अधिकार व हक्क सर्व स्त्रीयापर्यंत पोहचविण्याचे कार्य करत आहेत. स्त्रीचे समाजातील स्थान, आईचे महत्त्व इत्यादीवर लक्ष ठेवून १४ मे हा आई दिवस म्हणून पाळण्यात येतो.

(क) स्त्रीयांचे समाजातील स्थान उच्च करण्यासाठी प्रयत्न – प्रसारमाध्यमे स्त्रीयांचे समाजातील स्थान उच्च करण्याचे काम करु शकतात आणि करीतही आहेत. इंदिरा गांधी (राजकारण), मदर रेरेसा (सामाजिक कार्य), किरण बेदी (पोलीस खाते), किरण मझूमदार (उद्योगपती) पी.टी. उषा (क्रिडा) इत्यादी स्त्रीयांना प्रसार माध्यमांनी समाजासमोर त्यांच्या कर्तत्वासह आणले पाहिजे. त्यामुळे तरुणींच्या मनामध्ये नवीन उमेद निर्माण होईल, करिअरच्या त्यांच्या अपेक्षा रुंदावतील त्याचप्रमाणे त्या कोणत्याही प्रकारचे धाडस करण्यास प्रवृत्त होतील या धाडसी स्त्रीयांच्या कर्तृत्वाची जाणीव झाल्याने तरुण मुलींचे पालकही त्यांना करिअरसाठी मदत करतील त्यांना विविध क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी प्रवृत्त करतील.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - प्रसारमाध्यमांची स्त्रीयाविषयी सकारात्मक भूमिका स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

२.८.२ प्रसार माध्यमांची स्त्रीयांविषयी नकारात्मक भूमिका –

(अ) स्त्रीयांचे विकृत चित्रन – स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे असा सार्वतिक समज निर्माण करण्यास प्रसार माध्यमे आणि त्यातून केले जाणारे स्त्रीयांचे विकृत चित्रण जबाबदार आहे. जाहिरातीमध्ये स्त्रीयांचे भडक व उत्तेजक प्रदर्शन करण्यात येते. चलचित्रांमध्ये अर्धनग्नता आणि कामूक दृश्यांची रेलचेल असते. अशा विकृत चित्रणांमुळे काम –भावना चाळवते. आणि त्यातून स्त्रीयांचा विनयभंग आणि बलात्काराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. या सर्वांमध्ये प्रसार माध्यमे तर जबाबदार आहेतच. परंतु अनेक स्त्रीया मॉडेल प्रसिध्दीसाठी या सर्वांसाठी तयार होतात.

(ब) **स्त्रीयांवर अत्याचार होणाऱ्या कार्यक्रमांचे प्रसारण** – अनेक दूरदर्शन मालिंकामध्ये आणि विविध कार्यक्रमामध्ये स्त्रीयांवरील अत्याचार दाखवले जातात, बलात्काराच्या घटना वारंवार दाखवल्या जातात. त्यामुळे पुरुषांना आयताच चर्चेला विषय मिळतो कार्यक्रमांमध्ये दाखविल्याप्रमाणे वाईट कृत्य करण्याचे तरुणांच्या मनामध्ये येते. काही चित्रपटांमध्ये तर अगदी अश्लील चित्रण दाखवले जाते. दूरदर्शनवरील अनेक जाहिराती कुटुंबातील सदस्यांनी एकत्र बसून पाहण्यास लाज वाटते अशाच असतात. दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांमध्ये विवाह बाहय संबधाचे उदात्तीकरण आणि अवास्तव चित्रण प्रसारित करण्यात येते.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - प्रसार माध्यमांची स्त्रीयांविषयी नकारात्मक भूमिका स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

२.९ भारतांतील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी उपाय

स्त्रीयांच्या समस्या व्यवस्थिपणे कमी करण्याचा प्रयत्न केल्यास भारतीय समाजाच्या विकासात स्त्रीया महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात भारतीय स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाय -योजना करता येतील.

(१) **स्त्रीयांना शिक्षण** – सध्या भारत सरकारने स्त्रीयांना सक्तीचे शिक्षण केले आहे. इयत्ता बारावी पर्यंत सर्व मूलींना मोफत शिक्षण देण्याचे भारत सरकारने ठरविले आहे.याच्याही पुढे जाऊन महाराष्ट्र शासनाने सर्व मुलींना पदवी पर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचे ठरविले आहे. 'शिकलेली आई घरास पुढे नेई' हे प्रत्यक्षात आणण्यासाठी स्त्री शिक्षण १००%

पूर्ण झाले पाहिजे.

(२) **समाज जागृती** – स्त्रीयांच्या सकारात्मक बाजू समाजासमोर आणणे अतिशय महत्त्वाचे आहे. समाजाच्या मनात असणाऱ्या पारंपारिक रुढी व परंपरा काढून टाकण्यासाठी मोठया प्रमाणावर समाज जागृती आवश्यक आहे. अशासकीय संघटना सरकारी संघटना व काही खाजगी संघटनांनीही पुढाकार घेऊन हुंडा प्रतिबंध, स्त्री – शिक्षण, विधवा पुनर्विवाह व बाल – स्त्री विवाह इ. विषयी समाज जागृती केल्यास स्त्रीयांच्या सामाजिक व आर्थिक दोन्ही समस्या कमी होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

(३) **कायदेशीर प्रक्रियेचे सुलभीकरण** – स्त्रीयांसाठी शासनाने अनेक कायदे केले आहेत. भारतीय संविधानाने विविध तरतूदी केल्या आहेत. परंतु अत्याचारीत स्त्रीला

या कायदयाने न्याय मिळवण्यासाठी अनेक जाचक प्रक्रियेला सामोरे जावे लागते हीच प्रक्रिया जर सुलभ केली. तर प्रत्येक स्त्री कायद्याचा आधार घेईल अन्यथा अत्याचार होऊनही स्त्रीया कायद्याचा आधार घेणार नाहीत.

(४) **पोलीस खात्याची भूमिका** – पोलीस विभागाने जर स्त्रीयांना सहानुभूती दाखविल्यास त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न केल्यास अत्याचार करणाऱ्यांची अत्याचार करण्याची हिम्मतच होणार नाही. अत्याचार करणारे श्रीमंत असो की राजकारणी असो याचा विचार न करता पोलीस खाते वाजल्यास स्त्रीयांवरील होणाऱ्या अत्याचाराची तीव्रता कमी होईल.

(५) **कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी** – स्त्रीयांवरील अत्याचारासंबंधी करण्यात आलेले कायदे कागदोपत्री अनेक आहेत. राज्य घटनेतही अनेक तरतूदी करण्यात आल्या आहेत. परंतु या सर्व तरतूदी केवळ कागदावरच राहतात. प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. प्रत्यक्षात संबधीत कायदयांची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यास भारतीय स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण निश्चितच कमी होईल.

(६) **धार्मिक नेतृत्वाचा पाठिंबा** – स्त्रीयांचे समाजातील स्थान सुधारण्यात विविध धर्माच्या नेत्यांचे सहकार्य मिळाल्यास मोठया प्रमाणावर फायदा होईल. सर्व जाती – धर्मांचे नेते ज्यांचा संबंधीत समाजावर किंवा धर्मावर मोठया प्रमाणावर प्रभाव आहे. भारतातील सर्व धर्मातील लोक त्यांच्या धर्मातील नेतृत्वावर पूर्ण विश्वास व्यक्त करतात. म्हणून या धार्मिक नेत्यांनी ठरविल्यास स्त्रीयांवरील अत्याचाराची तीव्रता अगदी कमी होईल.

(७) **कामाच्या ठिकाणी सकारात्मक दृष्टीकोन** – स्त्रीया ज्या ठिकाणी नोकरी करतात. त्या कामाच्या ठिकाणी मालकाने व सर्व सहकार्यांनी स्त्रीयांविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला व स्त्री कर्मचाऱ्यास योग्य वागणूक देण्याचे ठरविल्यास स्त्री अत्याचार कमी होतील.

(८) **अशासकीय संघटनांची भूमिका** – स्त्रीयांचे समाजातील स्थान बळकट करण्याची अशासकीय संघटनाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. या संघटना स्त्रीयांच्या विविध समस्या समाजामध्ये पोहचवतात व स्त्रीयांना पाठिंबा देण्याचे कामही करतात.

(९) **संसदेत प्रभावी स्त्री नेतृत्व** – स्त्रीयांच्या समस्या त्यांच्यावर होणारे अन्याय त्यांच्या होणारा छळ इत्यादी प्रभावीपणे संसदेत मांडण्यासाठी प्रभावी स्त्री नेतृत्वाची गरज आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठीचे उपयांची सविस्तर चर्चा करा.

_____

_____

_____

_____

२.१० सारांश

असमानतेच्या नकारात्मक दृष्टिकोनांमुळे लिंगभेद, वर्णभेद, वंशभेद, प्रांतभेद, भाषाभेद, जातीभेद, अशा निरनिराळया प्रकारच्या भिन्नता समाजामध्ये निर्माण होतात. हे सर्व भेद समानतेच्या अभावामुळे म्हणजेच असमानतेमुळे समाजात निर्माण होतात. ही सर्व प्रकारची भिन्नता समाजातून समूळ नष्ट होण्यासाठी समानता समाजामध्ये येणे गरजेचे आहे. या सर्व प्रकारच्या भिन्नता मानवी समाजामध्ये संबंधाच्या समस्येमुळे (Problem of Relation) निर्माण होतात. त्यामुळे मानवी जीवनांमध्ये संबंधाची समस्या (Problem of Relation) प्रथम सुटणे. त्यावरील उपायाचा शोध घेणे ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. संबंधाची समस्या सोडवण्यासाठी मानवा – मानवांमध्ये एकाच शक्तीचा वास असल्याने दैवी भ्रातृभावाचा संबंध प्रस्थापित होणं, गरजेचे आहे.

स्त्री – पुरुष समानता आणण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी आणि प्रबोधनकारांनी प्रयत्न केले आजच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक युगामध्ये स्त्री ही पुरुषाच्या बरोबरी सर्व क्षेत्रात हिरीरीने भाग घेत आहेत. अनेक क्षेत्रामध्ये स्त्री ही यशस्वी कामगिरी करीत असल्याने ती अनेक प्रकारच्या महत्त्वाची जबाबदाऱ्या स्त्रीया उचलत आहेत. परंतु सद्यपरीस्थितीमध्ये स्त्री –पुरुष समानता म्हणजे जे – जे पुरुष करतो, ते ते सर्व स्त्री करु शकते, या मर्यादित अर्थाने न घेता, स्त्री –पुरुष समानतामध्ये स्त्री ही सुध्दा एक व्यक्ती आहे, म्हणून एक मानव या नात्याने स्त्री – पुरुष समानता अपेक्षित आहे. आजच्या स्त्रीला मानव म्हणून गौरव मिळाल्यास स्त्री आणि पुरुषांमध्ये कोणत्याही प्रकारचे भेद राहणार नाहीत. पुरुष व स्त्रीयांमध्ये एकमेकांबद्दल द्वेषाचे व तिरस्काराचे संबंध न राहता आत्मीयतेचे संबंध निर्माण होतील व समाज खऱ्या अर्थाने प्रगती पथावर वाटचाल करेल.

मानवी समाज हा पुरुष आणि स्त्री या दोन्ही पासून निर्माण झालेले असतो. समाज प्रगतीशील व विकसित असण्यासाठी पुरुष आणि स्त्री विकसित असण्याची गरज आहे. यासाठी स्त्री – पुरुष समानता समाजात असावी लागते. ही स्त्री – पुरुष समानता समाजात असावी लागते. ही स्त्री – पुरुष समानता एक मानव म्हणून असावी वैदिक काळामध्ये अशा प्रकारची समानता होती. परंतु वैदिक काळानंतर स्त्री – पुरुष असमानता निर्माण झाली. पितृसत्ताक समाजाची निर्मिती झाली. त्यामुळे स्त्री एक भोग्यवस्तू मानली जाऊ लागली यांतूनच स्त्रीयांवर अत्याचार होऊ लागला. हा अत्याचार कनिष्ठ दर्जा, हुंडा, बलात्कार व लैंगिक अत्याचार, बायकोला मारणे, विधवांच्या समस्या, भृणहत्या, लैंगिक शोषण, वेतनातील विषमता, विभक्त कुटुंबातील समस्या इत्यादी अनेक स्वरुपाचा आहे. स्त्री – अत्याचाराची कारणे पैशाशी संबंधित, व्यक्तीमत्त्वासंबंधीत, तवाणाची परिस्थिती, मद्यपान, पुरुषी अहंकार, प्रसारमाध्यमांची अतिरेक, सूडाची भावना इत्यादी प्रकारची आहेत. या अत्याचाराचे स्त्रीवर मानसिक, शारीरिक, आरोग्यावर, सामाजिक, कौंटुंबिक अशा प्रकारचे परिणाम होतात.

स्त्री भृणहत्या अतिशय भयानक अशी स्त्री समस्या आहे. स्त्रीभृण हत्येमुळे समाजामध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण घडत चालले आहे. दर हजारी पुरुषांमध्ये स्त्रीयांचे संख्या कमी होत चालली आहे.

प्रसार माध्यमांचा स्त्री विषयी स्त्रीयांच्या समस्यांचा प्राधान्य देणे, प्रसार माध्यमांनी स्त्रीयांना पाठिंबा देणे, स्त्रीयांचे समाजातील स्थान उच्च करण्यासाठी प्रयत्न ही सकारात्मक भूमिका आहे. तर स्त्रीयांचे विकृत चित्रन, स्त्रीयांवर अत्याचार होणाऱ्या कार्यक्रमांचे प्रसारण हे प्रसार माध्यमांची स्त्रीयांविषयी नकारात्मक भूमिका आहे. स्त्रीयांना सामाजिक बंधनातून सोडवण्यासाठी शासनाने अनेक फायदे केलेले आहेत.

भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी स्त्रीयांना शिक्षण, समाज जागृती, कायदेशीर प्रक्रियेचे सुलभीकरण, पोलीस खात्याची सकारात्मक भूमिका, कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी, धार्मिक नेतृत्वाचा पाठिंबा, कामाच्या ठिकाणी सकारात्मक दृष्टिकोन, अशासकीय संघटनांची विधायक दृष्टिकोन, संसदेत प्रभावी स्त्रीनेतृत्व इत्यादी उपाय आहेत.

२.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) 'असमानतेमुळे निर्माण होणारी भिन्नता' ही संकल्पना असमानतेच्या सकारात्मक व नकारात्मक दृष्टिकोनांच्या साह्याने सविस्तर स्पष्ट करा.

२) लिंग भिन्नतेमुळे निर्माण होणाऱ्या भिन्नता सांगा व स्त्री – पुरुष समानतेचा खरा अर्थ स्पष्ट करा.

३) वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे स्थान स्पष्ट करा.

४) वैदिक कालखंडानंतर समाजातील स्त्रीयांची परस्थितीचे सविस्तर विवेचन करा.

५) सध्याच्या आधुनिक काळातील स्त्रीयांच्या स्थानाचे वर्णन करुन खऱ्या अर्थाने आज स्त्री – पुरुष समानता आहे का याचे सविस्तर विवेचन करा.

६) अत्याचार किंवा हिंसाचाराचा अर्थ / व्याख्या सांगून अत्याचाराचे वर्गीकरण करा व भारतीय स्त्रीयांवरील अत्याचाराचे किंवा समस्येचे प्रकार सांगा.

७) स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची कारणे सांगून अत्याचाराचे सविस्तर होणाऱ्या परिणाम याची सविस्तर चर्चा करा.

८) स्त्री भृण हत्तेची कारणे सांगून सातत्याने घटत जाणारे लिंग गुणोत्तराची कारणे सविस्तर सांगा.

९) प्रसार माध्यमांची स्त्रीया विषयक सकारात्मक व नकारात्मक दृष्टिकोन सविस्तर सांगा.

१०) भारतातील स्त्रीयांच्या समस्या सोडवण्यासाठी असलेल्या निरनिराळया उपायांची सविस्तर चर्चा करा.

११) टिपा लिहा.

१) लिंग भिन्नता २) स्त्रीयांचे स्थान ३) हिंसाचाराचा अर्थ ४) स्त्री समस्येचे प्रकार

५) स्त्रीयांवरील अत्याचाराची कारणे ६) भ्रूणहत्या ७) लिंग गुणोत्तर प्रमाणाची कारणे

८) स्त्रीया व प्रसारमाध्यमे.

❖❖❖❖

३

अपंगत्व
(Disabilities)

३.० उद्दिष्टे
३.१ प्रस्तावना
३.२ अपंगाचे प्रकार
३.२.१ अंधत्व
३.२.२ बहिरेपणा
३.२.३ अस्थिरोग विषयक विकलांग
३.२.४ मानसिक विकलांग
३.४ विकलांग व्यक्तीना उपलब्ध असणाऱ्या सेवा
३.५ सारांश
३.६ विद्यापीठस्तरीय प्रस्न

३.० उद्दिष्टे

- अपंगत्वाचे प्रकार समजावून घेता येतील.
- अपंगत्वाच्या प्रत्येक प्रकाराचे प्रतिबंध आणि उपचार जाणून घेता येईल.

३.१ प्रस्तावना

अपंगत्व ही भारताची मोठी सामाजिक समस्या आहे. 'ज्या व्यक्ती त्यांच्या शारीरिक व मानसिक (बौध्दिक) बिघांडामुळे नित्याची कामे करु शकत नाही. त्यांना अपंग व्यक्ती समजण्यात येते. अपंग आणि अपंगत्वाची समस्या मानवजातीच्या सोबतच जन्माला आलेली आहे. शारीरिक व्यंग आणि मानसिक दोर्बल्य असलेल्या व्यक्ती जगामधील प्रत्येक देशात आहेत.

काहींना जन्मत:च अपंगत्व असते तर काहींना मोठा आजार व अपघात यामुळे अपंगत्व येते. अपंगाना इतरांच्या सहानुभूतीची गरज नसते, तर त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी आणि स्वत:च्या विकास करण्यासाठी आपल्या सर्वाच्या सहकार्याची आणि मदतीची गरज असते.

भारतात सुमारे १०० दश लक्ष अपंग व्यक्ती आहेत. त्यांची वर्गवारी त्यांच्या अपंगत्वाच्या प्रकारानुसार पुढील प्रमाणे करता येईल.

- २५% मानसिक दौर्बल्यामुळे अपंगत्व आलेल्या व्यक्ती
- १५% अंधत्वामुळे अपंगत्व आलेल्या व्यक्ती.
- ३०% मुक –बधीर.
- १५% बोलता न आल्याने येणारे अपंगत्व.
- १५% इतर.

अपंगत्व येण्याचे प्रमुख कारण हे निरक्षरता हे आहे. एकूण अपंगापैकी ५५% अपंग व्यक्ती ह्या गरीब कुटुंबातील आहेत. म्हातारपणामुळे हातापायाचा थरकाप होणारे, दृष्टी गमवणारे, बहिरे होणारे, चालू न शकणारे यांनाही अपंगत्वच समजण्यात येते. पक्षघातामुळे अर्धांग लुळे पडणे, महारोगाने ग्रस्त अशा अनेक व्यक्तींचा अपंगामध्ये समावेश होतो.

३.२ अपंगत्वाचे प्रमुख प्रकार

शारीरिक आणि मानसिक दौर्बल्य यांवर आधारित अपंग व्यक्तीचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

(१) अंधत्व
(२) बहिरेपण
(३) अस्थिरोगविषयक विकलांग
(४) मानसिक विकलांग

३.२.१ अंधत्व

ज्यांना पूर्णत: दिसत नाही त्यांना अंध व्यक्ती असे म्हणतात. दोषयुक्त डोळे असणाऱ्या व्यक्तीस पूर्ण अधंत्व किंवा अंशत: अंधत्व म्हणजेच रातआंधळेपणा, अस्पष्ट दिसणे, रंग ओळखण्याची क्षमता नसणे, मोतीबिंदू असणे इत्यादी दोष आढळतात. ज्यांना एका डोळयाने व्यवस्थित दिसते अशाचा समावेश यामध्ये होत नाही.

राष्ट्रीय अधंत्व नियंत्रण कार्यक्रम यांनी अंधत्वाची व्याख्या करताना अंधत्वाच्या पुढील तीन पातळया ठरविल्या आहेत.

- चांगल्या प्रतिचा चष्मा वापरुनही दृष्टी ६ / ६ पेक्षा कमी असणे.
- डोळयांची दृष्टी २० किंवा त्यापेक्षा कमी असणे.
- चांगल्या प्रतीचा चष्मा वापरुनही एका डोळयाची क्षमता ६ /६ पेक्षा कमी असणे किंवा २० पेक्षा कमी असणे.

थोडक्यात दोन्ही डोळयांनी व्यवस्थीतपणे न दिसणे म्हणजेच अंधत्व असे म्हणता येईल.

अंधत्वाची कारणे

अंधत्वाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) **डोळयात फूल पडणे (Cataract) -** डोळयात फूल पडणे किंवा मोतीबिंदू असणे यामुळे अंधत्व येते. डोळयातील नेत्रस्फटीक किंवा मोती बिंदू पारदर्शकतचे काम करीत नाही त्यास डोळयात फूल पडणे असे म्हणतात. डोळयांला इजा पोहचल्याने, 'क्ष' किरणांच्या विस्फोटाणे, ठराविक औषधोपचारामुळे किंवा मधुमेह या आजारामुळे डोळयात फूल पडणे किंवा मोतीबिंदू ही समस्या निर्माण होऊ शकते. परंतु अनेकदा नेत्र-शस्त्रक्रिया करुन या समस्येवर मात करता येते. म्हणजेच परत दृष्टी प्राप्त करता येते.

(२) **ग्लूकोमा (Glaucoma) –** सर्व सामान्यपणे प्रौढामध्ये निर्माण होणारा हा आजार डोळयात फूल पडणे या आजाराप्रमाणेच आहे. वयोमानानुसार डोळ्यातून पातळ द्रव सतत येते. हा द्रव डोळयातील नेत्रस्फटीकामागील मज्जातंतूवर सारखा आघात करतो. त्यामुळे दृष्ट पटल्यावर ताण पडतो आणि अंधत्व येते.

(३) **'अ' जीवनसत्वाचा अभाव (Vitamin 'A' Dificiency) -** 'अ' जीवनसत्वाच्या कमतरतेमुळेही अंधत्व येऊ शकते. 'अ' जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे डोळयातील बुबुळावर जे पारदर्शक चिवट पटल असते ते कोरडे पडते. त्यामुळे रातांधळेपणा होतो. अशाप्रकारचा आजार हा ज्या कुटुंबामधील मुलांना सकस आहार मिळत नाही, अशा गरीब घरातील मुलांनाच मोठया प्रमाणावर होतो.

(४) **अनेक आजार (Diseases)** – ज्यांना अनेक प्रकारचे आजार असतात त्यांना त्या सर्व आजारांचा डोळयावर परिणाम होऊन अंधत्व येण्याची शक्यता असते. या आजारांमध्ये मधुमेह, कांजण्या आणि हायपरटेनशन इत्यादी आजारांचा समावेश होतो.

(५) **हायफरमेट्रोफिया (Hypermetropia) -** यामध्ये लांबचे व्यवस्थित दिसते, परंतु जवळचे दिसत नाही. यासाठी लेन्सचा वापर केल्यास हा दोष टाळता येतो.

(६) **इतर कारणे (Other Causes)** – मेंदूला ईजा पोहचल्यासही त्याचा परिणाम डोळयावर होतो. काहींना डोळयांचा आजार पिढीजातच असतो. म्हणजेच अनुवंशकीयच असतो.

आपली प्रगती तपासा

प्रश्न १ अंधत्व म्हणजे काय ? हे स्पष्ट करुन अंधत्वाची कारणे सांगा.

_____

_____

_____

_____

अंधत्वावरील उपचार आणि निवारण (Treatment & Prevention)

(१) लहान मुलांना 'अ' जीवनसत्व असणाऱ्या पदार्थांचा आहारात समावेश करावा.

(२) हिरव्या भाज्या, गाजर, फळे, यामध्ये पेरु, लिंबू इत्यादी फळांचाही आहारात नियमित समावेश असावा.

(३) अलिकडे धर्मदाय संस्था अतिशय कमी खर्चात डोळयांची तपासणी, त्यावर उपचार व ऑपरेशनही करतात.

१९०९ साली रत्नागिरी हेन्डरसन या आय्. सी. एस्. (I.C.S.) अधिकाऱ्याने 'ब्लाईड' रिलीफ असोसिएशन ची स्थापना केली. तोपर्यंत भारतात काहीही सरकारी प्रयत्न झाले नव्हते. या संस्थेच्या शाखा पुढे ठिकठिकाणी निघाल्या, इ.स. १९२९ मध्ये अखिल भारतीय स्वरुपाची संस्था सुरु केली. संस्थेने फिरत्या दवाखान्याची सोय केली व औषधोपचोराचीही सोय केली. इ.स. १८३४ मध्ये लुई ब्रेलने तयार केलेल्या लिपीमुळे अंध जगतात एक प्रकाशमय दालन खुले झाले.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न - अंधत्वावरील उपचार आणि निवारण सांगा.

_____

_____

_____

_____

३.२.२ बहिरेपणा (Deafness)

श्रवण दोषांमुळे विकलांग असलेल्या व्यक्ती बहिऱ्या असतात. काही व्यक्ती जन्मत: कर्णबधीर असल्याने त्यांची वाचाशक्ती देखील विकसित होत नाही. त्यांना मूकबधीर असे म्हणतात. सर्व सामान्यपणे ० ते ३० डेसीबल पर्यंत व्यवस्थित ऐकू येते. डेसिबेल म्हणजे ध्वनीची तीव्रता मोजण्याचे परिणाम होय. ३० डेसिबेलच्या पुढे व्यवस्थित ऐकू येत नाही.

श्रवण दोषामुळे पूर्ण बहिरेपणा किंवा अंशिक बहिरेपणा असे कर्ण बधिरत्व उदभवते. बहिरेपणात व्यक्ती तिची ऐकण्याची शक्ती पूर्णच गमावून बसलेली असते. सामान्य माणूस काय बोलत आहे किंवा संपर्क साधत आहे याची बहिऱ्या व्यक्तीला अजिबात कल्पना येत नाही. जी मुले बहिरीच जन्माला येतात ती मुकीही असतात. बहिऱ्या मुलांना संपर्क साधण्यासाठी वेगळया प्रकारचे शिक्षण दिले जाते. अंध, मूक, बधीर यांच्याकरता वेगळया शाळा निर्माण कराव्या लागतात. अपंगाच्या शिक्षणाकरिता विशेष शिक्षक, विशेष स्वरुपाची साधनसामग्री व विशेष प्रकारचे नियोजन करावे लागते.

बहिरेपणाचे प्रकार –

बहिरेपणा हा कानाचा मुख्य दोष आहे. या कर्णदोषाचे चार प्रमुख प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे आहेत.

(१) **संवहन –बधिरता** – जेव्हा बाह्यकर्ण ध्वनिलहरी अंतकर्णापर्यंत पोहोच वू शकत नाही तेव्हा हा दोष निर्माण होतो. याची कारणे दोन असतात. एकतर बाह्यकर्णात मळ खूप साचलेला असतो किंवा कर्ण अस्थिकांची साखळी तुटते. हा दोष इतक्या गंभीर स्वरुपचा नाही.

वैद्यकीय उपचाराने अशी बधिरता काढता येते. या दोषाला आणखी काही कारणे म्हणजे कर्णपटलाला इजा पोहोचणे. आतल्या कानात निर्माण झालेली दाहकता इत्यादी असते.

(२) **संवेदना बधिरता -** हा बहिरेपणा मेंदूच्या श्रवण क्षेत्राला इजा पोहोचल्यामुळे येतो. हा दोष कायमस्वरुपी असतो. यालाच प्रमास्तिष्क बधिरपणा असे म्हणतात. हा दोष प्रमस्तिष्कात नेमका कुठे आहे. हे समजल्यास त्यावरुन बहिरेपणाची नावे सांगता येतात.

- **प्रमस्तिष्क बधिरपणा** – प्रमस्तिष्कच्या बाह्यकात दोष असेल तर त्याला प्रमास्तिष्क बधिरपणा असे म्हणतात.
- **केंद्रिय बधिरपणा** – मेंदूतील श्रवणकेंद्राच्या क्षेत्रात इजा पोहोचली असल्यास त्याला केंद्रीय बधिरपणा असे म्हणतात.

(३) **गर्भजात बधिरपणा** – बधिरपणा वरील प्रकारांशिवाय गर्भजात बधिरपणा असाही एक प्रकार आहे. हा कर्णदोष जन्मजात असतो. तसेच तो अनुवंशामुळेही आलेला असतो.

(४) **संपादित बधिरपणा** – कावीळ, टायफाईड, इत्यादी आजारावर करण्यात येणाऱ्या उपचार पध्दतीत दिल्या जाणाऱ्या औषधांच्या शरीरावर इतर परिणाम (Side effects) होतो. या औषधांच्या जास्तीच्या डोसामुळे अनेकदा बहिरेपणा येतो. गंभीर स्वरुपाच्या अपघात किंवा आवाजाचे प्रदूषण इत्यादी सारख्या घटनांमुळेही बधिरता येते त्यास संपादित बधिरता असे म्हणतात.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - बहिरेपणाचे प्रकार सांगा.

_____

_____

_____

_____

प्रतिबंध आणि उपचार

संपादित बधिरपणावर वैद्यकीय उपचार करुन ते व्यवस्थित करता येतात. आवाजामुळे किंवा अपघातामुळे बहिरेपणा आले असल्यास त्याच्यावर योग्य उपचार केल्यास आणि त्वरित उपचार केल्यास पूर्ववत ऐकू येऊ शकते.

केंद्रीय बधिरपणा किंवा गर्भजात बधिरपणा यासारख्या विकलांग पणावर वैद्यकीय उपचार पध्दतींचा काहीही परिणाम होत नाही. अशा वेळी संबंधित मुलांना त्वरित कर्णयंत्रे किंवा तत्सम साधनांचा वापर केल्यास बधिरपणावर मात करता येते. समाजाने अशा मुलांकडे वेळीच लक्ष पुरविल्यास ही मुले सुध्दा व्यवस्थित संपर्क साधून त्यांचे करिअर करु शकतात.

ज्या रोगांमुळे बहिरेपणा येतो अशा रोगाविषयी समाजामध्ये मोठया प्रमाणावर जागृती करणे आवश्यक आहे. विशेषत : जर्मन गोवर या रोगांपासून अतिशय दक्ष राहणे आवश्यक असते. गरोदरपणात मातेला जर्मन गोवर झाल्यास त्याचा परिणाम गर्भातील मुलाच्या कानावर होतो व मुलगा जन्मजात बहिरा जन्माला येतो. अनेकदा अंधसुध्दा होतो.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - बहिरेपणा या रोगावरील प्रतिबंध आणि उपचार सांगा.

_____

_____

_____

_____

३.२.३ अस्थिरोग विषयक विकलांग

ज्या व्यक्तीला हाडांत असा काही दोष आहे, की ज्यामुळे त्याला व्यवस्थीपणे शारीरिक हालचाली करता येत नाहीत व नियमित काम करता येत नाही त्यांना अस्थिरोग विकलांग असे म्हणतात. बंगलोर येथील शारिरीक विकलांग संघटन यांनी अस्थिरोग विकलांग या विषयी पुढील मत व्यक्त केले आहे. ‘ अस्थिरोग विकलांग व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती की, ज्याच्या हाडांमध्ये व्यंग असते, हांडाच्या नियमित हालचाली करता येत नाहीत, सांधे दुखतात किंवा स्नाय दुखतात अशी व्यक्ती होय.’

पुढील कारणांमुळे व्यक्ती अस्थिरोग विकलांग बनते.

- जन्मजात विकलांगपणा असणे अनुवंशिकतेमुळे किंवा जन्मानेच असा विकलांगपणा निर्माण होतो.
- अपघाताने
- गर्भार स्त्रीयांनी हानीकारक औषधे घेतल्यास गर्भावर त्याच्या परिणाम होतो. ज्या औषधामुळे साईड इफेक्ट होतात अशी औषधे .
- क्षय, देवी इत्यादी रोगांमुळे

अस्थिरोगाचे प्रकार

पुढील प्रमाणे अस्थिरोगाचे प्रकार सांगता येतात.

(१) **पोलियो** – लहान मुलांना होणारा हा विकार म्हणजे पक्षघाताचाच प्रकार म्हणता येतो. ताप येऊन अंगाला लकवा मारतो. गळा दुखणे, पचनतंत्र बिघडणे, स्नायू आखडणे ही लक्षणेही दिसून येतात. सध्या हा रोग नियंत्रणात आहे. कारण शासनाकडून पोलिओ डोस सर्व पाच वर्षाच्या आतील मुलांना दिला जातो.

(२) **मिरगी –फिट (Epilepsy)** – अचानक रोगी बेशुध्द होऊन कोसळतो. हातापायाला झटके देणे, दातखिळ बसणे, शरीर वेडेवाकडे किंवा ताठर होणे, ही फिटस्ची लक्षणे आहेत. झटका येण्यापूर्वी पूर्वसूचना रोग्याला मिळते व तो किंचाळायला सुरुवात करुन बेशुध्द पडतो. हा रोग मुख्यतः अनुवांशिक आहे. शिवाय तीव्र अपचन, नजरेत फेरफार, मानसिक उत्तेजना आदि कारणांनी फिटस् येण्याची शक्यता आहे.

(३) **प्रमास्तिष्क दुर्बलता** – मोठया मेंदूला येणारी दुर्बलता शरीराला सर्व संवेदना पोहचविणाऱ्या मेंदूतील यंत्रणेला इजा पोहचल्याने प्रमास्तिष्क दुर्बलता येते. विशेषतः गर्भार स्त्रीयांच्या बाबतीत त्यांच्या गर्भावर अशा प्रकारचा परिणाम होतो. मुलाच्या जन्माच्या वेळी मुलाला योग्य ऑक्सिजन न मिळाल्यास त्याच्या मेंदूवर परिणाम होतो. व प्रमस्तिष्क दुर्बलता येते. त्याप्रमाणे मातेला जर्मन गोवर असल्यास जन्मणाऱ्या मुलांच्या मेंदूवर त्याचा परिणाम होतो.

(४) **स्पायना बायफीडा** – शक्यतो जन्मतःच हा आजार पाठीच्या कण्याला होतो. यामुळे पाठीच्या कण्यापासून खालील भाग पूर्ण लूळा पडतो. त्यामुळे मूत्राशय खराब होते. लघवीवर नियंत्रण राहत नाही. लहान मुलांना झाल्यास ती मतीमंद होण्याची शक्यता जास्त असते.

(५) **अस्थिगत संसर्ग -** ऑस्टीओमायलेटीस हा हाडाला व हाडाच्या आतील भागामध्ये होणारा आजार आहे. हाडाला सुध्दा रक्तपुरवठयाची गरज असते. रक्तपुरवठयातून हाडांमध्ये संसर्ग होऊ शकतो. साधारणपणे ५ ते १४ वयोगटातील मुलांमध्ये हा संसर्ग होण्याचे प्रमाण जास्त आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - अस्थिरोगाची कारणे सांगून अस्थिरोगाचे प्रकार स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

प्रतिबंध आणि उपचार –

अस्थिरोगाच्या प्रतिबंध व उपचारासाठी भौतिकोपचार तज्ञांकडून त्वरीत शरीरातील संबंधित भागांचा व्यायाम केला पाहिजे. अनुभवी तज्ञांकडून किंवा सर्जरी करुन संबंधित शरीरातील हाड व्यवस्थित केले पाहिजे योग्य हालचाली करता येत नसलीत तर कृत्रिम अवयवयांचा उपयोग केला पाहिजे. लहान मुलांचा पोलिओ, पोलिओ लसीमुळे नियंत्रणात आणता येतो. सरकारी व बिगर शासकीय अनेक यंत्रणा यांनी अस्थिरोग व त्यावरील उपाय या विषयी समाजातील लोकांना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे.

३.२.४ मानसिक विकलांग

मानसिक विकलांगतेचे प्रकार

मानसिक दृष्टया विकलांग व्यक्ती विचार करण्यास व कृती करण्यास असमर्थ असते. मानसिक समस्यामुळे तिची विचार करण्याची क्षमता नष्ट झालेली असते किंवा खुटलेली असते. अशा व्यक्तीमध्ये बौध्दिक परिपक्वताही नसते.

पुढील तीन प्रकारचे मानसिक विकलांग असतात.

(अ) मतिमंदत्व (Mental Retardation)

(ब) विद्वतेतील विकलांग (Learining Disables)

(क) मानसिक आजार (Mental Disorder)

(अ) मतिमंदत्व (Mental Retardation) - गरजेपेक्षा कमी किंवा अत्यल्प बुध्दि म्हणजे मतिमंद होय. म्हणजेच मानसशास्त्रीय दृष्टया ७० पेक्षा कमी बुध्दिगुणांक (I.Q.) असणे. अमेरिकन असोसिएशन ऑन मेंटल रिटार्डेशन यांच्या मते, 'मतिमंदत्व म्हणजे बौध्दिक कार्यातून उकळपणे प्रभावित होणे. म्हणजेच अत्यल्प बुध्दि आणि कौशल्यामधील मर्यादा.

या निकषावरुन मतिमंदत्व ठरविता येते. मतिमंदत्वाची पुढील वैशिष्टये सांगता येतात.

- संप्रेषण कौशल्य
- स्वत:ची काळजी घेणे
- स्वतंत्रपणे राहण्याची क्षमता
- सामाजिक क्षमता
- सामाजिक कार्यामध्ये सहभाग
- स्वत:ला मार्गदर्शन करणे.
- आरोग्य आणि सुरक्षिततेचा विचार
- शैक्षणिक क्षमता
- काम आणि विश्रांती यांच्यातील ताळमेळ इत्यादी विषयी मतिमंद व्यक्ती असमर्थ असतात.

विविध दृष्टिकोनातून मतिमंदत्वाचे काही प्रकार पुढीलप्रमाणे पडतात.

१. **बौध्दिक कमकुवतेवरुन मतिमंदाचे प्रकार** – मानसशास्त्रज्ञ टर्मन यांनी बुध्दिगुणांकाच्या आधारे मतिमंदाचे पुढील वर्गीकरण पाडले आहेत.

- ५० ते ७० बुध्दिगुणांक – अल्पबुध्दि
- २५ ते ३० बुध्दिगुणांक –अत्यल्पबुध्दि
- २५ पेक्षा कमी बुध्दिगुणांक – निर्बुध्द

२. **शारीरिक व जैविक स्वरुपावरुन मतिमंदतेचे प्रकार** – मनोविकारतज्ञने व्यक्तीमध्ये शारीरिक व जैविक स्वरुपाचे कोणते दोष आहेत याचा अभ्यास करुन मतिमंदाची चिकित्सा करतात. त्यांनी मतिमंदाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

(१) **फ्रजाईल एक्स सिन्ड्रोम (Fragile x Syndrome)** – दुभंगलेले रंगसूत्र पालकांकडून मुलांमध्ये संक्रमित होते. त्यातून गंभीर स्वरुपाचे बुध्दिदोष दिसून येतात. बौध्दिक मागासले पणाबरोबर वाचिक व भाषिक दोष मुलांमध्ये आढळतात. ही मुले स्वभावाने संकोची असतात. सामान्य हालचाली योग्य प्रकारे करु शकत नाहीत. त्यामुळे अशी मुले समाजात मागे पडतात.

(२) **टर्नर्स सिन्ड्रोम (Turners Syndrome)** – सामान्यपणे प्रत्येक रंग सूत्राच्या जीवनपेशीत २३ जोडया असतात. पण या मुलांमध्ये २३ व्या रंगसूत्रात दोन रंगसूत्राऐवजी एकच रंगसूत्र (Chromosome) असते.

(३) **क्लिनफेल्टर्स सिन्ड्रोम (Clean felters syndrome)** - या मुलांमध्ये २३ व्या जोडीतील रंग सूत्रात एक अतिरिक्त रंगसूत्र आढळते.

(४) **डाऊनस् सिन्ड्रोम (Down's Syndrome)** - ही मुले मंगेल वंशाच्या लोकांसारखी दिसतात. म्हणून त्यांना, मंगोल, असेही म्हणतात. यांच्यामध्ये २१ व्या जोडीतील रंगसूत्रात एक अतिरिक्त रंग सूत्र आढळते.

(५) **लघुशीर्ष (Micro Cephalus)** – यामधील मुलांमध्ये डोक्याचा आकार लहान असतो. सामान्य मुलांसारखी या मुलांच्या मेंदूची वाढ होत नाही. ही समस्या अगदी लहान वयातच निर्माण होते. बुध्दिगुणांक २५ पेक्षा कमी आढळतो. त्यामुळे त्यांना शिक्षण देणे अशक्य असते.

(६) **जलशीर्षता (Hydro Cephalus)** - या मुलांच्या डोक्याचा आकार फार मोठा असतो. कारण त्यांचा विकास होत असताना मेंदूच्या व मज्जारज्जू पोकळीत असलेला सेरेब्रो स्वायनल द्रव बऱ्याच प्रमाणांत वाढतो. त्यामुळे मेंदूला इजा होते. इजेच्या प्रमाणात बुधिगुणांक ५० ते ७० च्या दरम्यान आढळतो.

(७) **जडवामनता (Cretinism)** – कंठस्थ ग्रंथीमधून थायरॉक्झीन नावाचा स्त्राव येतो. त्याचे प्रमाण कमी झाल्यास हा दोष कमी होतो. बुध्दिगुणांक ५० च्या वर आढळत नाही. शारीरिक वाढ खुंटलेली आढळते.

(८) **फेनिल – कीटोन्यूरीया** – प्रोटीन (प्रथिन) द्रव्यात फनिलॅनॉनिन नावाचे ऑमिनो ॲसिड असते. यकृतातून निर्माण होणाऱ्या रसामुळे या ॲसिडचे रुपांतर शरीराला पुरविल्या जाणाऱ्या शक्तीमध्ये होते, पण या समस्येमध्ये यकृतातील द्रव्याची कमतरता भासते. त्यामुळे ॲसिड साठत जाते. त्यातून मेंदूच्या कार्यात अडथळा येतो.

(९) **टे – साचा (Toy- Sacha) -** अनुवंशिक दोषामुळे दुर्बल जीनचे संक्रमण होते ते चयापचय कियेमध्ये दोष निर्माण करते. परिणामी चेतापेशींची पुनर्निमिती थांबते. जन्मानंतर स्नायुंवरील नियंत्रण ढासळते. मतिमंदतेबरोबर अंधत्व, अपंगत्व असते.

(ब) **विद्वत्तेतील विकलांग (Learning Disables)** –

शिक्षण घेण्याची व्यक्तीची कुवत कीती आहे. याचा विचार करुन शिक्षण क्षेत्रातील अधिकारी मतिमंदाचे प्रकार पाडतात. ते अशा मुलांचे पुढील प्रकारे वर्गीकरण करतात.

- अध्यापनीय (Educable) शिक्षण घेण्याची कुवत असलेली मुले.
- प्रशिक्षणीय (Trainable) प्रशिक्षण देण्याची योग्यता असणारी मुले.
- अप्रशिक्षणीय (Custodial) सर्वार्थाने दुसऱ्यांवर अवलंबून असणारी मूले.

(क) **मानसिक आजार (Mental Disorder)** – काही व्यक्तीना मानसिक विकलांगामुळे आणि मेंदू काम करीत नसल्याने त्यांना भावनिक, वर्तणूक विषयक व व्यक्तिमत्वाविषयी विकलांगपणा येतो. मानसिक आजार म्हणजे कमकुवत मानसिक आरोग्य किंवा मानसिक विकृती होय. अशा व्यक्तीची वर्तणूक ही विचित्र पध्दतीची असते. तसेच त्यांना भावनिक त्रासही होत असतो.

मानसिक आजार हे अनुवंशिकतेमुळे होतात. अनेकदा पर्यावरणीय घटकही मानसिक आजारास कारणीभूत ठरतात.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - मानसिक विकलांगतेचे प्रकार सांगा

_____

_____

_____

_____

मानसिक विकलांगतेवरील प्रतिबंध आणि उपचार

मानसिक आजार असणाऱ्या व्यक्तींना हाताळणे अतिशय अवघड असते. अशा व्यक्तींचे उपचार हे त्या संबंधित व्यक्तीवरच अवलंबून असतात. योग्य व वेळेत उपचार केल्यास यामधील अनेक विकृती दूर करता येतात. यामध्ये पालकांची जबाबदारी महत्त्वाची असते. मुलांना स्वत:ची काळजी घेण्याचे शिक्षण त्यांना द्यावे लागते.
आपली प्रगती तपासा

३.४ विकलांग व्यक्तींना उपलब्ध असणाऱ्या सेवा

अपंगत्व ही जागतिक समस्या आहे. अपंगानाही मानवी हक्क आहेत. त्यांना सशक्त व समर्थ बनवणासाठी अनेक कार्यक्रम हाती घेतले जातात. अपंगाचे पुनर्वसन करण्यासाठी भारतात अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. अपंगाना पुढील सेवा उपलब्ध आहेत.

(१) **अपंगासाठी चालविल्या जाणाऱ्या संख्या** - शारीरिक व मानसिकदृष्टया विकलांग असणाऱ्या साठी त्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात व देशात अनेक संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या संस्था अंधळे, बहिरे, मुके, शारीरिक दृष्टया अपंग व मानसिक दृष्टया अपंग यांच्या समस्या सोडवण्यासाठी मोठया प्रमाणावर संशोधन करीत असतात. या संस्था अल्प व दिर्घकालीन कोर्स अपंग व्यक्तीसाठी चालवितात. यातील काही महत्त्वाच्या संस्था पुढील प्रमाणे आहेत.

- देहराडून येथे दृष्टी दुर्बल व्यक्तींच्या मदतीसाठी राष्ट्रीय संस्था स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेत अंधासाठी शाळा, कार्यशाळा व प्रशिक्षण संस्था चालविल्या जातात. अंधासाठी ब्रेल लिपीतील साहित्याची निर्मिती करण्यात येते. या संस्थेची मुंबई, दिल्ली कोलकत्ता आणि चेन्नई येथे विभागीय कार्यालये आहेत.

- अलियावर जंग इन्स्टिटयूटची १९८२ मध्ये मुंबई येथे स्थापना करण्यात आली ही संख्या मूक – बधिरांना साह्य करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन व मार्गदर्शन इत्यादी उपक्रम हाती घेते.

- मानसिक अपंगासाठी राष्ट्रीय संस्था ही १९८४ साली सिंकदराबाद येथे स्थापन करण्यात आली. तेथे मनोरुग्णांच्या समस्येवर संशोधन करण्यात येते. मतिमंद मुलांच्या पालकासाठी प्रशिक्षण केंद्र चालवून विशेष दृकश्राव्य साहित्य वितरीत केले जाते. मतिमंद मुलांसाठी देशात सुमारे २८६ शाळा चालविल्या जाता त्यापैकी ५१ शाळा महाराष्ट्रात आहेत.

- 'अस्थिविकलांगासाठी राष्ट्रीय संस्था' १९८२ मध्ये कोलकत्ता येथे स्थापन करण्यात आली. अस्थिदोषांमुळे दुर्बलता असलेल्या रुग्णांसाठी ही संस्था संशोधन करते आणि अस्थिविकंलांगाना प्रशिक्षण देते.

- 'स्पॉस्टिक सोसायटी ऑफ इंडिया' ही संस्था १९९० साली मुंबई येथे स्थापन करण्यात आली. अपंगांना रोजगार मिळवून देण्यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. अपंगासाठी ही संख्या पुढील उपक्रम राबविले जातात.

(अ) अपंगाना व्यवस्याय शिक्षण
(ब) व्यावसायिक कौशल्याचा विकास
(क) उदयोग – संस्थामध्ये अपंगाना रोजगार प्राप्ती
(ड) अपंगाना संपर्क तंत्राचे शिक्षण
(ई) अपंगाना कार्यात्मक साक्षरतेचे शिक्षण
(फ) समाजाशी समायोजन करण्याची क्षमता विकसीत करणे इत्यादी.

(२) **कल्याणकारी मंत्रालय** – विकलांग व्यक्तीचे पुनर्वसन करणे व त्यांना सेवा पुरवण्याचे काम कल्याणकारी मंत्रालयाचे असते. सन २००५ -०७ मध्ये विकलांग लोकांच्या कल्याणासाठी सरकारने २४३ कोटी रुपये दिले अपंगासाठी विविध कल्याण कारी योजना व कार्यक्रमांची आखणी कल्याणकारी मंत्रालय करते.

(३) **बक्षिस आणि शिष्यवृत्ती** – भारत सरकारने राष्ट्रीय अपंग कल्याण निधी उभारलेला आहे. दरवर्षी राष्ट्रपती विशेष कामगिरी केलेल्या अपगांना राष्ट्रीय सन्मान बहाल करतात. विविध संख्या व संघटनाकडून पुढील बक्षिसे व शिष्यवृत्त्या अपंगांना दिल्या जातात.

- उद्योग क्षेत्रात स्वतः ठसा उमटीवणारी अपंग व्यक्ती.
- स्वतःच्या हिम्मतीवर व मोठया आत्मविश्वासाने स्वयंरोजगार करणाऱ्या अपंग क्यक्ती
- कार्यक्षमपणे नोकरी करणारी अपंग व्यक्ती.
- मुंबई येथील राष्ट्रीय अंध संघटना अंधाना त्यांच्या शिक्षणासाठी व प्रशिक्षणासाठी शिष्यवृत्ती देते.

(४) **स्वयंसेवी संघटना** – शारिरीक व मानसिक अपंगाना सहकार्य व मदत करण्यासाठी मोठया संख्येने स्वयंसेवी संघटना स्थापन होत आहेत. १९९२ मध्ये मुंबई येथे 'Parents of Down's syndrome Association'ची स्थापना करण्यात आली. ही संस्था डाऊन सिन्ड्रोम ग्रस्त अपंगाच्या मदतीसाठी स्थापन करण्यात आली आहे. ही संस्था संबंधित मुलांच्या पालकांना डाउन सिन्ड्रोम विषयी काळजी कशी घ्यावी, त्याचे स्वरुप व त्यावरील उपचार या विषयी शिक्षण देते. समाज जागृती करण्याचे कामही ही संस्था करते.

(५) **शाळा** – अपंग मुलांची शिक्षणपध्दती अवघड व वैशिष्टयपूर्ण असते. त्यांच्यासाठी स्वतंत्र विद्यालये व खास प्रशिक्षित शिक्षक यांची गरज असते. शिक्षणाचे माध्यम असणाऱ्या भाषेला ही मुले पारखी झालेली असतात त्यांच्यात अगोदर भाषा जागृती करावी लागते आणि नंतर शिक्षणाची सुरुवात करावी लागते.

भारतामध्ये अशा प्रकारच्या अपंग मुलांना शिक्षण देण्यासाठी मोठया संख्येने शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. सर्वात जास्त शाळा कर्नाटक राज्यात आहेत, त्याच्या खालोखाल

महाराष्ट्र व नंतर केरळचा क्रमांक येतो. या शाळानी अपंग विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षणाचा कार्यक्रम तयार केला आहे.

(६) **स्वयंसेवी संघटना आर्थिक मदत -** 'दीन दयाळ अपंग पुर्नवसन योजना' ही केंद्र सरकारने सुरु केली आह. अपंगाचे पुर्नवसन आणि शिक्षण देणाऱ्या स्वयंसेवी संस्था व संघटनांना याद्वारे आर्थिक मदत पुरवली जाते.

(७) **विशेष सवलत** – शारिरीक व मानसिक अपंगाचा भारत सरकारकडून पुढील विशेष सवलती देण्यात येतात.

- सार्वजनिक प्रवास सवलत उदा. विमान, रेल्वे एस.टी. इत्यादी प्रवासात सवलत देण्यास येते.
- कमी व्याजदराने कर्जपुरवठा.
- आयकरांमध्ये सवलत
- इतर विविध योजनांमध्ये प्राधान्य विशेषत: शिक्षण

(८) **नोकरीत आरक्षण** – शासकीय सेवामध्ये 'क' व 'ड' श्रेणीतील एकूण जागापैकी ३% जागा अपंगासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. केंद्रीय सेवामध्ये अपंगाना वयोमर्यादेतून १० वर्षाची सवलत देण्यात आली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांनाही हे आरक्षण लागू आहे. अपंगासाठी विशेष सेवा विनियोजन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

(९) **क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम** – राज्य पातळीवर राष्ट्रीय पातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवर अपंगाच्या क्रिडा स्पर्धा आणि अपंगासाठी सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. महाराष्ट्रात, राज्य सरकारने अपंगासाठी समांतर ऑलम्पीक स्पर्धाचे आयोजन केले होते. अशाच प्रकारच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील आयोजित केल्या जातात. या क्रीडा स्पर्धेत सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्यांना जिवनाचा नवीन अर्थ समजतो, जगण्याची नवसंजीवनी मिळते.

(१०) **मालकांचा प्रलोभन** – अपंगत्व कायदा १९९५ कलम ४१ प्रमाणे संबंधित सरकार आणि स्थानिक अधिकार असणाऱ्यांनी सार्वजनिक व खाजगी, क्षेत्रातील उद्योजकांना त्यांनी त्याच्या संघटनांमध्ये ५ % अपंग लोकांना रोजगार द्यावा म्हणून प्रेरित करणे.

खाजगी क्षेत्रामध्ये अपंगाना नोकरी द्याव्यात यासाठी अपंग व्यक्तीसाठी राष्ट्रीय धोरण, २००६ मध्ये स्वीकारण्यात आले. यामध्ये खाजगी उद्योगांना त्यांनी अपंगाना रोजगार द्यावेत म्हणून विविध प्रलोभन, देण्यात आली. उदा- करामधून सवलत, बक्षीसे आणि आर्थिक प्रलोभन मध्ये खाजगी मालक अपंगाना देत असलेल्या पगारातील २०% रक्कम त्यांना सरकारकडून परत दिली जाते.

(११) **पुनर्ववसन केंद्रे** – अपंगाचे पुनर्वसन मोठया प्रमाणावर केले जाते. देश पातळीवर, प्रादेशीक पातळीवर व जिल्हा पातळीवर अपंगाचे पुनर्वसन करण्यासाठी पुढीलप्रमाणे व्यवस्था करण्यात आली आहे.

केंद्र पातळीवर श्रीनगर, लखनौ, भोपाळ, गुहाटी आणि सुंदर नगर या ठिकाणी पुनर्वसन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. सर्व प्रकारच्या अपंगाना या ठिकाणी विविध सेवा व सुविधा पुरविल्या जातात.

- चंदीगड, कटक, जबलपूर आणि बरेली अशा चार ठिकाणी प्रादेशिक पुनर्वसन केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. याठिकाणी पाठीच्या कण्याचे विकलांग लोकांसाठी सेवा पुरविल्या जाता.
- तळापासून सर्व अपंगाना सेवा उपलब्ध व्हावी म्हणून प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी किंवा जिल्हयामध्ये एक पुनर्वसन केंद्र स्थापन करण्याचे ठरविले आहे. सध्या ५२२ ठिकाणी अशी केंद्र आहेत.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - विकलांग व्यक्तींना उपलब्ध असणाऱ्या सेवा थोडक्यात लिहा.

_____

_____

_____

_____

३.५ सारांश

अपंग व्यक्तीसुध्दा मानवी समाजाचा घटक आहेत. म्हणून त्यांचाही विकास होणे महत्त्वाचे आहे. प्रामुख्याने ज्या व्यक्ती त्यांच्या शारिरीक व मानसिक (बौधिक) बिघाडामुळे नित्याची कामे करु शकत नाहीत त्यांना अपंग व्यक्ती समजण्यात येते. शारिरीक आणि मानसिक दौर्बल्य यांवर आधारित अपंग व्यक्तीचे अंधत्व, बहिरेपणा, अस्थिरोग विषयक विकलांग, मानसिक विकलांग हे प्रमुख प्रकार आहेत. अंधत्वाची कारणे डोळयात धुल पडणे, ग्लूकोमा 'अ' जीवनसत्वाचा अभाव अनेक आजार, हायपर मेट्रोफिया इत्यादी आहेत. अंधात्वावरील उपाय म्हणजे 'अ' जीवनस्त्त्व युक्त आहार, हिरव्या पालेभाज्या, गाजर, फळे इत्यादींचा आहारात समावेश असावा.

मानसिक दृष्टया विकलांग व्यक्ती विचार करण्यास व कृती करण्यास असमर्थ असते. मतिमंदन, विद्वतेतील विकलांग, मानसिक आजार हे मानसिक विकलांगाचे प्रमुख प्रकार आहेत. मानसिक आजार असणाऱ्या व्यक्तींना कुशलतेने हाताळावे लागते. योग्य व वेळेत उपचार

करण्याची गरज आहे. यामध्ये पालकांची जबाबदारी महत्त्वाची असते. मानसिक रोगांने पिडीत असलेल्या मुलांना स्वत:ची काळजी घेण्याचे शिक्षण त्यांना द्यावे लागते.

विकलांग व्यक्तींना उपलब्ध असणाऱ्या सेवेमध्ये अपंगासाठी चालविल्या जाणाऱ्या संस्था कल्याणकारी मंत्रालय बक्षिस आणि शिष्यवृत्ती स्वयंसेवी संघटना, शाळा, विशेष सवलत, नोकरीत आरक्षण, क्रीडा व सांस्कतिक उपक्रम, मालकांना प्रलोभन इत्यादीचा समावेश होतो.

३.६ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

(१) अंधत्व म्हणजे काय? हे स्पष्ट करुन अंधत्वाची कारणे सांगा व त्यावरील उपचार व निवारण सांगा.

(२) बहिरेपणाचे प्रकार सांगून त्यावरील प्रतिबंध आणि उपचार सांगा.

(३) अस्थिरोग विषयक विकलांग म्हणजे काय?हे सांगून अस्थिरोगाचे प्रकार स्पष्ट करा व त्यावरील प्रतिबंध व उपचार सांगा.

(४) मानसिक विकलांगतेचे प्रमुख प्रकार तसेच उपप्रकार सांगून त्यावरील उपचार व प्रतिबंध सांगा.

(५) विकलांग व्यक्तीनां उपलब्ध असणाऱ्या सेवा सविस्तर लिहा.

(६) टिपा लिहा.

१) अंधत्वाची कारणे

२) बहिरेपणाचे प्रकार

३) अस्थिरोगाचे प्रकार

४) मानसिक विकलांगतेचे प्रकार

❖❖❖❖

४

जातीवाद जमातवाद आणि आंतर –जातीय संघर्ष
(Casteism communalism and Intergroup Conflicts)

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ जाती आणि जातीची व्याख्या व वैशिष्टये
४.३ जातीसंस्थामुळे निर्माण होणारी असमानता
४.४ जातीवादाचे परिणाम
४.५ जातीवादाचे निर्मूलन करण्याकरिता उपाय
४.६ जमात वादामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह)
४.७ सारांश
४.८ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

४.० उद्दिष्टे

(१) जातीभेद व जाती व्यवस्था यातील फरक समजावून घेता येईल.

(२) जातीभेदामुळे जातीवाद कसा निर्माण झाला ? व जातीभेदाचे व जातीवादाचे मूळ जाणून घेता येईल.

(३) जमात वादामुळे परस्पर गटांतील कलह कसे होतात ? याची माहिती होईल.

४.१ प्रस्तावना

मानव हा समाजशील प्राणी आहे. तो एकटा न राहता समाजामध्ये एकत्र राहतो त्याला आनंदाने राहता येण्यासाठी समाजामधील मानवा मानवामधील संबंध आत्मीयेतेचे, प्रेमाचे, सहानुभूतीचे, परस्पर सहकार्याचे, साहिष्णुतेचे असणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु आज समाजातील जातीभेदामुळे वरील प्रकारचे संबंध आज समाजामध्ये दिसत नाहीत. उलट आज समाज निरनिराळया प्रकारच्या संघर्षाने त्रस्त आहे. याचे मूळ कारण जातीभेद आहे, म्हणून

जातीभेद आपल्या देशाला खूप मोठा शाप आहे. जातीभेदाचे मूळ कशात आहे? याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. बऱ्याच वेळा असे म्हटले जाते की जातीभेदाचे मूळ चातुवर्णव्यवस्थेमध्ये आहे. पूर्वी चातुवर्णव्यवस्था होती. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण अस्तित्वात होते. खोल विचार करता जातीभेदाचे मूळ चातुवर्णव्यवस्थेमध्ये निश्चित्तपणे नाही, कारण चातुवर्ण व्यवस्था ही कामाची विभागणी (Distribution of Work) आहे. एक गोष्ट निश्चित्त आहे, की शारिरीक, मानसिक बौध्दिक या तिन्ही शक्ती प्रत्येक माणसाच्या वेगवेगळया असणार. या शक्तीनुसार व गुणकर्मानुसार असणार, निपूणतेनुसार व स्वतःच्या आवडीनुसार प्रत्येक मानवाला स्वतःचे काम ठरवण्याचा अधिकार आहे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतेही काम (कर्म) हलके नाही. त्याला आंतरिक मूल्य (Intrinsic Value) असते. म्हणून "कर्मदेव भव", "योग कर्मस्तु कौशल्य" असे म्हटले आहे. या तत्त्वातर चातुवर्ण व्यवस्था उभी आहे. वेदकाळामध्ये हया चातुवर्ण व्यवस्थेचा उल्लेख आहे. श्रीमद्भगवद् गीतेतही अध्याय -४, श्लोक– १३ मध्ये स्पष्ट सांगितले आहे.

वर्णव्यवस्थेत उच्च –नीच अशा कल्पना निर्माण झाल्या. ब्राम्हणांना या व्यवस्थेत श्रेष्ठ समजले जाऊ लागले व शूद्रांना हलके समजले जाऊ लागले. यामुळे समाजात मोठया प्रमाणात दरी निर्माण झाली व जाती संस्था अस्तित्वात आली. कालांतराने जाती संस्थेत उपजाती, पोटजाती निर्माण झाल्या. परिणामी शूद्रानां, अस्पृश, समजले जाऊ लागले. भारतीय राज्यघटनेने ही अस्पृशता नष्ट करण्यासाठी भारतीय संविधानात कलम -१७ मध्ये अस्पृशता निवारण करण्याचे प्रयत्न केले आहेत. त्याचप्रमाणे भारत सरकारने १९५५ पासून Prevention of untouchability offences Act हा कायदा पास करुन अस्पृशता पाळणे. हा कायदेशीर गुन्हा आहे असे ठरविले. या कायदयामध्ये पुढे १९७६ मध्ये सुधारणा करुन त्याचे नाव Protection of Civil Right Act असे करण्यात आले. त्याचप्रमाणे अस्पृशांना उच्च वर्णीयांपासून संरक्षण मिळावे त्यांची पिळवणूक होऊ नये म्हणून संविधानाचे अनेक कायदे केले आहेत. अस्पृशता निर्मूलनाचे काम प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केले. त्याचप्रमाणे महात्मा ज्योतीराव फुले, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, सावरकर यांनीही मोठया प्रमाणावर प्रयत्न केले.

जातीभेदामुळे श्रेष्ठ व कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये कलह निर्माण होत असतात. अंतर्गत कलहामुळे देशाची राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येत आहे. भारतामध्ये प्रामुख्याने उत्तर भारतात अशा प्रकारच्या कलहाचे प्रमाण जास्त आहे. या कलहामध्ये किंवा दंगलीमध्ये अनेक निरपराध लोकांचे जीवन उदध्वस्त होत आहे. त्याचप्रमाणे सामाजिक व वैयक्तिक मालमत्तेचीही हानी मोठया प्रमाणात होते. भारतामध्ये काही राजकीय पक्ष हे ठराविक जातींचे संरक्षण करण्यासाठीच अस्तित्वात आले. सत्तेवर येईपर्यंत ह्या पक्षांनी जातींचा व त्यांच्या भावनांचा मोठया प्रमाणावर वापर केला, व सध्या करीत आहेत. फक्त राजकीय फायदा घेण्यासाठीच जातींचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. राजकीय पक्षांच्या या दुटप्पी धोरणांमुळे जाती –जातीमध्ये तणाव निर्माण होत आहेत. दंगली होत आहेत. परंतु राजकीय नेत्यांना त्याचे काहीही वाईट वाटत नाही.

भारत सरकारने अस्पृश्यांना सवर्णा पर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षण, शासकीय उद्योगात, नोकरी, व विधान सभा, लोकसभेत राखीव, जागा ठेवून 'आरक्षण' जाहीर केले आहे. परंतु याचा फायदा आर्थिक दृष्ट्या सबळ असणारेच मागासवर्गीय लोकांना मिळत आहे. जो

आर्थिकदृष्ट्या अतिशय गरीब आहे तो हया सवलती पर्यंत पोहचतच नाही. निरक्षरता, गरीबी व अज्ञान इत्यादी कारणांमुळे हे लोक शासकीय मदतीपर्यंत पोहोचू शकत नाहीत व शासकीय लोकही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. अशाप्रकारे सद्यपरिस्थितीमध्ये जाती संदर्भातील कल्पना पुढील प्रमाणे आहेत.

४.२ जाती आणि जाती संस्था यांची व्याख्या व वैशिष्टे

(१) जातीची व्याख्या – जातीच्या अनेक व्याख्या आहेत. परंतु संक्षेपाच्या दृष्टिकोनातून खालील दोन व्याख्यांचा विचार करु.

१. नेशफिल्ड (Nesfield) यांची व्याख्या "a class of the community which disowns any connection with any other class and can neither intermarry nor eat nor drink with any but persons of their own community".

२. डॉ. केतकर (Dr. Ketkar) यांनी जातीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.
" a social group having two characteristics :
i) Membership is confined to those who are born of members and includes all persons so born :
ii) The members are forbidden by an inexorable social law to marry outside the group."

वरील व्याख्येवरुन जातीचे वैशिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतात.

(२) जातीची वैशिष्टे :-

i) **स्तर (श्रेणी) :** सामाजिक व धार्मिक दृष्टिकोनांतून जातीचे स्तर किंवा श्रेणी आहेत. या श्रेणीच्या पिरॅमिड मध्ये सर्वात वर ब्राम्हण आणि पिरॅमिडच्या तळामध्ये हलक्या जातीतील लोक व पिरॅमिडच्या मध्ये हजारो प्रकारच्या जातीव पोटजाती दाखवल्या जातात.

ii) **वंश :** एखाद्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा (social status) तो ज्या जातीत जन्म घेतो. त्याच्यावरुन ठरतो. उदा. ब्राम्हण कुटुंबामध्ये जन्म झाल्यास ब्राम्हण आणि शूद्राच्या कुटुंबात जन्म झाल्यास शुद्र समजले जाते.

iii) **स्वजाती विवाह (Endogamy) :** स्वतःच्याच जातीत विवाह केला जातो. भूतकाळामध्ये आंतरजातीय विवाहास अतिशय विरोध होता.

iv) **सामाजिक गट :** प्रत्येक जात म्हणजे एक सामाजिक गट होय. त्याचा नेतृत्व त्यांच्या नेत्याकडून केले जाते. एखादयाने त्यांच्या जातीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास नेता त्यांना शिक्षा म्हणून एखादे काम करुन घेणे, शारिरीक शिक्षा, किंवा त्या व्यक्तीला बहिष्कृत म्हणजेच वाळीत टाकले जाते. इत्यादी प्रकारच्या शिक्षा होत असत.

v) **स्थानिक गट :** संपूर्ण देशांमध्ये जातीचे मूल्य एकसारखे नाही उदा. एखादया विशिष्ट प्रदेशामध्ये अस्पृश मानलेल्या जातीस दुसऱ्या एखादया प्रदेशामध्ये त्याच जातीस अस्पृश मानले जात नाही.

vi) **परंपरागत व्यवसाय :** जुन्या जातीसंस्थेमध्ये व्यवसाय मागील पिढीकडून पुढील पिढीकडे हस्तांतरीत होत असे. उदा. व्यापार करणाऱ्याचा मुलगा हा व्यापारच करीत असे. सुतार (carpenter) काम करणाऱ्याचा मुलगा हा सुतार कामच करत असे इत्यादी.

vii) **प्रदूषित –शुध्द सिध्दांत (Theory of pollution & purity) :** परंपरागत जाती –जाती मधील संबंध 'प्रदूषित आणि शुध्द' या संकल्पनेनुसार असत. परंपरागत खालची जात वरील जातीस प्रदूषित करते, अशी संकल्पना होती. अस्पृशतेला आधार असलेली हीच संकल्पना आहे. खालच्या जातीतील लोकांना शाळा मंदिर, विहिरी इत्यादी सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नसे.

viii) **अन्नाच्या सवयी (Food Habits) :** अन्नाच्या सवयी संदर्भात काही बंधने (Restrictions) असत. उदा. शुध्द ब्राम्हणांनी मांसाहार करायचा नाही. दारु प्यायच नाही इत्यादी. एका जातीतील दुसऱ्या जातीमध्ये जेवत नसत. विशेषत: वरच्या जातीतील खालील जातीमध्ये जेवत नसत.

वरीलप्रमाणे जातीचे वैशिष्टे आहेत. परंतु सध्याच्या काळामध्ये वरील वैशिष्टयामध्ये काही प्रमाणात शिथिलता आलेली दिसून येते.

(३) **जाती संस्थेची व्याख्या (Definition of caste system) :** जाती संस्थेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली जाते -

"It is a system of social stratification and social restriction in India in which communities are defined by thousands of endogamous hereditary groups called Jatis." या व्याख्येवरुन जाती या जातीसंस्थेचे भाग किंवा एकक (part or unit) असल्याचे लक्षात येते.

(४) **जाती संस्थेची वैशिष्टे (Characteristics of the caste system) :**

i) **समाजाची विभागीय वाटणी (Segmental division of society) :** जाती संस्थेच्या अंतर्गत भारतीय समाज छोट्या छोट्या सामाजिक गटांमध्ये विभागला गेला आहे, त्यास जाती, असे म्हटले जाते. सद्य परिस्थितीमध्ये जात ही जन्मावरुन ठरते. त्यामुळे एका जातीतून दुसऱ्या जातीमध्ये जाता येत नाही. असे समजले जाते. प्रत्येक जातीला स्वत:चा परंपरागत सामाजिक स्तर, व्यवसाय, चालीरीती, नियम इत्यादी असतात. असे मानले जाते.

ii) **श्रेष्ठ –कनिष्ठ स्तर :** प्रत्येक भाषिक क्षेत्रामध्ये सुमारे २०० जाती आहेत. त्यातील काहींना श्रेष्ठ, काहींना कनिष्ठ समजले जाते, त्यावरुन त्यांचा क्रम लावला जातो.

iii) **नागरी आणि धार्मिक विशेष हक्क आणि अपात्रता संदर्भातील भेद :** जातीच्या आधारावर निर्माण झालेल्या समाजामध्ये विशेष हक्क (Privileges) आणि अपात्रता

(Disabilities) यांचे असमान वितरण असते. उच्च जातीतील लोक विशेष हक्काचे सुख अनुभवत असतात. तेव्हा हलक्या जातीतील समजले जाणारे लोक निरनिराळया अपात्रतेचा दुबळेपणाचा त्रास सहन करत असतात.

iv) **मुक्तपणे व्यवसाय निवडण्याचा अभाव :** व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. जाती संस्थेतील प्रत्येक जातीचा परंपरागत व्यवसाय ठरलेला असे. वंश परंपरागत हा व्यवसाय त्याच जातीतील मागील पिढीतून हा व्यवसाय त्याच जातीतील मागील पिढीतून पुढील पिढीकडे हस्तांतरीय होत असे. वंश परंपरागत चालत आलेला व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय करता येत नसे.

आपली प्रगती तपासा .

प्रश्न - (१) जातीची व्याख्या सांगून जातीचे वैशिष्टये सांगा.

(२) जातीसंस्थेची व्याख्या सांगून जाती संस्थेची वैशिष्टे सांगा.

४.३. जाती संस्थामुळे निर्माण होणारी असमानता (Inequalities causedby the caste system)

जाती संस्थामुळे सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी प्रकारची असमानता समाजामध्ये निर्माण होते. समाजामध्ये निर्माण होणारी असमानता पुढीलप्रमाणे सांगता येते.

i) **सामाजिक दर्जातील असमानता -** जातीसंस्थामध्ये श्रेष्ठ आणि कनिष्ठ याप्रकारचे स्तर असल्यामुळे कनिष्ठ जातीतील, हलक्या जातीतील लोकांना सामाजिक दर्जेचा (social status) आनंद अनुभवता येत नाही. खालच्या जातीतील माणसाला नेहमी त्यांच्या निम्न स्तराची (lower position) आठवण करु दिली जाते. अशा प्रकारच्या वागणूकीमुळे खालच्या जातीतील लोकांचा त्यांचा स्वत:वरील विश्वास नाहीसा होतो. आत्मविश्वासाच्या अभावामुळे इतर जातीतील लोकांशी मुक्तपणे स्पर्धा करण्यास असमर्थ ठरतात, त्यामुळे इतर अनेक प्रकारच्या असमानता निर्माण होतात.

ii) **जातीतील असमानता (Inequalities with in caste) :-** प्रत्यक्ष एका जातीमध्ये ही असमानता दिसून येतो. यामुळे उपजति व पोटजाती निर्माण झालेल्या दिसून येतात यांचा परिणाम म्हणून समाज अने छोटया छोटया विभागामध्ये, अंशामध्ये विभागला जातो. आणि उपजाती व पोटजातीमुळे एकाच जातीतील लोक एकमेकांपासून दूर जातात.

iii) **साक्षरतेमधील असमानता (Inequlities in Literacy) :** जरी देशांतील एकूणात साक्षरतेचा दर वाढलेला आहे. तरीसुध्दा अनुसुचित जाती व जमातीतील लोक शिक्षणांच्या संदर्भातील अनेक समस्यांना तोंड देत आहेत. अनुसूचित जाती – जमातीतील १९६१ मध्ये साक्षरतेचा दर १०.२७% असून तो २००१ मध्ये ४५.२०% इतका झालेला दिसून येतो. याचा अर्थ अजून ५५% अनुसूचित जाती जमातीतील लोक मूलभूत व आवश्यक भौतिक विकासाच्या घटाकांपासून वंचित आहेत.

iv) **प्राथमिक शिक्षण (Primary Education) :** प्राथमिक शाळेत सर्वच्या सर्व येण्याच्या दृष्टीकोनांतून आपला देश वाटचाल करीत आहे. प्राथमिक शाळेत नाव नोंदवण्याचे प्रमाण २००३ -२००४ मध्ये ९०% होते आणि २००४ -२००५ मध्ये ते ९८ % इतके झाले. हे प्रमाण वाढण्यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत उदा. मुलांना दुपारचे जेवण, एकदिवस आड शाळा उघडणे. तसेच शिक्षक व पालक संघटना प्राथमिक शाळेत नाव नोंदणीचे हे विधायक विकास दिसत असला तरी सुध्दा अनेक अनुसुचित जाती –जमातीतील मुले शाळेपासून दूर आहेत. अनुसूचित जाती जमातीतील ७ ते १७ वर्ष वयोगटातील फक्त ६५.७% मुले फक्त शाळेत जातात. याच वयोगटातील उच्च वर्णातील प्रमाण ८१.३ % इतके आहे. अनुसूचीत जाती जमातील २०.८ % मुले शाळेत केव्हाच जात नाहीत, हेच उच्च जातीतील प्रमाण ७.६ % इतके आहे. भारतामध्ये प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा यांचे प्रत्यक्ष अंतर घरांपासून जास्त आहे. मुले शाळेत जाण्यास हाही एक अडथळा आहे. अनुसूचित जाती जमातीतील लोकांची घरे गावांपासून दूर असतात, किंवा गावाच्या एका टोकाला असतात. त्यामुळेही अनुसूचित जाती-जमातीतील मुले शाळेत कमी प्रमाणात जातात. या भौतिक अंतरा बरोबर सामाजिक अंतर (Social Distance) सुद्धा ही अनुसूचित जाती जमातीतील मुले शाळेत न जाण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

v) **गरीबी (poverty) :** अनुसुचित जाती – जमातीतील लोकांची मिळकत अतिशय कमी आहे. सन २००० मध्ये ग्रामीण भागामध्ये ३८% अनुसूचित जाती –जमातीतील लोक दारिद्रय रेषेखाली होते, त्यावेळी इतर जातीतील २०% लोक दारिद्रय रेषेखाली होते. अशा प्रकारे मिळकतीती ही असमानता आहे.

आपली प्रगती तपासा –

प्रश्न – जाती संस्थामुळे निर्माण होणारी असमानता स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

४.४ जातीवादाचे परिणाम (consequences of casteism) :

- समाजामध्ये हिंसाचार बोकाळतो आणि कायदे हीन होतात.
- सर्वसामान्य आणि मागास लोकांचे जीवन उद्ध्वस्त होते आणि त्यांच्या संपतीचीही हानी होते.
- उच्च जातीच्या ऑफिसरने मागासवर्गीय व्यक्तींना त्यांचे विशेषाधिकार देण्याचे अमान्य केल्यास मागासवर्गीय व्यक्तींच्या मनात सूडाची भावना तयार होते व कलह निर्माण होतो.
- मागासवर्गीय लहान किंवा अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्ज देण्यास नकार देण्याचे उच्च जातीय बँक अधिकारी भारतातील विविध भागात आजही आहेत. त्यामुळे तणावाची परिस्थिती निर्माण होते.
- अनेक मागावसवर्गीय व्यक्ती देशात अपमानास्पद वागणूक सहन करुन जीवन जगत आहेत.
- मागासवर्गीय अनेक मुले ज्या ठिकाणी उच्च वर्गीय लोक मोठ्या प्रमाणावर पिळवणूक करतात तेथून शहाराकडे धाव घेत आहेत. त्यामुळे शहरी जीवनावर ताण पडत आहे.
- शैक्षणिक व सामाजिक जीवनामध्ये उच्च वर्णीय लोक विविध प्रकारे मागासवर्गीयांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळेही कलह निर्माण होत आहेत.
- मागासवर्गीय मुले व स्त्रिया यांची उच्च वर्णीय लोकांकडून मोठया प्रमाणावर पिळवणूक होत आहे.
- जातीयवाद अनेक राजकीय नेत्यांना विधानसभा व लोकसभेपर्यंत पोहोचविण्यासाठी मदत करतात. हेच आमदार व खासदार जातीय तणाव वाढविण्यास नंतर कारणीभूत ठरतात.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : जातीवादाचे परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

४.५ जातीवादाचे निर्मूलन करण्याकरिता उपाय (measures to Resolve casteism) – जातीवादाचे निर्मूलन करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना केल्यास निश्चितच त्याचे प्रमाण कमी होऊन कलह निर्माण होणार नाहीत.

(१) **कणखर राजकीय धोरण :** जातीय पक्ष, जातीय संघटना किंवा जातीय संस्था यांच्या कृत्यांना पायबंद घालण्यासाठी कणखर राजकीय धोरण असले पाहिजे. सत्ताधारी पक्षांनी

किंवा राज्यकर्त्यांनी जातीयवादाला पांघरुन घालू नये. किंवा जातीवाद स्वत:च निर्माण करु नये. धर्मातील राज्याच्या भूमिकेच्या प्रामाणिकपणे अवलंब केला पाहिजे.

(२) **कडक कायदे व त्यांची अंमलबजावणी जातीय :** वाद निर्माण करणाऱ्या विरुध्द कडक कायदे तयार केले पाहिजे. नुसतेच कागदोपात्री कायदे नकोत तर त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांना योग्य ते अधिकार देऊन त्यांना जबाबदार धरण्यात यावे. यामुळे समाजात जातीय कलह होणार नाहीत आणि झालेच तर ते नियंत्रणाबाहेर जाणार नाहीत.

(३) **शैक्षणिक व्यवस्थेत बदल :** संकुचित धर्म भावनांना थारा मिळणार नाही अशा प्रकारे सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेत बदल करुन, समभावाची शिकवण रुजली गेली पाहिजे. विशाल मानवतावादी धर्माची शिकवण दिली तरच परस्परांत सहकार्याची भावना निर्माण होईल व कलह थांबतील.

(४) **राष्ट्रनिष्ठा प्रबळ करणे :** विविध धर्मिय, विविध जातीय, लोक भारतात असले तरी आपण सर्व एकाच भारतीय संस्कृतीचे वारसदार आहोत अशा प्रकारची प्रबळ राष्ट्रीय निष्ठेची भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात दृढ करण्यास हवी.

(५) **कार्यक्षम सरकारी यंत्रणा :** घातक अशा जातीयवादी शक्तींना तोंड देण्यासाठी कार्यक्षम किंवा सक्षम सरकारी यंत्रणेची गरज आहे. त्याचप्रमाणे या नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांना कडक शिक्षा देण्यात यावी. अनेक पोलीस अधिकारी त्यांची कर्तव्ये कार्यक्षमपणे बजावत नाहीत अशावेळी निवृत्ती नंतरचे फायदे देऊ नयेत. अशा कडक कार्यवाहीची तरतूद असेल तरच अशा गोष्टींना पायबंद बसेल.

(६) **धर्मगुरुंची जबाबदारी :** विविध धर्मगुरु किंवा जातीयवादी प्रांतीय नेतृत्व यांची जबाबदारी फार मोठी आहे. या नेतृत्वाने समाजाला धर्माच्या मूलभूत विश्वबंधुत्वाच्या तत्त्वावर शिकवण दिली पाहिजे. धर्माची आदर्श तत्वे समाजात रुजविली पाहिजेत. धर्मद्वेष वाढेल, तणाव निर्माण होईल अशा घटकांना निष्प्रभ करण्यासाठी उदात्त विचारांची शिकवण स्वत:च्या आचरणाने लोकांना दिले पाहिजे.

(७) **प्रसार माध्यमांची भूमिका :** समाजातील विविध घटाकांमध्ये निसांप्रदायिकताची भावना रुजविण्यात प्रसारमाध्यमे मोठया प्रमाणात कार्य करु शकातात. निरनिराळया धर्मावर आपली पोळी भाजणाऱ्या राजकीय नेत्यांचे ढोंग समाजासमोर दाखवू शकतात. समाजामध्ये जातीवादाचे हळूहळू बीजा रोपन करणाऱ्या नेतृत्वाचा, पडदा फाडण्याचे कार्य प्रसारमाध्यमांनी करावे.

(८) **समाज जागृती :** सरकारी यंत्रणेबरोबरच अशासकीय संघटना व स्वंयसेवी संघटना यांनीही समाजजागृती मोठया प्रमाणावर करावी. जातीयवाद याविषयी कलह निर्माण होणार नाही यासाठी वारंवार तेच तेच प्रयत्न पुन्हा –पुन्हा करुन लोकांच्या मनावर बिंबवले पाहिजे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) जातीवादाचे निर्मूलन करण्याचे उपाय सांगा.

_____

_____

_____

_____

४.६ जमातवादामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह) (Inter –Group conflicts caused due to communalism)

राष्ट्रीय ऐक्य जाणीवपूर्वक टिकवावे लागते. कारण सर्वसाधारणपणे असे होते की आपत्तीच्या किंवा संकटाच्या वेळी माणसे एकत्र येतात. परस्परांना मदत करतात. परंतु आपत्ती टळली की व्यक्ती पुन्हा आपल्यापुरता विचार करायला लागतात. इतरांच्या हिताचा त्यांना विसर पडू लागतो. आपलाच स्वार्थ ते पाहू लागतात. धर्म, भाषा, प्रदेश या संकुचित आधारावर काही माणसे स्वार्थाचे राजकारण करु लागतात. यातूनच निरनिराळया प्रकारच्या वादाचे प्रश्न उभे राहतात. यातीलच एक जमात वाद (communalism) होय.

जमातवाद देशापुढील मोठे आव्हान आहे. संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण होतो. ब्रिटीशांनी आपल्या देशात जमातवादाचे बीज पेरले. वर्षानुवर्षे विविध धर्माचे लोक भारतात गुण्यागोविंदाने राहत आहेत. पंरतु जेव्हा धर्माच्या अभिमानाचा अतिरेक होतो तेव्हा त्याचे दुराभिमानात रुपांतर होते आणि यातूनच धर्मांधता निर्माण होते.

धर्मांधता हा जमात वादाचा पाया आहे. धर्मांधतेमुळे व्यापक राष्ट्रीय हिताचा विसर पडतो. भिन्न धर्मीयांचा एकमेकांवरचा विश्वास उडतो. काही लोक आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांचा विचारही आपापल्या धर्माच्या चौकटीतच करु लागतात. अशा अवस्थेत ते लोक धर्माविषयी, धर्म बांधवाविषयी अतिशय हळवे बनतात. आपल्या धर्माबददल कोणी काही बोलले किंवा धर्माचा अपमान केला तर दंगली पेटतात. शेकडो निरपराध लोक मारले जातात. कोट्यावधी रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते. सार्वजनिक शांतता नष्ट होते.

या सर्व परिस्थितीमध्ये राजकीय पक्ष धर्माधर्मात संघर्ष (कलह) निर्माण करण्याचे काम करीत आहे. उदा.राम जन्मभूमी, बाबरी मशीद, गुजरात गोध्रा रेल्वे जाळपोळ २००२ या सर्व दंगली धर्माच्या चिथावणीतून झाल्या आहेत. भारतामध्ये सर्वात मोठा व भयानक संघर्ष हिंदू मुस्लिम या दोन धर्मात स्वातंत्र्यापासूनच सुरु आहे. त्याचबरोबर हिंदू – शीख, हिंदू – ख्रिश्चन इत्यादी धर्मांमध्येही नेहमी संघर्ष निर्माण होत असतात. २६ /११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्लाने तर राष्ट्रीय एकात्मतेलाच सुरंग लागला आहे. देशातील नव्हे तर जगातील शांतताच लोप पावत आहे.

जमातवादास कारणीभूत घटक : पुढील कारणांमुळे जमातवाद निर्माण होतो.

(१) **धर्मांधता** – धर्मांधता हा जमातवादाचा पायाच आहे. धर्म निष्ठा व धर्मश्रध्दा अत्यंत आवश्यक आहे. सर्वधर्म समानतेचा संदेश देतात. परंतु याचा अतिरेक झाल्यास धर्मांधतेचा जन्म होतो. धर्म ही अफूची गोळी ठरते. त्यातूनच तणाव निर्माण होतात. थोडक्यात धर्मांधतेचा अतिरेक हे जमातवादाचे प्रमुख कारण आहे.

(२) **संस्कृती** – सर्व धर्मांना स्वत:ची परंपरा व संस्कृती आहे. विविध धर्मातील व प्रांतातील लोक आपली संस्कृती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. संस्कृती टिकविताना संस्कृती –संस्कृतीत संघर्ष निर्माण होतात. म्हणजेच जमातवाद निर्माण होतो.

(३) **राजकीय** – धर्माभावना व संस्कृती स्वत:हून संघर्ष निर्माण करीत नाहीत. तर त्यांचा अतिरेक तणावाला कारणीभूत ठरतो. राजकीय सत्तांध, संधिसाधू खुर्ची मिळवण्यासाठी धर्माचा व संस्कृतीचा उपयोग करतात व माणसांमाणसातील द्वेष वाढवून दंगली घडवून आणतात. संधीसाधू राजकीय नेते आपल्या जातीवर व समाजावर टिकून राहावे यासाठी जातीय भावनांना खत पाणी घालतात.

(४) **आर्थिक** – काही लोक आर्थिक प्रश्नांचा विचारही आपापल्या धर्माच्या चौकटीतच करु लागले आहेत. आपण ठराविक धर्माचे असल्याने राजकारणात प्रभावशून्य आहोत, त्यामुळे ठराविक प्रदेशाचा आर्थिक विकास करु शकत नाही. यासाठी दुसऱ्या जमातीच्या आर्थिक हितसंबंधाचा बळी देऊनच आपण आपला विकास करु शकतो. असे सांगून जातीय भावनांना प्रोात्साहन दिले जाते. व त्याचा स्वार्थासाठी उपयोग केला जातो.

(५) **भाषा** – भारत हा विविध भाषिक प्रदेश आहे. भारतामध्ये १६५२ भाषा बोलल्या जातात. प्रत्येकजण आपापल्या भाषेशी भावनिकरित्या गुंतलेल्या असतो. अनेकदा भाषा भेदामुळेच प्रादेशिक भावना किंवा जमातीबददलच्या भावना उफाळून येतात व संघर्ष निर्माण होऊ शकतो.

(६) **जातीय वादांचा उदय** – भारतात अनेक धार्मिक गट आहेत. त्या प्रत्येक धर्मात अनेक जाती, पोट जाती आहेत. यां सर्वांमध्ये भेद निर्माण करण्याचे काम राजकारणी करतात. राज्यकर्त्यांच्या या भेदनीतीमुळे संघर्ष होतात.

(७) **इतर घटक :** इतरही काही घटक जमात वादास कारणीभूत ठरतात. ते पुढीप्रमाणे आहेत.

- प्रशासन आणि कायदा सुव्यवस्था कुचकामी ठरते तेव्हा राजकीय लोकांच्या यात्रा, पदयात्रा इत्यादी.
- राजकीय लोकांची भडक भाषणे.
- प्रादेशिक समस्यांची भांडवल करणे.
- स्वार्थासाठी भावना भडकविणे (राजकीय) इत्यादी. वरील जमातवादामुळे उदभवणारे संघर्ष (कलह) टाळण्यासाठी पुढील गोष्टी आपण करायला पाहिजेत.

- आपण प्रथम राष्ट्राशी निगडीत आहोत नंतर धर्म, जात, भाषा ही जाणीव प्रत्येकाला करुन देणे. म्हणजेच आपली निष्ठा प्रथम राष्ट्रांशी आहेत. धर्म, जात, भाषा, यांना दुय्यम स्थान आहे.
- जातीय शक्तीविरुध्द लढा देण्यासाठी राजकीय पातळीवर प्रभावी प्रचार मोहिम आखली पाहिजे
- शैक्षणिक व्यवस्थेत बदल करुन राष्ट्रीय एकात्मतेचे वातावरण सृदृढ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी विविध धार्मियांमध्ये विश्वास व सहकार्य निर्माण करण्याचे काम शैक्षणिक उपक्रमाद्वारे करणे गरजेचे आहे.
- जातीय संघर्ष निर्माण करणाऱ्या जातीयवादी शक्तीचा शोध घेऊन त्यांचा पांथिकपणा समाजासमोर उघडा पाडला पाहिजे आणि अशा घातक शक्तींचा मुकाबला करण्यासाठी सरकारी यंत्रणे बरोबरच स्वयंसेवी संस्थानेही पुढाकार घेतला पाहिजे.
- धर्मावर ज्या व्यक्तीचे (राजकीय व धर्मगुरु) नियंत्रण आहे. अशा व्यक्तींवर महत्त्वाची जबाबदारी येते ती म्हणजे सर्व धर्म समान आहेत ही शिकवण धार्मिक प्रवक्ते किंवा धर्मगुरु यांनी चांगल्या रीतीने सांगायला हवी.

  या गोष्टी आपण सर्वांनी मिळून केल्यास निश्चितच संघर्ष (कलह) नष्ट होतील.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) जमातवाद म्हणजे काय ते सांगून जमातवादास कारणीभूत असणारे घटक स्पष्टी करणासह सांगा.

किंवा

(२) जमातवादामुळे किंवा परस्पर गटांतील संघर्ष (कलह) सविस्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

४.७ सारांश

मानव हा समाजशील प्राणी असल्याने तो समाजात एकत्र राहतो. सुदृढ समाजासाठी समाजातील मानवा-मानवांमध्ये परस्पर संबंध आत्मयितेचे असणे गरजेचे आहे. समाजातील या एकोप्याच्या संबंधामुळे व राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते. परंतु आज राष्ट्रीय एकात्मतेपुढे अनेक प्रकारची आव्हाने निर्माण झाली आहेत.

आपल्या देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेपुढे आज भाषावाद, प्रांतवाद, फुटीरतावाद, यासारखी आव्हाने कमी –अधिक प्रमाणात आहेत. परंतु यातील गंभीर आव्हान म्हणजे जातीवाद, जमातवाद आणि त्यांच्यातील परस्परातील संघर्ष (कलह) हे होय.

चातुवर्णव्यवस्था ही गुण कर्मानुसार होती. यामध्ये वर्ण जन्मावरुन ठरत नव्हता. कर्मामधील आवड व निपुणता यानुसार ठरत होती आणि महत्त्वाचे म्हणजे चातुवर्ण व्यवस्थेमध्ये सर्व कर्मांना समान आंतरिक मूल्य (Intrinsic Value) असल्याने कोणतेही काम श्रेष्ठ किंवा कनिष्ठ हा भेद नव्हता. परंतु जेव्हा वर्ण जन्मावरुन ठरु लागला आणि कमीमध्ये श्रेष्ठ – कनिष्ठ ही संकल्पना आणली गेली तेव्हा जातीभेद निर्माण झाले. यातून जातीवाद निर्माण झाला.

जातीवादामुळे अनेक प्रकारच्या असमानता निर्माण झाल्या. त्यामुळे जातीवादाचे परिणाम समाजांमध्ये अतिशय विपरित प्रकारचे झाले.

आपल्या देशांमध्ये जसे जातीवादामुळे समाजामध्ये अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या. त्याचप्रमाणे जमात वादामुळेही आपल्या देशांत अनेक प्रकारच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे जातीवाद व जमातवाद हे आपल्या देशाला शाप आहेत. निरनिराळे राजकीय गट जातीवाद आणि जमातवाद नष्ट करण्याऐवजी त्यांना स्वतःच्या स्वार्थासाठी खतपाणीच घालतात.

ही समस्या निघून जाण्यासाठी आपण प्रथम राष्ट्राशी निगडीत आहोत नंतर धर्म, जात, भाषा. ही जाणीव प्रत्येकाला करुन देणे आवश्यक आहे. म्हणजेच आपली निष्ठा प्रथम राष्ट्राशी आहे. धर्म, जात, भाषा यांना दुय्यम स्थान आहे. याची जाणीव प्रत्येकाला असणे अत्यंत आवश्यक आहे.

४.८ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

(१) जातीची व्याख्या सांगून जातीचे वैशिष्टे सविस्तर स्पष्ट करा.

(२) जातीसंस्थेची व्याख्या सांगून जातीसंस्थेची वैशिष्टे सविस्तर स्पष्ट करा.

(३) जातीसंस्थामुळे निर्माण होणारी असमानता सविस्तर स्पष्ट करा.

(४) जातीवादाचे परिणाम स्पष्ट करुन जातीवादाचे निर्मूलन करण्याकरिताचे उपाय सविस्तर सांगा.

(५) जातीसंस्थामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह) स्पष्ट करा.

(६) जमातवाद म्हणजे काय? ते सांगून जमातवादास कारणीभूत असणारे घटक सविस्तर सांगा.

(७) जमात वादामुळे परस्पर गटांतील संघर्ष (कलह) सविस्तर स्पष्ट करा.

❖❖❖❖

५

प्रदेशवाद, भाषिक भिन्नता आणि संघर्ष
(Regionalism, Lingustic Differences and Conflicts)

५.० उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ प्रदेशवादाचा अर्थ आणि विकास
५.३ प्रदेशवाद आणि भाविक संघर्ष वाढण्याची कारणे
५.४ प्रदेशवादाचे संघर्ष
५.५ प्रदेश वादचे संघर्ष कमी करण्यासाठी उपाय
५.६ भाषावाद
५.७ भाषिक संघर्ष
५.८ भाषिक संघर्ष कमी करण्याचे उपाय
५.९ प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम
५.१० सारांश
५.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न

५.० उद्दिष्टे

(१) प्रदेशवादाला अर्थ आणि विकास समजातून घेता येईल.
(२) प्रदेश वादामुळे निर्माण होणारे संघर्ष व त्यावरील उपाय जाणून घेता येतील.
(३) भाषिक संघर्ष व त्यावरील उपाय जाणून घेता येतील.
(४) प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम अभ्यासता येतील.

५.१ प्रस्तावना

भारतीय राजकारण शास्त्रामध्ये भारताला स्वातंत्र्यतेची पहाटेपासून प्रदेश वादाला (Regionalism) महत्त्व प्राप्त झालेले आहे. तथापि १९६० आणि १९७० च्या उत्तरार्धात इतर प्रदेशांपासून वेगळे होण्याची संकुचित मागणीसाठी दावा करु लागले आणि स्वतंत्र्य राज्यकारभार करण्याची इच्छा तीव्र होऊ लागली. या दोन्ही गोष्टी देशाच्या एकतेला धोका निर्माण करणाऱ्या गंभीर स्वरुपाच्या धक्कादायक होत्या. प्रदेशवादामुळे राष्ट्राची एकात्मता दुंभगली जाते.

५.२ प्रदेशवादाचा अर्थ आणि विकास (meaning and development of regionalism)

प्रदेशवाद म्हणजेच प्रांतवाद होय. आपल्या प्रदेशाविषयी अवाजवी स्वरुपाची अभिमान बाळगणे होय. उदा. मी मराठी मी गुजराथी अशी आपली ओळख सांगणे इथपर्यंत ठीक आहे. परंतु मी गुजराथी म्हणून मी इतर प्रांतीयांपेक्षा श्रेष्ठ आहे. अशी भावना किंवा समज होणे हा अवाजवी प्रांताभिमान होय. या अवाजवी प्रांताभिमानामुळे प्रदेशवाद (Regionalism) निर्माण होतात.

विकासातील असमतोलपणामुळे प्रदेशवाद निर्माण होतात. ब्रिटिश राजवटीमध्येच भारताच्या आर्थिक विकासात असमतोल निर्माण झाला. स्वांतत्र्यानंतरही काही राज्यांची प्रगती अधिक झाली. किंवा काही राज्ये आर्थिक दृष्ट्या मागासच राहिली. उदा. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, तामिळनाडू ही राज्ये आर्थिक व औदयोगिक दृष्टया बरीच विकसित झाली, तर ओरिसा, बिहार, आसाम सारखी राज्ये आर्थिक तसेच औदयोगिक दृष्ट्या अप्रगत राहिली. आर्थिक विकास व सुधारणा हा प्रगतीचा पाया असल्याने ज्या राज्यात आर्थिक विकास होतो ती राज्ये शिक्षण, आरोग्य किंवा इतरही क्षेत्रात मोठया प्रमाणावर प्रगती करु शकतात. ज्या राज्यांमध्ये अशा प्रकारचा विकास झालेला नसतो ती राज्ये मात्र शैक्षणिक तसेच नागरी सुविधांच्या बाबतीत खूपच मागे राहतात. प्रगत राज्यातील लोकांना उपलब्ध होणाऱ्या विकासाच्या संधी अशा राज्यांना मिळत नाहीत. शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी, दारिद्र्य अशा प्रश्नांची ते गांजले जातात. आपली फसवणूक होत आहे. आपल्याला विकासाच्या लाभांपासून दूर ठेवले जात आहे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होते. त्यामुळे राज्या-राज्यांतील सलोखा नष्ट होतो. हा सलोखा नष्ट झाल्याने राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते.

प्रदेशवाद हा प्रगत आणि अप्रगत अशा दोनही प्रकारच्या राज्यांना झपाटू शकतो आपण प्रगत आहोत कारण, प्रगत असल्याने आपण श्रेष्ठच आहोत असा श्रेष्ठत्वाचा गंड विकसित राज्यांतील लोकांमध्ये निर्माण होतो आणि मग ते अविकसित राज्यांतील लोकांना कमी लेखू लागतात. आपल्या विकासाच्या लाभात त्यांना वाटेकरु करुन घेण्यास त्यांची तयारी नसते. तर मागास भागातील लोकांना आपली संघटीत शक्ती उभी करण्यासाठी प्रादेशिक अस्मिता जागवावी लागते यातूनच प्रदेशवाद बळवतो. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्यास बाधा येते. तसेच लोकशाहीची वाढही होऊ शकत नाही.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : (१) प्रदेशवादाचा अर्थ आणि विकास सविस्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

५.३ प्रदेशवाद आणि भाविक संघर्ष वाढण्याची कारणे (causes for growth of regionalism)

भारतामध्ये प्रदेशवाद (Regionalism) आणि भाषिक संघर्ष वाढण्याची कारणे अनेक आहेत. या ठिकाणी नमूद करण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष हे हातात हात घालून चालतात, म्हणजेच प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष वाढण्याची कारणे एकच आहेत.

(१) भाषा किंवा संस्कृती माथी मारण्याच्या, विरुध्द प्रतिक्रिया (Reaction against imposition language or culture)

राष्ट्रीय सरकारने देशांतील सर्व लोक आणि गटांसाठी विशिष्ट प्रकारची आदर्शत्मक कल्पना, भाषा आणि संस्कृती माथी मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला प्रतिक्रीया म्हणून प्रदेशवाद (Regionalism) प्रथमतः या ठिकाणी दिसून येऊ लागला. अशा प्रकारे दक्षिणेकडील राज्यांनी हिंदी या भाषेला कार्यालनीन भाषा म्हणून विरोध केला कारण त्यांना उत्तरेकडील राज्ये आपल्यावर वर्चस्व गाजवतील या गोष्टींची भिती होती.

(२) प्रदेशाकडे दुर्लक्ष (Neglect towards Region)

सत्ताधारी पक्षाचे म्हणजेच सरकारचे एखाद्या प्रदेशांकडे नेहमी दुर्लक्ष असते आणि दुसऱ्या एखादया प्रदेशाकडे नेहमी प्रशासकीय आणि राजकीय सत्तेच्या दृष्टिकोनांतून नेहमी लक्ष केंद्रित केलेले असते. तेव्हा दुर्लक्षित प्रदेशांतील लोक वेगळे होऊन राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण (Decentralisation) करण्याचा प्रयत्न करतात. यातूनच प्रदेशवाद (Regionalism) उभा राहतो.

(३) उप – संस्कृती जतन करण्याची इच्छा (Desire to pre serve sub-cultures)

भारतीय संघ राज्य व्यवस्थेमध्ये स्वतःची उप-संस्कृती (sub-cultures) जतन करुन ठेवण्याच्या हेतूने स्वतःचे सरकार (self Government) स्थापून स्वतंत्र राज्यकारभार (autonomy) करण्याची इच्छा प्रदेशवादाला (Regionalism) जन्म देते.

(४) प्रादेशिक पक्षाची इच्छा (Desire of regional parties)

काही प्रादेशिक पक्षांच्या सत्ता हस्तगत करण्यांच्या इच्छेतून प्रदेशवाद (Regionalism) उदयास येतो उदा. AIADMK, अकाली दल (Akali Dal) तेलग देशम् (Telagu Desham) इत्यादी राजकीय पक्षांनी राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी प्रदेशवादाला उत्तेजन दिले.

(५) गटांच्या हितसंबंधाची ओळख राष्ट्रीय हितसंबंधाशी जोडण्यात अपयश (Failure to identify group interests with national Interests)

साठ वर्षाच्या स्वातंत्र्या नंतरही अनेक प्रकारच्या वेगवेगळया गटांना स्वतःच्या गटाच्या हितसंबधाची ओळख राष्ट्रीय हितसंबंधाशी जोडण्यात अपयश आले आहे. याचा परिणाम म्हणून

प्रदेशवाद टिकून राहिला आहे. हे गट स्थानिक आणि संकुचित हेतूने विचार करतात व स्वत:च्या गटालाच अग्रस्थान (Priorities) देतात. त्यांना असे वाटते की आपली ओळख मोठया देशांच्या हितसंबंधाशी जोडल्यास आपल्या स्वत:च्या गटाचे अस्तित्व नष्ट होईल आणि आपल्या गटाला जगण्यासाठी धोका निर्माण होईल. या प्रकारच्या विचारामुळे प्रदेशवाद तसाच टिकून राहतो.

(६) मागासलेल्या प्रदेशांतील वाढती जाणीव (Growing awareness of backward region)

मागासलेल्या प्रदेशांतील मागासवर्गीय लोकांच्या बरोबर नेहमी सापत्नभाव (Discrimination) ठेवण्यात आलेला असल्यानेही प्रदेशवादाला चालना मिळालेली आहे. स्थानिक राजकीय नेते यांचा पुरेपुर फायदा घेतात. ते लोकांना नेहमी सांगत असतात की केंद्रीय सरकार सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून जाणून बूजून आपल्या प्रदेशाकडे दुर्लक्ष करुन प्रादेशिक असमानता मुद्दाम निर्माण करत आहे. राज्य सरकारची सुध्दा हीच भूमिका आहे. अशा प्रकारे स्थानिक राजकीय नेते त्यांचे वर्चस्व टिकण्यासाठी प्रयत्न करतात. यामुळेही प्रदेशवाद (Regionalism) निर्माण होतो.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष वाढण्याची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

५.४ प्रदेशवादाचे संघर्ष (Conflicts of Reginalism)

जेव्हा एका प्रदेशांतील हितसंबधाला देश किंवा दुसऱ्या एखादया प्रदेशांकडून विरोध होतो. तेव्हा प्रादेशिक संघर्ष निर्माण होतात. तीव्र प्रकारचे प्रादेशिक संघर्ष निर्माण होतात. तीव्र प्रकारचे प्रादेशिक संघर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

(१) भारतीय संघातून बाहेर पडण्याची मागणी (Demand for secession from the Indian union)

भारतीय संघातून बाहेर पडण्याची मागणी ही प्रदेश वादाची शेवटच्या टोकाची भूमिका आहे. तामिळनाडूमध्ये DMK, पंजामध्ये अकालीदल (Akali Dal), उत्तर –पूर्व भारतातील मिझोस आणि नागस् (Mizos and Hagas), खलिस्तान चळवळ (Khalistan move ments) इत्यादींनी भारतापासून काही प्रदेशांना वेगळे

करण्यासाठी मागणी केलेली होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. परंतु प्रदेशांना भारतापासून वेगळे करणाऱ्या कोणत्याही चळवळीला यश आलेले नाही.

(२) **वेगळया राज्याची मागणी (Demand for separate state)**

काही क्षेत्रामध्ये लोकांनी त्यांची स्वत:ची भाषा व संस्कृती विकसित केलेली आहे. त्याठिकाणी ते लोक स्वतंत्र वेगळया राज्याची मागणी करीत आहेत. त्या ठिकाणी प्रदेशवाद आढळत आहे. अशा प्रकारची मागणी मुख्यत: स्वत:ची वेगळी राजकीय ओळख निर्माण करण्यासाठी करीत आहेत या प्रकारच्या प्रदेशवादामध्ये भाषेच्या आधारावर राज्याची फेररचना केली जाते.

(३) **विकासाच्या असमतोलपणामुळे मागणी (Demand due to imbalanced development)**

भाषेच्या आधारावर राज्यांची स्थापना मोठया प्रमाणावर झाली आहे. याचा परिणाम म्हणून त्या राज्यामध्ये असंतुलित विकास झाला. साधनांचे असमान वितरण झाले. त्यामुळे काही उपप्रदेश अविकसित राहिले. हे अविकसित राहिलेले उपप्रदेश राज्यांची स्वतंत्र्य मागणी करु लागले आहेत.

(४) **पूर्ण वाढ झालेल्या राज्याची मागणी (Demand for full- fledged state)**

राज्य फेर –रचना कायदा (state Reorganisation ACT) अस्तित्वात आल्यानंतर देशात

i) घटक राज्य (states) आणि

ii) संघप्रदेश (the union Territories) असे दोन प्रकारचे विभग झाले. यापैकी संघ प्रदेश (the union Territories) यांच्या पूर्ण वाढ झालेल्या राज्याच्या (Full fledged state) मागणीमध्ये प्रदेशवाद (Regionalism) दिसून येतो. काळाच्या ओघात या संघ – प्रदेशाची मागणीची चळवळ अतिशय तीव्र झाल्याने हिमाचल प्रदेश, मनिपूर, त्रिपुरा, गोवा, मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश इत्यादी. संघप्रदेशांना (the union Territories) यांना पूर्ण राज्यांचा दर्जा प्राप्त झाला.

(५) **आंतर –राज्य सीमा वाद (Inter- state boundary disputes)**

अनेक ठिकाणी आंतर –राज्य सीमावाद असल्याने प्रदेशवाद (Regionalism) निर्माण होतात. उदा. पंजाब आणि हरियाना यांच्यामधील चंदीगड वरुन वाद आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा बेलगम् (Belgallm) वरुन वाद आहे. या ठिकाणी मराठी भाषिक आणि कन्नड भाषिक यांच्यातील वाद आहे. या शहरात मराठी भाषिकांची संख्या खूप आहे. इत्यादी अनेक प्रकारच्या वादामुळे प्रदेशवाद (Regionalism) निर्माण होतो.

(६) **आंतरराज्य पाणी वाद (Inter – state water disputes)**

पाणी वापराचा पहिला महत्त्वाचा वाद नर्मदा, कृष्णा आणि कावेरी या नदयांचा आहे. यामध्ये मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या राजांचा समावेश होतो. कृष्णा नदीच्या पाण्याच्या वितरणांवरून महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या

राज्यांमध्ये वाद आहे. कावेरी नदीच्या पाण्यावरुन तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटक या राज्यांमध्ये वाद आहे. वरील प्रकारच्या आंतर – राज्य पाणी वादावरुन प्रदेशवाद (Regionalism) निर्माण होतो.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - निरनिराळे प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष सविस्तर सांगा.

_____

_____

_____

_____

५.५ प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष कमी करण्याचे उपाय (Measures for Resolving Regional conflicts)

प्रदेशवाद कमी करण्याचे उपाय पुढील प्रमाणे –

१. संघर्ष किंवा कलह निर्माण होणाऱ्या राज्यामध्ये सामंजस्याची व सहकाराची भावना निर्माण करण्यासाठी राजकीय पक्ष, सामाजिक संस्था व प्रसार माध्यमांनी महत्त्वाची भूमिका पार पाडणे आवश्यक आहे.

२. आर्थिकदृष्टया व औद्योगिक दृष्टया भागास राज्यांसाठी विशेष सवलती देऊ करणे, सध्या सरकारचे अनेक मागास राज्यांसाठी कर सवलती व रोख सवलती दिल्या आहेत.

३. राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी भारत सरकारकडून शक्य तेवढे प्रयत्न होत आहेत. अजूनही जास्त प्रमाणात प्रयत्न व्हायला हवेत.

४. अप्रगत राज्यांवर केंद्र सरकार तसेच प्रगत राज्येही त्यांचे लक्ष केंद्रीत करुन त्यांच्या विकासास चालना देण्याचे प्रयत्न करत आहेत.

५. प्रादेशिक सहकार्याची भावना वाढीस लागण्यासाठी राज्याराज्यात सतत सांस्कृतिक व किडाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

६. केंद्र सरकारकडून वितरीत केल्या जाणाऱ्या निधीचे वाटप योग्य प्रमाणात करुन त्यामध्ये समन्वयाची भूमिका केंद्र व राज्य सरकार निभावत आहेत.

७. महत्त्वाचे म्हणजे समर्थ नेतृत्व असेल तर प्रदेशवाद (Regionalism) निर्माणच होणार नाही.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष कमी करण्याचे उपाय सांगा.

५.६ भाषावाद (Linquism)

भारत ही विविध भाषिक भूमी आहे. १६५२ भाषा भारतात बोलल्या जातात. त्यामुळे मोठया प्रमाणावर भाषावाद निर्माण होतात. याचा विचार करुन भारतामध्ये भाषावर प्रातांची निर्मिती करण्यात आली आणि घटनांकारांनी प्रत्येक राज्याला त्याच्या संबंधीत भाषेला म्हणजेच प्रादेशिक भाषेला मान्यता दिली. भारतीय संविधानाने सुरुवातीला परिशिष्ट आठमध्ये १४ भाषांना मान्यता दिली. नंतर त्यामध्ये चार भाषांना मान्यता मिळाली. अशा प्रकारे सध्या भारतीय संविधानात १८ प्रादेशिक भाषांची नोंद करण्यात आली आहे. भारतातील ९१ %लोक या प्रादेशिक भाषा बोलतात व त्याद्वारेच व्यवहारही करतात.

भारतामध्ये हिंदुस्थानी भाषा व उर्दू भाषा बोलणारे ४६ लोक असल्याने भारतीय घटनांकारांनी हिंदी भाषेला राज्य भाषेचा दर्जा देण्याचे ठरवले. बिगर हिंदी भाषिक राज्यांनी त्यास विरोध केला. यामध्ये प्रामुख्याने दक्षिण भारतातील राज्ये व उत्तर पूर्वेकडील काही राज्यांचा समावेश होता. याबाबत बी.जी. खेर यांच्या अध्यक्षतेखाली एका भाषिक कमिशनची नेमणूक १९५५ साली करण्यात आली. या कमिशने त्यांचा अहवाल १९५६ मध्ये सरकारला दिला. संसदेने १९५७ मध्ये या अहवालाकर चर्चा करण्यांसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहाचे अधिवेशन बोलविले व त्यामध्ये पुढील तरतूद करण्यात आली.

भाषिक कमिशनच्या पहिला अहवाल १९५८ मध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालावर दक्षिणेतील राज्यांनी मोठया प्रमाणावर टीका केली आणि हिंदी भाषेच्या वापरास नकार दिला. त्यामुळे १९५९ मध्ये त्यावेळचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरुंनी लोकसभेत जाहीर केले की, अहिंदी भाषिक राज्यांना हिंदी बोलणे व व्यवहारात तिचा उपयोग करण्याचे बंधन त्यांच्या संमत्तीशिवाय लादले जाणार नाही. यासाठी अनिश्चित कालावधी देण्यात आला.

१९६३ मध्ये अधिकृत भाषा ठराव संमत करण्यात आला. यामध्ये इंग्लिश बरोबरच हिंदीलाही राष्ट्रभाषेचा दर्जा देण्याचे ठरले आणि १९६५ मध्ये हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा ठरली. १९६७ मध्ये हिंदी राष्ट्रभाषे विरोधात दक्षिणेतील राज्यांनी व पश्चिम बंगालने दंगली सुरु केल्या. यामध्ये तामिळनाडू राज्य वेगळे करण्याचे संकेत त्यांनी दिले. त्यामुळे १९६८ मध्ये भाषिक कायदयात सुधारणा करण्याचे संसदेत ठरवले आणि इंग्रजीला हिंदी भाषेचाच दर्जा कायम ठेवण्याचे मान्य करण्यात आले. यावर उत्तर भारतीयांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या म्हणून परत एकदा हिंदीलाच राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यात आला.

हिंदी – इंग्रजी भाषेवरुन दक्षिण व उत्तर भारत असे दंगे चालू असतानाच गोवा राज्याने कोकणी विरुध्द मराठी असा संघर्ष सुरु केला.

हिंदी –इग्रंजी वादाची सुरुवात घटना परिषदेत झाली. राज्यघटनेच्या मसुद्यात हिंदीचा राष्ट्रभाषा व प्रांताचा कारभार स्थानिक भाषेत करावा असे नमूद करण्यात आलेच नव्हते. तरीही बहुसंख्य असणाऱ्या हिंदी भाषिक लोकांनी हिंदीस राष्ट्रभाषेचा दर्जा द्यावा आणि संघ सरकारचा राज्यकारभार इंग्रजी भाषेऐवजी देवनागरी लिपीत म्हणजेच हिंदीत करावा यासाठी आग्रह धरला. हिंदीवाल्यांचे प्रवक्ते सेठ गोविंददास आणि स्व. पुरुषोत्तम टंडन यांच्या या मागणीचे दक्षिणेतील लोक चिंतीत झाले. त्यांच्या मते हा हिंदी साम्राज्यवाद (Hindi Imperialism) होता आणि यामुळे अहिंदी भाषिक राज्यांचे हितसंबंध धोक्यात येतील. म्हणून इंग्रजीच्या प्रेमामुळे नव्हे तर हिंदी भाषिकांना रोखण्यासाठी त्यांनी इंग्रजी भाषेचे समर्थन केले.

आपली प्रगती तपासा

प्रश्न – (१) भाषावाद सविस्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

५.७ भाषिक संघर्ष (Linguistic conflicts)

भारताच्या स्वातंत्र्यानंतर लगेच भाषिक संघर्षाला सुरुवात झाली. त्यापैकी काही संघर्ष शांत झालेले आहेत. परंतु अनेक संघर्षावर अजून तोडगा निघालेला नाही. काही महत्त्वाचे भाषिक संघर्ष पुढील प्रमाणे आहेत.

(१) **तामिळनाडूतील हिंदीच्या विरोधातील चळवळ (The Anti- Hindi agitations of Tamil Nadu)**

स्वातंत्रपूर्व व स्वातंत्र्यानंतर ही तामिळनाडूमध्ये (पूर्वीचे मद्रास राज्य) झालेल्या चळवळीची मालिकाच आहे. चळवळीमध्ये अनेक प्रकारचे हल्ले, विद्यार्थ्यांच्या चळवळी, राजकीय चळवळी इत्यादीचा समावेश आहे.

(२) **१९५० मधील इंग्रजीविरोधी जमावाने केलेला गोंधळ (The Anti-English Riots in the 1950s)**

१९५० मध्ये उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, राज्यस्थान या उत्तरेकडील राज्यांनी इंग्रजी या भाषेच्या विरोधात उठाव केला. यामध्ये विशेषतः विद्यार्थी होते. त्यांनी नियमांचे उल्लंघन करुन चळवळीत अनेक अहिंसक घटना घडवून आणल्या आणि खूप मोठ्या प्रमाणावर सरकारी संपत्तीचे नुकसान केले.

(३) महारष्ट्रीयन लोकांचे हितसंबंध सांभाळण्यासाठी आणि मराठीचे संरक्षण करण्यासाठी संघर्ष (The struggle for protecting Marathi and maharashtrian interests)
मराठी भाषा आणि मराठी लोकांचे समर्थन पूर्वीपासून शिवसेना आणि सद्यपरस्थितीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना करीत आहेत यासाठी चळवळी होत आहेत.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) भाषिक संघर्ष (Linguistic Conflicts) उदाहरणासह स्पष्ट करा.

५.८ भाषिक संघर्ष सोडवण्याचे उपाय (measures to resolve Linguistic conflicts)

हिंदी आणि इंग्रजी भाषेतील संघर्ष दूर करण्यासाठी १९६८ साली भाषिक कायदयात सुधारणा (दुरस्ती) करण्यात आली. त्यातील तरतूदी पुढील प्रमाणे आहेत.

- इंग्रजी भाषेला हिंदी भाषेबरोबरच राज्यांच्या कार्यालयीन भाषेचा व संसदीय भाषेचा दर्जा असेल. थोडक्यात भाषेला समान दर्जा असेल.
- हिंदी आणि स्थानिक प्रादेशिक भाषेला इंग्रजी भाषेचा पर्याय देण्यात आला.
- केंद्र आणि राज्य यांच्यातील संपर्काची भाषा म्हणून इंग्रजीला प्राधान्य देण्यात येईल. परंतु कोणतीही दोन राज्ये हिंदूतून व्यवहार करु शकतात किंवा हिंदीचे रुपांतर इंग्रजीमध्ये करुन संपर्क करु शकतात. भाषावादाची समस्या लक्षात घेऊन भारतीय घटनेने हिंदीलाच संरक्षण न देता प्रत्येक राज्याला त्यांच्या स्थानिक भाषेतून व्यवहार करण्याची परवानगी दिली आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) भाषिक संघर्ष सोडवण्याचे उपाय सांगा.

५.९ प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेचे परिणाम (Effects of Regionalism and Linguistic Differences)

प्रदेशवाद (Regionalism) आणि भाषिक समस्या संघर्ष निर्माण करण्याच्या शक्ती असल्याने ते देशाच्या एकतेला हानिकारक आहेत. त्यांच्या परिणामाचे वर्णन खालील प्रमाणे करता येते.

(१) प्रादेशिक पक्षांतील वाढ (Increase of regional parties)

प्रदेशवाद आणि भाषिक भिन्नतेमुळे अकाई दल, शिवसेना, तेलगु देशम अगदी अलिकडील महाराष्ट्र नव निर्माण सेना इत्यादी अनेक प्रादेशिक पक्ष राज्यांमध्ये निर्माण झाले. हे प्रादेशिक पक्ष फक्त राज्यातीलच राजकीय सत्ता हस्तगत करत नसून राष्ट्रीय राजकीय सत्तेमध्येही त्यांचा महत्त्वाचा भाग असतो. याला महत्त्वाचे कारण म्हणजे काँग्रेस पक्षाचे अध:पतन आणि याला योग्य पर्याय म्हणून पक्षाची उभारणी करण्यामध्ये भारतीय जनता पार्टी (BJP) चे अपयश होय. आज दोन्हीही पक्षाला लोक सभेत सत्ता मिळवण्यासाठी प्रादेशिक पक्षांची मदत घ्यावी लागते.

(२) प्रादेशिक नेत्यांमधील वाढ (Increase of regional leaders)

कित्येक नेत्यांना प्रसिध्दी प्रादेशिक वाढ आणि विकास यामुळे मिळते. उदा. एन्. टी. रामराव, अण्णा दुराई, एम् करुणानिधी, बाळ ठाकरे, ममता बॅनर्जी, जयललिता, इत्यादी अनेक प्रादेशिक नेत्यांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. प्रादेशिक नेत्यापैकी बऱ्याच जणांचा राष्ट्रीय राजकारणांमध्ये सुध्दा महत्त्वाची भूमिका बजावतात.

(३) स्वतंत्र राज्यकारभाराची (स्वायत्ततेची) मागणी (Demand for autonomy)

ज्या समाजाकडे विकासाच्या दृष्टीकोनांतून दुर्लक्ष झालेले आहे. असा समाज स्वंतत्र्य राज्याची मागणी करुन स्वतंत्र राज्यकारभार करण्याची इच्छा करतो. ही मागणी प्रदेशवाद (Regionalism) मुळे केली जाते.

(४) बाहेरील व्यक्ती विरुध्द मोहीम (Campaign against outsiders)

कित्येक प्रादेशिक नेते बाहेरील व्यक्ती विरोधात बोलू लागतात की स्थानिक लोकांच्या उदरनिर्वाहाची साधने बाहेरील लोक बळकवतात. शिवसेनेचे अध्यक्ष बाळ ठाकरे यांनी दक्षिण भारतीयांविरुध्द मोहीम सुरु केली. तसेच त्यांचे पुतणे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही उत्तरप्रदेश व बिहार मधून विशेषत: मुंबईमध्ये येणाऱ्या लोकांच्या विरोधात मोहीम सुरु केली आहे.

(५) राज्य व क्रेद्रींय राजकारणामध्ये युती (Coalition politics in states and at the centre)

प्रादेशिक पक्ष आणि प्रादेशिक नेते हे राजकीय दृष्ट्या बलवान व शक्तीशाली बनत आहेत. म्हणून सध्या बऱ्याच राज्यांमध्ये आणि केंद्रीय सत्तेमध्यही कोणत्याही एका पक्षाची सत्ता येऊ शकत नाही. सत्तेवर येण्यासाठी पक्षाला प्रादेशिक पक्षांशी युती करावी लागते. त्यामुळे प्रादेशिक पक्षाचे महत्त्व वाढत आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) प्रदेशवाद (Regionalism) आणि भाषिक भिन्नतेचे (Linguistic Differences) परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

५.१० सारांश

आपल्या देशाच्या एकात्मतेला प्रदेशवाद (Regionalism) आणि भाषिक भिन्नतेमुळे (Linguistic) धोका निर्माण झालेला आहे. प्रदेशवाद म्हणजे प्रांतवाद होय. भाषा आणि संस्कृती माथी मारण्याच्या विरुध्द प्रतिक्रीया, सरकारचे विशिष्ट प्रदेशांकडे दुर्लक्ष, उपसंस्कृती जतन करण्याची इच्छा, प्रादेशिक पक्षाची इच्छा,स्वतःच्या गटाचे अस्तित्व टिकवणे, मागासलेल्या प्रदेशांतील वाढती जाणीव इत्यादी घटकांमुळे प्रदेशवाद वाढतो. प्रदेशवादामुळे भारतीय संघातून बाहेर पडण्याची मागणी, वेगळ्या राज्याची मागणी, आंतरराज्य सीमावाद, आंतरराज्य पाणीवाद इत्यादी संघर्ष उभे राहतात.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे बऱ्याच प्रमाणात प्रदेशवाद आणि भाषिक संघर्ष हातात हात घालून चालतात. प्रादेशिक पक्षांतील वाढ, प्रादेशिक नेत्यांमधील वाढ, स्वायत्ततेची मागणी, बाहेरील व्यक्ती विरुध्द मोहीम, राज्य व केंद्रींय राजकारणांमध्ये प्रादेशिक पक्षांशी युती, इत्यादी प्रदेशवाद व भाषिक भिन्नतेचे परिणाम आहेत.

५.११ विद्यापीठ स्तरीय प्रश्न

(१) प्रदेशवादाला अर्थ आणि विकास सविस्तर स्पष्ट करुन प्रदेशवाद व भाषिक संघर्षाची कारणे सविस्तर सांगा.

(२) निरनिराळे प्रदेशवाद किंवा प्रादेशिक संघर्ष सविस्तर सांगून ते कमी करण्याचे उपाय सांगा.

(३) भाषावाद सविस्तर स्पष्ट करुन भाषिक संघर्ष उदाहरणासह स्पष्ट करा व ते मिटवण्याचे उपाय सांगा.

(४) प्रदेशवाद (Regionalism) आणि भाषिक भिन्नतेचे (Linguistic Differences) परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

(५) टिपा लिहा.

१) भाषावाद २) प्रदेशवाद / प्रांतीकवाद ३) भाषिक संघर्ष

❖❖❖❖

६

भारतीय संविधान / राज्यघटना
The Indian Constitution

पाठाची रचना :

६.० पाठाची उद्दिष्ट्ये
६.१ प्रास्ताविक
६.२ भारतीय संविधान निर्मिती
६.३ भारतीय संविधानाचे तात्विक अधिष्ठान
६.४ भारतीय संविधान रचना : प्रास्ताविक, मुख्य भाग आणि अनुसूची
६.५ भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये
६.६ सहिष्णुता, शांती आणि जातीय सलोखा
६.७ भारतीय संविधानाची मूलभूत वैशिष्ट्ये
६.८ समारोप
६.९ विद्यापीठस्तरीय प्रश्न

६.० पाठाची उद्दिष्ट्ये

- भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान समजून घेणे.
- भारतीय राज्यघटना रचनेचा अभ्यास करणे.
- भारतीय राज्यघटनेची शक्तिस्थाने आणि भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये जाणून घेणे.
- भारतीय राज्यघटनेची मूलभूत वैशिष्ट्ये समजून घेणे.

६.१ प्रास्ताविक

भारतीय समाज हा बहुसांस्कृतिक, बहुभाषिक, बहुवांशिक असा विविधतेने भरलेला असला तरीही कोणत्याही परकीय आक्रमणावेळी अथवा संकटावेळी तो एक होतो. भारतीय राजकारणात कोणत्याही धर्माची व्यक्ती पंतप्रधान किंवा राष्ट्रपती बनू शकते. कोणत्याही नैसर्गिक आपत्तीवेळी भारतीय लोक एकमेकांना मदतीचा हात देतात. लोक आपले मानवी हक्क मुक्तपणे उपभोगतात. हे सर्व आपल्या भारतीय राज्यघटनेमुळे शक्य झाले आहे. अन्यथा आपल्या शेजारील राष्ट्रांत आपण पाहतो की, पंतप्रधान, राष्ट्रपती यांना तुरुंगवास भोगावा

लागतो, कोणत्याही क्षणी सरकारविरुद्ध बंड करून ते उलथवून टाकले जाते. कधी लष्करी बंड होऊन ते सत्ता काबीज करतात. समाजविरोधी घटकांच्या हातात राज्यकारभार जातो. परंतु भारतीय राज्यघटनेमुळे भारतीय राज्यात अशी परिस्थिती आपणास कधीही अनुभवास येत नाही. उलट भारतीय समाजाने नेहमीच एकजूटीने अशा परिस्थितीत लोकशाही मार्गानेच सर्व प्रश्न सोडविले आहेत. त्या दृष्टीने पाहिल्यास, भारतीय राज्यघटनेला भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात तोड नाही.

६.२ भारतीय संविधान निर्मिती

भारतीय राजकारणाला सांविधानिक विकासाची मोठी परंपरा लाभली आहे. कारण ज्या ज्या वेळी भारतीय जनतेने ब्रिटिशांविरूद्ध आपले निषेध नोंदविले, त्या त्या वेळी ब्रिटिशांनी भारतीय जनतेला हप्त्या हप्त्याने संविधानिक सुधारणा देऊ केल्या. उदा. मोर्लेमिंटो सुधारणा (१९०९), मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा (१९१९), भारतीय स्वातंत्र्य कायदा (१९३५) इत्यादी. इ.स. १९४६ मध्ये कॅबिनेट मिशन भारतात आले व त्यांनी भारतीय राज्यघटना निर्मितीसाठी संविधान सभा किंवा घटना समिती स्थापन करण्याची शिफारस केली. त्यानुसार संविधान सभा स्थापन होऊन प्रांतिक विधानमंडळाच्या निर्वाचित सदस्यांद्वारे संविधान सभेच्या सदस्यांची निवड करण्यात आली. हे सदस्य तीन गटांमधून निवडले होते. उदा. १) सामान्य, २) मुस्लिम, ३) शिख. तसेच अल्पसंख्यांक, वंचित वर्ग (अनुसूचित जाती), पारसी, भारतीय ख्रिश्चन, अँग्लो इंडियन्स, आदिम जमाती आणि स्त्रिया यांनासुद्धा संविधान सभेमध्ये प्रतिनिधित्व देण्यात आले होते. हे सर्व सदस्य अनुभवी, बुद्धिमान आणि कर्तृत्ववान असे होते. संविधान सभेमध्ये एकूण सदस्य ३८९ असून त्यातील २९६ हे ब्रिटिश व्याप्त भारतातील तर ९३ हे संस्थानी राजांचे प्रतिनिधी होते. त्यातून २०८ राष्ट्रीय काँग्रेस, ७३ मुस्लिम लीग आणि उरलेले १०८ हे इतर संस्थांचे सदस्य होते.

संविधान सभेचे (घटना समिती) पहिले अधिवेशन ९ डिसेंबर १९४६ रोजी हंगामी अध्यक्ष डॉ. सचिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यानंतर ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची संविधान सभेचे कायम अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

राज्यघटना तयार करण्याच्या प्रक्रीयेसाठी संविधान सभेने काही नियम तयार केले. म्हणून संविधानाचा आराखडा लिहिण्यासाठी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. कायदेपंडीत व अनेक देशांच्या राज्य घटनांचा अभ्यास असलेले बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याअगोदरपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सभेच्या अनेक उपसमित्यांवर सदस्य म्हणून भूमिका पार पाडित होते. आता त्यांच्यावर संपूर्ण संविधानाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी टाकण्यात आली व ती त्यांनी आजारपण असतानाही पार पाडली. आपले पूर्ण प्रयत्न पणाला लावून त्यांनी भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला.

संविधानाचा हा मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तयार झाला. हा मसुदा २१ फेब्रुवारी, १९४८ पासून आठ महिने संविधान सभेपुढे चर्चेसाठी ठेवला. तसेच, जनतेच्या सूचना मागविण्यात आल्या. अशा प्रकारे ९ डिसेंबर, १९४६ ह्या पहिल्या सत्रापासून ते २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशीपर्यंत एकूण २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवसांचा कालावधी संविधान निर्मितीसाठी लागला. २६ जानेवारी १९५० या दिवसापासून हे भारतीय संविधान अंमलात आले.

मसुदा समितीची रचना खालीलप्रमाणे होती.

१) डॉ. बी. आर. आंबेडकर - अध्यक्ष
२) अल्लादी कृष्ण स्वामी अय्यर - सदस्य
३) एन्. गोपाल स्वामी अय्यंगार - सदस्य
४) डॉ. के. एम. मुन्शी - सदस्य
५) सय्यद मोहम्मद सादुल्ला - सदस्य
६) बी. एल. मित्तर (यांच्या जागी एन्. माधवराव सदस्य)
७) डी.पी. खेतान (यांच्या जागी टी.टी. कृष्णमाचारी सदस्य)

मसुदा समितीवर वरीलप्रमाणे सदस्य असले तरी ते आपले पाहिजे तेवढे योगदान देऊ शकले नाहीत व संपूर्ण आराखडा तयार करण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर येऊन पडली. त्यांच्या या महान कार्याची दखल भारतीय संविधान सभेने चर्चे दरम्यान घेतली आहे. ५ नोव्हेंबर, १९४८ रोजी मसुदा समितीचे एक सदस्य टी. टी. कृष्णमाचारी यांनी आपले मत संविधान सभेसमोर मांडले. त्यांनी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद आणि त्यादिवशी हजर असलेल्या सर्व सदस्यांसमोर आपले म्हणणे पुढील शब्दांत मांडले.

"अध्यक्ष महोदय, या सभागृहाला याची जाणीव असेल की, याचं सभागृहाने मसुदा समितीवर ज्या सात सदस्यांची नियुक्ती केली होती त्यापैकी एकाने या सभागृहाचा राजीनामा दिला म्हणून त्याच्या जागी दुसऱ्यांना नियुक्त करण्यात आले. एका सदस्याचा मृत्यू झाला आणि ती जागा रिकामीच राहिली. एक सदस्य दूर अमेरिकेत निघून गेले आणि त्यांचीही जागा भरली गेली नाही. दुसरे एक सदस्य राज्याच्या राजकारणात व्यस्त होते, गुंतलेले होते आणि त्या प्रमाणात पोकळी निर्माण झाली होती. एक किंवा दोन सदस्य दिल्लीपासून फार दूर होते आणि कदाचित प्रकृती अस्वास्थाच्या कारणास्तव त्यांनी बैठकीत भाग घेतलाच नाही. याचा अंतिम परिणाम असा झाला की या संविधानाचा मसुदा तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. आंबेडकर यांच्यावर आली आणि त्यांनी हे महत्त्वपूर्ण कार्य नि:संशय, अत्यंत समर्थपणे पूर्ण केले यात तीळमात्र शंका नाही. याकरिता आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत."

टी.टी. कृष्णमचारी यांच्याप्रमाणेच हजर अनेक सदस्यांनी संविधानाच्या मसुद्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिले आहे व ही सर्व चर्चा 'Constituent Assembly Debates' म्हणून नोंद करण्यात आलेली आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार मानले जाते.

आपली प्रगती तपासा :

१) मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते ?
२) संविधान निर्मितीसाठी एकूण किती कालावधी लागला ?

_____

_____

_____

_____

_____

६.३ भारतीय राज्यघटनेचे तात्विक अधिष्ठान

६.३.१ संविधानाच्या उद्दिष्टांचा ठराव :

भारतीय संविधानाची प्रास्ताविका हा अत्यंत महत्त्वाचा भाग असून ती तयार करताना त्यांत अनेक मूल्ये व तत्वज्ञानाचा समावेश असलेला आपणांस दिसतो. संविधानाचे तत्वज्ञान हे दुसरे तिसरे काही नसून वेगवेगळी मूल्ये, आदर्श, ध्येये व उद्दिष्ट्ये यांनाच पाया मानून त्यावर संविधानाची इमारत उभी केली आहे. संविधान सभेच्या पहिल्या अधिवेशनात ९ डिसेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'उद्दिष्टांचा ठराव' मांडला व त्यावर चर्चा होऊन तो २२ जानेवारी १९४७ रोजी सर्वानुमते पारित करण्यात आला. संविधानाच्या सर्व पायऱ्यांमध्ये उद्दिष्टांच्या ठरावातील उच्च आदर्श व तत्वज्ञान यांचा उपयोग संविधान तयार करताना केलेला आढळतो. त्या दृष्टीने 'उद्दिष्टांच्या ठरावास' अत्यंत महत्वाचे स्थान आहे. या ठरावातील मूल्यांचे प्रतिबिंब आपणांस प्रास्ताविकेमध्ये पडलेले दिसते. या ठरावाचे गमक म्हणजे भारत हे राष्ट्र एक सार्वभौम प्रजासत्ताक असून ते कोणत्याही परकीय सत्तेच्या प्रभावाखाली नसून ते भारतीय जनतेच्याद्वारे निर्माण झालेले आहे. तसेच भारतीय जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय आणि प्रत्येक नागरिकास व्यक्तिगत सुरक्षा, दर्जा व संधीची समानता उपलब्ध करण्याची भारतीय संविधान हमी देत आहे. तसेच संविधान अशी प्रतिज्ञापूर्वक दृढ निश्चय करते की, भारतास एक सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्रामध्ये रुपांतरीत करील.

६.३.२ भारतीय संविधानाची प्रास्ताविका :

प्रास्ताविका म्हणजे प्रस्तावना किंवा प्राथमिक विधान होय. तसेच कोणत्याही साहित्याच्या प्रारंभी त्या साहित्याची सारांशरुपाने दिलेली ओळख होय. भारतीय संविधानाची प्रास्ताविका ही सरकार व जनतेला दिलेले एक हमी पत्र आहे व सरकारची जबाबदारी निर्देशित करते. त्यामध्ये भारतीय जनतेच्या इच्छा-आकांक्षाचे प्रतिबिंब पडलेले आपणांस दिसते. संविधानाच्या माध्यमातून संपादन करावयाची ध्येये आणि उद्दिष्ट्ये म्हणजे ही प्रास्ताविका होय. ही प्रास्ताविका पुढील शब्दांत मांडण्यात आली आहे.

"आम्ही भारतीय जनता, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

न्याय : सामाजिक, आर्थिक व राजकीय;

स्वातंत्र्य : विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना;

समानता : दर्जा व संधी;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये;

बंधुता : व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांची हमी देणारी;

प्रवर्तीत करण्याचा निर्धार करून ;

आमच्या संविधान सभेत आज दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत."

आपणांस संविधानाचे तत्वज्ञान प्रास्ताविकेच्या माध्यमातून समजून घ्यावे लागेल.

'आम्ही भारतीय जनता' म्हणजे आम्ही भारतीय लोक आमच्या स्वत:साठीच हे संविधान अंगीकृत व अधिनियमित करीत आहोत. दुसऱ्या देशाचे संविधान आम्ही वापरीत नाही. भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांनी भारतीय जनतेच्यावतीने हे संविधान तयार केलेले आहे. म्हणजेच स्वत: घटनाकार किंवा संविधान सभा किंवा मसुदा समिती हे संविधान अंगीकृत व अधिनियमित करीत नसून भारतीय जनता ते करीत आहे. संविधान सभेचे सदस्य हे भारतीय जनतेचे प्रतिनिधी असून जनतेच्या वतीने जनतेसाठीच ते ही राज्यघटना तयार करीत आहेत.

६.३.३ सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक

भारतीय जनता भारतास एक सार्वभौम राष्ट्र म्हणून निर्माण करीत आहे. संज्ञा **'सार्वभौम'** याचा अर्थ भारत राष्ट्र कोणत्याही अंतर्गत किंवा बाह्य सत्तेच्या नियंत्रणाखाली नाही. तसेच भारतीय संविधान हे ब्रिटीश संसदेची किंवा सत्तेची देणगी नसून ते स्वत:साठी भारतीय जनतेने स्वत:च्या शक्तीने व बुद्धिने तयार केलेले आहे आणि त्यासाठी तीने आपले प्रतिनिधी निवडून लोकशाही मार्गाने संविधान सभेमध्ये पाठविले. त्यामुळेच भारतीय जनतेवर कोणाचीही कोणत्याही प्रकारची बंधने नाहीत व ती पूर्णपणे मुक्त आहे.

संज्ञा **'समाजवादी'** हे १९५० च्या संविधानाचा भाग नव्हते तर त्याचा समावेश ४२व्या घटना दुरुस्ती नुसार १९७६ रोजी करण्यात आला. समाजवादी संकल्पनेचा अर्थ सर्वसमावेशकता असा होतो. भारतीय जनता सर्वांना बरोबर घेऊन एकजीव समाजनिर्मितीसाठी प्रयत्न करील. तसेच एक केंद्री संपत्ती टाळणे, उत्पन्नाच्या साधनांवर सामाजिक नियंत्रण ठेवणे, तसेच गरजेप्रमाणे सर्वांना समान व योग्य वितरण करण्याचे आश्वासन देत आहे. ही संज्ञा मार्क्सच्या समाजवादाबरोबर साधर्म्य दाखवित असली तरी ती पूर्ण स्वरुपात नसून भारतीय सामाजिक रचनेप्रमाणे आहे. तसेच प्रत्येक भारतीय नागरिकास आपला योग्य मार्गाने उदरनिर्वाह करून आपले राहणीमान उंचावण्याचा अधिकार आहे हे या संज्ञेमद्ये अभिप्रेत आहे.

'धर्मनिरपेक्ष' हा शब्दसुद्धा ४२ व्या घटना दुरुस्तीन्वये प्रास्ताविकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्याचा अर्थ भारत या राष्ट्राचा 'राष्ट्रधर्म' नसून सर्व जाती धर्माच्या लोकांना आपले धर्मस्वातंत्र्य जोपासण्याचा अधिकार आहे. त्यांना उपासना स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य आहे. भारत राष्ट्र आपल्या नागरिकांमध्ये जाती-धर्माच्या आधारावर बिलकूल भेदभाव करणार नाही. त्यामुळे धर्माच्या बाबतीत राष्ट्र अलिप्त राहील. कोणत्याही विशिष्ट धर्माची पाठराखण करणार नाही. त्यामुळे धर्मनिरपेक्षता ह्या तत्वाचे प्रतिबिंब आपणास कलम २५मध्ये पडलेले आढळते. कोणतीही व्यक्ती कोणताही धर्म स्विकारू शकते, कोणत्याही धर्माचे-पंथाचे पालन करू शकते व तसे स्वातंत्र्य प्रत्येक भारतीय नागरिकास संविधानाने दिलेले आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती आर. वेंकटरामन यांनी धर्म निरपेक्षतेची व्याख्या अगदी मार्मिक शब्दात केली आहे. ते म्हणतात, 'धर्मनिरपेक्ष म्हणजे असे नाही की भारत संधार्मिक (Pro religious) अधार्मिक (non-religious) किंवा धर्मविरोधी (anti-religious) आहे.'

संज्ञा **लोकशाहीवादी** याचा संक्षेपी अर्थ म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या साहाय्याने लोकशाही सरकार निवडून देणे होय. परंतु विस्तारीत अर्थाने लोकशाहीवादी म्हणजे या देशातील लोकांचे जीवनमान आणि येथील संस्थांचा कारभार हा कसा चालला पाहिजे तर तो लोकशाही मार्गानेच. भारतीय शासन हे प्रातिनिधीक संसदीय लोकशाही पद्धतीवर आधारित असून ते येथील जनतेला जबाबदार आहे. लोकशाही सरकारचे अनेक प्रकार आहेत त्यापैकी अमेरिकेतील अध्यक्षीय लोकशाही, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड येथील राजा किंवा राणीला प्रमुख मानणारी लोकशाही यांचे उदाहरण देता येईल.

प्रजासत्ताक (**Republic**) या संकल्पनेचा अर्थ असा होतो की, भारतीय राज्याचा प्रमुख हा निर्वाचित असून तो कोणत्याही प्रकारे वारसा हक्काने आलेला नसेल. याचा दुसरा अर्थ असा होतो की, अंतिम सत्ता ही जनतेच्या हाती असेल आणि त्यासाठी जनता आपले प्रतिनिधी निवडून देईल. याचा अजूनही संदर्भ द्यावयाचा झाल्यास सर्व सरकारी आणि सार्वजनिक ठिकाणे कोणत्याही भेदभावाशिवाय जनतेला खुली असतील.

६.३.४ न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता :

पुढील भागात प्रास्ताविका असे म्हणत की, प्रत्येक भारतीय नागरिकांस तीन प्रकारचा **न्याय** मिळाला पाहिजे. तो म्हणजे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय होय. भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी ही न्यायाची योजना अत्यंत बुद्धिमानाने तयार केली आहे. सामाजिक न्यायाशिवाय आर्थिक व राजकीय न्याय मिळणे शक्य नाही. तसेच सामाजिक व राजकीय न्यायाशिवाय आर्थिक न्याय मिळणे दुरापास्त आहे. कारण भारतीय समाज हा अनेक जाती, धर्म, भाषा, लिंग, भेद यांनी बनलेला आहे आणि भारतीयांमध्ये या गोष्टींच्या आधारावर आपापसात अनेक प्रकारे भेदभाव केला जातो. अशा परिस्थितीत भारतीय जनतेमध्ये एक सुदृढ सामाजिक दृष्टीकोन बिंबवणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच भारतीय राज्य हे एक कल्याणकारी राज्य असणे गरजेचे आहे. हे या प्रास्ताविकामध्ये दर्शविण्यात आले आहे. ज्यावेळी ॲरिस्टॉटल या तत्ववेत्त्याने असे म्हटले की, सामाजिक न्याय प्रस्थापित करायचा असेल तर "समान स्तरावरच्या लोकांना समान नियम लावावेत आणि असमान स्तरावरच्या लोकांना असमान नियम लावावेत."

सामाजिक न्याय मिळण्याबरोबरच भारतीयांना आर्थिक न्याय मिळणे तेवढेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक नागरिकास योग्य मार्गाने कमाई करुन आपला उदरनिर्वाह करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या तत्वानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणेसुद्धा महत्त्वाचे आहे. आर्थिक स्तराच्या आधारावर भारतीय नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही हे मार्गदर्शक तत्वांमध्ये विशद केलेले आहे. म्हणूनच राज्याने सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळे कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे.

सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित केल्यानंतरच आपणांस राजकीय न्यायाचा विचार करावा लागेल. या अगोदर भारतातच नव्हे तर जगाच्या अनेक देशात मताधिकार हा सामाजिक स्तर, संपत्ती, शिक्षण, वर्ण यांच्या आधारावर दिला जायचा. परंतु भारतीय संविधानाने सरसकट सर्वच प्रौढ नागरिकांना मताधिकार बहाल केलेला आहे. तसेच गरीब, श्रीमंत, शिक्षित,

अशिक्षित अशा सर्वच जाती विरहीत नागरिकांना प्रत्येकी एक प्रौढ मताचा अधिकार दिला आहे व त्या एका मताचे मूल्य देखील एकच ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच राजकीय न्यायाची संकल्पना महत्त्वाची आहे.

म्हणूनच प्रास्ताविकेमध्ये प्रस्तुत केलेली न्यायाची संकल्पना ही एका अर्थाने क्रांतीकारी योजनाच आहे.

प्रास्ताविकेमध्ये **स्वातंत्र्याची** योजना आहे ज्याद्वारे भारतातील सर्व नागरिकांना आपले विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा, उपासना यांचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले आहे. याबाबतीत कोणताही भेदभाव न करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्याचबरोबर अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की, प्रत्येकाने आपले स्वातंत्र्य उपभोगताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्यास बाधा पोचणार नाही याचीही काळजी घेतली जाईल. प्रत्येक नागरिक आपणास हवा तो धर्म स्विकारू शकतो, कोणत्याही धर्म-पंथाची उपासना करू शकतो. म्हणूनच कलम १९ याद्वारे स्वातंत्र्याचा उहापोह करण्यात आला आहे.

प्रास्ताविकात सर्व भारतीय नागरिकांना कोणत्याही भेदभावाशिवाय समानतेने वागण्यांची हमी देत आहे. **समानतेच्या** संकल्पनेमध्ये दोन अर्थाच्या समावेश आहे. प्रथम **दर्जाची समानता** म्हणजे प्रत्येक व्यक्ती ही कायद्यासमोर समान मानली जाईल. तर दुसऱ्या प्रकारात **संधींची समानता** ज्याद्वारे सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून दिली जाईल असे अपेक्षित आहे. संविधान कलम १६(४) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, कोणत्याही मागास वर्गाच्या विकासासाठी सरकार कायदे पारित करू शकते व सामाजिक न्यायाची संकल्पना वास्तवात आणू शकते. तसेच ऐतिहासिक दृष्ट्या ज्या समाजावर हजारो वर्षे सामाजिक अन्याय (जातीभेद) झाला आहे, अशा समाजवर्गांसाठी 'संरक्षणात्मक भेद' करणे आवश्यक आहे. म्हणजेच धावपटूंच्या शर्यतीत अपंगांस सामील करावयाचे झाल्यास त्याला थोडी अंतर, वेळ यांची सूट देऊन नियम शिथिल केले तरच ती शर्यत न्यायपूर्वक होईल. म्हणूनच ॲरिस्टॉटलने जे म्हटले आहे की, "Equals to be treated equally, unequals unequally" हे योग्यच आहे.

प्रास्ताविकेमध्ये असेही पुढे म्हटले आहे की, प्रत्येक भारतीय नागरिकांची प्रतिष्ठा आणि एकजूट व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणारी **बंधुता** स्थापित केली जाईल. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, ''बंधुता ही अशी भावना आहे की, ज्यामध्ये सार्वत्रिक भ्रातृभाव आणि एकजूट व अखंडता यांना उत्तेजित करता येते.'' पुढे ते म्हणतात, ''समता व स्वातंत्र्य हे बंधुता असल्याशिवाय शक्यच नाही, अन्यथा भिंतीवर दिलेला रंगाचा पहिला हात असल्यासारखाच आहे.'' म्हणूनच समता, स्वातंत्र्य व बंधुता यांचा स्वतंत्रपणे विचार न करता एकत्रितपणे केला तर या तिन्हींचा त्रिवेणी संगम होऊन लोकशाहीचा विकास होईल.

अश प्रकारे प्रास्ताविकेचा सामरोप करताना २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी संविधान सभेमध्ये आम्ही भारतीय जनता ही राज्यघटना अंगीकृत आणि स्वत:प्रत अर्पण करीत आहोत असे म्हटले आहे.

आपली प्रगती तपासा :

१) भारतीय नागरिकांस कोणत्या प्रकारचे न्याय मिळण्याची हमी प्रास्ताविके मध्ये देण्यात आली आहे ?

२) भारतीय संविधान कोणत्या दिवशी अर्पण केले आहे ?

_____

_____

_____

_____

_____

६.४ भारतीय संविधान रचना : प्रास्ताविक, मुख्य भाग आणि परिशिष्टे

भारतीय संविधान रचना तीन विभागात झालेली आहे. ते म्हणजे प्रास्ताविक, मुख्य भाग आणि अनुसूची होय. भारतीय संविधानात संविधान दुरुस्तीची तरतूद अगोदरच करून ठेवल्यामुळे संविधानाचा गाभा बदलता येणार नाी. भारतीय संविधान हे जगातील सर्वात प्रदीर्घ व आशययुक्त आहे. मूळच्या संविधानामध्ये २२ भाग, ३९५ कलमे आणि ८ परिशिष्टे आहेत. या प्रत्येक तरतूदींबद्दल भारतीय संविधान सभेमध्ये प्रदीर्घ चर्चा होऊन सर्वानुमते किंवा बहुमताने ती पारित करण्यात आली.

६.४.१ प्रास्ताविका (Preamble) :

प्रास्ताविका भारतीय जनतेच्या इच्छा-आकांक्षांचा आरसा आहे. ती जरी कलमांमधील तरतूदींचा भाग नसली तरी त्याच्यामधील संकल्पना ह्या भारतीय जनतेने त्यांच्यासाठीच बनवलेल्या संविधानाचे एक सार आहे असे म्हणता येते. ते एक प्रकारचे तत्वज्ञान असून त्याची प्रत्यक्ष रुपात अंमलबजावणी ही सरकारला करावयाची आहे. आपण अगोदरच प्रास्ताविकेबद्दल प्रदीर्घ चर्चा केली आहे.

६.४.२ मुख्य भाग (Main Parts) :

संविधानाच्या मुख्य भागात २२ भाग आणि ३९५ कलमे यांचा समावेश होतो. प्रत्येक भाग व त्यातील कलम यांच्यामधील तरतूदी यांचा आपण मागोवा पुढीलप्रमाणे घेणार आहोत.

६.४.२.१ भाग – I संघराज्य व त्याचे क्षेत्र :

पहिल्या भागामध्ये कलम १-४ यांचा समावेश असून कलम १ व २ मध्ये संघराज्याचे नाव, त्याचे क्षेत्र व नवीन निर्मित राज्य यांचा समावेश आहे. प्रक्रीया, कलम ३ मध्ये नवीन राज्य निर्मिती त्यांचे क्षेत्र, सीमा यांचा समावेश आहे. कलम ४ मध्ये कलम २ व ३ अंतर्गत करण्यात आलेल्या कायद्यांद्वारे पहिल्या व चौथ्या परिशिष्टांच्या संशोधनाकरीता आणि पूरक, अनुषंगिक व परिणामी बाबींकरीता उपबंध करणे यांचा समावेश आहे.

६.४.२.१ भाग – II नागरिकत्व :

कलम - ५ संविधानाच्या प्रारंभीचे नागरिकत्व.

कलम -६ पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे अधिकार.

कलम - ७ स्थलांतर करून पाकिस्तानात गेलेल्या विवक्षित व्यक्तिंचे नागरिकत्वाचे अधिकार.

कलम -८ मूळच्या भारतीय असलेल्या, पण भारताबाहेर राहणाऱ्या विवक्षित व्यक्तिंचे नागरिकत्वाचे अधिकार.

कलम -९ परकीय देशाचे नागरिकत्व स्वेच्छेने संपादणाऱ्या व्यक्ति नागरिक नसणे.

कलम -१० नागरिकत्वाचे अधिकार चालू राहणे.

कलम -११ संसदेने नागरिकत्वाच्या अधिकाराचे कायद्याद्वारे विनियमन करणे.

६.४.२.१ भाग – III मूलभूत अधिकार (सर्वसाधारण) :

या भागात कलम १२ ते ३५ यांचा समावेश असून समता, स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शोषणाविरूद्धचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आणि घटनात्मक उपायांचा अधिकार यांचे विश्लेषण केलेले आहे. संपत्तीचा अधिकार इ.स. १९७८ च्या ४४ च्या घटना दुरुस्तीअन्वये वगळण्यात आला आहे.

६.४.२.१ भाग – IV राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे :

या भागात कलम ३६ ते ५१ यांचा समावेश असून त्यामध्ये संविधानाने राज्याला कल्याणकारी राज्याची संकल्पना अंमलात आणण्याविषयी मार्गदर्शनवजा सूचना केलेल्या आहेत. तसेच राज्याने मानवी मूल्ये, तत्वे, समता, स्वातंत्र्य, न्याय, आरोग्य, औद्योगिक, शैक्षिणिक विकास करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर सर्वच जनतेचा विकास करण्यासाठी समाजातील वंचित घटकांना विकासाची संधी राज्याने उपलब्ध करून दिली पाहिजे असे म्हटले आहे. या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाल्यास नागरिकांना न्यायालयात त्यांविरूद्ध दाद मागता येत नाही परंतु सरकारला पुन्हा सत्तेवर येण्यासाठी हे सर्व कल्याणकारी कार्य करणे गरजेचे असते.

६.४.२.१ भाग – IV – अ मूलभूत कर्तव्ये :

इ.स. १९५० साली मूलभूत अधिकार होते परंतु मूलभूत कर्तव्यांची तरतूद संविधानात केलेली नव्हती. त्यामुळे ४२व्या घटनादुरुस्तीनुसार इ. स. १९७६ साली कलम ५१-अ खाली मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. घटनाकारांना असे वाटले असावे की, प्रत्येक नागरिकास मूलभूत अधिकार आहेत त्यामुळे आपले अधिकार उपभोगताना दुसऱ्यांच्या अधिकारांचासुद्धा आदर ठेवला गेला पाहिजे असे अपेक्षित होते.

६.४.२.१ भाग – V – संघराज्य :

या भागात ५ प्रकरणे असून कलमे ५२ ते ७८ यांचा समावेश आहे व ते वेगवेगळ्या विषयांशी संबंधित आहेत.

पहिल्या प्रकरणाचे शीर्षक – 'कार्यकारी यंत्रणा' असे असून कलम क्र. ५२ ते ७३ यांमध्ये भारताचे राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांची नियुक्ती, कार्य व अधिकार-विशेषाधिकार यांची तरतूद आहे. कलम ७४-७५ मध्ये मंत्रिमंडळाची निर्मिती आणि त्यांचा कारभार यांची तरतूद आहे. कलम ७६ अंतर्गत भारताच्या महान्यायवादीची तरतूद आहे. कलम ७७-७८ मध्ये भारत सरकारचे कामकाज व पंतप्रधानांची कार्ये व कर्तव्ये यांविषयी तरतूदी आहेत.

दुसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'संसद' असे असून त्याची माहिती कलम ७९-१२२ मध्ये दिली आहे. कलम ८९-९८ मध्ये संसदेतील अधिकाऱ्यांची कार्ये नमूद केली आहेत. कलम ९९-१०० संसदेच्या कारभारासंबंधी आहे तर कलम १०१-१०४ मध्ये संसदेच्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द होणे याबाबत माहिती देण्यात आली आहे. कलम १०५-१०६ मध्ये संसदेचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती यांच्या तरतूदी आहेत. कलम १०७-१११ मध्ये संसदेच्या विधीबाबत प्रक्रीयेची माहिती दिली आहे. कलम ११२-११७ संसदेच्या अर्थव्यवहाराशी संबंधित आहेत तर कलम ११८-१२२ मध्ये संसदेची सर्वसाधारण कार्यपद्धती नमूद केली आहे.

प्रकरण ३ व त्यातील कलम १२३ संसदेच्या विरामकाळात अध्यादेश प्रस्थापित करण्याची राष्ट्रपतींची शक्ती यांची तरतूद केली आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये शीर्षक 'संघराज्य न्याय यंत्रणा' असे असून त्यात कलम १२४-१४७ यांचा समावेश आहे. यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती, त्यांचे अधिकार व अधिकारक्षेत्र यांची तरतूद आहे. कलम १४३ मध्ये राष्ट्रपतींना कोणत्याही विषयाबाबत सर्वोच्य नायालयाचा सल्ला घेण्याची शक्ती नमूद केली आहे.

पाचवे प्रकरण व त्यातील कलमे १४८-१५१ मध्ये भारताच्या नियंत्रक व महालेखा परीक्षक (CAG) यांची नेमणूक, शक्ती व कर्तव्ये यांच्याशी संबंधित आहेत.

६.४.२.२ भाग –VI – 'राज्ये' :

या भागात एकूण ६ प्रकरणे असून कलमे १५२ ते २३७ यांचा समावेश आहे व ती सर्व राज्यांशी संबंधित आहेत.

पहिल्या प्रकरणातील कलम १५२ मध्ये राज्याची व्याख्या दिली आहे. तर दुसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'कार्यकारी' असे असून त्यात कलमे १५३-१६७ यांचा समावेश आहे. कलम १५३-१६२ मध्ये राज्यपाल, त्यांची नेमणूक आणि कार्ये यांचे विवेचन आहे. कलम १६३-१६४ आपणास मंत्रीमंडळाची माहिती देते. कलम क्र. १६५ मध्ये राज्याच्या महाधिवक्त्याची तरतूद आहे तर कलम १६६-१६७ हे सरकारचे कामकाज आणि मुख्यमंत्र्यांची कर्तव्ये यांची माहिती देते.

तिसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'राज्य विधीमंडळ' आणि त्यामध्ये कलमे १६८-२१२ यांचा समावेश आहे. कलम १६८-१७७ हे विधीमंडळाच्या सर्वसाधारण रचना, कार्यपद्धती, विधान सभा व विधान परिषद यांच्याविषयी माहिती सांगते. कलम १७८-१८७ मध्ये विधीमंडळाचे अधिकारी उदा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिवालय यांच्याबाबत तरतूदी आहेत. कलम १८८-१८९ हे विधीमंडळाच्या कामकाजाविषयी माहिती देतात. कलम १९०-१९३ मध्ये आमदारांचे

सदस्यत्व रद्द होण्याबाबतच्या तरतूदी आहेत. कलम १९४-१९५ मध्ये विधानमंडळाच्या सभागृहाच्या कामकाजाविषयी माहिती आहे. कलमे १९६-२०१ मध्ये बील पारित करण्याच्या प्रक्रियेची माहिती आहे. कलमे २०२-२०७ मध्ये आर्थिक तरतूदीसंबंधी विधीमंडळाच्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली आहे. कलमे २०८-२१२ मध्ये सर्वसाधारण प्रक्रीयेची माहिती पुरवली आहे.

प्रकरण चारचे शीर्षक 'राज्यपालांचे वैधानिक अधिकार' असे असून ते कलम २१३ द्वारे स्पष्ट करण्यात आले आहेत. उदा. विधीमंडळाच्या विरामकाळात राज्यपालांचे अध्यादेश काढण्याचे अधिकार.

प्रकरण पाचचे शीर्षक 'राज्याची उच्च न्यायालये' असे असून त्यामध्ये कलम २१४-२३१ चा समावेश आहे. त्यांमध्ये उच्च न्यायालयाची रचना, अधिकार क्षेत्र, कार्य यांची तरतूद आहे.

सहाव्या प्रकरणात २३३-२३७ या कलमांचा समावेश असून दुय्यम न्यायालयांच्या बाबतीत तरतूदी आहेत. कलम २३२ हे वगळण्यात आले आहे.

भाग VII मधील कलम २३८ सुद्धा ७व्या घटना दुरुस्तीन्वये, १९५६ साली वगळण्यात आले आहे.

भाग VIII मध्ये कलमे २३९-२४२ यांचा समावेश असून त्यामध्ये केंद्र शासित प्रदेश व त्यांचे कामकाज यांची तरतूद आहे. दिल्लीला मिळालेला विशेष दर्जा नमूद करण्यात आला आहे.

भाग XI चे शीर्षक 'पंचायत राज', 'नगरपालिका' असे असून यामध्ये मुख्य कलम २४३ व त्याची पोटकलमे आहेत यांमध्ये पंचायत राज्याची संकल्पना, स्थानिक स्वराज्य संस्था यांची स्थापना, कामकाज, अधिकार तसेच नगरपालिका, महानगरपालिका यांच्या शक्ती व कामकाजाविषयी तरतूदी केलेल्या आहेत.

भाग X मध्ये कलम २४४ चा समावेश असून आसामसारख्या प्रदेशातील 'अनुसूचित क्षेत्र व जन-जाती क्षेत्रे' यांच्या बाबतच्या तरतूदींची माहिती दिलेली आहे.

भाग XI मध्ये 'संघराज्य व राज्य सरकार' यांच्यातील संबंधांचा कलमे २४५-२६३ मध्ये ऊहापोह करण्यात आलेला आहे. या भागात दोन प्रकरणे असून पहिल्या प्रकरणात २४५-२५५ कलमे आहेत आणि त्यामध्ये संसदेचे अधिकार व राज्य विधीमंडळ यांच्याबाबत तरतूदी आहेत. दुसऱ्या प्रकरणात २५६-२६३ कलमांचा अंतर्भाव असून संघराज्य व राज्य सरकारे यांच्यातील प्रशासनीक संबंधांबाबतचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. उदा. पाणी प्रश्नाबाबत संघराज्याची कोणती भूमिका असेल याविषयी तरतूद करण्यात आलेली आहे.

६.४.२.३ भाग –XII –वित्त, मालमत्ता, दायित्वे, दावे :

या भागात चार प्रकरणे असून कलमे २६४-३०० यांचा समावेश आहे. पहिले प्रकरण अर्थव्यवस्थेशी संबंधित असून कलम २६४-२६७ हे सर्वसाधारण माहितीबाबत आहे. उदा. कर, एकत्रित निधी, आकस्मिक निधी व लोकलेखा इत्यादी. कलमे २६८-२८१ मध्ये संघराज्य व

राज्ये यांच्यामधील महसूलाची वाटणी याबाबत माहिती दिली आहे. कलम २८० वित्त आयोगाची (राज्य) तरतूद आहे. कलमे २८२-२९० आर्थिक व्यवस्थेच्या संकीर्ण तरतूदींशी संबंधित आहे.

दुसरे प्रकरण 'कर्जा'बाबत असून कलमे २९२-२९३ चा समावेश आहे. त्यामध्ये संघराज्य व राज्य सरकार यांना कर्जे घेण्याची पद्धती नमूद केली आहे.

तिसरे प्रकरण मालमत्ता, दायित्वे, हक्क, जबाबदाऱ्या, बंधने आणि दावे यांबाबत असून त्यामध्ये कलमे २९४-३०० चा समावेश आहे. यामध्ये कायद्याने प्राधिकार दिल्यावाचून व्यक्तिंना संपत्तीपासून वंचित करावयाचे नाही अशी तरतूद करण्यात आली आहे.

भाग –XIII चे शीर्षक 'भारताचा व्यापार, वाणिज्य आणि व्यवहार संबंध' असे असून कलमे ३०१-३०७ चा समावेश आहे. यामध्ये व्यापार स्वातंत्र्य, वाणिज्य व सरकारचे व्यापारावरील बंधने लादण्याचे अधिकार यांच्याबाबत तरतूदी आहेत.

भाग –XIV चे शीर्षक 'संघराज्य व राज्ये यांच्या अख्त्यारितील सेवा' असे असून त्यामध्ये कलम ३०८-३२३ चा समावेश आहे. यातील पहिल्या प्रकरणात ३०८-३१४ कलमे असून त्यामध्ये संघराज्य व राज्ये यांच्या सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची सेवा, अटी व शर्ती यांची तरतूद केलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणात व त्यातील कलमे ३१५-३२३ द्वारे 'केंद्रीय लोकसेवा आयोग' आणि 'राज्य लोकसेवा आयोग' व त्यांची कार्ये व कामकाज यांच्याविषयीच्या तरतूदी आहेत.

भाग –XIV अ आणि त्यातील कलमे ३२३ अ ते ३२३ ब यांमध्ये प्रशासकीय व अन्य अधिकरणे (विशेष न्यायालये) यांच्या तरतूदी आहेत.

भाग –XV चे शीर्षक 'निवडणुक' असे असून त्यामध्ये कलमे ३२४-३२९ चा समावेश आहे. त्यांत निवडणुक आयोग, त्यांची कामकाज व्यवस्था व अधिकार याबाबत तरतूदी आहेत.

भाग –XVI चे शीर्षक 'विवक्षित वर्गासंबंधी विशेष तरतूदी' असे असून त्यामध्ये कलमे ३३०-३४२ चा समावेश आहे. या भागात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अँग्लोइंडियन्स यांच्यासाठी केंद्र व राज्ये यांच्या विधानमंडळात राखीव प्रतिनिधित्वाच्या तरतूदी आहेत. कलम ३३८ व ३३८ अ मध्ये अनुक्रमे अनुसूचित जाती आयोग व अनुसूचित जमाती आयोगांच्या तरतूदी आहेत. कलम ३४० मध्ये सरकारला इतर मागास, भटके विमुक्त, विशेष मागास यांच्याबाबत शोध घेऊन विशेष तरतूदी करण्याची योजनाआहे.

भाग –XVII चे शीर्षक 'संघराज्याची भाषा' हे असून यात कलम ३४३-३५१ चा समावेश आहे. यातील पहिल्या प्रकरणात कलम ३४३-३४४ संघराज्य, त्यांचे विविध आयोग, समित्या व संसदेच्या समित्या यांची अधिकृत भाषा हिंदी असल्याची तरतूद आहे. दुसरे प्रकरण प्रादेशिक भाषांशी संबंधित असून त्यात कलम ३४५-३४७ चा समावेश आहे. तिसरे प्रकरण हे सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या कामकाजाची भाषा ही इंग्रजी व नंतर त्याचे भाषांतर प्रादेशिक भाषांमध्ये करण्याची तरतूद आहे. चौथ्या प्रकरणातील कलम ३५०-३५१ मधील विशेष

मार्गदर्शक सूचनांनुसार प्राथमिक शिक्षणासाठी मातृभाषेचा वापर, भाषिक अल्पसंख्यांकांसाठी विशेष अधिकारी आणि हिंदी भाषेच्या विकासासाठी अधिकारी यांच्या तरतूदी आहेत.

भाग –XVIII चे शीर्षक 'आणीबाणीसंबंधी तरतूदी' असे असून यात कलमे ३५२ ते ३६० चा समावेश आहे. यातील कलम ३५२ नुसार बाह्य आक्रमणामुळे किंवा अंतर्गत बंडाळीमुळे राष्ट्रीय आणीबाणी, कलम ३५६ नुसार राज्यामध्ये आणीबाणी तर कलम ३६० नुसार आर्थिक आणीबाणीसंबंधी तरतूदी आहेत.

भाग –XIX हा 'संकीर्ण' तरतूदींविषयी असून कलम ३६१ ते ३६७ अशी कलमे आहेत. यांमध्ये राष्ट्रपती, राज्यपाल व राजप्रमुख यांना संरक्षण देण्याच्या तरतूदी आहेत.

भाग –XX वा व त्यातील कलम ३६८ हे कालानुरुप घटनेच्या कोणत्याही तरतूदीमध्ये घटना दुरुस्ती करण्याची योजना आहे.

भाग –XXI चे शीर्षक 'अस्थायी, संक्रमणी व विशेष तरतूदी' असे असून यामध्ये कलमे ३६९-३९२ चा समावेश आहे. यांमध्ये नवीन निर्मित राज्यांबाबत माहिती, सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या न्यायाधिश, नियंत्रक व महालेखा परीक्षक, लोकसेवा आयोग यांच्यासंबंधी विशेष तरतूदी आहेत.

भाग –XXII चे शीर्षक 'संक्षिप्त शीर्षक, प्राधिकृत हिंदी भाग, प्रारंभ व निरसने' असे आहे. यात कलमे ३९३-३९५ चा समावेश असून हिंदी भाषेतील पाठ व घटना दुरुस्त्यांचा समावेश आहे. कलम ३९५ हे वगळण्यात आले आहे.

आपली प्रगती तपासा :

१) भारतीय संविधानात कलमे, भाग व परिशिष्टे यांची संख्या किती होती ?
२) भारतीय नागरिकत्व कोणत्या प्रकारचे आहे ?
३) भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये कधी समाविष्ट करण्यात आली ?
४) आणीबाणीशी संबंधित कोणती कलमे व कोणत्या भागात आहेत ?

६.४.३ परिशिष्टे (Schedules)

सुरुवातीला भारतीय संविधानात ८ परिशिष्टे होती, परंतु आता त्यांची संख्या १२ झालेली आहे. प्रत्येक परिशिष्टांची तरतूद पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

परिशिष्ट १

१ : यात सर्व राज्यांची यादी दिली आहे.

२ : केंद्रशासित प्रदेशांची यादी

परिशिष्ट २

भाग अ राष्ट्रपती व राज्यपालांच्या तरतूदी

भाग ब वगळण्यात आला आहे

भाग क लोकसभा सभापती - उपसभापती, राज्यसभा अध्यक्ष - उपाध्यक्ष; विधानसभा अध्यक्ष - उपाध्यक्ष; विधान परिषद सभापती - उपसभापती यांच्याविषयीच्या तरतूदी आहेत.

भाग ड सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांबाबत तरतूदी

भाग इ भारताच्या नियंत्रक व महालेखा परिक्षकाबाबत तरतूदी.

परिशिष्ट ३ : शपथांचे व दृढकथनांचे नमूने (पद्ग्रहण करतेवेळी)

परिशिष्ट ४ : राज्यसभेतील जागांचे वाटप

परिशिष्ट ५ : अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमाती यांचे प्रशासन व नियंत्रण याबाबत तरतूदी

भाग अ सर्वसाधारण

भाग ब अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमाती यांचे प्रशासन व नियंत्रण

भाग क अनुसूचित क्षेत्रे

भाग ड परिशिष्टामध्ये दुरुस्ती

परिशिष्ट ६ : यामध्ये आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोराम या राज्यातील अनुसूचित जमाती क्षेत्रे व त्यांचे प्रशासन यांची माहिती.

परिशिष्ट ७ : यामध्ये तीन विषय याद्या आहेत.

१) केंद्र सूची / संघ सूची

२) राज्य सूची

३) समवर्ती सूची

परिशिष्ट ८ : भाषा व त्यांची यादी.

परिशिष्ट ९ : ठराविक कायदे व नियम यांची वैधता.

परिशिष्ट १० : पक्षांतराच्या कारणावरून सदस्यत्व अवैध होणे संबंधी तरतूदी.

परिशिष्ट ११ : पंचायत राज्याच्या शक्ती, अधिकार आणि जबाबदाऱ्या.

परिशिष्ट १२ : महानगरपालिकांच्या शक्ती, अधिकार आणि जबाबदाऱ्या.

पुरवण्या (Appendices)

यांमध्ये इ.स. २००४ पर्यंत एकूण ९२ वेळा घटना दुरुस्ती करण्यात आली त्यांची व त्यातील कलम आणि तारीख यांची संपूर्ण यादी देण्यात आली आहे.

६.५ भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये

मूलतः मूलभूत अधिकारांच्या दुसऱ्या बाजूला मूलभूत कर्तव्ये आहेतच. म्हणूनच घटनाकारांनी सुरुवातीला कर्तव्यांची लिखित योजना केली नाही. जेव्हा एका नागरिकास आपले अधिकार माहित असतात किंवा त्यांचा तो उपभोग घेत असतो, त्याच वेळी त्याला इतरांच्या अधिकारांचीसुद्धा जाणीव असणे म्हणजेच हे त्याचे आपोआपच कर्तव्य होते.

इ.स. १९७६ साली ४२ व्या राज्यघटना दुरुस्ती अन्वये कलम ५१-अ अंतर्गत मूलभूत कर्तव्ये प्रत्येक भारतीय नागरिकासाठी निश्चित केली आणि त्यांची प्रत्यक्ष अमलबजावणी ३ जानेवारी १९७७ पासून लागू झाली. ही कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत व त्यांचे प्रत्येक नागरीकाने पालक करणे आवश्यक आहे.

१) संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ति मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.

३) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे.

४) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.

५) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

६) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.

७) अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी आणि नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करुन त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे.

८) वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निःग्रहपूर्वक त्याग करणे.

१०) राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

११) सहा ते चौदा वर्षे वयाच्या बालकांचे आई-वडील किंवा पालक, त्यांच्या बालकांना किंवा पाल्यांना जे लागू असेल त्याप्रमाणे, शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे. (घटनेच्या कलम ४५ नुसार इ.स. २००२ साली ८६ व्या घटना दुरुस्तीन्वये घालण्यात आले आहे).

आपली प्रगती तपासा :

१) भारतीय संविधानातील कोणत्या परिशिष्टात भाषांची यादी आहे ?

२) भारतीय नागरीकांची कोणतीही तीन कर्तव्ये लिहा.

_____

_____

_____

_____

६.६ सहिष्णुता, शांती आणि जातीय सलोखा

भारतीय समाज हा बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुजातीय, असून येथील भौगोलिक रचना, ऐतिहासिक पार्श्वभूमी, वेशभूषा इ. विविधतेने नटलेला आहे. त्यामुळे येथील समाजामध्ये भेदभाव राहणे क्रमप्राप्त आहे. परंतु अशा देशातसुद्धा 'भारतीय संविधान' हे असे एक अस्त्र आहे की ते सर्वांना एकजूट ठेवून नेहमी देश रक्षणासाठी बळकट करते. मूळातच संविधानामध्ये वेगवेगळी मूल्ये, आदर्श, तत्वज्ञान यांचा प्रभाव आहे. त्यानुसारच मुलांच्या लहानपणी त्यांच्यावर सहिष्णुता, शांती, सहकार्य, सलोखा इ. मूल्ये रुजविणे अत्यंत आवश्यक आहे. या उपघटकांत आपण सहिष्णुता, शांती व जातीय सलोखा या मूल्यांवर थोडक्यात प्रकाश टाकणार आहोत.

६.६.१ सहिष्णुता :

सहिष्णुता याचा शब्दशः अर्थ सहनशीलता असा घेता येतो. परंतु तो थोडा संकुचित वाटतो. दुसऱ्यांच्या भावना, कल्पना समजून घेऊन त्यांचा आदर करणे म्हणजे सहिष्णुता असे म्हणता येईल. भारतीय समाज हा धर्म, जाती, परंपरा, पंथ, प्रादेशिक भाषा यांच्या वैविध्याने नटलेला आहे. अशा परिस्थितीत सहिष्णुता या मूल्याला अत्यंत महत्व प्राप्त होते. दुसऱ्याच्या मताचा आदरभाव बाळगणे आवश्यक आहे. दुसऱ्याची मते बऱ्याच वेळेस आपणास आवडत नाहीत, पटत नाहीत. परंतु त्यांचे श्रवण काळजीपूर्वक करुन शांतीपूर्ण मार्गाने त्यांचे खंडन करणे जरुरी आहे. या देशात हिंदु-मुस्लिम, हिंदु-ख्रिश्चन, दलित-उच्च अशा दंगली हे सामान्य उदाहरण आहे. परंतु सहनशीलता व सहिष्णुता बाळगणे हे त्यावर रामबाण औषध आहे.

सहिष्णुता मूल्याचे महत्व :

१) दुसऱ्याचे स्वभावधर्म समजून घेण्यास सहिष्णुतेची मदत होते..

२) जीवनातील अनेक प्रसंगी व्यक्तिला तडजोड करावी लागते व परिस्थितीशी समायोजन साधावे लागते, त्या दृष्टीने सहिष्णुतेची गरज आहे.

३) सहिष्णुतेच्या मूल्यामुळे भांडणे-तंटे व आपापसांतील संघर्ष थांबून शांतीचा मार्ग प्राप्त होतो.

४) भारतासारख्या बहुविध देशात सलोखा राखण्यासाठी सहिष्णुतेची आवश्यकता आहे.

५) लोकशाहीवादी समाजाला सतत प्रगतीशील व वैभव प्राप्त करायचे असल्यास सहिष्णुतेचे महत्व अधिक आहे.

६) सहिष्णुतेच्या मूल्याने व्याक्तिंमध्ये उदारमतवादी विचारांचा शिरकाव होऊन विरोधी मते सुद्धा स्विकारणे सोयीचे जाते.

७) स्वतःच्या मनाविरुद्ध असले तरी सहिष्णुता भावामुळे मनुष्य दुसऱ्याच्या मतांचा आदर करण्यास तत्पर होतो.

८) सहिष्णुता माणसामाणसात समतेची भावना वृद्धिंगत करते आणि संविधानात्मक तरतूदींची अंमलबजावणी सहज स्विकारते.

९) भारताला आर्थिक वैभव प्राप्त करुन जागतिक सत्ता व्हावयाचे असल्यास सहिष्णुता मूल्याची अत्यंत आवश्यकता आहे.

६.६.२ शांती :

भारताच्या प्रत्येक नागरिकामध्ये शांतीपूर्ण सहकार्य असेल तरच भारताच्या एकजूटीस बळकटी प्राप्त होईल. सहकार्य आणि परस्परांना मदतीची भावना असल्यास देशातील नागरिकामध्ये शांती नांदत असते. सर्व प्रगतीचे सार म्हणजे शांती होय. सामाजिक सहजीवनात प्रत्येकाने आपआपली जबाबदारी उचलली पाहिजे. आपण सर्वांना कृत्रिम वा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी कोणताही जात, धर्म, पंथ, भाषा, लिंगभेद, प्रदेश, पोशाख याबाबत भेद न बाळगता नेहमीच मदत केली पाहिजे. ज्यावेळी समाजातील प्रत्येक जण सहकार्य करण्यास तत्पर असेल तर प्रत्येक व्यक्तिचे भले झाल्यावाचून राहणार नाही. त्यामुळे सामूहिक किंवा सामाजिक कृती करण्यासाठी देखील योग्य समज आणि परस्पर सहकार्य असणे आवश्यक आहे व त्याचा शेवट समाजातच नव्हे तर व्यक्ति जीवनात, शेजारी व राष्ट्रामध्ये शांती नांदण्यात होतो.

शांती हे एक नैतिक-मानवी मूल्य आहे व त्याचे पालन करणे भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाला आवश्यक आहे. ज्यावेळी एखादी गोष्ट आपल्या मनाविरुद्ध होते त्यावेळी आपण आपला संयम सोडून हिंसाचार करु नये तर त्यावेळी संविधानिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. 'बळी तो काळ पिळी' हे सूत्र केवळ प्राणी जगताला लागू पडते परंतु मानवी समाजाला हे लागू करता येणार नाही. कारण जे सामाजिक दृष्ट्या वंचित, अंपग, रोगी, वृद्ध असतील यांची दखल कोणीच घेणार नाही किंवा त्यांचे रक्षणही केले जाणार नाही. यासाठीच शांतीच्या तत्वाचा मानवी जीवनात शिरकाव असणे अगत्याचे आहे. सिद्धार्थ गौतम बुद्धाने आपले वैभवशाली जीवनाचा त्याग करुन शांती प्रस्थापित करण्यासाठी किंबहुना शांती-सत्याचा शोध घेण्यासाठी व ती प्रस्थापित करण्यासाठी आपले आयुष्य वेचले. त्यामुळेच बुद्ध हे शांतीचे प्रतिक आहेत. आपण शातीपूर्ण सहजीवनाचे पालन केले तर इतरही त्याचे अनुपालन करतील. भारतामध्ये या मूल्यामुळे दंगली, हिंसाचार यांना तिलांजली मिळेल.

६.६.३ जातीय सलोखा :

भारतीय समाजाला अनेक सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. तसेच आपणांस राष्ट्रीय एकोपा, एकात्मता आणि भौगोलिक अखंडता जोपासणे आवश्यक आहे. आज धर्म, जात, पंथ, भाषा, प्रादेशिकता यांच्या आधारावर हिंसाचार माजतो. त्यामुळे देशाची आर्थिक, सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक नव्हे जीवित हानी होते. जगामध्ये नाचक्की होते. म्हणूनच प्रत्यकाने जातीय सलोखा राखणे महत्त्वाचे आहे. जातीय सलोखा राखायचा झाल्यास पुढील काही गोष्टींचे पालन प्रत्येक भारतीय नागरिकांने करणे आवश्यक आहे.

१) **सर्व धर्मांचा अभ्यास करणे :** प्रत्येक धर्माचे थोडक्यात तत्वज्ञान मग तो जैन, बौद्ध, हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख असेल अभ्यासणे करु प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असले पाहिजे. जसे की, ईश्वरभक्ती किंवा मोक्षप्राप्ती इ.

२) **मैत्री व भ्रातृभाव यांस उत्तेजन देणे :** प्रत्येक नागरिकाने, मैत्री, बंधुभाव, भगिनीभाव यांना उत्तेजन दिले पाहिजे व स्वतः त्याचे पालन केले पाहिजे. या सर्वांपेक्षा राष्ट्रभावनेला महत्त्व दिले पाहिजे.

३) **धार्मिक भावनेचे शोषण थांबविणे :** प्रत्येक नागरिकाने आपल्या लोकांच्या धार्मिक भावनांचे शोषण करु नये. उदा. आपल्या धर्मावर घाला आहे, धर्माचा अपमान आहे व त्यावरुन धार्मिक दगंलीना उत्तेजन देणे टाळले पाहिजे. तसेच धर्माच्या नावावर आपली थाटलेली दुकाने बंद केली पाहिजेत. मग ते भोंदू साधू, भोंदू संत, स्वयंघोषित बाब इ. असेल.

४) **आंतर-जातीय, आंतर-धर्मीय आणि आंतर-राज्य विवाहांना प्रोत्साहन देणे :**

आपल्या देशांत विविध धर्म, जाती, राज्ये, भाषा असल्या तरी आपण भारतीय आहोत या भावनेतून आंतर-जातीय, आंतर-धर्मीय व आंतर-राज्य विवाहांना चालना दिली पाहिजे. मानवप्राणी एक आहे या माध्यमातून विचार केला पाहिजे. या संकल्पनेने एकीची भावना वृद्धींगत होण्यास मदत होईल.

५) **बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुराज्य संघटना स्थापन करणे :**

अशा काही संस्था स्थापन करून त्यामध्ये सर्व धर्माच्या लोकांना सामील करून घेणे आवश्यक आहे. त्याद्वारे आपापसांतील परराज्यीय संघर्ष लयाला जावून धार्मिक सलोखा नांदेल.

६) **जातीय व धर्मांध शक्तींचे पितळ उघडे पाडणे :**

अशी काही नेतेमंडळी आहेत, काही स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्ते आणि संस्था आहेत की, ते आपली पोळी भाजण्यासाठी धर्माच्या-जातीच्या नावावर दंगली घडवून आणतात, निधी गोळा करतात, एवढेच नव्हे तर अतिरेकी प्रशिक्षण देऊन तशा कारवायाही करतात. अशा शक्तींचे प्रसारमाध्यमांसमोर किंवा कायद्यासमोर पितळ उघडे पाडले पाहिजे.

७) **नैसर्गिक व कृत्रिम आपत्तीवेळी मदतीची भावना :**

नैसर्गिक वा कृत्रिम आपत्तीच्या वेळी मग ती त्सुनामी, महापूर, भूकंप, चक्रीवादळ किंवा आग, अपघात, दुष्काळ असेल, सर्व धर्माच्या लोकांनी आपद्ग्रस्तांना तन, मन, धनाने मदत केली पाहिजे. कारण ओरिसातील चक्रीवादळ असेल, गुजरातमधील धार्मिक दंगली असतील किंवा मुंबईतील २६ जुलैचा महापूर असेल यावेळी लोक आपले जात धर्म विसरून एकमेकांच्या मदतीला धावून गेले होते. परंतु हीच भावना राहिल्यास सलोखा वाढण्यास मदत मिळेल.

८) **तत्वज्ञान, कल्पना, उच्च विचार यांची देवाण घेवाण :**

प्रत्येक भारतीय नागरिकाने चांगल्या धार्मिक कल्पना, सांस्कृतिक वारसा, वैज्ञानिक शोध, तत्वज्ञान, विचार यांची राज्या- राज्याच्या धर्मा-धर्माच्या लोकांपासून देवाण-घेवाण केली तर सामाजिक सलोखा वृद्धिगंत होण्यास मदत होईल. धर्मनिरपेक्षतेच्या भावनेला बळकटी येईल. धर्मापेक्षा मानव जातीला महत्त्व येऊन राष्ट्रीय भावनेचा विकास होईल.

९) **मानवी मूल्यांचे संवर्धन :**

धार्मिक व जातीय सलोखा वाढण्यासाठी प्रत्येकाने मूलभूत मानवी मूल्यांचे अवलंबन व संवर्धन केले पाहिजे. जसे सहकार्य, सत्य, अहिंसा, न्याय, सहिष्णुता, निपुणता, उदारता, देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांना जर प्रोत्साहन दिले तर राष्ट्रीय व जातीय सलोखा निर्माण होण्यास मदतच होईल.

१०) प्रसार माध्यमांची भूमिका :

जातीय, धार्मिक, प्रादेशिक, भाषिक सलोखा निर्माण करून त्याला प्रोत्साहन देण्याचे काम, प्रचार व प्रसार करण्याचे काम वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे अत्यंत यशस्वीपणे करतात. परंतु त्यासाठी कोणत्या गोष्टींचे प्रसारण करणे व कोणत्या गोष्टींचे प्रसारण टाळणे हे यासाठी प्रसारमाध्यमांनी आपले नियम पाळले पाहिजेत. त्यांनी जातीय सलोख्याच्या उदाहरणांचे प्रसारण करावे व त्याप्रमाणे जनतेला वागण्याचे आवाहन करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे जातीय सलोखा राहणे आपल्या देशासाठीच नव्हे तर एकूणच विश्वासाठी आवश्यक आहे.

आपली प्रगती तपासा :

१) सहिष्णूता म्हणजे काय ?
२) एखादी गोष्ट आपल्या मनाविरुद्ध झाल्यास आपण काय करावे ?
३) जातीय सलोखा राखण्यासाठी कोणत्या गोष्टींचे पालन करावे ?

६.७ भारतीय संविधानाची मूलभूत वैशिष्ट्ये

भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी त्याकाळी जगातील सर्व देशांमध्ये उपलब्ध असलेल्या संविधानांचा अभ्यास केला. त्यांच्यामधील ज्या ज्या चांगल्या तरतूदी भारतीय सामाजिक, भौगोलिक परिस्थितीला योग्य वाटतील त्यांचा समावेश भारतीय संविधानात केला. त्यामुळेच भारतीय नागरिकाला आनंदी व शांतीपूर्ण जीवन जगण्यासाठी जे आवश्यक आहे त्या गोष्टींचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला. भारतीय संविधानातील मूलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) प्रास्ताविक (Preamble) : प्रास्ताविकेबद्दल माहिती उपघटक क्र. ४.४.२ मध्ये वाचावी.

२) जगातील सर्वात प्रदीर्घ व लिखित संविधान :

भारतीय संविधान हे जगातील सर्वात प्रदीर्घ व लिखित संविधान आहे. यामध्ये ३९५ कलमे, २२ भाग आणि १२ परिशिष्टे होती. शिवाय घटनादुरुस्त्यांची यादी अनुसूचीमध्ये देण्यात आली आहे. कारण अमेरिकन संविधान ७ कलमांचे आहे तर ऑस्ट्रेलियन संविधान १२८ कलमे आणि कॅनडाचे संविधान १४७ कलमांचे आहे. भारतीय संविधानात प्रशासकीय यंत्रणेचे विश्लेषण, त्यांची कार्यवाही, विधीमंडळ व त्यांचे कामकाज, न्याय यंत्रणा इ. विषयी विस्तारपूर्वक ऊहापोह करण्यात आलेला आहे. इंग्लंडसारख्या देशाला तर लिखित संविधानच नाही. इ.स. २००३ पर्यंत एकूण ९२ वेळा संविधानात दुरुस्त्या करण्यात आलेल्या असून त्यामध्ये ४४७ कलमे, २६ भाग आणि १२ परिशिष्टे आहेत.

३) जनतेची सार्वभौमता :

भारतीय राष्ट्र हे कोणत्याही अंतर्गत व बाह्य सत्तेच्या नियंत्रणाखाली नसून येथील जनताच त्याची चालक व मालक आहे. देशावर जनतेची सत्ता ही अंतिम सत्ता आहे. त्यामुळे भारत हे सार्वभौम राष्ट्र आहे अशी संविधानात तरतूद आहे. भारतीय जनता त्यासाठी आपले प्रतिनिधी देशाचा कारभार चालवण्यासाठी निवडून देते. त्यासाठी प्रौढ मतांचा अवलंब करते. सर्व धर्माच्या, पंथाच्या, भाषेच्या, प्रदेशाच्या, १८ वर्षे व त्यापुढील वयाच्या भारतीय नागरिकास मतदानाचा अधिकार बहाल केला आहे.

४) अंशत: ताठर व अंशत: लवचिक :

भारतीय संविधानाचे हे एक वैशिष्ट्य आहे की, ते एकदम ताठर नाही की पूर्णत: लवचिक नाही. कलम ३६८ नुसार ज्या ज्या वेळी भारतीय जनतेला सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक, तात्विकदृष्ट्या कालानुरूप, बदलत्या प्रगतीनुसार संविधानात बदल करणे आवश्यक वाटेल त्या त्या वेळी त्याच्यात बदल करून त्यानुसार नवीन कलम जोडण्याची तरतूद केली आहे. तसेच कालानुरूप अनावश्यक कलमे वगळण्याचीसुद्धा योजना आहे. त्यानुसार आतापर्यंत अनेक नवीन राज्यांची निर्मिती केलेली आहे. परंतु संविधानाची मूळ चौकट बदलता येत नाही. उदा. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मूलभूत हक्क यांच्यामध्ये पूर्णपणे बदल करता येत नाही. सुरुवातीची कलमे ३९५ होती व सन २००३ पर्यंत त्यांची संख्या ४४७ झाली आहे.

५) मूलभूत अधिकारांची योजना :

भारतीय संविधानाने भारताच्या प्रत्येक नागरिकास मूलभूत अधिकार बहाल केलेले आहेत. ते कोणताही भेदभाव न करता त्याला उपभोगता येतात. त्यासाठी त्याला कायद्याने संरक्षणसुद्धा देण्यात आले आहे. या मूलभूत अधिकारांची तरतूद कलम १२-३५ मध्ये आहे.

मूलभूत अधिकार पुढीलप्रमाणे आहेत.

अ) समानतेचा अधिकार :

याद्वारे प्रत्येक भारतीय नागरिक हा कायद्यासमोर कोणत्याही भेदभावाशिवाय समान आहे असे म्हटले आहे (कलम १२-१८).

ब) स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९-२२) :

यामध्ये प्रत्येक भारतीय नागरिकाला सहा प्रकारची स्वातंत्र्ये बहाल करण्यात आलेली आहेत.

१) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य.
२) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य.
३) अधिसंघ वा व्यावसायिक संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य.
४) भारतीय राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार स्वातंत्र्य.
५) भारतीय राज्यक्षेत्रात कुठेही राहण्याचे स्वातंत्र्य.
६) कोणताही पेशा आचरण्याचे अथवा कोणताही व्यवसाय, उदीम किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य.

क) शोषणाविरुद्धचा अधिकार (कलम २३-२४) :

यामध्ये मानवी व्यापार, वेठबिगारी, सक्तमजूरी यांना पायबंद घालण्यात आला आहे.

ड) धर्म स्वातंत्र्याचा अधिकार (कलम २५-२८) :

भारतातील कोणत्याही व्यक्तीस आपल्या धर्म त्यागून किंवा ठेवून दुसरा धर्म स्विकारण्याचा, धर्माचरण करण्याचा अधिकार आहे.

इ) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (कलम २९-३०) :

प्रत्येक नागरिकास आपल्या संस्कृतीचा प्रचार, प्रसार, जतन करण्याचा व त्यासाठी आपल्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे अधिकार असतील व त्यांना कायद्याने संरक्षण मिळेल.

ई) संपत्तीचा अधिकार (कलम ३१) :

हा अधिकार इ.स. १९७८ साली ४४ व्या घटनादुरुस्तीन्वये वगळण्यात आला आहे.

प) घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम ३२-३५) :

कोणत्याही नागरिकावर बेकायदा अन्याय झाल्यास त्यास न्यायालयातर्फे संरक्षण दिले पाहिजे व हा त्याचा अधिकार आहे असे संविधानात नमूद केले आहे. उदा. १) हेबियस कॉर्पस (देहोपस्थिती) २) मँडॅमस (महादेश) ३) श्रोतेहिबिशन (प्रतिषेध) ४) कोवॉरंटो (क्वाधिकार) आणि ५) सर्शिओराय (प्राकर्षण) या प्रकारचे प्राधिलेख काढण्याची सर्वोच्य न्यायालयाची जबाबदारी असेल.

६) मूलभूत कर्तव्ये (कलम ५१ अ) :

मूलभूत कर्तव्यांची माहिती घेण्यासाठी घटक ४.५ वाचावे.

७) संघराज्य प्रबळ तर राज्यांनाही अधिकार :

केंद्रसरकार व सर्व राज्य सरकारांवर संविधानाचे नियंत्रण असते, नव्हे तर त्या सर्वांचे मार्गदर्शन संविधानच करते. सर्व राज्यांना त्यांचे अधिकार बहाल केलेले आहेत व त्यानुसार त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतु कोणतेही राज्य सरकार आपणांस संघराज्यापेक्षा वरचढ समजू शकणार नाही. कारण संघराज्य नेहमीच बळकट राहील अशी योजना संविधानानेच केली आहे. त्यासाठी एकेरी नागरिकत्व, संघसूची, राज्य विषय सूची, समवर्ती विषय सूची तयार करण्यात आले आहेत. आतापर्यंत (सन २००३) संघसूचीमध्ये ९९ विषय, राज्यसूची मध्ये ६१ विषय तर समवर्ती सूचीमध्ये ५२ विषयांची यादी आहे. ज्यावेळी संघ सरकार व राज्य सरकार यांच्यातील कायद्याबाबत वाद निर्माण होतो तेव्हा संघ सरकारचाच कायदा वैध मानला जावून राज्याचा कायदा अवैध ठरतो. तर आणीबाणी संबंधीच्या अधिकारांमध्ये संघसरकारला घटनात्मक यंत्रणा कोलमडण्याच्या कारणाने राज्य सरकार बरखास्त करुन त्याजागी राष्ट्रपतीशासन लागू करण्याचा अधिकार आहे.

८) संसदीय लोकशाही :

आपण संसदीय लोकशाहीचा स्विकार केलेला असून राष्ट्रपती हे संविधानिक व कार्यकारी प्रमुख आहेत. तर पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून कार्य करते व प्रत्यक्ष सरकार चालविते. असे म्हटले जाते की, राष्ट्रपती हे राज्याचे नामधारी प्रमुख असतात तर खरी सत्ता ही पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ यांच्या हातात असते. भारतीय संसद द्विगृही असून राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह तर लोकसभा हे कनिष्ठ सभागृह आहे. ही दोन्ही सभागृहे आपल्या लोकप्रतिनिधींमार्फत बहुमताने देशातील जनतेसाठी ठराव, कायदे पारित करीत असतात.

९) राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (कलम ३६-५१) :

राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे ही अतिरिक्त कायदेशीर सूचना व मार्गदर्शक भाग आहे. राज्य सरकार व संघसरकार यांनी आपली पाच वर्षांची राजवट करताना कोणत्या सूचनांचे पालन करावे व आपले सरकार व एकूणच आपले राष्ट्र कसे कल्याणकारी राज्य आहे हे सिद्ध करणे गरजेचे आहे. सरकारने या मार्गदर्शक तत्वांचे पालन केले नाही तर नागरिक त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागू शकत नाहीत. तरीही सरकारला या मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे भाग पडते. याचे कारण म्हणजे जे लोक अशा सरकारला निवडून देतात त्यांना पुन्हा निवडून देता येणार नाही हे त्याला पक्के माहित असते. उदा. कलम ४५ मधील तरतूद म्हणते की, भारतातील ६ ते १४ वयोगटाच्या मुलांस मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. त्यासाठी सरकारची ही नैतिक जबाबदारी आहे की, त्यासाठी शाळा बांधकाम, शिक्षकांच्या नेमणूका, त्यांचे वेतन, इमारती बाधणे इ. गोष्टी सरकारला करणे क्रमप्राप्त आहे.

१०) धर्मनिरपेक्षता :

या तरतूदीचा संविधानात इ.स. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्ती नुसार समावेश करण्यात आला. याचा अर्थ 'राष्ट्रधर्म' अशा प्रकारचा कोणताही भारताचा धर्म नाही. तसेच भारत सरकार कोणत्याही एका विशिष्ट धर्माचे लांगूलचालन करणार नाही किंवा तिरस्कारही करणार नाही. तसेच राज्य कोणत्याही धर्मामध्ये हस्तक्षेप करणार नाही व कोणावरही धार्मिक सक्ती करणार नाही. धर्म ही खाजगी बाब आहे. कोणत्याही धर्माचा सरकारवर पगडा नसेल. प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्य आहे व त्याला उपभोगता यावे यासाठी राज्यसरकार प्रयत्न करील. या तत्वामुळेच भारतामध्ये वेगवेगळ्या धर्माचे नेते राष्ट्रपती, पंतप्रधान या पदावर होऊन गेले.

११) एकेरी नागरिकत्व :

अमेरिकेच्या संविधानाने त्यांच्या नागरिकांना दुहेरी नागरिकत्वाची मुभा दिली आहे. एक देशाचे नागरिकत्व तर दुसरे राज्याचे नागरिकत्व होय. याउलट भारतीय परिस्थितीनुसार सविधानाने भारतीय नागरिकास फक्त एकेरी म्हणजे देशाचे नागरिकत्व बहाल केले आहे. कारण राज्याचे नागरिक फक्त आपल्या राज्याशी एकनिष्ठ राहतील परंतु देशाचे काय ? हा मोठा धोका भारतात संभावतो. तसेच संचार स्वातंत्र्याशी किंवा कुठेही राहण्याच्या अधिकाराचे काय झाले असते ? म्हणून भारतीय नागरिक कोणत्याही भेदभावाशिवाय कुठेही राहू शकतो, शिक्षण घेऊ शकतो, नोकरी-व्यवसाय करु शकतो. याच एकेरी नागरिकत्वामुळे 'मी प्रथमही भारतीय व अंतिमही भारतीय आहे' अशी भावना जोपासण्यास मदत होते. या एकरी नागरिकत्वामुळे विविध भाषा, धर्म, प्रदेश, स्त्री-पुरुष असे भेद न पाळता लोकांमध्ये राष्ट्रीय एकोपा व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होण्यास मदत होते.

१२) स्वतंत्र न्याययंत्रणा :

भारतीय संविधानाच्या तीन स्तंभांपैकी (विधानमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ) न्याय यंत्रणा ही स्वतंत्र ठेवण्यात आली असून त्यांना जादा अधिकार देण्यात आले आहेत. सर्वोच, उच्च, दुय्यम न्यायालयांची रचना व त्यांतील न्यायाधिश, त्यांची पात्रता, सेवा, शर्ती, अटी यांची तरतूद संविधानात स्पष्ट करण्यात आली आहे. न्याययंत्रणेला पूर्णपणे स्वतंत्र ठेवण्यात आले आहे. न्यायालयांना विधीमंडळ अथवा कार्यकारी मंडळाचा कायदा, निर्णय, नियम, ठराव संविधान विरोधी असल्यास अवैध ठरविण्याचा अधिकार आहे.

१३) न्यायिक पुनर्विलोकन :

सर्वोच्य व उच्च न्यायालये संविधानाचे रक्षक मानले जातात. त्यांना संविधानातील तरतूदींचा अंतिम अन्वयार्थ लावण्याचे अधिकार आहेत. म्हणूनच सरकार कोणताही कायदा, नियम, पारित करताना त्याची संविधानिक वैधता प्रथम तपासून पाहते व संविधानाचे कोणतेही उल्लंघन होणार नाही यांची काळजी घेते. बऱ्याच वेळेस राज्य विधानमंडळे किंवा संसदेने पारित केलेले कायदे संविधानाशी पूरक नसतात. अशा वेळी हे कायदे पूर्णपणे रद्द करण्याचे किंवा ते वैध ठरविण्याचे अधिकार न्यायालयांना असतात त्याला न्यायिक पुनर्विलोकन असे म्हणतात.

१४) जुन्या राजवटीचा अंत व नव्या राजवटीस प्रारंभ :

आपले संविधान हे खऱ्या अर्थाने क्रांतीकारी आहे. भारताचा राज्यकारभार प्राचीन काळापासून मनुस्मृतीवर आधारित होता, धर्मशास्त्रांवर आधारित होता. येथील कायदे त्याप्रमाणेच होते. परंतु आता त्याऐवजी संविधान आले. पूर्वी समानता, स्वातंत्र्य, न्याय, समान संधी-दर्जा यांना अजिबात भारतीय समाजात थारा नव्हता. तसेच जातीय, स्त्री-पुरुष, धार्मिक भेदभाव इतका बोकाळला होता की, खालच्या जाती, स्त्रीया यांना जीवन जगणे कठीण झाले होते. अस्पृश्यतेचा कलंक येथील भारतीय समाजाला लागला होता. परंतु भारतीय संविधानाने या सर्व त्रुटी दूर केल्या आहेत. स्त्रिया कमकुवत वर्ग यांना संरक्षण देण्यात आले आहे. म्हणूनच भारतीय संविधान म्हणजे जुने युग जाऊन नव्या युगाचा प्रारंभ होय.

१५) इतरांच्या चांगल्या गोष्टींचा समावेश :

संविधानाच्या शिल्पकारांनी इतर देशातील प्रचलित राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला व त्यातील जी काही चांगली तत्वे असतील त्यांचा भारतीय सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीनुसार भारतीय संविधानात समावेश केला. त्यातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे :

	देश	तरतूद
१)	इंग्लंड :	संसदीय लोकशाही, लोकशाही निवडणूक प्रक्रीया
२)	अमेरिका :	न्यायिक पुनर्विलोकन
३)	कॅनडा व अमेरिका :	संघराज्याचे स्वरुप
४)	आयर्लंड :	राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे
५)	इंग्लंड व फ्रान्स :	अध्यक्ष (राष्ट्रपती) व त्यांचे अधिकार
६)	अमेरिका व फ्रान्स :	मूलभूत अधिकार
७)	दक्षिण अमेरिका :	संविधान दुरुस्ती आणि लवचिकता
८)	जर्मन वायमर रिपब्लिक :	आणिबाणी

इतरांच्या मते यापेक्षा वेगळी वैशिष्ट्ये असू शकतात. कारण प्रत्येक तरतूद व कलम तेवढीच महत्त्वाची आहे.

आपली प्रगती तपासा :

१) भारतीय संविधान अंशत: ताठर व अंशत: लवचिक आहे म्हणजे काय ?
२) स्वातंत्र्याचे अधिकार सांगा.
३) न्यायिक पुनर्विलोकन म्हणजे काय ?

६.८ सारांश

भारतीय संविधाननिर्मिती पाठीमागे ब्रिटीश सरकारने वेळच्या वेळी काही कायदे केले व भारतीय जनतेचा असंतोष कमी करण्याचे उपाय केले. भारतीय नेत्यांची आंदोलने सतत चालूच होती आणि इ.स. १९४६ कॅबिनेट मिशनला संविधान निर्मितीसाठी संविधान सभेची शिफारस करावी लागली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु तत्पूर्वीच ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक होऊन संविधान निर्मितीला सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसचे सदस्य नसतानाही त्यांना त्यांच्या सांविधानिक कायद्याच्या सखोल ज्ञानामुळे संविधान सभेचे सदस्य बनवून मसुदा समितीचे अध्यक्षपद देण्यात आले. संविधानाच्या आराखडा तयार करण्याचे काम या समितीने मोठ्या कष्टाने पार पाडले व त्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरना जाते.

आपले संविधान हे अनेक प्रकारची मूल्ये, कल्पना, महान विचार यांवर आधारित आहे. जगातील तत्वज्ञनाच्या अनेक चांगल्या तत्वांच्या पायावर ते उभे आहे. भारतीय संविधान हे जगातील एक प्रदीर्घ व लिखित संविधान असून ते लोकशाही तत्वांवर आधारित आहे. येथील नागरीकाला मूलभूत अधिकारांबरोबर मूलभूत कर्तव्येसुद्धा दिली आहेत. भारतीय संविधान हे सर्व भारतीयांना, त्यांचे अनेक जाती, धर्म, पंथ, वेशभूषा, भौगोलिक, ऐतिहासिक पार्श्वभूमी असली तरी एकजूट ठेवण्याचे कार्य करते. संविधान मुळेच जनतेमध्ये शांती, सलोखा, सहिष्णुता यांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळेच आपल्या सांविधानिक तरतूदींचा आधार आज अनेक नवनिर्मित देश घेत आहेत.

६.९ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१. भारतीय सांविधानाचे तात्विक अधिष्ठान स्पष्ट करा.

२. भारतीय संविधान रचना स्पष्ट करा.

३. भारतामध्ये सहिष्णुता, शांती आणि जातीय सलोखा कसा वाढीस लागेल ? विश्लेषण करा.

४. भारतीय संविधानाची मूलभूत वैशिष्ट्ये कोणती ? चर्चा करा.

५. थोडक्यात टीपा लिहा.
   अ) भारतीय संविधान निर्मिती
   ब) भारतीय नागरीकाची मूलभूत कर्तव्ये
   क) संविधानाची प्रास्ताविका
   ड) जातीय सलोखा राखण्याचे उपाय
   इ) मूलभूत हक्क

❖❖❖❖

७

राजकीय प्रकियेतील महत्त्वाचे घटक

पाठाची रचना :

७.० उद्दिष्टे
७.१ प्रस्तावना
७.२ भारतातील राजकीय पक्षपद्धती
७.३ ग्रामिण व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था – ७३ वी व ७४ वी घटना-दुरुस्ती व सर्वसमावेशक राजकारण
७.४ महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्त्व
७.५ सारांश
७.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

७.० उद्दिष्टे

या प्रकरणामुळे आपल्याला भारतातील राजकीय प्रक्रिया समजून घेण्यास मदत होईल.

- भारतातील राजकीय पक्षपद्धती, त्यांची वैशिष्ट्ये, त्याचा विकास आणि गुण व दोष.
- ग्रामपंचायती संदर्भात ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामपंचायती ह्या स्वशासन धोरण कसे राबवू शकतात हे सांगता येईल.
- ७४ वी घटनादुरुस्ती व नगरपरिषदा आणि महानगरपालिका यांची माहिती सांगता येईल.
- भारतातील स्त्रियांच्या राजकारणातील प्रवेशाचा आढावा.
- भारतीय स्त्रियांच्या राजकीय सहभागातील अडथळे.
- भारतीय महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्त्व.

७.१ प्रस्तावना

भारतासारख्या विकसनशील देशाच्या विकासामध्ये त्याला विकसीत बनविण्यासाठी राजकीय पक्षाची भूमिका महत्त्वाची ठरते. कोणत्याही देशाची प्रगती ही तेथील राजकीय पक्षाच्या कार्यशक्तीवर अवलंबून असते. त्यामुळे देशाच्या विकासात राजकीय पक्ष, त्यांची भूमिका, त्यामध्ये असलेला लोकांचा सहभाग, महिलांची भूमिका इ. घटक महत्त्वाचे ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यावेळी घटना लिहिली त्यावेळी त्यांच्या समोर एक पक्ष पद्धती, द्विपक्ष

पद्धती आणि बहुपक्ष पद्धती असे अनेक पर्याय होते. परंतु तत्कालीन देशांती सर्व राजकीय पक्षांचा अभ्यास करून भारतासारख्या बहुभाषिक, बहुधर्मिय, लोकसंख्या असलेल्या देशालासुद्धा बहुपद्धती असणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी बहुपक्ष पद्धतीचा स्वीकार केला हे दिसून येते. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता असलेल्या भारतामध्ये आज अनेक राष्ट्रीय, प्रादेशिक पक्षाचा उदय व विकास होत गेलेला दिसून येतो. त्याचबरोबर ग्रामीण भागातील जनतासुद्धा राजकीय क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटवू लागले. महिलांनीसुद्धा आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखविले होतेच. बदलत्या परिस्थितीनुसार आपणही राज्यघटनेमध्ये बदल करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले. या दृष्टीने ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती महत्त्वाची ठरते.

७.२ भारतातील राजकीय पक्षपद्धती :

मनुष्य हा स्वभावः समाजशील आहे. तो एकाकी राहु शकत नाही. संघ करुन राहणे ही त्याची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. विचार भिन्नतेमुळे समाजात निरनिराळे संघ किंवा लोकसमूह निर्माण होतात. अशा प्रकारची विचार भिन्नता आर्थिक, सामाजिक, धार्मिक, तत्वज्ञानविषयक किंवा अन्य स्वरुपाची असू शकते. राजकीय पक्षांच्या उदयाला हे घटक कारणीभूत होऊ शकतात. त्यांच्यातील भिन्नतेमुळे पक्षभिन्नता निर्माण होऊ शकते. राजकीय पक्ष हे समाजातील संघटित गट असतात. त्यांना राजकीय म्हणतात कारण ते राज्यातील सत्तेशी संबंधित असतात.

७.२.१ राजकीय पक्ष व्याख्या :

एडमंड बर्क यांच्या मते, "राजकीय तत्वज्ञानाच्या बाबतीत एकमत असलेला व संघटितपणे राष्ट्रीय हितसंबंध जपणारा लोकसमूह म्हणजे राजकीय पक्ष होय". मॅकआयव्हर यांच्या मते राजकीय पक्ष म्हणजे एखाद्या तत्वाला किंवा उद्दिष्टाला पाठिंबा देण्यासाठी संघटित झालेली संस्था. अशी संस्था घटनात्मक मार्गाने ते तत्व किंवा उद्दिष्ट शासनसंस्थेचे उद्दिष्ट म्हणून ठरवण्याच्या प्रयत्न करते. या विचारवंताच्या विचारातून पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

१) राजकीय पक्ष ही लोकांची संघटना असते. पक्षाच्या मुलभूत तत्वाविषयी त्या लोकांत एकवाक्यता असते.

२) राजकीय पक्ष सत्ता हस्तगत करुन आपल्या तत्वांच्या चौकटीत लोककल्याण साधण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे राजकीय पक्ष म्हणजे समान राजकीय मते व ध्येय असणाऱ्या व्यक्तींची ऐच्छिक संघटना. ही संघटना शासनावर नियंत्रण ठेवून आपले धोरण साध्य करण्याचा प्रयत्न करते.

७.२.२ भारतातील पक्षपद्धतीचा उदय व विकास :

भारतात १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. परंतू शासन संस्था राबविणे या उद्देशाने नाही तर देशाला मुक्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट ठेवून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. पुढे ब्रिटीश कायद्याच्या चौकटीत राहून राष्ट्रीय काँग्रेसने सत्ता प्राप्ती करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. स्वातंत्र्य पूर्व काळात मुस्लिम लिग व हिंदू महासभा या संघटना सुद्धा विशिष्ट्य हेतूने स्थापन करण्यात आले. परंतु या दोन्ही संघटना राजकीय पक्षा पेक्षा धार्मिक पक्ष म्हणूनच लोकप्रिय झाल्या.

स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षाविषयी स्पष्टपणे कोणत्याही घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या नाहीत. परंतु कलम १९ प्रमाणे नागरिकांना संघटना स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्याची परिणती म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळअत नवनवीन राजकीय पक्ष उदयास येत आहे. राज्यघटनेच्या ९२४ व्या कलमान्वये निवडणुकांचे संचालन, मार्गदर्शन व नियंत्रण करण्याचे कार्य निवडणूक आयोगाकडे सोपविले आहे. त्यामुळे निवडणूका लढविणाऱ्या राजकीय पक्षाना मान्यता देणे, त्यांच्यासाठी चिन्हे राखून ठेवणे इत्यादी कामे हे आयोग करते.

७.२.३ भारतात पक्षपद्धतीचा विकास विविध टप्प्यात झाल्याचे दिसून येते :

१) १९४७ ते १९७७ : १९५० ला समाजवादी पक्ष, १९५१ ला भारतीय जनसंघ, १९५७ ला स्वतंत्र पक्ष, १९५७ रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया, १९६६ ला शिवसेना इत्यादी पक्ष उदयास आले. पण या काळात एकपक्ष प्रभुत्व पध्दती अस्तित्वात होती. काँग्रेस अतिशय प्रभावी पक्ष होता.

२) १९७७ ते १९८० : काँग्रेस पक्षाचा प्रभाव या कालखंडात कमी झाला व विविध विचारसरणीचे लोक एकत्र येवून जनता पक्षाची सत्ता आली.

३) १९८० ते १९८९ : या काळात पुन्हा काँग्रेस पक्षाचे शासन होते. ह्या काळात एकपक्ष प्रभुत्व पद्धती दिसून येते.

४) १९८९ पुढे : बहुपक्षपद्धती व संमिश्रे आघाडी सरकार यासाठी हा प्रसिद्ध कालखंड आहे.

७.२.४ भारतीय पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये :

अ) बहुपक्ष पद्धती : भारताच्या राजकीय वातावरणात अनेक राजकीय पक्ष आढळतात. राष्ट्रीय स्तरावरील पक्ष फुटून नवीन पक्ष निर्माण झाले. काही पक्ष, नेत्यांनी स्थापन केले. प्रादेशिक पक्षांची त्यात भर पडली. छोटे-मोठे मिळून ७५ पेक्षा अधिक पक्ष आहेत. कमी होण्यापेक्षा त्याच्या वाढण्याकडे अधिक कल आहे.

ब) एक पक्ष प्रभुत्व पद्धती : तांत्रिकदृष्ट्या आपल्याकडे बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. परंतू १९७७-७५, १९८९-९१, १९९६-९७-१९९८, १९९९-२००४ हा काळ वगळता केंद्रात कांग्रेस पक्षच सत्ताधारी पक्ष राहिला आहे. भारताच्या राजकीय पक्षावर काँग्रेसचे स्थान प्रमुखच राहिले आहे. काँग्रेस पक्षामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले अशी अनेक लोकांची समजूत आहे. बरेच राजकीय पक्ष व त्याचे नेते हे काँग्रेस पक्षाचा कधीतरी एक भाग होते. राष्ट्रीय स्तरावर काँग्रेसला गंभीर धोका उद्‌भवलेला नव्हता. तथापि गेल्या काही वर्षात काँग्रेसचा प्रभाव कमी होत असलेला दिसून येत आहे.

क) दुर्बल व असंघटित विरोधी पक्ष :

लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीसाठी बलवान विरोधी पक्ष आवश्यक असतो. परंतु भारतात विरोधी पक्ष दुर्बल आहेत. विरोधी पक्षांची संख्या प्रचंड आहे त्यामुळे त्यांच्या सामर्थ्यांचे विघटन होते.

ड) राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष :

काही पक्ष राष्ट्रीय स्तरावर कार्य करतात. त्यात काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, बहुजन समाज पक्ष इत्यादींचा समावेश होतो. शिवसेना, अकाली दल इत्यादी पक्ष प्रादेशिक स्वरुपाचे आहेत. प्रदेश निष्ठा चेतवली गेल्याने राज्यात प्रादेशिक पक्ष अधिक लोकप्रिय झाले. तेवढ्या प्रमाणात राष्ट्रीय पक्षांचा जनाधार कमी झाला. राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक पक्षांचे महत्व लक्षात घ्यावे लागले. त्यांच्याशी तडजोड करावी लागली.

इ) नेतृत्वावर आधारीत :

नेतृत्वावर आधारित पक्ष हे भारतातील पक्ष पद्धतीचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. पक्षाच्या नेत्याच्या नावाने त्या त्या राजकीय पक्षाला ओळखण्यात येते. नेत्यांमधील संघर्ष, त्यांचा अहंकार, त्यांच्यातील अधीक बेबनाव हेच बहुतेक राजकीय पक्षांच्या स्थापनेचे कारण आहे. कोणत्याही दोन राजकीय पक्षांमध्ये तीव्र स्वरुपाचा वैचारिक संघर्ष दिसत नाही. पक्षनेतृत्वात मतभेद झाले की पक्षाचे विभाजन होते व नवीन पक्ष निर्माण होतो.

ई) पक्षातंर :

विविध राजकीय पक्षाचे सदस्य अनेकदा पक्षातंर करताना आढळतात. अनेक वेळा या पक्षांतराचे कारण वैचारिक नसते. सत्ता मिळविण्याचा विचार सर्वात वरचढ ठरतो. कालचे शत्रू आजचे मित्र बनतात. निवडणूक जिंकल्यानंतर पक्षबदल करणे म्हणजे एकप्रकारे मतदारांचा विश्वासघात होय. म्हणून पक्षांतरबंदीचे कायदे केले आहेत. पक्षांतर करणे ही भारतीय राजकारणाची एक गंभीर समस्या बनली आहे.

उ) प्रबळ प्रादेशिक पक्ष :

अनेक प्रांतात प्रादेशिक पक्ष स्थानिक प्रश्नांना वाचा फोडणे या भावनेने उदयाला आले आहेत. आपापल्या राज्यात काँग्रेसला पर्याय म्हणून हे पक्ष वावरतात. राष्ट्रीय पक्ष आपले हितसंबंध जोपासण्यात असमर्थ आहेत अशी लोकभावना आहे. या भावनेमुळे राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष प्रबळ होतात. भारताच्या आजच्या राजकारणामध्ये 'प्रादेशिकता' हा राजकारणातील प्रभावी घटक आहे. आज भारतात अनेक प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आहेत. उदा. द्रविड मुन्नेच कळघम, तेलगू देशम पक्ष, समाजवादी पक्ष, अकाली दल, आसाम गणतंत्र परिषद, शिवसेना इ.

ऊ) विचारांचा आधार :

भारतातील बहुसंख्य राजकीय पक्ष कोणत्यातरी विचारप्रणालीचा पुरस्कार करतात. समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही इत्यादी विचारांना बांधलेले असल्याचा दावा करतात. सत्ता मिळविणे एवढेच त्यांचे उद्दिष्ट नसते. ते सत्तेच्या माध्यमातून विचार कृतीशील करण्याचे आश्वासन देताना दिसतात.

ए) विरोधी पक्षाच्या मर्यादा :

पंतप्रधनांना आपल्या पत्नीपेक्षाही विरोधी पक्षनेत्याचा अधिक परिचय असतो असे इंग्लडंच्या संसदीय लोकशाहीबद्दल म्हटले जाते. विरोधी पक्षाचे सरकारवर नियंत्रण असते. अभ्यासपूर्ण टीका टिपणी केली जाते व जागरुक लोकमत आपणास अनुकूल व्हावे म्हणून प्रयत्न

केला जातो. भारतात अनेक वर्षे एक पक्षीय वर्चस्व होते. विरोधी पक्षांचा विरोध बांधट होता. आता एक पक्षीय वर्चस्व राहिले नाही. तरीही विरोधी पक्ष हवा तितका प्रभावी नाही.

आपली प्रगती तपासा.

१) भारतातील पक्ष पद्धतीचा उदय व विकास जाणून घ्या.

२) भारतीय पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये जाणून घ्या.

७.३ ग्रामिण व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था ७३वी व ७४वी घटना-दुरुस्ती व सर्वसमावेशक राजकारण :

पंचायती राज्य किंवा स्थानिक स्वराज्य संस्था ही संकल्पना प्राचीन काळी वेगळ्या स्वरुपात होती. प्राचीन काळीसुद्धा भारतात ग्रामीण स्थानिक शासनसंस्था अस्तित्वात होत्या. आपण असे ऐकतो की, भारतात बरेच राजे आले, त्याने राज्य केलीत, परंतु खेडे हा घटक स्वतंत्रच राहिला. कारण प्राचीन भारतात खेडे हा एका सामाजिक जीवनाचे केंद्रस्थान होते. आज सुद्धा स्थानिक प्रशासनात ग्रामीण भाग महत्त्वाचा आहे. कारण भारतात अजूनही ग्रामीण जनतेचे प्रमाण शहरी जनतेपेक्षा बरेच जास्त आहे. पंचायती राज्य ही संकल्पना जरी नवीन नसली तरी स्थानिक प्रशासन संदर्भात विकास घडत असताना त्यातील होणारे प्रशासकीय बदल महत्वाचे ठरतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांची आवश्यकता खेड्यांप्रमाणे शहरातही भासते; कारण शहरे आणि खेडी मिळूनच भारत देश बनलेला आहे. शहरांचाही विकास चांगल्या रितीने व्हावा याच उद्देशाने शहरातही स्वराज्य संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.

७.३.१ ७३ वी व घटना-दुरुस्ती :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गाव, तालुका, जिल्हा व राज्य याविषयी विकासात्मक दृष्टिकोन स्वीकारुन त्या त्या स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था व शासन यांच्या समन्वयातून देशाचा राज्यकारभार चालू रहावा ह्यासाठी विविध प्रयत्न करण्यात आले. २० एप्रिल १९९३ रोजी पंचायती राजविषयक ७३ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. आणि त्यामुळे एक समान कार्यपद्धती गावापासुन राज्यापर्यंत लागू करण्यात आली. त्यालाच पंचायती राज्यपद्धती म्हणून संबोधण्यात येते.

७.३.२ ७३ व्या घटनादुरुस्तीचे स्वरुप :

७३ व्या घटनादुरुस्तीमुळे गाव तेथे ग्रामपंचायत, तालुका तेथे पंचायत समिती आणि जिल्हा तेथे जिल्हा परिषद अशा स्थानिक स्वराज्यसंस्थांची निर्मिती करण्यात आली. आणि त्यामुळे स्थानिक स्वराज्यसंस्थात नवविचाराचे पर्व सुरु झाले. पंचायत कायद्याला त्यामुळे

वैधानिक आणि संविधानिक असे स्वरुप प्राप्त झाले. तालुका स्तरावर ग्रामपंचायती सारखीच पंचायत समितीची निर्मिती करण्यात आली. जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत यांच्यामध्ये समन्वयक म्हणून पंचायत समित्याची भूमिका अपेक्षिली गेली. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्या समन्वयातून पंचायत समितीचे कामकाज १ मे १९६१ साली सुरु झाले. तालुक्यातील विकासविषयक कामे करण्याचे अधिकार तालुका स्तरावर सभापती हे पंचायत समितीचे पालकत्व करु लागले. तालुक्याचे लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे प्रभाग ठरविण्यात आले व त्याप्रमाणे तालुक्याचा कारभार चालू लागला.

जिल्हा स्तरावर उक्त विवेचनाप्रमाणे जिल्हा परिषदांची निर्मिती झाली. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेच्या कामकाजाचे पालकत्व अध्यक्षांकडे सोपविण्यात आले. तर शासकीय प्रमुख पदाची जबाबदारी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आली. ३५,००० संख्येसाठी एक जिल्हा परिषद सदस्य निवडून देऊन ५० ते ७५ इतकी जिल्हा परिषद सदस्यांची मर्यादा ठरविण्यात आली. अशा निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांमधून जिल्हा परिषद सदस्यांमधून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाची नियुक्ती करण्यात येते.

७.३.३ ७३ घटना-दुरुस्तीचे महत्त्व :

महाराष्ट्रात १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधि-नियमाने आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कायद्याने अगोदरच सुरु झालेल्या पंचायती राज पद्धतीला आता ७३ व्या घटनादुरुस्तीने घटनात्मक दर्जा मिळाला आहे. या घटनात्मक दर्जामुळे ७३ व्या घटनादुरुस्तीत सुचविल्याप्रमाणे नव्या पंचायती राज्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे बंधन राज्यसरकारवर आले आहे.

७३ व्या घटना दुरुस्तीअंतर्गत ११ व्या अनुसूचीमध्ये २९ विषयाचे हस्तांतरण पंचायती राज्यसंस्थाना करण्यात आलेले आहे. यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या संस्थांची जबाबदारी वाढलेली आहे. वाढत्या जबाबदारीप्रमाणे कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

७३ वी घटनादुरुस्ती झाल्यामुळे महिलांना ३३% आरक्षण देण्यात आलेले आहे. यामुळे मोठ्या संख्येने महिला राजकीय क्षेत्रात सामाजिक कार्य करण्याकरिता पुढे आलेल्या आहेत. महिलांना शिक्षण व प्रशासनाविषयी पुरेशी माहिती नसताना देखील संबंधित संस्थेची जबाबदारी पार पाडणे हे आव्हान होते. परंतु या आव्हानाला अनेक महिलांनी धैर्याने सामोरे जावून आपली जबाबदारी यशस्वी पार पाडल्याचे दिसुन येते. महिला पुरुषांप्रमाणेच कार्य करु शकतात याची संधी ७३ व्या घटनादुरुस्तीने राजकारणातील महिलांना दिलेले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

महाराष्ट्र ग्रामपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे कायदे या अगोदरच केले होते. परंतु ७३ व्या घटनादुरुस्तीने सुचविल्याप्रमाणे त्या कायद्यात काही दुरुस्त्या करुन मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती दुरुस्ती विधेयक १९९४ या नावाचा कायदा २२ एप्रिल १९९४ रोजी संमत केला. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती दुरुस्ती विधेयक १९९४ या नावाचा कायदा २२ एप्रिल १९९४ रोजी संमत केला. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व

पंचायत समिती अधिनियम, १९६१ या जुन्या कायद्यात दुरुस्त्या केल्या व २३ एप्रिल १९९४ पासून महाराष्ट्रात नवे पंचायती राज सुरु झाले.

७३ वी घटनादुरुस्ती प्रामुख्याने लोकशाहीचा विकास, सामाजिक न्याय, महिलांचा विकास तसेच नियोजन प्रक्रियेत जास्तीत जास्त लोकांचा सहभाग याच कारणासाठी करण्यात आलेले दिसून येते.

भारतातील सर्व राज्यांमध्ये गावपातळी, तालुका पातळी व जिल्हापातळी अशा तीनही पातळीवर पंचायती राज पद्धती सुरु झाली. महाराष्ट्रात १९५९ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाने आणि १९६१ च्या महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियमानुसार अगोदरच सुरु झाल्या होत्या. आता ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे ह्या योजनेला वैधानिक स्वरुप प्राप्त झाले आहे. त्यामुळे ह्या तीनही पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांचा दैनंदिन कारभार कायद्याच्या आकृतिबंधात चालविला जातो.

७.३.४ ७४ वी घटनादुरुस्ती :

डिसेंबर १९९२ च्या ७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी नागरी स्वशासन संस्थांचे अस्तित्व हे पूर्णपणे राज्यसरकारवर अवलंबून होते. त्यामुळे नागरी प्रशासनात नेहमीच अस्थिरता होती. नागरी प्रशासनात संपूर्ण राज्यभर सातत्याचा अभाव होता. मात्र ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर नागरी प्रशासनातील संस्था-नगरपरिषदा व महानगरपालिका आणि इतर संस्था यांना घटानात्मक दर्जा प्राप्त झाला.

७.३.५ ७४ व्या घटनादुरुस्तीचे स्वरुप :

भारतीय राज्यघटनेची ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती ही स्थानिक स्वराज्य संस्थांशी सबंधित आहे. या घटनादुरुस्तीपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थाचे अस्तित्व त्यांना मिळणारी अनुदाने इत्यादी सरकारच्या मर्जीवर अवलंबून होते. परंतु ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे या संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. संसदेने डिसेंबर १९९२ मध्ये ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती पास केली. या घटनादुरुस्तींचा उद्देश स्थानिक शासन संस्थांच्या कारभारात सुधारणा घडवून आणून लोकशाही विकेंद्रीकरण अधिक प्रभावी करण्याचा होता. त्यामुळे उभय घटनादुरुस्तीतील बहुसंख्य बाबतीत साम्य आढळून येते. काही तरतुदी केवल ग्रामीण शासन संस्थाविषयक (पंचायत राज व्यवस्थेविषयक) असल्याने त्यांचा समावेश ७३ व्या घटनादुरुस्तीत करण्यात आला आणि काही बाबी त्या केवळ नागरी स्वरुपाच्या असल्याने त्यांचा समावेश ७४ व्या घटनादुरुस्तीत करण्यात आला आहे. ७४ वी घटना दुरुस्ती नगरपालिका, नगरपंचायत, महानगरपालिका यासंबंधी आहे. दोन्हीही क्षेत्रांशी संबंधित असलेली नियोजन आणि विकास समितीची तरतूद केवळ ७४ व्या घटनादुरुस्तीतच करण्यात आली आहे.

या घटनादुरुस्तीसंबंधीचा अधिनियम १ जून १९९३ रोजी अमलात आला आणि भारतीय राज्यघटनेला नव्या ९७० या भागाची जोड मिळाली. या भागामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाचे नियम कसे असावेत याविषयी मापदंड निश्चित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीतील तरतुदींशी सुसंगत अशा दुरुस्त्या राज्यातील ग्रामीण आणि नागरी शासन संस्थाविषयक कायद्यांमध्ये १९९४ साली केल्या.

७४ व्या घटनादुरुस्तीन्वये शहरी भागात स्वयंशासनाच्या संख्याविषयी तरतुदी केल्या आहेत. त्यात आरक्षण, वित्त आयोग आणि निवडणूक आयोग यांच्याबद्दलच्या तरतुदी आहेत. या घटनादुरुस्तीने नागरी शासन संस्थांना घटनात्मक स्थान प्राप्त झाले.

७.३.६ ७४ व्या घटनादुरुस्तीचे महत्त्व :

७४ व्या घटनादुरुस्तीनुसार शहरी भागात व शहरीकरणाच्या दिशेने चाललेल्या छोट्या शहरामध्ये त्यांच्या लोकसंख्येनुसार महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायतीची स्थापना करण्यात आली. ज्यापद्धतीने ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण जनतेला सत्ता प्राप्त झाली. त्याच पद्धतीने ७४ व्या घटनादुरुस्तीने शहरी भागातील लोकांच्या हाती सत्तेची चावी आली. कोणत्याही शहराचा विकास करण्यासाठी तेथील नागरीकांना समाविष्ट केल्याशिवाय त्याचा विकास होवू शकत नाही. हे तत्व या घटनादुरुस्तीने मान्य केले. प्रत्येक शहराचा नियोजनबद्ध विकास व्हावा, पारदर्शी कारभार चालावा. प्रगतीला वेग मिळावा इ. उद्देश ठेवून शहरी भागातील शासन संस्थाना पुरेसे अधिकार प्राप्त झालेले दिसून येते आणि त्याचा उचित परिणामही महाराष्ट्राच्या काही शहरामध्ये गेल्यावर दिसुन येते. वाढती लोकसंख्या, प्रशासनाच्या विविध जबाबदाऱ्या, लोकशाहीचे दृढीकरण इ. बाबीसाठी केंद्रीकृत प्रशासनव्यवस्था ही निकामी ठरते. अशावेळी सत्तेचे विकेंद्रीकरण करणे ही काळाची बाब ठरते. आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने काळाची पावले ओळखून सत्तेचे योग्य पद्धतीने विकेंद्रीकरण केल्याचे दिसून येते. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडून आलेले लोकप्रतिनिधी आणि सरकारचे प्रशासकीय अधिकारी यांचा योग्य समन्वय झाल्याचे आपल्याला दिसून येते. ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार अनेक राज्यांनी आपल्या कायद्यात बदल घडवून आणून लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे.

७.३.७ महिलांचे सबलीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्था :

७४ व्या घटनादुरुस्तीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ३३% आरक्षणाची व्यवस्था केल्याने भारतीय राजकारणात महिलांची संख्या वाढलेली दिसून येते. मुळात भारतीय स्त्रियांना प्राचीन काळापासुन सार्वजनिक क्षेत्रात म्हणावा तसा प्रवेश मिळाला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लिहिलेल्या घटनेद्वारे स्त्रियांना समान दर्जा, समान हक्क प्राप्त झाले. तद्नंतर विविध क्षेत्रामध्ये स्त्रियांनी उत्तुंग भरारी मारल्याचे दिसून येते. परंतु वैयक्तिक कामगिरी करणे हे स्त्रिच्या हातात असले तरी राजकारणाच्या क्षेत्रात बहुसंख्यांकाची मानसिकता ही एखाद्या व्यक्तीला पुढे जाण्यासाठी किंवा रोखण्यासाठी कारणीभूत ठरते. पुरुषी मानसिकेतून अजूनही भारतीय समाजव्यवस्था बाहेर न पडल्यामुळे या दोन घटनादुरुस्तीच्या अगोदर स्त्रियांची राजकारणातील संख्या ही नगण्यच होती असे म्हणता येईल. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने मात्र कायद्यानेच स्त्रियांना राजकारणातील प्रवेशद्वार खुले केल्यामुळे ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागांमध्ये राजकारणाने स्त्रियांची संख्या झपाट्याने वाढली आहे.

३३% आरक्षणामुळे जरी स्त्रियांची संख्या वाढली असली तरी त्यांना पूर्ण अधिकार प्राप्त झाले आहेत अशा समजूतीत राहणे हे भोळेपणाचे ठरेल. तसेच स्त्रियांमधील अनुसूचीत जाती व जमातीतील स्त्रियांना मात्र दुहेरी संकटातून जावे लागते. पुरुषी मानसिकता व

जातीव्यवस्था अशा दोन्ही समस्यांना तोंड देत त्यांना राजकारणात टिकुन रहावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेद्वारे दिलेल्या अधिकारांनी क्रांतीची जी ठिणगी भारतीय स्त्रियांमध्ये निर्माण झाली तिला क्रांतीच्या दिशेने नेण्याचे काम ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने केले आहे असे म्हणता येईल. या दोन घटनादुरुस्तीचा व भारतीय राज्यघटनेची योग्य प्रकारे अंमलबजावणी झाल्यास भारतीय समाजात समता प्रस्थापित होण्यास वेळ लागणार नाही.

आपली प्रगती तपासा.

१) ७३ व्या घटनादुरुस्ती स्वरूप व महत्त्व जाणून घ्या.

२) ७४ व्या घटनादुरुस्तीचे स्वरूप व महत्त्व जाणून घ्या.

७.४ महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्व :

आज सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळवलेले दिसते. एकेकाळी केवळ पुरुषांची मक्तेदारी समजण्यात येणारी अनेक क्षेत्रे आज स्त्रियांनी स्वकर्तृत्वार पादाक्रांत केली आहेत. मात्र यासाठी स्त्रियांनी अनेक वर्षे पुरुषसत्ताक समाजाशी संघर्ष करावा लागला. केवळ भारतात नव्हे तर अमेरिका, इंग्लडंसारख्या प्रगत देशांमध्येही स्त्रियांच्या प्रदीर्घ संघर्ष करावा लागला. केवळ स्त्री असल्याने नाकारण्यात आलेल्या राजकीय, आर्थिक हक्कांसाठी, सामाजिक दर्जासाठी स्त्रियांना पराकोटीचा संघर्ष करावा लागला. स्त्री ही देखील माणूस आहे, तिला हक्क नाकारणे म्हणजे अर्ध्या मानवतेला वंचित ठेवणे आहे या जाणिवेतून स्त्रीवादाचा जन्म झाला. या जाणिवेतूनच जगाच्या विविध भागात स्त्रियांच्या हक्कासाठी वेगवेगळ्या पद्धतीने लढा उभारण्यात आला आणि स्त्रियांना राजकीय, सामाजिक, आर्थिक न्याय मिळण्यास सुरुवात झाली. परंतु ही लढाई अजून चालूच आहे, अजूनही या आधुनिक युगात स्त्रियांना समान न्याय हक्क मिळाला नाही.

७.४.१ भारतीय स्त्रियांच्या राजकारणातील प्रवेशाचा आढावा :

२००९ साली झालेल्या लोकसभा निवडणूकीतील आकडेवारीनुसार लोकसभेवर निवडुन गेलेल्या स्त्रियांची संख्या केवळ ५९ आहे. लोकसभेच्या एकूण संख्येच्या ही केवळ ११% एवढी आहे. महिलांना संसदेत ३३% आरक्षण असावे अशी मागणी स्त्रीवादी चळवळ, स्त्रियांच्या संघटना वारंवार करतात. सर्व पक्षातील स्त्री खासदारांमध्येही याबाबत एकमत दिसुन येते. मात्र ही मागणी आजतागायत अपूर्णच राहिली आहे. महिला आरक्षण विधेयक वेळोवेळी संसदेत मांडले जावुनही संमत झालेले नाही. स्त्रियांच्या राजकीय सहभाग व हक्कासांठी ब्रिटिशकाळापासून विविध प्रकारचे प्रयत्न होत आलेले दिसतात.

१९१७ साली भारतीय स्त्रियांच्या प्रतिनिधीमंडळाने लॉर्ड मॉन्टेग्यू यांची भेट घेऊन स्त्रियांसाठी मताधिकाराची मागणी केली. पुढे १९२० साली संपत्तीदार स्त्रियांना मताधिकार बहाल केला गेला. मात्र त्यांना विधीमंडळात प्रवेश नव्हता. १९३० साली वूमेन्स इंडिया असोसिएशन च्या प्रतिनिधींच्या सततच्या पाठपुराव्याने विधीमंडळ प्रवेश स्त्रियांना खुला झाला. मुथु लक्ष्मी रेड्डी या पहिल्या प्रतिनिधी म्हणून विधीमंडळावर कार्यरत झाल्या. १९३० साली इंग्लंड येथे आयोजित गोलमेज परिषदेत बेगम जहानआरा शाहनवास व राधाबाई सुब्बरायन या स्त्री कार्यकर्त्यांनी स्त्रियांसाठी विधीमंडळामध्ये ५% आरक्षणाची मागणी केली. पुढे १९३५ च्या भारत सरकार कायद्याद्वारे स्त्रियांच्या मताधिकाराचा व विधीमंडळ प्रवेशाचा पाया व्यापक करण्यात आला. या कायद्यांतर्गत घेण्यात आलेल्या प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणूकांतून एकूण ५६ स्त्रिया प्रांतिक विधीमंडळ सदस्य बनल्या. याशिवाय ३० स्त्रिया केंद्रिय विधीमंडळावर निवडून गेल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या नेतृत्वाखाली बनविण्यात आलेल्या राजघटनेत सर्व जाती, धर्माच्या वंशाच्या भारतीय स्त्रियांना समान घटनात्मक अधिकार देण्यात आले. पुढे १९९२ च्या ७३ व७४ व्या घटनादुरुस्त्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांना ३३% आरक्षण देण्यात आले. त्यामुळे अनेक स्त्रियांनी राजकारणात प्रवेश करुन आपला ठसा उमटविला.

७.४.२ भारतीय स्त्रियांच्या राजकीय सहभागातील मर्यादा :

स्त्रियांच्या राजकीय सहभाग हा विविध घटकांवर अवलंबून असतो. स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन, परंपरा, चालीरिती, जातीव्यवस्था, लिंगभेद इत्यादीच्या प्रामुख्याने समावेश करता येईल. भारतीय राज्यघटनेनुसार जरी स्त्रियांना राजकारणात समान अधिकार प्राप्त झाले असले तरी त्याची अंमलबजावणी मात्र योग्य प्रकारे केली जात नाही. किंबहुना हे अधिकार महिलांना मिळू नयेत यासाठी पुरुषसत्ताक मानसिकतेकडुन प्रयत्न केले जात आहेत.

७.४.३ भारतातील स्त्रियांच्या राजकारणातील प्रवेशाचा आढावा :

२००९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत एकूण ५५० पैकी फक्त ५९ स्त्रिया खासदार बनल्या याचाच अर्थ आजही लोकसभेमध्ये ८९% पुरुषांची मक्तेदारी दिसून येते. उर्वरीत ५९ पैकी किती महिला या स्व-कर्तृत्वावर निवडून आलेल्या आहेत हा संशोधनाचा विषय आहे. कारण भारतीय राजकारणामध्ये प्रस्थापितानी आपल्या घरातील स्त्रियांना राजकारणामध्ये प्रवेश जरी दिला असला तरी निर्णय मात्र ते स्वतः घेतात. भारतीय राजकारणामध्ये काही मोजक्या स्त्रियांनी पुरुषसत्ताक मानसिकतेला विरोध करून आपले स्वतःचे स्थान निर्माण केलेले दिसून येते. यामध्ये मायावती, जयललिता, ममता बॅनर्जी, सुषमा स्वराज, सोनिया गांधी इ. हिलांचा विशेष उल्लेख करावा लागेल. ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ३३% आरक्षण दिले आहे. त्याचप्रमाणे विधानसभा, लोकसभेसाठीसुद्धा आरक्षणाची आवश्यकता आहे. तरच खऱ्या अर्थाने स्त्रि-प्रतिनिधींची संस्था वाढलेली दिसून येईल.

आपली प्रगती तपासा.

१) भारतीय स्त्रियांचे राजकारणातील महत्त्व आणि भूमिका जाणून घ्या.

_____

_____

_____

_____

७.५ सारांश :

अशा प्रकारे भारतातील बहुपक्षपद्धती, त्यातील महिलांचे स्थान, ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीचे दूरगामी परिणाम दिसून येतात. खऱ्या अर्थाने हे तीनही घटक एकमेकांशी संबंधीत व एकमेकांवर अवलंबून आहेत. याची प्रचीती सद्यपरिस्थितीतील राजकीय घटनांचा आढावा घेतल्यास लक्षात येईल. आज भारतातील बहुतेक प्रमुख पक्षांची जबाबदारी ही महिलांकडेच आहे. ग्रामीण भागात महिला राजकारणात पुढे येत आहेत. अनेक पक्षांनीसुद्धा पारंपारिक विचारसरणीचा त्याग करून जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकेंद्रीकरणामुळे ग्रामीण भागातील जनतेलासुद्धा राज्य हाकण्याची संधी प्राप्त झाली आहे. अशा प्रकारे भारतीय राजकारणामध्ये आमूलाग्र बदल झालेले दिसून येतात.

७.६ विद्यापीठीयस्तरीय प्रश्न

१. भारतातील राजकीय पक्षपद्धती विषयी माहिती सांगा.
२. ७३ वी ७४ वी घटनादुरुस्ती व भारतीय राजकारण चर्चा करा.
३. भारतीय महिलांचे राजकारणातील भूमिका आणि महत्त्व सांगा.

❖❖❖❖

८

भारतातील वाढत्या सामाजिक समस्या : व्यसनाधिनता (धूम्रपान, मद्यपान व मादक द्रव्ये)

पाठाची रचना :

८.१ उद्दिष्ट्ये
८.२ प्रास्ताविक
८.३ सामाजिक समस्या.
८.४ धूम्रपानाची समस्या, कारणे, परिणाम, उपाययोजना
८.५ मद्यपानाची समस्या, कारणे, परिणाम, उपाययोजना
८.६ मादक द्रव्यांची समस्या, कारणे, परिणाम, उपाययोजना
८.७ सारांश
८.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न

८.१ उद्दिष्ट्ये

- सामाजिक समस्या ही संकल्पना समजावून घेणे.
- भारतातील व्यसनांचा दुरुपयोग व व्यसनाच्या पद्धतींची माहिती घेणे.
- व्यसनांच्या आहारी जाण्याच्या कारणांचा अभ्यास करणे.
- व्यसनांचे वैयक्तिक व सामाजिक परिणाम अभ्यासणे.
- व्यसन सोडविण्यासाठीच्या उपाययोजनांचा आढावा घेणे.

८.२ प्रास्ताविक

मानवी जीवन ही समस्यांची अखंड मालिकाच आहे. कारण माणूस हा गरजवंत प्राणी आहे. गरजा भागल्या तरी पुन्हा उद्‌भवतात. नव्या गरजा निर्माण होतात. गरजांची पूर्तता करण्यासाठी असंख्य अडचणी असतात आणि त्यामुळेच समस्या निर्माण होतात.

सध्याचा समाज अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. दररोजच्या कोणत्याही वर्तमानपत्रावर नजर टाकल्यास समस्यांची विविधता आणि भीषणता सहज लक्षात येते.

८.३ सामाजिक समस्या (Social Problems)

सामाजिक समस्या या समाजाचे खास वैशिष्ट्ये आहे. काही लोकांना जी समस्या वाटते ती इतरांना समस्या वाटत नाही. उदा. समारंभातील मद्यपान ही सामाजिक समस्या काही लोकांसाठी वाटते तर समाजातील काही घटकांनी ती समस्या वाटत नाही. युरोपियन देशांमध्ये समारंभातील मद्यपान ही समस्या ठरत नाही किंवा भारतातील उच्चभ्रूमध्येही ही समस्या वाटत नाही. म्हणजेच काही समस्या वेळेनुसार ठरतात किंवा संबंधीत असतात. समाजाच्या आधुनिकपणावर वेळोवेळी या समस्या बदलत असतात.

८.३.१ व्याख्या :

सामाजिक समस्यांची व्याख्या वॉलेस वीव्हर या लेखकाने पुढीलप्रमाणे केली आहे - "ज्यामुळे समाजात ताण, तणाव, संघर्ष, वैफल्य व असंतोष इत्यादी विघातक भाव निर्माण होतील. ती घटना स्थिती, कृती म्हणजे सामाजिक समस्या होय".

अलीकडच्या काळात आधुनिक मादक द्रव्यांचा प्रसार वाढत आहे. मोठ्या शहरांमध्ये युवकवर्गाकडून आधुनिक मादक द्रव्यांचे सेवन वाढत आहे. हेरॉइन, ब्राऊन शुगर, एल. एस. डी., बार्बीच्युरेटस्, मार्फिन, कोडिन, ट्रँक्रीलायझर, मँड्रेक्स, मारिज्युआना, कॅनॉबीज, ॲनॉलजिक, पेथेडिना, मँड्रेक्स, प्रोडोर्मा, लिब्रियस इत्यादी विविध प्रकारच्या मादक द्रव्यांची विविध लक्षणे आणि परिणाम आहेत. या मादक द्रव्यांमध्ये जर त्यांचा योग्य वापर केला तर काही औषधी गुणधर्म आहेत. मादक द्रव्याचे व्यसन म्हणजे आनंद प्राप्त करण्यासाठी आणि वास्तवापासून दूर जाण्यासाठी मादक द्रव्याचा वारंवार आणि अधिकाधिक वापर करणे.

सामाजिक समस्या ही वस्तुस्थिती आहे. उदा. समाजातील ठराविक लोकांसाठी मद्यपान आणि धूम्रपान ही न टाळता येणारी समस्या आहे, त्यामुळे त्यास सामाजिक समस्या म्हणता येईल.

८.३.२ भारतीय समाजाला भेडसाविणाऱ्या काही समस्या पुढीलप्रमाणे आहेत -

१) मद्यपान आणि धूमपान (Alcoholism & Smoking) :

समाजातील सर्वच स्थरांमध्ये मद्यपान व धूमपानाची समस्या मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. कमी उत्पन्न गटातील लोकांच्या मध्ये मोठ्या प्रमाणावर ही समस्या आढळून येते. मासिक उत्पन्नातील मोठा हिस्सा यावरच खर्च होतो. त्याचप्रमाणे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्येही मद्यपान व धूमपानाची सवय मोठ्या प्रमाणावर जडली आहे. महाविद्यालयीन निवडणूकीत विजय, क्रीडाक्षेत्रातील विजय, सांस्कृतिकक्षेत्रातील विजय, सहलीचा आनंद, स्नेहसंमेलन व्यवस्थित पार पाडल्याचा आनंद मुले मद्यपानानेच साजरा करीत आहे. यामध्येही मुलीचीही उपस्थिती लक्षणी असते.

२) अंमली पदार्थाचे व्यसन (Drug Addiction) :

अंमली पदार्थामध्ये भांग, चरस, गांज्या इ. अनुभव घेण्यासाठी तरुणी पिढी 'गर्द' कडे वळतात. अमली पदार्थाचा शरीरावर हानिकारक परिणाम होतो. शरीरातील पेशी निष्क्रिय

करण्याचे कार्य काम हे पदार्थ करतात. त्याचप्रमाणे फुप्फुसे व श्वसन यावरही दुष्परिणाम होतो. यामध्ये जर कुपोषणाची भर पडली तर न्यूमोनिया, ब्रॉकोटाइस इ. विकारही होतात. नशा करणाऱ्या व्यक्ती आपली जाणीव व लाज हरवून बसतात. थोडक्यात या सवयी व्यक्तीला अनेक रोग निर्माण करतात, त्यामुळे व्यक्तीचे आयुष्य कमी होते. ब्राऊन शुगरचे प्रमाण तर दिवसेंदिवस वाढतच आहे. सध्या रेव्ह पार्ट्या याचे प्रमाण जास्त आहे.

३) हुंडा पद्धती (Dowry System):

भारतामध्ये सर्व जाती-धर्मामध्ये हुंडा पद्धती मोठ्या प्रमाणावर चालते. भारतीय समाजाला लागलेली ही एक कीड आहे. अनेक मुलींच्या पालकांना हुंडा देणे शक्य नसते. तरीही त्यापैकी काही पालक घर, जमीन व इतर मालमत्ता गहाण टाकून किंवा विकून मुलीला हुंडा देतात. तर ज्यांना अशक्य आहे अशा अनेक मुली आत्महत्या करताना दिसत आहेत. किंवा स्वत:ला जाळून घेत आहेत. लग्न झाल्यानंतर हुंडा देणे मान्य केले असेल आणि दिला नाही तर गुलामासारखा मुलीचा छळ केला जातो.

४) जातीयवाद (Caste System) :

जातीयवाद नष्ट व्हावा हे मनापासून कोणालाच वाटत नाही. सभेमध्ये व कार्यक्रमामध्ये जातीयवादावर बोलायचे आणि प्रत्यक्षात कृती वेगळीच करायची हे राजकरण्यांचे धोरण हल्ली सर्वजणच अवलंबताना दिसत आहेत. लोकसभा-विधानसभेच्या निवडणुकांमध्ये एखाद्या मतदारसंघामध्ये उमेदवारी निश्चित करतात त्या मतदारसंघातील जातीप्रमाणे मतदारांची मोजणी केली जाते व त्याप्रमाणे उमेदवार निश्चित केला जातो. सामान्य माणसे मात्र भरडली जातात. उच्च जातीतील लोक व कनिष्ट जातीतील लोक यांच्यामध्ये कायम कलह, भांडणे निर्माण होत आहेत. यामध्ये अनेकांचे जीव जात आहेत. माणूस ही एकच जात आहे, हे समजेपर्यंत जातीयवादाची समस्या व कलह असाच चालू राहील.

५) निरक्षरता (Illiteracy) :

आज विमानात मुलांच्या मुंजी होऊ लागल्या. याचा अर्थ साक्षर लोकच प्रत्येक क्षेत्रातच पुढे दिसतात. उत्पन्नातील विषमतेमुळे ठराविक लोक रोज दिवाळी करीत आहेत तर गरीबांना शिक्षणासाठी पैसेही नाहीत. १९५१ ते २००१ या कालावधीमध्ये भारतीय साक्षरता ही ६५% पर्यंत पोहचली. जगातील इतर विकसनशील देशांच्या तुलनेत हे प्रमाण अगदीच नगण्य आहे. कोरिया, फिलिपाईन्स व थायलंडमध्ये साक्षरतेचे प्रमाण जवळपास ९५% इतके आहे. निरक्षरतेमुळे विविध सामाजिक व आर्थिक समस्या देशात निर्माण होतात. निरक्षर लोकाची कायम पिळवणूक होते.

६) भ्रष्टाचार (Corruption) :

आज भारतात सर्वच क्षेत्रांत भ्रष्टाचाराचे थैमान माजले आहे. जगामध्ये अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो. विकसनशील देशांमध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण विकसीत देशांच्या तुलनेत जास्त आहे, त्यामुळे या राष्ट्रांचा विकास संथगतीने होत आहे. भ्रष्टाचारामुळे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासावर मोठ्या प्रमानावर परिणाम होतो. शिक्षण, आरोग्य आणि लोककल्याण क्षेत्रांमध्येही भ्रष्टाचाराचे पदार्पण झाले आहे. यामध्ये काही स्वयंसेवी संस्थाही आहेत की ज्या समाजात कल्याणाकरिता निधी गोळा करतात व त्याचा

गैरवापर करतात. शिक्षण क्षेत्रामध्येही कागदोपत्री शाळा फक्त सरकारचा निधी मिळवण्यासाठी दाखविल्या जातात. धर्मदाय कायद्याचा गैरवापर करुन प्रत्यक्षात काम दुसरेच केले जाते, परंतु नोंदणी धर्मदाय संस्था म्हणून केली जाते. थोडक्यात भ्रष्टाचारमुक्त क्षेत्र मिळणे दुर्मिळच झाले आहे.

७) जमातवाद (Communalism) :

भारताला समाजवादाच्या समस्येने ग्रासले आहे. राजकारण, समाजवाद व प्रादेशिक गट यांनी जमातवादाला खतपाणी घातले आहे. धर्माची परंपरा व संस्कृती जतन करण्याच्या प्रयत्नात अनेक संघर्ष होतात. उदा. हिंदू-मुस्लिम दंगे होतात ते यामुळेच. राजकारणी माणसे सत्तापिपासू असतात. सत्ता संपादन करण्यासाठी ते धर्म व संस्कृतीचा साधन म्हणून उपयोग करतात व जातीयवादाचे गलिच्छ राजकारण खेळतात. यामुळे समाजघातक तणाव निर्माण होतो.

८) लोकसंख्येची वाढ (Growth of Population) :

१९०१ पासुन आजपर्यंत भारताच्या लोकसंख्येत सतत वाढ होत आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगात चीननंतर भारताचा नंबर लागतो. जगाच्या लोकसंख्येच्या सातवा हिस्सा भारताची लोकसंख्या आहे. त्यामुळे भारतामध्ये अतिरिक्त लोकसंख्या ही ज्वलंत समस्या आहे. प्रगत देशांच्या तुलनेत भारतीय लोकसंख्येची निरक्षरता प्रचंड आहे.

९) स्त्री-पुरुष असमानता (Gender Inequalities) :

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान असल्याने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. घरांमध्ये त्याचप्रमाणे कामाच्या ठिकाणीही स्त्रियांना छळले जाते, त्यांची छेड काढली जाते. २१ व्या शतकामध्ये स्त्रियांवरील अत्याचारांचे प्रमाण यत्किंचीतही कमी झालेले नाहीत. भारतीय राज्य घटनेने स्त्रियांना संरक्षण दिले आहे. स्त्रियांसाठी विविध कायदेही करण्यात आले आहेत. परंतु हे सर्व कागदोपत्री दिसून येते. पुरुषांच्या तुलनेत त्यांना कमी पगार दिला जातो. अनेक संघटनांमध्ये स्त्रियांना करिअरच्या संधीच उपलब्ध नाहीत.

१०) बाल गुन्हेगारी (Juvenile Delinquency) :

१८ वर्षे वयाच्या आतील मुलांना कामावर ठेवणे किंवा कोणत्याही कायदेशीर बाबीत गुंतवून ठेवणे कायद्याने गुन्हा आहे. तरीही समाजातील अनेक लोक या मुलांना गुन्हेगारीस प्रवृत्त करीत आहेत, त्यामुळे ही मुले चोऱ्या, पाकिटमारीसारखी कामे करीत आहेत. आर्थिदृष्ट्या गरीब व अनाथ मुलांचा समावेश गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणावर असतो. भारताचे भवितव्य घडवणारी पिढीच जर अशी पोखरली जात असेल तर भारताचे भवितव्य डळमळीत होईल.

११) प्रादेशिकता (Regionalism) :

राजकारणी लोक स्वतःच्या फायद्यासाठी प्रादेशिक वाद निर्माण करतात. आपण जर एकसंघ भारत राहावा असे म्हणतो तर देशातील सर्व राज्यांतील लोकांना मिळून मिसळून राहिले पाहिजे. अन्यथा राज्याराज्यांमध्ये वाद निर्माण होतील. रशियासारख्या महासत्तेचे जसे तुकडे झाले तसे होण्यास वेळ लागणार नाही.

१२) बेरोजगारी (Unemployment) :

सर्वात मोठी आणि ज्वलंत समस्या म्हणजे बेरोजगारी होय. प्रंचड लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी देशपातळीवर प्रयत्न झाले नाही तर बेरोजगारांच्या फौजा देशात तयार होतील आणि या फौजा गुन्हेगारीकडे वळतील.

आपली प्रगती तपासा :

१) सामाजिक समस्या स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

८.४ ध्रूमपानाची समस्या (Problems of Smoking) :

ध्रूमपान यामध्ये प्रामुख्याने आपण तंबाखू (tobacco) व तंबाखूपासून बनविलेल्या वस्तूंचे सेवन याचा विचार करणार आहोत. तंबाखू किंवा तंबाखूपासून बनलेल्या वस्तूंचे सेवन करणे ही आधुनिक जगातील फॅशन दिवसेंदिवस वाढत आहे. भारतामध्ये या व्यसनाचे प्रमाण खूपच मोठे आहे.

तंबाखूचे व्यसन रोखण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेतर्फे (WHO) १९८८ सालापासून ३१ मे हा 'तंबाखूविरोधी दिवस' म्हणून पाळण्यात येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या इशाऱ्याप्रमाणे जर तंबाखूचे सेवन थांबले नाही तर २०२० ते २०३० पर्यंत जगातील सुमारे १०० कोटी लोक तंबाखूपासून होणाऱ्या रोगामुळे मृत्यू पावतील, त्यामध्ये ४०% तरुण वर्ग असेल.

भारतात तंबाखूचे सेवन अनेक प्रकारे केले जाते. उदा. तंबाखू खाणे, तंबाखू ओढणे (धूम्रपान) यामध्ये – बिडी, सिगारेट, गुडगुडी, चिरुट, चिलिम इ. वापर केला जातो, तपकीर, मशेरी (मिश्री) इत्यादी.

धूम्रपानामुळे माणसाच्या शरीरावर व मनावर एक प्रकारचा आघातच होतो. एकदा तंबाखूची सवय लागली की मग ती सूटणे अवघड असते. धूम्रपानाची सवय पूर्ण सोडल्यास त्याची अस्वस्थ वाटणे, डोके दुखणे, कंटाळा येणे किंवा थकवा येणे, एकाग्रता न होणे, चिडचिड होणे, कोणत्याही कामात लक्ष न लागणे, सुणे सुणे वाटणे इ. लक्षणे जाणवतात.

८.४.१ धूम्रपानाची कारणे (Causes of Smoking) :

धूम्रपानाचे (तंबाखूचे) व्यसन लागण्यासाठी जी काही कारणे असू शकतील त्यापैकी काही महत्त्वाची कारणे पुढे देत आहे. त्यापैकी एक किंवा अनेक कारणांनी व्यसन लागू शकते.

१) जिज्ञासा :

काही लहान मुले जिज्ञासेपोटी विडी, सिगारेट ओढतात. त्यांना त्याची नशा माहीत नसते तर तोंडाने सिगारेट ओढून नाकातून धूर काढायचा असतो. काही मुले सहलीला किंवा फिरायला गेल्यावर मित्रांच्या आग्रहाने फेंशन म्हणून धूम्रपान करतात. काही सहज टाइमपास म्हणून धूम्रपान करतात तर काही तरुण मुलांना सिगारेट ओढणे शौर्याचे लक्षण वाटते.

२) घरच्यांचा आदर्श :

लहानपणी मुलांसमोर घरच्यांचा आदर्श असतो. घरात आई-वडील, नातेवाईक किंवा शेजारील मोठी माणसे ज्या स्टाईलने किंवा पद्धतीने सिगारेट ओढतात तसेच मोठे झाल्यावर आपणही ओढावे अशी विचारांची जोपासना मनात नकळत तयार होते. ग्रामीण भागात तर अनेकदा शिक्षकच मुलांसमोर सिगारेट ओढतात. या सर्व गोष्टींचे बालमनावर संस्कार होतात. त्यामुळे काही मुले आपल्या आईवडिलांचे, मोठ्या भावांचे, नातेवाईकांचे, शेजाऱ्यांचे आणि शिक्षकांचे नकळत अनुकरण करत असतात.

३) प्रतिष्ठा जोपासने :

हायफाय सोसायट्यांतील उचभ्रू तरुणांमध्ये सिगारेट ओढणे प्रतिष्ठेचे मानले जाते. या वर्गातील अनेक मुले व मुलीही राजरोसपणे सिगारेट ओढण्यात धन्यता मानतात. काही सिगारेट उत्पादक कंपन्या महाविद्यालयीन युवकांना सुरुवातीला मोफत गुटख्याची पाकिटे व सिगारेट देतात. सुरुवातीला मोफत मिळणाऱ्या सिगारेट व गुटख्यामुळे ही मुले व्यसनी बनून आजन्म ग्राहक बनतात.

४) चित्रपट व दूरदर्शन :

भारतातील तरुण पिढी ही चित्रपटसृष्टीतील कलावंतांची व क्रिकेटपटूंची दिवानी आहे. हे मानसशास्त्र जाणून धूम्रपान उत्पादन करणाऱ्या कंपन्या करोडो रुपये कलावंतावर व खेळाडूंवर खर्च करतात. चित्रपटांमध्ये हिरो सिगारेट ओढून वारंवार प्रभाव पाडतो. अनेक टी.व्ही. सिरियलमध्येही असे प्रकार वारंवार दाखवले जातात. त्यामुळे तरुण पिढी चित्रपटाची नक्कल करण्याचा प्रयत्न करते.

दूरदर्शनातील जाहिरातीमुळे उत्कृष्ट व प्रभावी जाहिरातीकडे युवा पिढी आकर्षित होते. जाहिरात प्रसिद्ध कलाकार व आवडत्या खेळाडूमार्फत केल्यास त्याचा निश्चितच तरुणांच्या मनावर परिणाम होतो. अशाप्रकारे जाहिराती करण्यासाठी उत्पादक 'फिल्मफेअर' सारख्या झगमगाटाचा कार्यक्रम आयोजित करतात किंवा गणेशोत्सवाची संधी साधतात. त्यामध्ये जाहिराती दाखविल्या जातात. अनेक कंपन्या अब्जावधी रुपये जाहिरातींवर खर्च करतात. शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या मनावर या प्रभावी जाहिरातींचा वाईट परिणाम होतो.

५) भ्रष्टाचार :

काही लोक शिष्टाचार म्हणून स्वतः सिगारेट ओढतात व इतरांनाही सिगारेट ओढण्यास प्रवृत्त करतात. काही लोक श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी उंची सिगारेट्स ओढतात. काही लोकांचा तर समज असा असतो की, सिगारेट न ओढल्याने समाजातील आपले (स्टेटस) वजन वाढत नाही.

६) तणाव दूर करण्यासाठी :

काही माणसे सतत तणावग्रस्त असतात. कोणती तरी काळजी, भीती त्यांना सतावीत असते. काही माणसे मनोविकारग्रस्त असतात. काहींच्यात न्यूनगंड असतो. अशा विविध प्रकारची माणसे विरंगुळा म्हणून किंवा तणाव दुर करण्यासाठी धूम्रपान करतात. या सर्वांचा समज असा असतो की धूम्रपानामुळे तणावापासून मुक्ती मिळेल, चिंता-भीती, दु:ख नाहीसे होईल.

७) चांगले विचार सुचतात :

कित्येक लोकांना वाटते की, विडी, सिगारेट ओढल्याने, तंबाखू किंवा गुटखा खाल्याने चांगले विचार सुचतात, नवनवीन कल्पनांचा अविष्कार शक्य होतो म्हणून कित्येक कलावंत, लेखक, कवी, साहित्यिक मूड येण्यासाठी धूम्रपान करतात.

८) व्यसन :

तंबाखूच्या व्यसनाला एकदा सुरुवात झाली म्हणजे त्यातील 'निकोटीन' हे विषारी रसायन मज्जासंस्थेवर परिणाम करते. यामुळे सुरुवातीला बरे वाटते, तरतरी आल्यासारखे वाटते, पण ते तात्पुरते असते. एकदा व्यसनाचे प्रमाण वाढले म्हणजे धूम्रपानाशिवाय मोकळा वेळ जातच नाही.

आपली प्रगती तपासा :

१) धूम्रपानाची कारणे स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

८.४.२ धूम्रपानाचे दुष्परिणाम (Bad-effect of Smoking)

धूम्रपानाचे विविध घातक दुष्परिणाम असूनही ते सुरुवातीला दिसून येत नाहीत. ज्याची प्रकृती मुळातच निरोगी आहे अशांना दुष्परिणामांना उशिरा सामारे जावे लागते. तंबाखूमध्ये अनेक विषारी घटक असतात. त्यामधील काही विषारी घटक आणि त्यांचे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबद्दलची माहिती भारत सरकारने प्रकाशित केलेल्या पत्रिकेत पुढीलप्रमाणे दिली आहे –

निकोटीन :निकोटीनचे शरीरातील प्रमाण वाढल्याने ह्रदयाचे ठोके वाढतात, रक्तदाब वाढतो आणि रक्तवाहिन्या आकुंचित होतात.

कार्बन-मोनॉक्साईड : कार्बन मोनॉक्साईडमुळे खोकला, दम लागणे, रक्त निळे होणे व डोळे बिघडणे इ. परिणाम शरीरावर दिसुन येतात.

टार (डांबर) : तोंडाचा कॅन्सर, कर्करोग इ.

मार्श गॅस : मार्श गॅसमुळे जननेंहद्रियांवर अनिष्ट परिणाम होतात व नुपंसकता येते.

अमोनिया गॅस : यामुळे पाचकशक्ती व रक्ताचि रासायनिक स्थिती बिघडते.

पाररिडियन : खोकला, घसा सुकणे व पोटात सारखी आग होते.

कोलोडिन : चक्कर येणे व मज्जापेशी निकामी होणे.

कार्बोलिक ॲसिड : निद्रानाश

परफिरोल : दात पिवळे पडणे व कमजोर होणे.

धूम्रपान करणे हे निश्चित धोकादायक आहे. त्याचे शरीरावर होणारे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत-

अ) तत्कालिक दुष्परिणाम :

धूम्रपानाच्या धूराचे लोट शरीरात गेल्यावर त्यातील निकोटीन झटकन रक्तात शोषले जाते. ते सर्व शरीरभर फिरते, अंत:स्त्रावाचे प्रमाण वाढते व निकोटीन रक्तावाटे मेंदूकडे जाते. काही काळ उत्साह जाणवतो परंतु नंतर निरुत्साह, औदासीन्य व दमछाक जाणवते.

धूम्रपानाचे सुरुवातचे दुष्परिणाम म्हणजे मळमळ होणे, पोट खराब होणे, रक्तातील आम्लता वाढणे, त्यामुळे यकृत, जठर इत्यादिंचे काम बरोबर होत नाही, सतत आम्लवृद्धीमुळे जठरामध्ये व छोट्या आतड्यांमध्ये व्रण होणे, उलट्या होणे, ह्रदयाचे ठोके वाढणे इ. तक्रारी सुरु होतात. त्याचप्रमाणे श्वसनमार्गातील अंत:त्वचा धूम्रपानामुळे खराब होते आणि श्वसनमार्गात रोगजंतूंचा प्रादुर्भाव वाढून सर्दी, खोकला होतो.

ब) दूरगामी दुष्परिणाम :

१) **हार्ट ॲटॅक :** तंबाखूतील कार्बन मोनॉक्साईडमुळे रक्तवाहिन्यांवर स्निध द्रव्यांचे पुटे चढतात व निला अरुंद होऊन रक्त वाहण्याची क्रिया कमी होत जाते. निकोटीनचाही परिणाम होऊन रक्तप्रवाहात रक्ताच्या गुठळ्या तयार होतात. त्यामुळे रक्ताभिसरणास अडथळा निर्माण होतो. परिणामी ह्रदयाला रक्तपुरवठा होत नाही.

२) **फुप्फुसाचा कर्करोग :** सतत विडी, सिगारेट ओढणाऱ्यांना फुप्फुसाचा कर्करोग होतो. धुरातील हजारो रासायनिक कणांपासून टार-नायट्रोसामाइन हा विषारी पदार्थ फुप्फूस, श्वसनलिका, अन्ननलिका, तोंड घसा इ. मधील पेशींवर अनिष्ट परिणाम होतो.

३) **दात आणि हिरड्यांचे आजार :** अनेक अशिक्षित स्त्रीया तंबाखू भाजून त्याची मशेरी दातांना चोळतात किंवा माणसे तंबाखू खातात या तंबाखूतील निकोटीन हे विषारी द्रव्य दात घासताना लाळेत मिसळते. याचा परिणाम म्हणजे दात व हिरड्यांचे आजार होतात.

४) **गरोदर स्त्रियांच्या गर्भावर :** ज्या स्त्रिया गरोदरपणात धूम्रपान करतात किंवा तंबाखू खातात त्यांचा गर्भपात होण्याची शक्यता जास्त असते किंवा त्यांच्या जन्मणाऱ्या अर्भकावर त्याचा परिणाम होतो. उदा. जन्म:ताच सरासरी वजन कमी असणे किंवा दोषपूर्ण बालकाला जन्म दिला जातो.

५) **झोप न येणे :** सततच्या धूम्रपानामुळे झोप कमी होऊन निद्रानाशाचा विकार होऊ शकतो. मन अस्वस्थ आणि चिडचिडे होते. तोंडाला आइण शरीराला उग्र वास येतो. भूक मंदावते आणि बोलताना तोंडातून स्पष्ट उच्चार होत नाहीत.

६) **समाजावर होणारे परिणाम :** धूम्रपानाचे समाजावरही दुष्परिणाम होतात. उदा. सिगारेट पूर्णपणे न विझवता तशीच टाकून दिल्यामुळे कित्येकदा आग लागते, हवेत मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते, धूम्रपानाच्या धूरामुळे समोरील व्यक्तीला धूराचा त्रास विनाकारन सहन करावा लागतो, तंबाखूच्या सेवनाने रस्त्यावर आणि सार्वजनिक ठिकाणी घाण केली जाते. हे सर्व पर्यावरणास म्हणजेच समाजास हानिकारक ठरते.

७) **कुटुंबावर होणारे परिणाम :** व्यसनामुळे त्याची कार्यक्षमता कमी कमी होत जाते, वारंवार आजारी पडल्यामुळे कामावरील गैरहजेरीचे प्रमाण वाढते. महिन्याला मिळणारे उत्पन्न कमी होते. मिळालेल्या पैशांपैकी बराचसा व्यसनासाठी व उरलेला दवाखान्यासाठी खर्च करावा लागतो. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिघडते, भांडणे होतात, संसार विस्कळीत होतो.

८) **रक्तवाहिन्या :** निकोटीनचा परिणाम शरीरातील सर्वच रक्तवाहिन्यांवर होतो. पायातील रक्तावाहिन्या आकुंचण पावल्यामुळे पायाच्या पोटऱ्या सतत दुखतात, पायाच्या पावलाकडील रक्तप्रवाह कुंठित होऊन 'बर्गर्स डिसीज' नावाचा आजार होतो. धूम्रपानामुळे मेंदूतील रक्तस्त्राव होण्याचे प्रमाण आणि पक्षघात होण्याचे प्रमाणही वाढते.

९) **अकाली मृत्यू ;** धूम्रपान करणाऱ्यांचा मृत्यू धूम्रपान न करणाऱ्यांपेक्षा लवकरात लवकर होतो. एका आरोग्य सर्वेक्षणानुसार धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू ८ ते १ वर्षे अगोदर होतो.

थोडक्यात व्यसनांमुळे माणासाच्या आयुष्यातील बरीच वर्षे कमी होतात.

आपली प्रगती तपासा :

१) धूम्रपानाचे दुष्परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

८.४.३ धूम्रपानावर उपाययोजना (Remedies on Smoking) :

तंबाखूतील निकोटीन हे अतिशय विषारी आहे. यावर नियंत्रण ठेवणारे औषध आजतरी उपलब्ध नाही. यासाठी यावर उपाययोजना करणे आवश्यक ठरते. काही उपाय हे सामाजिकदृष्ट्या करता येतील तर काही उपाय हे वैयक्तिक स्वरुपाचे असतील.

अ) सामाजिक उपाय :

धूम्रपानाचे परिणाम व्यक्तिपुरतेच मर्यादित नसून त्यांचे परिणाम समाजावरही होत असतात. यासाठी समाज व सरकार दोघांनी मिळून एकत्रीतरित्या प्रयत्न करणे गरजेचे आहे. सामाजिकदृष्ट्या पुढीलप्रमाणे सर्वसामान्य उपाययोजना करता येईल –

१) **शैक्षणिक कार्यक्रम :** मुलांमध्ये व्यसनाचे प्रमाण खूप आहे. यासाठी धूम्रपानाच्या व्यसनांचे दुष्परिणाम लहानपणीच मुलांच्या मनावर बिंबवले पाहिजेत. शाळा-कॉलेजात व्यसनांचे दुष्परिणाम स्पष्ट करणारे कार्यक्रम व्हावेत यासाठी मान्यवर वक्त्यांची व्याख्याने झाली पाहिजे. त्याचप्रमाणे क्रमिक पुस्तकांमध्ये व्यसने आणि त्यांचे घातक परिणाम याविषयीचा अंतर्भाव असावा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शाळा-कॉलेजच्या जवळपास तंबाखू, गुटखा, विडी, सिगारेट विकण्यास कायद्याने बंदी करावी.

२) **सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान बंदी :** सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान बंदीच असते, परंतु त्याची कडक कार्यवाही करणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी पान खाऊन थुंकणाऱ्यावर खटले भरुन त्यांना समज बसेल अशी शिक्षा करावी.

३) **मोठ्या प्रमाणावर कर अकारावेत :** तंबाखू व तंबाखूच्या इतर उत्पादनांवर खूप मोठ्या प्रमाणावर कर लादावेत. म्हणजे ही उत्पादने विकत घेणारा थोडा तरी विचार करील आणि धूम्रपानाचे प्रमाण कमी होईल.

४) **जाहिरातीवर कडक नियंत्रणे :** तंबाखू, गुटखा, सिगारेट यांच्या जाहिरातींवर कडक नियंत्रण ठेवावे. दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे, नियतकालिके, भिंतीपत्रे यामध्ये व्यसनाच्या जाहिराती करण्यास बंदी घालावी. उलट या प्रसिद्धी माध्यमांतून धूम्रपानाच्या धोक्याची माहिती देऊन लोकजागृती करावी.

५) **धोक्याची सूचना :** सिगारेटच्या, गुटख्याच्या, तंबाखूच्या व विडीच्या पाकिटावर धोक्याची सूचना मोठ्या अक्षरात व ठळकपणे लिहिली पाहिजे. त्यासाठी एकूण पाकिटाच्या एक चतुर्थांश जागा असावी. ही सूचना संबंधीत राज्याप्रमाणे प्रादेशिक भाषेते असावी. उदा. महाराष्ट्रात मराठीत व इंग्रजीत लिहावे.

६) **प्रतिष्ठित लोकांनी प्रचार करावा :** समाजातील डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, न्यायाधीश, वकील, पोलीस, कलावंत, खेळाडू इत्यादींनी स्वतः व्यसनमुक्त राहून व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत शक्य होईल तेवढा प्रचार करावा, कारण या प्रतिष्ठित मंडळींचा प्रभाव समाजावर बऱ्यापैकी असतो.

७) **स्वयंसेवी संघटना व समाजसेवक :** व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या स्वयंसेवी संघटना आणि समाजसेवकांचा सरकारने आणि समाजाने गौरव करावा. स्वयंसेवी संघटनांना त्यांच्या खर्चासाठी सरकारने भरघोष अनुदान द्यावे.

ब) व्यक्तिगत उपाय :

मनाशी पक्का निश्चय करुन त्यादृष्टीने प्रयत्न केले तर धूम्रपानाची व्यसने नक्कीच सोडता येतात. यासाठी मनापासून प्रयत्न करावे लागतात. दुसऱ्याने सांगून अशा गोष्टी शक्य होत नाहीत. व्यक्तिगत उपाय पुढीलप्रमाणे आहेत –

१. तंबाखू सेवनाचे प्रमाण हळूहळू कमी करुन व्यसनमुक्त होता येईल. काही लोक सिगारेटची संख्या हळूहळू कमी करत असतात.

२. नेहमीच्या वापरातल्या सिगारेटमध्ये असलेल्या निकोटीनच्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाण असलेल्या सिगारेट ओढणे. त्यांचे प्रमाण हळूहळू कमी करता येते. शेवटी शून्यावर येतो.

३. अनेक लोक सततच्या ताणतणावामुळे आणि मानसिक समस्यांमुळे धूम्रपान करताना त्यांनी मनोविकारतज्ज्ञांकडून औषधोपचार व मार्गदर्शन घेतले तर व्यसन सुटू शकते.

४. व्यसने सोडण्यासाठी काही चांगल्या सवयी स्वतःला लावून घेतल्या पाहिजेत. त्याच्यातून आनंद मिळविण्यास शिकले पाहिजे. योगशास्त्र, ध्यानधारणा, चांगल्या पुस्तकांचे वाचन, समाजसेवा इ. चांगल्या गोष्टींतून समाधान मिळविले पाहिजे तरच व्यसन सोडल्याचा विरह जाणवणार नाही.

५. धूम्रपानाचे व्यसन सोडण्यासाठी कोणीही कोणत्याही 'शुभ दिवसाची' वाट पाहू नये. उद्या सोडणार असाल तर ते आतापासूनच सोडावे.

आपली प्रगती तपासा :

१) धूम्रपानाच्या उपाययोजना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

८.५ मद्यपानाची समस्या (Problems & Alcoholism) :

भारतात अगदी प्राचीन काळापासून म्हणजेच वेदकाळापासून या व्यसनाचे उल्लेख आढळतात. प्राचीन काळी दारु, सोमरस, सुरा इ. नावाने ओळखले जात असे. दारु पिणे हे जगात सर्वच देशात चालते. दारुमुळे उत्साह वाढतो, ताणतणावापासून मुक्तता मिळते आणि करमणुकही होते असे बोलले जाते. दुःख विसरण्यासाठी तर काही आनंद साजरा करण्यासाठी दारु पितात.

दारु पिणे म्हणजे मद्यपान करणे असे म्हटले जाते. दारु पिणारा प्रत्येक माणूस व्यसनी होतोच असे नाही, पण तो पुढे व्यसनी होणारच नाही हेही छातीठोकपणे सांगता येणे कठीण आहे. दारु ही एक अशी चीज आहे की, परिस्थितीत थोडासा बदल होताच माणसाला आपला कधी गुलाम करुन घेईल हे कळणारच नाही. दारु पिताना सुरुवातीला मजा वाटते, परंतु शेवटी भयंकर सजा होते.

८.५.१ व्याख्या :

१. ॲडॉल्फ मेअर : मद्यर्क व त्याचे परिणाम यांची सतत तीव्र इच्छा होणे याला मद्यपान असे म्हणतात.
२. जे. एल. गिलिन : मद्यपानाच्या शरीरावर व मनावर होणाऱ्या परिणामांमुळे मद्यपान सतत करीत राहण्याच्या तीव्र इच्छेला 'मद्यपान' असे म्हणतात.
३. 'मद्याचे गैरवापर व मद्यपान राष्ट्रीय संस्था' (NIAAA) ही संस्था मद्यपानविषयक कार्य देशपातळीवर करते. या संस्थेने मद्यविकाराची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे –

'ज्या विकारात सतत दारु पिण्याची तीव्र इच्छा होते, जोपर्यंत काही समस्या निर्माण होत नाही तोपर्यंत उदा. नोकरी गमावणे किंवा कायदेशीररित्या काही त्रास होत नाही तोपर्यंत सतत पित राहावे असे वाटते म्हणजे मद्यविकार होय'.

या व्याख्येमध्ये दारु पिण्याची प्रबळ इच्छा निर्माण होते किंवा दारु पिणे अनिवार्यच ठरते, कोणत्याही प्रसंगी पिण्याचे सोडून दिल्यास शरीरावर सुरुवातीच्या काळात काही परिणाम होतात. उदा. मळमळणे, भीतीने अंगाला घाम सुटणे, भीतीने अंग थरथर कापणे आणि पुढे काय होईल याची सारखी भीती इ. नेहमी जास्तीत जास्त दारु पिण्याचे एकदम सोडून दिल्याने सहनशीलता राहत नाही. या लक्षणांचा समावेश होतो.

थोडक्यात दारुचे व्यसन करणाऱ्या व्यक्तीला तो 'मद्यपाश' (alcoholism) या रोगाने आजारी आहे असे मानले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) त्याबाबत काही उपाय सुचविलेले आहेत.

८.५.२ मद्यपानाची कारणे (Cause of Alcoholism) :

अनेक लोक सुरुवातीला सामाजिक गटातीलच असतात, परंतु सवय लागल्याने नंतर ते अट्टल दारुडे (बेवडे) बनतात. दारुचे व्यसन लागण्याची कारणे पुढीलप्रमाणे असू शकतात.

१) **मित्रांच्या संगतीमुळे :** दारु पिण्याऱ्या मित्रांच्या संगतीमुळे आणि त्यांच्या आग्रहामुळे अनेक तरुण दारुकडे वळतात. अनेकांना उन्मादक झिंग अनुभवण्याची आणि नावीन्याचीही हौस असते. त्याचप्रमाणे पुढील कारणांमुळेही ते दारुकडे आकर्षिले होतात. स्वत:ला सर्वच बाबतीत आधुनिक मानण्यासाठी. गंमत म्हणून किंवा 'थ्रिल' म्हणूनही अनेक मुले दारु पितात. अनेक तरुण बीअरला दारु मानत नाहीत, त्यामुळे सुरुवात बीअर पिण्याने करतात. अनेक मुले फुक्कट मिळते म्हणून पितात आणि फुक्कट पिता पिता व्यसन लागते.

२) **पालकांचे अनुकरण :** असे म्हणतात की पालकांची प्रतिकृती म्हणजेच मुले. मुले आपल्या व्यसनी पालकांचे अनुकरण करतात. पालक जर रोजच दारु पिऊन येत असतील तर घरातील तरुण मुलांवर त्याचा परिणाम होतो. जवळचे नेहमी येणारे नातेवाईक व शेजारील व्यक्ती यांच्याही संगतीने मुले दारुचे व्यसन करतात.

३) **व्यावसायिक संबंध सांभाळण्यासाठी पार्ट्या :** उद्योगधंद्यात गुंतलेल्या अनेक लोकांना पार्ट्या द्याव्या लागतात. पार्ट्यामध्ये सर्वांसोबत दारु प्यावीच लागते. पार्ट्यामध्ये दारु पिणे हे श्रीमंतीचे आणि प्रतिष्ठेचे समजले जाते. अनेकदा लायन्स क्लब, रोटरी क्लब, बोट क्लब इ. ठिकाणी चालणाऱ्या पार्ट्यांमध्ये तर लोक स्वतः दारु पितातच; इतकेच नव्हे तर बायकोलाही पिण्यास प्रवृत्त करतात. यातूनच काही स्त्रिया व्यसनी बनू शकतात.

४) **ताणतणाव कमी करण्यासाठी :** प्रत्येकाला जीवनामध्ये विविध समस्या या असतातच, त्यामुळे ताणतणावही निर्माण होतो. पुढील कारणांमुळे ताणतणाव येऊ शकतो. प्रेमभंग झाल्याने आलेले नैराश्य, घटस्फोट झाल्याने, नोकरी सुटल्याने आलेली बेकारी, महत्त्वाची परीक्षा नापास झाल्याने, इतरांकडून अपमान झाला असेल तर इ. कारणांमुळे निर्माण होणारा ताणतणाव विसरण्यासाठी दारु पिण्यास सुरुवात केली जाते.

५) **न्यूनगंड असलेल्या व्यक्ती :** काही व्यक्तींच्यात खूपच न्यूनगंड असतात. लहान लहान संकटांनाही तोंड देण्याची क्षमता त्यांच्यात नसते. म्हणजेच आत्मविश्वासाचा अभाव असतो. काहींना लैंगिक समस्या असतात. दारु पिल्याने लैंगिक समस्या सुटतील असे त्यांना वाटते. अनेकदा मनामध्ये नकारात्मक व निराशावादीच विचार येतात. सततची अनिवार्य चिंता आणि भयगंड असलेली काही माणसे दारु पिऊन धीट बनण्याचा खोटा प्रयत्न करतात.

६) **श्रमपरिहार :** काही आदिवासी मंडळी किंवा शारीरिक श्रम करणारी कामगार मंडळी दिवसभर थकून भागून घरी येतात. घरी येतानाच मिळालेल्या पैशातून दारु पिऊन येतात. पोटाला खायला कमी मिळाले तरी सर्व पैशांची दारु पितात. अलिकडे विविध कार्यालयामध्ये काम करणारे कामगारही जास्त काम पडले किंवा काही कार्यक्रम करुन घरी आले की श्रमपरिहार म्हणून दारु पितात.

७) **झोप न येणे :** काही मानसिक ताणामुळे माणसाला झोप येत नाही. त्या मानसिक ताणावर इलाज करण्याऐवजी कोणातरी व्यक्तीच्या किंवा अर्धवट डॉक्टरांच्या सांगण्यावरुन ते झोपेपूर्वी दारु पिऊ लागतात. सुरुवातीला हा उपाय लागू पडतो. नंतर दारुचे व्यसन लागते आणि मग दारु पिल्याखेरीज झोपच येत नाही. अशा रीतीने शेवटी तो व्यसनी बनतो.

८) **कलावंत आणि दारु :** कित्येक कलावंतांना दारुचे व्यसन लागते. कारण सुरुवातीच्या कालावधीमध्ये स्टेजची भिती जाण्यासाठी आणि आत्मविश्वासासाठी बहुतेक कलावंत दारुचा आधार घेतात. पुढे त्याचे व्यसन होते. अनेक कलाकार, लेखक, खेळाडू दारुमुळे बरबाद झाल्याची उदाहरणे आपल्या डोळ्यांसमोर आहेत.

९) **घरगुती समस्या :** घरगुती समस्यांमुळेही अनेकांना दारुचे व्यसन लागते. यामध्ये पुढील समस्यांचा समावेश होतो. घरी आईवडिलांची रोजची भांडणे, कायम निरुत्साही असणारे पालक, वडील दारु पिऊन आईला रोज मारतात, घरातील आर्थिक समस्या, मासिक उत्पन्नात घट इत्यादी.

१०) **अनपेक्षित यश :** व्यवसाय, धंदा किंवा नोकरीमध्ये एखाद्या व्यक्तीला अचानक यश मिळाल्यास आनंद साजरा करण्यासाठी काही व्यक्ती मद्यपान करतात.

११) **वाढते शहरीकरण :** आधुनिक समाजामध्ये वाढते औद्योगिकरण आणि शहरीकरण यामुळे व्यक्तीला अत्यंत धकाधकीचे जीवन जगावे लागते. यामुळे माणूस अत्यंत भौतिकवादी मनोवृत्तीचा होतो. शहरातील तळाचा वर्ग आपले दु:ख विसरण्यासाठी दारु पितो.

१२) **आनुवंशिक व्यसन :** काही वेळा दारु पिण्याचे व्यसन हे आनुवंशिक असते. तीन-चार पिढ्यांमध्ये हे व्यसन असल्याचे अनेकदा आढळून आलेले आहे. दारुड्या व्यक्तीच्या घरातील वातावरण मद्यापानाला पोषक असते. आपल्या वडीलांपासून, मोठ्या भावापासून किंवा घरातील इतर लोकांकडून हे व्यसन लहान मुले उचलतात.

आपली प्रगती तपासा :

१) मद्यपानाची कारणे स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

८.५.३ मद्यपानाचे परिणाम (Effects on Alcohol) :

दारुचे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत –

अ) शारीरिक परिणाम
ब) मानसिक परिणाम
क) सामाजिक परिणाम
ड) आर्थिक परिणाम

अ) शारीरिक परिणाम (Physiological Effects) :

सततच्या दारु पिण्यामुळे विविध शारीरिक आजार उद्‌भवतात. अशा आजारांची यादी पुढीलप्रमाणे देता येईल.

१) यकृत (Liver): दारुच्या सर्वात वाईट परिणाम यकृतावर होतो. यकृताला सूज येते. यकृताचा आकार मोठा होतो, यकृतदाह होतो, यकृतातील आवश्यक पेशी मरतात, त्यामुळे 'सिऱ्होसिस' हा आजार होतो.

२) **जठर :** नियमित दारु पिण्याने जठरावर व अन्ननलिकेवर अनेक दुष्परिणाम होतात. ॲसिडीटी वाढू लागते, पोट दुखू लागते, छातीत आणि पोटात मळमळते. भूक लागत नाही.

३) **रक्तघटक :** रक्तातील पांढऱ्या पेशींचे काम मंदावते. त्याचप्रमाणे रक्तातील कोलॅस्टेरॉलचे प्रमाणही वाढते. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. अशावेळी अनेक आजार उद्‌भवतात.

४) **ह्रदय :** दारुमुळे कॅरोनरी रोहिणी अरुंद होऊ लागतात आणि ह्रदयाला पुरेपूर रक्तपुरवठा होत नाही. त्यामुळे ह्रदयविकार (Heart Attack) येण्याची शक्यता जास्त असते.

५) **मेंदू व मज्जासंस्था :** सुरुवातीच्या थोड्या पिण्याने थोडेसे उत्तेजित वाटते. परंतु नंतर जास्त पिण्याने मेंदूला बधिरता, मुग्धभ्रांती आणि शेवटी विस्मरण निर्माण होते, त्यामुळे मेंदूची कार्ये मंदावतात.

६) **डोळे :** जास्त दारु पिण्याने डोळ्यांच्या नसांवर वाईट परिणाम होतो. क्कचित प्रसंगी अंधत्वही येऊ शकते.

७) **लैंगिक क्षमता :** दारुमुळे लैंगिक इच्छा वाढते; परंतु प्रत्यक्षात लैंगिक क्षमता कमी होते. प्रसंगी नंपुसकत्वही निर्माण होण्याची शक्यता वाढते.

८) **अर्भकावर परिणाम :** गर्भवती स्त्रीया जर नियमित दारु पित असतील तर पोटात वाढणाऱ्या अर्भकावरही त्याचा वाईट परिणाम होतो.

ब) मानसिक परिणाम (Physiological Effects):

दारुड्या व्यक्तींना विविध मानसिक दुष्परिणामांना तोंड द्यावे लागते. काही महत्त्वाचे दुष्परिणाम पुढीलप्रमाणे आहेत. कामातील कार्यक्षमता कमी होते, 'कंपवात' नावाची मनोविकृती होते, व्यवस्थित विचार करु शकत नाही व निर्णयही घेऊ शकत नाही, मनाचा स्वतःवरील ताबा सुटतो, व्यवस्थित चालता येत नाही, झोके घेत चालावे लागते, अर्थहीन काहीही बरळणे, स्मरणशक्ती गमावणे, मन पूर्ण दुबळे होऊन महत्त्वाकांक्षा लोप पावते, चिडखोरपणा व अतिसंशयाची वृत्ती वाढते.

क) सामाजिक परिणाम (Social Effects) :

दारुमुळे कुटुंब पूर्ण उद्‌ध्वस्त होते. कुटुंबातील इतर सभासदांवर त्याचे परिणाम होतात. यामध्ये प्रामुख्याने त्याचा बायकोवर व कुटुंबावर पुढील परिणाम दिसून येतात.

समाजातून संबंधीत घराला वेगळे ठेवले जाते, लैंगिक क्षमता नाहीसी होते, मोठ्या प्रमाणावर मानसिक तणाव येतो, घरच विस्कळीत होते, अनेकदा घटस्फोटाची परिस्थिती निर्माण होते, आत्महत्येचे प्रकार घडतात. खुनी प्रवृत्ती वाढते. घुन्हेगारीत वाढ होते.

इत्यादी सर्व दुष्परिणामांमुळे समाजातील संबंधीत कुटुंबाची पत पूर्ण नाहीशी होते आणि जर घरातील मुले शाळेत जात असतील तर मुलांच्या शिक्षणावर त्याचा विपरीत परिणाम होतो. अनेकदा मुलांना शाळा सोडून द्यावी लागते. मित्रांचे व समाजातील लोकांचे नको-नको ते ऐकून घ्यावे लागते.

ड) आर्थिक परिणाम (Economic Effects) :

दारुच्या व्यसनामुळे संबंधी दारुड्या व्यक्तीची वैयक्तिक आर्थिक स्थिती अतिशय हलाखीची होते. सततच्या दारु पिण्यामुळे नोकरीही सोडावी लागते. कारण सतत नशेत असल्याने कामावर लक्ष नसते. गैरहजेरीचे प्रमाण वाढते व कार्यक्षमताही कमी होते. यामुळे संपूर्ण कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होते.

आपली प्रगती तपासा :

१) मद्यपानाचे परिणाम विशद करा.

_____

_____

_____

_____

_____

८.५.४ मद्यापानाचा उपचार पद्धती (Treatment for Alcoholism) :

दारुच्या व्यसनातून बाहेर पडण्यासाठी काही उपचार किंवा इलाज केल्यास फायदेशीर ठरु शकते. दारुड्या व्यक्तीवर पुढीलप्रमाणे उपचार करणे आवश्यक ठरेल –

अ) शारीरिक उपचार
ब) मानसिक उपचार
क) सामाजिक उपचार

अ) शारीरिक उपचार :

दारुच्या व्यसनामुळे त्या व्यक्तीला अनेक आजार झालेले असतात. आजाराप्रमाणे औषधोपचार करण्यासाठी प्रथम त्याची शारीरिक तपासणी करावी. शारीरिक स्थिती अतिशय गंभीर असेल तर शिरेतून प्रवाही ग्लुकोज, सलाईन व व्हिटॅमिन्स देणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे मानसिक तणाव कमी करण्यासाठी व विश्रांती मिळावी म्हणून त्यास मेंदू शांत करणारी औषध दिली पाहिजेत.

दारुड्या व्यक्तीच्या मनात दारुविषयी दु:सास निर्माण करणारे 'डायसल्फीरम' किंवा अँटाब्यूस (Disulphiramor Antapuse) हे औषधे दिले पाहिजे. अटाब्यूसचा त्रास होणाऱ्या व्यक्तीसाठी 'डिपसॅन' नावाचे औषध वापरतात. दारुविषयी तीव्र तिटकारा निर्माण व्हावा म्हणून

अनेकदा वांती करण्यास भाग पाडणारे 'ॲपोमॉफीन' (Apomorphine) हे औषध वापरले जाते.

वरील औषधानंतर चार-सहा महिने दारु पिणे पूर्ण बंद केले तर नंतर दारुच्या वासही सहन होत नाही. वरील सर्व औषधोपचार डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यावीत. दारु लगेच सोडल्यानंतर जी विरह लक्षणे निर्माण होतात. त्यावर मात करण्यासाठी त्याला धीर दिला पाहिजे आणि त्याचप्रमाणे औषधोपचारही केले पाहिजेत.

ब) मानसिक उपचार :

दारुच्या व्यसनामध्ये अडकलेल्या लोकांचा आत्मविश्वास नाहीसा झालेला असतो. परंतु वरवर दाखविताना आपल्याकडे खूप आत्मविश्वास आहे. आपण उद्याही दारु सोडू शकतो अशी बढाई ते मारतात. परंतु त्यांचा उद्या कधी उगवतच नाही. ज्यांना दारुचे व्यसन जडले आहे त्यांचा आत्मविश्वास नष्ट झाला आहे, त्यामुळे अशा व्यक्तींनी मनोविकारतज्ज्ञ डॉक्टरांकडून मनसोपचार करुन घेतल्यास खूपच फायदा होतो. त्यामुळे दारुड्या व्यक्तीला त्याच्या समस्या मोकळेपणाने मांडता येतील. त्यांनी सांगितलेल्या समस्यावरुन मनोविकारतज्ज्ञ संबंधीत व्यक्तीचे भावनिक स्वरुप जाणून घेऊन समस्येतून बाहेर पडतात, मार्गदर्शन करतो. त्यामुळे संबंधीत व्यक्तीला आपल्या चुका कळू लागतात.

मानसोपचार हे काम एका दिवसाचे नसते. तर ते बरेच दिवस चालणारे असते. यासाठी संबंधीत व्यक्ती व घरातील इतर सभासदाचें पूर्ण सहकार्य अपेक्षित किंवा विश्वास असला पाहिजे. मानसोपचारतज्ज्ञांच्या जोडीला मद्यपी रुग्ण व्यक्तीने अनुभवी संमोहनतज्ज्ञांकडून संमोहन उपचार करुन घेतले तर त्याचा खूप फायदा होतो.

क) सामाजिक उपचार :

व्यसनी लोकांना व्यसनमुक्त करण्यासाठी समाजानेही प्रयत्न करावयास पाहिजेत, तरच त्यांचे मन परिवर्तन होईल. दारुचे व्यसन सोडण्यास भाग पाडणाऱ्या आणि त्यांचे पुनवर्सन घडविणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था आहेत. त्या सर्वांमध्ये 'अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस' ही संस्था उत्तमप्रकारे काम करत आहे. या संस्थेचा थोडक्यात उल्लेख ए. ए. (A-A) असा केला जातो. १९३५ साली डॉ. बाब आणि स्टॉक ब्रोकर बिल डब्लू यांनी अमेरिकेत या संस्थेची स्थापना केली. ही संस्था जागतिक पातळीवर काम करते. ११४ पेक्षा जास्त देशांत त्यांच्या शाखा आहेत. ७३,००० पेक्षा जास्त मद्यपींना गटांना त्यांनी दारुमुक्त केले आहे. मद्यपीला नवजीवन देणारी ही एक निःस्वार्थी वृत्तीने काम करणारी संस्था आहे.

एकमेकांना नैतीक आधार देऊन त्यांचे मनोबल टिकवणे, त्यांची समुहभावना जागृत करुन त्यांना नवी दिशा देणे, धीर देणे प्रसंगी एकमेकांना मदत करणे इ. महत्त्वाची कामे ही संस्था करते. संस्थेत प्रवेशाची एकच अट असते, ती म्हणजे दारु सोडण्याची त्याची आत्यंतिक इच्छा असली पाहिजे. ही संस्था उपचार, मार्गदर्शन व औषधोपचार या सर्वांचा योग्य मेळ घालून कोणत्याही प्रकारची फी न घेता पूर्णपणे निःस्वार्थी सेवा पुरविते.

८.५.५ उपाययोजना (Remedies) :

दारुचे व्यसन सोडण्यासाठी मनाची तयारी पाहिजे तसेच दारु सोडायची हे निश्चित झाले तरच त्यावर उपाय होऊ शकतो. दारुच्या व्यसनातून मुक्त करण्यासाठी जास्त प्रमाणात नियमित पिणाऱ्याला सुरुवातीला आठवड्यातून एकदा, नंतर महिन्यातून एकदा असे कमी करत जाणे, दारुवर अवलंबून असणाऱ्या सवयी कमी करणे. उदा. दारु पिल्यासच झोप येते इ. दारुपासून दूर राहणे, दारु पिणाऱ्यांची संगत सोडणे आणि दारु कोठेच मिळणार नाही अशी व्यवस्था करणे. दारु व्यसन व दुष्परिणाम याविषयी शैक्षणिक अभ्यासक्रम सुरु करणे, दारुच्या विक्रीवर जास्तीत जास्त कर आकारणे, दारुच्या जाहिरातींवर नियंत्रण लावणे, राज्य सरकारच्या धोरणामध्ये त्याविषयी तरतूद करणे इत्यादी उपाययोजन फायदेशीर ठरु शकतात.

आपली प्रगती तपासा :

१) मद्यपानाच्या उपचारपद्धती विशद करा.

_____

_____

_____

_____

८.६. मादक द्रव्यांची (अंमली पदार्थ) सेवनाची समस्या (Problems of Drug Addiction)

मादक द्रव्य म्हणजेच अमली पदार्थ होय. १९६० पासून तर या समस्येने उग्र स्वरुप धारण केले आहे. भारतातील तरुणवर्ग अंमली पदार्थांच्या व्यसनाने मोठ्या प्रमाणावर झाला आहे. झोपडपट्टीत अमली पदार्थांचे सेवन खूप केले जाते. त्याचप्रमाणे श्रीमंतवर्ग व मध्यमवर्गातील लोकांना या व्यसनाची लागण झाली आहे.

अंमली पदार्थ म्हणजे रसायन होय. या रसायनाच्या व्यसनी व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक क्षमतेवर परिणाम होतो, नशा येते, त्यामुळे स्वैराचार व हिंसाचार यासारख्या प्रवृत्तींना चालना मिळते. अंमली पदार्थांचे व्यसन याची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल –

१) नैसर्गिक अथवा कृत्रिम अंमली पदार्थांच्या सततच्या अतिरिक्त सेवनाने व्यक्तीला येणारी तात्पुरती अथवा सततची नशा म्हणजे अंमली पदार्थांचे व्यसन होय.

२) ज्या पदार्थांच्या किंवा द्रव्याच्या सेवनाने तात्पुरते उत्तेजन मिळते आणि ज्यांच्या सेवनाने व्यसन जडलेल्या व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेचा ऱ्हास होतो त्या द्रव्य किंवा पदार्थांना मादक किंवा अंमली द्रव्ये असे म्हणतात.

मादक द्रव्यांचे सेवन याचा अर्थ व व्याख्येवरुन पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील –

मादक द्रव्यांची सवय लागल्यानंतर कायम नशेत राहावे असे वाटू लागते.
मादक द्रव्य हे नैसर्गिक किंवा त्यावर रासायनिक प्रक्रिया करुन तयार केले जातात.
अंमली पदार्थाच्या नशेमुळे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक तोल ढासळतो.
मादक द्रव्यांच्या नशेची सवय झाल्यानंतर सहजगत्या ती सुटत नाही.
मादक द्रव्यांच्या नशेत व्यक्ती विविध प्रकारची दुष्कृत्य करण्यास तयार होतो.

८.६.१ मादक द्रव्यांचे प्रकार (Types of Drugs) :

मादक द्रव्यांच्या किंवा अंमली पदार्थांच्या सेवनाच्या परिणामावरुन त्यांचे पुढील प्रकार केले जातात –

१) गर्द (Brown Sugar) :

हेरॉईनचे अशुद्ध स्वरुप म्हणजे गर्द होय. हेरॉईन घेणे परवडत नाही म्हणून त्यामध्ये भेसळ करुन गर्द बनविले जाते. गर्द म्हणजे ब्राऊन शुगर. फॅशनेबल व श्रीमंत मुले याला स्मॅक म्हणतात. त्याचप्रमाणे शाम व भुरी साखर या नावानेही हे ओळखले जाते. गर्दमध्ये अनेक अंमली आणि विषारी द्रव्ये असतात. हे मिश्रण दळलेल्या साखरे सारखे दिसते म्हणून यास ब्राऊन शुगर असेही म्हणतात.

गर्दचे सेवन दोन प्रकारे केले जाते. एक चेसिंग पद्धतीने म्हणजे धूर करुन ओढणे आणि दुसरे सिगरेटच्या तंबाखूत गर्द मिसळून ओढणे. गर्दचे व्यसन लागले की ते सुटता सुटत नाही. गर्दमुळे डोळ्यांचे विविध आजार होतात, माणूस नंपूसक बनतो. इ.

२) हेरॉईन (Heroin) :

अतिशय महाभयानक असे हे हेरॉईन मार्फिनवर रासायनिक प्रक्रिया करुन तयार केले जाते. इतर अंमली पदार्थापेक्षा हेरॉईन हे अतिशय विषारी व घातक आहे. हेरॉईन हे इंजेक्शनद्वारा टोचून किंवा तपकिरीसारखे नाकात ओढले जाते. हेरॉईनच्या शरीरावर त्वरित परिणाम होतो. सुरुवातीची त्याची अवस्था जरी सुखाची असली तरी नंतर काही वेळाने आपण मरुन पडले आहोत, शरीरभर किडे वळवळत आहेत अशा प्रकारचे भ्रम होऊ लागतात. शारीरिकदृष्ट्या दुबळे असणाऱ्या व्यक्तींना ही हेरॉईन लवकर संपवून टाकते.

३) कोकेन (Cocaine) :

अतिशय महाग व अमेरिकेसारख्या श्रीमंत राष्ट्रात लोकप्रिय असे हे कोकेन कोको नावाच्या झाडाच्या सुकलेल्या पानांपासून तयार केले जाते. कोकेन हे उत्तेजीत करणारे प्रभावी असे आहे. सतत कोकेनच्या सेवनामुळे भूक मंदावते, तब्येत खराब होते, झोप येत नाही, नशेत वावरणे, लैंगिक ताकद कमी होऊन नंपुसकता येते, नैराश्याची भावना निर्माण होते, रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. सतत कोकेनची नशा करणाऱ्या व्यक्ती काही वर्षातच मृत्युमुखी पडतात.

४) मारिजुआना (Morijuana) :

मारिजुआना हे गांज्याप्रमाणे आहे. यामध्ये भांग, गांजा, मारिजुआना तंबाखू आणि हाशीर इ. समावेश होतो. मारिजुआना सिगारेटप्रमाणे ओढतात. हे अत्यंत हानिकारक असते. प्रथम थोडा वेळ बरे वाटते, पण नंतर शरीरावर त्याचे अनेक दुष्परिणाम होतात.

५) झोपेचे औषध (Brown Sugar) :

विविध प्रकारची मद्ये व गोळ्या यांचा समावेश होतो. याना Red Downers असेही म्हणतात. हे पदार्थ प्रत्यक्ष किंवा इंजेक्शनद्वारे घेतले जाते व पोठात गेल्यावर विमनस्कता, झोप, विस्मरण, असंबंद्ध बडबड, थकवा इत्यादी परिस्थिती निर्माण होते. सतत ही नशा केल्यास त्याचे व्यसन जडते आणि व्यक्ती शेवटच्या अवस्थेत व्यसनी बनतो. अनेक मोठ्या प्रमाणावर सेवन केल्यास मृत्युही ओढवतो.

६) शांतके (Tranquilizers) :

शांतके तोंडाने गोळीसारखी घेतली जातात. मानसिक ताणतणाव कमी करुन मनाला शांतच करण्यासाठी किंवा निद्रानाशाचा रोग जडलेल्या व्यक्तींना डॉक्टर अशा प्रकारची औषधे देतात. वैद्यकीय सल्ल्याने ही औषधे प्रमाणात घेतल्यास त्याचा काही विपरीत परिणाम होत नाही; परंतु औषधांनी बरे वाटते म्हणून काही लोक ती बंद न करता घेतच राहतात, त्यामुळे त्यांची सवय होऊन ती अधिक प्रमाणात घेतली जातात आणि मग त्याचे व्यसन लागते.

७) भ्रामक (Hallucinogans) :

भ्रामकामध्ये एल.एस.डी. (LSD) आणि मेस्कॅलिन हे पदार्थ मोठ्या प्रमाणावर भ्रम निर्माण करतात, कारण त्यामध्ये 'ॲसिड' व 'सनशाईन' असे घातक घटक असतात. यामध्ये सर्वात शक्तीशाली म्हणून एल.एस.डी (Lysergic Acid Diethylamide) कार्य करते. एल.एस.डी. गोळ्या, पावडर किंवा पातळ स्वरुपातही उपलब्ध असते. कणभर एल.एस.डी. जीभेवर ठेवली तरी व्यक्तीची मन:स्थिती पूर्ण बदलून जाते. डोळ्यांसमोर अंधारी येणे, विविध रंग दिसू लागतात. तसेच चमत्कारिक अनुभवाने व्यक्ती फार गोंधळून जातात. अनेकदा अशा व्यक्तीच्या तोल सुटतो किंवा वेड्याच्या भरात आत्महत्या केल्याचीही अनेक उदाहरणे आहेत.

८) मादक पदार्थ (Narcotics) :

मादक पदार्थाचा संच असतो. या संचामध्ये हेरॉईन, मार्फिन, मेथेड्रीन इत्यादीचा समावेश होतो. या पदार्थांच्या सेवनामुळे थकवा, झोप, गुंगी येते व संवेदन बधीर होतात. हे पदार्थ गोळ्यांच्या स्वरुपात, इंजेक्शनच्या स्वरुपात किंवा धूम्रपान करुन घेता येतात. परंतु शरीरावर याचे फार घातक परिणाम होतात.

आपली प्रगती तपासा :

१) मादक द्रव्यांचे प्रकार सांगा.

_____

_____

_____

_____

८.६.१ मादक द्रव्यांची व्यसनाची कारणे (Causes Drug Addition) :

मादक द्रव्यांचे चांगलेही उपयोग आहेत आणि दुष्परिणामही आहेत. यामुळे अनेकजण असा विचार करतात की, अंमली पदार्थांच्या सेवनाने आनंद तरी मिळेल किंवा दु:ख तरी कमी होईल. इतरही अनेक कारणे अंमली पदार्थांचे सेवन करण्यास उद्युत करतात. ती पुढीलप्रमाणे आहेत –

१) थ्रिल म्हणून :

काही मुले स्वत:ला खूपच आधुनिक समजतात आणि काही तरी मर्दुमकी दाखविणे म्हणजे व्यसन करणे हा समज करुन घेतात. त्यांना सिगारेट, गुटखा ही व्यसने सुरुवातीपासून असतात. यामध्ये आणखी मजा यावी म्हणून 'हम भी कुछ कम नही' हे दाखविण्याचा त्याचा उद्देश असतो.

२) सहज उपलब्धता :

मादक द्रव्ये उपलब्धच नसतील तर आता व्यसनाधीन असणाऱ्यांपैकी ५०% लोकाना हे व्यसनच लागले नसते. परंतु अंमली पदार्थांच्या बाबतीत परिस्थिती नेमकी उलट आहे. अंमली पदार्थ सहज उपलब्ध होतात. यापैकी अनेक पदार्थ तर ग्रामीण भागांतही सहज उपलब्ध होतात. उदा. गांजा, चरस इ.

३) उत्सुकता :

तरुण मुलांना मादक द्रव्यांची फार उत्सुकता असते. त्यांना त्याचे दुष्परिणाम माहीत नसतात. जगाचा त्यांनी नीट अनुभव घेतलेला नसतो. विशेष म्हणजे काही तरी नवीन करावे अशी सारखी त्यांची धडपड चालू असते. या कुतूहलापोटी किंवा उत्सुकतेपोटी अनेक तरुण पिढी व्यसनाधीन झालेली दिसून येते.

४) परकेपणा / एकटेपणा :

काही लोक त्याच्या घरापासून, समाजापासून, जवळच्या लोकांच्यापासून स्वत:ला दूर ठेवतात. त्यामुळे अशा लोकांना सतत पोरकेपणा जाणवतो किंवा आपण एकटेच आहोत ही भावना त्यांच्या मनात निर्माण होते. परकेपणावर व एकटेपणावर मात करण्यासाठी अशा प्रकारचे लोक अंमली पदार्थांच्या आहारी जातात.

५) वाईट संगत :

तरुण वयात मुलांवर त्यांच्या मित्रपरिवाराचा मोठा प्रभाव असतो. व्यसनी मुलांची संगत लागल्यास सुरुवात सिगारेटनी होते. संगतीचा शेवट व्यसनाने होतो. अनेक मुले बोलण्यात पटाईत असतात. ते मधाळ बोलण्याने वाईट सवयींचेही समर्थन करतात. त्यांच्या या मधाळ बोलण्याला इतर सर्वसामान्य मुले फसतात आणि या जीवघेण्या व्यसनात अडकतात.

६) निराशावादी व्यक्तीमत्व :

काही मुलांचे व्यक्तीमत्व निराशावादी असते. मन सतत नकारात्मक विचारच करीत बसते. अशी मुले अंमली पदार्थांच्या व्यसनांच्या अधीन लवकर होतात. त्यांच्या मनात नेहमी नैराश्य असते. नैराश्यावर उपाय म्हणून मित्र परिवाराकडून त्यांना अंमली पदार्थ घेण्याचा सल्ला मिळतो.

७) वडीलधाऱ्यांचा प्रभाव :

घरातील मोठी, कर्ती माणसे आणि त्यांचे कतृत्व आणि वर्तणूक याकडे घरातील लहान मुलाचे बारकाईने लक्ष असते. वडीलधाऱ्यांचीच वर्तणूक चांगली नसेल तर आपोआपच घरातील तरुण मुलेही त्याच मार्गाला लागतात. लहान वयात पालकांच्या आचारविचारांचा प्रभाव पडत असतो. अनेक घरांमध्ये आधुनिकतेचे वारे वाहत असतात आणि एखाद्या घरात वडील दारु पिऊन किंवा अंमली पदार्थांची नशा करुन आईला, मुलांना शिव्या देतात. अशा प्रकारच्या घरातील वातावरणाला मुले कंटाळतात आणि नकळत अंमली पदार्थांच्या विळखा त्यांच्या गळ्यात पडतो.

८) शारीरिक गरज :

मादक द्रव्यांचे व्यसन नुकतेच सोडले असेल तर त्यांना असह्य होणारी विरह लक्षणे (Withdrawal Symptons) फारच त्रासदायक ठरतात. ती मरणप्राय वेदना सहन करणे व्यसनी लोकांना जमत नाही. म्हणून ते परत व्यसनाच्या मागे लागतात. म्हणजे मग त्यांच्या दृष्टीने ती शारीरिक गरज बनते.

९) मानसशास्त्रीय गरज :

शारीरिक गरजेप्रमाणे मानसिक गरजही निर्माण होते. व्यसन सोडलेला माणूस मानसशास्त्रीयदृष्ट्या पूर्ण खंगून जातो, त्यामुळे अंमली पदार्थ घेतले नाही तर आपल्याला फार त्रास होईल किंवा आपला मृत्युही होऊ शकेल अशी त्यांची मानसिकता बनलेली असते, म्हणून मग ते परत व्यसनाधीन होतात.

१०) मूलभूत मानवी गरजांपासून सुटका :

झोपडपट्टी भागामध्ये छोट्याशा जागेमध्ये दोन किंवा अधिक कुटुंबे राहतात. भूक आणि लैंगिक गरज या मूलभूत मानवी गरजा ते भागवू शकत नाहीत. मादक द्रव्यांच्या सेवनामुळे या गरजांपासून काही काळ सुटका होते. मादक द्रव्यांच्या सेवनामुळे भूक पुढे ढकलली जाते.

११) पाश्चात्यांचे अनुकरण :

श्रीमंत कुटुंबातील मुलांकडून पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण केले जाते. त्याचा परिणाम गरीब कुटुंबातील मुलांवर होतो. गरीब कुटुंबातील मुले श्रीमंत मुलांसारख्या चैनीच्या वस्तू वापरु शकत नाहीत. पण त्यांच्यातील मादक द्रव्यांचे सेवन गरीब मुलांना परवडणारे असते, त्यामुळे ही मुले मादक द्रव्यांच्या आहारी जातात.

आपली प्रगती तपासा :

१) मादक द्रव्यांचे व्यसन लागण्याची कारणे स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

८.६.२ मादक द्रव्यांच्या सेवनाची लक्षणे (Symsptoms of Drug Addition) :

अंमली पदार्थांच्या किंवा मादक द्रव्यांच्या अतिरिक्त सेवनाने शरीरावर पुढील लक्षणे दिसू लागतात.

१. भोजनाची तीव्र इच्छा होणे अथवा अजिबात इच्छा न होणे.
२. कंटाळा येणे.
३. सतत शारीरिक तक्रारी निर्माण होतात.
४. हातावर, पायांवर सुया टोचल्याचा भास होतो.
५. तीव्र वेदनेमुळे जिवाला विश्राती मिळत नाही.
६. व्यक्तिमत्त्वात बदल होतो.
७. अचानक मूड बदलतो.
८. चिडचिड निर्माण होते, चिडकेपणा येतो.
९. कायम उदासीन वाटते, दु:खी अवस्था.
१०. कोणत्याही गोष्टीत आवड निर्माण होत नाही.
११. मित्रपरिवार पूर्ण बदलतो.
१२. शैक्षणिक प्रगतीवर किंवा कामात कार्यक्षमतेवर परिणाम होतो.
१३. कोणालाही समजणार नाही अशी वर्तणूक.
१४. विनाकारण खूप मोठ्या प्रमाणावर पैशाची गरज.
१५. अनेकदा घरातून हाकलून दिले जाते.
१६. कायदेशीर समस्या निर्माण होतात.
१७. अगोदर अंगी असणारा टापटीपपणा पूर्ण नाहीसा होतो.
१८. किळसवाणे व घाणेरडे वागणे.
१९. मनावर ताबा राहत नाही.
२०. सहन न करता येणाऱ्या वेदना होतात. इ.

आपली प्रगती तपासा :

१) मादक द्रव्यांची लक्षणे सांगा.

_____

_____

_____

_____

८.६.३ मादक द्रव्यांच्या सेवनांचे परिणाम (Effects of Drug Addiction) :

अंमली पदार्थांच्या अतिरिक्त सेवनाचे संबंधीत व्यक्तीच्या शरीरावर, कुटुंबावर व समाजावर पुढील परिणाम दिसून येतात.

अ) वैयक्तिक परिणाम (Effects on Individual) :

मादक द्रव्यांचे व्यसन लागले की ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या पूर्णपणे अंमली पदार्थांवर अवलंबून राहते आणि या पदार्थांचे सेवन सोडल्यास विथड्रॉल सिम्टम्स दिसू लागतात. उदा. उलट्या होणे, अंग दुखणे, शरीर थरथर कापणे इ. सततच्या मोठ्या प्रमाणावर घेत असलेल्या अंमली पदार्थांमुळे शरीराची मोठ्या प्रमाणावर हानी होते. अंमली पदार्थांपैकी काही इंजेक्शनद्वारे शरीरात सोडली जातात. त्यामुळे एड्सची लागण होण्याची किंवा इतर लैंगिक आजार होण्याची किंवा शरीरात हेपटॅटशचीही लागण होऊ शकते. अनेकदा अंमली पदार्थांच्या सेवनाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मृत्यू येतो.

ब) कुटुंबावर होणारे परिणाम (On the Family) :

मादक द्रव्यांच्या सेवनाने कुटुंबावर अनेक विपरीत परिणाम होतात. आर्थिकदृष्ट्या हे कुटुंब पूर्ण उद्ध्वस्त होते. समाजातील त्या कुटुंबाचे स्थान कमी होते. कुटुंबातील प्रत्येकावर त्याचा परिणाम होतो. व्यसनी कोण आहे त्यावर हे परिणाम अवलंबून असते. मुले व्यसनी असतील तर अंमली पदार्थ घेण्यासाठी घरातून पैसे मिळाले नाहीतर तर घरातील वस्तू विकून पैसे मिळवतात. अनेक मुले घरांतून पैसे चोरतात किंवा आईचे दागिने चोरुन विकतात, चोऱ्याही करतात. ही मुले अगदीच बेफाम बनतात. पैशासाठी आई-बापाला मारु लागतात.

क) समाजावर होणारे परिणाम (On the Society) :

मादक द्रव्यांचे व्यसन असणाऱ्या व्यक्तीमुळे समाजावरही वाईट परिणाम होतात. उदा. व्यसनी व्यक्ती ज्या ठिकाणी काम करते त्या ठिकाणी त्याची कार्यक्षमता कमी होते, वेळेचा अपव्यय होणे, त्याच्या हातून कधी अपघात होतील हे नेमके सांगता येत नाही, त्याचे काम करणे त्या संबंधीत ठिकाणी धोकादायक ठरु शकते. उत्पादनाच्या ठिकाणी काम करीत असेल तर त्यास कामावर ठेवणेच योग्य होणार नाही. व्यसनी लोकाना शारीरिक तक्रारी अनेक होत असल्याने दवाखान्याचा त्यांचा खर्च मोठा असतो, त्यामुळे एवढे पैसे गोळा करण्यासाठी त्या व्यक्ती प्रसंगी गुन्हेगारी प्रवृत्तीही स्वीकारतात.

आपली प्रगती तपासा :

१) मादक द्रव्यांचे परिणाम विशद करा.

_____

_____

_____

_____

८.६.४ मादक द्रव्यांच्या उपाययोजना :

व्यसनाला फैलाव दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर होत आहे. यावर वेळीच प्रतिबंधक उपाय योजले नाहीत तर ही समस्या आवाक्याबाहेर जाऊ शकेल. यासाठी या समस्येवर पुढीलप्रमाणे उपाययोजना करता येतील –

१) जनजागृती आणि शिक्षण :

मादक द्रव्यांच्या अतिसेवनाचे दुष्परिणाम हे अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास सर्वात मोठी उपाययोजना होईल. अंमली पदार्थांच्या सेवनाच्या दुष्परिणामाविषयी जनजागृती मोठ्या प्रमाणावर होईल. सुनियोजित शिक्षण व विविध माध्यमांची याविषयीची भूमिका, यामुळे अंमली पदार्थांचे सेवनाचे प्रमाण निश्चितच कमी करण्यास मदत होईल.

२) युवक केंद्रे :

स्वंयसेवी संस्था आणि अशासकीय संस्थांनी युवकांसाठी अंमली पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम यासाठी तरुणांची केंद्रे स्थापन करावीत. या केंद्रामध्ये व्यसनी लोकांशी मुक्त चर्चा करता यावी, त्यांच्या समस्या ऐकून घ्याव्यात आणि एकत्र चांगल्या कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात यावी. यामुळे संबधीत व्यसनी व्यक्तींना आधार मिळेल, त्यांना त्यांचे विचार ऐकून घेणारे त्यांच्याच वयातील व्यक्ती मिळणार आहेत. अशा ठिकाणी त्यांचे मनमोकळे करण्याची संधी, मित्रमैत्रिणी मिळतील, त्याप्रमाणे मोकळेपणाने हसता-खेळता येईल.

३) कडक कार्यवाही :

मादक द्रव्यांचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध कडक कार्यवाही करण्यात यावी. अंमली पदार्थांचे व्यसन असणाऱ्यांचा संबंध वेश्यागमन, गुन्हेगारी, अपघात, गैरवर्तणूक अशा स्वरुपाचे असतात. यासाठी कायद्यामध्येही तशाप्रकारे तरतूद करण्यात यावी. अशा प्रकारे कडक कार्यवाही करण्यात येणार असेल तर त्याप्रमाणे अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांची संख्याही आपोआप कमी होईल.

४) सल्लागार केंद्रे :

शैक्षणिक संस्थांनी, अशासकीय संस्थांनी, स्वयंसेवी संस्थांनी तसेच सामाजिक संस्थांनी अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांवर माहिती पुरवणारी सल्लागार केंद्रे स्थापन करावीत. त्यामध्ये अंमली पदार्थां सेवन करु नका. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामाची माहिती, अंमली पदार्थ घेतल्यास त्याचे शरीरावर होणारे परिणाम इ. मार्गदर्शन करण्यात यावे.

५) आंतरराष्ट्रीय मदत :

मादक द्रव्याच्या गैरवापरावर नियंत्रण आणि मदत पुरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनेने (United Nation Funds for Drug Abuse Control) संबंधीत सरकारला मदत देण्याचे ठरवले आहे. त्याचप्रमाणे काही आंतरराष्ट्रीय संस्थांनाही मदत पुरविण्यात येते. अंमली पदार्थांच्या सेवनाविषयी जनजागृती व शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे, त्यावरील उपाययोजना व उपचार पद्धती विकसित करणे आणि त्यावर संशोधन करुन अंमली पदार्थांच्या वापरावर नियंत्रण आणणे इ. कार्ये या संस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर करतात.

६) व्यसनी व्यक्तीवर नजर ठेवणे :

जर मादक द्रव्यांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींवर सुरुवातीलाच उपचार शक्य झाले तर अशी व्यक्ती लवकर बरी होण्याची शक्यता निर्माण होते. सुरुवातीलाच व्यसनाचे निदान झाले तर ते लवकर थांबविणे शक्य होते.

७) शैक्षणिक संस्था सुरक्षित करणे :

शैक्षणिक संस्थांच्या जवळपास असे प्रकार बंद करावेत. त्यासाठी सरकारने त्यांच्या परिसरामध्ये या द्रव्यांची विक्री करणाऱ्या व्यक्तींवर कडक नजर ठेवावी आणि शैक्षणिक संस्थांच्या परिसर मादक द्रव्यांपासून सुरक्षित करावा.

आपली प्रगती तपासा :

१) मादक द्रव्यांचे व्यसन रोखण्यासाठी उपाययोजना सांगा.

_____

_____

_____

_____

८.६.५ मादक द्रव्यांच्या उपचारपद्धती :

अंमली पदार्थांच्या अतिरिक्त सेवनामुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक तसेच मानसिकतेवर पुढीलप्रकारे उपचार करता येतील.

अ) डॉक्टरांच्या देखरेखीखाली :

अंमली पदार्थांचे अतिसेवन करणाऱ्या रुग्णास दवाखान्यात ॲडमिट केले पाहिजे आणि डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार करण्यात यावेत. सुरुवातीला अशा रुग्णांच्या जैव-रासायनिक चाचण्या केल्या पाहिजेत. या चाचणीद्वारे शरीरातील अंमली पदार्थांचा अंश किती आहे व त्याचा शरीरावर परिणाम किती झाला आहे हे तपासले जाते. त्यानुसार रुग्णावर उपचार केले जातात. हे व्यसन सुटल्यानंतर ते फिरुन उलटू नये म्हणून 'नाल्मफेन्स' (Nalmefence) हे औषध अतिशय उपयुक्त ठरले आहे.

ब) वर्तणूक उपचारपद्धती :

औषधी उपचाराप्रमाणे अशा रुग्णांना वर्तणूक उपचार आणि औषधोपचार अशा दोन्ही उपचारांमुळे फायदा होऊ शकतो. म्हणजे औषधोपचार आणि मानसोपचारतज्ज्ञांनी उपचार सुरु ठेवल्यास रुग्णास लवकर गुण येतो. मानसोपचारामुळे त्याच्या मूळ समस्येला भिडणे शक्य होते. त्याचप्रमाणे मनोविकारशास्त्रातील आधुनिक औषधांचाही फायदा होऊ शकतो. त्याचप्रमाणे त्यास व्यवस्थित मार्गदर्शन करणे, जवळच्या मित्रांशी संबंध ठेवणे. यामुळेही संबंधीत रुग्णाची वर्तणूक सुधारते.

क) कार्यमग्न ठेवणे :

या व्यसनी लोकांना सतत कार्यमग्न ठेवले पाहिजे. त्यांना योग्य मार्गदर्शन करुन भरीव काम करण्यास तयार करणे. सुरुवातीला त्यांना लहान-लहान विनाश्रमाची कामे सांगा. त्यांना आनंद वाटेल अशा प्रकारच्या उपक्रमांमध्ये सहभागी करुन घ्या. उदा. सांस्कृतिक कार्यक्रम इ. त्यामुळे त्याचा परकेपणा, एकाकीपणा नाहीसा होईल.

ख) सामाजिक वातावरण :

या लोकांचा मानसिक ताणतणाव व दु:ख कमी करण्यासाठी त्यांच्या सामाजिक वातावरणात बदल केला पाहिजे. रुग्णाच्या कलाने सर्व गोष्टी घेणे, समाजातील स्फूर्तिदायक उदाहरणे सतत त्यांच्यासमोर ठेवावी, उत्तम ग्रंथ वाचण्याची सवय, कोणती ना कोणती कला-क्रीडा आत्मसात करण्यास सांगावी. इत्यादीमुळे त्याचे लक्ष व्यसनांवर केंद्रित होणार नाही.

ग) नार्कोटिक्स ॲनॉनिमस (Narcotics Anonymous) : नार्कोटिक्स ॲनॉनिमस ही संस्थासुद्धा अशा व्यसनी लोकांना व्यसनातून मुक्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम करते. या ठिकाणी रुग्णांना आपापल्या अनुभवांची व विचारांची देवघेव करता येते. प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असतात. त्यांचाही फायदा मोठ्या प्रमाणावर होतो. त्याचप्रमाणे त्यांना मानसिक धैर्य देण्याचे काम ही संस्था करते.

घ) मार्गदर्शन :

मार्गदर्शनाच्या द्वारे संबंधीत व्यक्तीला हे समजते की, ही सवय आपल्याला का लागली. व्यक्तीकेंद्रित उपचार पद्धतीमध्ये व्यक्तीला आपल्या व्यसनाचे कारण समजेपर्यंत मोकळेपणाने बोलू दिले जाते आणि नंतर ते कारणच दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

आपली प्रगती तपासा :

१) मादक द्रव्यांच्या उपचारपद्धती स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

८.७ सारांश

भारतात अनेक सामाजिक समस्या आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी शासन, सामाजिक संस्था काम करीत आहेत. आपण सामाजिक किंवा स्वयंसेवी संस्थांची भूमिका व कार्य यांचा आढावा या ठिकाणी घेतला आहे. अनेक सामाजिक समस्यांपैकी आपण धूम्रपान व मद्यपान या समस्यांविषयी विचार केला आहे. या समस्या निर्माण होण्याची कारणे, समस्यांचे दुष्परिणाम (सामाजिक व वैयक्तिक) व उपाययोजानंचा विचार केला आहे. या समस्या संपुष्टात

येण्यासाठी आपणास सर्व स्तरांवर कार्य करणे गरजेचे आहे. कारण हीच पिढी या व्यसनांच्या बळी जास्त पडत आहे.

भारतापुढील ही सर्वात महत्त्वाची समस्या आहे. तरुणवर्ग या व्यसनाच्या बळी मोठ्या प्रमाणात दिसून येतो. आपण अंमली पदार्थांचे विविध प्रकार पाहिले. अंमली पदार्थांचे व्यसन लागण्याची कारणे, या अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम किती वाईट असतात ते पाहिले आणि या व्यसनापासून दूर होण्याच्या उपायांचा अभ्यास केला आहे.

८.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१. भारतीय समाजाला भेडसाविणाऱ्या सामाजिक समस्यांची चर्चा करा.

२. धूम्रपानाच्या समस्येची कारणे सांगून, धुम्रपानामुळे होणारे दुष्परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

३. धूम्रपानामुळे होणारे दुष्परिणाम सांगून धूम्रपानाच्या समस्येवर उपाय सुचवा.

४. मद्यपींच्या विविध अवस्था स्पष्ट करुन दारुचे व्यसन लागण्याची कारणे लिहा.

५. दारुचे शरीरावर होणारे परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

६. मद्यपींवर उपचार पद्धती कशी करता येईल.

७. मादक द्रव्यांचे प्रकार सांगून मादक द्रव्यांचे व्यसन लागण्याची कारणे स्पष्ट करा.

८. मादक द्रव्यांच्या सेवनाचे परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

९. मादक द्रव्यांच्या व्यसनांवर उपाय सुचवून ते सविस्तर स्पष्ट करा.

१०. टीपा लिहा.

अ) दारुसंबंधी गैरसमज ब) धूम्रपान क) मद्यपान ड) सामाजिक समस्या इ) मादक द्रव्ये ई) धूम्रपान कारणे भ) मद्यपानाची कारणे प) धूम्रपानाचे उपाय फ) मद्यपानाचे उपाय य) मादक द्रव्याचे प्रकार इ) मादक द्रव्याची कारणे ल) मादक द्रव्याचे परिणाम व) मादक द्रव्याचे उपाय क्ष) मादक द्रव्यांच्या उपचार पद्धती.

❖❖❖❖

९

एच.आय.व्ही/एड्स जाणीव व समतोल

पाठाची रचना :

९.१ उद्दिष्ट्ये
९.२ प्रास्ताविक
९.३ एड्स म्हणजे काय ?
९.४ एच.आय.व्ही. म्हणजे काय ?
९.५ एड्सची कारणे
९.६ एड्सची लक्षणे
९.७ एड्सवर प्रतिबंधात्मक उपाय
९.८ एड्सचे परिणाम
९.९ एड्स जनजागृती
९.१० सारांश
९.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न

९.१ उद्दिष्ट्ये

- एड्स आणि एच.आय.व्ही. या संकल्पना समजावून घेणे.
- एड्स कारणांचा आढावा घेणे
- एड्सचा संसर्ग होण्याचा सर्वाधिक धोका असणाऱ्या व्यक्तींची माहिती घेणे.
- एड्सवरील उपचाराचा आणि प्रतिबंधात्मक उपायांचा आढावा घेणे.

९.२ प्रास्ताविक

१९८३ साली फ्रान्सचे नामांकित शास्त्रज्ञ ल्युक मॉटॅग्रीयर व अमेरिकेतील डॉ. रॉबर्ट गॅलो यांनी यांनी या विषाणूंचा शोध लावला. या दोन देशातील प्रगत विज्ञान व वैद्यकशास्त्रामुळे हा रोग शोधून काढला व तो एड्स (AIDS) या नावाने ओळखला जाऊ लागला. या विषाणूंचे नाव 'मानवी रोग प्रतिकार शक्ती कमी करणारा विषाणू' (Human Immuno Deficiency Virus) असे आहे.

सर्वप्रथम आफ्रिका देशात या रोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर मिळाले. आफ्रिकन देशांनी या रोगाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्या देशातील प्रचंड मनुष्यहानी झाली. भारतामध्ये सर्वप्रथम एप्रिल १९८६ मध्ये मद्रास या शहरात १० वेश्यांना विषाणूंचा संसर्ग झाल्याचे आढळून आले. मद्रास शहरातच एड्सचा बळी गेला. आज जगात सर्वाधिक एड्सचे रुग्ण भारतात आहेत.

मुंबईमध्ये एड्स रुग्णांचे प्रमाण सर्वाधिक असण्याची शक्यता आहे. कारण सतत बाहेरून येणाऱ्या लोकांचे लोंढे मुंबईत येत असतात. मोठ्या प्रमाणावर रक्ताचा काळाबाजार, अनैतिक धंदे आणि विना परवाना रक्त पेढ्या इत्यादी कारणांमुळे मुंबईत एड्सचा फैलाव मोठ्या प्रमाणावर झालेला आहे.

९.३ एड्स म्हणजे काय?

एड्स या रोगाचे नुसते नाव घेतले तरी माणसाच्या अंगावर काटे उभे राहतात. कारण या रोगाची दहशतच एवढी मोठी आहे. Acquired Immunity Defifiency Syndrom या इंग्रजी शब्दसमुहाच्या अक्षरापासून AIDS या जिवघेण्या आजाराचे नाव जगात रूढ झाले आहे. याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे-

A - Acquired - संपादित किंवा मूलतः हा आजार अंगिभूत स्वरूपाचा नसून तो व्यक्तीला जडतो.
I - Immunity - रोगप्रतिकार शक्तीच्या
D - Defifiency - कमतरतेमुळे
S - Syndrome - होणाऱ्या लक्षणांचा समुह

थोडक्यात, एड्स म्हणजे अनेक रोगांचा समूह. एड्स दुसऱ्यापासून होतो म्हणजेच तो मिळवलेला रोग असतो. कारण शरीरातील रोगप्रतिकार शक्तीच्या कमतरतेमुळे ते विषाणू शरीरात प्रवेश करतात. या रोगाची अनेक लक्षणे म्हणून लक्षणांचा गट (Syndrome) असे म्हटले जाते.

९.४ एच.आय.व्ही. म्हणजे काय?

ज्या विषाणूंमुळे हा रोग होतो, त्याला एच.आय.व्ही. विषाणू असे म्हणतात. दिवसेंदिवस या रोगाची लक्षणे वाढतच जातात.

Human Immuno Deficiency Virus (HIV) म्हणजे

H - Human - मानवी
I - Immuno Deficiency – रोगप्रतिकार शक्ती कमी करणारा
V- Virus – विषाणू

म्हणजेच मानवी रोगप्रतिकार शक्ती कमी करणारा विषाणू होय. हा विषाणू आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती म्हणजेच पांढऱ्या पेशी कमी करतो आणि एकदा आपली रोगप्रतिकारक शक्ती कमी झाली की साध्या-साध्या रोगांचा संसर्गही आपल्याला दुर्बल करू शकतो. व्यक्तींच्या रक्तात, पुरुषाच्या विर्यात व स्त्रीच्या योनीस्त्रावात एच.आय.व्ही. चे विषाणू मोठ्या प्रमाणात आढळतात.

एच.आय.व्ही. हा एक प्रकारचा रोगजंतू आहे. या जंतूच्या जातीला विषाणू म्हणतात. आपल्या रक्तामध्ये टी-४ नावाच्या पांढऱ्या पेशी असतात. एच.आय.व्ही. चे आक्रमण झाले असता पांढऱ्या पेशींना त्यांना त्यांचे काम करणे कठीण जाते आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी कमी होत जाते. त्यांची प्रतिकार शक्ती कमी झाल्याने मामुली रोगही गंभीर स्वरूप धारण करतात आणि माणसामध्ये न्युमोनिआ (फुफ्फुसदाह), अतीसार (हगवण), खंगणे, कापोसीचा सार्कोमा (त्वचा कर्करोग) इ. लक्षणे दिसू लागतात.

त्याचप्रमाणे एच.आय.व्ही. शरीरातील इतरही चेतापेशींचे नुकसान करते. त्यातून बुद्धीभ्रंश किंवा चेताविकृती म्हणजेच मज्जातंतूचे आजार उद्‌भवतात. ही सर्व संक्रमणे एकटी किंवा एकत्रित येतात आणि या अवस्थेला पूर्ण विकसित एड्स असे म्हणतात.

आपली प्रकती तपासा.

१) एड्स म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

एड्सच्या अवस्था (Stage of AIDS)

एड्सचे चार अवस्थांमध्ये विभाजन केले जाते. एच.आय.व्ही. संक्रमित प्रत्येक व्यक्ती यातील प्रत्येक अवस्थेमधून जातेच असे नाही. परंतु अशा प्रकारची लक्षणे दिसू लागण्याचा कालावधी व्यक्तीप्रमाणे बदलत जातो. ज्यावेळी शरीरातील रोगप्रतिकार शक्ती क्षीण होते आणि कामच करत नाही त्यावेळी एड्स झाल्याचे निदान होते. एच.आय.व्ही. आणि शरीरातील रोगप्रतिकार शक्ती यांच्यातील संबंध पुढील चार अवस्थांमध्ये दाखविता येते.

अ) प्रथमावस्था - प्रथमावस्था काही महिन्यांपासून ते बऱ्याच वर्षापर्यंत टिकून राहू शकते. या अवस्थेत काहीच लक्षणे जाणवत नाहीत. काही व्यक्तींमध्ये या अवस्थेचे लक्षण म्हणजे पूर्ण शरीरावर लसिकाग्रंथींची होणारी वाढ यामध्ये प्रामुख्याने काखेतल्या, मानेतल्या आणि जांघेतील लसिकाग्रंथी मोठ्या होतात.

ब) द्वितीयावस्था (सुरुवातीचा रोग) - लसिकाग्रंथीची वृद्धी काहींना जाणवते तर अनेकजण बरीच वर्षे लक्षणरहित राहतात. एच.आय.व्ही. संक्रमण जसजसे पसरू लागते, तसतशी शरीराची रोगप्रतिकार शक्ती कमी होते. अनेकांमध्ये याची लक्षणे जाणवू लागतात. वजन कमी होणे, हगवण व केसाळ श्वेत चट्टे इ. लक्षणे दिसून येतात. संपूर्ण निरोगी माणसामध्ये कारणाविना ही लक्षणे सारखी सारखी आढळून आल्यास एच.आय.व्ही. संक्रमणाचा संशय घ्यावा. यातील कोणतेही लक्षण मृत्यूस कारणीभूत ठरत नाही.

तृतीयावस्था - या अवस्थेमध्ये त्वचेचा कॅन्सर, तोंडातील चट्टे व फुफ्फुस क्षय इ. लक्षणे दिसून येतात. सतत ताप, हगवण आणि शरीराच्या वजनात एकूण १० टक्के घट या तक्रारीही याच अवस्थेत दिसून येतात.

ड) चतुर्थावस्था - चतुर्थावस्था म्हणजे अंतिम अवस्था होय. या अवस्थेला पोहोचलेल्या रुग्णांवर अनेकदा मृत्यूच ओढावतो. कारण रोगप्रतिकारक शक्तीच नसल्याने एच.आय.व्ही.चे विषाणू शरीराचा पूर्ण ताबा घेतात. त्यामुळे शरीरावर अनेक रोगांची आक्रमणे होतात.

आपली प्रगती तपासा.

१) एड्सच्या अवस्था स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

९.५ एड्सची कारणे

पुढील कारणांमुळे व्यक्तीला एड्सची लागण होऊ शकते.

१) असुरक्षित लैंगिक संबंध : एड्सचा संसर्ग झालेल्या व्यक्तीबरोबर असुरक्षित लैंगिक संबंध हे एड्स होण्याचे प्रमुख कारण आहे. जुजबी ओळखीपाळखीतील व्यक्ती किंवा वेश्या यांच्याशी लैंगिक संबंध म्हणजे एड्सला आमंत्रणच होय. फक्त बाह्य दर्शनावरून एखाद्या व्यक्तीला एड्स झाला आहे किंवा नाही हे सांगणे अवघड आहे.

२) एच.आय.व्ही. ग्रस्त रक्तांचे संक्रमण : एच.आय.व्ही. संसर्ग झालेल्या माणसाचे रक्त न तपासता एखाद्या रुग्णास दिल्यास त्यालाही एच.आय.व्ही. संसर्ग होतो. यासाठी रक्ताची गरज तुम्हांला भासलीच तर रक्ताची एच.आय.व्ही. प्रतिद्रव्यविषयक चाचणी करण्यात आली आहे याची खात्री करून घ्यावी.

३) दूषित सुया व सिरींजचा वापर : संसर्ग झालेल्या व्यक्तीसाठी वापरण्यात आलेल्या सुया व सिरींज (Syringes) पुन्हा निर्जंतुक करून न घेता तशाच दुसऱ्या निरोगी माणसाला वापरल्या गेल्यास एचआयव्हीचा संसर्ग होऊ शकतो. विशेषत: मादक द्रव्यांचे सेवन करणारे जेव्हा एकच सिरींज सर्वांसाठी निर्जंतुक न करता उपयोगात आणतात तेव्हा संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो.

४) शरीरद्रवाचा जखमेशी किंवा श्लेष्मपटलाशी संपर्क आल्याने : एड्स विषाणूची लागण झालेल्या व्यक्तीच्या शरीरद्रवाचा दुसऱ्या व्यक्तीच्या जखमेशी किंवा श्लेष्मपटलाशी संपर्क आल्यास दुसऱ्या व्यक्तीला एड्सचा संसर्ग होतो. लाळेमध्ये विषाणूंचे प्रमाण अल्प असले तरी ओले चुंबन, मानवदंश, प्रेमाने चावल्याने, जखम असलेले बोट संसर्गग्रस्त व्यक्तीच्या तोंडात अगर योनीत घातल्याने, कॉन्टॅक्ट लेन्सची अदलाबदल, चाचणी घेतल्याने, जखम झालेल्या त्वचेशी संसर्गग्रस्त व्यक्तीच्या लघवीचा संपर्क आल्यामुळे, गुदसमागम, विषाणुवाहक, मातेने बाळाला पाजल्यामुळे, प्रेमक्रिडेमध्ये स्तनपान केल्याने एड्सचा संसर्ग निरोगी व्यक्तीला होऊ शकतो.

५) मेंदूचलाद्वारे संसर्ग : एच.आय.व्ही. पॉझिटीव्ह व्यक्तीच्या मज्जासंस्थेशी निगडीत आजाराचे निदान करण्यासाठी दोन मणक्यांच्यामध्ये सुई टोचून मेंदूजल बाहेर काढतात. त्या द्रवाचा जखमेशी संपर्क आल्यास विषाणूची लागण होऊ शकते.

६) मातेकडून बाळाला संसर्ग होणे : संसर्गग्रस्त माता उपचार न करता गरोदर राहिली असेल तर गरोदरपणातच हा रोग मातेकडून गर्भाकडे संक्रमित होतो. जर एच.आय.व्ही. मातेने उपचाराअंती गरोदरपण स्विकारले असेल तर गर्भाला संसर्ग होण्याची शक्यता कमी होते.

आपली प्रगती तपासा.

१) एड्सची कारणे स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

पुढील गोष्टींमुळे एच.आय.व्ही. म्हणजे एड्सचा संसर्ग होत नाही हे लक्षात ठेवावे-

१) एकमेकांशी हस्तांदोलन केल्याने
२) चुंबन वा अलिंगन घेण्याने
३) खोकल्याने व शिंगल्याने
४) सार्वजनिक स्वच्छतागृहाचा एकत्र वापर केल्यामुळे
५) एकत्र भोजन केल्यास
६) एचआयव्ही संसर्ग झालेल्या व्यक्तीने खाद्यपदार्थ तयार केल्यास
७) एकत्र पोहोल्यामुळे
८) एकमेकांचे कपडे वापरल्याने
९) डास किंवा किटक चावल्याने

९.६ एड्सची लक्षणे (Syringes)

व्यक्ती बरीच वर्षे लक्षणरहित राहतात. एचआयव्हीची लागण होऊनसुद्धा अनेक व्यक्तींमध्ये एड्सची कोणतीच लक्षणे दिसून येत नाहीत. अनेकदा व्यक्तीला एचआयव्हीची लागण झालेली असते. परंतु त्या व्यक्ती सुस्थितीत दिसतात. परंतु त्यांची रोगप्रतिकारक शक्ती पूर्णपणे बाद झालेली असते.

काही व्यक्तींमध्ये सुरुवातीला एड्स उद्‌भवू शकतो. त्यामध्ये एड्सची लक्षणे दिसून येतात. एड्स रोगामध्ये पुढील लक्षणांपैकी कोणतीही लक्षणे दिसून येतात-

१. दोन महिन्यात शरीराच्या वजनात १० टक्के घट होणे.
२. एक महिनाभर किंवा जास्त टिकणारा ताप.
३. एक महिन्यापेक्षा जास्त काळ हगवण (Diarrhoea) लागणे.
४. नागीण सारखे त्वचाविकार होणे.
५. तोंड येण्याचा प्रकार किंवा तोंडात चट्टे पडणे.
६. दीर्घकाल राहणारा कोरडा खोकला.
७. मानेतल्या, काखेतल्या आणि जांघेतल्या लसिकाग्रंथीची तीन महिन्यांपासून वाढ.
८. कमी श्रमानेही खूप थकवा येणे.
९. सर्व शरीरभर खाज सुटणे.
१०. रात्रीचा घाम येणे.

भारतामध्ये इतर आजारातही यापैकी बरीच लक्षणे आढळून येतात. म्हणून एखाद्या लहानशा लक्षणाने घाबरून जाऊ नये. तर अशा वेळी एचआयव्ही संसर्ग तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.

आपली प्रगती तपासा.

१) एड्सची लक्षणे सांगा.

_____

_____

_____

_____

९.७ एड्सवर प्रतिबंधात्मक उपाय (AIDS Prevention Remedies)

पुढील उपाययोजनांद्वारे एड्स प्रतिबंधीत करता येतो.

१) सुरक्षित लैंगिक जीवन (Safe Sex) : लैंगिक स्वैराचार हे एचआयव्ही संसर्ग होण्याचे प्रमुख कारण आहे. एचआयव्हीला सामोरे जाण्यासाठी घ्यावयाची दक्षता आणि लैंगिक आविष्कार (प्रकार) म्हणजेच सुरक्षित लैंगिक जीवन होय. लैंगिक संबंध ठेवताना प्रत्येकाने पुढील चौकशी

केल्यानंतरच संबंध ठेवावेत. भागीदाराचा लैंगिक जीवन पूर्वोतिहास, अंमली पदार्थ वापरण्याच्या वृत्तीविषयी, पूर्वी एचआयव्हीला सामोरे गेल्याने संभाव्य धोका. या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत आणि तुमचा साथीदार दक्षता घेणार नसेल तर तुम्ही लैंगिक संबंधाला नकार द्या.

२) निरोधचा वापर (Use of Condoms) : एचआयव्ही संसर्गाचा धोका कमी करण्याचा खात्रीचा उपाय म्हणजे निरोधचा अचूक वापर. लिंगपारेषित रोगांच्या संसर्गाची संभाव्यता कमी करण्यासाठी आणि नको असलेली गर्भधारणा टाळण्यासाठी अनेक वर्षांपासून निरोधचा यशस्वी वापर करण्यात येत आहे. अनेक व्यक्ती निरोध वापरणे टाळतात. कारण निरोधची किंमत, लैंगिक आनंद कमी होईल, वापरण्याच्या पद्धतीची माहिती इ. सध्या निरोध कमी किंमतीत सहजासहजी उपलब्ध होतात. पातळ चांगल्या दर्जाचे निरोध लैंगिक आनंदात कोणताही अडथळा आणत नाहीत. तसेच ते वापरण्याच्या पद्धती समजण्यास अतिशय सोप्या आहेत.

३) निर्जंतुक सुया व सिरिंजस् (Clean Syrings and Needles) : ॲक्युपंक्चर, गोंदवणे, कान टोचणे, सुंता किंवा इतर कोणत्याही त्वचाभेदक प्रक्रियेसाठी निर्जंतुक उपकरणे वापरल्यास त्या प्रक्रिया सुरक्षित ठरतात. तुम्हांला इंजेक्शन घेण्याची गरज भासली आणि त्यावेळी विल्हेवाटक्षम (वापरा आणि फेका) सिरींज वापरली जाणार नसेल तर सुईच्या निर्जंतुकीकरणासाठी योग्य पद्धती अवलंबिल्या जाव्यात असा आग्रह धरा.

४) आईपासून मुलाला होणाऱ्या संसर्गापासून प्रतिबंध (Prevention of mother to child transmission) : एचआयव्ही संक्रमीत माता पोटातल्या गर्भाकडे, प्रसुतीच्या वेळी किंवा अंगावर पाजल्या जाणाऱ्या दुधातूनही विषाणू पोचवू शकते. संसर्ग असलेल्या मातेकडून तिच्या नवजात अर्भकाला संसर्ग होऊ नये म्हणून एचआयव्ही संसर्ग झालेल्या मातेपासून होणाऱ्या अर्भकास सर्व प्रतिबंधक लसी डॉक्टरांच्या सल्ल्याने द्याव्यात. संबंधित मातेला गर्भधारणा होऊ देऊ नये, झाल्यास प्रतिबंधक करावा, डॉक्टरांच्या सल्ल्याने मातेची व बाळाची तपासणी करावी. या दक्षता घ्याव्यात.

५) प्रभावी रोगप्रतिकार शक्ती उपचार पद्धती (Highly Active Anti-Retrovira Therapy) : एचआयव्ही संसर्गावर गुणकारी उपचार पद्धती म्हणजे हार्ट (HAART) होय. एचआयव्ही बाधीत व्यक्तींना या पद्धतीमुळे दीर्घकाळ जगता येऊ शकते. हार्ट पद्धतीमुळे एचआयव्ही प्रसारणाऱ्या रक्तातील वेग मंदावतो. हार्ट औषध उपचार पद्धतीमुळे एड्सची शरीरातील वाढ कमी-कमी होत जाते. त्यामुळे काही एचआयव्ही बाधीत लोक अनेक वर्षे सशक्तपणे जगू शकतात. परंतु या उपचार पद्धतीमुळे दररोज खूप शक्तीशाली औषधे घ्यावी लागतात. त्यामुळे अनेकदा शरीरावर त्याचे विपरीत परिणाम होतात.

६) सुरुवातीची उपचार पद्धती (Early Detection) : एचआयव्ही संसर्ग झाल्याचा संशय आल्यास संशयाचे परिमार्जन करण्यासाठी पुढील दोन चाचण्या करून घ्याव्या लागतात.

इलायझा (Enzyme) – linked innunosorbent asary test या इंग्रजी शब्दांची अद्याक्षरे म्हणजे ELSA रक्तातील एचआयव्ही प्रतिद्रव्ये शोधून काढणारी ही चाचणी

आहे. इलायझा चाचणी होकारात्मक आल्यास पुढील दुसरी चाचणी करावी लागते. नकारात्मक असल्यास गरज नाही.

वेस्टर्न ब्लॉट टेस्ट (Western Bolt test) - इलायझा चाचणी होकारार्थी आली तर एचआयव्ही प्रतिद्रव्यांच्या उपस्थितीची खात्री करुन घेण्यासाठी ही चाचणी केली जाते.

वरील दोन्ही चाचण्या अत्यंत ग्रहणक्षम असल्याने चुका होतच नाहीत. कारण होकारात्मक चाचणीची बातमी अनेकांना उध्वस्त करून टाकणारी ठरू शकते.

७) शालेय आधारित शैक्षणिक कार्यक्रम (School based education programs) एड्स निर्मुलन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून काही देशांमध्ये एड्स विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. यामध्ये एचआयव्ही एड्स इत्यादीची संपूर्ण माहिती त्यांचा संसर्ग विज्ञानाच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सामाजिक विज्ञान व नैतिक शिक्षणामध्येही एड्स कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे एड्स याविषयीची माहिती सर्वांपर्यंत हळुहळू परंतु प्रभावीपणे पोहोचते.

८) समवयस्कांसाठी शिक्षण (Peer Education)- एड्स निर्मुलन मोहिमेतील गेल्या दशकातील कार्यक्रम म्हणजे समवयस्कांसाठी शिक्षण होय. तरुणींमध्ये हा कार्यक्रम अतिशय लोकप्रिय होत आहे. त्यांच्याशी योग्य चर्चा केल्याने ते सर्वांपर्यंत ही पोहोचवितात. आशियामध्ये रेड क्रॉस या संस्थेने १९९४ मध्ये एड्स कार्यक्रम अतिशय मोठ्या प्रमाणावर यशस्वी केला.

९) सरकारची व जागतिक बँकेची भूमिका (Role of Government & World Bank)- एड्स निर्मुलन करण्यासाठी सरकारही मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करीत आहे. एड्स/एचआयव्ही याविषयी माहिती गोळा करून ती विविध माध्यमांद्वारे समाजापर्यंत पोहोचवणे तसेच एचआयव्ही बाधीत व्यक्तींना धीर देणे, त्यांच्यावर उपचार करणे इ. कार्यक्रम सरकारतर्फे केले जात आहेत. विकसनशील देशांमध्ये एड्स, निर्मुलन कार्यक्रमांसाठी जागतिक बँक मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत करत आहे. विविध देशांच्या मदतीने कार्यशाळा, चर्चासत्रे व शैक्षणिक कार्यक्रमांचेही आयोजन जागतिक बँकेमार्फत केले जात आहे. थोडक्यात एड्स, निर्मुलन कार्यक्रमामध्ये जागतिक बँक महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

आपली प्रगती तपासा.

१) एड्स प्रतिबंधक उपाययोजना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

९.८ एड्सचे परिणाम (Implications of AIDS)

एड्सचे परिणाम सामाजिक व आर्थिक घटकांवर होतात. ते परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

अ) सामाजिक परिणाम (Social Implications)- एड्स हा लांछनास्पद आजार आहे अशी आपली विचारधारा आहे. एड्स बाधीत व्यक्तींमध्ये लाजीरवाणी व अपराधीपणाची भावना निर्माण होते. याचा परिणाम संबंधीत व्यक्तीचे त्याच्या कुटुंबातील व शेजारच्या व्यक्तींशी असणाऱ्या संबंधांवर होतो. सर्वसाधारणपणे मध्यमवयीन व्यक्तींमध्ये, स्त्रियांमध्ये एचआयव्ही संसर्ग होण्याचे प्रमाण जास्त आहे. एचआयव्ही बाधील लोकांची नीतिमत्ता बिघडते. याचा परिणाम त्यांच्या आहारावर होतो. त्याचप्रमाणे इतर आजारांकडेही दुर्लक्ष होते. परिणामी संबंधित व्यक्तीची मानसिकता खालावते. समाजामध्ये फिरणे, वागणे व मिसळणे या व्यक्तींना अशक्य होते. कारण त्यांना स्वत:चीच लाज वाटू लागते. या व्यक्ती त्यांच्या जवळच्या मित्रांना व नातेवाईकांना भेटण्याचे टाळतात. त्यामुळे एकाकीपणा, एकटेपणा वाढतो.

ब) आर्थिक परिणाम (Econmic Implications)- घरातील एखाद्या व्यक्तीला प्रामुख्याने कमावत्या व्यक्तीला एड्सची लागण झाल्यास घरातील उत्पन्न कमी होते. संबंधित व्यक्तीचा दवाखाना व औषधोपचार इत्यादींचा बोजा पडतो. गरीब कुटुंब असेल तर आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट होते. कारण कमावत्या व्यक्तीला एड्स झाल्याने उत्पन्न घटते, दवाखान्याचा व औषधांचा खर्च वाढतो, संतुलित आहार घेता येत नाही, घरातील मुलांची शाळा बुडते, राहणीमानाचा दर्जा खालावतो.

एड्सची लागण झालेल्या व्यक्तीला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च मोठ्या प्रमाणावर वाढतो. प्रत्यक्ष खर्चामध्ये औषधे, डॉक्टरांची फी, दवाखान्याचा खर्च व योग्य आहार यांचा समावेश होतो. सर्वसामान्यांना हा खर्च करणे शक्य होत नाही. अप्रत्यक्ष खर्चामध्ये जीवनातील चांगले दिवस वाया जातात, आजारामुळे काम करता येत नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या आजारामध्ये अनेकदा मृत्यू होण्याचीच शक्यता जास्त असते. वरील सर्व परिणामांमुळे संबंधित व्यक्तीच्या घरातील मुलांचे शिक्षण बंद होण्याची वेळ येते. कारण त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची होते. त्याहीपेक्षा एड्सची लागण झालेल्या घरातील मुले म्हणूनही त्यांना रोज त्रास सहन करावा लागतो. यामुळे शाळाही सोडून द्यावी लागते.

आपली प्रगती तपासा.

१) एड्स परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

९.९ एड्स जनजागृती (AIDS Awarness) :

एड्स हा रोग अतिशय भयंकर आहे. सध्या भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर लोकांना एचआयव्हीची लागण झालेली आहे. एचआयव्हीची लागण होण्याचा महत्त्वाचा प्रमुख मार्ग म्हणजे असुरक्षित लैंगिक जीवन हाच आहे आणि दुसरा महत्त्वाचा मार्ग म्हणजे स्वच्छ व निर्जंजुक नसलेल्या सुया व सिरींजस् आणि मातेपासून जन्मलेल्या नवीन अर्भकाला इत्यादी महत्त्वाच्या कारणांमुळे एड्स होऊ शकतो. हीच कारणे नाहीशी करण्यासाठी तरुणवर्गामध्ये याविषयी जागृती करणे अतिशय महत्त्वाचे आहे. देशाचा आधारस्तंभ असणारे तरुणच जर जागृत झाले, त्यांच्यापर्यंत आपण योग्य संदेश पोहोचवू शकलो तर नक्कीच आपण पुढील काही वर्षांमध्ये एड्स या रोगाचे जगातूनच उच्चाटन करू शकतो.

समाजामध्ये एड्स रोगाची जनजागृती पुढीलप्रमाणे करता येईल.

१) एड्सवर प्रदर्शने (Publicity) : अशासकीय संस्था आणि भारत सरकार यांनी नेहमी एड्सवर प्रदर्शने आयोजित केल्यास समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती होईल. ही प्रदर्शने मोक्याच्या ठिकाणी किंवा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच मॉल, रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड अशा महत्त्वाच्या ठिकाणी आयोजिक करण्यात यावीत. अशा प्रदर्शनांमध्ये कार्यक्षम आणि प्रशिक्षित कर्मचारी, यामध्ये प्रभावी पोस्टर्स लावलेले असावेत, एड्स प्रतिबंध आणि त्याची उपचार पद्धती यांची पूर्ण माहिती यामध्ये दिली जावी, भेट देणाऱ्यांना मोफत पुस्तिका व संबंधित साहित्य देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

२) प्रसिद्धी (Publicity)- उपलब्ध विविध माध्यमांद्वारे मोठ्या प्रमाणावर एड्स जनजागृतीस प्रसिद्धी दिली पाहिजे. उदा. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी व पोस्टर्स इ. माध्यमांद्वारे प्रसिद्धी करणे गरजेचे आहे. प्रभावी पोस्टर्स एस.टी., रेल्वे व बसेस या सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांवर चिकटविल्यास प्रसिद्धी होऊ शकते. दूरदर्शन पाहणारे व रेडिओ ऐकणारे लोक या माध्यमांद्वारे जागृत होतील. ग्रामीण भागामध्ये वर्तमानपत्रे व नियतकालिकांद्वारे संपर्क साधता येईल.

३) मालिका/कार्यक्रम (Serials/Programmes)- एड्स जनजागृती करण्यासाठी दूरदर्शनने विविध मालिका व कार्यक्रम तयार करावेत व त्यांचे प्रसारण प्रत्येक वाहिनीवरून करण्याची सक्ती करण्यात यावी. दूरदर्शनवर गाजलेल्या मालिका या कार्यक्रमांमुळे लोकांची करमणूक तर होतेच परंतु सोबत महत्त्वाचा संदेशही देता येतो.

४) पथनाट्य (Stree Plays)- युवक संघटना, अशासकीय संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांनी एड्सवर प्रभावी पथनाट्य सादर केल्यास मोठ्या प्रमाणावर समाजात जनजागृती होऊ शकते. निरक्षर लोकांसाठी पथनाट्य अतिशय महत्त्वाची असतात. या लोकांना त्यांच्या आवडीच्या लोकगीताच्या माध्यमातून किंवा इतर धार्मिक व विज्ञानविषयक दृष्टीने त्यांना समाजातील अशा प्रेमळ भाषेते संदेश देणे महत्त्वाचे आहे. अशा प्रकारचे कार्यक्रम महाविद्यालयामध्ये सुद्धा सादर केल्यास मोठ्या प्रमाणावर जनजागृती होऊ शकते.

५) आरोग्य मेळावे (Health Camps)- शाळा, महाविद्यालये इत्यादी ठिकाणी आरोग्य मेळाव्याचे आयोजन केल्यानेही एड्सविषयी जनजागृती होईल व एड्सला प्रतिबंधही बसेल. अशा प्रकारच्या मेळाव्यांमध्ये फक्त शारीरिक तपासणीच करून थांबू नये तर त्याबरोबरच एड्स विषयी सर्व माहिती, एड्स होण्याची कारणे, त्यावरील उपाय व त्यावरील उपचारपद्धती इत्यादीविषयी माहिती देण्यात यावी.

६) शैक्षणिक अभ्यासक्रम (Curriculum)- एड्सची जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमामध्येच त्याचा समावेश करावा. या अभ्यासक्रमध्ये एड्सची कारणे, त्यावरील उपाययोजना व त्याचे परिणाम इ. माहिती विशेषतः उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमातून दिली जावी. त्याचप्रमाणे हीच माहिती महाविद्यालयीन अभ्यासक्रमातही समाविष्ट करण्यात यावी.

आपली प्रगती तपासा.

१) एड्स जनजागृती कशी करता येईल ?

_____

_____

_____

_____

एड्स पिडीत लोक किती वर्षे जगतील हे शक्यतो संबंधित देशातील सार्वजनिक साफसफाईच्या गुणवत्तेवरच अवलंबून असेल. आरोग्यसुविधा उपलब्ध असलेल्या देशांमध्ये हा कालावधी अनेक वर्षाचा असू शकतो. थोडक्यात एचआयव्ही संक्रमण आणि एड्स झालेली माणसे असंक्रमित माणसांइतकेच चांगल्या प्रतीचे जीवन जगू शकतात. त्यासाठी पुढील काही मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करावा लागेल-

पुरेशी नियमित झोप घ्या.

नातेवाईकांशी आणि मित्रांशी संपर्कात रहा.

नियमित व्यायाम करणे.

मद्यपान, अंमली पदार्थ व सिगारेटपासून दूर रहा. कारण प्रतिकार शक्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

सार्वजनिक आरोग्य उच्च प्रतीचे ठेवा.

भरपूर खा व मजा करा.

९.१० सारांश

१९८३ साली फ्रान्सचे नामांकित शास्त्रज्ञ ल्युक मॉटॅग्रीयर व अमेरिकेतील डॉ. रॉबर्ट गॅलो यांनी या विषाणूंचा शोध लावला. या विषाणूंचे नाव मानवी रोगप्रतिकारक शक्ती कमी करणारा विषाणू (Human Immuno Deficiency Virus) असे आहे. Acquired Immunity Defifiency Syndrom या इंग्रजी शब्दसमुहाच्या अक्षरापासून AIDS या

जिवघेण्या आजाराचे नाव आले. थोडक्यात, एड्स म्हणजे अनेक रोगांचा समूह. एड्स दुसऱ्यापासून होतो म्हणजेच तो मिळवलेला रोग असतो. एड्स म्हणजे काय? एच.आय.व्ही. म्हणजे काय? एड्सची कारणे, लक्षणे, एड्सवर प्रतिबंधात्मक उपाय, एड्सचे परिणाम, एड्स जनजागृती यांचा आढावा आपण घेतला.

९.११ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) एड्स म्हणजे काय? एड्सच्या विविध अवस्था थोडक्यात सविस्तर स्पष्ट करा.

२) एड्स प्रसाराची कारणे सांगून, एड्सच्या लक्षणांची चर्चा करा.

३) एड्स म्हणजे काय? एड्स प्रतिबंधक उपाययोजना सविस्तर स्पष्ट करा.

४) एड्सचे पुढील घटकांवर होणारे परिणाम लिहा. अ) सामाजिक, ब) आर्थिक

५) एड्स जनजागृती कशाप्रकारे करता येईल यावर चर्चा करा.

६) टीपा लिहा.
   अ) एड्स जनजागृती.
   ब) कोणत्या घटकामुळे एचआयव्ही संसर्ग होत नाही?
   क) एचआयव्ही विषाणू.
   ड) एड्स अर्थ.

❖❖❖❖

१०

वृद्धांच्या व बालमजूरांच्या समस्या आणि स्त्रीयांचा अनैतिक व्यापार

पाठाची रचना :

१०.१ उद्दिष्ट्ये
१०.२ प्रास्ताविक
१०.३ वृद्धांच्या समस्या (प्रौढ नागरिकांच्या समस्या)
१०.४ बालमजूर
१०.५ मुलांचे दुरुपयोग / अत्याचार
१०.६ स्त्रीयांचा अनैतिक व्यापार
१०.७ सारांश
१०.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१०.१ उद्दिष्ट्ये

- वृद्धावस्थेचा अर्थ समजावून घेणे व वृद्धांच्या समस्यांची माहिती घेणे.
- वृद्धांच्या समस्यांची कारणे व उपाययोजना समजावून घेणे.
- बालमजूर अर्थ समजावून घेणे व आर्थिक व सामाजिक समस्यांचा आढावा घेणे.
- मुलांचे दुरुपयोग/अत्याचार कारणे व परिणाम माहिती घेता येईल.
- स्त्रीयांचा अनैतिक व्यापाराची माहिती होईल.

१०.२ प्रास्ताविक

जीवनमानातील सुधारणा आणि आरोग्य सोयींमध्ये झालेल्या वाढीमुळे मृत्युदरात झालेली घट आणि सरासरी आयुर्मानामध्ये झालेली वाढ ही विसाव्या शतकातील लोकसंख्यावाढीची दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. १९९१ च्या जनगणनेनुसार भारतात वृद्धांची म्हणजेच ६० वर्षावरील लोकांची संख्या ६ कोटी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ६.४ टक्के एवढी होती. २००१ च्या जनगणनेनुसार भारतात वृद्धांचे प्रमाण ७.७ टक्के म्हणजेच ७.७ कोटी एवढे होते. येत्या ५० वर्षात भारताची लोकसंख्या दुप्पट होईल. २०१५ मध्ये भारताच्या लोकसंख्येत वृद्धांचे प्रमाण १७ टक्के तर संख्या ३०.१० कोटी एवढी असेल.

वय वर्ष ६० म्हणजेच म्हातारपण कारण ६० वर्षानंतर विविध मानसिक व शारीरिक व्याधी जडलेल्या असतात. अर्थात सर्वांच्यात बाबतीत असे घडत नाही. कारण अनेक प्रौढ व्यक्तींची प्रकृती तरुणांना लाजवेल अशी असते. त्यांची शारीरिक व मानसिक स्थिती अत्यंत उत्कृष्ट असते. भारतातील वयोवृद्ध नागरिकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली दिसते. त्याचप्रमाणे त्यांच्या सरासरी आयुर्मानातही वाढ झालेली आहे. कारण आरोग्यसेवेतील झालेल्या मोठ्या प्रमाणावरील सुधारणा व आयुर्मानातील वाढ यामुळे वयोवृद्ध नागरिकांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते. वयोमानानुसार त्यांना लहान, मोठ्या, शारीरिक व मानसिक व्याधी जडलेल्या असतात. अनेकांची कुटुंबियांकडून अवहेलना होत असते. व्यवहारवादी बनत चाललेल्या समाजरचनेमुळे भारतीय समाजात ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या उद्‌भवत आहेत.

वृद्धावस्थेचे विभाजन :

१) **प्रारंगिक अवस्था :** सामान्यतः ६० ते ७० वयोमर्यादेच्या काळात ही अवस्था असते. ही अवस्था व्यक्तीचे शारीरिक आणि मानसिक संतुलन असणारी अवस्था असते. ही अवस्था प्रत्येक व्यक्तीची प्रकृती, राहणीमानाचा दर्जा, देशाचे हवामान या घटकांवर अवलंबून असते.

२) **परावलंबी अवस्था :** सामान्यपणे वयाच्या ७० वर्षापासून मृत्यूपर्यंत ही अवस्था असते. या अवस्थेत शारीरिक क्रिया स्वतंत्रपणे करण्यावरील व्यक्तीचे नियंत्रण कमी होत जाते. शारीरिक व मानसिक संतुलन नसणारी अशी ही अवस्था असते. या काळात व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून राहावे लागते. व्यक्तीचे मानसिक संतुलन पूर्वीप्रमाणे राहात नाही.

१०.३ वृद्धांच्या समस्या (प्रौढ नागरिकांच्या समस्या) (Problem of the Elderly Senior Citizens)

औद्योगिक समाजात निवृत्ती अटळ असते. त्यामुळे व्यक्तीच्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात अनेक बदल घडून येतात. आर्थिक मिळकत बंद झाल्यामुळे व्यक्तीची प्रतिष्ठा कायम राहात नाही. अर्थार्जन करता येत नसल्यामुळे वृद्ध व्यक्तीमध्ये मानसिक पोकळी निर्माण होते. व्यक्ती अर्थार्जन करीत असतांना व्यक्तीला असणारी सामाजिक प्रतिष्ठा आणि कुटुंबातील दर्जा अर्थार्जन बंद झाल्यानंतर कमी होतो. सेवानिवृत्त व्यक्ती आर्थिक आणि शारीरिक गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहते. त्यामुळे या परावलंबीत्वाचा वृद्धांना मानसिक त्रास होतो. त्याचबरोबर कुटुंबात ताणतणावर वाढतात. वार्धक्यामुळे व्यक्तीच्या वैयक्तिक कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात अनेक बदल घडून येतात.

१) **आरोग्यविषयक समस्या :** वार्धक्य ही काही व्याधी नाही. पण वार्धक्यामध्ये शरीरातील विविध अवयवांची कार्यक्षमता कमी होते. काही अवयव त्यांचे नियोजित कार्य करू शकत नाहीत. त्यामुळे अनेक व्याधी निर्माण होतात. शरीराच्या रचनेत अंतर्गत आणि बाह्य दोन्ही प्रकारचे बदल होतात. यामध्ये दात पडणे, चेहऱ्यावर व शरीरावर सुरकुत्या पडणे, हातापायांना कंप सुटणे इत्यादी बाह्य लक्षणे दिसून येतात. याबरोबर दृष्टी कमी होणे, रक्तदाब कमी अधिक होणे, मलमूत्र विसर्जनावरील नियंत्रण कमी होणे इत्यादी अंतर्गत व्याधी निर्माण होतात. अशा प्रकारे वार्धक्यामध्ये शरीरामध्ये अंतर्गत आणि बाह्य स्वरुपाचे बदल झाल्याने अनेक शारीरिक समस्या निर्माण होतात. व्यक्तीचा समाजातील सहभाग कमी होतो.

२) मानसिक समस्या – वृद्धावस्थेत शारीरिक संरचनेत होणाऱ्या बदलांप्रमाणे व्यक्तीच्या मानसिक संरचनेमध्येही बदल होतो. व्यक्तीची काही नवीन शिकण्याची इच्छा कमी होते. आपला कुटुंबाला काहीही उपयोग नाही अशी निराशावादी भावना निर्माण होते. वार्धक्यामध्ये व्यक्तीचे विस्मरण वाढते. आपण निरुपयोगी झाल्यामुळे आपल्याकडे कुणी लक्ष देत नाही, आपला सल्ला विचारत नाही. त्यामुळे निराशेत अनेकदा वृद्धांमध्ये चिडखोरपणा वाढीस लागतो. वृद्ध व्यक्तीमुळे कुटुंबात परस्परांमध्ये ताणतणाव निर्माण होतो.

३) कौटुंबिक समस्या : बऱ्याचदा जोडीदाराचा मृत्यू झाल्यामुळे वृद्ध व्यक्तीला एकाकीपणा येतो. इतरांकडून आपला तिरस्कार केला जातो आहे असे त्यांना वाटते. कौटुंबिक निर्णयप्रक्रिया आणि काम यामध्ये त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. पाश्चात्य परिणामामुळे अलिकडच्या काळात पाहिजे तेवढा आदर व सन्मानाची वागणूक मिळत नाही.

४) आर्थिक समस्या : वृद्धत्वामुळे निवृत्त व्यक्ती उत्पादनप्रक्रियेत सहभागी होत नसल्याने त्या व्यक्तीला वेतन मिळत नाही. निवृत्ती वेतनाची तरतूद नसेल तर व्यक्ती आर्थिकदृष्ट्या परावलंबी होते. वार्धक्यामध्ये आजारपणामुळे वैद्यकीय खर्च वाढलेला असतो. तो भागविणे त्यांना कठीण जाते. आर्थिक मिळकत नसल्यामुळे वैयक्तिक व कौटुंबिक जीवनावर परिणाम होतो. त्यांना आपले पूर्वीचे राहणीमान टिकविणे कठीण जाते. मानसिक ताण वाढतो. निवृत्ती वेतन नसेल तर अवस्था अत्यंत दयनीय होते. निराधार वृद्ध, वृद्धांची आत्महत्या, भिक्षावृत्ती यांसारख्या समस्या यातून निर्माण होतात.

५) सामाजिक समस्या : वार्धक्यामुळे व्यक्ती शारीरिक, मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या परावलंबी होते. वार्धक्यामुळे सतत घरी असणारी वृद्ध व्यक्ती कुटुंबातील व्यक्तींशी जुळवून घेऊ शकली तर फारशा समस्या निर्माण होत नाहीत. पण तसे झाले नाही तर कौटुंबिक स्वास्थ्य धोक्यात येते. दोन पिढ्यांतील अंतर वाढत जाते. वृद्ध व्यक्ती आपले अधिकार सोडायला तयार नसतात. त्यामुळे तरुण वर्गावर फार मोठ्या प्रमाणात मर्यादा निर्माण होतात. भारतात सध्या कुटुंबात तीन पिढ्यांमधील सामाजिक संबंध जिव्हाळ्याचे नाहीत ही मुख्य सामाजिक समस्या आहे. निवासस्थान अपुरे असेल तर या समस्यांमध्ये आणखी भर पडते. शहरांमध्ये रिकामा वेळ कसा घालवावा ही वृद्धांपुढील महत्त्वाची समस्या आहे.

६) सुरक्षाविषयक समस्या : वृद्धांना त्यांच्या शारीरिक अकार्यक्षमतेमुळे स्वतःचे संरक्षण करणे शक्य नसते. खेड्यामध्ये वृद्ध जोडप्याला किंवा एकाकी वृद्धाला भुरटे चोर मारहाण करून चोरी करतात. शहरातील सदनिका आणि बंगले या ठिकाणी वृद्धांच्या खुनाच्या आणि चोरीच्या घटना वाढत आहेत. वृद्धांना स्वतःचे संरक्षण दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे.

७) घराची समस्या : पूर्णपणे अंथरुणाला खिळून असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत राहण्यासाठी घराची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. सर्वसाधारणपणे ही समस्या मुंबईसारख्या मोठ्या शहरामध्ये जास्त प्रमाणात दिसून येते. अशा व्यक्तीला घरातील लहान खोलीमध्ये ठेवले जाते. त्यामुळे अशा व्यक्तीच्या बाबतीत घर म्हणजे तुरुंग बनतो.

८) शहरातील गुन्हेगारी : हल्ली मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरांमध्ये अनेक वयोवृद्ध व्यक्तींचे खून होत आहेत. ज्यांची मुले शिक्षणासाठी किंवा नोकरीच्या निमित्ताने इतर शहरांमध्ये किंवा परदेशी राहतात अशा अनेक वयोवृद्ध व्यक्ती एकट्याच शहरात राहतात. त्यामुळे त्यांना पूर्णपणे नोकरांवर अवलंबून राहावे लागते. आणि अनेकदा नोकर पैशासाठी खूनही करतात. म्हणजेच शहरातील गुन्हेगारी ही एक नवीनच समस्या प्रौढांपुढे उभी राहिली आहे.

९) मंद हालचाली : वयोमानानुसार चपलतेने हालचाली करता येत नाहीत. त्यामुळे शहरांमध्ये बस पकडणे, रेल्वेने प्रवास करणे किंवा स्वत: फिरण्यास जाण्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते आणि म्हणून अशा व्यक्तींना घरी चार भिंतींच्या आत कोंडून घेण्याशिवाय पर्यायच उरत नाही.

आपली प्रगती तपासा.

१) वृद्धांच्या समस्या स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.३.१ वृद्धांना निर्माण होणाऱ्या समस्यांची कारणे(Causes of Problem of Elderly)

प्रौढांना किंवा ज्येष्ठ नागरिकांना निर्माण होणाऱ्या समस्या पुढील कारणांमुळे निर्माण होतात.

१) म्हातारपण (Old Age) : म्हातारपणामुळे व्यक्तींना शारीरिक व मानसिक दौर्बल्य येते. त्यामुळे त्यांना ऐकू येत नाही व व्यवस्थित दिसतही नाही. त्यांच्या अशक्तपणाचा फायदा गुंड व मवाली लोक मोठ्या प्रमाणावर घेतात. मोठ्या शहरांमध्ये अशा प्रकारच्या घटना घडल्याचे आपण नेहमी वर्तमानपत्रात वाचत असतो. त्याचप्रमाणे या वयोवृद्ध व्यक्ती एकट्याच घरात असतात याचाही गैरफायदा घेतला जातो. म्हणजेच या सर्वांमागील कारण म्हणजे म्हातारपण होय.

२) आरोग्य (Health) : वयोवृद्धांना मोठ्या प्रमाणावर समस्या निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा आरोग्य हा घटक होय. वयोमानानुसार प्रौढांची प्रतिकार शक्ती कमी झालेली असते. त्यामुळे त्यांना अनेक व्याधी, रोग होतात. यामध्ये प्रामुख्याने हृदयरोग, श्वसनाचे आजार किंवा दमा इ. चा समावेश असतो.

३) मानसशास्त्रीय घटक (Psychological Factor) : निवृत्तीमुळे अनेक वृद्धांचे रोजचे वेळापत्रक बदलते. कायमस्वरूपी कार्यालयात असणारे निवृत्तीनंतर घरी बसून राहतात. त्यांच्या नियोजनाच्या अभावामुळे एकटेपणात भर पडते आणि मग हळुहळू आत्मविश्वास गमावून नंतर मानसिकता बिघडते.

४) कुटुंबातील सभासदांनी दुर्लक्ष करणे (Neglect by Family Member) : स्वतःचा मुलगा, सून किंवा इतर कुटुंबातील अगदी जवळच्या व्यक्ती स्वतःच्याच कामात व्यस्त व मग्न असतात, त्यामुळे ते घरातील वयोवृद्धांना पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. वयोमानानुसार विविध व्याधींनी त्रस्त असणाऱ्या वयोवृद्धांकडे कुटुंबातील सभासदांनी दुर्लक्ष केल्यास त्यांच्या समस्यांमध्ये वाढ होते.

५) आर्थिक घटक (Financial Factor) : अनेकदा म्हातारपणातील सर्व समस्यांचे मूळ कारण हे आर्थिक घटक हेच असते. पैसा जवळ असेल तर दवाखाना व्यवस्थित करता येतो आणि घरातील सभासदही जवळ राहतात व मदत करतात. अनेक समस्यांचे कारण पैसा हेच आहे.

६) दोन पिढ्यांतील अंतर (Generation Gap) : दोन पिढ्यांतील अंतर हे सुद्धा समस्या निर्माण करणारे महत्त्वाचे कारण होऊ शकते. वयोवृद्ध माणसांच्या वेळची पिढी, त्यांचे राहणीमान, संस्कार व संस्कृती इ. त्यांची नातवंडे व त्यांचे व त्यांचे राहणीमान, संस्कार व संस्कृती यामध्ये खूप फरक असतो. नातवंडे आज्ञाधारक असतीलच असे नाही. या सर्वांमुळे मानसिक त्रास होतो.

७) कारखाना केंद्रित उत्पादन पद्धती : भारतात ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी घरच्या परंपरागत उद्योगात सर्वांचाच सहभाग असे. यामध्ये वृद्धांच्याकडून विविध कौशल्ये पुढच्या पिढीला शिकविली जात. वृद्धही जमेल तसे घरच्या कामात मदत करीत असत. पण विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात कारखाना केंद्रित उत्पदन पद्धती सुरू झाल्याने ग्रामीण कारागिरीवर आधारित सर्व व्यवसाय बंद पडले. घरगुती उद्योग बंद पडल्याने वृद्धांच्या समस्यांमध्ये भर पडली.

८) शहरीकरणामध्ये वाढ : औद्योगिकरणामुळे जुन्या शहरांचा विस्तार झाला. नवी शहरे निर्माण झाली. मोठ्या प्रमाणात लोक नोकरी, व्यवसाय, शिक्षण, ग्रामीण दारिद्र्य, शहरांचे आकर्षण या कारणांमुळे शहरांकडे स्थलांतरित होऊ लागले. या स्थितीत वृद्ध व्यक्ती आपल्या गावीच राहू लागला. त्यामुळे सबंधांमध्ये दुरावा निर्माण झाला. त्यामुळे कौटुंबिक आनंद कमी झाला. वृद्ध व्यक्ती एकाकीपणे गावातच राहू लागल्या. त्यामुळे त्यांची हेळसांड होऊ लागली.

९) विभक्त कुटुंबपद्धती : औद्योगिकरण आणि शहरीकरण यामुळे संयुक्त कुटुंबपद्धती नष्ट झाली आणि पती, पत्नी आणि मुले अशी विभक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात आली. आईवडिलांना कोणी सांभाळायचे यावरून भावाभावात विसंवाद निर्माण होऊ लागला. यातून वृद्धांची परवड होते.

१०) वाढती व्यक्तीवादी प्रवृत्ती : शहरांमध्ये स्वतःची वैयक्तिक प्रगती जास्तीत जास्त करून घेण्यावर लोकांचा भर असतो. यासाठी ते स्वतःच्या इच्छा, महत्त्वाकांक्षा यांना अधिक महत्त्व देतात. यासंदर्भात वृद्धांच्या इच्छांचा विचार केला जात नाही. कुटुंबातल्या सर्वांचा विचार न करता फक्त स्वतःच्या स्वार्थाचा व्यक्ती जास्तीत जास्त विचार करते. यासंदर्भात वृद्ध आईवडिलांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होते.

आपली प्रगती तपासा.

१) वृद्धांच्या समस्यांची कारणे स्पष्ट करा.

१०.३.२ प्रौडांच्या समस्यांचे परिणाम (Implications of Problems of Elderly):

वृद्धांच्या समस्यांचे परिणाम त्यांना स्वतःला व कुटुंबातील सदस्यांना जाणवतात.

अ) स्वत:वर होणारे परिणाम (Effects of Self) – वयोवृद्धांना वयोमानानुसार मानसशास्त्रीय परिणामांना सामोरे जावे लागते. मानसशास्त्रीयदृष्ट्या ते दुर्बल बनतात. त्यामुळे त्यांची स्मरणशक्ती कमी होते, झोप लागत नाही, दुसऱ्यांवर ओरडणे इत्यादीमुळे त्यांच्या मानसिक व शारीरिक समस्या उद्‌भवतात. परिणामतः त्यांच्या स्वतःच्या प्रकृतीवर परिणाम होतो. त्यामुळे अनेक शारीरिक व्याधी त्यांच्या मागे लागतात. वृद्धांना निवृत्तीमुळे आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. आर्थिक अडचणीच्या समस्येमुळे त्यांना स्वतःचा दवाखाना व्यवस्थित करता येत नाही. जवळच्या मित्रांच्या व नातलगांच्या गाठीभेटी घेणे अवघड होते. या सर्वांचा त्यांच्या मनावर व शरीरावर परिणाम होतो.

ब) कुटुंबातील सभासदांवर होणारे परिणाम (Effects on Family Members) : वयोमानानुसार निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे घरातील सभासद व जवळच्या नातलगांवर त्याचा परिणाम होतो. सध्याच्या विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरांमध्ये नवरा, बायको व मुलं एवढेच असतात. त्यामुळे वयोवृद्धांची देखभाल करण्यासाठी घरातील व्यक्तींना व जवळच्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागतो. कायम अंथरुणावर असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत तर घरात येणाऱ्या सर्व नातलगांना त्यांचा परिणाम सहन करावा लागतो. कायमचा दवाखान्याच्या खर्च यामुळे घरातील अंदाजपत्रक कोलमडते, नेहमी आजारी असल्याने घरामधील काम करणाऱ्या सभासदांच्या कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होतो. घरामध्ये व कार्यालयामध्ये ते कार्यक्षमपणे काम करू शकत नाहीत. अनेकदा त्यांना रजा घेऊन घरी थांबावे लागते. त्यामुळे मासिक उत्पन्नावर त्याचा परिणाम होतो.

आपली प्रगती तपासा.

१) प्रौढांच्या समस्यांचे परिणाम विशद करा.

१०.३.३ प्रौढ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना :

प्रौढ नागरिकांनी त्यांच्या तरुण वयात त्यांच्या कुटुंबाची, समाजाची व देशाची सेवा केलेली असते. त्यामुळे त्यांच्या ऋणाची परतफेड करण्यासाठी कुटुंब, समाज व देशपातळीवर उपाययोजना करणे अतिशय महत्त्वाचे आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये वृद्धांसाठी विशेष तरतुदी करण्यात येतात. भारतामध्ये अजूनतरी अशा प्रकारच्या कोणत्याही तरतूदी करण्यात येत नाहीत.

प्रौढ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढील दोन प्रकारे उपाययोजना करता येते-

अ) संस्थात्मक उपाययोजना / कायदेशीर उपाययोजना,
ब) व्यक्तीगत उपाययोजना

अ) संस्थात्मक उपाययोजना (Legislative Remedies) – आर्थिक सुरक्षितता सर्वात महत्त्वाचा उपाय वयोवृद्धांच्या बाबतीत होऊ शकतो आणि नेमकी तीच तरतूद वृद्धांना करणे आवश्यक असते. त्यासाठी संस्थात्मक किंवा शासनामार्फत तरतूदी करणे गरजेचे असते. भारतामध्ये पुढील संस्थात्मक उपाययोजना करता येतील.

१) समावेशनाची तरतूद (Provision of Involvement) – वयोवृद्ध व्यक्तींना सामाजिक कार्यक्रमामध्ये मोठ्या प्रमाणावर समाविष्ट करुन घेतले पाहिजे. ज्यांची शारीरिक प्रकृती अगदी व्यवस्थित आहे. असे वयोवृद्ध निवृत्तीनंतरही १० ते १५ वर्षे उत्साहाने काम करू शकतात. प्रौढांजवळ प्रचंड अनुभव व परिपक्वता असते. त्यांच्या अनुभवाचा तरुणांना फायदा करून घेण्यासाठी समावेशकतेची तरतूद करण्यात यावी.

२) प्रौढांशी उद्धट वागणाऱ्याविरूद्ध कायदा (Prevention of Elder abuse) : वृद्धांना खरोखरच सन्मानाने वागवायचे असेल तर उद्धटपणे वर्तणूक करणाऱ्या व्यक्तीसाठी गुन्हेगारी कायद्याखाली एक नियमावली तयार करुन त्यामध्ये वृद्धांच्या कुटुंबातील सभासदांसाठीही तरतूद करण्यात यावी तरच वृद्धांना समाजात मानाने व सन्मानाने त्यांचे जीवन व्यतीत करता येईल.

३) वृद्धाश्रम आणि स्वयंसेवी संस्थांना आर्थिक मदत (Old age home & Home Financial old to NGO's) : जास्तीत जास्त लोकांना समाविष्ट करून घेण्यासाठी सरकारने मोठ्या संख्येने वृद्धाश्रम स्थापन करुन त्यामध्ये औषधोपचार व वृद्धांची इतर देखभाल करण्याची व्यवस्था करावी. ज्या लोकांची त्यांच्या कुटुंबातील सभासद देखभाल करीत नाहीत किंवा ज्यांना जवळचे असे कुणीच नातेवाईक नाहीत अशा वृद्धांना याचा उपयोग होईल. वृद्धाश्रम स्थापन करण्यासाठी सरकारने संबंधित क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना आर्थिक व इतर मदत केल्यास अनेक स्वयंसेवी संस्था हे कार्य अतिशय कार्यक्षमतेने व तत्परतेने करतील.

४) वृद्धांना रोजगार पुरविणे : सशक्त, उत्साही व गरजू वृद्धांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रामध्ये वार्षिक मानधनावर नेमणूक केल्यास कार्यक्षम वृद्ध यासाठी तयार होतील. निवृत्तीनंतरही काम

करण्यास अनेक वयोवृद्ध व्यक्ती तयार असतात. त्यांना फक्त संधी द्यावी लागेल. त्यामुळे त्यांची मानसिक व शारीरिक प्रकृती उत्तम राहते. त्यांच्या अनुभवाचा लाभ संशोधनासाठी, प्रशिक्षणासाठी व विकासासाठी करून घेणे महत्त्वपूर्ण आहे.

५) राष्ट्रीय भविष्य निर्वाह निधी योजना (National old age Pension Scheme) – वृद्धांच्या कल्याणाकरिता केंद्र सरकाने वृद्धांसाठी राष्ट्रीय भविष्यनिर्वाह निधी योजना सुरू करावी. ज्या वृद्धांची भविष्यासाठी कोणतीच तरतूद नाही अशा वृद्धांसाठी अशाप्रकारच्या योजनेची तरतूद करण्यात यावी. ही योजना राज्यानुसार वेगवेगळी असावी.

६) अन्नपूर्णा योजना (Annapurna Scheme) : एप्रिल २००० मध्ये अन्नपूर्ण योजना तयार करण्यात आली. याचा उद्देश गरजू वृद्धांना की जे भविष्यनिर्वाह निधी मिळविण्यास पात्र आहेत परंतु त्यांना तो मिळालेला नाही. अशा वृद्धांना रोज १० कि.ग्रॅ. अन्न विना मोबदला दर महिन्याला पुरविण्यात येते. सन २००२-०३ पासून ही योजना राज्य सरकारांकडे हस्तांतरीत करण्यात आली.

ब) व्यक्तिगत उपाययोजना (Personal Remedies) - तरुण वयात योग्य ती काळजी घेतल्यास वृद्धापकाळी येणाऱ्या समस्यांवर थोड्याफार प्रमाणावर निश्चितच मात करता येत. व्यक्तिगत स्वरुपाच्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत-

१) तंदुरुस्त राहा - प्रत्येकाने आपापल्यापरिने शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्याचा प्रयत्न करणे. पुरेपूर व्यापाम, योग्य आहार, मद्य पदार्थाचे सेवन टाळणे आणि तंबाखू, विडी, सिगारेट यांच्यापासून दूर राहणे, चांगल्या सवयी व त्यामध्ये सातत्य असल्यास निश्चितपणे वृद्धपकाळाताली अनेक समस्या आपोआप कमी होतील.

२) छंद जोपासणे - एकाकीपणा कमी करण्यासाठी विविध छंद सुरुवातीपासून विकसित केल्यास म्हातारपणीच्या अनेक समस्या कमी होतील. कायमस्वरुपी त्या छंदामध्ये व्यस्त राहता येईल. त्यामुळे निश्चितपणे मानसिकता सुधारेल.

३) म्हातारपणीही सक्रीय राहणे - वृद्धांनीही स्वतः विविध कार्यक्रमामध्ये सहभाग घेऊन स्वतःला सक्रीय ठेवले पाहिजे. शारीरिक श्रम करावे लागणार नाहीत अशा प्रक्रियेमध्ये स्वतःला गुंतवून घेतल्यास वेळ जाईल आणि त्यामुळे मानसिकताही बिघडणार नाही. समाजसेवा करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनात किंवा तीर्थक्षेत्र इत्यादी ठिकाणी स्वतःला गुंतवणूक घेणे शक्य असते.

४) आर्थिक स्वावलंबन : प्रत्येकाने सुरुवातीपासूनच म्हातारपणासाठी आर्थिक तरतूद करून ठेवली पाहिजे. आर्थिक स्वावलंबनामुळे अनेक समस्या आपोआपच सुटतात. यासाठी भविष्य निर्वाह निधी योजना, एल.आय.सी. व इतर चांगला परतावा मिळून देणाऱ्या ठेवींमध्ये गुंतवणूक करावी. अनेक समस्यांवर पैसा हे रामबाण औषध आहे.

५) हस्तक्षेप करु नये – सध्याचे युग हे अतिशय गतिमान बनले आहे व ते रोज बदलत आहे. या गतिमान बदलत्या युगाप्रमाणे प्रत्येक वृद्धाने स्वत:ला बदलले पाहिजे. शक्यतो तरुणांच्यामध्ये हस्तक्षेप टाळावा. कारण त्यांना ते आवडत नाही आणि वृद्धांनाही बदलत्या युगाती गती पकडता येत नाही.

आपली प्रगती तपासा.

१) वृद्धांच्या समस्यांच्या उपाययोजना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.४ बालमजूर (Child Labour) :

बाल मजुरीची समस्या ही प्राचीन व विश्वव्यापी त्याचप्रमाणे आर्थिक व सामाजिक समस्या आहे. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये सूत गिरणीमध्ये काम करणाऱ्या मुलांची दशा दयनीय होती. बाल मजुरांची पिळवणूक करण्याचे काम भारतातही मोठ्या प्रमाणात चालू आहे.

व्याख्या– कोणतेही उद्योग, खाणी, कारखाने इत्यादीमध्ये मानसिक व शारीरिक श्रम करणाऱ्या १४ वर्षांच्या खालील मुलांना बाल मजूर म्हटले आहे.

भारतीय संविधानाच्या २४ व्या अनुच्छेदात स्पष्ट लिहिले आहे की, १४ वर्षाखालील मुलांकडून खाणी व कारखान्यांमधून काम करून घेतले जाणार नाही. विशेष करून जी कामे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम घडवून आणतात.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (**ILO**) मते; "बाल मजूर म्हणजे अशी अल्पवयीन व्यक्ती की, जिच्यावर अकाली प्रौढत्व लादले जाते. त्याच्या शारीरिक आणि बौद्धिक क्षमतेचा विचार न करता कमी वेतनावर कष्टाची काम करण्याची सक्ती केली जाते."

१०.४.१ भारतातील बालमजुरांची समस्या (Problems of Child Labour in India)

भारतातील बाल मजुरांची सर्वात महत्त्वाची आणि सर्वमान्य समस्या म्हणजे त्यांची होणारी पिळवणूक ही होय. जगातील सर्वाधिक बाल मजूर भारतात आहेत. बालकांचे शोषण करण्याविरूद्ध कायदा अस्तित्वात असूनही अशा प्रकारची परिस्थिती भारतामध्ये आढळून येते.

आगकाडी किंवा फटाक्यांच्या उद्योगांमध्येही मोठ्या प्रमाणावर बालमजूर काम करत आहेत. बाल मजुरांचे काम करण्याचे दुसरे मोठे ठिकाण म्हणजे घरगडी हे होय. त्याप्रमाणे हॉटेल, कॅन्टीन व बांधकामे इत्यादी ठिकाणी लहान मुले मोठ्या प्रमाणावर काम करताना दिसून येतात.

२००१ च्या जनगणनेप्रमाणे देशातील एकूण कामगारांच्या संख्येमध्ये बाल कामगारांचे (म्हणजेच वय वर्ष ५ ते १७) प्रमाणच जास्त आहे. या जनगणनेप्रमाणे २००१मध्ये ४०२२.३५ लाख कामगार होते. त्यापैकी २८३.४८ लाख बाल कामगार होते. बाल कामगार प्रामुख्याने जंगले, कारखाने व मोटार गाड्या दुरुस्तीची गॅरेजेस इ. ठिकाणी काम करतात. गरीबी आणि उपासमार टाळण्यासाठी ग्रामीण भागातून बाल कामगारांना शहरात आणले जाते. अशाप्रकारे ग्रामीण भागातून आलेल्या मुलांपैकी अनेक मुले शहरांमध्ये लहान-मोठ्या चोऱ्या करणे, पाकीटमार करणे किंवा हॉटेलमध्ये काम करताना दिसून येतात.

१०.४.२ बालमजुरांच्या समस्येची व्याप्ती

१) दारिद्र्य व विपन्नता : दारिद्र्य व विपन्नता याचबरोबर अत्यंत निकृष्ट दर्जाचे राहणीमान बाल कामगारांना विविध व्यवसायात मजूर म्हणून काम करायला भाग पाडते.

२) कुपोषण व आजार : दारिद्र्य व विपन्नता याचबरोबर बाल कामगारांना अत्यंत निकृष्ट दर्जाचा आहार मिळतो. शारीरिक कुपोषणाबरोबर अनेक दुर्धर आजारांना बालकामगार बळी पडतो.

३) निकृष्ट दर्जाचे राहणीमान : बालकामगार शहरी भागात, औद्योगिकरण झालेल्या परिसरात प्राथमिक सोयींचा पूर्णपणे अभाव असणाऱ्या झोपडपट्ट्यांमध्ये राहतो. त्याचे राहणीमान अतिशय निकृष्ट दर्जाचे असते.

४) अधिक तास काम : बालमजुरांकडून दिवसभरातील किती तास काम करुन घ्यावे याबाबत कोणत्याही प्रकारचे नियम नाहीत. त्यामुळे काही ठिकाणी बालकामगारांकडून दररोज १० ते १२ तास काम करुन घेतले जाते.

५) पुरेसे जेवण व सुट्टीचा अभाव : भारतात ५ ते १८ या वयोगटातील मुले पुरेसे जेवण व सुट्टीशिवाय १० ते १२ तास काम करतात.

६) अतिशय कमी वेतन : हॉटेल्स, गॅरेज, खाणी, कापड व ताग गिरण्या यांसारख्या व्यवसायात बालकामगारांची फार मोठ्या प्रमाणात नियुक्ती केली जाते. याचे कारण प्रौढ कामगारांपेक्षा या कामगारांना कमी वेतन देता येते.

७) निरक्षरता : बालकामगारांच्या जीवनातील ५ ते १५ वर्ष हे वय अत्यंत संवेदनशील असते. शिक्षणाच्या मार्गाने शारीरिक आणि मानसिक विकास याच काळात होत असतो. बालकामगारांना शिक्षणापासून वंचित राहवे लागते.

आपली प्रगती तपासा.

१) बालमजुरांच्या समस्येची व्याप्ती स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.४.३ भारतातील बालमजुरांची कारणे (Course of Child Labour in India) :

भारतात बाल मजुरांच्या संख्येत वाढ होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत-

१) दारिद्र्य : लहान मुलांना काम करावे लागण्याचं मुख्य कारण म्हणजे दारिद्र्य किंवा गरीबी होय. भारतातील ४० टक्के जनता आज देखील दारिद्र्यात जीवन जगत आहे. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील पालक आपल्या मुलांकडे व्यवस्थित लक्ष देऊ शकत नाहीत व त्यामुळे या मुलांना लहान वयात काम करणे भाग पडते.

२) लोकसंख्या वाढ : लोकसंख्येचा विस्फोट हे दारिद्र्याचे एक कारण आहे. भारताने विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे. परंतु लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात ती कमीच आहे. त्याचप्रमाणे भारतीय शेती पावसावर अवलंबून असल्याने तीही सर्वांना सामावून घेऊ शकत नाही. त्यामुळे बालमजूरीत वाढ होऊ लागते.

३) बेरोजगारी : शिक्षण घेऊनसुद्धा रोजगार मिळत नाही असे चित्र सध्या आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात आणि बाल मजुरांकडून जास्त काम करुन घेतले जाते. अनेकदा घरातील कर्त्या पुरुषालाच रोजगार नसल्याने लहान मुलांना कामावर पाठविण्याशिवाय पर्यायच उरत नाही.

४) अशिक्षितपणा : आज भारतात निरक्षरतेचे प्रमाण कमी आहे. आई-वडील अडाणी असल्याने ते लहान मुलांना सोबत घेऊन रोज कामावर जातात. त्यामुळे मुलांना शाळेत पाठविण्याऐवजी कामावर नेल्यास कुटुंबाची मिळकत वाढते अशा चुकीच्या समजूतीने त्यांना लहान वयातच कामगार बनवले जाते.

५) कारखानदारांची मनोवृत्ती व कायदे : कमी पगारात जास्त वेळ काम करण्यास बालकामगार तयार होतात. विशेष म्हणजे घाणीच्या ठिकाणी किंवा असुविधाजनक वातावरणात देखील ते चुपचाप तासन्तास काम करतात. तसेच लहान मुलांकडे बारीक व कौशल्याची काम करण्याची कला असते. गालिचे विणणे, काच उद्योग, जरीकाम व हिऱ्यांना पॉलिश करणे यांसारख्या हस्त उद्योगांमध्ये लहान मुलांना कामावर घेतले जाते.

बालमजूर प्रतिबंध व नियंत्रण कायदा १९८६ यासारखे अनेक कायदे करण्यात आले आहेत. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. १४ वर्षाखालील मुलांना कामावर ठेवणे हा फॅक्टरी कायद्याने शिक्षेस पात्र गुन्हा आहे. तरीसुद्धा हा कायदा कागदोपत्रीच राहतो. कारखानदार त्याकडे दुर्लक्ष करतात आणि सरकारही अशा मालक वर्गावर कार्यवाही करीत नाहीत. म्हणून बाल कामगार कायदे कमकुवत आहेत.

६) शाळांची कमतरता : मुले शाळेत जात नाहीत म्हणून त्यांच्यावर कामाला जाण्याची सक्ती केली जाते. शाळांची अपुरी संख्या, शाळांचा अभाव तसेच शाळेचा खर्च परवडत नसल्यामुळे मुले शाळेत जात नाहीत. त्यामुळे त्यांना कामाला जावे लागते.

७) पालकांचा दृष्टीकोन : काही पालकांना असे वाटते की केवळ औपचारीक शिक्षण निरुपयोगी आहे. त्याऐवजी जीनासाठीची कौशल्ये मुलाने लहान वयातच शिकून घेतली पाहिजेत. त्यासाठी मुलांना शाळेत पाठवण्याऐवजी ते त्यांना कामावर पाठवतात.

८) सामाजिक आर्थिक सक्ती : कुटुंबाचा सामाजिक व आर्थिक दर्जा आर्थिक परिस्थितीशी संबंधीत आहे. आजुबाजुची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती अशी असते की, त्यामुळे मुलांवर कामाची सक्ती होते.

९) ग्रामीण भागात पर्यायांचा अभाव : ग्रामीण भागात बालमजुरांचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भागात बालमजुरी शेती आणि संबंधित उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळते. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांमध्ये असंघटित क्षेत्रात बालमजुरांचे प्रमाण अधिक आहे.

आपली प्रगती तपासा.

१) बालमजुरीची कारणे स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.४.४ बालमजुरीचे दुष्परिणाम (Bad Effects of Child Labour) :

बालमजुरीचे आर्थिक व सामाजिक परिणाम होत असल्याने बालमजुर समस्येचे गांभीर्य मोठ्या प्रमाणावर जाणवते. बालमजुरीचे दुष्परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

१) आरोग्यावर परिणाम : कडक ऊन, थंडी, संततधार पाऊस अशाच वातावरणात ही मुले काम करतात. त्यामुळे ते अनेक रोगांचे शिकार बनतात. याचे दीर्घकालीन दुष्परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. अनेकदा त्यांची शारीरिक व मानसिक वाढही खुंटते.

२) अमानुष वागणूक : बाल कामगारांकडे मानवाच्या व सन्मानाच्या दृष्टीने बघितले जात नाही. मालकांकडून या बालकांना सतत रागावणे, शिव्या घालणे आणि कधी कधी तर मारण्यापर्यंत त्यांची मजल जाते. या वागणुकीमुळे मुलांची बालपणातील चंचलता आणि मस्ती नाहीशी होते. यामुळे अनेक बालके मानसिकदृष्ट्या विक्षिप्त होतात.

३) शिक्षण व व्यक्तिमत्व विकासापासून वंचित : लहान वयातच कुटुंबासाठी पैसे कमवून आणावे लागत असल्याने या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. पालक निरक्षर असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही. पालकांचे दुर्लक्ष आणि शिक्षणाचा अभाव यामुळे लहान बाल कामगारांना त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची संधीच मिळत नाही. कारण कामाच्या ठिकाणी त्यांना खूप कष्टाचे काम करावे लागते.

४) देशाच्या प्रतिमेला धक्का : जगामध्ये सर्वात जास्त बाल कामगार आहेत ही बाब देशाच्या दृष्टीने आणि देशातील सरकारच्या दृष्टीने मानहानीकारक आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतिमा डागळत आहे.

५) संघर्षग्रस्त बालके : लहान वयातील बालकांकडून केल्या जाणाऱ्या समाजविघातक कृत्यांना बालगुन्हेगारी आणि अशी कृत्ये करणाऱ्या मुलांना संघर्षग्रस्त बालक असे म्हणतात. मालकांकडून लहान मुलांची पिळवणूक होते आणि त्यांच्या पालकांचेही त्यांच्याकडे दुर्लक्ष होते. व्यसनाचे शरीरावर कोणते परिणाम होतात याचे ज्ञान नसल्याने शेवटपर्यंत वाईट सवयींच्या आहारी जातात. त्यामुळे अशी मुले गावातून मुंबईसारख्या शहरात पळून जातात. शहरात त्यांना लगेच रोजगार मिळत नाही. त्यामुळे ती मुले वाममार्गाला लागतात.

६) व्यसनाधिनता : शिक्षणाचा अभाव व लहान वयात हातात पैसा येत असल्याने आणि लहान वयातच मोठ्या श्रमाची कामे करावी लागत असल्याने ही बालके व्यसनाच्या आहारी जातात. त्यामुळे त्यांच्या स्वत:च्या व कुटुंबाच्या विनाशास कारणीभूत ठरतात.

७) देशाच्या मानवी संसाधनेत अडथळा : मानवी संसाधन ही देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे. देशाच्या विकासात त्याची महत्त्वपूर्ण कामगिरी असते. आजची लहान पिढी हीच उद्याची देशाची आधारस्तंभ पिढी आहे. हीच मुले जर लहान वयात अशक्त व व्यसनाधीन होणार असतील तर देशाच्या भवितव्याला निश्चितच धोका निर्माण होईल.

८) पिळवणूक : शक्यतो ग्रामीण भागामध्ये पालकच मुलांना लहान वयातच काम करण्यास प्रवृत्त करतात. मालक वर्गही लहान मुलांचे शोषण विविध प्रकारे करतो. उदा. कमी वेतन देणे, कामाचे तास जास्त ठेवणे, कामाच्या ठिकाणची असमाधानकारक परिस्थिती इत्यादी.

आपली प्रगती तपासा.

१) बालमजुरीचे दुष्परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.४.५ बालकामगार समस्येवर उपाययोजना :

बालकामगार ही समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालली आहे. म्हणूनच या समस्येची दखल राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जात आहे. सरकारद्वारे किंवा कायदे करुन कोणतीही समस्या समूळ नष्ट होत नाही. त्यासाठी कायदे सोडून इतर मार्गाने परिस्थितीत बदल घडवून आणण्याची गरज आहे. यासाठी पुढील काही उपाययोजना सुचविता येतात.

१) दारिद्र्य निर्मुलन : दारिद्र्य व गरीबी यामुळे मोठ्या प्रमाणावर बालमजूर तयार होतात. यासाठी देशात प्रामाणिकपणे दारिद्र्य निर्मुलनचे प्रयत्न झाले पाहिजे. दारिद्र्य निर्मुलनचे अनके कार्यक्रम भ्रष्टाचारामुळे कागदावरच राहतात. खऱ्या अर्थाने या योजना गरीबांपर्यंत पोहोचतच नाहीत. त्या गरिबांपर्यंत कशा पोहोचतील याची भविष्यात काळजी घेतल्यास दारिद्र्य निर्मुलन होण्यास मदत होईल.

२) शिक्षणाबरोबर रोजगार प्राप्तीची संधी : गरीब कुटुंबातील मुलांना कमवा व शिका यांसारख्या योजना प्रत्येक ठिकाणी राबविण्यात याव्यात. शाळेतील शिक्षणच जर त्यांना रोजगाराभिमुख दिले तर त्यांच्याकडून काम करुन घेता येईल. यामुळे मुलांचा स्वतःचा विकास होईल.

३) मोफत शिक्षण व सवलती : गरीब व अनाथ मुलांना मोफत शिक्षण त्याचबरोबर त्यांची राहण्याची, भोजनाची व कपड्यांची सोय केल्यस बालमजुरांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर घट होईल.

४) प्रौढ शिक्षण : निरक्षर पालक हेच अनेक बालमजुरीचे कारण असू शकते. यासाठी बालमजुरांच्या अशिक्षित आई-वडीलांना प्रौढ शिक्षण देण्याची आज गरज आहे. तरच ते आपल्या पाल्याच्या भविष्याचा विचार करतील.

५) शिक्षणाची आवड व जागरुकता : भारतामध्ये सर्वसाधारणपणे विशेषतः ग्रामीण भागात प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण जास्त आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी मुलांना शिक्षणाची आवड निर्माण होईल. शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये व ग्रामीण भागात सामाजिक कार्यकर्त्यांनी जाऊन पालक वर्गामध्ये जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, मुलांच्या भवितव्याविषयी पटवून देणे आणि याविषयी त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याची गरज आहे.

६) वेठबिगारीतून मुक्तता : ग्रामीण भागातून अनेक लोक सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी स्वतःच्या लहान मुलांना सावकाराकडे पाठवितात. अशाप्रकारची वेठबिगारी शोधून काढावी. यामध्ये जमिनदार व सावकारांचा समावेश मोठ्या प्रमाणावर आहे. यासाठी त्याच्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक कायदे करावेत.

७) सर्वेक्षण पद्धतीत बदल : बाल मजुरांचे सर्वेक्षण किंवा गणना होत आहे असे समजल्यावर अनेक मालक बाल मजुरांना कामावरुन सुट्टी देतात. त्यामुळे बाल मजुरांचा निश्चित आकडा

उपलब्ध होत नाही. यासाठी सर्वेक्षणाच्या या पद्धतीत अमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. हेच काम राष्ट्रीय सेवा योजना किंवा समाजशास्त्रातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांकडून करुन घेतल्यास सत्य परिस्थिती समजण्यास मदत होईल.

आपली प्रगती तपासा.

१) बालकामगार समस्येवर उपाययोजना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.५ मुलांचा दुरुपयोग /अत्याचार

मुलांच्या दुरुपयोगाचे तीन प्रकार करता येतील.

१) शाररीक अत्याचार २) दुय्यम अत्याचार

३) अदैनंदिन अत्याचार यांचे प्रकार स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

१०.५.१ दुरुपयोगांचे परिणाम

१) **शाररीक अत्याचार** –

शाररीक दुरुपयोगामध्ये मुलांचा शाररीक छळ करणे मारहाण करणे, याचा समावेश होतो. बऱ्याच वेळा आईवडीलांना असे वाटते आपल्या मुलाची हीच लायकी आहे.

२) **दुय्यम आत्याचार** –

यामध्ये काही पालकांना वाटते आपण करतो ते योग्य आहे तर काहींना वाटते अयोग्य आहे.

३) **अदैनदिन अत्याचार** –

यामध्ये पुढील प्रकारांचा समावेश होतो.

अ) **ज्वालामुखी अत्याचार -** यामध्ये अत्याचार करणाऱ्याला विशिष्ट असे ध्येय प्राप्त करावयाचे नसते. असे पालक आपल्या व्यवसायातील अपयशाबदल लक्ष करुन त्यांच्यावर अत्याचार करतात.

ब) **अमली पदार्थांच्यामुळे होणारे अत्याचार** – पुरुष मद्यपदार्थ्यांच्या सेवनामुळे आपली सदसदविवेक बुध्दी धान ठेवून नशेमध्ये आपल्याच मुलांवर अत्याचार करतो.

क) **लैगिंक अत्याचार** – सावत्र आई, सावत्र मुलावर अत्याचार करते किंवा सावत्र बाप, सावत्र मुलीवर अत्याचार करतो यालाच लैगिंक अत्याचार असे म्हणतात.

ख) **भावनिक अत्याचार** – शाररीक क्षमता दाखविण्यासाठी काही वेळ पालक आपल्या आपत्यांवर अन्याय करतात.

ग) आपल्या पाल्याचे वर्तन बदलण्यासाठी नाहीतर आपण त्याचे पालक आहोत हे भासविण्यासाठी ते अत्याचार करतात.

४) **लैगिंक अत्याचार** – लैंगीक अत्याचार म्हणजे अपरीपक्क मुलांचे लैगींक व्यवहारात उपयोग करुन घेणे होय. १८ वर्षाखालील मुलामुलींना या व्यवसायात गुंतवणे म्हणजे त्यांच्यावर अत्याचार करणे होय.

* या व्यवसायात मुलांपेक्षा मुलींवर अधिक अत्याचार होतात.
* १४ वर्षावरील मुलां-मुलींचे लैगिंक शोषण जास्त प्रमाणात केले जाते.
* मुलांचे लैगींक शोषण एखादया व्यक्तीकडून केले जाते तर मुलींचे लैगींक शोषण अनेक व्यक्तींकडून केले जाते.
* आर्थिक दृष्टया कमकूवत कुंटुबातील मुला-मुलीचे शोषण केले जाते.
* कामाच्या ठीकाणी शोषण होण्याचे प्रमाण जास्त आहे.

५) **भावनिक अत्याचार** – मुलांकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना वाईट वागणूक देणे म्हणजे त्यांच्यावर केलेला भावनिक अत्याचार होय. मुलांच्या सामाजिक शाररीक, भावनिक, नैतीक गरजांकडे दुर्लक्ष करणे याचा यात समावेश होतो. मुलांना सकस, योग्य आहार, न देणे, कपडे न देणे, त्यांना संरक्षण न देणे म्हणजेच त्यांचा शाररीक अत्याचार होय. त्यांच्यावर भावनीक प्रेम व करणे म्हणजे भावनीक अत्याचार.

ज्या परांमधे कमाई कमी व खर्च ज्यादा व मुलेही ज्यादा असतात अशा कुटुंबामधे मुलांवर अत्याचार होण्याचे प्रमाण जास्त असते. तसेच जे पालक स्वभावाने तापट असतात तेही मुलांवर अन्याय करतात.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - मुलांवरील अत्यचार स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.५.२ मुलांवरील अत्याचारांची कारणे - याची अनेक कारणे आहेत त्यापैकी काही खालील प्रमाणे –

i) शाररीक अत्याचाराची कारणे –

* मुले पालकांचे ऐकत नाही.
* पालकांची सतत भांडणे होणे व मुलांना बळीचा बकरा बनवणे.
* मुलाने अभ्यास न करणे.
* घटातून फार काळ बाहेर राहणे.

* भांडणे करणे.
* काम करुन आणलेले सर्व पैसे पालकांना न देणे.
* मुलाच्या वर्तनाबद्दल सतत तक्रारी येणे.
* चोरी किंवा गैरवर्तन करणे.

ii) लैगींक अत्याचाराची कारणे –

* पालकांमधील संघर्ष
* मुलांना घरातून भावनीक प्रेम न मिळणे
* वडीलांचे दारु पिणे
* मुलांवर दुर्लक्ष करणे
* आईवडीलांचे विवाह बाहय संबध
* सावत्र बाप असणे.

iii) शाररीक अत्याचाराची कारणे –

* गरीबी
* पालकांचा स्वतांवर नियत्रण नसणे
* पालकांनी स्वतः लहाणी भोगलेले अत्याचार
* पालकांचा नशेबाजपणा

आपली प्रगती तपासा

प्रश्न - मुलांवरील अत्याचाराची कारणे सांगा

_____

_____

_____

_____

१०.५.३ मुलांवरील अत्याचाराचे परीणाम –

१) अत्याचारामुळे मुलांचा आत्मविश्वास कमी होतो. त्यामुळे त्यांचे अभ्यासान, कामात लक्ष लागत नाही. आपण इतरांपेक्षा वेगळे, कमी आहोत अशी भावना त्यांच्यात निर्माण होतो.

२) जबाबदारीमुळे कुचंबणा होते. मुले स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी काम करत असल्यामुळे ते पालकांवर अवलंबून राहत नाहीत.

३) वर्तनावरील वाईट परीणाम – मुलांच्या सामाजिक वर्तनावर वाईट परीणाम होतो. ते सामाजिक बळी जातात. शाळेत गैरहजर राहणे. कामावर न जाणे, सिगारेट पीणे, दाद देणे, चोरी करणे, अश्या प्रकारचे गुन्हे करु शकतात.

४) सामाजिक नाती तयार करण्यास अपयशी ठरतात. कुटुंबातच मान मिळत नसल्यामुळे त्यांना असुरक्षित वाटते व ते समाजात मित्र – मैत्रिणी तयार करु शकत नाही.

५) पुन्हा अत्याचाराला बळी पडणे – असे मुले लैगींक अत्याचाराला लवकर बळी पडतात. त्यातून त्यांना बाहेर काढले आणि तरीही कुंटुबात कोणी लक्ष देत नसेल तर ते पुन्हा त्याच अत्याचाराला बळी पडण्याची शक्यता जास्त असते.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - मुलांवरील अत्याचाराचे परिणाम सांगा.

१०.५.४ मुंलावरील अत्याचार थांबविण्याचे उपाय –

* चांगला स्पर्श व वाईट हेतून केलेला स्पर्श यामधील फरक मुलांना समजावून सांगा.
* मुलांना कोणत्याही प्रकारे इजा करणे म्हणजे अत्याचार हे समजावून घ्या.
* मुलांना नाही 'आ' म्हणायला शिकवा. म्हणजेच त्यांना आवडत नसलेल्या गोष्टींना नकार देण्याची हिमंत येईल.
* काही अनअपेक्षित घडले तर पालकांना किंवा शिक्षकांना सांगण्यासाठी मुलांना प्रेरीत करा.
* अनोळखी व्यक्तीपासून मुलांना दूर राहण्यास शिकवा. कोणी खादयपदार्थ किंवा असेच काही दिले तर ते स्विकारु नये याची समज मुलांन दया.
* मुलांवर केल्या जाऊ शकणाऱ्या अत्याचाराची त्यांना कल्पना दया म्हणजे त्यातील धोके व धोक्याची घंटा त्यांना समजेल.
* मुले टी.व्ही व संगणावर काम करतात याच्यावर बारकाईने लक्ष ठेवा.
* मुलांच्या वर्तनावर बारकाईने लक्ष ठेवा. त्यांचे मित्र – मैत्रिणी यांची माहिती ठेवा.

१०.६ स्त्रीयांचा अनैतिक व्यापार

१०.६.१प्रस्तावना :

अनैतिक व्यापार हा एक संघटीत गुन्हा आहे. ज्यामध्ये मानवी मूल्यांची पायमल्ली केली जाते. सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर याला गुलामगिरी असेही म्हणता येईल. व्यावसायिक लैगींक शोषण हा या व्यापाराचा मुख्य उद्देश आहे. त्याच बरोबर मानवी शरीरचे अवयव विकणे, भिक मागायला लावणे, जबरदस्तीने सर्कसमध्ये काम करावयास लावणे, लग्न करण्यास जबरदस्ती करणे ही त्याची इतर अंगे आहेत. भारतामध्ये अशा प्रकारच्या अनैतिक व्यवहारासाठी परदेशातून स्त्रीया आयात केल्या जातात. त्याचबरोबर आखातामध्ये स्त्रीयांना पाठविले जाते. भारतामध्ये गोवा, आसाम, ओरिसा, उत्तरप्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये हा व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो.

भारतीय राज्यघटनेनुसार असे करणे गुन्हा आहे व त्यासाठी शिक्षेचीही तरतुद आहे. अमली पदार्थाच्या खालोखाल या व्यापाराचा क्रमांक लागतो. याचा स्त्रीया व मुले यांच्यावर मोठा विघातक परिणाम होत आहे. लैगिक शोषन केल्या नंतर ही अनेक वर्ष त्यांच्यावर अत्याचार केला जातो, मानवी मूल्यांच्या ऱ्हासाचे हे जिवंत उदाहरण आहे. यामुळे मानवी मूल्य, मानवी हक्क यावर मोठ्याप्रमाणात बाधा आली आहे. यातून बाहेर पडणे पिठीत व्यक्तीला सहज शक्य नसते. कारण या व्यापारात गुंतलेल्या गुन्हेगारांचे जाळे खूप भक्कम आहे.

या व्यवसायामागे अनेक कारणे आहेत. देशातंर्गत आणि देशाबाहेरी या व्यापारामध्ये अनेक व्यक्ती गुंतलेल्या आहेत. याची कारणे पुढील प्रमाणे आहे.

१०.६.२कारणे –

१) **गरिबी** – गरिबी ही या व्यवसायामागील प्रमुख कारण आहे. नेपाळ सारख्या देशामध्ये गरिबीचे प्रमाण जास्त आहे. आणि त्यामुळे सोप्या पध्दतीने पैसे मिळविण्याच्या या पध्दतीला स्त्रीया सहज बळी पडतात.

२) **बेकारी** – जिथे बेकारीचे प्रमाण जास्त आहे अशा ठिकाणी पुरुषाला काम मिळत नाही. आणि कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी स्त्रीयांना या व्यवसायामध्ये ठकलण्यात येते. आर्थिक कमकवतपणामुळे स्त्रीयांवर प्रचंड दडपण आणून त्यांच्याकडून हा व्यवसाय करुन घेतला जातो.

३) **बाल विवाह** – आजही आपल्या देशामध्ये बालविवाह आणि हुंडा पध्दती अस्तित्वात आहे. उत्तरप्रदेश आणि बिहारमध्ये विवाहाच्या नावाखाली मुलींना या व्यवसायामध्ये ढकलले जाते.

४) **सामाजिक परिस्थिती** – आपल्या समाजामध्ये स्त्रीयांची प्रतिष्ठा ती विवाहीत असेल तरच राखली जाते. परंतु एखादी स्त्री विधवा, परित्यकत्या व अविवाहीत राहिली तर तिला आपला सामाजिक दर्जा गमवावा लागतो आणि त्यामुळे अशा स्त्रीया या व्यापाराचा चटकन बळी ठरतात.

५) **धार्मीक परंपरा** – आपल्या देशामध्ये अनुसूचित जाती मधील स्त्रीयांना देवाला सोडणे, देवाशी लग्न लावणे व देवदासी, मुरळी जोगतीण अशा प्रथा प्रचलित आहेत. आणि या स्त्रीयांनी वेशा व्यवसाय करावा अशी समाजाची अपेक्षा असते. अशा स्त्रीया एकतर स्थानिक पातळीवर किंवा शहरामध्ये जाऊन वेश्या व्यवसाय करतात.

६) **स्त्रीभृण हत्या** – पंजाब आणि हरियाणा या दोन राज्यामध्ये स्त्रीभृण हत्येचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे स्त्रीयांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. ही उणीव भरुन काढण्यासाठी शेजारील राज्यातून स्त्रीयांना आयात करुन त्यांना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले जाते.

७) **खोटी वचने** – अनेक पुरुष स्त्रीयांना तुला नोकरीला लावतो, काम देतो तुझ्याशी लग्न करतो अशी खोटी वचने देऊन त्यांना जाळयात अडकवतात व त्यांना वेश्या व्यवसाय करावयास लावतात.

८) **घरतील अत्याचार** –हुंडा आणि इतर कारणांमुळे स्त्रीयांवर घरामध्ये अत्याचार केला जातो. ज्या स्त्रीया या अत्याचाराला वैतागुन घरातून बाहेर पडतात त्या वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यापारांच्या हातात सहज पडतात व व्यवसाय करतात.

९) **आपत्तकालीन परिस्थिती** – दंगली, युध्दे, भुकंप, वादळ अशा परिस्थितीमुळे जर घरातील पुरुष बाहेर पडलो किंवा मृत्यूमुखी पडले पर स्त्रीयांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांना असुरक्षित वाटते घरातील लोकांचा आधार मिळत नाही. अशा अडचणीत सापडलेल्या स्त्रीया अनैतिक व्यापार करणाऱ्यांचा बळी ठरतात.

१०) **स्थलांतर आणि पर्यटन** – उस्त्रोगधंद्यांच्या क्रांतीमुळे खेड्यातील अनेक लोक शहरामध्ये येतात. परंतु त्यांचे कुटुंब गावीच राहते. त्यांची शारीरिक गरज भागविण्यासाठी वेश्यांची गरज लागते. आणि त्यामुळे दलाल या व्यापारामध्ये अशा पुरुषांना वेश्या पुरवितात. तसेच काही पर्यटक उदा. गोवा आणि केरळामध्ये वेश्याची मागणी करतात. त्यामुळे अशा व्यवसायांना चालना मिळते.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - या व्यवसायाची कारणे विशद करा.

_____

_____

_____

_____

१०.६.३ परिणाम –

१) **समाजाची नकारत्माकता** – अशा व्यवसायामध्ये काम करणाऱ्या स्त्रीयांना समाज नाकारतो. ही एक मोठी शोकांतिका आहे. समाज त्यांना दुषणे लावतो किंवा निंदा करतो. आणि त्यामुळे या व्यवसायाच्या बळी ठरलेल्या स्त्रीयांचे सामाजिक अस्तित्व नष्ट होते.

२) **असाहयता** – आपण सामाजिक परिस्थिती बदलू शकत नाही याची जाणीव असल्यामुळे त्यांना असाहय वाटते. त्यामुळे त्या समाजापासून दूरदूर राहू लागतात. त्यांचे पुनर्वसन केले तरीही त्यांचा समाज स्वीकार करीत नाही.

३) **विमनस्कता** - या व्यवसायांचे बळी ठरलेल्या स्त्रीया त्यांच्या कटू अनुभवापासून दूर जाण्यासाठी आमली पदार्थ, अल्कोहोल अशा गोष्टींना बळी पडतात.

४) **ताणतणाव** –पूर्वीच्या अनुभवांमुळे अशा स्त्रीया तणावाखाली जगत असतात. तणाव सहन झाला नाही तर त्यांचे मानसिक आरोग्य बिघडते. पूर्वीचे सर्व त्यांना विसरावयाचे असते परंतु बऱ्याच वेळा ते शक्य होत नाही आणि त्यामुळे त्यांना बधिरावस्था येऊ शकते.

५) **निराशता** - या व्यवसायाचा बळी ठरलेले निराशतेचा अनुभव घेतात. आणि त्यामुळे त्याची निराशेची भावना, आनंदाचा आस्वाद घेता न येणे, दररोजच्या कामात लक्ष न लागणे, भविष्याबद्दल नकारात्मक विचार येणे हे परिणाम होतात.

६) **एकाग्रता नष्ट होणे** - या व्यवसायातील बळी ठरलेल्या स्त्रीयांमध्ये एकाग्रतेचा अभाव असतो. त्यांचे परिणाम पुढील प्रमाणे होतात. बेशुध्द पडणे, बधीरपणा येणे, अनेक व्यक्तीमत्त्वे हे परिणाम होतात.

७) **मानसशास्त्रीय समस्या** - यामध्ये भास होणे, योग्य वर्तन न करता येणे, भाराहून जाणे या प्रकारच्या समस्या उद्‌भवतात.

८) **खाण्यापिण्याच्या समस्या** – अशा स्त्रीया खाण्यापिण्याकडे दुर्लक्ष करतात किंवा नुसते खातच राहतात. याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो.

आपली प्रगती तपासा.

प्रश्न - या व्यवसायावरील परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१०.७ सारांश

प्रौढ किंवा ज्येष्ठ नागरिक म्हणजे ज्यांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झालेली आहेत किंवा त्यापेक्षा जास्त अशा व्यक्ती होय. वय वर्ष ६० म्हणजेच म्हातारपण. भारतातील वयोवृद्ध नागरिकांच्या संख्येत मोठ्या, शारीरिक व मानसिक व्याधी जडलेल्या असतात. अनेकांची कुटुंबियांकडून अवहेलना होत असते. व्यवहारवादी बनत चाललेल्या समाजरचनेमुळे भारतीय समाजात ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या उभ्दवत आहेत.

प्रौढ नागरिकांनी त्यांच्या कुटुंबाची, समाजाची व देशाची सेवा केलेली असते. त्यामुळे त्यांच्या ऋणाची परतफेड करण्यासाठी कुटुंब, समाज व देशपातळीवर उपाययोजना करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

भाल कामगार ही समस्या इतर सर्व समस्यांपेक्षा अतिशय वेगळी अशी समस्या आहे. ही सामाजिक व आर्थिक अशी मिश्रित समस्या आहे. त्यासाठी ही समस्या दूर करण्यासाठी सरकार, अशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था व सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे जन सहयोग (). अशा सर्व घटकांनी एकत्रितपणे समाज जागृती करणे गरजेचे आहे. तरच त्याचे परिणाम समाजापर्यंत पोहोचू शकतील आणि समाधानकारक अपेक्षा करता येतील.

खरेतर बाल कामगारांविषयी काम करण्यासाठी कोणत्याही प्रलोभनाची गरज नाही. आर्थिक व आर्थिकेत्तर अशा प्रकारच्या कोणत्याही मोबदल्याची गरज नाही. लहान मुले ही देवाघरची फुले असतात असे आपण नेहमीच म्हणजो. देशाचा विचार करता लहान मुले ही देशाची महत्त्वपूर्ण आणि मूल्यवान संपत्ती आहे. समृद्धी असो किंवा दारिद्र्य, कोणत्याही देशातील

वा समाजातील संसाधनांमुळे मुलांना पहिले प्राधान्य असले पाहिजे. त्यासाठी मुलांचे आरोग्य व शिक्षण यावरील खर्च म्हणजे भावी काळातील गुंतवणूक मानली पाहिजे.

१०.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) भारतातील प्रौढ नागरिकांच्या समस्या सविस्तर स्पष्ट करा.

२) प्रौढ नागरिकांना निर्माण होणाऱ्या समस्यांच्या कारणांवर सविस्तर चर्चा करा.

३) प्रौढ नागरिकांच्या समस्येचे होणारे परिणाम लिहा.

४) प्रौढ नागरिकांच्या समस्या कमी करण्यासाठीची उपाययोजना सांगा.

५) बाल मजूर म्हणजे काय ? भारतातील बाल मजुरांची समस्या सविस्तर स्पष्ट करा.

६) भारतातील बाल मजुरीची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

७) बाल मजूर म्हणजे काय ? बाल मजुरीच्या दुष्परिणामांची चर्चा करा.

८) बाल कामगारांच्या समस्येवर उपाययोजना सविस्तर स्पष्ट करा.

९) बाल मजुरी उच्चाटन यावर चर्चा करा.

१०) बाल मजुरी समस्या व अशासकीय संस्था यावर भाष्य करा.

११) मुलांचे अत्याचाराची कारणे सांगून, परिणाम स्पष्ट करा.

१२) मुलांचे दुरुपयोगाचे प्रकार सविस्तर स्पष्ट करुन, अत्याचार थांबविण्याचे उपाय विशद करा.

१३) स्त्रीयांचा अनैतिक व्यापार म्हणजे काय ? अनैतिक व्यापारची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

१४) स्त्रीयांचा अनैतिक व्यापाराचे परिणाम व उपाययोजना स्पष्ट करा.

१५) टीपा लिहा.
अ) प्रौढ नागरिकांच्या समस्या.
ब) बाल मजुरीची कारणे.
क) बाल मजुरीचे दुष्परिणाम.
ड) बाल मजुरी समस्या.
त) प्रौढ समस्येचे त्यांच्या कुटुंबावर होणारे परिणाम.
थ) बाल मजुराकडून प्रतिसाद.
द) मुलांचे अत्याचार.
ध) स्त्रीयांचा अनैतिक व्यापार.

❖❖❖❖

विभाग - २

११

उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण संकल्पना

(Concept of Liberalisation, Privatisation and Globalisation)

पाठाची रचना :

११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रास्ताविक
११.२ खाजगीकरण
११.३ उदारीकरण
११.४ जागतिकीकरण
११.५ नवीन औद्योगिक धोरण
११.६ माहिती तंत्रज्ञान
११.७ बदलती मूले आणि जीवनशैली
११.८ सारांश
११.९ विद्यापीठस्तरीय प्रश्न

११.० उद्दिष्ट्ये

- आर्थिक उदारीकरणाची व्याख्या अभ्यासणे.
- आर्थिक उदारीकरणाच्या अंतर्गत प्रमुख बदलांचा अभ्यास करणे.
- खाजगीकरण संकल्पना समजावून घेणे व उद्देश आणि फायदे अभ्यासणे.
- जागतिकीकरण संकल्पनेचा अभ्यास करणे.
- माहिती तंत्रज्ञान संकल्पनेचा अभ्यास करता येईल.

११.१ प्रास्ताविक

सद्यस्थितीमध्ये जागतिकीकरणाच्या प्रद्धिंयेने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. उदारीकरणाचा आणि खाजगीकरणाचा अंतिम हेतू जागतिकीकरण आहे. उदारीकरण ही

संकल्पना आर्थिक उदारीकरण म्हणून विचारात घेतली जाते. उदारीकरणास शिथिलीकरण असेही म्हणतात. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी बाजारधिष्ठीत अर्थव्यवस्थेचा आणि सरकारच्या निर्हस्तक्षेपाच्या धोरणाचा फार पूर्वी स्विकार केला होता. त्यांच्या मते सरकारी हस्तक्षेप हा आर्थिक विकासातील प्रमुख अडथळा असतो आणि असे मानणाऱ्या सध्याच्या काळातील अर्थतज्ज्ञांनी आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला आहे. १९९१ पासून भारताच्या अर्थव्यवस्थेत व्यापक स्वरुपाच्या सुधारणा घडून आल्या. या सुधारणांची त्रिसूत्री म्हणजे 'खऊजा' होय.

११.२ खाजगीकरण (Privatization)

भारतीय अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी १९९१ मध्ये जे नवीन आर्थिक धोरण जाहीर केले त्या धोरणातील एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'खाजगीकरण' होय. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाचा जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी व सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्राला महत्त्व देण्यात आले. परंतु १९४७ ते १९९० पर्यंत या क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी निराशाजनक झाली. त्यामुळे सरकारला सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे जरुरीचे झाले. (म्हणजे सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करणे.) या उपाययोजनेलाच खाजगीकरण असे म्हणतात. थोडक्यात सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगांकरीता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रामधील उद्योगांना खुले करण्याच्या प्रक्रियेला खाजगीकरण म्हणता येईल. त्याचप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगांची मालकी, त्यांचे व्यवस्थापन व नियंत्रण खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना हस्तांतरित करण्याची प्रक्रिया याचाही समावेश खाजगीकरण या संकल्पनेत होतो.

११.२.१ खाजगीकरण म्हणजे काय?

१) **पीटर ड्रकर** या व्यवस्थापन शास्त्रज्ञाच्या मते, खाजगीकरण म्हणजे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांतील शासकीय भांडवल काढून घेण्याची प्रक्रिया होय.

२) **डी. आर. पेंडसे :** खाजगीकरण म्हणजे राष्ट्रीय आर्थिक व्यवहारातील सरकारचा सहभाग कमी करणे होय.

३) **डेव्हीड हेरॉल्ट :** खाजगीकरण म्हणजे साधनसामग्रीच्या उपयोगासाठी बाजारविरहीत पद्धतीऐवजी बाजारधिष्ठीत पद्धतीचा स्वीकार करण्याची प्रक्रिया.

४) **बार्बरा ली व जॉन निलिस :** खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मालकीत किंवा व्यवस्थापनात खाजगी व्यक्तींना सहभागी करून घेण्याची प्रक्रिया होय. यामध्ये खाजगी व्यवस्थापनाच्या ताब्यात तो उपक्रम देण्यात येतो. त्याचप्रमाणे हे संपादन व्यवस्थापन करार, भाडेपट्टीने चालविण्यास देणे किंवा मताधिकार पद्धतीने चालविण्यास देणे यापद्धतीने होते.

११.२.२ खाजगीकरणाच्या पद्धती :

१) मालकी हक्कासंदर्भात खाजगीकरण : या पद्धतीमध्ये सार्वजनिक उद्योगाची मालकी पूर्णतः किंवा खाजगी उद्योगांकडे हस्तांतरीत केली जाते. त्याचे चार प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

अ) संपूर्ण निराष्ट्रीकरण (Total de-nationalisation): या पद्धतीमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची मालकी पूर्णतः खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत होते.

ब) संयुक्त मालकी (Joint Venture) : या पद्धतीत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात खाजगी क्षेत्राचा अंशतः सहभाग घेतला जातो. अर्थात उद्योगातील खाजगी क्षेत्राचा वाटा किती असावा हे सरकारी धोरणावर अवलंबून असते. यातील महत्त्वाचा उद्देश असा असतो की, काही प्रमाणात खाजगी मालकी दिल्यामुळे उद्योग व्यावसायिक पद्धतीने चालविण्यात व कार्यक्षमता वाढविणे शक्य होते.

क) विसर्जन (Liquidation) : याचा अर्थ सार्वजनिक मालमत्ता खाजगी क्षेत्रातील व्यक्तीला अगर संस्थेला विकणे जो तिचा वापर त्याच उद्देशासाठी किंवा इतर उद्देशासाठी करण्यास पूर्णपणे स्वतंत्र असतो.

ड) संपूर्ण व्यवस्थापन खरेदी (Total Management Buy-out) : या पद्धतीत उद्योगाचे भागभांडवल खाजगी व्यक्तीला किंवा कंपनीला न विकता त्याच उद्योगातील कामगारांना विकण्यात येते. यामध्ये उद्योगाची मालकी व्यवस्थापनासह कामगारांकडे हस्तांतरित होते. या पद्धतीत कामगारांना वेतन आणि लाभांश असा दुहेरी लाभ मिळतो. त्यामुळे कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते.

आपली प्रगती तपासा.

१) खाजगीकरण म्हणजे काय ? त्याच्या पद्धती स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.२.३ खाजगीकरणाचे परिणाम (Effects of Privatization) :

खाजगीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी करण्यात आलेल्या निर्गुंतवणूक प्रक्रियेमुळे देशातील उद्योगांवर त्याचप्रमाणे देशाच्या अर्थकारणावर ते परिणाम घडून आले त्यापैकी काही सकारात्मक तर काही नकारात्मक परिणाम झाले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) खाजगी क्षेत्रामध्ये वाढ : खाजगीकरणामुळे मोठ्या प्रमाणावरील सार्वजनिक क्षेत्रात घट झाली आहे. तर खाजगी क्षेत्राचा व्याप व सामर्थ्य यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. त्यामुळे

बाजारपेठेतील खाजगी क्षेत्राच्या हिस्यात वाढ झाली आहे. परिणामी खाजगी उद्योगपतींचे सामर्थ्य वाढले आहे.

२) निधीचा गैरवापर : खाजगीकरणाच्या प्रक्रियेतून सरकारला मिळालेला निधी हा पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी सार्वजनिक उद्योगापुढील समस्या सोडविण्यासाठी, समाजातील दुर्बल घटकाच्या /वर्गाच्या कल्याणासाठी व देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यासाठी खर्च झाला पाहिजे परंतु प्रत्यक्षात या निधीचा उपयोग योग्य कारणासाठी करण्यात येत नाही.

३) भांडवलदारांची मक्तेदारी : खाजगीकरणामुळे सार्वजनिक उद्योगांच्या मक्तेदारीचे बुरूज एकामागून एक ढासळू लागले. त्याच वेगाने खाजगी भांडवलदारांची मक्तेदारी निर्माण होण्याच्या प्रक्रियेचा वेग वाढू लागला. त्याचे परिणाम समाज व सरकारला जाणवू लागले आहेत.

४) कमी उत्पन्न : निर्गुंतवणूकीचा कार्यक्रम व्यवस्थीतपणे कार्यान्वित करण्यात न करता आल्यामुळे सरकारला अपेक्षेपेक्षा खूपच कमी उत्पन्न मिळाले आहे. खाजगीकरणामुळे सरकारने सार्वजनिक क्षेत्रावरील त्यांची मालकी व नियंत्रण गमावले आहे. परंतु त्याचा पुरेपूर मोबदला मिळाला नाही. पर्यायाने समाजाचे सर्वच ठिकाणी नुकसान झाले आहे.

५) अपेक्षेप्रमाणे परिणाम नाही : खाजगीकरणामुळे उत्पादन खर्चात घट होईल, उद्योगांच्या उत्पादनक्षमतेचा पूर्ण उपयोग करता येईल, उत्पादनाचा दर्जा सुधारेल आणि व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल आणि यामुळे सर्वच उद्योगांना मोठ्या प्रमाणावर नफा मिळेल या सरकारच्या अपेक्षा प्रत्यक्षात उतरल्या नाहीत.

६) बेकारीमध्ये वाढ : ज्या सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करण्यात आले, त्या सर्व उद्योगांमध्ये कामगारांची संख्या कमी करण्यात आली आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात बेकारीचे प्रमाण वाढले आहे. अनेक कामगार संघटनांनी यावर निषेध नोंदविला, अनेक उद्योगांमध्ये संपही घडून आले आहेत. परंतु देशपातळीवर विचार करता या सर्वांचा परिणाम देशाच्या अर्थकारणावर झालेला दिसून येत नाही.

७) भ्रष्टाचाराचा आरोप : निर्गुंतवणूकरणाच्या अनेक प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे आरोप करण्यात आले. त्याचप्रमाणे खाजगीकरणाची प्रक्रिया पारदर्शक नव्हती असेही आरोप करण्यात आले. उदा. मुंबईतील जुहू सेंटॉर आणि एअरपोर्ट सेंटॉर या दोन हॉटेल्समधील निर्गुंवणूकीचा व्यवहार.

८) आश्वासनांची पूर्तता : देशाच्या सुरक्षिततेच्या, विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या व ज्यांची कामगिरी उत्कृष्ट आहे. अशा काही निवडक सार्वजनिक उद्योगांना नवरत्न उद्योग या नावाने गौरविण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीत नवरत्न उद्योगांचे खाजगीकरण करण्यात येणार नाही असे ठरविण्यात आले होते. तरीही सरकारने भेल (BHEL) या उद्योगामध्ये पुर्नगुंतवणूकीची प्रक्रिया सुरू केली. डाव्या पक्षांनी याचा जोरदार विरोध केला होता.

खाजगीकरणाचा अवलंब केल्यापासून जे काही बदल घडून आले ते सर्व खाजगी भांडवलदारांच्या हिताचे व खाजगी मक्तेदारीच्या विकासाला सहाय्यक ठरतील असेच आहेत. खाजगीकरणामुळे कामगाराचे हित, देशहित व देशाच्या अर्थव्यवस्थेत बळकटी तसेच दुर्बल घटकांचा विचार व विकास अजिबात झाला नाही.

आपली प्रगती तपासा.

१) खाजगीकरण म्हणजे काय ? त्याच्या पद्धती स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.२.४ खाजगीकरणाचे उद्देश / फायदे

१) उत्पादकता आणि कार्यक्षमता यामध्ये सुधारणा : खाजगी क्षेत्र सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेत अधिक कार्यक्षम आहे. खाजगी क्षेत्रात नफा वाढविण्याच्या दिशेने निर्णय घेतले जातात. निर्णय प्रक्रिया उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढविणारी असते. खाजगी क्षेत्रातील व्यवस्थापनाची गुणवत्ता चांगली असते.

२) व्यवस्थापनात सुधारणा : सार्वजनिक क्षेत्रामध्ये उद्योगाच्या दैनंदिन कारभारात सरकारचा हस्तक्षेप होतो. सरकारी हस्तक्षेपामुळे गैरव्यवहार, राजकारणाचा प्रभाव असे दोष निर्माण होतात. म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे समर्थन सदोष होते. व्यवसायासाठी कायदा निर्णय घेण्याची क्षमता त्याच्यात नसते. खाजगीकरणामुळे व्यवस्थापनाची कार्यक्षमता सुधारते.

३) स्पर्धा शक्तीमध्ये वाढ : स्पर्धा नसल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले नाहीत. या उद्योगातील उत्पादीत वस्तूंच्या किंमती सरकार ठरविते. खाजगीकरणामुळे या किंमती ठरविताना, उत्पादन खर्च आणि नफा यांचा विचार होऊ लागला आणि त्यामुळे खाजगीकरणाद्वारे उद्योगांची स्पर्धा शक्ती वाढली.

४) सार्वजनिक उद्योग नफ्यात आणणे : अकार्यक्षमता, सदोष व्यवस्थापन आणि स्पर्धेचा अभाव या तीन दोषामुळे भारतातील सार्वजनिक उद्योगातील तोटा वर्षानुवर्षे वाढत गेला. हा संचित तोटा कमी करण्यासाठी आणि या उद्योगांना फायद्यात आणण्यासाठी खाजगीकरण आवश्यक आहे.

५) अतिरीक्त कर्मचाऱ्यांची संख्या कमी करणे : अतिरीक्त कामगार भरतीमुळे उत्पादन वाढण्याऐवजी ते कमी झाल्याचे दिसते. कोणत्याही उद्योगाला अनुत्पादक कर्मचाऱ्यांचा भार पेलता येत नाही. हे अतिरीक्त कर्मचारी कमी करणे खाजगीकरणामुळे शक्य होते.

६) जबाबदारीचे निर्धारण सोपे होते : सार्वजनिक उद्योगातील कर्मचारी होणाऱ्या तोट्याला जबाबदार नसतो. याऊलट खाजगी क्षेत्रामध्ये जबाबदाऱ्या काटेकोरपणे निश्चित केलेल्या असतात. त्यामुळे त्या निर्धारित वेळेत पूर्ण न केल्यास संबंधित कर्मचाऱ्याला त्यासाठी जबाबदार धरले जाते.

७) खाजगी उद्योगांना भांडवल बाजाराची शिस्त : खाजगी उद्योगांना भांडवली बाजाराची एक शिस्त असते आणि त्याची छाननी वित्तीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून केली जाते.

८) राजकीय हस्तक्षेपाला वाव नाही : सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाला राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे त्याचा उत्पादकता आणि लाभदायकता यावर परिणाम होतो. याऊलट खाजगी क्षेत्रामध्ये राजकीय हस्तक्षेपाचा पूर्ण अभाव असतो.

९) काटेकोर नियोजन : अनेक सार्वजनिक उद्योग दीर्घमुदत नियोजनाच्या बाबतीत अपयशी ठरतात. त्यामुळे निर्णय प्रक्रियेला उशीर होतो. तसेच नवीन येणारी राजकीय सत्ता पूर्वीच्या निर्णयात सारखा बदल करत असते. अशा प्रकारची स्थिती खाजगी उद्योगात अस्तित्वात नसते. खाजगी उद्योगात नियोजन काटेकोर असते.

१०) कमी प्रतिसाद कालावधी : खाजगी उद्योगामध्ये एखाद्या धोरणाची अंमलबजावणी केल्यानंतर त्याचा प्रतिसाद तपासण्याचा कालावधी कमी असतो. खाजगी क्षेत्रामध्ये निर्णय प्रक्रिया जलद असते. त्याचबरोबर प्रतिसाद पडताळणी कालावधी कमी असतो.

११) उपाययोजनांची त्वरित अंमलबजावणी : खाजगी क्षेत्रामध्ये निर्णय प्रक्रिया आणि एखाद्या समस्येबाबत उपाययोजना कमीत कमी कालावधीत हाती घेतली जाते.

१२) उपभोक्त्यांना चांगली सेवा : खाजगी क्षेत्र उपभोक्त्यांना सेवा पुरविण्याच्या बाबतीत अतिशय संवेदनशील असते. ग्राहकांची दखल, ग्राहकांचे समाधान या गोष्टी खाजगी क्षेत्रात महत्त्वाच्या मानल्या जातात. याबाबत सार्वजनिक क्षेत्र पूर्णपणे उदासीन असते.

आपली प्रगती तपासा.

१) खाजगीकरणाचे फायदे स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.३ उदारीकरण (Liberalization)

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या त्रिसूत्रीमधील उदारीकरण किंवा शिथिलीकरण ही एक महत्त्वाची संकल्पना आहे.

उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेमध्ये लादण्यात आलेले निर्बंध व नियंत्रणे कमी करणे किंवा रद्द करणे, सरकारी हस्तक्षेप कमी करणे, सरकारच्या सहभागाचे क्षेत्र मर्यादित करणे, उद्योजकांना व व्यावसायिकांना सोयी व सवलती पुरविणे, त्यांना पुरेसे स्वातंत्र्य देणे, देशी परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आणि एकंदरीने अर्थव्यवस्था अधिक मुक्त, पारदर्शी व स्पर्धात्मक करणे होय. थोडक्यात सरकारी निर्बंध व नियंत्रणे कमी करणे किंवा रद्द करण्याच्या धोरणाला 'उदारीकरण' असे म्हणतात. या धोरणात काही उद्योगधंद्याचा अपवाद वगळता इतर सर्व उद्योगांना परवाना पद्धतीच्या निर्बंधातून मुक्त करण्यात आले. या धोरणांतून ६ उद्योगांना वगळण्यात आले आहे. या सहा उद्योगांना परवान्याची गरज आहे. यामध्ये स्फोटकांचे उत्पादन

करणारे उद्योग, संरक्षण विषयक उत्पादने, अल्कोहोलची उत्पादने, सिगारेट, धोकादायक रसायने, औषधे या उद्योगांचा समावेश आहे.

विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहीत करण्यासाठी विदेशी गुंतवणूक प्रवर्तन मंडळाची स्थापना करण्यात आली. उच्च तंत्रज्ञानाचा उपयोग केल्या जाणाऱ्या उद्योगांमध्ये १०० टक्के परकीय गुंतवणुकीला मान्यता देण्यात आली.

११.३.१ उदारीकरण व्याख्या :

उदारीकरण ही संकल्पना व्यापक असल्याने त्याची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. ही संकल्पना अर्थव्यवस्थेतील व्यापक स्वरुपाच्या आर्थिक सुधारणांची प्रक्रिया आहे.

१) डॉ. व्ही. एम्. अत्री - आर्थिक उदारीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे निर्यातीस आणि आयातीस प्रतिबंध करणाऱ्या घटकांची तीव्रता कमी करण्यासाठी बाजाराधिष्ठीत किंमतयंत्रणेचा स्वीकार केला जातो.

२) डॉ. एस रामनजनेयुल आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात, निर्यात आणि उत्पादक गुंतवणुकीवरील अनिष्ट निर्बंध, नियंत्रणे, परवाने शिथिल करणे होय.

अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा वाढीला लावण्यासाठी, बाजाराधिष्ठीत किंमत यंत्रणेचा स्वीकार, ही यंत्रणा म्हणजे मागणी-पुरवठा यांच्या आधारे उत्पादन व उपयोग याबाबतचे निर्णय घेणारी यंत्रणा होय. ती अधिक सुलभ झाली तर अर्थव्यवस्थेची गती वाढते. त्यासाठी सरकारने बाजारव्यवस्थेतील आपला हस्तक्षेप क्रमाक्रमाने कमी करणे आणि खुल्या स्पर्धेला वाव देणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय.

नैसर्गिक साधनसंपत्तीची विपुलता, पुरेसे तांत्रिक कौशल्य, स्वस्त श्रमपुरवठा आणि प्रचंड मोठी बाजारपेठ असून देखील भारत स्वातंत्र्योत्तर काळात फारशी प्रगती करु शकला नाही. याचे कारण विकासाच्या प्रक्रियेतील सरकारचा हस्तक्षेप होय. १९९१ मध्ये श्री. पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाल्यानंतर ढासळत्या भारतीय अर्थव्यवस्थेला पुन्हा मार्गावर आणण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था खुली करणे, उद्योगांमध्ये स्पर्धाशक्ती वाढीला लावणे आणि भारतीय अर्थव्यवस्था बाजाराधिष्ठीत करणे आवश्यक होते. हा मार्ग इतर राष्ट्रांनी आगोदर स्विकारला असल्याने भारताला आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारावा लागला.

आपली प्रगती तपासा.

१) उदारीकरण म्हणजे काय ते स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.३.२ आर्थिक उदारीकरणांतर्गत प्रमुख बदल

१) खाजगी क्षेत्राच्या वाढीला वाव देण्यासाठी औद्योगिक धोरणाबाबतच्या दृष्टीकोनामध्ये बदल करणे.

२) याद्वारे तांत्रिक सुधारणा घडवून आणणे.
३) यासाठी व्यापार, राजवित्तीय धोरण, मौद्रीक धोरण, औद्योगिक धोरण यामध्ये बदल घडवून आणणे.
४) परकीय गुंतवणुकीसाठी अर्थव्यवस्था खुली करणे.
५) आयात परवानामुक्त आणि निर्यातवाढीसाठी प्रयत्न करणे.

११.३.३ १९९१ नंतर उदारीकरणासंबंधी सरकारने घेतलेले निर्णय

१) परवानामुक्त धोरण : राष्ट्रीय संरक्षण उद्योग आणि राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे उद्योग सोडून इतर सर्व उद्योग परवानामुक्त करण्यात आले.

२) पायाभूत क्षेत्रात विदेशी गुंतवणूकीला प्रवेश : भारताच्या मुलभूत क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीला मुक्त प्रवेश देण्यात आला. उदा. सेवाक्षेत्र, वीज, रस्ते, बंदरविकास.

३) विदेशी गुंतवणूकीला मुक्त प्रवेश : भारतातील औद्योगिक आणि इतर क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागात गुंतवणूक करण्यात विदेशी गुंतवणुकदारांना परवानगी देण्यात आली.

४) मक्तेदारी कायद्यात शिथिलता : मक्तेदारी उद्योगातील गुंतवणुकीची कमाल मर्यादा रद्द करण्यात आली. त्यामुळे कोणत्याही औद्योगिक कंपनीला आपल्या आकारमानाला गरजेनुसार बदल करता येऊ लागला.

५) आयात-निर्यात उदारीकरण : भारताने आयात निर्यातीबाबत उदार धोरण स्विकारले. निर्यातीवरील निर्बंध उठविण्यात आले. त्याचप्रमाणे आयातीवरील निर्बंधही उठविण्यात आले. जकातीचा दर कमी करण्यात आला.

६) रुपया परिवर्तनीय करण्यात आला : उदारीकरण धोरणांतर्गत विदेशी चलन व्यवहार नियंत्रणमुक्त करण्यात आले. रुपया सुरुवातीला व्यापारी खात्यावर आणि नंतर चालू खात्यावर परिवर्तनीय करण्यात येणार आहे. सध्या रुपयाचा इतर चलनातील दर बाजाराधिष्ठीत आहे.

७) फेरा ऐवजी फेमा कायदा : १९९१ पूर्वी विदेशी चलनावर नियंत्रण ठेवण्यासाठी फॉरीन एक्सचेंज रेग्युलेशन ॲक्ट अस्तित्वात होता. त्यास 'फेरा' असे म्हणतात. त्यामध्ये उदारीकरणानुसार बदल करण्यात आला आणि कमीत कमी नियंत्रणे असणारा फॉरीन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्ट नवा कायदा करण्यात आला. त्याला 'फेमा' असे म्हणतात.

८) साध्या आणि सोप्या करपद्धतीचा अवलंब : उदारीकरणांतर्गत भारतीय करपद्धतीत सुधारणा करण्यात आली. करपद्धतीत सुधारणा करण्यासाठी करण्यात आलेल्या राजा चेलिया समितीने केलेल्या शिफारसी ८५ टक्के भारत सरकारने स्विकारल्या.

९) वित्तीय क्षेत्रात उदार धोरण : भारताच्या वित्तीय क्षेत्रात उदारीकरण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या नरसिंहम् समितीच्या शिफारशी भारत सरकारने स्विकारल्या. त्यानुसार सार्वजनिक क्षेत्राती बँकांच्या खाजगीकरणाचा निर्णय, खाजगी आणि विदेशी बँकांना प्रवेश,

बँकांना निर्णय स्वातंत्र्य हे निर्णय घेण्यात आले. त्याचप्रमाणे भारतातील व्याजदर बाजाराधिष्ठीत करण्यात आले.

१०) भांडवल बाजारात सुधारणा : याबाबत भांडवल बाजाराद्वारे विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी उपाययोजना करण्यात आली.

आपली प्रगती तपासा.

१) उदारीकरणासंबंधी सरकारने घेतलेले निर्णय स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.३.४ उदारीकरणाचा भारतीय उद्योगावरील परिणाम (Impact of Liberalization)

उदारीकरणाचा मूळ हेतू खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना सर्व प्रकारच्या सवलती मिळवून देणे, त्यांच्या समस्या सोडविणे व अडचणी दूर करणे हा आहे. सोप्या शब्दात खाजगी उद्योगांवरील सरकारी नियंत्रणे कमी करणे व त्यांना मोठ्या प्रमाणावर स्वातंत्र्य देणे हा हेतूनेच उदारीकरणाच्या धोरणाचा अवलंब सरकारने केला.

भारतीय उद्योगावर उदारीकरणाचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून येतात-

१) खाजगी उद्योगांना अनेक सवलती :

सरकारी पातळीवरून उदारीकरणाचे धोरण राबविण्याचे ठरविल्यामुळे खाजगी कारखानदारांवर सवलतींचा वर्षावच झाला. यामुळे सरकारची खाजगी उद्योगांविषयीची भूमिका मित्रत्वाची झाली. मक्तेदारी प्रतिबंध कायद्यामधील जाचक तरतूदी काढून टाकण्यात आल्या. परवाना पद्धती रद्द करण्यात आली. त्याचप्रमाणे लघु उद्योगांतील गुंतवणूकीची मर्यादा ३ कोटी रु. पर्यंत वाढविण्यात आली आहे.

२) स्पर्धेमध्ये वाढ व उत्पादनात वाढ :

उदारीकरणाच्या धोरणामुळे औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे देशातील उद्योगांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड द्यावे लागले. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात थोडेफार चिंतेचे वातावरण निर्माण झाले. कारण ही स्पर्धा बहुराष्ट्रीय कंपन्यांशी होती. उदारीकरणानंतरच्या काही वर्षामध्ये औद्योगिक उत्पादनाच्या वार्षिक वाढीचा सरासरी दर कमी झाल्याने दिसून येते. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रामध्ये अशाप्रकारे घट दिसून येते आहे. म्हणजेच सरकारकडून उदारीकरणाचे धोरण राबविण्यासाठी करण्यात येणारी उपाययोजना योग्य नव्हती असे म्हणता येईल.

३) सार्वजनिक उद्योगांच्या कार्यक्षमतेत वाढ :

उदारीकरण आगोदरची सार्वजनिक उद्योगांची कार्यक्षमता व उदारीकरणानंतरची सार्वजनिक उद्योगांची कार्यक्षमता याचा आढावा घेतल्यास उदारीकरणानंतर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी निश्चितच समाधानकारक होती. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील उद्योगांची कामगिरी सुधारणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात सार्वजनिक उद्योगांच्या कामगिरीमध्ये सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही.

४) विदेशी उद्योगांचे वर्चस्व :

उदारीकरणाच्या प्रक्रियेमुळे उद्योगांचे एकत्रीकरण आणि एका उद्योगाने दुसरा उद्योग ताब्यात घेण्याचे अनेक प्रकार घडून आले आहेत. ताबा घेणाऱ्या उद्योगांमध्ये विदेशी कंपन्यांचा भरणा जास्त होतो आहे. खाउजा प्रक्रियेमुळे विदेशी गुंतवणुकदारांना व विदेशातील कंपन्यांना ज्या सवलती मिळाल्या, त्या सवलतींचा या कंपन्यांनी उपयोग करून घेतल्यामुळे भारतातील उद्योगांच्या मालकीचे हस्तांतर विदेशी कंपन्यांकडे मोठ्या प्रमाणावर झाले आहे.

५) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व :

उदारीकरणाचे धोरण राबविण्यासाठी भारत सरकारने कंपन्यांच्या समभागांची विक्री करण्याचे ठरविले. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय कंपन्यांच्या समभागांची विक्री / खरेदी मोठ्या प्रमाणावर केली. परिणामतः भारतीय उद्योगांना देशामध्येच बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे.

६) आधुनिक उत्पादन तंत्र :

उदारीकरणानंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणावरील स्पर्धेला तोंड देण्यासाठी आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. उदारीकरणानंतर भारतीय उद्योजकांमध्ये अशाप्रकारच जागरूकता निर्माण झाली. विदेशातून आधुनिक तंत्रज्ञान मिळवून त्यांचा उपयोग भारतात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला.

७) संशोधन व विकासावर खर्च :

उदारीकरणानंतर मोठ्या प्रमाणावरील जागतिक स्पर्धेचा सामना करण्यासाठी भारतीय कंपन्यांनी संशोधन व विकासावर पुरेसा खर्च करण्यास सुरूवात केली. अनेक कंपन्यांच्या संशोधन व विकास खर्चामध्ये वाढ झाली. त्यामुळे चांगल्या दर्जाच्या व गुणवत्तेच्या वस्तुंचे उत्पादन करून भारतीय कंपन्यांनी जागतिक स्पर्धेला तोंड देऊन उदारीकरणाचा फायदा करुन घेतला आहे.

८) लघु उद्योगांना अनेक समस्या :

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विकासात लघू उद्योगांची भूमिका फार महत्त्वाची आहे. उदारीकरणामुळे मोठ्या व खाजगी उद्योजकांना मोठ्या प्रमाणावर सोयी व सवलती मिळाल्या आहेत. त्यातुलनेत लघु उद्योगांना उदारीकरणामुळे काही सोयी व सवलती मिळाल्या

नाहीत. लघु उद्योगांचे भांडवल, साधने व उत्पादन मर्यादित असल्याने त्यांना जागतिक स्पर्धेला तोंड देणे अशक्य होऊ लागले. उदारीकरणामुळे भारतातील लघु उद्योगांवर विपरीत परिणाम घडून आला.

९) कामगार कपात :

उदारीकरणाच्या धोरणामुळे जे बदल घडून आले त्यामुळे कामगारांच्या हालाखीत वाढ झाली. उदारीकरणानंतर टाळेबंदी, कंपन्या बंद करणे व कामगार कपात यांचे प्रमाण वाढले. अनेक कंपन्यांमध्ये स्वेच्छा निवृत्ती (VRS) राबविण्या आल्या आहेत.

उदारीकरणामुळे भारतीय उद्योगांवर काही सकारात्मक व काही नकारात्मक परिणाम झाले. एकंदरीत विचार करता उदारीकरणामुळे भारतीय उद्योग स्पर्धाक्षम बनले. आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्यांच्या शक्तीमध्ये वाढ झाली.

आपली प्रगती तपासा.

१) उदारीकरणाचे परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.४ जागतिकीकरण (Globalization)

भारताच्या आर्थिक उदारीकरराचा आणि खाजगीकरणाचा अंतिम हेतू जागतिकीकरण हा आहे. जागतिकीकरण किंवा वैश्विकीकरण (Globalization) हा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि चर्चेचा विषय झाला आहे. जागतिकीकरण हे नविन आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे सूत्र आहे. जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा, तंत्रज्ञान व भांडवलाच्या हालचालींवरील सर्व प्रकारचे निर्बंध दूर करणे व त्यांचा प्रवाह सुखकर व गतिमान करण्याची प्रक्रिया होय. थोडक्यात व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामधून होणारे रुपांतर म्हणजे जागतिकीकरण असे म्हणता येईल. जागतिकीकरणाच्या संकल्पनेत वित्त व भांडवल यांची मालकी, बाजार व स्पर्धा, संशोधन व ज्ञान यांना संलग्न तंत्रज्ञान, राहणीमानाचे आधुनिकीकरण, संपूर्ण जगाविषयी जाणीव, राजकीय संलग्नत्ता, राजकीय नियमांची क्षमता व व्यवस्थापन इत्यादी बाबींचा समावेश होतो.

११.४.१ व्याख्या (Defination) :

आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने जागकिकीकरणाची व्याख्या पुढीलप्राणे केली आहे.

१) रुसी मोदी : मुक्त स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान याद्वारे उत्पादन आणि उत्पादकता वाढविणे आणि संपूर्ण जगाची सलग एकच बाजारपेठ निर्माण करुन वस्तू व सेवा यांची विक्री करणे.

२) श्रवणकुमारसिंग : जागतिकीकरण म्हणजे सर्व देशाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे आणि भांडवलाचे सुलभ परिचालन निर्माण करणे होय.

३) प्रा. देवेंद्र अवस्थी : बाजाराधिष्ठीत आर्थिक विकासाच्या डावपेचातून जागतिकीकरणाचे धोरण अस्तित्वात आले. या धोरणात आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक वातावरणाशी राष्ट्रीय अर्थव्यवस्तेचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्व वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध टप्याटप्याने रद्द करणे, आयात कमीत कमी पातळीवर आणणे तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण करणे, जागतिकीकरणामध्ये राष्ट्रांतर्गत श्रमविभागणी आणि राष्ट्रीय बाजारपेठ यापेक्षा आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ यांचा प्रभाव अधिक असतो. त्यामुळे भांडवल, वस्तू, तंत्रज्ञान आणि श्रम यांच्या गतिशीलतेला राष्ट्रीय सीमा राहात नाहीत. जागतिकीकरणामुळे जगातील प्रत्येक राष्ट्राची आणि राष्ट्राराष्ट्रातील उद्योगांची स्पर्धा वृत्ती वाढीस लागते. जगात चालणाऱ्या संशोधन व विकासाचा लाभ सर्वच राष्ट्रांना तत्परतेने मिळतो. त्यामुळे प्रत्येक राष्ट्रातील कार्यक्षमता आणि उत्पादकता यात जलद वाढ होते.

११.४.२ जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये : जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) मोठ्या प्रमाणात व्यवहार : जागतिक व्यवसायात उत्पादन आणि विपणन व्यवहार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात येतात. त्यांना जागतिक गरजा पूर्ण करावयाच्या असतात. त्यामुळे उद्योगांना बाह्यबचतीचे लाभ होतात.

२) मोठी स्पर्धा : जागतिकीकरणामुळे मोठ्या स्पर्धेला चालना मिळते. जागतिक बाजारातील स्पर्धेचे स्वरुप फार उच्च आहे. व्यवसाय संस्थेला देशांतर्गत स्पर्धक आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धक यांच्याशी एकाचवेळी स्पर्धा करावी लागते. तसेच जगातील सर्व निर्यातक देशांबरोबर स्पर्धा करावी लागते.

३) सीमेपलिकडे व्यापार व स्थलांतर यात वाढ : जागतिकीकरणाला प्रोत्साहन देणारे धोरण आणि गेल्या दशकातील तांत्रिक विकास यामुळे सीमेपलिकडे व्यापार, गुंतवणूक आणि स्थलांतर यात मोठी वाढ झाली आहे.

४) खुली बाजाराधिष्ठीत अर्थव्यवस्था : गेल्या दोन दशकात जागतिक पातळीवर अनेक सरकारांनी खुल्या बाजारधिष्ठीत अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. स्वतःच्या उत्पादनक्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ करुन आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूक यांना मोठ्या प्रमाणात संधी निर्माण केल्या. व्यापारावरील निर्बंध कमी केले. वस्तू आणि सेवा यांचा व्यापार आणि गुंतवणूक याबाबत अनेक आंतरराष्ट्रीय करार अस्तित्वात आले.

५) आंतराष्ट्रीय वित्तीय आणि व्यवसाय रचनेचा विकास : सध्याचे जागतिकीकरण हा आंतरराष्ट्रीय वित्तीय आणि व्यवसाय रचनेच्या विकासाचा परिणाम आहे.

६) तांत्रिक विकास : माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे आर्थिक जीवनामध्ये फार मोठा बदल झाला. माहिती तंत्रज्ञानामुळे जागतिक उपभोक्ता, गुंतवणुकदार, व्यवसाय, आर्थिक प्रवाहांचे विश्लेषण करण्याची नवी साधने, त्याद्वारे नव्या आर्थिक संधीचा शोध आणि त्यांचा पाठपुरावा शक्य झाला. साधनांचे हस्तांतरण आणि जागतिक भागिदारांबरोबर सहयोग शक्य झाला.

७) बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विकास : जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या अस्तित्वात आल्या. बहुराष्ट्रीय कंपनी या आपल्या शाखांच्याद्वारे अनेक देशात व्यवसाय करतात. त्यामुळे जागतिक व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ होते.

आपली प्रगती तपासा.

१) जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.४.३ जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम (Impact of Globalizaton on Economy)

भारताचे जागतिकीकरणाचे धोरण स्विकारल्यामुळे जागतिकीकरणाच्या नियमांचे पालन करावे लागते. त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर व अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर जागतिकीकरणाचे विविध परिणाम झालेले दिसून येतात. त्यापैकी काही महत्त्वाचे परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) आयात शुल्कात कपात : भारताने आयातीवरील प्रशुल्क कमी करावे, उपभोग्य वस्तुंच्या आयातीवर घातलेली नियंत्रणे हटवावीत, नकारात्मक निर्बंध दूर करावेत इत्यादीबाबत जागतिक व्यापार संघटना (W.T.O.) भारतावर दडपण आणत आहे. परिणामी भारताने प्रामाणिकपणे करारातील अटींचे पालक करून सीमाशुल्प दरवर्षी घटवत नेले. यामुळे भारतीय उद्योगांना विदेशी मालाशी स्पर्धा करावी लागत आहे.

२) चीनी वस्तूंचा व्यापार : सध्या चीनमध्ये उत्पादन झालेल्या वस्तुंचा व्यापार भारतामध्ये कमी किंमतीमध्ये होत आहे. भारतातील कोणत्याही उत्सवाला भारतीय बाजारपेठा चीनी वस्तुंनी गजबजलेल्या दिसत आहेत. त्यामुळे भारतीय उद्योजकांपुढे नवीन समस्या निर्माण झालेली आहे.

३) विदेशी भांडवलाची गुंतवणूक : जागतिकीकरणामुळे देशात मोठ्या प्रमाणावर विदेशी गुंतवणुक होऊ लागली आहे. पायाभूत उद्योगांमध्येही अशा प्रकारच्या गुंतवणूकीचा प्रभाव दिसू

लागलेला आहे. त्यामुळे देशातील साधन सामग्रीचा पर्याप्त उपयोग होऊ लागला व रोजगाराच्याही अनेक संधी उपलब्ध होत आहेत.

४) भांडवल बाजारामध्ये गुंतवणूक : परकीय गुंतवणुकीवर असलेले निर्बंध कमी करण्यात आल्याने परकीय संस्थात्मक गुंतवणुकदारांनी भारतातील भांडवल बाजारात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केलेली आहे. कोट्यावधी रुपयांची परकीय गुंतवणूक भारतीय भांडवल बाजारात झालेली आहे.

५) जुन्या कार आयातीची परवानगी : भारताने विदेशातील जुन्या कार आयातीस परवानगी दिल्याने भारतीय ऑटोमोबाईल उद्योगांवर संक्रात ओढावली आहे. भारत सरकारच्या या निर्णयास प्रसिद्ध उद्योगपती श्री. राहुल बजाज यांची राष्ट्रविरोधी कार्य असे संबोधले आहे.

६) भारतातील उद्योगांची पिछेहाट : जागतिकीकरणानंतर आपल्या देशातील उद्योगांना जागतिक स्पर्धेला तोंड द्यावे लागत असल्याने देशातील अनेक प्रतिष्ठीत उद्योगांना सुरुवातीला अस्तित्व टिकवून ठेवणे अशक्य झाले. म्हणून भारतीय कंपन्यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या उद्योगाची विक्री केली. देशातील बाजारपेठांमध्ये निर्माण झालेल्या तीर्व स्पर्धेमुळे अनेक उद्योगांची पिछेहाट झाली.

७) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व : जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात प्रवेश करण्याची मुक्त संधी मिळाली. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर देशात शिरकाव केला. भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे विदेशी भांडवल गुंतवणुकीमध्ये वाढ होऊन औद्योगिक क्षेत्राचा विस्तार घडून आला आहे.

८) टिकाऊ उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात वाढ : विदेशी गुंतवणुकीचा ओघ भारतात आला व मोठ्या प्रमाणावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांचे उत्पादन भारतात सुरू केल्याने मोठ्या प्रमाणावर स्पर्धा सुरू झाली आहे. त्यामुळे टिकाऊ व उपभोग्य अशा वस्तूंच्या उत्पादनात वाढ झाली. जागतिकीकरणापूर्वी ज्या उद्योगांची देशात मक्तेदारी होती ती संपुष्टात आली.

९) बेकारीमध्ये वाढ : जागतिकीकरणामुळे देशात आधुनीक तंत्रज्ञान आले, संगणक आले. त्यामुळे उत्पादनाच्या पारंपारिक पद्धती कालबाह्य ठरल्या व त्यांचा परिणाम रोजगारावर मोठ्या प्रमाणात झाला. अनेक लोकांना त्यांचा रोजगार गमवावा लागला व बेकारीत वाढ झाली.

१०) देशातील उद्योग आजारी व बंद पडले : जागतिक स्पर्धा व बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्याबरोबर टिकून राहणे अनेक उद्योगांना शक्य न झाल्याने ते उद्योग बंद पडले. अनेक उद्योग आजारी पडले. या सर्व उद्योगातील कर्मचाऱ्यांवर बेकारीची समस्या निर्माण झाली आहे.

आपली प्रगती तपासा.

१) जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.५ नवीन औद्योगिक धोरण (NIP) १९९१

२४ जुलै १९९१ रोजी केंद्र सरकारने नवीन औद्योगिक धोरणाची घोषणा केली. त्यावेळी भारताचे पंतप्रधान श्री. नरसिंहराव हे होते. तर अर्थमंत्री श्री. मनमोहन सिंग हे होते. या धोरणाचे मुख्य ध्येय भारतीय उद्योग क्षेत्राचे उदारीकरण करणे हे होते. या धोरणाची महत्त्वाची उद्दीष्ट्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देणे, आर्थिकदृष्ट्य मागास विभागाचा विकास करणे, भारतीय उद्योगांना पाश्चात्य देशातील उद्योगांशी स्पर्धा करू शकतील अशा प्रकारे सक्षम करणे, उत्पादनाच्या साधन-सामुग्रीचा पर्याप्त वापर करणे, उत्पादक रोजगारामध्ये वाढ करणे, औद्योगिक विकासाचा वेग वाढविणे व औद्योगिक संरचनेमधील अनिष्ट प्रवृत्तीचे निर्मुलन करणे ही सांगता येतील.

११.५.१ नवीन औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये (Features of NIP) :

नवीन औद्योगिक धोरण व्यापक आहे. औद्योगिक अर्थव्यवस्थेमधील काही क्षेत्रांमध्ये जुनी पायवाट सोडून, सरकारच्या व्यवहारांना पूर्णपणे वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न या धोरणाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. या धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) **सार्वजनिक क्षेत्रांचा संकोच :** १९९१ चे औद्योगिक धोरण सार्वजनिक क्षेत्राचे कार्यक्षेत्र कमी करण्यावर भर देणारे होते. या धोरणानुसार फक्त आठ उद्योगच सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव असलेल्या उद्योगांच्या संख्येमध्ये उत्तरोत्तर घट करण्यात आली. सध्या फक्त तीनच क्षेत्रे सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव आहेत. ती अणुशक्ती, अणुशक्तीच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट खनिजे व रेल्वे वाहतूक ही आहेत.

२) **परवाना पद्धतीत अमुलाग्र बदल :** उद्योजकांना अधिक स्वातंत्र्य देण्याकरिता व त्यांना गुंतवणुकीचे निर्णय तत्परतेने घेण्यासाठी १९९१ या धोरणात सध्या फक्त सहा उद्योगांकरिताच परवाने घेणे अनिवार्य (Compulsory) ठरविण्यात आले आहे. अल्कोहोल, सिगारेट, हानिकारक रसायने, संरक्षणविषयक उपकरणे, औद्योगिक स्फोटके, ड्रग्ज व फार्मस्युटिकल्स या सहा उद्योगांना परवाना घेणे आवश्यक आहे. इतर सर्व उद्योगांच्या बाबतीत परवाना पद्धती संपूर्णपणे रद्द करण्यात आला आहे.

३) **विदेशी भांडवलाची गुंतवणूक :** १९९१ च्या आगोदर विदेशी गुंतवणूकीसाठी सरकारची परवानगी घ्यावी लागत होती. त्यामळे त्यामध्ये प्रचंड विलंब होत होता. तसेच सरकारी हस्तक्षेपही मोठ्या प्रमाणावर होत असे. परंतु नवीन धोरणानुसार ३४ उद्योगांची एक यादीच

करण्यात आली. या उद्योगांना सरकारकडून कोणतीही विशेष अनुमती न मिळवता या उद्योगांच्या भाग भांडवलाच्या ५१ टक्के भांडवल विदेशातून आणता येईल. तर आता काही उद्योगांकरिता ही मर्यादा १०० टक्के पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

४) विदेशी तंत्रज्ञान : तंत्रज्ञानाच्या अभावामुळे भारतीय औद्योगिक विकासाच्या मार्गत अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे नवीन औद्योगिक धोरणानुसार सरकार उद्योगपतींना परकीय तंत्रज्ञानाची आयात करण्याकरिता आवश्यक ते करार करण्यासाठी अनुमती देईल. त्याचप्रमाणे परकीय तंत्र व तंत्रज्ञानाच्या सेवा यांचा उपयोग करून घेण्यासाठी उद्योगपतींना मुक्त परवानगी दिली जाईल.

५) सार्वजनिक क्षेत्राचे निर्गुंतवणुकीकरण : सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून ज्यांना महत्त्व नाही, ज्याठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही व ज्याठिकाणी अल्पप्रमाणावर उत्पादनाचे कार्य केले जाते अशा उद्योगांचे निर्गुंतवणुकीकरण करण्याचे धोरण १९९१ च्या धोरणात ठरविण्यात आले. त्यामुले सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योगांचे खाजगीकरण करण्यात आले आहे.

६) मक्तेदारी नियमन कायद्यामध्ये सुधारणा : १९९१ पूर्वी १०० कोटी रु. पेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या सर्व उद्योगांना मक्तेदारी नियमन कायदा (M.R.T.P. Act) लागू होता. यामुळे या उद्योगांमध्ये उत्पादनात वाढ करणे, विस्तार करणे, नवीन उत्पादन करणे इ. बाबींवर कडक नियंत्रण होते. नवीन औद्योगिक धोरणानुसार ही सर्व नियंत्रणे कमी करण्यात आली आहेत.

७) नवीन उद्योगांसाठी परवाना : नवीन औद्योगिक धोरणानुसार ज्या उद्योगांना परवाना घेणे आवश्यक आहे. निवडक उद्योग सोडल्यास, इतर उद्योग १ मिलियन लोकासंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या नसलेल्या शहरामध्ये सुरू करण्यासाठी सरकारच्या परवान्याची गरज नाही. १ मिलियनपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरामध्ये २५ कि.मी. अंतरापलिकडे नवीन उद्योग सुरू करण्यासाठी सरकारच्या परवान्याची गरज नसते.

८) कर्ज भागभांडवलामध्ये परिवर्तित करण्याची तरतूद रद्द : बँका व वित्तीय संस्था उद्योगांना जो कर्जपुरवठा करतात त्यामध्ये कर्जाचा काही टक्के भाग भांडवलामध्ये परिवर्तीत करण्याची तरतूद नवीन औद्योगिक धोरणामध्ये करण्यात आली. बँका व वित्तीय संस्थांना या प्रकारच्या तरतुदीचा उपयोग करून उद्योगांचा प्रत्यक्ष ताबा घेणे किंवा उद्योगांच्य व्यस्थापनावर दडपण आणणे शक्य होते. म्हणून अशा प्रकारची तरतूदच या धोरणातून रद्द करण्यात आली आहे.

९) उत्पादन प्रक्रिया : इंजिनिअरींग व इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांना उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल देशातूनच खरेदी करावा लागत असे. परंतु नवीन धोरणामध्ये ही तरतूद कमी करण्यात आली आहे. आता अशा प्रकारच्या उद्योगांना उदार आयात धोरणाची तरतूद करण्यात आली आहे.

आपली प्रगती तपासा.

१) नवीन औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.६ माहिती तंत्रज्ञान (Information Technology)

११.६.१ प्रास्ताविक –

माहिती तंत्रज्ञान या दोन शब्दांचे महत्त्व पुन्हा वेगळया पध्दतीने सांगण्याची गरज नाही. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. आंतरजाल (इंटरनेट) वर माहितीचा प्रचंड साठा आहे किंवा माहितीचा महासागर आहे. शिक्षण क्षेत्रापासून ते सर्व उद्योंगापर्यंतची माहिती तसेच सर्व क्षेत्रामधील माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे. नवीन उद्योग सुरु करण्यासाठी या माहितीचा नक्कीच उपयोग करुन घेता येतो.

तंत्रज्ञानाचा वापर करुन अनेक सेवा व सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. समाजाचे आर्थिक, शैक्षणिक परिवर्तन होत आहे. समाज जास्त गतिमान बनत असताना त्याच्या सुखाच्या कल्पना या पूर्वीच्या पिढीपेक्षा वेगळ्या आहेत. उत्तम सेवा व सुविधांसाठी समाजाची पैसे खर्च करण्याची क्षमता व वृत्ती बदलत आहे. शिक्षण, व्यवसाय अथवा नोकरीचे ठिकाण व राहण्याची जागा हे यातील अंतर वाटत आहे. त्यामुळे दररोज प्रवासात वेळ बराच लागत आहे. अशा बदलत्या जगामध्ये वेगवेगळ्या सेवा व सुविधा पुरविण्याची गरज आहे. अशा सेवा व सुविधांसाठी नवीन उद्योगांना भरपूर संधी आहे.

११.६.२ नवीन उद्योग –

नवीन उद्योग सुरु करण्यासाठी अनेक गोष्टींचा बारकाईने विचार करावा लागतो. नवीन उद्योगामधील संभाव्य धोके व त्यासाठी उपाययोजना याची आखणी आधीच करुन ठेवावी लागते. नवीन उद्योगामध्ये मेहनत, चिकाटी व गुणवत्ता राखल्यास नक्कीच यश मिळेल. आर्थिक बाजू म्हणजे भाग भांडवल उभारणी यासाठी अनेक संस्थाचे साहाय्य मिळू शकते. आपल्या देशामध्ये सरकारच्या पातळीवरही नवीन उद्योजकांना साहाय्य व प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या योजना उपलब्ध केल्या आहेत. इंटरनेटला माहितीचा महामार्ग म्हणतात. इंटरनेटला वापर करुन नविन उद्योगांना लागणारी सर्व माहिती मिळू शकते. तसेच नवीन उद्योग सुरु करण्यासाठीही सेवा व सुविधा मिळू शकतात.

प्रत्येकजण सतत आपल्या कामामध्ये व्यग्र किंवा व्यस्त असतो. चांगल्या व नविण्यपूर्ण कामासाठी वापरलेला वेळ मनाला आनंद देतो. नवनवीन निर्मिती व त्यापासून समाजाला उपयुक्त सेवा उपलब्ध करणे हे कार्यमग्न लोकांमध्ये विशेषाने दिसून येते. अशा उद्योजक मनात

वेगवेगळ्या कल्पना येतात. त्या कल्पना व्यवहारामध्ये उतरविण्यासाठी त्यांची धडपड चालते. कल्पनांना मूर्त रुप देताना उद्योजक व्यवहार्यता तपासून पाहतात. अशा पध्दतीने नवीन उद्योगांना चालना मिळते. त्या उद्योगांचे यश – अपयश अनेक गोष्टींवर अवलंबून असते.

सध्याच्या स्पर्धात्मक जगामध्ये आय. एस. ओ. सारखे गुणवत्ता सिध्द करणारे प्रामणपत्र उद्योजकांना घ्यावे लागते व उत्पादनाचा पुरवठाही वेळेत करावा लागतो. अशा वेळी मागणी जास्त असल्यास किंवा कमी खर्चात उत्पादन करण्यासाठी काही कंपन्या इतरांना काही भागांचा पुरवठा करतात. यातूनही नवीन उद्योगाला सुरुवात करता येते. इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन संस्था अंतर्गत इंडस्ट्रिअल जागा तसेच वीज, पाणी, रस्ते या सुविधा उपलब्ध करुन दिल्याने नविन उद्योग वेगवेगळया खंडामध्ये सुरु झाले. सन १९६५ मध्ये आशिया खंडामध्ये भारत पहिला देश होता की ज्याने कांडला येथे ई.पी. झेड निर्माण केला. एप्रिल २००० मध्ये एस. ई. झेड धोरण जाहीर केले. मे २००५ मध्ये एस. ई. झेड ऍक्ट लोकसभेने संमत केला. १० फेब्रुवारी २००६ रोजी एस. ई. झेड ऍक्ट २००५ त्यासाठीचे SEZ नियम केल्यावर अमलात आला. उद्योगधंदयासाठी परकीय गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी हा कायदा करण्यात आला.

SEZ ची मूळ उद्दिष्टे

१) इकॉनॉमिल ऍक्टिव्हीटीची वाढ व्हावी.

२) निर्यातीमध्ये वाढ व्हावी.

३) परेदशातून व देशामधून इन्व्हेस्टमेंट वाढावी.

४) एम्प्लॉयमेंटच्या संधी मिळाव्या.

५) पायाभूत सुविधांची (इन्फ्रास्टक्चरची) वाढ व्हावी.

SEZ असे ५८५ प्रकल्प भारतामध्ये सुरु झाले आहेत. पुण्याजवळीले हडपसर येथे मगरपटटा टाऊनशिप हा SEZ प्रकल्प १२ हेक्टर जागेमध्ये उभारला असून येथे अनेक कंपन्यांनी त्यांचे काम सुरु केले आहे. अशा मोठ्या प्रकल्पांपासून ते घरी बसून परदेशामधील कंपन्यांचे काम घरच्या संगनकावर इंन्टरनेटच्या माध्यमातून करुन देण्यासारख्या अनेक नवीन उद्योगाची संधी उपलब्ध आहेत.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - नवीन उद्योगांचे सुरु करण्यासाठी काय कराल ते स्पष्ट करा ?

_____

_____

_____

११.६.३ माहिती तंत्रज्ञानाद्वारे माहिती –

इंटरनेट व संगणक यांच्या साहाय्याने अनेक उत्तम नविन उद्योग सुरु करता येतात. यामध्ये शालेय शिक्षणातून ते बॅकिंग क्षेत्रापासून अनेक उद्योग सुरु करता येतात. परंतु त्यासाठी प्रोग्रॅमिंग, मल्टीमिडीया, वेब डेव्हलपमेंट यांचे ज्ञान संपादन करणे जरुरीचे आहे. इंटरनेटवर

अनेक ट्रेनिंग सेंटरचा वेबसाइट उपलब्ध आहेत. काही वेबसाईटवर ई -लेखन उपलब्ध आहे. घरी बसून सुध्दा इंटरनेटवर असे कोर्स करता येतात. उद्योगांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा – सुविधांची माहिती व जाहिराती इंटरनेटवर उपलब्ध आहेत. हे सर्च इंजिनचा वापर करुन आपणास हव्या असलेल्या उद्योगांची माहिती क्षणात उपलब्ध होते.

इंटरनेटच्या माध्यमातून परदेशामधील संस्थांसाठी डाटा एन्ट्रीचा उद्योग घरी बसून करता येतो. यासाठी इंटरनेटवर अशा प्रकारच्या गरजांची माहिती वेब साईटवरुन मिळते. मेडीकल ट्रान्सक्रिप्शनसारख्या उद्योगांची माहितीही इंटरनेटवर मिळते. यासाठी मेडिकलमधील शब्दांची नीट माहिती व परदेशी डॉक्टरांच्या बोलीभाषेचा सराव करावा लागतो. अशा उद्योगांमध्ये डॉक्टर पेशंटची माहिती व त्याला दिलेले औषध यांची माहिती ऑडिओ फाईलमधून पाठवितात. या फाईल ऐकून याची डाटा एन्ट्री करुन घ्यावयाची असते. वधू –वर सूचक मंडळासारखे उद्योग इंटरनेट माध्यमातून करता येतात.

उद्योग सुरु करताना अर्ज कुठे करावयाचा, अर्जाचा नमुना, अनामत रक्कम भरणे याचीही माहिती इंटरनेटवर मिळते. सध्या पेपरमध्ये जाहिराती देण्यापेक्षा इंटरनेटवर नवीन कामाच्या निविदा वेबसाईटवर देणे. फारच सोपे झाले आहे. पेपरमध्ये त्या परिसरासाठीच जाहिरात देता येते परंतु इंटरनेटवरची जाहिरात ही जगभर बघता येते.

११.६.४ माहिती, तंत्रज्ञान व संप्रेशन यांची वाढ आणि त्यांचा दररोजच्या जीवनावरील परिणाम-

प्रस्तावना – मानवाच्या दररोजच्या जिवनावर माहिती व तंत्रज्ञानाने खूप मोठा प्रभाव टाकलेला आहे. इंटरनेट, वेब, रिमोट सेंसीग, जीआयएस, जीपीएस, दूरध्वनी, दूरभ्रमणध्वनी यंत्र, फॅक्स या साधनांच्या विकासामुळे एका ठिकाणची माहिती काही सेंकदातच दुसऱ्यापर्यंत पोहचवता येते. त्यामुळे, माहिती तंत्रज्ञान व दळणवळणाची प्रक्रियाने सर्व सिमा पार केल्या आहेत. त्यामुळे व्यवसाय, व्यवस्थापन आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत क्रांती झाली आहे. याचा आपण थोडक्यात अभ्यास करु.

११.६.५ माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव –

१) वेब (WWW) - यावर विविध विषयांवर माहिती उपलब्ध असल्यामुळे अनेकजण याचा वापर करतात. उदा. पर्यावरण, मंत्रालय, भारत सरकार यांच्या वेब साइडच आहेत. त्यावर अनेक प्रकारची माहिती उपलब्ध आहे.

२) जीआयएस – पृथ्वीतलांवरील विविध ठिकांणाची माहिती यावर उपलब्ध आहे. विविध कारणांसाठी, उपयोगांसाठी या माहितीच्या उपयोग होतो. याचबरोबर पाण्याचा श्रोत कोठे आहे. मातीचा प्रकार, जंगली भाग, पीके, कुरणे यांचीही माहीती मिळविण्यासाठी या तंत्राचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग होतो /

औद्योगिकीकरणामध्ये, कारखाने कोठे टाकावेत याची माहिती मिळविण्यासाठी या तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

३) रिमोट सेंसीग – अवकाशातून पृथ्वीतलाची देखरेख करणे यालाच रिमोट सेंसींग असे म्हणतात. यासाठी वापरलेल्या जाणाऱ्या उपग्रहाला रीमोट सेंसीग उपग्रह म्हणतात. हे तंत्रज्ञान अतिशय उपयुक्त आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आवश्यक असणारी अत्यंत महत्त्वाची माहिती या तंत्रज्ञानामुळे उपलब्ध होते. या तंत्रामुळे मिळणारी माहिती खालील प्रमाणे –

* जलसाठ्यांची माहिती अतिशय जलद गतीने मिळते. पाणी कोठे नाही, साठा किती आहे हे जाणून घेता येते.
* भू-सर्वेक्षण :– उपग्रहाच्या मदतीने राष्ट्रीय पातळीवर भू- सर्वेक्षण करता येते.
* राष्ट्रीय पेयजल मोहीम :– भू – गर्भातील पाण्याच्या साठयाचा अंदाज यामुळे बांधता येतो. ही मोहीम राष्ट्रीय पेयजल मोहीमेतांर्गत राबविण्यात येते.
* दुष्काळग्रस्त भागांचा आढावा :– प्रदेशानुसार दुष्काळग्रस्त भागांवर देखरेख करता येते. यासाठी हा उपग्रह अत्यंत उपयुक्त ठरला आहे. तसेच पिकांचे सर्वेक्षण करण्यातही याचा उपभोग होतो.
* जंगल भागाचे मापन :– प्रदेशानुसार जंगलाचे प्रमाण माहीत करुन घेण्यासाठी या तत्रांचा उपयोग होतो.
* पुरांबद्दल सर्वेक्षण :- या तंत्राच्या साहयाने पुरग्रस्त भागाची माहिती तात्काळ उपलब्ध होते तसेच काम उपाय योजना केल्या पाहिजेत याची कल्पना येते.
* मासेमारी :– मासेमारीसाठी आवश्यक असणारी माहिती उदा. माश्यांची उपलब्धता, हवामान, प्रवाह यांची माहीती मिळत असल्यामुळे मासेमारीसाठी या तंत्राचा उपयोग करुन घेतला जातो.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.६.६ दळणवळण (संप्रेशन) Communications – आपल्या भावना, विचार, कल्पना, मते यांची देवाण – घेवाण करण्याल्याच संप्रेशन असे म्हणतात. यामुळे व्यक्ती एकमेकांशी संभाषण करतात व सामाजिक व्यवहार प्रस्थापित करतात. संप्रेशन करण्याच्या पध्दतीमध्ये विविध साधनांचा वापर करण्यात येत आहे. हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. गेल्या दोन दशकात दळणवळणाच्या तंत्रामध्ये अमुलाग्र बदल झाला आहे. फार मोठी क्रांती झाली आहे. कमी वेळात व कमी खर्चात अचूक पध्दतीने संप्रेशन करण्याचे तंत्र विकसीत झाले आहे.

११.६.७ संप्रेशनाच्या विविध पध्दती –

१) **दूरध्वनी** – व्यवसाय, घर, व्यवस्थापनामध्ये दूरध्वनी हा महत्वाचा घटक बनला आहे. सर्वसामान्य मानसाचाही तो उपयुक्त घटक आहे. व्यवसायामधे मागणी व पुरवठा करण्यासाठी याचा वापर केला जातो. नातेवाईकांची चौकशी करणे, खुशाली विचारणे यासाठी सर्वसामान्य माणूस याचा उपयोग करतो. पैसा व वेळ मोठया प्रमाणात वाचून झटपट दळणवळाचे महत्वपूर्ण साधन म्हणून दूरध्वनीकडे बघता येईल.

२) **भ्रमणध्वनी** – दूरध्वनी एकाच ठीकाणी लावलेले असतात तर भ्रमणध्वनी सोबत कोठेही घेवून फीरता येतात. त्यामुळे व्यक्ती कोठेही गेली तरी तिच्याशी संपर्क साधता येतो. संभाषण बरोबरच मेसेज पाठविणे, करमणूक करणे, खेळ खेळणे यासाठीही यांचा वापर होतो.

३) **फॅक्स** – कागदपत्रांच्या जशाच्या तश्या प्रती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविण्यासाठी या यंत्राचा उपयोग होतो. दूरध्वनी जाळयांचा वापर यासाठी केला जातो त्यामुळे याचा खर्च परवडण्या एवढाच असतो.

४) **संगणक** – आज संगणक म्हणजे माहितीचे आगार बनले आहे. संप्रेशनाच्या क्षेत्रांत त्यांनी क्रांती आणली आहे. इ-मेल, इंटरनेट, व्हीडीओ व सभेंसाठी यांचा वापर मोठया प्रमाणात केला जातो.

* **ई – मेल** :– हे अंत्यत जलद गतीने संप्रेशन करते. तसेच त्यात अचूकता असते. आज दररोज लाखो इ-मेल केले जातात यावरुन त्याचे महत्व लक्षात येते.

* **इंटरनेट** :– संप्रेशन क्षेत्रातील अतिशय महत्वाचा शोध म्हणजे इंटरनेट. संगणद्वारे इ-मेल पाठवीला जातो. जगात उपलब्ध असलेली माहीती संगणावर टाकता येते. तसेच ती मिळवताही येते. ही माहीती संगणकावर इंटरनेटद्वारे मिळविता येते. यामुळे संपूर्ण विश्व एक खेडेगाव बनले आहे. एकाठिकाणची बातमी लगेचच दुसऱ्या ठीकाणी पाठविता येते.

* **व्हिडीओ सभा** :– व्हिडीओ सभा हा एक दूर चित्रवाणी सारखाच प्रकार असतो. एकाच वेळी दोन वेगवेगळया ठिकाणी राहणाऱ्या, असणाऱ्या व्यक्तिची सभा या तंत्राद्वारे आयोजित करता येते. दोन्हीही व्यक्ती समोरासमोर नसल्याचा आभास निर्माण होतो. ज्यामुळे सभांचे आयोजन लवकर होते. वेळेचा दुर्पुयोग टाळता येतो आणि त्याचबरोबर प्रवास टाळता येतो.

आपल प्रगती तपासा

प्रश्न - १) संप्रेशन म्हणजे काय ?

२) संप्रेशनाच्या विविध पध्दती सांगा.

_____

_____

_____

_____

११.७ बदलती मूल्ये आणि जीवनशैली -

मूल्ये म्हणजे सामाजिक तत्त्वे, ध्यये किंवा व्यक्तीने स्वीकारलेली मानके, विशिष्ट वर्गाने किंवा समाजाने स्वीकारलेली मानके होय. जीवनपध्दती म्हणजे जगण्याची पध्दती होय. व्यक्तीने जगण्यासाठी निवडलेल मार्ग, जगण्याची वैशिष्टये, दृष्टीकोन, उद्देश, स्थान आणि मूल्ये इत्यादी म्हणजे जीवनपध्दती होय.

सध्याच्या जागतिकीरणाच्या या युगामध्ये विशेषतः तरुणांच्या जगण्याच्या पध्दतीमध्ये प्रचंड मोठा बदल झालेला आहे. तसेच तत्त्वांमध्येही बदल झालेला आहे. मानवी मूल्ये म्हणजे सत्य, प्रामाणिकपणा, सहकार्य, सहिष्णुतता, वडिलधाऱ्यांचा मान –सन्मान आणि देशभक्ती इत्यादी मूल्ये अंगी असणे होय. परंतु सध्या लोक वास्तववादी आणि स्वयं केंद्रीय दिसून येतात. आजची तरुण पिढी पश्चिमात्य संस्कृती व जीवनपध्दतीचे अनुकरण करीत असल्याचे दिसते. परंतु आपण अनुकरण करताना त्यांच्या नकारात्मक संस्कृतीचे करतो. भारतासह अनेक देशात संस्कृतीला नकारात्मक व सकारात्मक अशा दोन बाजू असतात. पण आपण कशाचा स्वीकार करावयाचे हे तरुण पिढीने स्वतः ठरवावयाचे असते. परंतु जागतिकीकरणाच्या युगामध्ये आपण मानवी मूल्यांचे अध :पातन करीत आहोत आणि आपली जीवनपध्दती वास्तववादी व काल्पनिक करीत आहोत.

११.७.१ बदलती मूल्ये (Changing Values)

जागतिकीकरणामुळे आपली बदलती मूल्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) अप्रामाणिकपणा (Dishonest)

स्वत:ची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी वाईट मार्गांचा अवलंब समाजातील अनेक लोक करीत आहेत. दिवसेंदिवस समाज अप्रमाणिकपणाकडे भरकटत चालला आहे. सत्य आणि प्रामाणिकपणाची किंमतच शिल्लकच राहिली नाही. कोणत्याही क्षेत्राचा विचार केला तरी बहुसंख्य हीच परिस्थिती आढळून येते. नोकरी, व्यवसाय, उद्योगधंदा सर्वच ठिकाणी आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी चुकीच्या मार्गाचा अवलंब होत आहे. शिक्षण, व्यवसाय डॉक्टर, वकील किंवा इतर प्रशासकीय अधिकारी सर्वच क्षेत्रामध्ये जवळपास हीच परिस्थिती दिसून येते.

२) औदार्याचा अभाव (Lack of Generosity)

सध्याचे लोक स्वयंभू व आलकेंद्रीत होत चालले आहेत. समाजातील समस्यांकडे ते जाणून बुजून दुर्लक्ष करतात. इतरांच्या अडचणीत त्यांना मदत करणे, पाठिंबा देणे, सहकार्य करणे, त्यांचे मनोबल वाढविणे या गोष्टी दिवसें दिवस कमी – कमी होत चालल्या आहेत. कारण स्वतः पुरताच विचार करणे, महागडया वस्तू खरेदी करणे, मौजमज्जा करणे आणि चैनीत रहाणे किंवा जगणे आणि त्याप्रमाणेच वागत आहेत. त्यामुळे औदार्य संपलेले आहे.

३) न्यायाचा अभाव (Lack of Justice) -

सध्या लोक कशालाच न्याय देत नाहीत. जीवनात क्षणोक्षणी पक्षपाती धोरण आपणास दिसून येते. कामाच्या ठिकाणी, राजकारणात, कुटुंबात समाजात किंवा इतरत्र कोठेही जास्तीत जास्त अन्यायच दिसून येतो. कामाच्या ठिकाणाचा विचार केल्यास मालक कामगारांना न्याय

देत नाही. प्रामुख्याने ते जीव ओतून व प्रामाणिकपणे काम करीत असतात. तरी सुध्दा त्यांच्या बाबतीत त्यांना कधीच न्याय मिळत नाही. समानता आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व कधीच वापरले जात नाही. अनेकदा कर्मचारी, कामगार प्रामाणिकपणे व चिकाटीने काम करीत नाहीत. थोडक्यात सर्वच ठिकाणी न्यायाचा अभाव कोणत्या ना कोणत्या स्वरुपात दिसून येतो.

४) असहिष्णुता (Intolerance)

मानवी जीवनात सुखाबरोबर दु:खही असते. ही दु:खे सहन करण्याची क्षमता आणि दु:खात शांत मनाने मार्ग काढणारी व्यक्तीच जीवनात यशस्वी होऊ शकते. दु:खात इतरांना मदत करणे, त्यांच्या दु:खात सहभागी होणे, त्यांना सहानुभूती दाखविणे हे सध्याच्या लोकांना मानवत नाही. सर्वच ठिकाणी असहिष्णुता निर्माण झाली आहे. धार्मिक आणि राजकीय लोक तर असहिष्णुता कशी निर्माण होईल यासाठीच प्रयत्न करताना दिसत आहेत.

५) देशभक्तीचा अभाव (Patrotism) –

मानवी मनाला उल्हास, आनंद व प्रेरणा देणारे जे स्तुत्य विचार आहेत त्यामध्ये देशप्रेम, स्वदेशभिमान हे आहेत. देशभक्ती म्हणजे देशाची स्थिती सर्व दृष्टीने उत्तम राहिल अशा सुधारणा घडवून आणणे म्हणजेच देशाचा विकास करणे. दुसऱ्या देशाचा, तिरस्कार करणे म्हणजे देशभक्ती नव्हे. खरा देशभक्त तो असतो की जो स्वत:च्या देशाचा विकास व हित जोपासण्यासाठी प्रयत्न करेल. परंतु त्याच बरोबर माणुसकी म्हणून सर्व जगाचा विचार करेल. जागतिकीकरणाच्या या युगामध्ये असे देशभक्त आहेत का? स्वत:च्या देशासाठी झटणारे अनेक आहेत. परंतु मानवता म्हणून इतर देशांचा विचार करणारे थोडेच सापडतील.

६) उत्कृष्टपणाचा अभाव (Excellence) –

लोक उत्कृष्टतेच्या गप्पा मारताना दिसतात. परंतु त्यासाठी लागणारे प्रयत्न करीत नाहीत. जो उत्कृष्ट आहे त्याच्या विषयी मत्सराची, द्वेषाची भावना मनात ठेवतात. कोणतेही प्रयत्न न करता कमी वेळात लोकांना यश हवे असते. चांगल्या गोष्टींचा मोठेपणा घेण्यास लोक तयार असतात. त्या गोष्टींशी संबंध नसतानाही त्याचे श्रेय स्वत: घेत असतात, जर जीवनात यशस्वी व्हावयाचे असेल तर चार्लीस एम. शेल्डॉन यांच्या मताप्रमाणे प्रयत्न करावे लागतील.

"स्वत:ला उत्कृष्ट बनविण्याचा नेहमी प्रयत्न करा. प्रत्येक दिवशी स्वत:ला स्पर्धेत ठेवा. दररोज सकाळी तुम्ही काल केलेल्या कामाचा आढावा घ्या आणि इच्छित ध्येय मिळविण्यासाठी प्रयत्न करा."

आपली प्रगती तपासा

प्रश्न - बदलती मूल्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.७.२ बदलती जीवनशैली (Changing Lifestyles) –

जागतिकीकरणामुळे आपली बदलती जीवनशैली पुढीलप्रमाणे आहेत.

१) ऐषोरामाची हाव (Cruze for materialism) –

सध्याच्या जागतिकीकरणाचा युगात लोकांना संपत्ती, धन गोळा करुन ऐषोरामात राहण्याची इच्छा निर्माण होत आहे. स्वत:कडे पैसे नसताना किंमती व चैनीच्या वस्तू खरेदी करण्याची इच्छा निर्माण होते. आज वस्तू खरेदी करावयाची व उद्या पैसे द्यावयाचे किंवा कर्ज रुपाने त्या वस्तू घ्यावयाच्या. या संकल्पनेवर त्यांचा विश्वास असतो. विविध वस्तूंची खरेदी हप्ता पध्दतीवर केली जाते. परंतु स्वत:ची पैसे फेडण्याची ऐपत असेल तर, क्षमता असेल तर वावगे किंवा गैर काहीच नाही. अनेक प्रकरणात हप्ता वेळेवर न दिल्याने विक्रेता वस्तू परत घेऊन जातात किंवा खरेदीदाराला शेजाऱ्याकडून किंवा मित्राकडून पैसे मागावे लागतात. त्यामुळे अशा लोकांचे संबंध बिघडतात.

२) गुन्हेगारी वाढ (Increase in Crimes) -

जागतिकीकरणाच्या युगात माहिती तंत्रज्ञानामुळे रोजगारात वाढ होण्या ऐवजी घट होत आहे. अनेक तरुण बेरोजगार होत आहेत. झटपट श्रींमत होण्यासाठी हे सुशिक्षित तरुण गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात. चोऱ्या करणे, स्मगलिंग, किडनॅपिंग, ड्रग्ज व्यवसाय, आमली पदार्थ, इत्यादी गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात. तसेच इतरही बेकायदेशीर व्यवसाय किंवा धंदे करतात. त्यामुळे देशातील कायदाव्यवस्था विस्कळीत होत आहे.

३) प्रसारमाध्यमे (Media) –

जागतिकीकरणामुळे प्रसारमाध्यमे तेजीत आली आहेत. त्यांना भरभराटीचे दिवस आले आहेत. त्यामुळे त्यांच्यात मोठया प्रमाणावर स्पर्धा निर्माण होत आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व प्रसिध्दी मिळविण्यासाठी टी. व्ही. (दूरदर्शन) सारखी प्रसारमाध्यमे भडक मालिका आणि कार्यक्रम दाखवू लागले आहेत. प्रसार माध्यमांचा दर्जा यामुळे घसरत चालला आहे. त्याचा परिणाम तरुण वर्गावर होऊ लागला. तरुण वर्ग उपद्राव्य सामाजिक कार्यक्रमात, लैगिकता व हिंसाचार इत्यादींमध्ये सामील होऊ लागले आहे.

४) कौटुंबिक जीवनाची चिंता कमी (Low concern for family life) –

पैसा व संपत्ती वाढविणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ऐहिक सुखाची चटक लागलेल्या या लोकांना गाडी, बंगला इतर चैनीच्या वस्तू तर पाहिजेच असतात. परंतु त्याबरोबर कोणतीही चिंता नको असते. आई -वडील पण नको असतात. विशेषत: शहरामध्ये अनेक जोडपी 'डींक' या संकल्पनेचा अवलंब करतात. डिंक म्हणजे डबल उत्पन्न किंवा दुप्पट उत्पन्न, मूल नको अशी स्थिती आहे.

५) रेव पार्टया (Rave Parties) -

सध्याच्या तरुण वर्गाला त्यातला त्यात प्रामुख्याने इंग्रजी बोलणारा तरुण वर्ग कॉल सेंटर्स व बी. पी. ओ. मध्ये कमी वयात खूप पैसा मिळवीतो. त्यामुळे असे तरुण व तरुणी रेव पार्टयांचे आयोजन करतात. या पार्टयामध्ये असभ्य, असंस्कृत असे वर्तन केले जाते. मद्य – प्रशान, स्मोकिंग, अमली पदार्थांचे सेवन मोठया प्रमाणात या पार्टयांमध्ये केले जाते. यामुळे

त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतात व त्यांच्या करिअरलाही धोका पोहोचू शकतो. अति श्रीमंताची व काही प्रतिष्ठीतांची बिघडलेली मुले, मुली अशा पार्टयांचे आयोजन करतात.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - जागतिकीकरणामुळे बदललेली जीवनशैली स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११.८ सारांश

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. उदारीकरणाचा आणि खाजगीकरणाचा अंतिम हेतू जागतिकीकरण आहे. उदारीकरण ही संकल्पना आर्थिक उदारीकरण म्हणून विचारात घेतली जाते. उदारीकरणास शिथिलीकरण असेही म्हणतात. १९९१ पासून भारताच्या अर्थव्यवस्थेत व्यापक स्वरुपाच्या सुधारणा घडून आल्या. या सुधारणांची त्रिसूत्री म्हणजे खउजा होय.

खाजगीकरण म्हणजे साधनसामग्रीच्या उपयोगासाठी बाजारविरहीत पद्धतीऐवजी बाजाराधिष्ठीत पद्धतीचा स्वीकार करण्याची प्रक्रिया. सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगांकरिता राखून ठेवलेले क्षेत्र खाजगी क्षेत्रामधील उद्योगांना खुले करण्याच्या प्रक्रियेला खाजगीकरण म्हणता येईल. त्याचप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगांची मालकी, त्यांचे व्यवस्थापन व नियंत्रण खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना हस्तांतरित करण्याची प्रक्रिया याचाही समावेश खाजगीकरण या संकल्पनेत होतो.

अर्थव्यवस्थेत निकोप स्पर्धा वाढीला लावण्यासाठी, बाजाराधिष्ठीत किंमत यंत्रणेचा स्वीकार, ही यंत्रणा म्हणजे मागणी-पुरवठा यांच्या आधारे उत्पादन व उपयोग याबाबतचे निर्णय घेणारी यंत्रणा होय. सरकारने बाजारव्यवस्थेतील आपला हस्तक्षेप क्रमाक्रमाने कमी करणे आणि खुल्या स्पर्धेला वाव देणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. भारतीय अर्थव्यवस्था खुली करणे, निर्बंध व नियंत्रणे नियंत्रणे कमी करणे किंवा रद्द करणे, सरकारी हस्तक्षेप कमी करणे, उद्योगांमध्ये स्पर्धाशक्ती वाढीला लावणे आणि भारतीय अर्थव्यवस्था बाजाराधिष्ठीत करणे आवश्यक होते. हा मार्ग इतर राष्ट्रांनी अगोदर स्विकारला असल्याने भारताला आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारावा लागला.

जागतिकीकरण हे नविन आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे सूत्र आहे. जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा, तंत्रज्ञान व भांडवलाच्या हालचालींवरील सर्व प्रकारचे निर्बंध दूर करणे व त्यांचा प्रवाह सुखकर व गतिमान करण्याची प्रक्रिया होय. मुक्त स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान याद्वारे उत्पादन आणि उत्पादकता वाढविणे आणि संपूर्ण जगाची सलग एकच बाजारपेठ निर्माण करुन वस्तू व सेवा यांची विक्री करणे. जागतिकीकरणामुळे जगातील प्रत्येक राष्ट्राची आणि

राष्ट्राराष्ट्रातील उद्योगांची स्पर्धा वृत्ती वाढीस लागते. जगात चालणाऱ्या संशोधन व विकासाचा लाभ सर्वच राष्ट्रांना तत्परतेने मिळतो. त्यामुळे प्रत्येक राष्ट्रातील कार्यक्षमता आणि उत्पादकता यात जलद वाढ होते.

११.९ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) खाउजा ही संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

२) खाजगीकरण म्हणजे काय ? खाजगीकरणाचे परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

३) खाजगीकरणाच्या पद्धती सांगून, खाजगीकरणाचे फायदे सविस्तर स्पष्ट करा.

४) उदारकरणाची व्याख्या सांगून, उदारीकरणासंबंधी सरकारने घेतलेले निर्णय स्पष्ट करा.

५) उदारीकरणाचा भारतीय उद्योगावरील परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

६) जागतिकीकरण व्याख्या सांगून, जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

७) जागतिकीकरण व्याख्या सांगून, जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम स्पष्ट करा.

८) नवीन औद्योगिक धोरण म्हणजे कय ? नवीन औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

९) माहिती तंत्रज्ञान म्हणजे काय ? नविन उद्योग सविस्तर स्पष्ट करा.

१०) माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव व संप्रेशनच्या (दळवळण) विविध पद्धती विशद करा.

११) बदलती मूले आणि जीवनशैली यावर सविस्तर चर्चा करा.

१२) टिपा लिहा.

अ) खाजगीकरण

ब) उदारीकरण

क) जागतिकीकरण

ड) खाजगीकरणाचे फायदे

इ) जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये

ग) माहिती तंत्रज्ञान

घ) बदलती मूले

प) जीवनशैली

❖❖❖❖

१२

जागतिकीकरण : रोजगार व शेती
(Globalisation : Employment & Agriculture)

पाठाची रचना :

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रास्ताविक
१२.२ जागतिकीकरण व कामगार
१२.३ कामगारांचे स्थलांतर
१२.४ जागतिकीकरण व शेती
१२.५ सारांश
१२.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१२.० उद्दिष्ट्ये

- रोजगार म्हणजे काय ते समजणे सोपे जाईल.
- रोजगारावर जागतिकीकरणाचा परिणाम समजेल.
- स्थलांतर म्हणजे काय ? स्थलांतराचे विविध प्रकार समजणे सोपे जाईल.
- जागतिकीकरणाचा शेतीवरील परिणाम समजून घेता येईल.

१२.१ प्रास्ताविक

जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे देशात मोठ्या प्रमाणावर महिला कामगारांची संख्या वाढली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण झाला आहे. जागतिकीकरण, आर्थिक वाढ व रोजगार या तीन संकल्पनामधील सहसंबंधापेक्षा सर्वात मोठा विषय जगातील कोणत्याही देशात नसेल. रोजगार आणि नोकरी गमावणे हे सर्वसामान्यपणे जागतिकीकरणाशी जोडले जातात.

स्थलांतर म्हणजे एका जागेवरून दुसऱ्या जागेत व दुसऱ्या जागेवरून इतर कोणत्याही ठिकाणी लोकांचे जाणे होय. जगाच्या एका भागातून लोकांचे दुसऱ्या भागात जाणे म्हणजे स्थलांतर होय. स्थलांतर हे एका ठिकाणाहून, शहरातून, गावातून, प्रदेशातून, राज्यातून, देशातून दुसऱ्या ठिकाणी शहर, गावात, प्रदेशात, राज्यात किंवा देशात होते. जागतिकीकरणामुळे स्थलांतर जागतिक पातळीवर होते.

भारत हा मूलतः शेतीप्रधान देश आहे. एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती आणि शेतीपूरक व्यवसाय हा भारतातील आर्थिक उपक्रमाचा एक मोठा भाग आहे. भारतात बहुतांश शेतकरी निर्वाह शेती करतात. जरी विविध प्रकारची पिके घेता येत असली तरी बहुतांश शेतकरी अन्नधान्याची पिके घेतात. शेती मालाच्या किंमतीतील चढउताराचा सामान्य किंमत पातळीवर परिणाम होतो. जागतिकरणाचा शेतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला आहे.

१२.२ जागतिकीकरण व कामगार

जागतिकीकरणामुळे कामगार वर्ग संघटीत क्षेत्राकडून असंघटीत क्षेत्राकडे ढकलला गेला. संघटीत क्षेत्रात चांगले पगार, इतर सवलती मोठ्या प्रमाणात व नोकरीची सुरक्षितताही, असंघटीत क्षेत्रापेक्षा चांगली असते. जागतिकीकरणामुळे संघटीत क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधीची मोठ्या प्रमाणावर उपलब्धतता होत आहेत. जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे देशात मोठ्या प्रमाणावर महिला कामगारांची संख्या वाढली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण झाला आहे. त्यापैकी काही रोजगाराच्या संधीची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

१२.२.१ विविध क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी

१) **जाहिरात :** जागतिकीकरण आणि खाजगीकरणामुळे जाहिरातीतील खूप मोठ्या प्रमाणावर महत्त्व प्राप्त झाले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादनाची जाहिरात करण्यासाठी व कंपनीचे नावलौकिक करण्यासाठी कंपन्यांना प्रभावी जाहिरातीची गरज भासते. त्यामुळे या क्षेत्रामध्ये जाहिरात करणाऱ्या संस्था व जाहिरात संस्थेत डिझायनर, कॉपीराईटर, आर्टिस्ट इ. जागेसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

२) **माहिती तंत्रज्ञान :** जागतिकीकरणाच्या संगणकाच्या या युगामध्ये व्यवसायांची प्रक्रिया व्यवस्थीत व त्वरित होण्यासाठी ई-मेल, इंटरनेटचा उपयोग, ई-कॉमर्स इ. उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. देशातील बहुतेक तरुण वर्ग या माहिती-तंत्रज्ञानाकडे आकर्षित होत आहे. लहान वयात मोठी-मोठी पॅकेजस तरुणांना भूलवत आहेत. कॉल सेंटर किंवा माहिती – तंत्रज्ञानाअंतर्गत येणाऱ्या बँका, विमा कंपन्या व आरोग्य सेवा इ. अनेक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत आहे.

३) **दूरसंचार/दूरध्वनी :** देशाच्या अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाचे वारे घुसल्यापासून दूरसंचार विभागाला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. मोबाईल, लॅन्डलाईन आणि इतर कंपन्या पुरवित असलेल्या सर्व दूरसंचार सेवांमध्ये रोजच्या रोज प्रचंड वाढ होत आहे. तांत्रिक अनुभव, व्यवस्तापकीय कौशल्य व विपणनाची माहिती इ. क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना मोठ्या प्रमाणावर दूरसंचार विभागात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

४) बँका : भारतीय बँका आणि परकीय बँका मोठ्या प्रमाणावर भरती करीत आहे. २००८-०९ वा वर्षात स्टेट बँक ऑफ इंडियाने सर्वात मोठी कर्मचाऱ्यांची भरती केली आहे. जागतिकीकरणामुळे बँकांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत आहे. बँक मॅनेजर, ऑफिसर्स, बँकेतील कर्मचारी म्हणून व इतर जागेवर बँकेत नोकरी मिळू शकते.

५) विमा कंपन्या : खाजगी क्षेत्रासाठी विमा क्षेत्र खुले करण्यात आल्याचे विविध खाजगी कंपन्या व परकीय कंपन्यांनी भारतीय विमा क्षेत्रात प्रवेश केला आहे. विमा कंपन्यामध्ये विमा एजंट, डेव्हलपमेंट ऑफीसर्स, सर्व्हेवर, प्रशासकीय अधिक्षक, या प्रकारच्या संधी प्राप्त करून घेता येतील.

६) जैवतंत्रज्ञान : जागतिकीकरणामुळे जैवतंत्रज्ञानाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. औद्योगिकीकरण व पर्यावरण या ज्वलंत विषयांवर समन्वय निर्माण करण्यासाठी जैवतंत्रज्ञानाची गरज आहे. यामध्ये आरोग्यदायी, अन्नपदार्थ, कृषी संशोधन, पर्यावरण – मैत्रेय तंत्रज्ञान इ. पदासाठी रोजगार मिळू शकतो.

आपली प्रगती तपासा.

१) विविध क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या रोजगारांच्या संधी सांगा.

_____

_____

_____

_____

१२.२.२ जागतिककरणाचा रोजगारावर होणारा परिणाम (Impact of Globalisation on Employment) :

जागतिकीकरण, आर्थिक वाढ व रोजगार या तीन संकल्पनामधील सहसंबंधापेक्षा सर्वात मोठा विषय जगातील कोणत्याही देशात नसेल असे वाटते. रोजगार आणि नोकरी गमावणे हे सर्वसामान्यपणे जागतिकीकरणाशी जोडलेले नाते आहे. ग्रामीण भागामध्ये जागतिकीकरणामुळे बेरोजगारी वाढत आहे, असे मत काही अर्थतज्ञांनी व्यक्त केले आहे. परंतु जागतिक बँकेने विविध देशातील माहिती एकत्र करुन जो अहवाल प्रसिद्ध केला त्यानुसार हे स्पष्ट होते की, लोकसंख्या आणि बेरोजगारी यांचा आढावा घेतला असता बेरोजगारीचे प्रमाण लोकसंख्येच्या वाढीच्या तुलनेत भारतामध्ये जास्त नाही. सर्वसाधारणपणे १९९० पासून ते १९९९ पर्यंत बेरोजगारीचे प्रमाण स्थिर राहिलेले दिसून येते.

जागतिकीकरणाविषयी अनेक लोक नकारात्मक मत व्यक्त करतात.

१. बहुराष्ट्रीय कंपन्या माल विकसीत देशात तयार करतात आणि त्याची निर्यात विकसनशील देशात करतात. त्यामुळे विकसनशील देशामध्ये रोजगार निर्मितीच होत नाही. बहुसंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या विकसीत राष्ट्रांच्याच आहेत.

२. व्यापाराचे उदारीकरण झाल्याने स्थानीक कंपन्या बंद कराव्या लागतात त्यामुळे अनेक कामगार बेरोजगार होतात.

३. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे उत्पादनासाठी कामगारांवर अवलंबून राहावे लागत नाही.

ज्या देशाने जागतिकीकरणाचा स्वीकार केला आहे. त्या देशाची जागतिक वाढ मोठ्या प्रमाणावर होते. म्हणजेच औद्योगिक वाढ होते आणि औद्योगिक वाढ हा रोजगाराचा मार्ग आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या ज्या देशात येतात. त्याच देशात उत्पादन करीत असल्याने त्या देशातील लोकांना रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतात. त्याचप्रमाणे संबंधीत देशाला कर रुपाने मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते.

१२.२.३ रोजगाराच्या संदर्भात नव्याने निर्माण झालेले मुद्दे (Emerging issues of employment):

जागतिकीकरणाच्या काळात भारतातील रोजगाराविषयक स्थिती अत्यंत वाईट झाली. १९८३-९९४ या काळात रोजगारवाढीचा दर प्रतिवर्ष २.०४% होता, तो १९९४-२००० या काळात ०.९८% पर्यंत कमी झाला. शेतीक्षेत्राकडे या काळात केलेल्या दुर्लक्षामुळे आणि सार्वजनिक क्षेत्रातील कामगार भरती थांबविल्यामुळे ही स्थिती निर्माण झाली. सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्तीमुळे रिकाम्या झालेल्या जागासुद्धा या काळात भरल्या नाहीत. जागतिकीकरणाच्या परिणामामुळे गेल्या दशकात प्रमुख क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात रोजगाराची घसरण झाली.

१२.२.४ कामाचा काही भाग बाहेरुन करुन घेणे (Outsourcing):

जागतिकीकरणाचा रोजगारावर विविध प्रकारे परिणाम झालेला आहे. त्यापैकी एक म्हणजे कंपन्या आपल्या कामाचे भाग पाडून प्रत्येक भाग आस्थापने बाहेरील दुसऱ्या कंपनीकडून ठेकेदारी पद्धतीने करवून घेतात. याचा अर्थ Outsourcing ही अशी प्रक्रिया आहे ही कंपनी आपल्या कामाचा काही भाग दुसऱ्या कंपनीकडून करवून घेते. यामध्ये Outsourcing चे कंत्राट मिळणारी कंपनी Outsourcing चे कंत्राट देणाऱ्या कंपनीच्या आराखड्यानुसार आणि मार्गदर्शनानुसार कामपूर्ण करुन देते. दुसऱ्या शब्दात Outsourcing करणारी कंपनी आपल्या आराखड्यानुसार उत्पादन तयार करून देण्याचा कंत्राट घेणाऱ्या कंपनीला आदेश देते.

१९८० नंतरच्या Outsourcing हा व्यावसायिक विश्वाचा अविभाज्य भाग झाला. प्रमुख उत्पादनाशी संबंधित सर्व कमी महत्त्वाची कामे त्या त्या कामांच्या बाबतीत निष्णांत असणाऱ्या कंपन्यांकडून करुन घेण्याची पद्धती रूढ झाली. Outsourcing मध्ये व्यवस्थापकीय कामाचे हस्तांतरण, दोन्ही मार्गांनी माहितीचे आदान-प्रदान, काम देणाऱ्या आणि कामाचे कंत्राट घेणाऱ्या कंपन्यामधला समन्वय आणि विश्वास यांचा समावेश होतो. दोन कंपन्यामधील अशा प्रकारचा संबंध गुणवत्तेच्या दृष्टीने परंपरागत संबंधापेक्षा वेगळा आहे. Outsourcing संबंधामध्ये समन्वय प्रस्थापित होतो आणि कामगारावरील नियंत्रण हा व्यवस्थापनाचा भाग विभागला जातो.

सध्या कंपन्या पुढील कामे बाहेरुन करुन घेऊ लागल्या आहेत. यामध्ये माहिती तंत्रज्ञान, मानवी संसाधन, सोयी पुरविणे, मालमत्ता व्यवस्थापन, लेखांकन या कामांचा समावेश होतो. जेव्हा असे काम दुसऱ्या देशातील कंपनीकडून करुन घेतले जाते तेव्हा त्याला Outsourcing असे म्हटले जाते. Outsourcing म्हणजे संघटनात्मक नियंत्रणात दुसऱ्या संघटनाला सहभागी करुन घेणे. Outsourcing म्हणजे संघटनात्मक कामाचे दुसऱ्या देशात पुन:र्वसन करणे. संघटनात्मक नियंत्रण मात्र आहे त्या ठिकाणीच ठेवणे. Outsourcing हा सुद्धा Outsourcing चा एक भाग आहे. Offshore outsourcing केले जाते. कारण विकसनशील देशात श्रम स्वस्त आहेत. श्रमखर्च कमी करण्याबरोबरच, नवीन बाजारात प्रवेश मिळविणे, देशातील विद्वतेचा लाभ उठविणे, तसेच विशिष्ट उपक्रम देशात हाती घेण्यावरील निर्बंधावर मात करणे हे Offshore outsourcing मागील प्रमुख उद्देश असतात. भारत हा सध्याची कामे करुन Software देणारा महत्त्वाचा देश आहे.

Outsourcing शी संबंधीत दुसऱ्या दोन संकल्पना म्हणजे व्यवसाय प्रक्रिया कामे बाहेर देणे (BSP- Business Process Outsourcing) आणि व्यावसायिक सेवा पुरवठादार (BSP- Business Service Provider) व्यावसायिक सेवा पुरवठादार इंटरनेटद्वारे व्यवसाय प्रक्रिया कामे किंवा सेवा पुरवितो. सध्या अमेरिका हा जगातील सर्वात मोठा बाहेरून कामे करवून घेणारा (Outsourcing) देश आहे. त्या पाठोपाठ इंग्लंडचा क्रमांक लागतो. भारताच्या बाबतीत या दोन देशा पाठोपाठ इतर युरोपिय देशाचा क्रमांक लागतो. बाहेरील देशांची कामे करुन देण्याच्या बाबतीत भारताचा सध्या पहिला क्रमांक लागतो आहे. याबाबतची पुरेशी परिपक्वता भारताने प्राप्त केली आहे. भारतातील नवी दिल्ली, बंगलोर, हैद्राबाद, मुंबई, पुणे, चेन्नई आणि कलकत्ता जागतिक पातळीवरील Outsourcing केंद्रे म्हणून उदयाला आली आहेत.

आपली प्रगती तपासा.

१) कामाचा काही भाग बाहेरुन करुन घेणे म्हणजे काय ? (Outsourcing)

_____

_____

_____

_____

१२.२.५ कामे बाहेर देण्याचे (Outsourcing) फायदे :

१) यामुळे एखादे उत्पादन घेण्याच्या व्यवसाय संस्थेचा उत्पादन खर्च किमान राहतो. Outsourcing मुळे उत्पादनाची गुणवत्ता चांगली मिळते. कमी उत्पादन खर्चात अधिक उत्पादन प्राप्त होते. त्याचा अर्थव्यवस्थेला फायदा होतो.

२) Outsourcing च्या कामांचा विकसनशील देशांना फायदा होतो. भारत, चीन, रशिया या देशांप्रमाणे कामाचे Outsourcing करणाऱ्या युरोपियन देशांनाही त्याचा फायदा होतो. वाढते वेतनमान, कामाची प्रतिष्ठा, शिक्षण, जीवनाची गुणवत्ता या स्वरुपाचा तो फायदा असतो.

३) Outsourcing करणाऱ्या कंपन्यांची अपेक्षा अशी आहे की Outsourcing चे काम घेणाऱ्यांची बौद्धिक भांडवल खरेदी करण्याची क्षमता असावी; एकूण कामाच्या बाबतीत उच्च क्षमता असावी. उत्पादनखर्च कमी करता आला पाहिजे. ज्याद्वारे वस्तू व सेवा यांच्या विकासाचा एक सर्वश्रेष्ठ आर्थिक मार्ग तयार झाला पाहिजे.

४) विशिष्ट व्यवसायाच्या बाबतीत प्रभूत्व प्राप्त करण्यासाठी सर्व ताकद केंद्रित केली जाते.

५) Outsourcing मुळे जगातील श्रमशक्ती, भांडवल, तंत्रज्ञान आणि साधने यांच्या अधिक कार्यक्षम वापराला चालना मिळते.

६) दुसऱ्या देशात Outsourcing ची कामे देण्यामुळे विकसनशील देशातील अल्पमोबदल्यातील श्रमशक्तीचा लाभ उठविण्याची संधी प्राप्त झाली.

Outsourcing वरील टिका :

१) Outsourcing मध्ये काम करणाऱ्या कामगारांमध्ये कामाची असुरक्षितता मोठ्या प्रमाणात वाढीला लागते.

२) Outsourcing मध्ये सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवेची गुणवत्ता कमी राहते.

३) Outsourcing करणाऱ्या कंपन्यांकडून बाहेरच्या देशातून कामे करवून घेतल्यामुळे स्वत:च्या देशात बेरोजगारी वाढते.

४) ग्राहकांशी संबंधित संवेदनशील माहिती बाहेर जात असल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो.

आपली प्रगती तपासा.

१) कामे बाहेर देण्याचे (Outsourcing) फायदे सांगा.

_____

_____

_____

_____

१२.२.६ कंत्राटी कामगारांच्या संख्येत वाढ :

जागतिकीकरणामुळे कंत्राटी कामगार पद्धतीला चालना मिळते. त्यामुळे वेठबिगारी आणि गुलामी या दिशेने कामगार वर्गाची वाटचाल होते. कुशल आणि अर्धकुशल कामाच्या बाबतीत अनेक उद्योगात कंत्राटी कामगार पद्धती अस्तित्वात आहे. सेवाक्षेत्रामध्येही कंत्राटी कामगारपद्धती अस्तित्वात आहे. कंपनीचे एखादे काम पूर्ण करून देण्यासाठी कंत्राटदार कंत्राटी कामगाराची नियुक्ती करतो. त्यामुळे कंत्राटी कामगार हा अप्रत्यक्ष कामगार ठरतो. या कामगाराचा पगार, त्याचे पर्यवेक्षन ही कंत्राटदाराची जबाबदारी ठरते. हा कामगार विशिष्ट

कामासाठी आणि विशिष्ट काळासाठी कामावर घेतला जातो. कामगार म्हणून कनिष्ठ दर्जा, रोजगाराचे अत्यंत तदर्थ स्वरुप, कामाच्या खात्रीचा अभाव, गरीबीची आर्थिक परिस्थिती ही कंत्राटी कामगाराची वैशिष्ट्ये आहेत. आर्थिक दृष्टीने उत्पादनखर्च कमी करणारी ही पद्धत आहे. परंतु सामाजिक न्यायाच्या दृष्टीने ही पद्धती अयोग्य आहे.

१२.३ कामगारांचे स्थलांतर

जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातून शहराकडे आणि एका देशातून दुसऱ्या देशाकडे कामगारांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात चालू झाले. जागतिकीकरणाने देशाच्या सीमेपलिकडील स्थलांतराला चालना मिळाली. कामगारांचे एका देशातून दुसऱ्या देशात मोठ्या प्रमाणात स्थलांतर होऊ लागले. एका सर्वेक्षणानुसार १७५ द.ल. कामगार दुसऱ्या देशात काम करतात. स्थलांतराचा सामाजिक जीवनावर, मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर फार मोठा परिणाम होतो. स्थलांतरांचा स्थलांतरीताच्या आणि पाठीमागे राहिलेल्या कुटुंबाच्या सामाजिक जीवनावर मोठा परिणाम होतो. मुले एकाकी होतात. दिर्घकाळ एकमेकांपासून दूर राहिल्यामुळे पती पत्नी मधील संबंधात दुरावा निर्माण होतो. त्यामुळे अवैवाहिक अनैतिक संबंधाला चालना मिळते. विदेशामध्ये भाषेच्या अडचणीमुळे एकाकीपणा सहन करावा लागतो. त्यांना सक्तीने विदेशी संस्कृतीबरोबर जुळवून घ्यावे लागते. या स्थितीत शोषणाची शक्यता अधिक राहते. असमान संधी, भेदभावाची वागणूक आणि पूर्वग्रह यांचा स्थलांतरीतांना पदोपदी सामना करावा लागतो. स्थलांतरीतांना बऱ्याचदा वंशविद्वेषाचा सामना करावा लागतो. दुर्लक्षितपणाचा सामना करावा लागतो. स्थलांतरीतांचे सीमांतीकरण केले जाते. त्यांना पदोपदी डावलले जाते. त्यामुळे त्यांना अकुशल काम आणि कमी उत्पन्न प्राप्त होते. स्थलांतरीतांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन गुन्हेगारी आणि संशयास्पद स्वरुपाचा असतो. स्थलांतरीत मजूरांना बऱ्याचदा फारच कमी मजुरी दिली जाते. बऱ्याचदा स्थलांतरीत मजूरांना घरकाम आणि शेतमजुरीचे काम दिले जाते. घरकाम करणाऱ्या कामगारांना अतिशय कमी वेतन, अधिक तास काम, मधल्या सुट्टीचा अभाव, एकांतवास, वाईट वागणूक, गणवेश घालण्याची सक्ती, नोकर म्हणून वागणूक, कौटुंबिक जीवनाला नकार, वंशद्वेष, लैंगिक शोषण यांचा सामना करावा लागतो.

स्थलांतरीतांमध्ये शेतमजुरांचे प्रमाणही मोठे आहे. शेतमजुरांना कमी वेतनात दिर्घकाळ राबवून घेतले जाते. आरोग्याबाबतच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांना विदेशी संस्कृती आणि भिन्न भाषा यांचा सामना करावा लागतो. तसेच या कामगारांना निराशा, एकाकीपणा, मद्यपान, एडस् आणि लैंगिक आजारांना बळी पडावे लागते. त्यांची राहण्याची व्यवस्था अत्यंत वाईट असते.

१२.३.१ स्थलांतराचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत :

१) **स्थानिक स्थलांतर :** स्थानिक स्थलांतर म्हणजे स्थानीक पातळीवर होणारे स्थलांतर होय.

२) **ग्रामीण ते शहरी स्थलांतर :** सर्वसाधारणपणे औद्योगिकीकरणामुळे विकसनशील देशात ग्रामीण भागातून लोकांचे मोठ्या प्रमाणावर शहरामध्ये उपलब्ध असल्याने लोकांचे लोंढे शहराकडे येतात. उदा. भारताच्या कानाकोपऱ्यातून मोठमोठ्या शहरांमध्ये ग्रामीण लोक येत असतात.

३) एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर : यामध्ये एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशामध्ये लोक जात असतात. उदा. उत्तर भारतातून मुंबईकडे येणाऱ्या लोकांची संख्या खूप आहे.

४) नागरी भागातून ग्रामीण भागात जाणे : भारतासारख्या विकसनशील देशामध्ये अशा प्रकारचे स्थलांतर शक्यतो होत नाही. विकसीत देशांमध्ये शहरामधील राहणीमान अतिशय खर्चीक असल्याने शहरी लोक ग्रामीण भागात येऊन वास्तव्य करतात. विकसीत देशांमध्ये पायाभूत सुविधा ग्रामीण भागातही असतात.

५) सामुहीक स्थलांतर : मोठ्या प्रमाणावर लोक एकत्र येऊन दुसऱ्या ठिकाणी जातीय म्हणजे सामुहीक स्थलांतर करतात. उदा. नदीवरील मोठे धरण, तलाव इ. कारणांसाठी संबंधीत भौगोलिक क्षेत्रातील लोकांचे स्थलांतर करावे लागते.

६) सक्तीचे स्थलांतर : ठरावीक उपक्रम राबविण्यासाठी अनेकदा शासनाकडून लोकांचे सक्तीने स्थलांतर केले जाते.

आपली प्रगती तपासा.

१) स्थलांतराचे प्रकार सांगा.

_____

_____

_____

_____

१२.३.२ स्थलांतरणाची कारणे :

स्थलांतर करण्यासाठी खालील घटक कारणीभूत ठरतात.

१) आर्थिक घटक : बेरोजगारी आणि दारिद्र्य लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास प्रवृत्त करतात. सर्वसामान्यपणे ग्रामीण भागातील लोक नोकरीच्या शोधात शहरी भागात जातात. जागतिकीकरणामुळे मोठमोठ्या शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मोठ्या प्रमाणावरील पगार व वेतनेत्तर सुविधा उपलब्ध असल्याने राहणीमानाचा दर्जा सुधारतो यासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते.

२) सामाजिक घटक : कुटुंब, विवाह व मुलाचे करिअर इ. सामाजिक कारणांसाठीही स्थलांतर केले जाते. आपल्या भारतीय समाजात मुलींचे लग्न झाले की तिला तिच्या सासरी जावे लागते. म्हणजेच विवाहामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर होते. त्याचप्रमाणे मुलांचे उच्च शिक्षण, किंवा करिअरच्या चांगल्या संधी मिळण्यासाठी संपूर्ण कुटुंबाला मुलाबरोबर इतर ठिकाणी जावे लागते.

३) पर्यावरणात्मक घटक : महापूर, दुष्काळ, भूकंप व आर्थिक अरिष्ट इत्यादी पर्यावरणात्मक म्हणजेच नैसर्गिक घटकांमुळे स्थलांतर करावे लागते. उदा. भारताच्या दक्षिण भागात त्सुनामी लाटा आल्याने अनेक लोक बेघर झाले. त्यांना देशाच्या इतर भागात स्थलांतरीत करावे लागले.

४) आरोग्यविषयक घटक : आरोग्यविषयक चांगल्या सुविधा व काळजी ज्याठिकाणी घेतली जाते अशा ठिकाणी लोक स्थलांतर करतात. अनेक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदुषण आहे. ज्या व्यक्तींची प्रकृती जेमतेम असते असे लोक चांगल्या हवामानासाठी ही स्थलांतर करतात.

५) राजकीय घटक : राजकीय कारणांसाठी ज्यावेळी दुसऱ्या ठिकाणी जावे लागते त्यास राजकीय दृष्टीने केलेले स्थलांतर असे म्हणतात. राजकीय स्थलांतर पुढील कारणांसाठी करावे लागते. राजकीय अस्थीरता, जामातवाद, प्रदेशवाद, भाषीकवाद, अंतरजातीयता, दहशतवाद, दंगे – धापे इ. कारणांच्या भितीमुळे अनेक लोक स्थलांतर करीत असतात.

आपली प्रगती तपासा.

१) स्थलांतरणाची कारणे सांगा.

_____

_____

_____

_____

१२.३.३ स्थलांतरणाचे परिणाम (Effect of Migration)

स्थलांतरणाचे पुढीलप्रमाणे परिणाम दिसून येतात.

१) बुद्धिमंतांचे देशाटन (Brain Drain) : बुद्धिमान तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, इंजिनिअर्स आणि शैक्षणिक मंडळी आपला देश सोडून इतर देशात म्हणजे अमेरिका, कॅनडा, इंग्लड इत्यादी देशात जातात म्हणजेच बुद्धिमतांचे देशाटन होय. हुशारी, ज्ञान आणि कौशल्य असलेली ही बुद्धिमान मंडळी ज्या देशात जातात त्या देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी प्रयत्न करतात. या सर्व प्रक्रियेला 'ब्रेन ड्रेन' असे म्हणतात. आपले देशाने प्रभावी सुनियोजीत प्रयत्न केल्यास बुद्धिमंताचे देशाटन होणार नाही आणि त्यांच्या बुद्धिमत्तेचा देशालाच फायदा होईल.

२) परकीय चलन निधी (Foreign Exchange Reserve) : एका देशातून लोक नोकरीसाठी दुसऱ्या देशात जातात. दुसऱ्या देशात त्यांचा पगार त्याच देशाच्या चालना मिळतो. संबंधीत व्यक्ती त्यांच्या कुटुंबासाठी आपल्या देशात पैसे पाठवून देते. त्यामुळे देशाच्या तिजोरीत विविध देशांचे चलन जमा होते म्हणजे परकीय चलन निधीमध्ये वाढ होते.

३) विविध संस्कृतींचा मिलाफ (Fusion of cultures) : स्थलांतरीत लोक विविध देशातून आलेले असतात. विविध प्रदेशातून, विविध राज्यातून, विविध शहरातून एकत्र आलेले

असतात. त्यामुळे सर्व संस्कृतीचा एका ठिकाणी मिलाफ होतो. स्थलांतरामुळे संस्कृतीची देवाणघेवाण होते. विविध संस्कृतीमुळे खाण्याचे पदार्थ व सवयी, कपडे व पेहराव, विविध भाषा इत्यादींची देवाण-घेवाण होते. त्यामुळे जगण्याची शैलीच बदलते. व्यक्तीमत्वामध्येही बदल घडून येतात.

४) सामाजिक समस्या (Social Problems) : एखाद्या शहरामध्ये, प्रदेशात, राज्यात किंवा देशात सतत लोक येत असतील तर संबंधीत विविध सामाजिक आर्थिक समस्या निर्माण होतात. लोकसंख्येत वाढ होऊन दाट लोकवस्ती तयार होते, झोपडपट्ट्यांत वाढ होते, गुन्हेगारीचे प्रमाण वाढते. आजार पसरतात, मद्यपान व अंमली पदार्थाचे सेवन वाढते. सार्वजनिक सेवांवर ताण पडतो. उदा. सार्वजनिक वाहतुक, वीज, रस्ते इ. समस्या आहेत.

५) मानसशास्त्रीय समस्या (Psychological Problems) : आपल्या जवळच्या लोकांना, कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्रांना सोडून लोक स्थलांतर करीत असतात. त्यामुळे अशा लोकांना एकटे एकटे वाटणे, कुटुंबियांच्या सारख्या आठवणी येणे व न करमणे इ. समस्या निर्माण होऊन त्यांची मानसिकता बिघडते. नवीन वातावरणात त्यांना असुरक्षीत वाटू लागते. काही लोकांना तर नवीन नोकरी, राहण्याची जागा, नवीन मित्र यामुळे मनावर दडपण येते.

६) स्थलांतरीत लोकांविषयी शत्रुत्व (Hostilities towards Migrants) : अनेकदा स्थलांतरीत लोक आणि स्थानिक लोक यांच्यात विविध कारणांमुळे वाद होतात. स्थानीक लोक स्थलांतरीत लोकांबरोबर व्यवस्थीत वर्तणूक करीत नाहीत. अगदी देशांतर्गत सुद्धा अशा प्रकारच्या समस्यांना स्थलांतरीत लोकांना तोंड द्यावे लागते.

आपली प्रगती तपासा.

१) स्थलांतराचे परिणाम सांगा.

_____

_____

_____

१२.४ जागतिकीकरण व शेती

१२.४.१ प्रास्ताविक :

जागतिकीकरणाचा शेतीवरील एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्या कंत्राटी शेती (Contract agriculture) स्थापन करण्याच्या प्रयत्नात आहेत. या नवीन व्यवस्थेत शेतकऱ्यांनी आपण सांगू त्या पिकाचे सांगितलेल्या पद्धतीने व ठरविलेल्या दराने उत्पादन करावे. म्हणजे या कंपन्या एका बाजूने बी-बीयाणे, खते, जंतुनाशके यांच्या पुरवठ्यावर तर दुसऱ्या बाजूने जागतिक शेती उत्पादनावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत. या नवीन व्यवस्थेत भारतासारख्या ८० टक्के लहान शेतकरी असणाऱ्या देशात त्यांचे अस्तित्व धोक्यात

येईल. नफा प्रेरित उत्पादनाच्या दिशेने शेतीची वाटचाल सुरु झाल्यास अन्नधान्य उत्पादनातील आपल्या देशाची स्वयंपूर्णता नष्ट होईल. अन्नधान्याच्या बाबतीतील परावलंबीत्व अत्यंत धोकादायक ठरेल, ऊती संवर्धन शेतीचा अवलंब सुरु झाल्याने शेती प्रयोगशाळेत बंदिस्त होईल की काय ? अशी भिती वाटते.

१२.४.२ शेतीचे महत्त्व (Importance of Agriculture) :

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय लोकसंख्येच्या ५० टक्के लोक उदर-निर्वाहाचे साधन म्हणून शेती व संबंधीत उद्योग करत आहेत. शेतीमधील रोजगार हा प्रामुख्याने शेतीचा हंगाम, शेतीउत्पादनाचे काळ यांना अनुसरणारा असा असतो. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. शेतीचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट होते.

१) रोजगार : भारतातील मोठ्या प्रमाणावर रोजगार पुरविण्याचे काम कृषी क्षेत्र करते. १९५१ मध्ये ७० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. सध्या म्हणजेच २०११-१२ मध्ये शेतीवर उपजिविकेचे साधन म्हणून पाहणाऱ्यांची संख्या ५२ टक्के इतकी होती. शेतीपासून प्रत्यक्ष रोजगार व अप्रत्यक्ष रोजगार मिलू शकतो.

प्रत्यक्ष रोजगारामध्ये शेतीची मेहनत करणे, लागवड करणे, कापणी करणे आणि विपणन इ. समावेश होतो. अप्रत्यक्ष रोजगारामध्ये शेतीला सहाय्य करणारी यंत्रणा म्हणजेच वाहतुक, साठवणूक व बँका इत्यादींचा समावेश होतो.

विकसीत देशांमध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या अतिशय कमी आहे. अमेरिकेत, फ्रान्स आणि जपानमध्ये फक्त २ टक्के ते ३ टक्के एवढे आहे.

२) परकीय चलन : कृषी मालाची निर्यात करुन देशाला परकीय चलन मिळते. परकीय चलनातील कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी-कमी होत चालला आहे. १९९०-९१ मध्ये १९.४ टक्के एवढेच परकीय चलन शेतमालाच्या निर्यातीपासून मिळाले. सध्या तांदूळ, फळे आणि भाजीपाला, सागरी उत्पादने, चहा, ऑईल केक (Oil Cake) या प्रकारच्या शेतमालाची निर्यात भारतातून होत आहे.

३) भांडवल निर्मिती : भांडवल निर्मिती ही बचत आणि गुंतवणुकीद्वारे होत असते. शेतीमध्ये अतिरिक्त उत्पादन झाले की बचत वाढते. बचत झाली की शेती पाणीपुरवठा योजनामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होते.

आर्थिक सर्व्हेशन १९९० अनुसार देशातील स्थूल उत्पन्नात (GDP) शेती क्षेत्राचा भांडवल निर्मितीतील हिस्सा २.२ टक्के इतका होता. भांडवल निर्मितीतील शेती क्षेत्राचा हिस्सा कमी होण्यासाठी दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक शेती क्षेत्राकडे झालेले दुर्लक्ष आणि दोन शेतीचा पाणीपुरवठा यामध्ये सरकारी गुंतवणुक १९९० च्या तुलनेत योग्य झाली नाही. शेतीचे अतिरिक्त उत्पादन (Surplus) होण्यासाठी शेतीची उत्पादनक्षमता वाढते. उत्पादनक्षमता वाढली की अतिरिक्त उत्पादन होते. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते आणि बचतीचे प्रमाणही वाढते.

४) देशाच्या स्थूल उत्पन्नात योगदान : देशाच्या स्थूल उत्पन्नात शेती क्षेत्राच्या उत्पन्नाचेही योगदान काही प्रमाणात आहे. स्थूल उत्पन्नातील शेती क्षेत्राच्या योगदानाचे प्रमाण अलीकडे कमी झालेले दिसून येते. प्राथमिक क्षेत्रामध्ये ५९ टक्के शेती, जंगल, संपत्ती, मासे, खाण इ. समावेश होतो. ५९ टक्के मध्ये शेती क्षेत्राचा हिस्सा ५६ टक्के इतका होतो. तर आता २० टक्के शेती क्षेत्राचा हिस्सा होतो.

५) खाद्य पदार्थांची तरतूद : वाढत्या लोकसंख्येला खाद्यपदार्थ पुरविण्याचे काम शेती करते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे खाद्य पदार्थाची मागणी मोठ्या प्रमाणावर होत आहे. भारतात शेतीची उत्पादन क्षमता कमी असल्याने शेतीपासून मिळणारे उत्पन्नही कमी होत आहे. त्यामुळे जनतेला अन्न-धान्य पुरविण्यासाठी सरकारला अन्नधान्याची आयात करावी लागते. त्यामुळे त्याचा परकीय चलनाच्या साठ्यावर परिणाम होतो. शेती जीवित मालमत्तेलाही म्हणजेच गाई, म्हैसी, शेळ्या, मेंढ्या, घोडे इ. चा चारा (वैरण) पुरविण्याचे काम करते. जीवित मालमत्तेवरच मानवाचे जीवन अवलंबून असते. कारण यापासून मानवाला दूध, मांस आणि शेती करण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो.

६) कच्चा मालाचा पुरवठा : विविध उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा शेती क्षेत्रापासून केला जातो. साखर उद्योग, ज्यूट उद्योग, वस्त्र उद्योग, अन्नपदार्थ निर्मिती करणारे उद्योग इत्यादी व यासारख्या विविध उद्योगांना कच्चा माल शेतीपासूनच मिळतो. शेतीचा व्यवस्थित विकास झाला नाही तर त्याचा वाईट परिणाम या सर्व उद्योगावर होतो.

७) उत्पादित मालाला बाजारपेठ : कारखान्यामध्ये उत्पादित करण्यात आलेल्या मालाचा मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ ही ग्रामीण भागातच असते. शेतीपासून अतिरिक्त झालेल्या मालाची शेतकरी विक्री करतात. त्यामुळे त्यांच्याकडे पैसे येतात. या पैशातून त्यांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची खरेदी ते करीत असतात. काही कंपन्या तर त्यांच्या मालाची विक्री फक्त ग्रामीण भागातच करतात.

८) ग्रामीण विकास : शेतीला पाणीपुरवठा, वीज निर्मिती, योग्य रस्ते, शैक्षणिक संस्था इत्यादीवरच ग्रामीण विकास अवलंबून असतो. ग्रामीण विकासाकरीता रस्ते बांधणी, शेतीला पाणीपुरवठ्यांच्या योजना (Irrigation) व वीज इत्यादी योजनांसाठी शासनाकडूनही मोठ्या प्रमाणात मदत होते. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतरीत होणाऱ्यांचे प्रमाण कमी होते आहे. शहरांवरील अतिरिक्त लोकसंख्येचा ताण कमी होण्यास मदत होते.

९) समाज व्यवस्था : शेती क्षेत्राकडून उपलब्ध रोजगारावरच समाज व्यवस्था ठरत असते. शेती व्यवसायात गुंतलेले लोक शक्यतो समाज-विघातक कार्य करण्यास प्रवृत्त होत नाहीत. शेती क्षेत्राकडून रोजगार मिळाला नाही तर देशात बेरोजगारांची फौजच तयार होईल. त्यामुळे कायद्याला महत्त्व राहणार नाही आणि समाज व्यवस्था बिघडून जाईल.

१०) किंमत स्थिरतेस मदत : देशात किंमती स्थिर ठेवण्यास शेती क्षेत्राची मदत होते. कारण प्रत्येकालाच अन्नधान्याची गरज असते. अन्नधान्याचा योग्य साठ्यामुळे देशात अन्नधान्याचा किंमती स्थिर राहतात. अन्नधान्याचा देशात तुटवडा निर्माण झाला तर चलनफुगवट्याची

परिस्थिती निर्माण होते. यामुळे फक्त शेतीमालाच्याच किंमती वाढत नाहीत तर त्याबरोबरच औद्योगिक उत्पादित वस्तूंच्याही किंमती वाढतात.

११) सेवक्षेत्राचा विकास : शेतीच्या विकासामुळे सेवाक्षेत्राच्याही भरभराटीस मदत होते. उदा. वाहतूक क्षेत्र, व्यापार आणि बँकिंग इ. सेवा क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होते. शेतीमालाची बाजारपेठेपर्यंत वाहतूक करण्यासाठी वाहतुकीमध्ये वाढ होते. तर त्यांचे वितरण करण्यासाठी व्यापारामध्ये वाढ होते. तर आर्थिक व्यवहारासाठी बँकांची गरज भासते.

१२) दारिद्र्य कमी होते : दारिद्र्य निर्मुलनामध्ये शेतीचा महत्त्वाचा सहभाग आहे. अतिरिक्त शेतमालाची विक्री करून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळते. त्यामुळे शेतकरी शेत मजुरांना मजुरी देऊ शकतात. ग्रामीण भागातील अनेक लोकांना शेत मजुरीच्या स्वरूपात रोजगार मिळत असतो. सर्वांना रोजगार मिळाल्याने दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे सरकार सर्वसामान्यांना स्वस्त दराने अन्नधान्याचा पुरवठा करते.

आपली प्रगती तपासा.

१) शेतीचे महत्त्व स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१२.४.३ जागतिकीकरणाचा शेती व्यवसायावरील परिणाम (Impact of Globalisation on Agriculture) :

जागतिक निर्यातीमध्ये भारताच्या एकूण निर्यातपैकी ७० टक्के निर्यात ही कारखान्यातून तयार झालेल्या मालाची केली जाते. भारताच्या एकूण निर्यातीत शेतीचा हिस्सा दिवसेंदिवस कमी होत आहे. २०१०-११ मध्ये ११ टक्के हिस्सा शेतीक्षेत्राचा होता. म्हणजेच भारतामध्ये शेतीमालाच्या निर्यातीकडे दुर्लक्ष केले जाते.

भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा (WTO) संस्थापक सभासद आहे. जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी भारतानेही व्यापारी अडथळे कमी केले. पेटंट कायद्यात सुधारणा केली. परंतु शेती हा विषय जागतिक व्यापार संघटनेतील वादादीत विषय आहे. कारण शेतीला देण्यात येणाऱ्या सवलती वरुन यामध्ये विविध समस्या निर्माण होत आहेत.

जागतिक व्यापार संघटनेत न सुटणारी समस्या म्हणजे शेतीची समस्या आहे. अमेरिका त्यांच्या शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर शेतीला आर्थिक सवलत देते. १९ बिलियन डॉलर एवढी मोठी सवलत अमेरिका शेतऱ्यांना देते. एवढी मोठी सवलत जगातील कोणताही देश देत नाही आणि भारताने शेतीच्या आयातीवरील कर कमी करण्यासाठी भारतावर दबाव आणते. भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेसारखी सवलत मिळत नसल्याने भारतीय शेतकरी, अमेरिका व युरोप या देशातील शेतमालाशी स्पर्धा करु शकत नाहीत. यासाठी सरकारने शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे.

आपली प्रगती तपासा.

१) जागतिकीकरणाचा शेती व्यवसायावरील परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१२.४.४ शेतीची दक्षता / काळजी :

भारतीय शेती व भारतीय शेतकरी यांना संरक्षण देण्यासाठी भारत सरकारने पुढील दक्षता घेतली पाहिजे.

१) मूल्यावपाती : मूल्यावपातीचा म्हणजे एखादी वस्तू अथवा सेवा निर्माण करण्यासाठी जेवढा खर्च येतो त्या खर्चापेक्षाही कमी बाजारभावाने ती वस्तू वा सेवा विकणे याला 'मूल्यावपाती' असे म्हणतात. उपयोग केला तर त्यासाठी देशांतर्गत वस्तूच्या किंमती लवचिक असल्या पाहिजेत. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना परकीय शेतीमालापासून संरक्षण मिळेल. ज्या शेतमालाची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते. त्याबाबतीतच काळजी घ्यावी लागेल.

२) सरकारी गुंतवणूक : अनेक वर्षापासून सरकारची आणि सार्वजनिक गुंतवणूकीचे कृषी क्षेत्रातील प्रमाण कमी-कमी होत आहे. जागतिकीकरणाचा विचार करता सरकारने किंवा सार्वजनिक गुंतवणूकदारांनी शेतीमध्ये शेतीसाठी पाणीपुरवठा योजना, कृषी संशोधन, विपणन पायाभूत सुविधा, कृषी-माल साठवणूक व्यवस्था, सुधारित बि-बियाणे इ. कारणांसाठी गुंतवणूक केली पाहिजे.

३) सुरक्षिततेचे जाळे : जागतिकीकरणामुळे ठराविकच पिकांना निर्यातीसाठी महत्त्वाचे स्थान असते. ज्या विभागात अशा प्रकारची पिके घेतली जातात तो विभाग निर्यातीत पुढे जातो व इतर विभाग मागे पडतात. यासाठी सर्व विभागात समाज जागृती निर्माण करून निर्यात केल्या जाणाऱ्या मालाचेच शेतात उत्पादन घेतल्यास प्रत्येक विभागाचा समान विकास होईल. अशा प्रकारे सरकारने सुरक्षिततेचे जाळे देशात तयार केल्यास सर्व शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल.

४) मर्यादित शेती व्यापार : भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर शेती उत्पादन होते. परंतु भारतीयांची खरेदीची क्षमता अतिशय कमी आहे. देशामध्येच या शेतीमालाची अतिशय कमी किंमत येते. म्हणून अतिरिक्त शेतीमालाची निर्यात केली जाते. देशात कमी किंमतीला मालाची विक्री करण्यापेक्षा जास्त किंमतीला निर्यात करणे शेतकरी पसंत करतात. त्यामुळे देशांतर्गत अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होतो. त्यामुळे भारत सरकारने शेती मालाची निर्यात मर्यादित करण्याची तरतूद केली आहे.

५) विकसीत राष्ट्र शेतीला देत असलेले शासकीय अनुदान : भाजीपाला, फळे, तांदूळ, मसाल्याचे पदार्थ इ. विविध प्रकारच्या कृषी मालाचे उत्पादन भारत मोठ्या प्रमाणावर करतो. परंतु विकसीत देशांपेक्षा भारताची उत्पादन क्षमता खूप कमी आहे. कारण आंतरराष्ट्रीय

बाजारपेठेत भारतीय शेतकरी त्यांचा आत्मविश्यास गमावून बसलेला आहे. भारतासारखे विकसनशील देश एकत्र येऊन जागतिक व्यापार संघटनेवर (WTO) शेतीचे शासकीय अनुदान कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. असे झाले तरच विकसीत देश व विकसनशील देश हे एकाच पातळीवर येतील.

६) एकस्व (पेटेंट) : एखादा नवीन शोध बनविण्याची किंवा विकण्याची अधिकृत विशेषाधिकारपत्रिका म्हणजे एकस्व (Patent) होय किंवा थोडक्यात कायदेशीर अधिकार पत्र होय. ''व्यापारविषयक बौद्धिक मालमत्ता हक्क'' (TRIPs) हा करार शेती क्षेत्रालाही लागू केला आहे. वनस्पतींच्या विविध जाती, सुधारीत बी बियाणे इ. समावेश आहे. यामुळे भारतासारख्या विकसनशील देशावर हानीकारक परिणाम होतील. विकसीत राष्ट्रांकडे मुबलक पैसा, सुयोग्य प्रयोगशाळा व तज्ज्ञ व्यक्ती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याने सर्व अधिकारपत्रे त्याच्याच ताब्यात जातील. यासाठी भारत सरकारने अधिकारपत्र मिळविण्यासाठी देशामध्ये सुसज्ज प्रयोगशाळा, त्यासाठी लागणारा भांडवल पुरवठा व तज्ञ लोक याविषयी एक कृती आराखडा आखला तरच आपण त्या धोक्यापासून सावध होऊन फायदा करुन घेऊ शकतो. कारण भारताने अगोदरच TRIPs या करारावर सही केली आहे.

आपली प्रगती तपासा.

१) शेतीची दक्षता स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१२.४.५ जागतिकिकरण व शेतकरी :

गेल्या शतकातील नव्वदीच्या दशकात भारतात जागतिकिकरणाचे वारे सुरु झाले. प्रत्यक्ष अंमलबजावणी व परिणाम दिसण्या आधीच प्रत्येक व्यासपीठावर या विषयावर अनुकूल किंवा प्रतिकूल भूमिका घेऊन वाद रंगु लागले.

जागतिकिकरणाने शेतकरी संघटना व शेतकरी समुदायास पाडलेली भुरळ चुकीची होती असे नाही. आजपर्यंतच्या राज्यकर्त्यांनी वाढत्या क्रमाने शेतकरी विरोधी धोरणे राबवून शेती उत्पादनाच्या वाढत्या लुटीतून संपन्न वर्ग अधिक संपन्न करणारा विकास साधला होता. सरकार हे शेतकरी वर्गाच्या लुटीचे हत्यार बनले होते. जागतिकिकरणाने हे हत्यारच बोथट बनणार होते. जागतिकिकरणाने सरकारची आर्थिक क्षेत्रातील लुडबुड कमी होणार होती. झोन बंदी, जिल्हा बंदी, प्रांत बंदी आणि निर्यात बंदी ही शेती मालाचे भाव पाडण्यासाठी वापरली जाणारे हुकुमी एक्के सरकारच्या हातातून जाणार होती. शेतकरी समुदायाच्या भल्यासाठी सरकारने काहीच करण्याची गरज नाही. फक्त सरकारने शेतकरी समुदायाचे भले होऊ नये यासाठीच्या उपाय योजना सोडाव्यात ही शेतकरी संघटनेची प्रारंभीपासूनची मागणी जागतिकिकरणाने पूर्ण होणार होती ! तीसुद्धा वैधानिक स्वरुपात, जगातल्या २०० पेक्षा अधिक राष्ट्रात करार होऊन सततच्या सरकारी धोरणाने आणि हस्तक्षेपाने प्रत्येक वर्षीचा वाढता तोटा सहन करुनही शेती

व्यवसाय वाचविणारा शेतकरी स्वत:च्या अनुभवाच्या चिकाटीच्या व परिश्रमाच्या जोरावर शेती व्यवसाय फायदेशीर करु शकतो हा होरा काही चुकीचा म्हणता येणार नाही. शिवाय जागतिकिकरणाने त्याला जागतिक बाजारपेठ खुली होणार होती. या बाजारपेठेत सबसीडीच्या जोरावर तग धरून असलेला संपन्न राष्ट्रातील शेतकरी व उणे सबसिडित शेती करणारा भारतीय शेतकरी असा भेदभाव राहणार नसल्याने भारतीय शेतकरी स्पर्धेत जिंकणार हा आशावाद निराधार नव्हताच. शेतकरी संघटना व संघटनेचे नेते शरद जोशी यांनी जागतिकीकरणाची केलेली भलावन चुकीची नसली तरीही गेल्या वीस वर्षात जागतिकिकरणाने शेती व शेतकरी यांचे काडीचेही भले झाले नाही हे सत्य कसे नाकारता येईल ?

सरकारने अनेकदा जागतिकीकरराच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकून दोन पाऊले मागे घेतली आहेत. शिवाय जी काही पाऊले पुढे पडली ती औद्योगिक समूह व त्यांच्याशी निगडित तंत्रज्ञानाच्या बाबतीत शेतीचा जागतिकीकरणाशी काही समबद्ध आहे हे सरकारच्या गावी नाही किंवा जागतिकीकरणाचा लाभ शेतीला मिळू नये हे कटाक्षाने पाहिले जात असावे हेच सरकारी धोरण दर्शविते. जगभराच्या सरकारांचे असेच धोरण आहे. म्हणूनच शेती मालाचा व्यापार अजूनही चर्चेच्या फेरीवर फेरीत अडकून पडला आहे. शेती क्षेत्रात जागतिकीकरणाच्या दिशेने एखादे पाऊल पडल्याचे कोणत्याही अभ्यासकास सोडाच पण दस्तुरखुद्द मनमोहन सिंह यांचेपासून शरद जोशीपर्यंत कोणालाही सांगता व दाखविता येणार नाही. विपरीत निर्णय मात्र मुबलकतेने दाखविता येतील. परदेशात अवैध रित्या पैसा नेणारी नावे उघड न करण्याचा करार सरकार आंतरराष्ट्रीय कराराचे पावित्र्य टिकविण्याच्या नावावर पुढे रेटनार, पण शेतीमालाच्या व्यापारा सबंधीचे शेतकरी हिताचे करार कोणतीही पूर्व सूचना न देता क्षणार्धात मोडित काढणार हे शेतमालाच्या अचानक निर्यात बंदिने अनेकदा दिसून आले आहे याचा अर्थ स्पष्ट आहे. जागतिकिकरणाच्या कालखंडात इथल्या व्यवस्थेची व सरकारची भूमिका शेती व शेतकरी यांच्या बाबतीत दुटप्पी व जुलमीच राहिली आहे हे शरद जोशीच्याही एव्हाना लक्षात आले असेल. एवढेच नाही तर आजची परिस्थिती पाहून शरद जोशींना सुरेश भटांच्या या ओळी नक्कीच आठवत असतील "उष:काल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली". आकलनात झालेली चुक कबुल करून शरद जोशींनी वय अनुमती देत नसले तरी मनातील या ओळी ओठावर आणाव्यात असेच प्रत्येक शेतकरी भावा-बहिणीला वाटत असणार.

आपली प्रगती तपासा.

१) जागतिकीकरण व शेतकरी यांचा संबंध स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१२.४.६ शेतकरी आत्महत्येची कारणे :

खरोखरीच शेतकरी का आत्महत्या करतो, याची खरी कारणे शोधली पाहिजेत कर्ज माफी किंवा अनुदाने हा त्या वरचा उपाय नव्हे अपाय आहे ? आत्महत्येची काही कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) शेतकऱ्यांच्या कोणत्याच पिकाला हमी भाव दिला जात नाही, त्यामुळे दलाल शेतकऱ्याकडून शेतीमाल कमी भावाने विकत घेऊन शहराच्या ठिकाणी कितीतरी अधिक भावाने विकतात.

२) शेतमालाची बाजारपेठ शेतकऱ्याच्या हातात नाही तिथे मारवाडी किंवा इतर लोक असतात.

३) जसे भारतात कोणत्याही वस्तुची फिक्स किंमत आहे तर मग शेतीमालाचीच का नाही? उदा. कांदे १० रुपये किलो आहेत तर संपूर्ण भारतात १० रुपये किलोने विकली गेली पाहिजेत आज कसे होते शेतकऱ्याकडून ३ रुपये किलोने कांदे घेऊन ते १५ रुपये किलोने विकले जातत म्हणजे फायदा कोणाचा?

गावाकडे वांगी, कांदे, भेंडी, टोमॅटो, इतर भाजीपाला खूप झाला तर ५ रुपये किलो मिळतो कधी कधी तर २ किंवा ३ रुपये किलोने मिळतो मग शहराच्या ठिकाणीच का १५ ते ५० रुपये किलोने मिळतो म्हणजे फायदा कोणाचा, अशी खूप कारणे आहेत पण एक मात्र खरे, शेतकऱ्याने कष्ट करून शेतीत माल पिकवला तरी तो त्या शेतमालाची व त्याच्या कष्टाची किंमत ठरवू शकत नाही हे दुदैव म्हणावे लागेल, ती किंमत सरकारी अधिकारी, दलाल किंवा तुम्ही आम्ही ठरवतो.

४) सारख कारखाने ही ऊसाचे राजकारण करतात. एक कारखाना ऊसाला १५०० रुपये भाव देतो तर दुसरा कारखाना ऊसाला ६०० किंवा ७०० रुपये भाव देतो, मग प्रश्न पडतो की १५०० रुपये भाव देणाऱ्या कारखान्यांची साखर पांढरी असते आणि ६०० किंवा ७०० रुपये भाव देणाऱ्या कारखान्याची साखर काळी असते का?

५) महाराष्ट्रातील साखर कारखाने, कृषी उत्पन्न बाजार समिती, भु विकास बँक, जिल्हा सहकारी बँक, या संस्थांशी शेतकऱ्याचा जास्त संबंध येतो पण या संस्था कोणत्या राजकीय पुढाऱ्यांच्या ताब्यात असतात, मध्यवर्ती बँक, कारखाना तोठ्यात चालतो आहे असे दाखवून त्यावर सरकारी पॅकेज मिळवायचे, ते पॅकेज स्वत:कडेच ठेवायचे शेतकऱ्याचे काय तो त्याचा काही करेल.

आत्महत्तेची काही कारणे खालीलपैकी :

१) पाण्याची (सिंचनाची) सोय नाही.

२) पश्चिम महाराष्ट्रीय माणसाच्या तुलनेत विदर्भीय माणुस जरा आळशी व उधळ्या स्वभावाचा आहे.

३) शेतात विहिर खोदुन पाणी पुरविणे वगैरे तिकडे तेवढे प्रचलित नाही.

४) दोन पिक घेणे पण फारसं दिसत नाही.

५) जास्तीत जास्त शेतकरीवर्ग अशिक्षीत आहे.

६) आधुनिक शेतीची अजून सुरुवात व्हायची आहे.

७) शिकलेले तरुण शेती करुन मालक बनण्यापेक्षा नोकरी करण्यात धन्यता मानतात ही एक मोठी शोकांतिका आहे.

८) विदर्भातील शेतकरी मुलीच्या लग्नासाठी जसे शेती विकतो, तसेच शाळेत बाबु (कारकुन) ते प्राध्यापक अशा १०-१५ हजार पगाराच्या नोकऱ्या मिळविण्यासाठी शेतीविकून ८ ते १६ लाख रुपये डोनेशन देण्यात धन्यता मानतो.

९) सुशिक्षीत तरुण शेतीकडे उदासिनतेने बघतात ही आहे खरी शोकांतिका.

१०) विदर्भातील राजकारणी शेतकऱ्यांच्या विकासासंबंधी पाऊल उचलताना कमी पडतात. विदर्भातील तरुण वर्ग शेती करण्यापेक्षा पुण्या मुंबईत येऊन नोकरी करण्याला प्राधान्य देतो.

आपली प्रगती तपासा.

१) शेतकरी आत्महत्येची कारणे स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१२.४.७ संघटना व आंदोलनाची गरज :

जागतिकीकरणाने शेतीमालाला चांगले भाव मिळू शकतात, पण संघटन व आंदोलन मजबूत नसेल तर हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो हा मोठा धडा अलीकडच्या घटनानी शेतकरी व शेतकरी कार्यकर्त्यांना मिळाला आहे. नासुकल्या कांद्याने आजची व्यवस्था शेतकरी विरोधी व असंवेदनशील असल्याचे प्रामाणिक केले आहे. शेतकरी समुदायाच्या हातात आर्थिक ताकद असती तर हा विरोध मोडून काढणे कदाचित शक्य झाले असते. ही ताकद त्याच्याकडे नसल्याने संघटना व आंदोलन याशिवाय त्याच्याकडे दुसरा पर्याय उपलब्ध नाही. सत्ता हातची जावू नये म्हणून शेती मालाचे भाव पाडण्यास तत्पर असलेल्या सरकारला शेती मालाचे भाव पडले व पाडले तर सत्ता हातची जाईल अशी जरब बसण्याची गरज आहे. हे संघटन व आंदोलन यानेच संभव आहे. नवे तंत्रज्ञान, बियाणे यालाही मुकण्याची वेळ संघटन व आंदोलन मजबूत नसेल तर येते हे बीटी वानग्याने दाखवून दिले आहे. संघटन व आंदोलन मजबूत नसेल तर निव्वळ आपल्या नाव लौकीकाच्या जोरावर १०-२० लोक धान्यापासून मद्यनिर्मितीला विरोध करण्याची अतार्किक भूमिकाही रेटू शकतात हा इतिहास ही ताजाच आहे. ताज्या परिस्थितीने सर्वात मोठा धडा शरद जोशी व सर्व शेतकरी समुदायाला मिळाला आहे. जागतिकिकरणाचा लाभ शक्तिशाली शेतकरी आन्दोलनाशिवाय प्राप्त होणे अशक्य कोटीतील गोष्ट आहे. वाट चुकलेल्या शेतकरी आंदोलनातील कार्यकर्त्यांसाठीही मोठा धडा आहे. जागतिकीकरणा विरूद्ध संघर्षात शक्ति वाया घालविण्याऐवजी जागतिकीकरणाचा लाभ शेतकरी समुदाय मिळावा यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करण्याची गरज आहे. ज्यांनी शेतकरी समुदायाला धडे दिले त्यांनाच धडे देण्याची वेळ शेतकरी समुदायावर येणार नाही अशी आशा करु या.

१२.५ सारांश

जागतिकरणाचा रोजगारावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला आपणास पाहावयास मिळाला आहे. खाजगीकरणामुळे व जागतिकीकरणामुळे रोजगार उपलब्ध होतोत पण ते कायम स्वरूपाचे असत नाहीत. तंत्रज्ञान व विज्ञानानाने केलेली प्रगती तसेच जागतिक व्यापारी धोरण

यामुळे नोकरीच्या/रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. पण ज्यांच्याकडे कौशल्य आहे, ज्ञान आहे. त्याच्यासाठीच त्या आहेत.

जागतिकीकरण व खाजगीकरण यांच्यामुळे आज प्रचंड प्रमाणात स्थलांतर होत आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक, पर्यावरण, आयोग्य इत्यादी घटक कारणीभूत आहेत. यामुळे शहरीकरणात व झोपडपट्टीत वाढ होत आहे. गुन्हेगारीचे प्रमाण व आजाराचे प्रमाण वाढत चालले आहे. थोडक्यात सार्वजनिक सेवांवर ताण वाढत चाललेला आपणास दिसत आहे.

भारतातील शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे शहरीकरणात भर पडत आहे. शेती व्यवसाय होत नाही. लोक मोठ्या संख्येने स्थलांतरित होत असलेले दिसतात. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे शेती व्यवसाय करणे अवघड होत आहे. भारतात शेतीची उत्पादन क्षमता कमी असल्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न ही कमी आहे. शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत नाहीत. त्यामुळे सरकारला अन्न-धान्याची आयात करावी लागत आहे.

१२.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) जागतिकरणाचा रोजगारावर होणारा परिणाम सविस्तर स्पष्ट करा.

२) विविध क्षेत्रातील उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी सांगून, कामाचा काही भाग बाहेरून करुन घेणे म्हणजे काय ?

३) स्थलांतर म्हणजे काय ? स्थलांतराचे विविध प्रकार स्पष्ट करा.

४) स्थलांतराच्या विविध परिणामाची सविस्तर चर्चा करा.

५) जागतिकीकरण व शेतकरी यांचा संबंध सांगून, शेतकरी आत्महत्येची कारणे स्पष्ट करा.

६) शेतीचे महत्त्व सांगून, जागतिकीकरणाचा शेती व्यवसायावरील परिणाम स्पष्ट करा.

७) टीपा लिहा.

अ) कंत्राटी कामगार.

ब) जागतिकीकरण आणि कामगार.

क) स्थलांतर.

ड) शेतकरी आत्महत्या.

इ) जागतिकिकरण व शेतकरी.

उ) संघटना व आंदोलनाची गरज.

❖❖❖❖

१३

मानवी हक्क

पाठाची रचना :

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ मानवी हक्क संकल्पना
१३.३ सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनामा (UDHR)
१३.४ भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क आणि मानवी हक्क यांचा संबंध
१३.५ समारोप
१३.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१३.० उद्दिष्ट्ये

- मानवी हक्क संकल्पना समजून घेणे.
- सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनाम्याचा अभ्यास करणे.
- एकूण मानवी हक्क आणि त्यांचा भारतीय घटनेतील मूलभूत हक्कांशी संबंध तपासून पाहणे.

१३.१ प्रस्तावना

मानवी हक्क म्हणजे मानव असल्यामुळे मानवाला त्याचे मिळणारे हक्क होय. त्यानुसार जगातील प्रत्येक मानवाला हे हक्क प्राप्त होतात म्हणून ही संकल्पना सार्वत्रिक व सर्व मानव समान आहेत हे मानणारी आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी हक्क ही एक चळवळ झालेली आहे. मानवी हक्कांचा अभ्यास अनेक पैलूंनी केला जातो. उदा. नागरी हक्क, राजकीय हक्क, आर्थिक हक्क, सामाजिक हक्क, सांस्कृतिक हक्क इ. काही ठिकाणी त्यांना 'मूलभूत हक्क' असेही म्हटले जाते. मानवी वंश असल्यामुळे जन्मापासूनच प्रत्येकाला आपले हक्क मिळाले पाहिजेत व म्हणून त्यांना 'जन्मसिद्ध हक्क' सुद्धा म्हणता येते. त्यांना कोणत्याही जात, धर्म, पंथ, लिंग, प्रदेश, वर्ण, व्यवसाय इ. चा भेदभाव न बाळगता बहाल होणारे 'स्वातंत्र्याचे अधिकार' असेही म्हणता येते.

१३.२ मानवी हक्क संकल्पना

मानवी हक्क ही २० व्या शतकातील संकल्पना असून त्यांना 'नैसर्गिक हक्क' किंबहूना सर्वात समर्पक शब्द 'मानवाचे हक्क' असे म्हणतात. मानवाचे हक्क किंवा त्यासंबंधित इतर संज्ञा ह्या मानव प्राणी जन्माला आल्यापासूनच अस्तित्वात आहेत. ह्या संकल्पना जगातील बहुतेक संस्कृतीमध्ये अस्तित्वात होत्याच परंतु त्यांना एकदम 'मानवी हक्क' या संदर्भात वापरात आणले जात नव्हते. त्यामुळे 'मानवी हक्क' ही संकल्पना तुलनेने अगदीच अलिकडची असली तरीही ती मानवी हक्क म्हणून वेगळ्या स्वरुपात मानवी संस्कृतीपासूनच वापरात होती. मानवी हक्काची कल्पना मानवी इतिहासात सापडते. मानवी संस्कृतीला आपल्या हक्कांसाठी नेहमीच संघर्ष करावा लागलेला आहे. मग तो अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध किंवा तुच्छता यांविरुद्ध असेल.

विस्तारित रुपात पाहिल्यास, मानवी हक्क म्हणजे व्यक्तिला कोणत्याही जात, धर्म, पंथ, लिंग या भेदांशिवाय जीवन, स्वांतत्र्य, समानता आणि प्रतिष्ठा प्राप्त होणे होय. सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्युासार, मानवी हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तिला मिळणारे समप्रमाणातील हक्क होत. त्यांचा गभितार्थ म्हणजे प्रत्येक मानव प्राणी जन्मापासूनच मुक्त आहे आणि त्याची प्रतिष्ठा आणि हक्क अनुसरण्यास तो स्वतंत्र आहे.

प्राध्यापक हेरॉल्ड लास्की यांच्या मते, "हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी अवस्था की जिच्याशिवाय मानव आपल्यातील कौशल्यांचा सुप्त गुणांचा विकास करु शकत नाही."

डॉ. बाबासोहब आंबेडकर यांच्या मते, "मूलभूत हक्क म्हणजे कायद्याची देणगी आहे. मानवप्राण्याला ते अनिवार्य आहेत. ते शासन बहाल करते आणि त्यासाठी शासन कायदा अंमलात आणू शकते." त्यांचा मूलभूत मानवी हक्कांचा सिद्धांत हा राजकीय लोकशाहीशी संबंधित असून तो चार स्तभांवर उभा असलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय लोकशाहीचे चार स्तंभ पुढीलप्रमाणे आहेत.

१) "व्यक्ति ही स्वत: स्वत:चे साध्य आहे." ("The individual is an end in himself") :

कोणतीही सामाजिक अथवा राजकीय संस्था असेल तर त्यांचे व्यक्तिविकास हेच साध्य असते व्यक्ति ही काही राज्यासाठी नसते तर व्यक्तिनेच आपल्यासाठी राज्याची निर्मिती केलेली असते आणि कोणत्याही आदर्श नागरिकाचे आपल्या राज्याची (देश) सेवा करणे हे कर्तव्य असते. व्यक्ति आपले कल्याण साधू इच्छित असेल तर त्यामध्ये त्याचे शारीरिक, मानसिक आणि भौतिक कौशल्यांचा विकास होणे महत्वाचे आहे जेणेकरुन त्याला जीवनात समाधान प्राप्त होईल.

२) "प्रत्येक व्यक्तिला तिच्यापासून अविभक्त असे बहाल झालेले अधिकार असतात व त्यांची हमी ही लिखित संविधानद्वारे मिळणे गरजेचे आहे." ("The individual has certain in alienable rights which must be guaranteed to him by the constitution".)

याचा अर्थ कोणत्याही व्यक्तिचे अधिकार कोणतीही दुसरी व्यक्ती किंवा संस्था अतिक्रमित, संक्षेपित किंवा नष्ट करु शकत नाही. त्यासाठी मात्र संविधानाशिवाय दुसरी कोणतीही योजना त्याची हमी देऊ शकत नाही.

३) "कोणत्याही व्यक्तिने कोणत्याही प्रलोभनासाठी आपल्याला मिळालेले सांविधानिक हक्क त्याग करण्याची आवश्यकता नाही." ("The individual shall not be required to relinquish any of his constitutional rights as condition precdent to the receipt of a preivilage".)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "प्रत्येक व्यक्तिचे अधिकार हे वेगळे करता येण्यासारखे नसून ते संविधानिक आहेत. म्हणूनच त्यांनी ते कोणत्याही मोहापायी सोडून देणे चुकीचे आहे. असे असले तरी ते सिमित करताना किंवा नष्ट करताना कायद्याच्या योग्य प्रक्रीयेचे पालन करणे आवश्यक आहे."

४) "राज्य (देश किंवा सरकार) कोणत्याही त्रयस्थ व्यक्तिला इतरांवर शासन चालविण्याचा परवाना देऊ शकत नाही." ("The state shall not delegate to private persons to govern others")

त्यांच्या मते, राज्य हे अंतिम आहे आणि व्यक्तिस सर्व सुविधा देण्यास सक्षम आहे. म्हणूनच कोणतीही मध्यस्थ व्यक्ति किंवा कोणत्याही राज्याचे किंवा राजपुत्राचे राज्यावर नियंत्रण नसले पाहिजे. सर्व व्यक्ति हे कायद्यापुढे समान आहेत आणि समान वागणूक मिळण्यास पात्र आहेत व ते सरकारचे (राज्याचे) कर्तव्यच आहे.

१३.२.१ मानवी हक्कांचा इतिहास :

मानवी हक्कांचे मूळ आपणास बॅबिलोनियन कायद्यांमध्ये सापडते. बॅबिलोनियन राजा हमुराबी याने आपल्या प्रजेसाठी कायद्याचे संच निर्माण केले ते 'हमुराबी संहिता' म्हणून ओळखले जातात. त्यामध्ये योग्य वेतन, संपत्तीचे रक्षण आणि अपराधी व्यक्तिवरील आरोप हे खटला चालवून किंवा सुनावणी होऊनच सिद्ध झाले पाहिजेत आणि मगच त्यास शिक्षा झाली पाहिजे अशा मुद्यांचा समावेश होता. ग्रीक तत्ववेत्ते प्लेटो, ॲरिस्टॉटल, आणि रोमन तत्ववेत्ते सिसेरो, यांनी नैसर्गिक कायदा, नैसर्गिक हक्क आणि मानवी हक्क यांचा नेहमीच पुरस्कार केला.

सांस्कृतिक शब्दकोशानुसार मानवी हक्कांची व्याख्या 'सरकारचा एकतर्फी हस्तक्षेप आणि बंधने यांपासून स्वातंत्र्य' अशी केलेली आढळते. ही संज्ञा विस्तृत अर्थाने नागरी हक्क किंवा नागरी स्वातंत्र्ये यांच्या अर्थाशी संबंध प्रस्थापित करते. परंतु त्यानुसार असे अधिकार सूचित करते की, ज्यांना वस्तुनिष्ठ मान्यता देणे कठीण होऊन बसते.

आधुनिक काळाच्या सुरुवातीला, प्रबोधन काळातील मानवतावादामुळे खऱ्या अर्थाने मानवी हक्क संकल्पनेचा उगम झाल्याची शक्यता आहे. त्याच्याही अगोदर 'हेबिअस कॉर्पस' म्हणजे आरोपीला प्रत्यक्ष न्यायालयासमोर हजर करण्याची आज्ञा यांचा समावेश इ.स. १२१५ च्या 'मॅग्ना कार्टा' मध्ये आपणास आढळून येतो. युरोपिय धर्मयुद्धे आणि १७ व्या शतकातील

इंग्लंडमधील यादवी युद्धे यांनी उदारमतवादी तत्वज्ञान आणि मानवी हक्कांवरील विश्वास यांना जन्म दिला. त्यानंतर १८ व्या शतकातील ज्ञान युगाचा व युरोपातील बुद्धिप्रामाण्यवादी संस्कृतीचा मानवी हक्क व उदारमतवाद एक प्रमुख भाग बनले. मानवी हक्काची कल्पना आपणांस अमेरिकन राज्यक्रांती (१७७६) आणि फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) की ज्यांनी सार्वत्रिक प्रौढ मतदानाची संकल्पना मांडली त्यांमध्ये सापडते. २० व्या शतकातील जागतिक महायुद्धांनी तर 'सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनामा' (UDHR) प्रसिद्ध करण्यास हातभार लावला.

भारतीय तत्वज्ञानाचा व मानवी हक्कांचा संबंध आपल्याला तथागत बुद्धांचे तत्वज्ञान आणि सम्राट अशोक मौर्याची धार्मिक सहिष्णुता यामध्ये आढळतो. सम्राट अशोकाने जे शीलालेख कोरले त्यामध्ये त्याने राज्याने नेहमीच लोककल्याण आणि धार्मिक सहिष्णुता यांना उत्तेजन देऊन त्यांचे पालन केले पाहिजे असे लिहिले. तसेच युद्धबंद्याना पकडून त्यांची कत्तल करणे ह्याचा सुद्धा त्याने निषेध केलेला आहे. त्यामुळेच मानवी हक्कांचा उगम अशोकाच्या राज्यात जो बौद्ध तत्वज्ञानाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करीत होता, आपणास आढळून येतो.

इतिहासकार जॉन एस्पोसिटो यांच्या मतानुसार, मोहम्मद पैगंबराने स्त्री बालहत्या, गरीबाचे शोषण, सावकारशाही, खून, खोटे करारमदार, आणि चोरी यांना निषिद्ध मानले. त्याने आपल्या धार्मिक तत्वज्ञानात अरबी आणि मोझेसचे कायदे व प्रचलित प्रथांचा समावेश केला. मदिनाची राज्यघटना त्याने तयार केली व त्यामुळे समुदायाची सुरक्षा वाढली, त्यांना धार्मिक स्वातंत्र्य मिळाले आणि स्त्रियांना संरक्षण मिळाले.

आधुनिक मानवी हक्क संकल्पना आपणास प्रबोधन व सुधारणा काळ (युरोप) यामध्ये असलेली आढळते. कारण त्याचवेळी सामंतशाहीचे (संरंजामशाही) वर्चस्व आणि धार्मिक कट्टरता ज्यांनी तत्कालीन व्यक्तिजीवनावर प्रभाव टाकला यांचे अस्तित्व नष्ट झाल्याचे दिसत होते. जॅक डॉनेली यांच्या मते, प्राचीन जगात प्रारंपारिक समाजामध्ये काही ठळक कर्तव्ये पाळली जायची.... जसे न्यायाची संकल्पना, राजकीय वारसा, आणि मानवी भरभराट. त्यामुळे मानवी प्रतिष्ठा किंवा त्यांची भरभराट व त्यांचे कल्याण या संकल्पना मानवी हक्क म्हणून नसल्या तरी अस्तित्वात होत्या. इ.स. १२१५ ची 'मॅग्ना कार्टा' ही सर्वसामान्य मानवी हक्कांशी संबंधित आहे. पोलंडच्या राजधानीत असलेला 'कॅलिझ' याचा पुतळा (१२६४) तेथील ज्यू अल्पसंख्याकाना सुविधा व हक्क बहाल करतो. इ.स. १५२५ मध्ये जर्मनीत जर्मन शेतकरी-युद्धामध्ये त्या शेतकऱ्यांनी आपल्या 'स्वाबियन संघा' च्या मागण्या 'बारा लेख' म्हणून सादर केल्या. ब्रिटनमध्ये इ.स. १६८३ मध्ये, 'बिल ऑफ राईट्स' किंवा 'हक्कांची सनद' सादर केली गेली. त्यालाच प्रजेचे अधिकार आणि स्वातंत्र्ये व राजाच्या वारसाहक्कांचा प्रश्न याबाबत जाहिर केलेला कायदा असे म्हटले जाते. तसेच स्कॉटीश हक्क दाव्यांनी सरकारचा दडपशाहीच्या कृतीचा निषेध केला.

त्यानंतर मानवी हक्कांचा विकास आपणास अमेरिकन राज्यक्रांती (१७७६), फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) यांच्या मानवी हक्क किंवा राजकीय नागरी हक्कांच्या सनदेमधून झालेला आढळतो. त्यातच इ.स. १७७६ च्या व्हर्जिनिया हक्कांच्या जाहिरनाम्याने अनेक मूलभूत हक्कांना व नागरी स्वातंत्र्याच्या तरतूदींना कायद्यामध्ये परावर्तीत केले. त्यानंतर तत्ववेत्त्यानी मानवी हक्क तत्वज्ञान विकासास चालना दिली. त्यामध्ये थॉमस पेन चे 'राईट्स ऑफ मॅन' आणि विल्यम लॉईड गॅरिसन यांचे इ.स. १८३१ चे 'द लिबरेटर' मधील लेखन ज्यामध्ये त्यांनी आपल्या वाचकांना महान मानवी हक्कांची जाणीव करुन दिलेली आढळते.

गुलामीच्या जाचक विषयावर १९ व्या शतकात मानवी हक्क हा एक मध्यवर्ती विषय म्हणून चर्चेला आला. ब्रिटनमध्ये गुलामी विरोधात विल्यम विल्बरफोर्स यांनी काम केले आणि त्याच्या परिणामस्वरुप इ.स. १८०७ मध्ये ब्रिटनमध्ये गुलामी व्यापार कायदा आणि इ.स. १८३३ मध्ये 'गुलामी प्रथा निर्मूलन कायदा' पारित केला. उत्तर अमेरिकेतील राज्यांनी अगोदरच गुलामी प्रथा नष्ट केलेली होती परंतु दक्षिण अमेरिकेतील राज्यांनी ती नंतर केली. २० व्या शतकामध्ये या ना त्या स्वरुपात आपणास अनेक मानवी हक्क चळवळी सुरु झाल्याचे आढळते. उदा. कामगार संघटना आणि कामगारांचे अधिकार, स्त्री हक्क चळवळी, भारतातील म.गांधी व राष्ट्रीय काँग्रेस प्रणीत राष्ट्रीय चळवळ, डॉ. बाबासोहब आंबेडकरांनी सुरु केलेली दलित मुक्ती चळवळ इ.

आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना, इ.स. १८६४ चे 'लायबर संहिता' आणि इ.स. १८६४ ची पहिली जिनिव्हा परिषद यांनी आंतरराष्ट्रीय मानवी कायद्याच्या स्थापनेस हातभार लावला. दोन जागतिक महायुद्धातील मानवी संहार आणि मानवी हक्कांची एकूणच पायमल्ली यांनी आधुनिक मानवी हक्क कायद्यांना सुरुवात केली. इ.स. १९१९ मध्ये राष्ट्रसंघाची (League of Nations) स्थापना करण्यात आली आणि त्यात निःशस्त्रीकरण, युद्धग्रस्त राष्ट्रांतील तंटे सामोपचाराने मिटविणे व तसे करण्यास सार्वत्रिक दबाव टाकणे व एकूण जागतिक कल्याणाची भूमिका घेणे यांचा समावेश करण्यात आला. त्यातील सनदेमध्ये समाविष्ट असलेल्या कायद्यांना नंतरच्या काळात इ.स. १९४८ मध्ये स्थापन झालेल्या 'सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनाम्यात' (UDHR) स्थान मिळाले.

इ.स. १९४५ साली 'याल्टा परिषदेमध्ये' दोस्त राष्ट्रांनी एक नवीन आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यास मान्यता दिली व 'संयुक्त राष्ट्रसंघटनेची' (UNO) स्थापना झाली. आजमितीस मानवी हक्क व त्यासंबधी कायदे संहिता बनविणे तिची अंमलबजावणी करणे व नियंत्रण करण्याची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांस पार पाडावी लागते.

आपली पग्रती तपासा :

१) प्रा. हेरॉल्ड लास्की यांच्या मते हक्क म्हणजे काय ?

२) 'ह मुराबी संहिता' म्हणजे काय ?

१३.२.२ मानवी हक्क तत्वज्ञान :

मानवी हक्कांचे तत्वज्ञान हे मानवी हक्कांच्या संकल्पनेचा पाया व विकास यांचे परीक्षण करते आणि (आपण उपघटक क्र. २.२ मध्ये पाहिले आहे) त्याकडे समिक्षात्मक स्वरुपात पाहून त्यांच्या मर्यादांचा आढावा घेतला जातो. मानवी हक्कांच्या अपेक्षा समाजाकडून केल्या जातात आणि त्यासाठी अनेक सैद्धांतिक कसोट्यांवर चर्चा केली जाते.

एका पाश्चिमात्य तत्वज्ञानानुसार मानवी हक्क म्हणजे वेगवेगळे तत्वज्ञान आणि धार्मिक आशयातून निघालेले नैसर्गिक न्यायाचे फलित होय. काही सिद्धांतानुसार, मानवी हक्क हे नैतिक वर्तनाला संहितेच्या स्वरुपात आणते. डेव्हिड ह्युम यांच्या मते, मानवी हक्क हे जैविक, सामाजिक प्रक्रीयेच्या विकासातून निर्माण झालेले उत्पादन आहे. मॅक्स वेबर असे म्हणतात, "मानवी हक्क म्हणजे राज्य चालवण्याची सामाजिक प्रक्रीया आहे". जॉन रॉल्स यांच्या मते, "व्यक्ति आपल्यावरील नियम व बंधने एखाद्या कायदेशीर अधिकाऱ्याकडूनच स्विकारु शकतो आणि त्यांच्या बदल्यात आपणांस सुरक्षा आणि आर्थिक लाभ मिळवून घेतो. याला 'सामाजिक करार' असे म्हणतात."

जगात मानवी हक्कांची जी चर्चा चालू आहे त्यावर मुख्य अशा दोन सिद्धांताचा प्रभाव आपणांस आढळून येतो व ते सिद्धांत म्हणजे (i) स्वारस्य सिद्धांत आणि (ii) इच्छा सिद्धांत. स्वारस्य सिद्धांतानुसार, मानवी हक्कांचे मुख्य कार्य म्हणजे मानवाच्या आवश्यक स्वारस्याचे संरक्षण आणि त्याला उत्तेजन देणे होय. तर इच्छा सिद्धांतानुसार, स्वातंत्र्य उपभोगता यावे यासाठी विशिष्ट मानवी क्षमतेवर आधारित मानवी हक्कांची वैधता प्रस्थापित करणे होय.

१३.२.३ मानवी हक्कांचे वर्गीकरण :

मानवी हक्कांचे वर्गीकरण आणि संघटन विविध प्रकारांनी करता येते. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवी हक्कांचे विभाजन नागरी व राजकीय हक्क आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क या प्रकारांत केले जाते.

नागरी आणि राजकीय हक्क हे सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यातील कलम ३ ते २१ मध्ये असून आंतरराष्ट्रीय नागरी आणि राजकीय हक्क करारनामा (ICCPR) यांमध्ये सुद्धा समाविष्ट आहेत. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क हे सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यातील (UDHR) कलम २२ ते २८ मध्ये व आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक करारनाम्यामध्ये सुद्धा अंतभूत आहेत.

कारेल वासक या तत्वज्ञाने मानवी हक्कांना तीन पिढ्यांमध्ये वर्गीकृत केले आहे. ते पुढीलप्रमाणे –

i) पहिल्या पिढीतील नागरी आणि राजकीय हक्क (जगण्याचा व राजकीय सहभागाबाबतचे हक्क)

ii) दुसऱ्या पिढीतील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क (यामध्ये उदरनिर्वाहाचा हक्क) यांचा समावेश आहे.

iii) तिसऱ्या पिढीतील ऐक्याचे हक्क (ज्यामध्ये शांती, स्वच्छ पर्यावरण) यांचा समावेश आहे.

वरील तीन पिढ्यांतील हक्कांपैकी तिसऱ्या पिढीतील हक्कांवर आजच्या युगात अधिक विचारमंथन व चर्चा चालू आहे परंतू त्यांना कायदेशीर व राजकीय मान्यता मिळत नाही.

१३.२.४ मानवी हक्कांचा विकास :

सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनामा (UDHR) अभ्यासण्या अगोदर आपणांस काही इतर मानवी हक्कांबाबतच्या सनदा, जाहिरनामे, करारनामे, संहिता यांचा आढावा घेणे आवश्यक

आहे. उदा. मॅग्ना कार्टा, बील ऑफ राईटस (हक्कांची सनद), अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहिरनामा, फ्रान्सचा मानवी व नागरिकांच्या हक्कांचा जाहिरनामा.

अ) मॅग्ना कार्टा, १२१५ :

१५ जून १२१५ रोजी इंग्लंडने मॅग्ना कार्टा ही हक्कांची संहिता जाहिर केली. त्यास 'मॅग्ना कार्टा लिबरॅटम' किंवा 'ग्रेट चार्टर ऑफ द लिबर्टीज ऑफ इंग्लंड' (इंग्लंडच्या स्वातंत्र्यांची महान सनद) असे म्हटले जाते. ते मूळ स्वरुपात लॅटिन भाषेत असून नंतर फ्रेंचमध्ये भाषांतरित करण्यात येऊन इ.स. १२१९ पर्यंत अनेक स्थानिक भाषांमध्ये भाषांतरित केले गेले. त्या नंतरही त्याच्यात अनेक फेरबदल केले गेले. इ.स. १२१५ रोजी इंग्लंडचे राजे जॉन यांनी लोकांसाठी काही अधिकार या सनदेद्वारे जाहिर केले आणि त्याची इच्छा किंवा कारभार हा एकतर्फी नाही हे दाखवून दिले. उदा. इंग्लंडमधील कोणत्याही मुक्त नागरिकास देशाच्या योग्य कायदेशीर प्रक्रीयेशिवाय शिक्षा देता येणार नाही हे त्याला स्विकारावे लागले. हा अधिकार लोकांसाठी आजही इंग्लंडमध्ये प्रचलित आहे.

ब) हक्कांची सनद (बिल ऑफ राईट्स) १६८९ :

इ.स. १६८८ ची हक्कांची सनद किंवा 'बिल ऑफ राईट्स' १६८८ हा ब्रिटीश संसदेने १६ डिसेंबर १६८९ रोजी पारित केलेला कायदा होय. या कायद्याने राजाच्या सत्तेवर अंकुश ठेवण्यात आला, संसदेचे नियम तयार करण्यात आले, तसेच संसदेमध्ये भाषण स्वातंत्र्याचे नियम तयार केले गेले. संसदेच्या नियमितपणे निवडणुका घेणे, कोणत्याही व्यक्तिगत कार्यवाहीच्या भिती शिवाय राजाच्या निर्णयांना आव्हान देणे यांसारख्या तरतूदींचा समावेश करण्यात आला. या सनदेने प्रॉटेस्टंट पंथाच्या अनुयांयांना कायद्याच्या चौकटीत राहून स्वरक्षणासाठी शस्त्र बाळगण्याचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आले. कारण तथाकथित कॅथॉलिक पंथीय (पोपचे अनुयायी) हे सरकारमध्ये सहभागी असून शस्त्रे बाळगीतच होते.

क) अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहिरनामा, १७७६ :

४ जुलै १७७६ रोजी कॉंटीनेन्टल कॉंग्रेसने अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याचा स्विकार केला. त्याद्वारे असे घोषित करण्यात आले की, ज्या १३ अमेरिकन वसाहती ग्रेट ब्रिटनसोबत युद्ध करीत होत्या त्या आता स्वतंत्र आहेत आणि ब्रिटीश साम्राज्याशी त्यांचा कोणताही संबंध नाही. त्या जाहिरनाम्यानुसार निर्मात्याने निर्मिल्याप्रमाणे सर्व मानव समान असून त्यांना जन्मजात काही हक्क व अधिकार मिळाले आहेत. उदा. जगणे, स्वातंत्र्य आणि आपले जीवन सुखी बनवणे या हक्कांचा त्यात समावेश होता. खरे पाहता या जाहिरनाम्याचा पुरस्कार अब्राहम लिंकनने केलेला होता व त्याच्या राजकीय तत्वज्ञानाचा तो पाया होता. त्यामुळेच त्याने असा तर्क मांडला की, अमेरिकन राज्यघटनेचा अन्वयार्थ या जाहिरनाम्यातील तत्वज्ञानानुसारच लावला जावा. या जाहिरनाम्याचा उपयोग जगातील अनेक दुर्लक्षित घटकांना आपल्या उद्धारासाठी झाला.

ड) मानवी व नागरी हक्कांचा जाहिरनामा, १७९३ :

हा जाहिरनामा म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीचा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. याद्वारे फ्रेंच समाजातील तीनही स्तरातील (Three Estate) लोकांचे व्यक्तिगत व सामुदायिक अधिकार

हे सर्वमान्य असतील असे ठरविण्यात आले. त्यानुसार 'नैसर्गिक हक्क', 'सिद्धांत' व 'मानवी हक्क सिद्धांत' हे सार्वत्रिक असले पाहिजेत अशी तरतूद करण्यात आली. इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये त्याचा स्विकार करण्यात आला. परंतु त्यामध्ये पुढील काळात अनेक बदल करण्यात येऊन इ.स. १७९३ मध्ये त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात आली. हा जाहिरनामा कोणत्याही धार्मिक सिद्धांत किंवा अधिकारावर अवलंबून नाही तर पूर्णपणे नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर आधारित आहे. या जाहिरनाम्यातील आशयानुसार मानव प्राणी जन्मतःच मुक्त आहे व पुढेही मुक्त राहील व त्याला कायम समान हक्क बहाल होतील. म्हणूनच सरकारचे प्रमुख कार्य या हक्कांना मान्यता देऊन ते त्या व्यक्तिस बहाल केले पाहिजेत हे आहे. त्या अधिकारांमध्ये स्वातंत्र्य, संपत्ती, सुरक्षा आणि अन्यायाविरुद्ध प्रतिकार या अधिकारांचा समावेश आहे.

आपली पग्रती तपासा :

१) मानवी हक्कांच्या जागतिक चर्चेवर कोणत्या दोन सिद्धांतांचा प्रभाव आपणांस आढळून येतो ?

२) मॅग्ना कार्टा काय आहे ?

१३.३ सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनामा (Universal Declaration of Human Rights – UDHR)

१० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिसमध्ये संयुक्त महासभेमध्ये सार्वत्रिक मानवी हक्काचा जाहिरनामा (UDHR) स्विकारण्यात आला. हा जाहिरनामा म्हणजे दुसऱ्या महायुद्धातील घटनांचा परिपाक असून जगातील सर्व लोकांसाठी मानवी हक्कांची अभिव्यक्ती होय. या जाहिरनाम्यातील तरतूदींचा स्विकार जगातील अनेक देशांच्या राज्यघटना आणि कायदे संहिता यांमध्ये करण्यात आला. आंतरराष्ट्रीय हक्कांच्या सनदेमध्ये सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनामा, आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा करारनामा, आंतरराष्ट्रीय नागरी आणि राजकीय हक्कांचा करारनामा आणि इतर दोन ऐच्छिक शिष्टाचारनामे यांचा समावेश आहे. इ.स. १९६० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या सनदेची पूर्तता करणारे दोन सविस्तर तरतूदींचे करारनामे स्विकारले आणि इ.स. १९७६ मध्ये काही सदस्य राष्ट्रांनी त्यामध्ये योग्य असे बदल सुचविल्यानंतर या सनदेला आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले.

हा जाहिरनामा लिहिण्याचे श्रेय जॉन पिटर्स हम्फ्रे (कॅनडा), रेने कॅसिन (फ्रान्स), स्टिफेन हेसेल (फ्रान्स), पी.सी. चांग (चीन), चार्ल्स मलिक (लेबॅनॉन), एलिनॉर रुझवेल्ट (अमेरिका) आणि इतर यांना जाते.

१३.३.१ सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनामा (UDHR), १९४८ पार्श्वभूमी :

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीच दोस्त राष्ट्रांनी भाषण, सभा, (एकत्र जमणे), भयमुक्तता, इच्छा स्वातंत्र्य या स्वातंत्र्यांचा स्विकार केला होता. संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरमध्ये मूलभूत मानवी हक्कांवरील विश्वासाचा पुनरुच्चार केला होता. तसेच मानवी प्रतिष्ठा व त्यांची योग्यता यांचा समावेश करुन सर्व सदस्य राष्ट्रांना मानवी हक्कांचा आदर आणि त्यास उत्तेजन देणे व कोणताही धर्म, जात, लिंग, भाषा, प्रदेश यांच्या भेदभावाशिवाय मूलभूत स्वातंत्र्यांच्या हक्कांचे पालन करण्याचे अनिवार्य करण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धानंतर नाझी जर्मनीने ज्यू लोकांचा केलेला छळ सार्वत्रिक झाला त्यावेळी जगातील जवळ जवळ सर्वच राष्ट्रांचे एकमत झाले की, संयुक्त राष्ट्रांच्या सनदेमध्ये मानवी हक्कांची स्पष्टता असणाऱ्या सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याचा संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या तरतूदींमध्ये समावेश करणे आवश्यक आहे.

१३.३.२ सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याची निर्मिती (UDHR) :

सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याच्या निर्मितीचे श्रेय कॅनडाचे सांविधानिक तज्ज्ञ जॉन पिटर्स हम्फ्रे यांना जाते. त्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सचिवालयातील मानवी हक्क विभागाचे संचालक म्हणून त्यांना नेमण्यात आले. संयुक्त राष्ट्रांची स्थायी समिती म्हणजेच मानवी हक्क आयोगाची स्थापना सुरुवातीच्या काळातील आंतरराष्ट्रीय हक्कांची सनद तयार करण्यासाठी केली होती. या आयोगाचे सदस्यत्व सर्व समावेशक होते व जगातील बऱ्याच राष्ट्रांना प्रातिनिधीक स्वरुपात ते बहाल करण्यात आले होते. त्यामध्ये ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, बेलारुस सोव्हिएत संघ, चिली, चीन, इजिप्त, फ्रान्स, भारत, इराण, लेबॅनॉन, पनामा, फिलीपाईन्स, इंग्लंड, अमेरिका, रशियन सोव्हिएत संघ, उरुग्वे आणि युगोस्लाव्हिया या देशांचा समावेश होता. या देशांतील लेखकांपैकी कॅनडाच्या जॉन पिटर्स हम्फ्रे यांनी तयार केलेला मसुदा मानवी हक्क आयोगाचा प्रमुख दस्तऐवज बनला.

१३.३.३ सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनाम्यास मतदान करणारे सदस्य देश :

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १० डिसेंबर १९४८ रोजी 'सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनामा' (UDHR) स्विकारला. त्यासाठी ४९ देशांनी बाजूने मतदान केले तर विरोधात शून्य मते गेली. तर ८ देश गैरहजर राहिले. त्यामध्ये रशियन सोव्हिएत संघ, युक्रेन सोव्हिएत संघ, बेलारुस सोव्हिएत संघ, युगोस्लाव्हिया, पोलंड, दक्षिण आफ्रिका, चेकोस्लोव्हाकिया आणि सौदी अरेबिया यांचा समावेश होता. ज्या राष्ट्रांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले त्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

१	अफगाणिस्तान	२	अर्जेंटिना	३	ऑस्ट्रेलिया
४	बेल्जियम	५	बोलिव्हिया	६	ब्राझिल
७	ब्रह्मदेश	८	कॅनडा	९	चिली
१०	चीनी प्रजासत्ताक	११	कोलंबिया	१२	कोस्टा रिका
१३	क्युबा	१४	डेन्मार्क	१५	डॉमिनीकन रिपब्लिक
१६	ईक्वाडोर	१७	साल्वाडोर	१८	इजिप्त
१९	इथियोपिया	२०	फ्रान्स	२१	ग्वाटेमाला
२२	हैती	२३	भारत	२४	इराण
२५	इराक	२६	लेबॉनॉन	२७	लायबेरिया
२८	पाकिस्तान	२९	रोमानिया	३०	ग्रीस
३१	आईसलँड	३२	लक्झेम्बर्ग	३३	मेक्सिको
३४	नेदरलँड	३५	न्यूझीलंड	३६	निकाराग्वा
३७	नॉर्वे	३८	पनामा	३९	पॅराग्वे
४०	पेरु	४१	फिलीपाईन्स	४२	स्विडन
४३	सिरिया	४४	थायलंड	४५	तुर्कस्थान
४६	इंग्लंड	४७	अमेरिका	४८	उरुग्वे
४९	व्हेनेझुएला				

कॅनडाचे तज्ज्ञ जॉन हम्फ्रे हे या जाहिरनाम्याचे प्रमुख असल्यानंतर सुद्धा सुरुवातीला कॅनडा सरकारने मसुद्याच्या मतदानाच्या दिवशी गैरहजर राहणे पंसत केले. परंतु नंतर महासभेतील मतदानावेळी ठरावाच्या बाजूने मतदान केले.

१३.३.४ सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनाम्याच्या (UDHR) तरतूदी :

या जाहिरनाम्यामध्ये एकूण ३० कलमे असून सुरुवातीस प्रास्ताविक करण्यात आले आहे. उदा. भारतीय संविधानाचे प्रास्ताविक.

१३.३.४.१ प्रास्ताविक (Preamble) :

स्वातंत्र्य, न्याय आणि जागतिक शांतता यांचा पाया म्हणजे मानवी समुदायाच्या सदस्यांची जन्मजात प्रतिष्ठा, समान अधिकार, आणि मानवी हक्क बहाली होय.

मानवी हक्कांबाबतच्या अनादर आणि उल्लंघन यांनी दुष्कृत्यांत भर टाकली आणि मानवी सद्सदविवेक बुद्धीचा ऱ्हास केला. त्यामुळे सध्याच्या जगात सर्व सामान्य मानव भाषण व श्रद्धा स्वातंत्र्य, भयमुक्तता, मुक्त इच्छा यांच्यासाठीचा उद्घोष या जाहिरनाम्यात करीत आहेत.

जसे आवश्यक आहे त्याप्रमाणे, राष्ट्राराष्ट्रांमध्ये मैत्रीचे संबंध विकसित होण्यास उत्तेजन देणे गरजेचे आहे.

जसे आवश्यक आहे त्याप्रमाणे, संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांनी मानवी हक्कांवरील विश्वास, मानवाची प्रतिष्ठा आणि योग्यता आणि स्त्री व पुरुष यांना समान अधिकार यावरील विश्वासाचा पुनरुच्चार केलेला असून सामाजिक प्रगती व विस्तृत स्वातंत्र्यासह उच्च राहणीमान यांना प्रोत्साहन देण्याचे निश्चित केले आहे.

जसे आवश्यक आहे त्याप्रमाणे, सदस्य राष्ट्रांनी मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये यांचे संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने संपादन करुन त्यांना सार्वत्रिक आदर व त्यांचे काटेकोर पालन करण्यास उत्तेजन देण्याची प्रतिज्ञा केली आहे.

जसे आवश्यक आहे त्याप्रमाणे या प्रतिज्ञेची पूर्तता करण्यासाठी या हक्क व स्वातंत्र्ये यांची जाणीव हे खूप महत्त्वाचे आहे.

आता, संयुक्त राष्ट्रांची महासभा सर्व जनता आणि सर्व राष्ट्रे यांच्यासाठी एक सामान्य संपादणूक पातळी म्हणून 'सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनाम्याचा' (UDHR) उद्घोष करीत आहेत. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने ह्या जाहिरनाम्याच्या संदर्भात अध्यापन व शिक्षण याद्वारे या हक्कांबद्दल व स्वातंत्र्यांबद्दल आदर आणि प्रगतीशील उपायांद्वारे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना सार्वत्रिक व परिणामकारक मान्यता मिळवणे व त्यांचे अनुपालन करणे यासाठी सदस्य राष्ट्रांतील जनता आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील जनता यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे.

याबरोबर प्रास्ताविकाचा भाग संपविण्यात आला.

१३.३.४.२ सार्वत्रिक मानवी हक्काच्या जाहिरनाम्यातील कलमे :

कलम क्र. १ : प्रतिष्ठा व हक्क यांबाबत सर्व मानव हे जन्मापासूनच मुक्त आणि समान आहेत. तसेच त्यांना तर्कशक्ती व सद्सद्विवेक बुद्धी असून एकमेकांशी त्यांनी बंधुतेच्या भावनेने वागणे गरजेचे आहे.

कलम क्र. २ : कोणताही धर्म, वर्ण, लिंग, भाषा, पंथ, राजकीय किंवा इतर संदर्भ, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ, संपत्ती, जन्म किंवा इतर दर्जा या बाबतीत कुठलाही भेदभाव न बाळगता या जाहिरनाम्यात तरतूद केल्याप्रमाणे प्रत्येक मानवाला हक्क व स्वातंत्र्ये मिळालीच पाहिजेत. कोणीही व्यक्ती ह्या किंवा त्या देशाचा किंवा प्रदेशाचा, राजकीय, कार्यक्षेत्रीय किंवा आंतरराष्ट्रीय दर्जा मोठा आहे या आधारावर कोणताही दुजाभाव दाखवता येणार नाही. तसेच तो देश स्वतंत्र आहे, विश्वस्त आहे, स्वराज्य संस्था नसतील किंवा कोणत्याही सार्वभौम मर्यादा असतील तरीही त्यांच्यासोबत भेदभाव केला जाणार नाही.

कलम क्र. ३ : प्रत्येक मानवास आपल्या जिविताचा, स्वातंत्र्याचा आणि सुरक्षेचा अधिकार आहे.

कलम क्र. ४ : कोणालाही गुलाम म्हणून वागवता येणार नाही आणि सर्व प्रकारच्या गुलामीच्या व्यापारावर बंदी घातलेली आहे.

कलम क्र. ५ : कोणाचाही छळ केला जाणार नाही किंवा कोणालाही दुष्ट, अमानवी किंवा अपमान कारक वागणूक दिली जाणार नाही किंवा शिक्षा केली जाणार नाही.

कलम क्र. ६ : प्रत्येकाला, प्रत्येक ठिकाणी आपली एक व्यक्ति म्हणून ओळख मिळण्यास कायदेशीर अधिकार आहे.

कलम क्र. ७ : सर्वजण कायद्यासमोर समान आहेत आणि कोणत्याही भेदभावाशिवाय कायद्याने समान संरक्षण मिळण्यास पात्र आहेत.

कलम क्र. ८ : प्रत्येकाला संविधानाने किंवा कायद्याने मंजूर केलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाल्यास सक्षम राष्ट्रीय लवादासमोर आपले गाऱ्हाणे मांडून न्याय मिळविण्याचा अधिकार आहे.

कलम क्र. ९ : कोणालाही गुन्हा नसताना एकतर्फी अटक, ताब्यात घेणे किंवा हद्दपार करणे गैर आहे.

कलम क्र. १० : कोणालाही आपल्याविरुद्धचा आरोप किंवा खोटा आरोप सिद्ध करण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष लवादासमोर जाण्याचा अधिकार आहे.

कलम क्र. ११ : १) कोणालाही दंडात्मक गुन्हा सिद्ध होईपर्यंत अपराधी न मानता त्याची बाजू मांडण्याची मग ती जनतेसमोर किंवा लवादासमोर असेल, सर्व प्रकारची हमी व संधी मिळणे हा त्याचा हक्क आहे.

२) कोणत्याही राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये समावेश नसलेल्या गुन्ह्यबाबत कोणालाही त्यावेळी त्याने केलेल्या गुन्ह्यासाठी अपराधी किंवा दंडात्मक कारवाईसाठी पात्र मानता येणार नाही. तसेच तरतूद असल्यापेक्षाही अधिक दंडात्मक कारवाई करता येणार नाही किंवा तरतूदी पेक्षा अधिक दंड ठोठावता येणार नाही.

कलम क्र. १२ : कोणाच्याही खाजगी बाब, कौटुंबिक जीवन, गृह किंवा खाजगी देवाणघेवाण यांमध्ये कोणीही एकतर्फी हस्तक्षेप करणार नाही. तसेच त्याच्या मान व प्रतिष्ठा यावर हल्ला करणार नाही. त्यामुळे या हस्तक्षेप किंवा हल्ल्या विरोधात कायदेशीर दाद मागण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.

कलम क्र. १३ : १) प्रत्येकाला आपल्या राज्याच्या (Nation) सरहद्दीमध्ये मुक्त संचार व रहिवासाचा अधिकार आहे.

२) प्रत्येकाला स्वतःच्या देशासह कोणताही देश सोडून इतरत्र जाण्याची मुभा आहे व केव्हाही परतण्याचा हक्क आहे.

कलम क्र. १४ : १) कोणत्याही व्यक्तिला छळ होत असेल तर कोणत्याही देशात आश्रय घेऊन तेथील जीवन उपभोगण्याचा अधिकार आहे.

२) ह्या हक्कांचा वापर संयुक्त राष्ट्रांच्या तत्वे व उद्देश यांच्या विरोधात किंवा अराजकीय गुन्ह्याबाबत खटला चालू असल्यास करता येणार नाही.

कलम क्र. १५ : १) प्रत्येकाला राष्ट्रीयत्वाचा हक्क आहे.

२) कोणालाही राष्ट्रीयत्वाचा हक्कापासून वंचित ठेवता येणार नाही. तसेच आपले राष्ट्रीयत्व बदलण्यास नकार देता येणार नाही.

कलम क्र. १६ : १) कोणत्याही प्रौढ स्त्री किंवा पुरुषाला कोणत्याही वंश, राष्ट्रीयत्व किंवा धर्म यांच्या भेदभावाशिवाय विवाह करण्याचा व आपले कुटुंब स्थापन करण्याचा

हक्क आहे. त्यांना आपल्या विवाहासमयी, विवाहकालीन आणि विभक्त झाल्यानंतर सुद्धा समान हक्क राहील.

२) विवाहेच्छुक जोडप्यांची मुक्त व पूर्ण संमती असल्यासच ते दोघे विवाहबद्ध होऊ शकतात.

३) कुटुंब हा समाजाचा नैसर्गिक आणि मूलभूत घटक आहे आणि राज्य व समाजाकडून संरक्षण मिळणे क्रमप्राप्त आहे.

कलम क्र. १७ : १) प्रत्येकास व्यक्तिगत संपत्ती बाळगण्याचा व इतरांशी सहकार्य करुन गटाने संपत्ती बाळगण्याचा अधिकार आहे.

२) कोणालाही एकतर्फी आपल्या संपत्ती बाबत वंचित ठेवता येणार नाही.

कलम क्र. १८ : प्रत्येकाला विचार, विवेक व धर्म यांचे स्वातंत्र्याचा हक्क आहे. त्यात श्रद्धा व धर्म बदलाचे स्वातंत्र्य आणि व्यक्तिगत किंवा सामुदायिक, खाजगी अथवा सार्वजनिक किंवा आपला धर्म, किंवा श्रद्धा यांचे अध्यापन, आचरण, प्रार्थना किंवा अनुपालन याद्वारे व्यक्त करता येण्याचा हक्क आहे.

कलम क्र. १९ : प्रत्येकाला आपले मत व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्यांचा हक्क असून त्यात हस्तक्षेपाशिवाय ते मत बाळगण्याचा आणि माहिती व कल्पना ह्या कोणत्याही भौगोलिक सिमा न बाळगता प्रसारमाध्यमांद्वारे मिळण्याचा आणि ती इतरांना देण्याचा हक्क आहे.

कलम क्र. २० : १) प्रत्येकाला शांतीपूर्ण रित्या एकत्र जमण्याचा व आपली संघटना स्थापण्याचा हक्क आहे.

२) कोणावरही संघटनेत सामिल होण्याची सक्ती केली जाणार नाही.

कलम क्र. २१ : १) प्रत्येकाला लोकप्रतिनिधीत्वाद्वारे किंवा प्रत्यक्षपणे आपल्या देशातील सरकारमध्ये सहभागी होण्याचा हक्क आहे.

२) आपल्या देशातील सार्वजनिक सेवा मिळण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

३) लोकांची इच्छा ही प्रत्येक सरकारच्या राज्यसत्तेचा पाया असेल, तसेच त्याची अभिव्यक्ती ही कालबद्धतेनुसार व वास्तविक निवडणुक पद्धतीने सार्वत्रिक व समान मतदान व गुप्त मतदान किंवा तत्सम मतदान पद्धतीने केली जाईल.

कलम क्र. २२ : समाजाचा घटक म्हणून प्रत्येक व्यक्तिला सामाजिक सुरक्षेचा हक्क आहे. तो मिळविण्यासाठी राष्ट्रीय प्रयत्न आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य तसेच राज्याच्या विविध संघटना व स्त्रोत किंवा उद्‌गम यांचा उपभोग त्याला घेता आला पाहिजे. त्याची प्रतिष्ठा आणि व्यक्तिमत्वाचा मुक्त विकास होण्यासाठी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार प्राप्त झाले पाहिजेत.

कलम क्र. २३ : १) प्रत्येकाला काम मिळण्याचा, रोजगार निवडण्याचा, कामाच्या ठिकाणी न्यायपूर्वक व अनुकूल वातावरण मिळण्याचा तसेच बेकारी विरुद्ध संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे.

२) प्रत्येकाला कोणताही भेदभाव न बाळगता समान कामासाठी समान वेतन मिळण्याचा अधिकार आहे.

३) जो कोणी काम करतो त्यास आपण व आपले कुटुंब प्रतिष्ठित जीवन जगू शकेल असे योग्य व अनुकूल वेतन-भत्ते मिळण्याचा हक्क असून गरज पडल्यास सामाजिक संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.

४) प्रत्येकाला आपल्या हितासाठी कोणतीही कामगार संघटना स्थापन करण्याचा अथवा तिचे सदस्यत्व पत्करण्याचा हक्क आहे.

कलम क्र. २४ : प्रत्येकास विश्रांती व मनोरंजनाचा हक्क आहे. त्यासाठी कामाच्या तासांची मर्यादा आणि प्रासंगिक कामातील सुट्या भरपगारी मिळणे हा हक्क आहे.

कलम क्र. २५ : १) प्रत्येकाला आपले व आपल्या कुटुंबाचे आरोग्य योग्य रहावे व राहणीमान समाधानकारक राहावे याचा अधिकार आहे. त्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सुविधा, सामाजिक सेवा, आणि बेरोजगारी, आजार, अपंगत्व, विधवेपणा, वृद्धत्व तसेच आपल्या नियंत्रणा बाहेरची परिस्थिती निर्माण झाल्यास सामाजिक सुरक्षा मिळण्याचा समावेश आहे.

२) मातृत्व व बालपण या अवस्थांमध्ये विशेष काळजी घेणे व साहाय्य मिळणे क्रमप्राप्त आहे. विवाहाद्वारे किंवा विवाहबाह्य संबंधातून जन्माला आलेल्या प्रत्येक बालकाला सारखेच सामाजिक संरक्षण मिळाले पाहिजे.

कलम क्र. २६ : १) प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार आहे. प्राथमिक व मूलभूत अवस्थेतील शिक्षण हे मोफत आणि अनिवार्य असले पाहिजे. प्रत्येकाला आपल्या कुवतीनुसार तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण सामान्यपणे उपलब्ध झाले पाहिजे तर उच्च शिक्षण सहज साध्य झाले पाहिजे.

२) शिक्षणाचा उद्देश मानवी व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास आणि मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्ये याबद्दलचा आदरभाव भक्कम करणे हा असला पाहिजे. शिक्षणाने समझदारी, सहिष्णुता, आणि मैत्री यांना उत्तेजन दिले पाहिजे आणि शांतता प्रस्थापित करुन तिचे दृढीकरण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांना धार्मिक व अधार्मिक तंटे सोडविण्यास मदत केली पाहिजे.

३) मुलांच्या पालकांना कोणतेही शिक्षण निवडण्याचा अधिकार आहे.

कलम क्र. २७ : १) प्रत्येकाला आपल्या धर्माच्या सांस्कृतिक कार्यात सहभागी होण्याचा त्यातील कलेचा आस्वाद घेण्याचा आणि वैज्ञानिक प्रगतीच्या फळांचा लाभ घेण्याचा हक्क आहे.

२) प्रत्येकाला त्याने निर्माण केलेल्या किंवा तो लेखक असलेल्या कोणत्याही वैज्ञानिक, साहित्यिक किंवा कलात्मक योगदानाबाबत नैतिक व भौतिक आस्वाद घेऊन संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.

कलम क्र. २८ : सदर जाहिरनामा ज्याद्वारे मानवाचे हक्क व स्वातंत्र्ये बहाल केलेली आहेत त्याबाबत सामाजिक व आंतरराष्ट्रीय अधिकार मिळाले पाहिजेत.

कलम क्र. २९ : १) ज्या समाजामध्ये आपल्या व्यक्तित्वाचा मुक्त व पूर्ण विकास करणे शक्य आहे त्या समाजाप्रती प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

२) प्रत्येकाला आपले अधिकार व स्वातंत्र्ये यांची अंमलबजावणी करताना काही मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. उदा. कायदा व त्याची प्रक्रीया आपल्याबरोबर इतरांचेही हक्क व स्वातंत्र्ये, त्यासाठी लोकशाही समाजामध्ये नैतिकता, सार्वजनिक व्यवस्था आणि सर्वसामान्यांचे कल्याण यांची जाणीव असणे जरुरीचे आहे.

कलम क्र. ३० : या जाहिरनाम्यातील तरतूदींचा अन्वयार्थ लावताना कोणतेही राष्ट्र, गट अथवा व्यक्ती ही यातील मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्ये नष्ट करण्याच्या कामी उपयोग करणार नाहीत.

१० डिसेंबर हा जगात 'मानवी हक्क दिन' किंवा 'आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन' म्हणून पाळला जातो.

ग्रिनिज बुकामध्ये सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनाम्याची नोंद जगातील 'सर्वात अधिक भाषांमध्ये भाषांतरीत दस्तऐवज' अशी करण्यात आली आहे.

आपली पग्रती तपासा :

१) सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्याचे प्रमुख लेखक कोण ?

२) सार्वत्रिक मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यावर सह्या करणाऱ्या कोणत्याही दहा देशांची नावे लिहा.

३) जागतिक मानवी हक्क दिन केव्हा पाळला जातो ?

१३.४ मानवी हक्कांचा घटक म्हणून भारतीय नागरिकाचे मूलभूत हक्क :

आपण मूलभूत हक्कांचा अभ्यास केल्यास आपणांस त्यांवर सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनाम्याचा प्रभाव असल्याचे आढळते. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागामध्ये कलम १२ ते ३५ च्या दरम्यान मूलभूत हक्कांची तरतूद आहे. या हक्कांवर प्रामुख्याने पुढील मानवी हक्कांच्या सनद किंवा घटनांचा प्रभाव पडलेला दिसतो.

१. बिल ऑफ राईट्स, ब्रिटीश पार्लमेंट, १६८८.
२. अमेरिकन राज्यक्रांती, १७७६.
३. मानवी हक्कांचा जाहिरनामा, फ्रेंच राज्यक्रांती, १७८९ आणि १७९३.

४. अमेरिकन संविधानातील मानवी हक्क जाहिरनामा, १७९१.
५. मोतिलाल नेहरु रिपोर्ट, १९२८ आणि
६. सार्वत्रिक मानवी हक्कांचा जाहिरनामा (UDHR), संयुक्त राष्ट्र, १९४८.

आपल्या भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी (डॉ. बाबासोहब आंबेडकर) आपले संविधान तयार करण्यापूर्वी जगातील अनेक संविधानाचा व त्यातील मानवी हक्कांचा अभ्यास केला म्हणून या मूलभूत अधिकारांवर तथाकथित मानवी हक्क, नैसर्गिक हक्क, जन्मसिद्ध हक्क, नैसर्गिक न्याय यांचा प्रभाव दिसतो.

इ.स. १९५० रोजी संविधान निर्मितीच्या वेळी एकूण सात मूलभूत अधिकार भारतीय नागरिकास बहाल केले होते. उदा.

१. समानतेचा अधिकार
२. स्वातंत्र्याचा अधिकार
३. शोषणाविरुद्धचा अधिकार
४. धर्म स्वातंत्र्याचा अधिकार
५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार
६. संपत्तीचा अधिकार आणि
७. घटनात्मक उपायांचा अधिकार

४४ व्या संविधान दुरुस्ती कायदा, १९७८ अन्वये संपत्तीचा अधिकार वगळण्यात आला व उप-कलमे ठेवण्यात आली. ह्या अधिकारांची मानवी हक्कांच्या संदर्भात चर्चा पुढीलप्रमाणे.

१३.४.१ समानतेचा अधिकार (कलम १४-१८) :

कलम क्र. १४ : राज्य कोणालाही कायद्यासमोर समानता नाकारु शकत नाही आणि प्रत्येक भारतीय व्यक्तिला कायद्यासमोर समान संरक्षण देईल.

कलम क्र. १५ : राज्य धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थळ, निवास या किंवा या व्यतिरिक्त कोणत्याही आधारावर भारतीय नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही.

कलम क्र. १६ : या कलमानुसार प्रत्येकाला सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी मिळेल व धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थळ, निवास या किंवा या व्यतिरिक्त कोणत्याही आधारावर भेदभाव करणार नाही. यातील उपकलम (४) नुसार असे म्हटले आहे की, मागास वर्गासाठी किंवा मागास जातीसाठी राखीव नेमणुका करण्यापासून या कलमातील कोणतीही तरतूद राज्यास रोखू शकणार नाही.

कलम क्र. १७ : या कलमाने अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे तिचे पालन करणे हा दखलपात्र गुन्हा आहे.

कलम क्र. १८ : या कलमाने भारतीय व्यक्तिला कोणत्याही परकीय देशाकडून कोणतेही लाभ, पद अथवा जाचक पद स्विकारता येणार नाही.

१३.४.२ स्वातंत्र्याचा अधिकार (कलम १९-२२) :

कलम क्र. १९ : या कलमाने भारतीय नागरिकास मूलभूत सहा प्रकारची स्वातंत्र्ये बहाल केलेली आहेत. उदा.

१. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य
२. शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य
३. कोणतीही संघटना स्थापन करुन संघटित होण्याचे स्वातंत्र्य
४. भारताच्या कोणत्याही भागात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य
५. भारतीय प्रजासत्ताकाच्या कोणत्याही भौगोलिक प्रदेशात निवास करण्याचे व तेथे स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य आणि
६. भारतीय कोणत्याही प्रदेशात कोणताही व्यवसाय, वाणिज्य व व्यापार करण्याचे स्वातंत्र्य.

आपल्या मूलभूत अधिकारांचा समावेश हा युरोप आणि उत्तर अमेरिकेतील अनेक लोकशाही देशांनी आपल्या नागरिकांना केल्यानुसारच आहे. तरीही भारतीय मूलभूत अधिकार हे निरंकुश नाहीत व त्यावर सांविधानिक नियंत्रण आहे. किंबहुना, कोणतेही राष्ट्र स्वैर अधिकार न देता त्यावर माफक प्रमाणात बंधने घालतेच व ते योग्यही आहे. त्यासाठी राज्याला काही कारणासाठी व काही प्रमाणात हे अधिकार सिमित करता येतात व सामाजिक सौहार्द, अंतर्गत शांतता, राष्ट्रीय सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था प्रस्थापित केली जाते.

कलम क्र. २० : या कलमाने प्रत्येक व्यक्तिला आरोपी व्यक्तीवरील आरोप इतरांना सिद्ध करण्याची किंवा त्यांचे खंडन करण्याची न्याय संधी मिळाली पाहिजे व त्या आरोपासाठी असलेली तरतूद व त्यानुसारच शिक्षा झाली पाहिजे. त्यापेक्षा कमी किंवा जास्त होता कामा नये.

कलम क्र. २१ : कायद्याच्या योग्य पद्धतीशिवाय कोणालाही आपले जीवन जगण्यापासून किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्यापासून वंचित ठेवता येणार नाही.

कलम क्र. २१अ इ.स. २००२ च्या ८० व्या संविधान दुरुस्ती कायद्यान्वये या कलमाचा समावेश करण्यात आला. त्यानुसार वय वर्षे ६-१४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ही राज्याची जबाबदारी आहे.

कलम क्र. २२ : कोणत्याही निरपराध व्यक्तिला अटक करता येणार नाही आणि गुन्हा असल्यास त्याला अटक करण्याचे कारण सांगणे गरजेचे आहे.

१३.४.३ शोषणा विरुद्धचा अधिकार (कलम २३-२४) :

कलम क्र. २३ : कोणत्याही व्यक्तिला वेठबिगार किंवा गुलाम म्हणून जबरदस्तीने राबविता येणार नाही. तसे झाल्यास वेठबिगार राबविणाऱ्या व्यक्तिस दखलपात्र गुन्ह्याखाली शिक्षा करता येते.

कलम क्र. २४ : या कलमाने कोणत्याही १४ वर्षाखालील बालकास बालमजूर म्हणून कारखाना, खाण किंवा इतर घातक ठिकाणी काम करण्यास लावणे गुन्हा आहे व तसे करण्यास भाग पाडल्यास मनाई करण्यात आली आहे.

१३.४.४ धर्म स्वातंत्र्याचा अधिकार (कलम २५-२८) :

कलम क्र. २५ : याद्वारे प्रत्येकाला सद्सद्विवेकबुद्धी स्वातंत्र्य दिले आहे आणि प्रत्येकास आपल्या धर्माचे आचरण करणे व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

कलम क्र. २६ : धार्मिक संघटन करण्याचे व धार्मिक संस्था स्थापण्याचे स्वातंत्र्य.

कलम क्र. २७ : कोणाही व्यक्तिला आपला धर्म सोडण्याची व दुसरा धर्म स्विकारण्याची सक्ती केली जाणार नाही आणि धर्म, जात, पंथ या आधारावर कोणताही दंड किंवा धार्मिक कर वसूल करता येणार नाही.

कलम क्र. २८ : सरकारी निधीवर चालत असलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये कोणत्याही प्रकारचे धार्मिक शिक्षण देता येणार नाही.

१३.४.५ सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९-३०) :

कलम क्र. २९ : प्रत्येक व्यक्तिला आपली भाषा, लिपी, साहित्य आणि संस्कृती यांचा प्रचार व संवर्धन करण्याचा हक्क आहे. सर्व धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकाना आपल्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे व त्यांचे प्रशासन देखभाल व व्यवस्थापन करण्याचे आणि सरकारी अनुदान मिळण्याचे हक्क आहेत. कोणत्याही नागरिकाला धर्म, वंश, जात, भाषा यांच्या आधारावर सरकारी अनुदान मिळणाऱ्या संस्थामध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

कलम क्र. ३० : याद्वारे राज्याचे धर्मनिरपेक्ष स्वरुप स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच याद्वारे अल्पसंख्याकांना आपले स्वारस्य व संस्कृती यांचे रक्षण करण्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे.

१३.४.६ संपत्तीचा अधिकार (कलम ३१) :

कलम क्र. ३१ : संपत्तीचा अधिकाराच्या रक्षणासाठी संविधानाने तिहेरी तरतूद केली होती. त्यासाठी खाजगी संपत्तीची हमी देण्यात आली होती. परंतु त्यासोबत संपत्तीचा उपभोग घेऊन तिची विल्हेवाट लावण्याचा हक्क सुद्धा दिला होता.

१. प्रत्येक व्यक्तिला नैतिक मार्गांनी संपत्ती मिळविण्याची हमी देण्यात आली.
२. प्रत्येक व्यक्तिला आपली खाजगी संपत्ती बचत करण्यापासून वंचित ठेवता येणार नाही.
३. यामध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्याला ज्यावेळी आवश्यक वाटेल तेव्हा खाजगी मालमत्ता संपादित करण्याचा किंवा कायद्याने कब्जा करण्याचा अधिकार राहील. तो अधिकार दोन अटींच्या अधीन राहून असेल –

अ) हे संपादन किंवा आवश्यकता सार्वजनिक उद्देशाकरीता असेल आणि
ब) जेव्हा हे संपादन करण्याबाबत किंवा कब्जा करण्याबाबत कायदा पारित केला जाईल त्यावेळी सदर मालमत्ता असलेल्या मालकाला त्याबदल्यात आर्थिक किंवा तत्सम भरपाई दिली पाहिजे.

एवढे असले तरी कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट आणि एकजिनसी समाज निर्मितीचे ध्येय गाठण्यासाठी ४४ व्या संविधान दुरुस्ती कायदा १९७८ अन्वये खाजगी मालमत्तेचा अधिकार नष्ट करण्यात आला आहे.

१३.४.७ घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम ३२-३५) :

कलम क्र. ३२ : भारतीय संविधान भारतीय नागरीकाला मूलभूत हक्क केवळ बहाल करीत नाही तर त्या हक्कांच्या रक्षणासाठी व म्हणूनच त्यांचा मुक्तपणे उपभोग घेता यावा यासाठी उपाययोजना सुद्धा करीत आहे. कायद्याचे राज्य प्रस्थापित करताना जर या मूलभूत हक्कांचा कायद्यानेच भंग झाला तर सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये आलेल्या याचिकांद्वारे या मूलभूत अधिकारांचे पुनर्वसन करण्याचे आदेश देतात. नागरीकाला आपल्या मूलभूत अधिकारांचे पुनर्वसन होण्यासाठी पुढील प्रकारच्या याचिका न्यायालयात सादर करता येतात.

१) **हेबिअस कॉर्पस् :** न्यायालये कायद्याच्या रक्षकांना एखाद्या व्यक्तिला बेकायदा ताब्यात घेतल्यास तिला न्यायालयात सादर करण्याचे आदेश देते त्याला हेबिअस कॉपर्स म्हणतात.

२) **मॅन्डॅमस :** याद्वारे वरिष्ठ न्यायालय, कनिष्ठ न्यायालय किंवा शासकीय अधिकारी यांना आपले कर्तव्य नियमानुसार बजावण्याचा आदेश देते.

३) **प्रोहिबिशन :** नैसर्गिक न्यायाच्या उलट किंवा आपल्या समोर असलेल्या खटल्यांच्या बाबत जर कनिष्ठ न्यायालय आपल्या कार्यक्षेत्राबाहेर जावून काही निर्णय देत असेल किंवा खटले चालवित असेल तर वरिष्ठ न्यायालय ते थांबविण्याचे आदेश काढते.

४) **सर्टिओरारी :** या प्रकारच्या याचिकेमध्ये वरिष्ठ न्यायालय पुनर्विलोकनासाठी खालच्या न्यायालयास, लवादास किंवा सरकारी अधिकाऱ्यास समोर आलेल्या खटल्याबाबतचे सर्व दस्तऐवज न्यायिक पुनर्विलोकनासाठी पाठविण्याचे आदेश देते.

५) **को-वॉरंटो :** ही एक विशेष हक्क भंग याचिका असून याद्वारे वरिष्ठ न्यायालय कार्यवाही करण्याऱ्या अधिकाऱ्याला त्यांच्या अधिकाराबाबत कायदेशीर विचारणा करते.

आपली पग्रती तपासा :

१) भारतीय मूलभूत हक्कांवर कोणत्या घटकांचा प्रभाव आहे ?
२) भारतीय नागरीकास कोणती स्वातंत्र्ये बहाल केली आहेत ?
३) हेबिअस कॉर्पस् म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

१३.५ सारांश

वरील मानवी हक्कांच्या चर्चेमध्ये आपण मानवी हक्कांची संकल्पना, अर्थ व त्यांचे नैसर्गिक न्यायाचे स्वरुप पाहिले. हे हक्क आजमितीला जगातील सर्वच देशांमध्ये तेथील जनतेला बहाल केले आहेत. परंतु त्या व्यतिरिक्त इंग्लंडमधील मानवी हक्क सनद (१६८८), अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहिरनामा (१७७६), फ्रेंच मानवी हक्क जाहिरनामा (१७८९) यांचा समावेश महत्त्वाचा आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनामा (१९४८) म्हणजेच Universal Declaration of Human Rights हा जगातील सर्व मानव प्राण्यांसाठी त्यांच्या हक्क रक्षणासाठी केलेली तरतूद आहे. सध्या जगातील २०० पेक्षा जास्त देश संयुक्त राष्ट्रांचे (UN) सदस्य असून त्यांना या जाहिरनाम्यातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे. भारतीय संविधानाने मूलभूत हक्कांचा समावेश करुन मानवी हक्क संकल्पना प्रत्यक्षात राबविली आहे. परंतु या अधिकारांवर कायदेशीर नियंत्रण आहे व ते असणे आवश्यक सुद्धा आहे. अन्यथा मूलभूत हक्क, नैसर्गिक हक्क, मानवी हक्क यांच्या आड स्वैराचार माजण्याची शक्यता आहे.

१३.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१. मानवी हक्क संकल्पना स्पष्ट करा.
२. सार्वत्रिक मानवी हक्क जाहिरनामा, १९४८ याचे महत्त्वावर चर्चा करा.
३. 'भारतीय संविधानातील मूलभूत हक्क हे मानवी हक्कांचा एक भाग आहेत' यावर भाष्य करा.
४. थोडक्यात टीपा लिहा.
   अ) राजकीय लोकशाहीचे चार स्तंभ
   ब) मानवी हक्कांचे तत्त्वज्ञान
   क) स्वातंत्र्याचा अधिकार
   ड) घटनात्मक उपायांचा अधिकार

वाचक संदर्भ यादी :

१. विकीपिडीया ज्ञानकोश (www.wikipedia)
२. गायकवाड के. एस. Social Awareness and Personality Development, IDOL, 2009
३. रावत बी. एस. Indian Political System, Chetana Prakashan, Mumbai, 1988
४. क्षीरसागर आर. के., Politial Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar, Intellecctual Publishing House, New Delhi, 1992.
५. गायकवाड प्रदीप, भारताचे संविधान, शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समता प्रकाशन, नागपूर, २००४

❖❖❖❖

१४

परिस्थितिकीय शास्त्र (Ecology)

पाठाची रचना :

१४.० उद्दिष्ट्ये
१४.१ प्रास्ताविक
१४.२ पर्यावरण
१४.३ परिस्थितिकीय शास्त्र
१४.३.१ परिसंस्थेचे संरचना
१४.३.२ परिसंस्थेचे कार्य
१४.३.३ परिसंस्थेचे प्रकार
१४.४ जैविक विविधता
१४.४.१ जैविक विविधता म्हणजे काय ?
१४.४.२ जैव विविधतेचे महत्त्व
१४.४.३ मानवाच्या अस्तित्वासाठी जैव विविधतेचे महत्त्व
१४.४.४ जैव विविधतेचे संवर्धन व उपाय
१४.५ सारांश
१४.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१४.० उद्दिष्ट्ये

- परिस्थितिकीय किंवा परिसंस्था म्हणजे काय ? याचा अभ्यास करता येईल.
- जैविक घटकांची माहिती स्पष्ट करता येईल.
- जैव विविधते बद्दल सविस्तर माहिती घेता येईल. उदा. महत्त्व, संवर्धन, ऱ्हास इत्यादी.

१४.१ प्रास्ताविक

पर्यावरण शास्त्राच्या अभ्यासात परिस्थितीकी विधानाला महत्त्वाचे स्थान आहे. परिस्थितीकी हे सर्व सजीवांचे आपापसातील संबंध आणि सजीव व त्यांचे पर्यावरण यांचे परस्परसंबंध यांचा शोध घेणारे विज्ञान आहे. सजिवांच्या परस्पर संबंधावर सर्व सृष्टीक्रम अवलंबून आहे.

झिम्मरमॅनच्या मते – "साधनसंपत्ती या शब्दाचा अर्थ एखादी वस्तू किंवा एखादा पदार्थ नव्हे तर असे कार्य किंवा क्रिया की जे पदार्थांमुळे किंवा वस्तुमुळे घडत असते. वस्तुमुळे घडणारे कार्य किंवा क्रियेतून मानवी गरजांचे समाधानकारक पूर्तता करणे हे अंतिम ध्येय असते."

आपल्या भोवताली पसरलेल्या सृष्टीच्या अफाट पसाऱ्यात दोन घटक प्रामुख्याने आढळतात. जैविक घटक आणि अजैविक घटक. जीवसृष्टीच्या व्यवहारात या दोन प्रमुख घटकांचा जो परिणाम होतो त्याला पर्यावरण असे म्हणतात.

पर्यावरणाची ही संकल्पना समजण्याकरिता आपण नदीच्या प्रवाहातील माशाचे जीवन निरखून पाहू शकतो. नदीचा प्रवाह हे पर्यावरण. या पर्यावरणातील जैविक, अजैविक घटक कोणते ? ज्या प्रवाहात तो राहतो, त्या प्रवाहातील पाण्याचे तपमान हा महत्त्वाचा अजैविक घटक, ते तपमान नदीकाठी असणारी वृक्षराजी नियंत्रित करतात. सकाळ, संध्याकाळ सूर्यप्रकाश अडविला जाऊन पाणी कमी तापते. वृक्षराजी हा तसा जैविक घटक आहे. तसाच पाण्यातील अनेक प्रकारच्या लहान लहान प्राण्यावर मासा आपली उपजिविका करतो हे सुद्धा जैविक आहेत. प्रवाहाच्या तळाशी असलेले दगड माती, पाण्यात विरघळलेला प्राणवायु ही अजैविक घटकांची उदाहरणे आहेत. अशा प्रकारे सजीवांच्या भोवतालचे पर्यावरणाचे स्वरूप खूपच गुंतागुंतीचे असून त्यातील वेगवेगळ्या घटकांचे परस्परसंबंध प्रस्थापित झालेले असतात.

यावरून परिस्थितीशास्त्र या जीवशास्त्राच्या शाखेमध्ये सजीवांच्या अधिवासाचा, त्यांच्या राहणीचा अभ्यास तर केला जातोच, पण त्याचबरोबर अधिवासाचा, त्यांच्या आपापसातातील व पर्यावरणातील पारस्पारिक संबंधाचाही अभ्यास केला जातो.

१४.२ पर्यावरण

स्वरूप व व्याप्ती : पर्यावरणातील काही घटक मानवाला अनुकूल असतात तर काही प्रतिकूल असतात. अनुकूल घटकांच्यामुळे मानवाच्या प्रगतीस चालना मिळते तर प्रतिकूल घटकांमुळे मानवी जीवनाचा विकास खुंटतो. त्यासाठी पर्यावरणाचे पूर्णपणे आकलन करून घेणे महत्त्वाचे ठरते. प्रतिकूल घटक किंवा अडचणी काही नैसर्गिक असतात तर मानवानिर्मित असतात. अशा अडचणी किंवा संकटांना मानवाला सामोरे जावे लागते. वीज पडणे, भूकंप, ज्वालामुखी, महापूर येणे व वादळे येणे ही पर्यावरणातील नैसर्गिक संकटे आहेत. हवेचे व पाण्याचे प्रदूषण, किटकनाशके, जंतुनाशके, भूमीच्या गैरनियोजनाचे दुष्परिणाम ही मानव निर्मित संकटे आहेत. अशा अनेक प्रकारच्या घटकांचे आकलन करून मूल्यमापन करणे महत्त्वाचे आहे. साधन संपत्तीचा आढावा घेऊन संपुष्टात येणाऱ्या साधन संपत्तीसाठी पर्याय शोधणेही आवश्यक आहे. पर्यावरणापासून जास्त उत्पादन हवे असल्यास त्याचे परिक्षण करण्याची गरज आहे.

पर्यावरणात विविधता असते. या विविध घटकांचा मानवी जीवनावर परिणाम होत असतो. तसेच मानवाच्या प्रगत तंत्रज्ञानाचा व विज्ञानाचा पर्यावरणात प्रभाव पडत असतो. विविध पर्यावरणातील वनस्पती व प्राणीजीवन यातील जैविक घटकात फरक असतो. भूरचना, समुद्रसपाटीपासून उंची, भू-उठाव, मृदा व हवामान इत्यादींचा वेगळा विचलन गट आहे. या गटातील घटकात स्थलकाळानुसार फरक पडत असतो. ही स्वाभाविक विचलितता असते.

अशा सर्वसामान्य विचलीत घटकांची कारणमिमांसा करणे अगत्याचे असते. उदा. वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळे हवामान असल्याचे आढळते. तसेच वर्षातील विविध काळातसुद्धा हवामानात फरक पडत असल्याचे जाणवते. अशा प्रकारचा अभ्यास करून स्थळानुसार पर्यावरणातील घटकात बदल का होतात याच्या कारणांची पद्धतशीर मांडणी केल्यास पर्यावरण अभ्यासास वैज्ञानिक दृष्टी विकसित होऊ शकते. पर्यावरणातील घटक हे परिवर्तनीय आहेत. हा परिवर्तनाचा दृकचमत्कार निरीक्षणाद्वारे तुलनात्मकरीत्या समजावून घेतला पाहिजे.

स्थळानुसार हवामान बदलते. हवामानानुसार वनस्पती. वनस्पतीवर प्राणी जीवन अवलंबून असते. वनस्पती व प्राणी जीवनावर मानवी जीवन अवलंबून असते. पर्यावरणातील परिवर्तन दृकचमत्कार पर्यावरणातील अनेक घटकांवर अध्यारापीत झालेला असतो. अशा घटकांवर अध्यारापीत झालेला असतो. अशा घटकांचे परस्पर अध्यारोपणाच्या संकल्पनेचे मार्गदर्शन अभ्यासकाला झाल्यास त्यांना स्वाभाविकपणे वैज्ञानिक प्रक्रियांचे आकलन होईल, व विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी जीवनाच्या उन्नतीसाठी केला जात आहे. त्याचमुळे पर्यावरणात परिवर्तन अधिक प्रमाणात घडून येतआहेत. कारखाने, वाहतुकीची साधने इत्यादींमुळे हवा, पाणी व अन्न दूषित होत आहे. धरणे, कालवे, अणूचाचण्या, जंतुनाशके, किटकनाशके यांचा वापर इत्यादींमुळे अनके सामाजिक, आर्थिक, मानसिक समस्या निर्माण झाल्या आहेत. पर्यावरण परिवर्तनाचे संपूर्ण आकलन झाल्यास असमान समाजसंस्था, आर्थिक विषमता, प्रादेशिक असमतोलता इत्यादीबाबतची वास्तवता प्रगट करणे सोईचे जाईल.

साधन संपदांचे मुख्य दोन प्रकार पुढीलप्रमाणे :

१) अपूनर्नवीकरण संपदा : जी साधन संपत्ती एकदा वापरल्यानंतर कायमची नष्ट होते किंवा ज्या संपदाचे पुनर्निवीकरण करणे कठीण असते त्यांना अपुनर्नवीकरण संपदा म्हणतात. दगडी कोळसा, लोह, तांबे, खनिज तेल या संपदा पुर्नचक्रीकरणास अयोग्य ठरतात.

२) पुनर्नवीकरणीय संपदा : ज्या संपदांचे पुर्नवीकरण नैसर्गिक चक्राद्वारे किंवा मानवाद्वारे अल्प काळात होऊ शकते त्याला पुनर्नवीकरणीय संपदा असे म्हणतात. उदा. जलचक्राच्या माध्यमातून पाण्याची निर्मिती किंवा वनस्पतीच्या पुर्नलागवडीतून वनस्पतींची निर्मिती किंवा कार्बनचक्रातून प्राण वायूची निर्मिती होत असते. अर्थात अशी नैसर्गिक चक्रे निसर्गात नित्य आणि जलद गतीने सुरू असतात.

प्रत्यक्षात आज मात्र मानव आपल्या फायद्यासाठी पुर्नवीकरणीय साधन संपत्तीचा जलद गतीने नाश करत आहे. जंगलाची तोड होत असतानाच वृक्षाची लागवड केल्यास जंगल संपत्ती ही पुननिर्मित संपत्ती होऊ शकेल. आज जगाच्या बहुतेक भागात झाडांची पुन्हा लागवड न करताच जंगलतोड होत आहे. भूमिवर पाण्याच साठा, सुपीक मृदा व सजीव ही पुनर्निमित साधन संपत्तीची उदाहरणे आहेत.

आपली प्रगती तपासा.

१) पर्यावरणाची स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१४.३ परिस्थितिकीय शास्त्र

परिस्थितीतील जे घटक सजीव सृष्टीच्या हितावर नियंत्रण ठेवून प्रसाराचे, निर्मितीचे व उत्क्रांतीचे नियमन करतात. अशा घटकांचा अभ्यास म्हणजे 'परिस्थितीकी विज्ञान' होय.

या विज्ञानात पृथ्वीवरील सर्व सजीव, सुक्ष्म जीव व पर्यावरण यांच्या आंतरक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. जगातील सर्व परिसंस्थांचा अभ्यास परिस्थितीकीमध्ये केला जातो. पृथ्वीचा विशाल भाग हा जीवसंहीतेने व्यापलेला आहे, परंतु प्रत्येक जीवसंहिता ही लहान-लहान गटामध्ये विभागलेली आहे आणि या उपक्षेत्रास 'परिस्थितीकी व्यवस्था' किंवा 'परिसंस्था' असे म्हणतात.

परिस्थितीकीमध्ये अभ्यासाठी पर्यावरणाचा मर्यादित प्रवेश अपेक्षीत असतो. उदा. एखाद्या तलावातील प्राणीजीवन, छोट्या वनराईतील पक्षी जीवन इ. परिस्थितीकीमध्ये सर्वप्रकारचे सजीव व नैसर्गिक पर्यावरणाचे घटक यांचा संबंध यांचा अभ्यास केला जातो. थोडक्यात जीव, जीव समुह व त्यांचे वस्तीस्थान यांचा अभ्यास हा परिस्थितीकीचा मुख्य गाभा आहे. परिस्थितीकीमध्ये सजीवांच्या जीवनचक्राचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जातो. परिस्थितीकेच्या स्पेनमध्ये, विकासामध्ये जैव विविधतेचा प्रभाव जास्त प्रमाणात आढळतो. कारण विविध जैवघटकांचा परिस्थितीकेवर परिणाम होत असतो. परिस्थितीकेमध्ये एखाद्या घटकामध्ये जरी विकृती निर्माण झाली किंवा असंतुलन निर्माण झाले तर परिस्थितीचे अस्तित्व धोक्यात येते.

परिस्थितीकिय रचना अधिक गुंतागुंतीचीव क्लिष्ट असते त्यात जैव घटकांचे अस्तीत्व मोलाचे असते. परिस्थितीकी गरजानुसार नेहमीच मुळ निसर्गातील बिघडणारा समतोल हा सजीवांतील समायोजन क्षमतेमुळे पुन्हा पूर्ववत केला जातो. पुन्हा संतुलन राखले जाते. परिस्थितीकी शाखानुसार मृदेची सुपीकता वनस्पतीची वाढ, परागवहन, परागसिंचन व फळधारणा, पुननिर्मिती, टाकाऊ कुजलेल्या पदार्थाचे विघटन, हवामानाची तिव्रता कमी करणे, हवा व पाणी शुद्ध राखणे इ. कार्ये परीसंस्थेत केली जातात. परिसंस्था हे एक संकिर्ण जाळे आहे. त्यात सजीव व पर्यावरण व त्यांच्यातील आंतरक्रियातील समावेश होतो. 'परिसंस्था' विषयी विविध शास्त्रज्ञांनी आपापली मते व व्याख्या स्पष्ट केली आहेत. त्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) डॅनियन चिरास : जैविक, प्राकृतिक व रासायनिक घटक यातील परस्परावलंत्व व गतीशीलता यांचे तंत्र म्हणजे परिसंस्था होय.

२) वनस्पती प्राणी व प्राकृतिक घटक तसेच त्यांच्या आंतरक्रिया यांचा समावेश असलेल्या व्यवस्थेस परिस्थितीकीय व्यवस्था किंवा परिसंस्था असे म्हणतात.

३) परिसंस्था म्हणजे पृथ्वीवरील विविध वर्गीय जीवांच्या परस्पर आंतरक्रिया व त्यांचे पर्यावरण होय.

४) जीव समुह व त्यांचे पर्यावरण यालाच परिसंस्था असे म्हणता येईल.

आपली प्रगती तपासा.

१) परिसंस्था म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

१४.३.१ परिसंस्थेचे संरचना :

परिसंस्तेतील निरनिराळे घटक व त्या घटकाचा एकत्रित राहण्यासाठी पात्र ठरण्याच मार्ग म्हणजे परिसंस्थेतील संरचना होय. परिसंस्तेतील विविध घटकांचे दोन मुख्य गट पडतात ते पुढीलप्रमाणे :

१) अजैविक घटक :

२) जैविक घटक :

१) अजैविक घटक : अजैविक घटकाचे दोन उपगट पडतात. ते म्हणजे १) प्राकृतिक घटक व २) रासायनिक घटक होय.

प्राकृतिक घटकामध्ये पर्जन्य, तापमान, सुर्यप्रकाश, आर्द्रता, मृदाप्रकार, भुपृष्ठरचना इ. चा समावेश होतो. तर, रासायनिक घटकांमध्ये ऑक्सिजन, नायट्रोजन, हायड्रोजन, कार्बन-डाय-ऑक्साईड, मॅग्नेशिअम, फॉस्फरस इ. चा समावेश होतो.

पर्यावरणातील प्राकृतिक व रासायनिक घटकांच्या मांडणीस अजैविक संरचना असे म्हणतात. परिसंस्थेत अजैविक किंवा निर्जीव घटक व पोषक पदार्थ क्रमाने फिरत असतात आणि त्याचबरोबर ऊर्जेचा प्रवाह देखील सुरू असतो. त्यात सजीवांचाही अंतर्भाव होतो. पोषणचक्र व उर्जाप्रवाह, साध्य होण्यासाठी परिसंस्थेत अनेक संरचनात्मक परस्परसंबंध आवश्यक असतात.

अ) हवामान : अजैविक घटकात तापमान व पर्जन्य हे प्रमुख घटक आहेत. जगात हवामान सर्वत्र सारखे नाही. पर्जन्य व तापमान या घटकांच्या वितरणात व प्रमाणात खूपच विविधता आढळते. पृथ्वीवर वार्षिक सरासरी ० ते २५० सें.मी. दरम्यान पाऊस पडतो. काही भागात अतिवृष्टी तर काही भागात अवर्षण असते. जगात सरासरी वार्षिक तापमानदेखील ० टक्के से. ते ३८ टक्के सें. आढळते. काही अतिउष्ण तर काही थंड प्रवेश आढळतात. तापमान व पर्जन यांचा एकत्र परिणामही भिन्न-भिन्न प्रदेशात भिन्न-भिन्न आहे. हवामानाच्या भिन्नतेमुळे जगात निरनिराळी जीवसंहती वाढलेली दिसून येते. पाणी या घटकामुळे वने, गवताळ प्रदेश व वाळवंटे अशी वेगवेगळी जीवसंहतीनिर्माण झाली आहे. वृक्षाची वाढ होण्यासाठी सुमारे १०० सें.मी. वार्षिक पर्जन्य असणे अहत्त्वाचे आहे. २५ सें.मी. पर्जन्य असल्यास गवत वाढू शकते. तर वाळवंटी प्रदेशात ५ ते १० सें.मी. वार्षिक पर्जन्य असणे महत्त्वाचे आहे. २५ सें.मी. पर्जन्य असल्यास गवत वाढू शकते. तर वाळवंटी प्रदेशात ५ ते १० सें.मी. पर्जन्य असल्यास तेथे काटेरी वन वाढतात.

एखाद्या प्रदेशातील सर्वसाधारण हवामान स्थितीपेक्षा स्थानिक पातळीवर तापमान व आर्द्रता यांचे गुणधर्म काहीसे वेगळे असतील तर त्या हवामान स्थितीस 'सुक्ष्म हवामान' असे म्हणतात. सुक्ष्म हवामानामुळे विशाल जीवसंहतीत विविधता निर्माण झालेली आढळते. उदा. महाबळेश्वर, माथेरान, भिमाशंकर, आंबोली या भागात सदाहरीत वने तर कोकणात निमसदा हरीत वने आढतात.

ब) मृदा : ज्याचा वनस्पतीस आधार मिळतो, ज्यामुळे वनस्पतींचे पोषण होते व त्या वाढू शकतात. अशा भूकवचाचा झीजलेला थर म्हणजे 'मृदा' होय. मृदेत मूळ खडक, खनिजे, जैविक संयुगे, हवा व पाणी यांचे जटिल मिश्रण असते. वनस्पतींना पोषक द्रव्ये मृदेतून मिळत असतात तर वनस्पतीतील खनिज द्रव्ये मृदेत मिसळत असतात. पृथ्वीवरील निरनिराळ्या जीवसंहतीत निरनिराळ्या मृदा आढळतात. उदा. सूचीपर्णी व पाणझडी वनप्रदेशात तपकिरी मृदा तर उष्ण व आर्द्र हवामानात तांबूस व काळी मृद्रा आढळते.

क) प्राकृतिक अडथळे : प्राकृतिक रचनेस परिसंस्थेच्या संरचनेवर निश्चितपणे परिणाम होतो. प्राकृतिक रचनेच्या परिणामामुळे एका परिसंस्थेतून सजीवांचा प्रसार होऊ शकत नाही. उदा. एखाद्या पर्वतामुळे एका परिसंस्थेचे दोन विभागात विभाजन होते. दोन परिसंस्थांच्या दरम्यान महासागर अथवा वाळवंट असल्यास सजीवांचा प्रसार व स्थलांतर होऊ शकत नाही.

आपली प्रगती तपासा.

१) अजैविक घटक सांगा.

_____

_____

_____

_____

२) जैविक घटक :

प्राणी, वनस्पती व सुक्ष्म जीव हे प्रमुख जैविक घटक आहेत. वनस्पती, पशू व सुक्ष्मजीव हे सजीव समुह ज्या पद्धतीने परिसंस्थेत पात्र ठरलेली आहेत त्या पद्धतीस 'जैविक संरचना' असे म्हणतात. निरनिराळ्या परिसंस्थेत जैविक संरचना समान असते. म्हणजेच सर्व परिसंस्थेत मूलभूत सजीव गट असून त्यांच्यातील आंतरक्रिया समान पद्धतीने होत असतात. सजीवांचे प्रमुख गट म्हणजे उत्पादक, ग्राहक/भक्षम, अपघटक व अपमार्जक हे आहेत.

अ) उत्पादक : परिसंस्थेतील सर्व हिरव्या वनस्पती या उत्पादक आहेत. वनस्पती असेंद्रिय पदार्थापासून सूर्यप्रकाशाद्वारे सेंद्रिय पदार्थ तयार करतात. हे सेंद्रिय पदार्थ वनस्पतीचे अन्न असते. हिरव्या वनस्पती प्रकाश उर्जेचा वापर करून त्याचे कार्बन-डाय–ऑक्साईडमध्ये पाण्याचे शर्करेमध्ये परिवर्तन करतात व ऑक्सिजन वातावरण सोडतात. या प्रक्रियेस प्रकाश संश्लेषण असे म्हणतात. वनस्पती स्वयंपोषी (Autotrops) असतात. या वनस्पतींच्या अन्नावरच परिसंस्थेतील सर्व सजीवांची उपजीवीका होते.

ब) ग्राहक/भक्षक : ज्या सजीवांना ऊर्जा व पोषक द्रव्यांसाठी सेंद्रिय द्रव्यावर अवलंबून रहावे लागते. ते जीव वनस्पतीचे भक्षण /ग्रहण करतात. म्हणून त्यांना 'ग्राहक/भक्षक' म्हणतात. हे जीव परपोशी असतात. ग्राहक / भक्षक या संज्ञेत सुक्ष्म जीवाणूपासून ते महाकाय प्राण्यापर्यंत सर्वांचा समावेश होतो. या प्राण्यांचा अन्नसवयी व जीवनक्रियानुसार पुढील गट पाडले जातात.

१) प्राथमिक ग्राहक : जे प्राणी प्रत्यक्षपणे झाड-पाला, गवत, फळे इ. खाऊन जगतात त्यांना 'प्राथमिक ग्राहक' म्हणतात. उदा. गुरे, मेंढ्या, ससे, उंदिर, हरीण इ.

२) द्वितीयक ग्राहक : शाकाहारी प्राण्यांना खाऊन जगणारे घुबड, साप, वाघ, सिंह, चित्ता इ. हिंस्त्र प्राणी हे 'द्वितीय ग्राहक' आहेत.

३) तृतीयक ग्राहक : प्राण्यांच्या मृत अवशेषावर उपजिवीका चालते. त्यांना 'तृतीय ग्राहक' असे म्हणतात. उदा. कावळा, गिधाड, घार इ.

क) अपघटक व अपमार्जक : कोणत्याही वनस्पती व प्राणी यांच्या मृत अवशेषांवर फार शेवटी ज्यांची उपजिविका चालते. ते शवोंपजीवी सुक्ष्मजीव त्यांच्या शरीराचे अपघटन करतात. म्हणून त्यांना 'अपघटक' असे म्हणतात. उदा. सुक्ष्मजंतू, भुंगेरे, गांडूळे इ. भूमिगत प्राणी वनस्पती व प्राणी यांचे लहान-लहान तुकडे करतात त्यांना अपमार्जक म्हणतात.

आपली प्रगती तपासा.

१) जैविक घटक स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१४.३.२ परिसंस्थेचे कार्य :

अ) अन्नशृंखलां किंवा जाळी : सजीवांच्या अस्तित्वाला आवश्यक असलेली ऊर्जा ही प्रामुख्याने सुर्यापासून मिळते. पृथ्वीवर पोहचणाऱ्या एकूण सूर्यप्रकाशापैकी ३टक्के प्रकाश वनस्पतींवर पडतो व त्याचे प्रकाश संश्लेषण होऊन पुढे त्यापासून अन्न-निर्मिती होते. सूर्य प्रकामुळे वनस्पती वाढतात, त्या वनस्पतींवर शाकाहारी प्राणी जगतात. शाकाहारी प्राण्यांना मासांहारी प्राणी खातात. वनस्पती, शाकाहारी प्राणी व मांसाहारी प्राणी अन्नासाठी एकमेकांवर अवलंबून असतात. परिसंस्थेत प्रत्येक प्राणी व वनस्पती कधी-न-कधी कुणाचे तरी खाद्य ठरते.

सर्व प्राणी अन्नासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या वनस्पतींवर अवलंबून असतात. तृणभक्षक वनस्पतीचे भक्षण करून ऊर्जा मिळवतात व हेच तृणभक्षक इतर मांसभक्षकांचे अन्न बनतात व अशा प्रकारे तणभक्षकांकडे मांसभक्षकांकडे ऊर्जेचे संक्रमण होते. कधी कधी लहान मांसभक्षक मोठ्या मांसभक्षकांचे अन्न होतात व ऊर्जेचे संक्रमण होते. अन्नाचा व त्यातून होणाऱ्या शिस्तबद्ध संक्रमणाला अन्नसाखळी (Food Chain) असे म्हणतात.

एखाद्या अन्नशृंखलेत दोन, तीन किंवा अधिक प्राण्यांचे किंवा वनस्पतींचे गट असू शकतात. वनस्पती किंवा प्राणी यांच्या गटानुसार अन्नशृंखला लघु किंवा दिर्घ म्हणून ओळखली जाते. उदा. गवतावर हत्ती जगतो, गवत व हत्ती ही लघु शृंखला आहे तर पाण्यातील वनस्पती-त्यावर जगणारे सुक्ष्म जीव-सुक्ष्म जीवांना खाणारे मासे-लहान माशांना खाणारे मोठे मासे व मासे खाणारी माणसे ही दिर्घ शृंखला आहे. अन्न शृंखला ही परिसंस्थेतील उर्जाप्रवाह व पोषकद्रव्ये यांचा प्रवाह सुरू ठेवणारी साखळी आहे. पोषक द्रव्यांचे चक्रिकरण करणे हे अन्नशृंखलेचे प्रमुख कार्य आहे. परंतु मानवी हस्तक्षेपामुळे पोषक द्रव्यांचे नैसर्गिक चक्र बिघडत आहे. अन्नसाखळीत प्रत्येक संक्रमणाच्यावेळी काही ऊर्जा वापरली गेल्याने क्षय पावते व म्हणून परिसंस्था कार्यन्वित व चिरस्थायी राहण्यासाठी बाह्य ऊर्जेचा (सौर ऊर्जेचा) करणे आवश्यक असतो.

अन्नजाळी (Food Web): अगदी सरळ व सहज प्रकारे अन्नसाखळीतून होणारा ऊर्जेचा विनिमय बघीतला. परंतु ऊर्जेचे हे संक्रमण साधे व सरळ नसते. आपण पाहिले की तृणभक्षक अन्नसाखळी हिरव्या वनस्पतींपासून सुरू होऊन मांसभक्षक प्राण्यानंतर थांबते. प्रत्यक्षात आपल्या भोवती तृणरक्षक व मांसभक्षक असणाऱ्या अन्नसाखळ्या तुरळकच आढळतात. असे का ? तर त्याचे मुख्य कारण असे की कोणताही भक्षक विविध मार्गाने आपले अन्न मिळवू शकतो. तसेच एक जीव इतर अनेक प्राण्यांचे भक्ष्य असू शकतो. यामुळे संपूर्ण परिसंस्थेत एक प्रकारचे

परस्परसंबंध प्रस्थापित होतात. हे संबंध नुकतेच परस्परावलंबी नसतात तर आंतरभेदकही असतात. म्हणूनच अनेक अन्नसाखळ्यांच्या अनुबंधाने परिसंस्थेत एक अतिशय क्लिष्ट अशी अन्नजाळी प्रस्थापित होते.

कोणत्याही अन्नजाळीत उपलब्ध असलेली ऊर्जा सजीवांना पूर्णत: उपयोगी पडत नाही. ग्रहण केलेल्या ऊर्जेपैकी काही ऊर्जेचे उत्सर्जन होते. काही ऊर्जा परावर्तित होते. काही ऊर्जा शोषली जाते व काही ऊर्जा विविध कार्यासाठी खर्ची पडते. तसेच अन्नसाखळीतही ऊर्जेचे प्रमाण प्राथमिक उत्पादकांकडून (वनस्पती) पुढच्या संक्रमित होताना कमी होत जातात. कारण या संक्रमणातही ऊर्जेचा क्षय होतो.

ब) ऊर्जाप्रवाह : सूर्यापासून मिळालेली प्रकाश ऊर्जा आणि प्राथमिक उत्पादक घेतात व उत्पादकांनी केलेल्या अन्नातून ती ऊर्जा इतर पातळ्यांवरच्या ग्राहकांद्वारे शेवटच्या पातळीपर्यंत जाते. एकूण ऊर्जेचा बहुतेक भाग उत्पादकांच्या व ग्राहकांच्या प्रत्येक पातळीवर खर्च होतो. काही ऊर्जा श्वसनक्रियेत उष्णता रूपाने मोकळी होते व ती पर्यावरणात मिसळते व या पद्धतीने ऊर्जेचा एक प्रवाह चालू असतो. उत्पादकापासून जसजसे वरच्या पातळीतील ग्राहकाकडे ऊर्जेचा उपयुक्त भाग कमी-कमी मिळत जातो. याचा परिणाम म्हणून प्रत्येक पातळीत ग्राहक-पोषक पातळ्यांच्या क्रमात उत्पादनक्षमता पायरी-पायरीने कमी होते.

ऊर्जा संक्रमण व्यवस्थेत जैविक केंद्रिकरण प्रश्न महत्त्वाचा ठरतो. जैविक केंद्रीकरणात प्रदूषके प्रत्येक जैविक स्थिरावर संक्रमित होत असतो. केंद्रीकरण होत असल्यामुळे जस जसे आपण अन्नसाखळीत उच्च स्तरावर पोहचतो तस तसे ही प्रदूषके अधिक केंद्रित होत विषारी होऊ शकतात.

जसजशी ऊर्चा अन्नसाखळी एका स्तरातून दुसऱ्या स्तराकडे संक्रमित होत असते त्याप्रमाण जीवांच्या संख्येत प्रत्येक श्रेणीबरोबर घट होत असते. म्हणजेच प्रत्येक स्तरातील उपभोगता त्याच्या खालच्या स्तरावरील सजीवांच्या मोठ्या प्रमाणावर उपभोग घेतो. कारण प्रत्येक स्तरावर केवळ १० टक्के ऊर्जेचे संक्रमण होत असते.

समजा, अशा परिस्थितीत जर या अन्नसाखळीच्या सुरूवातीस म्हणजेच वनस्पतींच्या स्तरावर एखादा प्रदुषक किंवा विष जर असेल तर ते विष किंवा प्रदुषक प्रत्येक वेळी त्याच्या वरच्या स्तरांमध्ये हळूहळू केंद्रित होऊ लागतो. उदा. डी.डी.टी. (DDT) सारख्या किटक नाशकांच्या बाबतीत अधिक बिकट होतो. याचे मुख्य कारण म्हणजे डी.डी.टी. चरबीमध्ये मिसळू शकते व हे मांस भक्षण केल्याने डी.डी.टी. भक्षकाच्या शरीरात सहज शिरू शकते. डी.डी.टी.मुळे डास मेले परंतु काही प्रमाणात ती अन्नसाखळीत शिरून पक्षांपर्यंत पोहचली. यामुळे पक्षांची अंडी व त्या अंड्याचे कवच सहज फुटू लागल्याने पक्षांच्या प्रजोत्पादनात फरक पडू लागला. ही घटना 'रेचल कार्सन' यांच्या 'सायलेट स्प्रिंग' या पुस्तकातून लोकांसमोर आली व त्यामुळे डी.डी.टी.वर बंदी घालण्यात आली.

१४.३.३ परिसंस्थेचे प्रकार

निसर्गामध्ये विविध प्रकारच्या परिसंस्था दिसून येतात. मात्र यातील काही महत्त्वाच्या परिसंस्था म्हणून पुढील परिसंस्थांचा विचार करता येईल.

१) **जंगल परिसंस्था :** जंगल परिसंस्था याचा अर्थ जंगलातील वृक्ष, मृदा, पाणी यांचा या परिसंस्थेत समावेश होतो. जंगल परिसंस्था जंगलांच्या विविध प्रकारानुसार बदलत जाते.

२) **गवताळ परिसंस्था :** साधारणपणे १० टक्के ते २० टक्के उत्तर व दक्षिण अक्षवृत्ता दरम्यान ही परिसंस्था आढळते. या परिसंस्थेत वृक्षांची संख्या कमी तर गवतांची उंची व क्षेत्र अधिक असते. या परिसंस्थेत रेडा, शेळी, हत्ती, जिराफ, हरीण, कांगारू इत्यादी. तृणभक्षक प्राणी आढळतात.

३) **वाळवंटी परिसंस्था :** ही परिसंस्था निसर्गात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत उभी असते. तापमान व पर्जन्य याबाबतीत अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असली तरी या ठिकाणी विविध प्रकारचे प्राणी आढळतात. उदा. साप, विंचू, घोड,गाढव, उंट, सरडे, पाली, घूशी इ.

४) **जलिय परिसंस्था :** या प्रकारच्या परिसंस्था पृथ्वीवर सर्वात मोठ्या व बहुसंख्येने आहेत. कारण पृथ्वीवरील ७१ टक्के भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. या प्रकारच्या परिसंस्थामध्ये ओढे, नाले, खाड्या, तळे, समुद्र इत्यादींचा समावेश होतो.

१४.४ जैविक विविधता

पृथ्वीतलावावरील विविध जीव मानवाच्या अनेक गरजांचा पुरवठा गेली अनेक शतके करत आहेत. जैविक विविधतेमुळे आज अनेक विध संस्कृतीचा उदय व ऱ्हास झालेला आढळतो. त्या संस्कृतींनी निसर्गाने बहाल केलेल्या विविध संसाधनाचा वापर केलेला आहे. ज्या संस्कृतीनी संसाधनाचा अयोग्य व समर्यादा वापर केलेला आहे. त्या संस्कृती आज नष्ट झालेल्या आहेत.

याच अनुषंगाने जैविक शास्त्राने जैविक विविधतेचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. यातूनच वनस्पती शास्त्र व प्राणी शास्त्राचा उदय झाला. या जैविक माहितीमुळे मानवास उपयुक्त अनेक वनस्पती, औषधे इ. वापर करणे शक्य झाले.

एखाद्या प्रदेशातील जैविक विविधता त्या प्रदेशातील एक अमूल्य नैसर्गिक संसाधन असते. या जैविक विविधतांतूनच जनकांचा संचय झालेला असतो व या संचयातूनच आजची जीवन वनस्पती उदयास आली. म्हणूनच जेवढी अधिक जैविक विविधता तेवढीच अधिक स्थिर परिस्थिती जैविक विविधतेचे रक्षण यामुळे महत्त्वपूर्ण ठरते.

आज अंदाजे पृथ्वीवर १.५ ते २० अब्ज प्राणी व वनस्पतींच्या जाती आहेत. आजच्या निर्वाणीकरणाच्या वेगाने २०५० व्या दशकापर्यंत सुमारे १० दशलक्ष जीवांचा नाश होण्याची शक्यता आहे. उत्तरेतील विकसित समाज, त्यांचा अमर्याद संसाधनांचा वापर दक्षिण राष्ट्रातील बेसुमार वाढणारी लोकसंख्या या व इतर अनेक कारणामुळे जीवजाती नष्ट होत आहेत.

जगातील २० टक्के वनस्पतीच्या जाती केवळ १८ ठिकाणी आढळतात. ही ठिकाणे पर्यावरण व जैविक विविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. जैविक विविधतेने परिपूर्ण देश दक्षिणपूर्व अशियात आहेत.

१४.४.१ जैविक विविधता म्हणजे काय?

जीवावरणातील जैविक विविधतेचा अभ्यास म्हणजेच जैविक वैविधता या अभ्यासात
१) दक्षक विविधता (Genetic Diversity)
२) परिस्थितीकी विविधता (Ecosystem Diversity)
३) जाती विविधता (Species Diversity) यांचा समावेश होतो.

१) दक्षक विविधता (Genetic Diversity)

एखाद्या जैविक घटकातील व्यक्तीला विविधता म्हणजे जैविक विविधता : उदा. प्रत्येक मानव त्यांच्या विविध जातीतील फरक हा घटक अनेक जनूक व त्यांचा संयोगातून उदयास येतो. हा फरक प्रजोत्पनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो कारण हा फरक व वैविधता कुठल्याही प्रकारच्या जनुकीय बदलांसाठी महत्त्वाची ठरते. हा फरक व वैविधता मर्यादित असेल तर एखादी जाती नष्ट होऊ शकते.

२) परिस्थितीकी विविधता (Ecosystem Diversity)

पृथ्वीवर विविध परिस्थितीकी आढळतात. प्रत्येक परिस्थिकीतीत जीव व त्यांच्यातील आंतरसंबंध विकसीत असतात. प्रत्येक परिस्थितीकी ही रचनात्मक व कार्यात्मक दृष्टीने वैशिष्टपूर्ण असते. नैसर्गिक परिस्थितीकीत वन, गवताळ प्रदेश, वाळवंट, किनारपट्टी इत्यादींचा समावेश होतो. परंतु यात महत्त्वाचा मुद्दा असा की, या नैसर्गिक परिस्थितीत मानवाच्या हस्तक्षेप झालेला नसतो. जर या परिस्थितींचा गैरवापर किंवा अमर्याद वापर झाला तर त्याची उत्पादकता ढासळते.

३) जाती विविधता (Species Diversity)

एखाद्या प्रदेशात आढळणाऱ्या प्राणी व वनस्पतींची संख्या म्हणजे जाती वैविधता. ही वैविधता उष्ण कटीबंधीय वनात मोठ्या प्रमाणावर आढळते. तसेच अशी वैविधता पारंपारिक शेती होत असलेल्या प्रदेशातही दिसते. या विरूद्ध व्यवसायिक तत्त्वावर केलेल्या शेतीत बहुतांशी एकच पीक घेतले जाते. अशा वेळी संपूर्ण पीक एका कीटकामुळे नष्ट होऊ शकते, असे पारंपारिक शेतीत होणे सहज शक्य नसते.

आपली प्रगती तपासा.

१) जैविक विविधता म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

१४.४.२ जैविक विविधतेचे महत्त्व

जैविक विविधता हे एका परिपूर्ण, सक्षम सुदृढ पर्यावरणाची लक्षणे आहेत. जेवढी विविधता अधिक तेवढे पर्यावरण सक्षम. त्याचे महत्त्व केवळ पृथ्वीवरील जीवास नव्हे तर मानवासही महत्त्वपूर्ण ठरते. या विविधतेतूनच आजही जीव सृष्टी व पर्यायाने यातूनच मानवास आवश्यक अन्न-पुरवठा होत आहे. मानवाच्या विविध व्यवसायामुळे पर्यावरणास धोका उत्पन्न झालेला आहे. जैविक विविधतेमुळे हा धोका मोठ्या प्रमाणावर टाळणे शक्य आहे. जैविक विविधतेच्या अभ्यासातून शेती व पिके, दुभती जनावरे इत्यादी यांचा अधिक परिणामकारक उपयोग होऊ शकतो. नवीन औषधे व आजारांवर उपाय व पर्याय उपलब्ध होऊ शकतात. अशा प्रकारे जैविक विविधता महत्त्वाची ठरते.

जैविक विविधतेच्या नाशाची कारणे :

१) मूल्यस्थानाचा नाश किंवा विभाजन : वाढती मानवी लोकसंख्या व त्या अनुषंगाने तिचा विस्तार यामुळे पृथ्वीवरील फार थोडे प्रदेश मानव व त्याच्या व्यवसायांच्या परिणाम विरहीत राहिले आहेत. वाढत्या मागणीमुळे शेती, धरणे, उद्योग, मानवीवस्त्या यासाठी जमिनीची गरज अधिक प्रमाणात भासू लागली व निर्वणीकरणाचे प्रमाणे वाढले. अनेकदा हे विकास प्रकल्प हे नैसर्गिक परिस्थिकींना भेदून जातात किंवा त्यात मोठ्या प्रमाणावर बदल किंवा नुकसान पोहचवतात. यामुळे काही जीव-जाती नष्ट होऊ लागल्या आहेत.

२) नवीन जीवजातींचा अंतर्भाव : अपघाताचे किंवा मुद्दाम एखाद्या जीवजातीचा दुसऱ्या परिस्थितीत अंतर्भाव झाला तरीही जैविक विविधतेचा ऱ्हास संभव आहे. अनेकदा असे घडते की हा परकीय जीव त्या परिस्थितीकीतील इतर जीवांपेक्षा अधिक प्रबळ असतो व स्वतःचे स्थान टिकविण्याच्या प्रयत्नात त्या परिस्थितीकीतील इतर जीवाचा नाश करतो. याचे उत्तम उदा. म्हणजे मॉरेशिअस बेटावरील डोगे पक्षी. हा पक्षी जमिनीवर अंडी घालायचा व मानवाला घाबरत नसे. परंतु वसाहतकारांनी या बेटावर डुक्कर आणली व ती या पक्षांची अंडी खाऊ लागली याचा परिणाम १६८१ मध्ये डोगे पक्षांची संपूर्ण जात पृथ्वीवरून नाहीशी झाली.

३) अतिरिक्त प्रमाणात वापर करणे : याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेतील पॅसेंजर जातीचे कबुतर. हे पक्षी प्रचंड प्रमाणात एकेकाळी अमेरीकेत आढळत होते. एक पक्षांचा थवा ४०० किमी एवढा मोठा असून त्यात सुमारे २ अब्ज पक्षी असल्याचा अंदाज आहे. ५ कि.मी. रुंद व ९७ कि.मी. लांबीच्या वनात ९० टक्के घरटी या पक्षांची असत. या पक्षांचे मांस मोठ्या प्रमाणावर मागणीत होते व त्यामुळे त्यांची शिकार मोठ्या प्रमाणात होत असत. परिणामी त्या पक्षांचे अस्तित्व धोक्यात आले व शेवटचा पक्षी १९१४ साली प्राणीसंग्रहालयात मरण पावला. अशा प्रकारे हत्ती व वाघाची गत झाली. परंतु आंतरराष्ट्रीय प्रयत्नांमुळे आज हे प्राणी संपूर्ण नाशापासून वाचले आहेत.

४) प्रदूषण : विविध प्रकारची प्रदुषके जसे खनिजे, शेतातील रसायने, धुर इ.मुळे वनस्पतींचा नाश होत असतो. ही प्रदुषके अन्नसाखळीतून प्रसारित होत, त्यांचे केंद्रिकरण होते व सजीवांना धोका उत्पन्न होतो. आम्ल पर्जन्यामुळे वनांचा नाश झाला आहे.

आपली प्रगती तपासा.

१) जैविक विविधतेच्या ऱ्हासाची कारणे सांगा.

१४.४.३ मानवाच्या अस्तित्वासाठी जैव विविधतेचे महत्त्व

मानवाच्या अस्तित्वासाठी सर्व इतर सजीवांचेही अस्तित्व आवश्यक आहे. फळा-फुलांची, वनस्पती औषधे व इतर उपयुक्त पदार्थ मानवाला वनस्पतींकडून मिळतात. त्या वनस्पती जगणे मोलाचे आहे. प्राणवायू व कार्बनडाय ऑक्साईड वायूचे संतुलन वनस्पती टिकवून ठेवतात. म्हणून वनस्पतीचे जगणे मानवाच्या दृष्टीने हितकारक आहे. अन्नधान्ये व इतर धान्ये मानवाला जगण्यास आवश्यक आहेत. अन्नधान्यांचे उत्पादन वाढविणे, त्यांचा कस टिकविणे, प्राणी उत्पादनातून मांस, दूध, अंडी इ. उत्पादने मिळविणे म्हणजे मानवाची 'अन्न' भूक भागविण्यासाठी जैव विविधतेचा उपयोग होत असतो. सर्वच जलचर, भूचर परस्परावलंबी आहेत. निसर्गचक्रात पर्यावरण परिस्थितीमध्ये संघर्ष करून आपले अस्तित्व टिकवणे हा प्रत्येक सजीवाचा मूळ गुणधर्म आहे. प्रत्येकाची धडपडही अस्तित्वासाठी चाललेली असते. सर्व जीव घटकांचा समतोल राहावा. उपलब्ध घटक व त्यांचा वापर करणारे जीव यांच्यात संतुलन राहावे यासाठी मानवी प्रयत्न आवश्यक आहेत. मानवाच्या चरितार्थाचे व जीवनाचे सर्व आधार हे कायम टिकावे लागतात. त्यांचे मानवाकडून शोषण होऊ नये. अतिवापर होऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मानवाच्या चिरंतन अस्तित्वासाठी 'जगा नि जगवा' हा संदेश अतिशय मोलाचा आहे.

जंगलातील गवत खाणारे सर्व प्राणी मारून टाकले. तर वाघ, सिंह इ. हिंस्त्र प्राण्यांना त्यांचे अन्न मिळणार नाही. मग ते मानवी वस्तीवर व पाळीव प्राण्यांवर हल्ला करू लागतील. याउलट जर अन्नसाखळीत वाघ, सिंह यासारखे मासांहारी प्राणी कमी झाले तर त्यांचे भक्ष्य असणारे गवत खाणारे प्राणी खूप वाढतील. तृण भक्षकांची संख्या वाढली तर ते शेतीचे व पिकांचे आहार म्हणून भक्षण करतील. शेतीचे नुकसान करतील व मानवासाठी अन्न उरणार नाही. निसर्ग समतोल ढासळून जाईल. विष व कातडीसाठी साप मारले जातात. त्यामुळे उंदरांचा सुळसुळाट होईल. उंदरांपासून अन्नधान्ये व पिकांचे नुकसान होईल. शिवाय सापाचे विष हे औषधी आहे. थोडक्यात म्हणजे सर्व जीव जगणे आवश्यक आहे. मानवाच्या सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करण्यास हे जीव उपयोगी आहेत. निरोगी, कार्यक्षम, बुद्धीमान, निसर्ग-पर्यावरणाचे संरक्षण करणारा मानवी समाज हा चिरंजीव राहतो. उलट रोगराई, अन्न-पाणी, प्रदूषण इ. समस्यांमुळे मानव दुबळा व अशक्त होतो. त्याचे अस्तित्व चिरंजीव राहात नाही. विविध सजीवांच्या सेंद्रीय संयुगांपासून नायट्रोटस्, फॉस्फेटस् इ. पदार्थ निर्माण केले जातात. क्लोरोमायसेटीन, पनिसिलीन, स्ट्रेप्वेमायसीन इ. औषधे ही बुरशीपासून निर्माण केली जातात. सागरातील प्राण्यांपासून अन्न पदार्थाबरोबर कॉडालिव्हर आईल व इतर औषधी द्रव्य मिळवली जातात.

हरीत क्रांती, श्वेतक्रांती, नील (जल) क्रांती, औद्योगिक क्रांती, संगणक क्रांती यांच्याप्रमाणे आजच्या युगात मानवाच्या अस्तित्वासाठी 'जैवक्रांती'कडे विज्ञान तंत्रज्ञानाने वाटचाल सुरू केली आहे. जैव तंत्रज्ञानामार्फत नवीन जैव-गुणसुत्रांचे एकत्रीकरण करून नव्या प्रजाती निर्माण केल्या जातात. गुणसूत्रीय उत्क्रांती पेशींची (Genetically Modified organs) निर्माण केली जाते. हव्या त्या गुणधर्माची, वैशिष्ट्यांची जैवनिर्मिती त्यातून केली जाते. अन्नाधान्याची गरज पूर्ण करण्यास हे तंत्र उपयुक्त ठरेल. नवीन बियाण्यांचा शोध केला जाईल.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या डार्विन संशोधन केंद्रातील डॉ. ऑलिव्हरकरी यांनी जैव तंत्रज्ञानाच्या आधारे संशोधन करून इ.स. ३००० मधील मानव कसा असेल यावर निष्कर्ष काढलेले आहेत. त्यांच्या मतानुसार इ.स. ३००० पर्यंत मानवी शरीरात अधिक उत्क्रांती होऊन पोषण द्रव्ये, औषधे व स्थलांतरामुळे जगातील मानवातील वर्णभेद नष्ट होईल जैव तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाच्या शारीरिक, सामाजिकक्षमता, संवादक्षमता कमी होतील. त्या मानवाची सरासरी उंची २ मिटर्स पर्यंत राहील. सर्वच मानवजातीचा एकच गहूवर्ण असेल व मानवाचे आयुष्य १२० वर्षापर्यंत वाढलेले असेल. तंत्रज्ञानामुळे मानवाचे आयुष्य सुखकर असले तरी त्यात जनुकिय दोष वाढतील. इ.स. ३००० नंतरचा काळ मानवास वाईट असेल.इ.स. १२००० पर्यंत मानवाच्या जवळील अनेक भावनांचा ऱ्हास होईल. प्रेम, जिव्हाळा, आदर हे गुण व या क्षमता उंच, सडपातळ, विनयशील असा एक गट असेल तर 'बुटका, रोगट, कमी बुद्धीमान' असा दुसरा गट असेल.

पृथ्वीवर जसे हवामान तसे मानवी जीवन आढळते मानव प्राण्यांनी ज्या त्या हवामानात टिकून राहण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या दृष्टीने आपल्याकडील तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी विकासासाठी सर्वत्र केला गेला. विशेषतः प्रतिकूल थंड हवामानाचे व उष्ण वाळवंटी प्रदेश वगळता इतरत्र मानवेतर सजीवांचा वापर मानवाने आपल्या सुखासाठी व गरजपूर्तीसाठी करून घेतला आहे. जगात समशीतोष्ण कटीबंधीय (मध्य कटीबंधीय) हवामान सर्वोच्च सजीवांच्या समृद्धींला पोषक ठरलेले आहे. जेथे सागरसंपदा आहे तेथील मत्स्योत्पादन, जेथे गवताळ प्रदेश आहेत तेथे पशुपालन, जेथे सुपीक जलसमृद्धी भाग आहे तेथे शेती व उद्योगधंदे असे विविध व्यवसाय मानवाला करता आले. हे व्यवसाय करताना इतर मौल्यवान प्राणी, पक्षी, सजीवांच्या संरक्षणासाठी मानवाने कोठेही खास प्रयत्न केले नाहीत. दूध, मास मिळते म्हणून प्राणी पोसले. पण त्यांच्या संख्यावृद्धीसाठी, त्यांच्या सुरक्षित वन निवाऱ्यासाठी प्रयत्न केले नाहीत. मानवाला आवश्यक उपयुक्त असणारी नैसर्गिक संपत्ती, जैव विविधतेबरोबर नाश पावत आहे. त्यामुळे 'सर्वांसाठी हे पर्यावरण' आहे या भूमिकेतून 'जैव संवर्धन' गरजेचे ठरले आहे. मानवाच्या अस्तित्वासाठी औद्योगिकीकरणामधून निर्माण होणारे प्रदुषण नियंत्रण केले पाहिजे. खनिजांचा वापर जपून केला पाहिजे. वनक्षेत्रात वाढ केली पाहिजे. म्हणजे सुक्ष्म व इतर उपयुक्त जीव नष्ट होणार नाहीत. शेती क्षेत्रात रासायनीक खते व किटकनाशके वापरावर बंदी घातली पाहिजे.

सध्या मानव समाज हा सुमारे १/३ पेक्षा अधिक पृथ्वीवर जैविक उत्पादनांचा वापर करतो आहे. पण त्या उत्पादनांची पुनर्निमीती व संरक्षण करीत नाही. पर्यावरणाचे जैविक भांडवल अमर्याद वापरू नये. तसे झाले तर मानवाला 'अन्न-पाणी' पुरेसे मिळणार नाही.

एखाद्या वनस्पतीतील मानवाला उपयुक्त असे गुणधर्म गुण सूत्रातून वेगळे करावयाचे व ते सुक्ष्म जिवाणूंच्या गुणसूत्रात टोचावयाचे आहेत. अशा उपयुक्त सुक्ष्म जिवाणूंची वाढ आपल्याला आवश्यक असलेल्या वनस्पतीत केली तर त्या वनस्पतींमध्ये उपयुक्त गुणधर्म निर्माण होतात. कवक (Fungi) शास्त्रज्ञांनी बुरशी व सूक्ष्म जिवाणूंची कृत्रिमरीत्या वाढ करून माणसाला उपयुक्त अशा औषधांची पाचकद्रव्यांची व ॲक्टिबायोटिक्सची निर्मिती केलेली आहे. सूक्ष्म जिवाणूंपासून निर्माण झालेली 'पाचकद्रव्ये' औद्योगिक क्षेत्रात बदल घडवतील व ही द्रव्ये 'पर्यावरणाचे मित्र' बनतील.

जैव तंत्रज्ञान हे शेती विकासाची 'गुरूकिल्ली' ठरणार आहे. अतिसंवर्धनामुळे प्रतिकूल घटकांमध्येही टिकून राहतील अशा पिकांच्या जास्ती उत्पादन देणाऱ्या जाती निर्माण होतील. एक जातीय, आंतर जातीय जनुकरोपण केले जाईल व त्यामुळे पिकाला कीड किंवा रोगाशी सामना करावा लागेल. तेव्हा कोणतेही कीटकनाशक न वापरता स्वतः पिकाकडेच रोगाला सामना करण्याचे सामर्थ्य येईल. पीकच स्वतःचे संरक्षण करण्यासाठी लागणारी कीटकनाशके स्वतःच तयार करील. स्वतःला लागणारी पोषकद्रव्ये पिके स्वतःच निर्माण करतात तेव्हा त्यांना वेगळ्या खतांची गरज भासणार नाही. उपयुक्त रसायने निर्माण करणारी जनुके पिकांकडून निर्माण केली जातील. येत्या शतकात जैव अभियांत्रिकी औषधी उपचार निर्माण होतील. जनुकांचा अर्थ लावण्यात शास्त्रज्ञांना यश आल्यामुळे चांगली जनुके वापरून चांगला मानव, चांगले प्राणी निर्माण होतील. मानवाकडे रोगप्रतिकारक शक्ती वाढून उपयुक्त प्राण्यांचे आयुर्मानही वाढविता येईल.

आपली प्रगती तपासा.

१) मानवासाठी जैवतंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१४.४.४ जैव विविधतेचे संवर्धन व त्यावरील उपाय

पर्यावरण शुद्धतेसाठी, पर्यावरण संरक्षणासाठी जैव विविधतेने संवर्धन करणे आवश्यक आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर, उपयोग अशा पद्धतीने करावा की, ज्यामुळे ती संपदा नाश पावणार नाही. अशी शाश्वत संवर्धन प्रक्रिया सर्वत्र अवलंबणे आवश्यक आहे. जैव विविधता मौल्यवान आहे. तिच्या संरक्षणार्थ शासकीय व सामाजिक स्तरांमधून विविध संस्था कार्य करीत आहेत. जैव विविधतेच्या संपदेचे सर्वेक्षण करणे, संवर्धन व संरक्षण करणे मानवाच्या अस्तित्वाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

जगात जैव विविधतेचे अति संवेदनशील महत्त्वाचे असे एकूण २५ भूभाग असून त्यात भारतातील पश्चिम घाटाचा समावेश केला जातो.

भारतात इ.स. १९७२ मध्ये व १९९२ मध्ये वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी वन्यजीव संरक्षण कायदा केला व शिकारीवर निर्बंध घालण्यात आले. १९८० मध्ये जंगल संरक्षण कायदा करण्यात आला व जंगलाखेरीज इतर कारणांसाठी जंगल जमीन वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला. १९८७ च्या मासेमारी कायद्याने स्फोटक व विषारी द्रव्ये वापरण्यावर निर्बंध घातले. पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजनेबाबत कायदा १९८६ मध्ये केला गेला व त्याद्वारे हवा, पाण्याचे प्रदुषण, टाकाऊ कचरा, विषारी पदार्थ यांच्याबाबत नियम केले. भारतात वनस्पती व प्राण्यांची संवर्धन व संरक्षणासाठी २३ व्याघ्र प्रकल्प ९२ राष्ट्रीय उद्याने, ४९७ अभयारण्ये व १५ राखीव जंगले तयार केलेली आहेत.

जैव संवर्धनासाठी स्थानिक जंगली जातीच्या नवीन जाती या संकरित पद्धतीने निर्माण केल्या जातात. अनुवंश टिकवून ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे यासाठी 'जीन किंवा जनुका बँका' स्थापन झाल्या आहेत. नैसर्गिक जनन प्रक्रियाऐवजी सजीवांच्या प्रयोगशाळेत 'क्लोनिंग' पद्धतीने सजीवांची प्रयोग शाळेत निर्मिती केली जाते. भारतात ICAR (Indian Cancil of Agricultural Resources) संस्था जनुक संवर्धनाचे GBC (Gene Bank Conservation) चे कार्य करीत आहेत. याशिवाय भारतात नॅशनल ब्यूरो ऑफ प्लॅन्ट जेनेटीक रिसोर्स (NBPGR) नवी दिल्ली ही संस्था भात, गाजर, कांदे, मुळा, टोमॅटो, मिरची, पपई, बटाटे, गहू, बाजरी कडधान्ये इ. प्रजातींचे जतन करत आहे. नॅशनल ब्यूरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्स (NBAGR) हरियाणा ही संस्था कर्नाल येथे असून ती पाळीव प्राण्यांच्या पुनरूत्पादनासाठी पेशी द्रव्याचे जतन करते. दिल्लीला NBPGR येथेच उती संवर्धन व जैन तंत्रज्ञानाद्वारे करणारी नॅशनल फॅसिलिटी फॉर प्लॅट टिश्यू कल्चर रिपॉझिटरी (NFPTCR)ही संस्था आहे.

जगात सर्वात जास्त सजीवांचा नाश हा त्यांच्या वस्तिस्थानातच घडून आला. जगात ब्राझीलमधील रिओडी जानीरो येथे वसुंधरा शिखर परिषदेत संयुक्त राष्ट्र संघटनेमार्फत जैव विविधता करार केला गेला. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे संकटात आलेल्या वन्य वनस्पती व प्राण्यांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार करार (Cites) केला व तो १९७५ पासून अमलात आणला. इ.स. १९७१ मध्ये इराण येथील 'रामसर' येथे आंतरराष्ट्रीय जलमय भूमीविषयी करार केला व त्यांची अमंलबजावणी १९७५ पासून करण्यात आली. जलमय भूमीतील सरोवरे, तलाव इत्यादीमधील प्राणी व वनस्पतींचे संवर्धन करण्यासाठी या करारादारे आचारसंहिता ठरविण्यात आली.

आपली प्रगती तपासा.

१) जैव विविधतेचे संवर्धन व त्यावरील उपाय सांगा.

_____

_____

_____

_____

१४.५ सारांश

पर्यावरण शास्त्राच्या अभ्यासात परिस्थिती की विधानाला महत्त्वाचे स्थान आहे. परिस्थितीतील जे घटक सजीव सृष्टीच्या हितावर नियंत्रण ठेवून प्रसाराचे निर्मितीचे व उत्क्रांतीचे नियमन करतात. परिसंस्था हे एक संकिर्ण जाळे आहे. त्यात सजीव व पर्यावरण व त्यांच्यातील आंतरक्रियातील समावेश होतो. परिसंस्थेचे दोन गट पडतात. १) अजैविक घटक, २) जैविक घटक, अजैविक घटकाचे १) प्राकृतिक घटक व २) रासायनिक घटक असे दोन उपगट पडतात. १) हवामान, २) मृदा, ३) प्राकृतिक अडथळे, जैविक घटक १) उत्पादक, २) ग्राहक/भक्षक, १) प्राथमिक भक्षक, २) द्वितीयक भक्षक, ३) तृतीयक भक्षक, परिसंस्थेच्या कार्यसंबंधी १) अन्न शृंखला, २) ऊर्जाप्रवाह यांचा उल्लेख करता येतो.

निसर्गामध्ये विविध प्रकारच्या परिसंस्था दिसून येतात. १) जंगल परिसंस्था, २) गवताळ परिसंस्था, ३) वाळवंटी परिसंस्था, ४) जलीय परिसंस्था जैविक विविधता हे एका परिपूर्ण सक्षम सुदृढ पर्यावरणाची लक्षणे आहेत. जैविक विविधतेचा नाश होत आहे. १) मुल्यस्थानाचा नाश, २) नवीन जीवजातींचा अंर्तभाव, ३) अतिरिक्त प्रमाणात वासर करणे, ४) प्रदूषण मानवाच्या अस्तित्वासाठी सर्व इतर सजीवांचे अस्तित्व आवश्यक आहे. फळा-फुलांची वनस्पती औषधे व इतर उपयुक्त पदार्थ मानवाला वनस्पतींकडून मिळतात. त्या वनस्पती जगणे मोलाचे आहे. जैव विविधतेचे संवर्धन करण्यासाठी त्यावर काही उपाय योजना करणे आवश्यक आहे. ज्यामुळे ती संपदा नाश पावणार नाही. अशी शाश्वत संवधन प्रक्रिया सर्वत्र अवलंबणे आवश्यक आहे.

१४.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) परिसंस्था म्हणजे काय ? परिसंस्थेची संरचना स्पष्ट करा.
२) परिसंस्थेचे कार्य व प्रकार विशद करा.
३) जैविक विविधता म्हणजे काय ? सविस्तर स्पष्ट करा.
४) जैविक विविधतेच्या नाशाची कारणे विशद करा.
५) मानवाच्या अस्तित्वासाठी जैव विविधतेचे महत्त्व काय आहे ?
६) जैव विविधतेचे संवर्धन का करावे ते सांगून त्यावरील उपाय सांगा.
७) टिपा लिहा.
१) परिस्थिीकीय, २) जैविक घटक, ३) अजैविक घटक, ४) परिसंस्थेचे कार्य, ५) जैव विविधतेचे संरक्षण, ६) परिसंस्थेचे प्रकार, ७) जैविक विविधतेचे महत्त्व.

❖❖❖❖

१५

पर्यावरणाचा ऱ्हास व संवर्धन
(Enviromental Degradation & Sustainble)

पाठाची रचना :

१५.० उद्दिष्ट्ये
१५.१ प्रास्ताविक
१५.२ पर्यावरणाचा ऱ्हास
१५.३ साधनसंपत्तीचे संवर्धन
१५.४ भारतातील पर्यावरण संरक्षण व संवर्धन
१५.५ सारांश
१५.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१५.० उद्दिष्ट्ये

- पर्यावरणाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करता येईल.
- पर्यावरणाच्या ऱ्हासाचे कारणे अभ्यासता येतील.
- मानवाच्या नागरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कसा होतो ते स्पष्ट होईल.
- साधनसंपत्तीचे संवर्धन का करावे ते अभ्यासता येतील.
- भारतातील पर्यावरण संरक्षण व संवर्धन पाहता येईल.

१५.१ प्रास्ताविक

पृथ्वी ही मानव व मानवेत्तर प्राण्याचे निवासस्थान आहे. तसेच वनस्पतीचे सुद्धा निवास स्थान आहे. मानव, मानवेत्तर प्राणी व वनस्पती यांचा परस्पर संबंध अपरिहार्य आहे. परंतु मानव हा प्राणी बुद्धिप्रधान असल्यामुळे तो मन मानेल तसा वागतो. या तिघातील असमतोलामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरण नष्ट होत चालले आहे. पृथ्वीतलावर सजीवसृष्टीत मानवप्राणी हा सर्वात तरबेज व बुद्धीमान असून त्याने आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाचा मोठ्या कल्पकतेने उपयोग करून घेतला आहे. निसर्गात उपलब्ध होणाऱ्या विविध वस्तुंचा वापर करून मानवाने आपल्या अन्न, वस्त, निवारा या मूलभूत गरजा भागविल्या आहेत. पर्यावरणात मानवाच्या सभोवतीही असलेल्या सर्व बाबींचा उदा. जंगले, नद्या, जमीन, पर्वत, पाणी, समुद्र, इमारती, रस्ते, वस्त्या इत्यादींचा समावेश होतो. मूलभूत गरजा सर्वत्र सारख्या असल्यातरी पर्यावरणातील घटक साधने मात्र सर्वत्र सारखे नाहीत. प्राकृतीक घटका इतकेच सांस्कृतीक घटक विपुल प्रमाणात

आढळतात. आदि मानवापासून यंत्र युगाच्या मानवापर्यंत गरजा व मागण्यांच्या पूर्ततेसाठी मानवी पर्यावरणात अव्याहत धडपड सुरू आहे. पर्यावरणातील ज्या पदार्थ्यांचा अथवा वस्तूंचा वापर मानवाद्वारे केला जातो त्यास 'साधनसंपदा' असे म्हणतात.

औद्योगिकरण काळाची गरज आहे. पण औद्योगिकरणाच्या वाढत्या पसाऱ्यामुळे नैसर्गिक जंगलसंपत्तीचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे दरवर्षी देशातील सरासरी १० लाख ५० हजार हेक्टर क्षेत्रफळावरील जंगल नाहीसे होत आहे. इंडियन सोशल इन्स्टिट्यूटच्या संशोधन विभागातील डॉ. वाल्टर फर्नांडिस यांनी आपल्या निबंधात या निरीक्षणावर भर दिला आहे. त्यांच्या मते जंगल हे उद्योजकांना भरमसाठ नफा मिळवून देणारे चांगले साधन आहे. जंगलतोडीमुळे जमीन वनस्पतीहीन होऊन निरूत्पादक बनते, त्यास वाळवंटीकरण असे म्हणतात.

१५.२ पर्यावरणाचा ऱ्हास

ओरिसातील कागद गिरण्यात दर टनास १९८२-८३ मध्ये पाचशे रूपये इतक्या कमी किंमतीत बांबू दिला गेला तर मध्य प्रदेशातील कागद गिरण्यात १९८३-८४ मध्ये ४५० रू हून कमी दराने दिला गेला. तसेच ओरिसातील औद्योगिक कारखान्यात एका वर्षी १२ लाख ९५२ टन जळाऊ लाकूड वापरले गेले. कच्चा माल म्हणून चांगल्या प्रतीचे लाकूड वापरले गेले असे उदाहरणादाखल म्हटले आहे. यामुळे जंगलांवरील आक्रमण वाढत आहे तसेच वनीकरणालाही फारसे उत्तेजन दिले जात नसल्यामुळे भारतातील जंगलांना खरा धोका औद्योगिकरणापासूनच निर्माण झाला आहे.

भारतातील उत्तर प्रदेशातील गढवाल क्षेत्रात एकूण २२ प्रकल्पांपैकी १) टेहरी-भगीरथी, २) उत्तियासू – अलकनंदा, ३) कोरली भेल – गंगा हे तीन प्रकल्प म्हणजे पर्यावरणीय समस्यांना आमंत्रणच आहे. धरणे भौगोलिक दृष्ट्या ४० वर्षापेक्षा जास्त काळ टिकणार नाहीत. धरणे भरल्यावर मैदानी प्रदेश तयार होईल व पुराचे प्रमाण वाढेल. येथील वनस्पती व प्राणी अस्तंगत होतील व हा एक निमशुल्क प्रदेश तयार होईल व येतील विस्तार वाढून ३०-४० वर्षात त्याचे वाळवंटीकरण होईल. १००० ते २००० मीटर्स उंचीवरील पाण्याचे झरे जंगलतोडीमुळे आताच नाहीसे झाले आहेत. शहरात तसेच ग्रामीण भागात मनुष्यनिर्मित त्याज्य पदार्थ, घाण, मैला, सांडपाणी तसेच उद्योगधंदे, काराखान्यांमधून निरनिराळ्या प्रक्रियांपोटी निर्माण होणारे भौतिक व रासायनिक त्याज्य पदार्थ किरणोत्सारी पदार्थ्याचे कण यांचे उत्सारण होते. हे पदार्थ शेवटी सोयीस्कररीत्या नद्या किंवा समुद्रामध्ये सोडून दिले जातात. अपद्रव्यांनी युक्त असे पाणी मानवी वापरास बाधक तर ठरतेच पण त्यामुळे मानवेत्तर सजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो. शेतीव्यवसायात पिकासाठी वापरलेली जंतूनाशके, कीटकनाशके, रासायनिक मिश्रणे विविध मार्गांनी सरते शेवटी समुद्राला येऊन मिळतात व पाण्याचे प्रदूषण होते.

आधुनिक काळात झालेल्या पाहणीनुसार जगातील समुद्रामध्ये ५००० टन अपद्रव्यांचा प्रवेश होतो. पावसामुळे जमिनीवरील मानवनिर्मिती अपद्रव्ये, विषारी, रासायनिक पदार्थ, किरणोत्सर्गी पदार्थ शेवटी नद्यामध्ये, सरोवरात व समुद्रामध्ये मिसळले जातात; त्यामुळे जलजीवांच्या परिसंस्था डळमळीत होतात. काही वनस्पती प्रदूषणामुळे नष्ट होतात तसेच प्राणीदेखील नष्ट होतात. पर्यावरणाचा ऱ्हास खालील कारणांमुळे होतो.

१५.२.१ पर्यावरणाचा ऱ्हासाची कारणे :

१) आम्लपर्जन्य व बाळवंटीकरण : कारखान्यात आणि औष्णिक वीज-निर्मिती-केंद्रात इंधन जाळल्यावर जसा कार्बन-डाय-ऑक्साइड वायू बाहेर पडतो, त्याचबरोबर गंधक वायू आणि नत्रवायूही बाहेर पडतात. पावसाच्या पाण्यात ते मिसळतात आणि त्यापासून गंधकाम्ल आणि नत्राळ तयार होतो व आम्लयुक्त पाऊस पडतो. पावसाच्या पाण्याबरोबर ही आम्ले खाली येतात. या आम्लांची जमिनीतल्या पोषक द्रव्याशी रासायनिक क्रिया होते आणि या द्रव्याचे निरूपयोगी द्रव्यात रूपांतर होते.

आम्लयुक्त पावसामुळे झाडांची पाने मोठ्या प्रमाणावर गळतात आणि त्यांची वाढ खुंटते. मध्य युरोपातील अनेक जंगले या आम्लयुक्त पावसाने नष्ट झाली. काही वनस्पती मात्र आम्लयुक्त पावसाने फोफावतात. त्यामुळे संतुलन बिघडते. अशा या आम्लयुक्त पावसाची परदेशातही निर्यात होते. उदा. ब्रिटनमध्ये कोळसाचे उत्पादन खूप असल्याने तेथे कोळसावर चालणारी औष्णिक वीज-निर्मिती-केंद्रेही बरीच आहेत. या केंद्रामधून बाहेर पडणारा कार्बन-डाय-ऑक्साइड व गंधक या नत्रवायूंची निर्यात वाऱ्याच्या प्रवाहामुळे होऊन नॉर्वे, स्वीडन या देशात आम्लपर्जन्य पडतो.

आम्लयुक्त पावसामुळे संबंध जगभरच्या जंगलांवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे होणारे इमारती लाकडाचे नुकसान हे अब्जावधी डॉलर्सच्या घरात जाईल. "वर्ल्ड वॉय इन्स्टिट्यूट" या जागतिक स्तराच्या संस्थेने केलेल्या अभ्यासात हा धोक्याचा इशारा देण्यात आला असून जंगलाचे रक्षण करण्यासाठी प्रदूषणाच्या कोणत्याही एकच एक कारणावर नियंत्रण ठेवून भागणार नाही असे अभ्यासात म्हटले आहे. युरोप आणि अमेरिकेच्या पूर्वेकडील मोठ्या भागात जवळजवळ ९० लाख एकर जंगलाचे हवेतील प्रदूषणामुळे व आम्लपर्जन्यामुळे नुकसान होत आहे. (जंगलाचे होणारे नुकसान ८ टक्क्यांवरयून ३८ टक्क्यांवर गेले आहे.) आम्ल पर्जन्यामुळे जंगले नाहीशी होत असल्याने वाळवंटीकरण वाढण्यास मदत होते आहे.

२) सरोवराची शुष्कता व वाळवंटीकरण : जलप्रदूषणाचा परिणाम भूगर्भजलावर व सरोवरांवर देखील होतो. विकसनशील राष्ट्रांत वनस्पतीच्या प्रमाणाबाहेर होणाऱ्या वाढीमुळे किंवा अन्यतिरेकामुळे सरोवरे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. विकसित राष्ट्रांत सरोवरे नष्ट होण्याचे आम्लपर्जन्य हे देखील एक महत्त्वाचे कारण आहे. आतापर्यंत जगातील ५० हजार लहान मोठी सरोवरे नष्ट झाली आहेत किंवा काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. भारतात सरोवरांनी सुमारे २ लाख हेक्टर क्षेत्र व्यापले आहे. भारतात निलगिरी टेकड्यांच्या परिसरातील कोडाई कॅनॉल आणि भुकेर्टी ही सरोवरे वगळता समुद्रसपाटीपासून २००० मीटर्सपेक्षा जास्त उंचीवरील सरोवरांना अस्तित्वाचा धोका निर्माण झाला आहे.

३) जंगलतोड : इंधन, उत्पादने, वनसंकलन, वास्तूनिर्मिती अशा विविध कारणांसाठी जगभर जंगलतोड होत असते. ही जंगलतोड जगाच्या बऱ्याच भागात, विशेषतः अविकसित व विकसनशील देशांत अनिर्बंधपणे व अनियोजित स्वरूपात चालू आहे. जंगलकटाई केल्याने मृदेने कण सुटे होतात. जंगले म्हणजे मृदेचे आच्छादन असते व तेच काढून टाकल्यास पाणी जमिनीत मुरू शकत नाही. जलवाहनाचे प्रमाण वाढते. पर्यायाने जमिनीची धूप वेगाने होते. जंगल तोडीमुळे पुराचे प्रमाण वाढते. पुराच्या पाण्याला प्रतिबंध होत नाही व बेफाम जलप्रवाहामुळे मृदाधुपेचाही वेग वाढतो.

सध्या पृथ्वीवर सुमारे ३३ टक्के भूक्षेत्र जंगलांनी व्यापले आहे. तथापि जंगलांचे पृथ्वीवरील वितरण अतिशय विषम स्वरूपाचे आहे. भारतात अगदी अलीकडच्या आकडेवारीनुसार अवघे ७ टक्के क्षेत्र जंगलाखाली आहे. वनस्पतींमुळे वातावरणातील कार्बन-डाय–ऑक्साइड व ऑक्सिजन यांचे योग्य प्रमाण राखले जाते. कारण मानवाने उच्छवासावाटे बाहेर सोडलेला कार्बन-डाय-ऑक्साइड वायू वनस्पती आपल्या पानावाटे शोषून घेते व प्राणवायू बाहेर सोडते. हा प्राणवायू सजीव प्राणी श्वासावाटे आत घेतो व कार्बन-डाय-ऑक्साइड वायू बाहेर सोडतो आणि ही क्रिया सतत चालू राहते. मात्र मानव या वनस्पतींची मोठ्या प्रमाणात तोड करीत आहे. त्यामुळे वातावरणातील प्राणवायूचे प्रमाण घटून कार्बन-डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. शिवाय या जंगलतोडीस लोकसंख्या वाढही तितकीच जबाबदार आहे. कारण मानव स्वत:साठी जंगलतोड करून तेथे आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती करत आहे. वाढत्या लोकसंख्या गरजेसाठी जंगलतोड करून जंगलाखालची जमीन शेतीखाली आणीत आहे. वाढती लोकसंख्या म्हणजे, वाढती घरे, वाढते लाकडांचे इंधन, वाढते फर्निचर, अन्न, धागा, औषधे व इतर कच्च्या मालाची उपलब्धता तसेच जंगल उत्पादनावर आधारित अनेक उद्योग विकसित झाले असून त्याचे प्रामुख्याने फर्निचर उद्योग, जहाजबांधणी व बांधकाम व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर लाकडास मागणी असलेली आढळते. यासाठी वाढती जंगलतोड अपरिहार्य बनते.

आपली प्रगती तपासा.

१) जंगलतोडीचे परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

४) कृषि क्रियामुळे पर्यावरणाचा ऱ्हास : शेती हा मानवाचा अतिशय मोठ्या व्याप्तीचा आणि जुना व्यवसाय आहे. शेतीचा शोध १०००० वर्षापूर्वी लागला व आजतागायत मानवाने शेतीची पद्धत व तंत्रात आमूलाग्र बदलही घडवून आणले आहेत. जसजसी लोकसंख्या वाढत गेली तसतसी जंगलांची तोड करून मानवाने जंगलसंपदांना कृषिपर्यावरणाचे कायम स्वरूप प्राप्त करून दिले. विविध प्रकारची पिके, फलोत्पादन, कच्चा मालास उपयोगी पडणारी उत्पादने शेतीच्या विकासात प्रेरक ठरली. यातूनच कृषिपरिसंस्था निर्माण झाल्या. भौगोलिक दृष्ट्या शेतीउत्पादनातल्या प्रत्येक पिकाचे तापमान, आद्रता, पाणीपुरवठा, मृदा यांच्या संदर्भातील गरज वैशिष्ट्यपूर्ण असते. मानवाने बुद्धिमत्तेच्या सामर्थ्यांवर नैसर्गिक पर्यावरणाच्या मूलभूत दृश्यांच्या विचाराला फार महत्त्व न देता उत्पादन वाढीसाठी रासायनिक खते, जंतूनाशके, किटकनाशके, जलसिंचन यांचा मुक्तपणे वापर सुरू केला. ही सर्व उत्पादन – प्रवर्तक – साधने वापरताना शास्त्रीय मानकांच्या मर्यादा (Scientific Permissible Limit) मात्र ओलांडल्या गेल्या. याला अज्ञान, लोभ, परंपरा, स्वार्थ यांतील कोणतीही कारणे असतील. शेतीविषयक पद्धतींनी आधुनिक काळात पर्यावरणातील मृदा, जल, हवा या माध्यमांतील प्रदूषणाला एक प्रकारे हातभारच लागला आहे. हवामानातील अनिश्चिततेमुळे कृषिपरिसंस्थांमध्ये व्यत्यय निर्माण होतात. उदा. ओला किंवा कोरडा दुष्काळ पिकांच्या शरीर वैज्ञानिक क्रियांना बाधा निर्माण करतो. हवामान व मृदेबरोबरच कृषिपरिसंस्थेत इतर वनस्पती. तण, पिके व प्राणी यांच्या स्पर्धेचा प्रभाव

असतो. संपदांच्या अभ्यासाप्रमाणेच शेतीसाठी होणारा भू वापर व त्याचे पर्यावरणातील प्रभाव सर्वदूर लक्षात येऊ लागलेले आहेत. जगाच्या विविध भागातील शेती खालचे क्षेत्र उत्तरोत्तर वाढत असल्याने भूसंपदेचा असंतुलित वापर ही पर्यावरणीय समस्या वाढत आहे.

शेतीमुळे भूमिउपयोजनात झपाट्याने होणारे बदल पर्यावरणास व परिसंस्थांना घातक ठरत आहेत. उदा. नैसर्गिक वनस्पती किंवा अरण्यांखाली असणारे क्षेत्र शास्त्रीयदृष्ट्या कमीत कमी ३३ टक्के (किंवा १/३) असायला हवे. आज जगाच्या फारच थोड्या भागात हे प्रमाण आढळते. भारतात तर फक्त ७ टक्केच जमीन अरण्याखाली राहिली आहे. जंगलांची तोड करून तेथे शेतीचा विस्तार वाढत आहे. शेतीच्या विळख्याने गवताळ प्रदेश, अरण्ये अदृश्य झाली आहेत. शेतीत खतांचा वापर संतुलित न केल्यामुळे जमिनीच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम झाले त्यामुळे खतांचा अतिरेकी वापर मृदेच्या थरात साचून रासायनिक व भौतिक संघटन बिघडते. पाणी व पोषक द्रव्यांचे चक्रीकरण मृदेच्या माध्यमातून होत असल्याने उत्पादनवाढीसाठी मानवाने पाणी व्यवस्थापनात व पोषक द्रव्यांच्या कृत्रिम पुरवठ्यात अवाजवी प्रमाण अंगीकृत केल्याने मृदेच्या प्रकृतीत दुर्धर बिघाड होतात. मातीचा १ सेंटीमीटर जाडीचा थर स्थापित व्हायला शेकडो वर्षे लागतात; उजाड जमिनीवर पावसाच्या जोरदार प्रहाराने तेवढी मृदाधूप एका दिवसात देखील होऊ शकते. शेतीबरोबर रानात असलेले पशुधन चराईसाठी काळजीपूर्वक नीट न सोडल्यास अतिचराईमुळे मृदाधूपेला वाव मिळतो.

५) अतिजलसिंचन : शेतीतील पिकांना पाण्याची गरज भागवण्यासाठी पृष्ठीय व भूगर्भिय जलाचा वापर केला जातो. तथापि पिकाच्या गरजेपेक्षा बऱ्याचवेळा अतिरिक्त पाणी दिले गेल्यास त्याला अतिजलसिंचन म्हणतात. अतिजलसिंचनामुळे मृदेची जलधारणाशक्ती संपृक्त होते. परिणामी सिंचत पाण्याचे बाष्पीभवन होताना मृदेच्या खालच्या थरातील क्षार वर ओढले जातात व जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढून क्षारकरण ही क्रिया घडते. आर्थिक दृष्ट्या आधीच कमकुवत असणाऱ्या शेतकऱ्याला हा अधिभार परवडत नाही. या समस्येचे मूळ कारण मानवी हलगर्जीपणा हेच आहे. यासाठी प्रत्येक पिकांची पाण्याची परिस्थितीक गरज ओळखूनच गरजेप्रमाणे योग्य प्रमाणात पाणी पुरवले पाहिजे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात सामान्य शेतकऱ्यांपर्यंत सर्व स्तरावर शेतीसाठी पाण्याचा सुनियोजित वापर हे तत्व प्रसृत करून त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

६) रासायनिक खतांचा वापर : हरितक्रांतीतील प्रभावामुळे उत्पादनवाढीसाठी रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. यामध्ये पोटॅश, अमोनियम सल्फेट किंवा युरिया, नायट्रोजनयुक्त खतांचा समावेश होतो. अशा खतांच्या अतिरिक्त वापराचेही दुष्परिणाम कृषिदृश्यात वाढलेले आहेत. अतिरिक्त मात्रांच्या रासायनिक खतांमुळे पिकांचे उत्पादन तात्पुरते वाढत असले तरी त्याचे दूरगामी परिणाम कृषिपरिसंस्थेत मृदा व जला यांच्या संरचनेवर होतात. नंतर ही रासायनिक द्रव्ये उत्पादक न ठरता शेतीला विघातकच ठरतात. पिके नुसतीच पोसली जातात. पण त्यांचे दर एकरी उत्पादन उत्तरोत्तर घटत जाते. आशियाई राष्ट्रात १९७५-७७ या दरम्यान रासायनिक खतांचा वार्षिक वापर ४२ कि. ग्रॅम होता हेच प्रमाण १९८६-८७ मध्ये ९३ ग्रॅम झाले. ही समस्या सोडविण्यासाठी सेंद्रीय खतांचा वापर हा भरीव उपाय आहे. शेणखत, मलमूत्र यामुळे शेतीवर विपरित परिणाम होत नाही. कारण ही नैसर्गिक खते व्यवस्थित ग्रहण करण्याची पिकांची क्षमता नैसर्गिक तत्वावर आधारलेली असते.

७) जंतुनाशके व कीटकनाशकांचा वापर : शेतीउत्पादने वाढवण्यासाठी आधुनिक शेतीत जंतुनाशके व कीटकनाशकांचा प्रमाणाबाहेर वापर केला जातो. ही विषारी द्रव्य मातीतून लवकर विघटीत अथवा विषविरहीत न होत वनस्पतीद्वारे प्राण्यांच्या शरीरात अन्नसाखळीतून प्रवेश करतात. प्रगत राष्ट्रांत यामुळे DTT च्या वापरावर कायदेशीर बंदी करण्यात आली आहे. भारतासारख्या देशात मात्र रासायनिक खतांबरोबरच जंतुनाशके व कीटकनाशके यांचा वाढता खप लक्षात घेता कृषिपर्यावरणातील हे रासायनिक प्रदूषणकिती गंभीर आहे. याची कल्पना येते.

आपली प्रगती तपासा.

१) कृषि क्रियामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कसा होतो, स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

८) औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास : धूर, धुळ, कार्बन मोनोऑक्साईड सारखे बिनवासाचे वायु, नायट्रोजन / ऑक्साईड, हायड्रोकार्बन, सल्फरडॉय ऑक्साइड, शिसे इ. घातक द्रव्ये वेगवेगळे उद्योगधंदे, ऊर्जाउत्पादक केंद्रे, रासायनिक कारखाने, रस्त्यावरील वाहतुक, आण्विक केंद्रे इत्यादीद्वारा हवेत सोडली जातात व त्यामुळे हवा प्रदुषित होते.

जगाच्या सर्व भागात आर्थिक विकासाचा निर्देशांक म्हणून कारखान्यांची संख्या वेगाने वाढल्यामुळे जीवाश्म इंधनाचा वापर वाढला आणि प्रदुषणाचा प्रश्न भीषण झाला आहे. पृथ्वीच्या पर्यावरणात घन, द्रव्य, वायुरूप पदार्थ्यांमुळे जे प्रदूषण होत आहे. त्यांचे मुख्य कारण कारखानदारी आणि जीवश्म इंधनांचा वापर हे आहे. कारखान्याद्वारे बाहेर सोडले जाणारे CO, Co_2 NO, NO_2, SO_2 हे विषारी वायु त्याचबरोबर क्लोरोफ्ल्युरोकार्बन यांसारखे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरले आहे. कारखानदारीमुळे वायुरूप अपद्रव्यांबरोबर ॲटिमनी, अर्सेनिक, कोबाल्ट, निकेल, पारा, शिसे यांसारखी विषारी अपद्रव्ये वातावरणात विखुरली जात आहेत. सूक्ष्मवायू कलिकांमध्ये कार्बनचे कण, सिलीकेट डांबरी पदार्थांचे कण व विविध प्रकारचे ऑक्साइडस वातावरणात प्रवेश करतात. ही दुषितके मानव व प्राणी तसेच वनस्पतींच्या विविध शरीरवैज्ञानिक क्रियांना घातक सिद्ध होत आहेत. कारखान्यातून उत्सर्जित होणाऱ्या घन कणात विषारी कणांत विषारी प्रकारच्या रासायनिक कणांमुळे सजिवाबरोबर इमारती, वास्तुशिल्पे यांच्यावरही गंज चढणे, झीज होणे असे परिणाम होत आहेत. विषारी धुलीकण, वायू वनस्पतीच्या श्वसनाद्वारे शरीरात प्रविष्ट होतात त्यामुळे श्वसन, बाष्पोत्सर्जन यांसारख्या क्रियांना अडथळे निर्माण होतात. वनस्पतीची वाढ खुंटते. मानवाला ब्राँकायटीस, कर्करोग, क्षय, अवयवांची दुर्बलता यांसारखे दुर्धर आजार होऊ शकतात, हे जगातल्या उद्योगप्रधान शहरामधल्या सर्वेक्षणानुसार सिद्ध झाले आहे. कारखान्यांच्या प्रक्रियांमध्ये गंधक व त्याची संयुगे मोठ्या प्रमाणावर बाहेर सोडली जातात. या विषारी पदार्थांचा मानवावर तसेच निसर्गातल्या परिसंस्थांवर अतिशय वाईट परिणाम होतो.

कारखान्यांच्या प्रदुषणामुळे भारतातील मोठ्या शहरांमध्ये कार्बन मोनॉक्साइडचे प्रमाण जास्त झालेले आहे. त्यामुळे रक्तदाब, हृदयविकार, फुफ्फुसाचे आजार व अनारोग्यात वाढ झाली. कारखान्यांच्या वाढीबरोबरच शहरांची अनिर्बंध वाढ होते. परिणामी वाहनांचा वापर आवश्यक ठरतो. स्वयंचलित वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे हवेच्या प्रदुषणाबरोबर ध्वनिप्रदूषण ही समस्यादेखील (विशेषतः विकसनशील राष्ट्रात) मोठी समस्या झालेली आहे. सिमेंट, पेट्रोकेमिकल्प, खते व रसायने यांच्या निर्मिती उद्योगामुळे विषारी प्रदूषण तीवक्रतेने वाढते. कारखान्यात काम करताना यंत्राच्या आवाजामुळे जे ध्वनी प्रदूषण होते त्याचा परिणाम मानवी जीवनावर अत्यंत वाईट पद्धतीने होतो.

उदाहरणार्थ, भारतात मुंबई, दिल्ली, कलकत्ता, पुणे, बंगलोर, मद्रास या औद्योगिक पातळी वेगाने वाढत आहे. 'Enviortech 1984' च्या पाहणीनुसार मुंबई हे भारतातील सर्वात जास्त प्रदूषित शहर सिद्ध झाले आहे. एकट्या मुंबई शहरातच रोज अंदाजे २००० टनापेक्षा जास्त प्रदूषक हवेत सोडली जातात. यापैकी ६५ टक्के प्रदूषके रस्त्यावरील वाहनांच्या धुरामुळे निर्माण होतात. १९७३ साली हवेत सोडल्या जाणाऱ्या प्रदूषकांचे प्रमाण दुप्पटीने वाढले. ही गोष्ट चिंताजनक आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर येत्या पाच वर्षात मुंबईत राहणे अशक्य होईल. बऱ्याच संस्थांनी केलेल्या अभ्यास पाहणीनुसार असे आढळले की, क्षयाव्यतिरिक्त इतर श्वसनाच्या रोगांमुळे १९८० साली दर लाख लोकसंख्येतील ११० व्यक्ती मृत्युमुखी पडल्या,पण १९८६ सालापर्यंत हेच प्रमाण १२२ व्यक्तीपर्यंत वाढले. वाढत्या प्रदूषणामुळे मुंबईत मृत्यूचे प्रमाण वाढते आहे.

मुंबईत चेंबुर जवळील हिंदुस्थान व भारत पेट्रोलियम या दोन तेल शुद्धीकरण कारखान्यांमुळे हवा मोठ्या प्रमाणावर दुषित होते. हिंदुस्थान पेट्रोलियम कारखान्यातून रोज ३६ टन सल्फर डायऑक्साईड व ७६ टन कार्बन मोनॉऑक्साईड हवेत सोडला जातो. चेंबुरच्या हवेतील नैट्रिक ऑक्साईड पैकी ७०% टाटा इलेक्ट्रिक कंपनीतून सोडले जाते. त्याच प्रमाणे चेंबुरच्याच खत कंपन्यामुळेही प्रदूषण होते.

कारखान्याच्या उत्पादनाबरोबर त्यांची देखभाल नीट न झाल्यास काही वेळा अपघात होतात व अपघाताच्या वेळीही विषारी वायूंची मोठ्या प्रमाणावर गळती होते. भारतात ३ डिसेंबर १९८४ मध्ये भोपाळ येथील 'युनियन कार्बाइड' कारखान्यांमध्ये जागतिक स्तरावर नोंद होईल असा रासायनिक उद्योगातील मोठा अपघात झाला. सुमारे ८०,००० पौंड एवढे मिथिल आयसो सायनेट (MIC) हे अतिशय विषारी द्रव्य २ तास कारखान्यातून बाहेर पडले. या द्रव्याचा न भरून येणारा परिणाम भोपाळच्या परिसरातील लोकांवर झाला. यात फुफ्फुसाचे कार्य थांबल्यामुळे मृत्यु, अंधत्व, अपंगत्व तसेच फुफ्फुसाच्या कार्याला बाधा निर्माण करणारे अरिष्ट भोगावे लागले. तसेच मध्यवर्ती चेतासंस्था या विषारी अपद्रव्यामुळे कायमची बिघडून बरेच लोक नंतरच्या एक दोन वर्षात मरण पावले. याशिवाय वातावरणात जेव्हा असे वायू मोठ्या प्रमाणावर मिसळले जातात. तेव्हा या वायूंचे हवेच्या प्रवाहाबरोबर दूरवर प्रसरण केले जाते व पर्यावरण दूषित होते.

विकसित राष्ट्रात विशिष्ट रासायनिक कारखान्यामधून क्लोरोफ्ल्युरो-कार्बन या वायूंच्या प्रसरणामुळे अलीकडच्या काळात उत्तर ध्रुवावर ओझोन वायुच्या उपयुक्त थराला मोठे छिद्र पडले आहे. तसेच वातावरणातील कार्बन-डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढविण्याचे

कारखानदारी हे महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे पृथ्वीवर येणारी सौरऊर्जा कार्बन कणांमध्ये साठवली जाते व हरितगृह तत्वानुसार तिचे ऊत्सर्जन न झाल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढण्याची प्रक्रिया वेगाने होत असते. थोडक्यात जगातील औद्योगिकरणाचा वाढता कला हा पर्यावरणाच्या एकूण प्रवृत्तीस अत्यंत अपायकारक आहे.

आपली प्रगती तपासा.

१) औद्योगिकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कसा होतो, स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१५.२.२ नागरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास

नागरीकरण कोणत्याही क्षेत्रातले असो, त्याचा परिणाम पर्यावरणावर गुणवत्तेचा क्षय करण्यात निश्चितपणे होतो. यासाठी नागरीकरणाच्या पुढील समस्या लक्षात घेता येतील.

१) निवास समस्या : अपुरे उत्पन्न असल्यामुळे या गटातील व्यक्ती आवश्यक तो पैसा खर्च करून भाड्याची वा स्वतःची जागा घेऊ शकत नाहीत, त्यामुळे ही मंडळी बेकायदेशीर वस्त्या निर्माण करतात. कोणत्याही प्रकारची सोय नसलेली कच्च्या प्रकारची घरे बांधतात. संडास, न्हाणीघर, बंद गटारे व अत्यावश्यक सुखसोयींपासून ते दूर राहतात व त्यामुळे गलिच्छ वस्ती व बेकायदेशीर घरांचा प्रश्न निर्माण होतो.

२) पाणी समस्या : भारताच्या राजधानीतील २०० दशलक्ष लिटर्स् एवढी घाण रोज यमुना नदीत विनाप्रक्रिया सोडली जाते. सध्या यमुना ही जगातील अतिदूषित नद्यांपैकी एक म्हणून गणी जाते. यमुनेच्या पाण्यात आधीच दर १०० मि.ली. पाण्यात ७५०० कॉलीफॉर्म नावाचे जीवाणू अस्तित्वात असतात व त्यात ही घाणीची भर पडते. WHO च्या शिफारसीनुसार पिण्याचे पाणी या जीवाणूंपासून पूर्णतः मुक्त असले पाहिजे. दिल्ली शहर सोडताना यमुनेच्या पाण्यात प्रती १०० मिलीला २४ दशलक्ष कॉलीफॉर्म जीवाणू मिसळलेले असतात. यामुळे कावीळ, डिसेंट्री सारखे गंभीर आजार होऊ शकतात. भारतातल्या ३००० शहरांपैकी केवळ ७ टक्के शहरातच घरगुती सांडपाणी प्रक्रिया करून नद्यांत सोडले जाते. उरलेल्या ९३ टक्के शहरांतले सांडपाणी एकतर नद्या किंवा थेट समुद्रात सोडले जाते. गंगेचे पाणी उपसणाऱ्या १३२ औद्योगिक प्रकल्पापैकी केवळ १२ प्रकल्पाद्वारे प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया केली जाते. पर्यावरण राज्यमंत्र्यांच्या मतानुसार हा प्रश्न सोडविण्यासाठी ६० टक्के कारखाने बंद करावे लागतील. यासाठी १९९१ नंतर दोन वर्षे मुदत देण्यात आली होती. केनियातील १४० कि.मी. लांबीचा मोंबासा किनारा हा पर्यटनामुळे असाच प्रदूषित झाल्याचे लक्षात आले आहे. या किनाऱ्यावरील प्रवाळ खडक नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

३) कचरा समस्या : शहरातील कचऱ्यांचे प्रदूषण ही मोठी पर्यावरणीय समस्या आहे. कचऱ्याबद्दल जनमत जागृत नसल्याने जागो जागी कचऱ्याचे ढीग पसरतात, कुजतात व रोगकारक जीवजंतुंच्या वाढीची आगरे बनतात. परिणामी शहरवासियांचे एकूण आरोग्याच धोक्यात येते. वाढत्या लोकसंख्येची ऊर्जा गरजही वाढती असते. वाहने, घरगुती साधने, कारखाने, दिवाबत्ती यांसाठी ऊर्जेचा प्रचंड वापर होतो. ऊर्जा म्हणून पारंपरिक ऊर्जासाधनांचा वापर वाढल्याने प्रदूषणाचा प्रश्न बिकट होतो.

४) ऊर्जा समस्या : युनोच्या १९८० मधील नागरीकरण पाहणी अहवालानुसार तिसऱ्या जगातील नागरी पर्यावरण गंभीरपणे दूषित झालेले आहे. औद्योगिक, मानवी आणि घन अपद्रव्यांची विल्हेवाट नियोजितपणे न लावल्यामुळे हवा, पाणी व मृदा यांचे प्रदूषण तीव्र बनले आहे. शहरातील लोकसंख्येचा मोठा भाग कोंदट वातावरण जीवन कंठत आहे. सांडपाणी, मैलापाणी यांच विल्हेवाट नीट न लागल्याने हवेचे व पाण्याचे दूषितीकरण, अनारोग्य इ. समस्या भेडसावतात. नद्या, खाड्या, समुद्रकिनारे यांचे घरगुती व कारखान्यातील त्याज्य पदार्थांमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढते आहे. नद्यांची अवस्था गरटमय झाली आहे, तर समुद्राच्या पाण्यात कारखान्यातील नको असलेली द्रव्ये सोडल्याने तेथील जीवजाती वेगाने नष्ट होत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या गरजा भागविणे शासकीय स्तरावर कठीण झाले आहे, तर जे पाणी मिळते ते ही स्वच्छ असेल पण शुद्ध मात्र नसते.

५) वाहतूक समस्या : गावाकडून शहराकडे येणाऱ्या लोकांच्या अनियंत्रित प्रवाहामुळे वाहतुकीवर खूप ताण पडतो. बेकायदेशीर झोपड्या अनेक ठीकाणी बांधल्या जातात, त्यामुळे वाहतुकीला अडथळा येतो. वाहनांच्या संख्येत बेसुमार वाढ होत आहे.

६) प्रदूषण समस्या : शहरातील वाढत्या वाहतुकीमुळे व वाढणाऱ्या कारखान्यांमुळे प्रदुषणाचा एक भयंकर प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रदुषणामुळे शहरातील हवा व पाणी प्रदूषित होत आहे. निसर्गाचा समतोल ढळत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे अवेळी पडणारा पाऊस, तापमानात अचानक होणारे चढ-उतार, दमा व ॲलर्जी या रूग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ.

७) आरोग्य समस्या : ज्या बेकायदेशीर वस्त्या निर्माण होतात, तेथे मूलभूत सोयींचा अभाव असतो. त्यामुळे सांडपाणी, मैला व इतर दूषितीकरण यामुळे अनेक साथीचे रोग फैलावतात. सरकारी दवाखाने व वैद्यकीय मदतीचा अभाव यामुळे हे रोग वाढीस लागतात. कावीळ, हिवताप, लैंगिक रोग, महारोग, क्षय इ. रोगांचे पर्माण वाढते; काही रोग संसर्गजन्य असतात, त्यामुळे शहरातील लोकांचे आरोग्य धोक्यात येते.

आपली प्रगती तपासा.

१) नागरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कसा होतो, स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१५.२.३ पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम :

पर्यावरणाचा ऱ्हास नैसर्गिक किंवा मानवी कारणांमुळे होतो. पर्यावरण ऱ्हासाचा पर्यावरणावर पर्यायाने लोकांवर मोठ्या प्रमाणावर हानीकारक परिणाम होतात. ते परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

१) जागतिक तापमान वाढ : २०व्या शतकापासून पृथ्वीच्या तापमानात सातत्याने वाढ होत आहे. कार्बन-डाय-ऑक्साइड, नायट्रेटस, मिथेन, क्लोरोफ्ल्युरोकार्बन्स, ओझोन आणि हवेतील पाण्याचे बाष्प यांना हरित वायू असे म्हणतात. यामुळे पृथ्वीवरील सरासरी तापमान ठरते. पृथ्वीवरील सजीवांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठी ठराविक तापमानाची गरज असते. परंतु या तापमानात वाढ झाल्यामुळे अनेक संकटांना आपणास तोंड द्यावे लागणार आहे. प्रदूषणामुळे हे तापमान सतत वाढत आहे.

२) आम्ल पर्जन्य : हवेत मोठ्या प्रमाणावर कार्बन, ऑक्साइड, गंधक, क्लोरीन वायू व नायट्रोजन मिसळतात. पाण्यात मिसळून त्यांची आम्ले तयार होतात व त्यामुळे जो पाऊस पडतो त्यास आम्ल पर्जन्य म्हणतात. याचा परिणाम वनस्पती, प्राणी व वस्तुशिल्पावर होतो. आम्लयुक्त पावसामुळे वनस्पतींची पाने गळतात व वाढ खुंटते. तसेच आम्लपर्जन्यामुळे जंगले नष्ट होऊन वाळवंटीकरण मोठ्या प्रमाणावर होते. तलाव व सरोवरातील मत्स्यजीवन धोक्यात येते.

आम्लपर्जन्यामुळे इमारतीची बांधकामे यांचे विदारण होण्यास मदत होते. पिण्याचे पाणी आम्लयुक्त झाल्यास श्वसनाचे व पोटाचे विकार होतात. तसेच स्वीडन शास्त्रज्ञांच्या मते रक्ताचा कर्करोगही यामुळे होतो.

३) ओझोनचा क्षय : ओझोन हा ऑक्सिजनपासून निर्माण होणारा वायू वातावरणाच्या स्थितांवर थरात आढळतो. हा वायू सूर्यापासून भूपृष्ठाकडे येणारे अल्ट्राव्हॉयलेट सारखे अदृश्य किरण अडवतो. हे निलकिरण खूप विध्वंसक असतात. यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी तासाभरात नाहीशी होईल. म्हणून ओझोनच्या थरास पृथ्वीचे संरक्षण कवच म्हणतात. या वायूचा थर समुद्रसपाटीवर १२ ते ३५ कि.मी. दरम्यान आढळतो. वाढत्या प्रदूषणामुळे या ओझोनचा क्षय होत आहे. प्रगत देशांनी सी.एफ.एस.च्या उत्पादनावर बंदी घातली आहे. पर्यावरणावर सर्वात मोठ्याप्रकारचे संकट या घटकामुळे येऊ शकते.

४) वाळवंटीकरण : अति लागवड, जंगलतोड, अति चराई, उद्योगांना जागा उपलब्ध करून देणे व शेतीला प्रमाणापेक्षा जास्त पाणी देणे इत्यादी कारणांमुळे वाळवंटीकरण होते. वाळवंटीकरणामुळे जमीन नापिक किंवा निरूत्पादक बनते, पावसाचे प्रमाण कमी होते, जमिनीची धूप मोठ्याप्रमाणावर होते, प्राण्यांचा निवारा नष्ट होतो. त्यामुळे प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होतात.

५) सागरीजीवन : सागरी जीवन नष्ट होते. जगावर अरिष्ट आले की त्याचा परिणाम सागरी जीवनावर मोठ्या प्रमाणावर होतो. सागरी प्रदूषणामुळे सागरी प्राण्यांवर व वनस्पतींवर त्याचा परिणाम होतो. सागरी प्रदूषणामुळे पाण्यातील पुनरूत्पादनाची प्रक्रीया थंडावते. तेल व कार्बनयुक्त पदार्थाच्या तवंगामुळे प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया पूर्णपणे थंडावते व प्राणवायूचा तुटवडा निर्माण होतो.

६) जमिनीची धूप : निसर्गाला मृदा तयार करण्यास हजारो वर्षे लागतात व ती मृदा मानवी हस्तक्षेपामुळे काही दिवसात नष्ट होते. जमिनीची धूप झाल्याने हे होते. अतिपर्जन्य, वादळीवारे

व जमिनीची धूप या कारणानेही जमिनीचा ऱ्हास होतो. जमिनीची शेतीच्या दृष्टीने उत्पादक क्षमता वाढविणे, नवीन तंत्रज्ञान विकसीत करणे इत्यादी गोष्टीकडे लक्ष दिल्यास भूसंपदेचे योग्य व्यवस्थापन आणि संवर्धन करणे फायदेशीर ठरेल.

७) हवा प्रदूषण : हवेच्या प्रदूषणामुळेही पर्यावरणाची अवनती होते. हवेतील धूर, धुराके यामुळे प्रकाश किरण इतस्ततः पसरतात व दिसण्यामध्ये अडथळे निर्माण होतात. हवेतील प्रदूषणामुळे शेती व वनस्पतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते तसेच अजैविक पदार्थावरही त्याचा परिणाम होतो. रंग जाणे, रंग काळा पडणे, झीज होणे व तुकडे पडणे इत्यादी त्याचप्रमाणे हवा प्रदूषणाचा सर्वात जास्त परिणाम मानवावर होतो.

आपली प्रगती तपासा.

१) पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम सांगा.

_____

_____

_____

_____

१५.३ साधनसंपत्तीचे संवर्धन –

लोकसंख्येची वाढ आणि औद्योगिक क्रांतीचा प्रसार यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीच वापर बेसुमार वाढला. जमीन, पाणी, वने, खनिजे इतकेच काय हवेचीही मागणी प्रचंड प्रमाणावर वाढली. त्यामुळे नैसर्गिक संतुलन कोलमडून पडण्याचा धोका निर्माण झाला. हे धोकादायक आहे व त्याचे परिणाम सर्वांनाच विनाशकारी आहेत. नैसर्गिक साधन-संपत्तीचा अतिरिक्त वापर केल्यामुळे परिसंस्थेच्या उत्पादकतेत घट झाली आहे व जैव-विविधताही कमी होत चालली आहे.

१५.३.१ नैसर्गिक साधन-संपत्तीच्या अतिरिक्त वापरास पुढील घटक जबाबदार आहेत.

१) **वेगाने वाढणारी लोकसंख्या** – सध्याची जगाची लोकसंख्या ७ बिलियनपेक्षा जास्त आहे व ती लोकसंख्या १.६% दराने वाढत आहे. हा वाढीचा दर लक्षात घेता लोकसंख्या ४० वर्षात दुप्पट होईल व त्याचा ताण साधन संपत्तीच्या वापरावर होईल.

२) **तंत्रज्ञानाचा विकास** – तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मानवी जीवन आरामदायी झाले आहे. पण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे साधनसंपत्तीच्या वापराचा वेग वाढतो, कारण मानवी शक्तीपेक्षा यंत्राची ताकद व काम करण्याची क्षमता अनेक पटींनी जास्त आहे.

३) **वाढता चंगळवाद** – रहाणीमानाचा दर्जा वाढल्यामुळे जगभर चंगळवाद वाढतो आहे. स्वतःची मौजमजा, चंगळ यापुढे मानवाला नैसर्गिक घटकांचा होणारा नाश दिसेनासा झाला आहे.

४) **पश्चिमात्य संस्कृतीचे आक्रमण** – टी. व्ही व प्रसारमाध्यमांमुळे पश्चिमात्य संस्कृतीचे अनुसरण करण्याची प्रवृत्ती जगभर वाढत आहे. 'वापरा व फेकून द्या' या मनोवृत्तीमुळे साधनसंपत्ती वरचा ताण वाढतोय त्यामुळे कचऱ्याचे ढीग जमतात व पर्यावरणाची अवनती होते.

५) **सरकारी नियंत्रणाचा अभाव** – जगीतील सर्व देशामध्ये एक वाक्यता नसल्यामुळे जगभरातील साधनसंपत्तीच्या वापरावर सरकारी नियंत्रण नाही. व्यक्तीगत व राष्ट्रीय पातळीवर पर्यावरणविषयक कायद्यांची अंमलबजावणी होत नाही. काही देशात सरकारच आर्थिक प्रगतीच्या नावाखाली चंगळवादाला उत्तेजन देते.

१५.३.२ संवर्धनाची व्याख्या –

संवर्धन म्हणजे साधनसंपत्तीचे संरक्षण, वापराचे व्यवस्थापन व योग्य वापर संवर्धनात अनेक घटकांचा समावेश होतो. संवर्धनाचा पाठपुरावा करणाऱ्या लोकांमुळे शेतीतील उत्पादकता चांगली रहाते. वनांचे संरक्षण होते. वन्य प्राण्यांनाही संरक्षण मिळते. लोकांना पर्यटन स्थळांना आनंद उपभोगता येतो.

सवंर्धन (conservation) हा शब्द दोन लॅटीन शब्दांच्या एकत्रीकरणातून तयार झाला आहे. 'can' चा अर्थ एकत्र आणि 'serve' म्हणजे संरक्षण करणे म्हणजेच 'conservation' म्हणजे एकत्र ठेवणे. हा शब्द प्रथम श्री. गिफोर्ड पिनचोर यांनी १९०८ मध्ये वापरला. संवर्धनाच्या काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) जॉन केनेडी यांच्या मतानुसार –संवर्धन म्हणजे आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापर, तिचा अपव्यय टाळणे व आपल्या साधन संपत्तीची गुणवत्ता व उपयुक्तता वाढवणे.

२) पीटर हॅगेट यांच्या मतानुसार – संवर्धन म्हणजे योग्य वेळी योग्य प्रमाणात साधनसंपत्तीच्या वापर, त्यामुळे जास्तीत –जास्त उत्पादन अधिक लोकांना जास्त काळ मिळत राहील.

३) एच. रॉबिनसन यांच्या मतानुसार –संवर्धन म्हणजे साधनसंपत्तीचा काळजीपूर्वक व योग्य वापर व बेजबाबदार वापर व नाश यापासून साधनसंपत्तीचे संरक्षण .

आपली प्रगती तपासा

प्रश्न - संवर्धन म्हणजे काय ते सांगून सविस्तर स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१५.३.३ संवर्धन का करावे?

आजच्या काळात परिसंस्थेचे संतुलन कायम राखण्यासाठी संवर्धनाची नितांत गरज आहे. कारण आपला आर्थिक विकास व आपला भविष्यकाळ त्यावरच अवलंबून आहे. आर्थिक विकासासाठी साधनसंपत्तीचे संवर्धन आवश्यक आहे आणि कारणे पुढीलप्रमाणे –

१) पुढच्या पिढ्यांना साधनसंपत्तीच्या साठा टिकवून ठेवण्यासाठी.
२) आर्थिक विकासाचा वेग कायम राखण्यासाठी.
३) काही महत्त्वाच्या साधनसंपत्तीची टंचाई टाळण्यासाठी.
४) पर्यावरणीय संतुलन राखणे व पर्यावरणीय समस्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी
५) साधनसंपत्तीचे योग्य प्रमाणात लोकांच्यात वाटप होण्यासाठी.

१५.३.४ संवर्धनासाठी जागतिक उपाययोजना –

१८ व्या शतकापासून २० व्या शतकापर्यंत आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिका या देशातील साधनसंपत्तीचे शोषण विकसित देशांनी वसाहतीकरणाच्या काळात प्रचंड प्रमाणावर केले. कालांतराने या देशांना स्वातंत्र्य मिळाले पण त्यानंतर आर्थिक गरजेपोटी किंवा राजकीय दबावामुळे या देशातील साधन संपत्तीचा वापर / गैरवापर मोठ्याप्रमाणावर झाला त्यामुळे साधनसंपत्तीत घट झाली व अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या.

सध्याची संवर्धनाची चळवळ संयुक्त संस्थानात १९०८ साली सुरु झाली. १९३०नंतर संयुक्त संस्थानात वने, मुद्रा, वन्य जीवन व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संरक्षणासाठी अनेक संस्था स्थापन झाल्या व कायदे केले गेले. संयुक्त संस्थानानंतर युरोपातील देश व रशिया तसेच जगातील इतर देशांना संवर्धनाचे महत्त्व पटले आणि त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेने संवर्धनाच्या कार्यात पुढाकार घेतला. या संघटनेचे वेगवेगळे विभाग जगभर साधनसंपत्तीच्या सवंर्धनासाठी भरीव कार्य करीत आहेत.

१) १९६० मध्ये/IUCN या संस्थेने आर्थिक विकासाबरोबरच संवर्धनाचा विचार मांडला. नवी दिल्ली येथे १९६९ साली याबाबत परिषद झाली. स्टॉकहोम येथे १९७२ साली झालेल्या मानवी पर्यावरण विषयक परिषदेत सवंर्धन आणि विकास यांचा विचार झाला. याच परिषदेत संयुक्त राष्ट्र संघटनेचा या विषयातील रोजगार कार्यक्रम ठरला.

२) १९७५ मध्ये IUCN या संस्थेबरोबर / UNED, UNESCO व FAO या संयुक्त राष्ट्र संघटनेचा इतर संस्थानी एकत्र येऊन 'परिसंस्था संवर्धन गट' स्थापन केला व हळूहळू 'जागतिक संवर्धनाचे धोरण' स्पष्ट होऊ लागलो.

३) १९७७ मध्ये UNEP च्या मार्गदर्शनानुसार IUCN ने जागतिक संवर्धनाच्या समस्या व त्यावरील परिणामकारक उपाय योजना तयार केल्या. यामध्ये वनप्राण्यांचे करण्यावर भर देण्यात आला.

४) संवर्धनाचे जागतिक धोरण / हे १९८० मध्ये मोडण्यात आले व त्यावर स्टॉकहोम परिषदेचे जनरल सेक्रेटरी श्री. मॉरिस स्ट्रॉंग यांनी शोधलेल्या 'Eco – development' या संकल्पनेचा प्रभाव होता. आर्थिक विकास करताना पर्यावरणाचे भान राखावे हा यातील मूळ हेतू IUCN, UNEP व WWF यांनी एकत्र येऊन 'परिसंस्था संवर्धन गट' स्थापन केला व संवर्धनाचे जागतिक धोरण विकसित केले.

आपली प्रगती तपासा

प्रश्न – संवर्धनाची व्याख्या सांगून जागतिक उपाययोजना सांगा.

१५.३.५ संवर्धनाच्या जागतिक धोरणाची वैशिष्टे :

अ) मानवाचे अस्तित्व व विकास ज्यावर अवलंबून आहे त्या अत्यावश्यक पर्यावरणीय प्रक्रिया व जीवन – रक्षक प्रणालीचे संरक्षण करणे. उदा. मृदेचे संवर्धन, पोषक, द्रव्यांचा पुर्नवापर, प्राण्याची स्वच्छता इत्यादी.

ब) जैविक विविधता टिकवणे – कारण त्यावर अनेक प्रक्रिया अवलंबून आहेत. उदा. झाडांची वाढ व संवर्धन, पाळीव प्राणी, सूक्ष्म जीवांवर संशोधन व संवर्धन, शास्त्रीय व वैद्यकीय प्रगती व जैविक साधन संपत्ती वापरणाऱ्या अनेक उद्योगांची तपासणी व त्यावर नियंत्रण इत्यादी पूरक उपाय अवलंविणे.

क) मासे, वन्यप्राणी, वने व इतर जैविक घटकांचा चिरंतर वापर करण्याच्या दृष्टीने केलेल्या उपाययोजना.

जागतिक संवर्धन धोरण्याच्या प्राथमिक गरजा –

अ) पर्यावरण प्रक्रिया व जीवन रक्षक प्रणाली यांच्या प्राथमिक गरजा –

१) शेतीसाठी चांगली जमीन राखून ठेवणे.

२) शेतजमिनीचे नियोजन चांगल्या प्रकारे करणे.

३) वने व कुरणे यासाठी जलसंधारण करणे.

४) किनाऱ्यावरील प्रदेशात मासेमारी संबंधी प्रक्रियेचे व्यवस्थापन व नियोजन करणे.

५) प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे.

ब) जैविक विविधतेची प्राथमिक गरज –

१) विविध प्रजातींचे विनाशापासून संरक्षण करणे.

२) शक्य असेल तिथे पिके, झाडे, वृक्ष, जनावरे, जलचर, सूक्ष्म जीव पाळीव व वन्य प्राण्यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

३) उपयुक्त झाडे व प्राणी यांच्या वनातील मूळच्या वंशजांचे संरक्षण व संवर्धन प्रत्यक्ष जागेवरील संरक्षण कार्यक्रम पुढील घटकांसाठी राबविणे.

अ) वनातील उपयुक्त झाडे व प्राणी यांच्या वनातील मुळच्या वंशजांचे संरक्षण व संवर्धन करणे.

ब) नष्ट होणाऱ्या जातींचा बचाव करणे.

क) परिसंस्था राबवणे.

ड) परिसंस्थेचे विविध प्रकार.

४) परिसंस्थेची गरज व त्यातील प्राणी, वनस्पती लक्षात घेऊन संरक्षित क्षेत्राची व्याप्ती ठरविणे व त्याचे व्यवस्थापन करणे.

५) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाची सांगड घालणे.

क) चिंरतर वापराची प्राथमिक गरज –

१) वापरात येणाऱ्या प्रजातींची व परिसंस्थेची उत्पादकता लक्षात घेऊन त्यांचा वापर उत्पादन क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही याची काळजी घेणे.

२) प्रजातींचा व परिसंस्थेचा वापर करण्यासाठी संवर्धन व्यवस्थापनाचे धोरण ठरविणे.

३) साधन संपत्तीच्या क्षमतेपेक्षा तिचा वापर वाढणार नाही याची काळजी घेणे.

४) पिकांचे उत्पादन अतिरिक्त न घेता ते चिरंतन विकासाच्या पातळीपर्यंत घेणे.

५) उदर निर्वाहाच्या पातळीवर जगणाऱ्या समाजाला साधनसंपत्तीच्या वापराचे योग्य ज्ञान देणे

६) प्रजातींचे पर्यावरण टिकवणे.

७) वन्य प्राणी व वनस्पतींच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण ठेवणे.

८) लाकडाच्या व्यापारावर नियंत्रण ठेवणे.

९) जळावू लाकडाच्या वापरावर नियंत्रण ठेवणे.

१०) वनस्पती व प्राण्यांची उत्पाकता अधिक काळ टिकविण्यासाठी कुरणांवर नियंत्रण ठेवणे.

११) पाळीव प्राण्यांबरोबर वन्य प्राण्यांचाही वापर व संवर्धन करणे.

आपली प्रगती तपासा .

प्रश्न - संवर्धन धोरणाच्या जागतिक प्राथमिक गरजा सांगा.

१५.३.६ ब्रंटलँड अहवाल (Brundtiand Report)

१९८७ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्वसाधारण सभेत 'आपले सर्वांचे समान भविष्य' या नावाचा अहवाल सादर करण्यात आला. हा अहवाल ब्रटंलँड अहवाल म्हणून ओळखला जातो. पर्यावरण व द्रारिद्रय या जागतिक महत्त्वाच्या समस्या मानल्या गेल्या. अनेक कारणांमुळे ब्रॅटलँड कमिशनचे कार्य महत्त्वाचे आहे.

अ) १९७२ मध्ये पर्यावरणवाद्यांनी स्टॉकहोम येथे भरविलेल्या परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे विचारात घेतले.

ब) इतर सतित्यांच्या कार्याच्या मानाने ब्रँटलँड कमिशनला अधिक यश मिळाले कारण याचा संबधं प्रत्यक्ष संयुक्त राष्ट्रांच्या सर्व साधारण सभेशी होता.

क) आंतरराष्ट्रीय विकसाच्या संदर्भात या अहवालाची चर्चा आर्थिक व राजकीय क्षेत्रात झाली व त्यातून चिरंतन विकासाची जाणीव निर्माण झाली.

ड) या अहवालामुळे प्रथमच पर्यावरणीय समस्या आंतरराष्ट्रीय राजकीय पटलांवर आल्या.

चिरंतन विकासाच्या संकल्पनेतून निर्माण झालेली पर्यावरण व विकास धोरणाची उद्दिष्टे:

१) वाढीचे पुनरुज्जीवन.

२) वाढीच्या गुणवत्तेत बदल

३) रोजगार, अन्न, ऊर्जा, पाणी व इतर मूलभूत सुविधांची पूर्तता.

४) लोकसंख्येची चिरंतन पातळी कायम राखणे.

५) साधनसंपत्तीचे संवर्धन व वाढ करणे.

६) तंत्रज्ञानात बदल.

७) निर्णय प्रक्रियेत पर्यावरण व अर्थकारण यांची सांगड घालणे.

१५.३.७ रिओ परिषद (Rio- Conference) –

१९८९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने पर्यावरण आणि विकास यावर जून १९९२ मध्ये ब्राझीलमधील रिओ डी जानेरो येथे आंतरराष्ट्रीय परिषद घेण्याचे ठरविले या परिषदेत पुढील मुद्दांवर विचार झाला.

१) या शतकाच्या शेवटपर्यंतची (इ.स. २०००) प्रमुख पर्यावरणीय व विकासाची आव्हाने व संधी.

२) विकसनशील देशांमधील दारिद्र्य.

३) साधनसंपत्तीचा धोकादायक वापर.

४) जागतिक लोकसंख्या वाढ.

या परिषदेत २१ व्या शतकातील चिरंतन विकासासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला व वनांच्या सरंक्षणावर भर देण्यात आला. याच परिषदेत हवामान बदल व जैविविधता या संबंधीच्या करारावर १५४ देशांनी सह्या केल्या. रिओचा जाहीरनामा २७ तत्वांवर आधारित आहे. त्यापैकी दुसरे तत्त्व हे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनाशी निगडीत आहे. त्यानुसार प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील साधनसंपत्ती संवर्धनाशी निगडीत आहे. त्यानुसार प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील साधनसंपत्तीचा वापर करताना त्याचा विपरीत परिणाम इतर राज्यांच्या पर्यावरणावर होणार नाही. याची काळजी घेणे आवश्यक आहे.

१५.३.८ क्याटो जाहीरनामा – डिसेंबर १९९८ मध्ये क्योटो येथे United Framework Convention on climatic/chagne (UFCCC) ची बैठक झाली. या परिषदेचा भर जगातील हवामानाला धोकादायक असणाऱ्या वायू (GHG) चे वाढते प्रमाण कमी करण्यावर होता. कारण त्यामुळे हवामान व पर्यायाने पर्यावरणाला धोका निर्माण होतो.

१५.४ भारतातील पर्यावरण संरक्षण व संवर्धन

१९७० नंतर भारतातील पर्यावरण संरक्षण व संवर्धनास वेग आला. या संबंधातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींचा प्रतिसाद भारतात उमटला. आपल्या राज्यघटनेतील ४२ व्या कलमातही पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने बदल करण्यात आला. कलम ४८ अ नुसार वने व वन्य प्राण्यांचे संरक्षण करणे व पर्यावरणाची गुणवत्ता वाढविणे ही राज्याची जबाबदारी आहे. तर कलम ५१ अ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकांचे हे कर्तव्य आहे की त्याने नैसर्गिक पर्यावरणातील वणे, तळी, नद्या व वन्यजीवनाचे संरक्षण करावे व त्यांच्या गुणवत्तेत वाढ करावी तसेच सजीवांबद्दल सहानुभूती असावी.

पर्यावरणाची गुणवत्ता वाढावी व त्याचे संरक्षण करावे यासाठी नियोजन आयोगाच्या उपअध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली १९८० मध्ये एक उच्च स्तरीयसमिती स्थापन करण्यात आली. या समितीने पर्यावरणासाठी वेगळा विभाग स्थापण्याची सूचना केली हा विभाग १ नोव्हेंबर१९८० साली स्थापन करण्यात आला. त्याची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

अ) पर्यावरण संरक्षण व आर्थिक विकास यांतील केंद्रीय संस्था म्हणून कार्य करणे.

ब) विकास प्रकल्पाचे पर्यावरणीय परिणाम तपासणे.

क) प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना करणे.

ड) विशिष्ट परिसंस्थेचे संवर्धन करणे.

इ) सागरी परिसंस्थेचे संवर्धन करणे.

फ) कुरणांचे संरक्षण करणे.

ग) घातक पदार्थांवर नियंत्रणाचा कायदा.

पर्यावरण रक्षण व परिसंस्थेचे संतुलन कायम राखण्यासाठी भारत सरकारने अनेक कायदे केले आहेत. त्यातील काही कायदे पुढीलप्रमाणे -

अ) वन्यजीवन संरक्षण कायदा – १९७२

ब) पाण्याचे प्रदूषण नियंत्रण – १९७४

क) हवेचे प्रदूषण नयंत्रण – १९८१

ड) वनसंवर्धन कायदा – १९८०

इ) वन्यजीवन संरक्षण कायदा – १९७२

फ) पर्यावरण संरक्षण कायदा – १९८६

या कायद्याअंतर्गत प्रदूषण नियंत्रणावर भर दिला आहे. तसेच धोकादायक पदार्थ हाताळण्यासाठी ही नियम केले आहेत. त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी कडक शिक्षेची तरतूद आहे.

भ) पर्यावरणीय ऑडिटची सुरुवात -१९९२

ह) राज्यपातळीवरील प्रदूषण नियंत्रण समित्याची स्थापना.

भारतातील संवर्धन धोरण मात्र फारसे कडक नाही. खनिजांचे संवर्धन आणि ऊर्जेचे संवर्धन याबाबत अतिशय कमी नियम व निर्बंध आहेत.

१५.४.१ संवर्धनाच्या सर्वसाधारण पध्दती :

शाधनसंपत्तीच्या संवर्धनाची आत्यंतिक गरज निर्माण झाली आहे. त्यातही पुनः निर्माण न होणाऱ्या खनिज संपत्ती – धातू व खनिज तेल, कोळसा यांच्या संवर्धनाची तातडीने गरज आहे. जगात वापरल्या जाणाऱ्या एकूण ऊर्जेपैकी ७० ऊर्जा खनिज तेलाच्या वापरातून मिळते व ते हे प्रमाण वाढतच आहे. सध्याचा तेल वापरण्याचा दर लक्षात घेता उपलब्ध तेलाचे साठे येत्या ३० वर्षातच संपतील. यासाठीच खनिज तेलाचे संवर्धन करणे त्याला पर्याय शोधणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

संवर्धनाचे धोरण ठरविताना त्यात पुढील घटकांचा विचार घेणे आवश्यक आहे.

अ) पर्यायी घटक – (Substitution)

ब) पूर्नवापर – (Recyling)

क) नवीन शोध – (नवीन कल्पना - Innovation)

ड) अपव्यय टाळणे - (Miaimisation of Loaiste)

इ) समाजाला प्रशिक्षण – (Mass Education)

फ) वापरावर नियंत्रण - (Stationary Control)

ग) साठ्याचा अंदाज -(Resource Estimation)

घ) भविष्यकाळातील गैरजेचा आढावा – (Assessment of future needs)

अ) पर्यायी घटक –

खनिज तेल एकदा वापरले की संपून जाते व त्यामुळे भविष्यात गंभीर समस्या निर्माण होऊ नये. यासाठी त्या सांधन-संपत्तीला पर्यायी घटक शोधणे महत्त्वाचे ठरते. उदा. औष्णिक ऊर्जा कोळसा जाळून मिळविली जाते तर जलविद्युत पाण्याच्या वापरातून निर्माण होते. यामुळे औष्णिक ऊर्जेपेक्षा जलविद्युत वापरण्यास प्राधान्य व प्रोत्साहन दिले पाहिजे. दुर्देवाने आपल्या देशात भरपूर जलस्त्रोत असूनही जलविद्युत निर्माण करण्यापेक्षा औष्णिक ऊर्जेकडे प्राधान्य दिले जाते. त्याचप्रमाणे भारतात गुरांची संख्या सर्वाधिक आहे. यामुळे शेतकऱ्यांनी रासायनिक खतांऐवजी शेणाचा वापर करणे पर्यावरणाच्या दृष्टीने अधिक उपकारक आहे.

ब) पुर्नवापर –

लोखंडी वस्तूंचे भंगार वितळवून पुन्हा लोकांना मिळते. उसाच्या चिपाडापासून ऊर्जा मिळू शकते तसेच अल्होकोल तयार करण्यातही त्याचा वापर होतो.

क) नवीन शोध / कल्पना –

नवीन कल्पना व सतत संशोधन केल्यामुळे साधनसंपत्तीचा अधिक चांगला वापर करता येतो. पाश्चिमात्य औद्योगिक देश पुर्ननवीकरणीय व न संपणारा ऊर्जेचा स्त्रोत शोधून काढण्यासाठी कोटयावधी डॉलर्स खर्च करीत आहेत.

ड) अपव्यव टाळणे –

जगाची लोकसंख्या वाढतच आहे. त्यामुळे साधनसंपत्तीची मागणी वाढतच आहे. असलेली साधनसंपत्ती अधिक काळ वापरण्यासाठी तिचा अपव्यव टाळणे अत्यंत आवश्यक आहे. झेरॉक्सची सोय उपलब्ध झाल्यामुळे आपण कागदपत्राच्या उगाचच झेरॉक्स काढणे. त्यामुळे किती झाडांचा बळी कागद निर्मितीसाठी केला गेला असेल याचा विचार आपण करीत नाही. त्याचप्रमाणे पाणी व खनिज तेलाचाही अपव्यय टाळणे आवश्यक आहे.

इ) समाजाला प्रशिक्षण –

साधनसंपत्ती संवर्धनाची जाणीव समाजातील सर्व घटाकांना झाल्याशिवाय त्याची योग्य अंमलबजावणी होणार नाही यासाठी समाजातील सर्व घटकांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देणे व अंमलबजावणीसाठी कडक कायदे करणे आवश्यक आहे.

फ) वापरावर नियंत्रण –

श्रीमंत देश व श्रीमंत माणसे साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर करतात. तसेच मोड्या औद्योगिक कंपन्याही भरमसाठ वापर करतात, प्रदूषण करतात. यासाठी कडक कायद्यांद्वारे साधन-संपत्तीच्या वापरावर नियंत्रण आणणे अत्यावश्यक आहे. विशेषतः खाणकाम, वृक्षतोड, किनाऱ्यावरील व नदीतील वाळूचा वापर यावर नियंत्रणाची तातडीची गरज आहे.

ग) साठ्याचा अंदाज –

संवर्धन कार्यक्रमाची आखणी करण्यापूर्वी देशातील विविध प्रकारच्या साधनसंपत्तीची उपलब्धता व एकंदर साठ्याचे प्रमाण याचा अंदाज येणे आवश्यक आहे. त्यामुळे नियोजन धोरणे ठरविताना मदत होते. जपानमध्ये जलविद्युत निर्मितीस वाव आहे. तर खनिज तेल आयात करावे लागते. तर सौदी अरेबियात खनिज तेल भरपूर असून वाळवंटी प्रदेशामुळे जलविद्युत निर्मितीस चांगला वाव नाही. त्याचप्रमाणे इतर साधनसंपत्तीच्या साठ्याचा अंदाज घेणे आवश्यक आहे.

घ) भविष्यकाळातील गरजेचा आढावा –

भविष्यकाळातील वाढणारी लोकसंख्या औद्योगिक विकास, बाजारपेठा इत्यादी लक्षात घेऊनच संवर्धनाचे धोरण आखणे जरुरीचे आहे. व्यक्तीगत फायद्यापेक्षा समाजाचा फायदा लक्षात घेऊन संवर्धन कार्यक्रमाची आखणी केली व त्याला सरकारने पाठिंबा दिला तरच हे कार्यक्रम यशस्वी होतील व मानवी समाजाचे भले होईल.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - संवर्धनाच्या सर्वसाधारण पध्दती स्पष्ट करा.

_____

_____

_____

१५.४.२ संवर्धनासाठी प्राधान्य कृती -

१) **लोकसंख्या व साधनसंपत्तीच्या वापरावर नियंत्रण** – शाळा, समाजसेवी संस्था, सरकारी संस्था यांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना वाढत्या लोकसंख्ये विषयी तसेच बेजबाबदार साधनसंपत्तीच्या वापराविषयी जाणीव करुन देणे अत्यंत आवश्यक आहे.

अ) पृथ्वीवरील साधनसंपत्ती मर्यादित आहे.

ब) लोकसंख्येवर नियंत्रण अत्यावश्यक आहे.

क) नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरिक्त व अनावश्यक वापर टाळला पाहिजे.

ड) श्रीमंत लोकांनी तसेच विकसित राष्ट्रातील लोकानां त्यांचा उच्च राहणीमानाचा दर्जा कायम राखूनही साधनसंपत्तीचा अनावश्यक अपव्यय टाळणे शक्य आहे.

२) **राष्ट्रीय नियोजनात लोकसंख्या व साधनसंपत्तीचा वापर याची सांगड घालणे** –

अ) लोकसंख्येतील वाढ स्थिरावण्यासाठी सरकारी धारेणात बदल अपेक्षित आहे.

ब) ऊर्जेचा वापर व इतर साधन संपत्तीचा वापर यावर सरकारी नियंत्रण असावे.

क) खाजगी क्षेत्राला तसेच अशासकीय संस्थाना कुटुंब नियोजन तसेच साधनसंपत्तीच्या योग्य वापरासंबधी कार्यक्रम व समाजात जागृती करण्यास सरकारने उत्तेजन देणे आवश्यक आहे.

३) **साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर** –

पुर्ननवीकरणीय व अपुर्ननवीकरणीय साधनसंपत्तीचा वापर अधिक कार्यक्षमतेने केल्यास पैशाची बचत होईल व आधुनिक तंत्रज्ञानामुळे साधनसंपत्तीचा पुरेपुर वापर करता येईल व प्रदूषणही कमी होण्यास मदत होईल.

अ) साधनसंपत्तीचा योग्य वापर व्हावा, अपव्यय टाळावा यासाठी उद्योगसंस्थांनी सुयोग्य तंत्रज्ञानाचा वापर करावा म्हणून योग्य निर्बंध अंमलात आणावेत व सहकार्य करणाऱ्या उद्योगांना आर्थिक लाभ द्यावेत.

ब) पर्यावरणाच्या दृष्टीने अनुकूल उत्पादने व प्रक्रियांना पुरस्कार द्यावेत.

क) गरीब देशांनी सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा व त्यासाठी मदत घ्यावी.

४) **ऊर्जेच्या व साधनसंपत्तीच्या अतिरिक्त वापरावर निर्बंध** –

ऊर्जा साधनसंपत्तीच्या वापराला सरकारने अजिबात सवलती देऊ नयेत. ऊर्जा साधनसंपत्तीच्या अतिरिक्त व बेताल वापरावर जबरदस्त कर आकारण्यात यावा.

५) **पर्यावरण प्रेमी ग्राहक व्हा** – देशातील तसेच घरातील विविध प्रकारच्या साधानसंपत्तीचा शक्य असेल तेथे पुर्नवापर व्हावा. श्रीमंत देशातील नागरिकांनी पर्यावरणाची कमीत कमी हानी करणारी उत्पादने खरेदी करण्यावर भर द्यावा. पर्यावरणास अनुकूल उत्पादने व सेवांचीच मागणी करावी व स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील प्रसार माध्यमातून जनजागृती करावी. तसेच नातेवाईक, मित्र, सहकारी व कुटुंबातील व्यक्तींनाही पर्यावरण प्रेमी ग्राहक होण्यास प्रोत्साहन द्यावे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - संवर्धनासाठी प्राधान्य कृती कोणत्या आहेत.

१५.४.३ पर्यावरणाला अनुकूल घटकांचा वापर – (प्रेमी ग्राहक) (Green Consumption)

ज्या घटकांच्या वापरामुळे मानवाच्या आरोग्याला अपाय होत नाही तसेच नैसर्गिक आरोग्याला अपाय होत नाही. तसेच नैसर्गिक परिसंस्थेचे कार्य व विविधता अबाधित रहाते अशा घटकांना पर्यावरणीय अनुकूल घटक असे म्हटले जाते.

बऱ्याच घटकांचे उत्पादन करताना पर्यावरणाचा विचार केला जात नाही व त्यामुळे जमीन, पाणी, व हवेचे प्रदूषण होते व पर्यावरणाची अपरिमित हानी होते. यामुळे पर्यावरणास अनुकूल अशाच निर्मिती प्रक्रिया व घटकांचा वापर करण्याची मागणी सर्वत्र होत आहे. कारण त्यामुळे अनेक फायदे होतील व देशांचा चिरंतन विकास साधणे शक्य होईल.

याबाबतीत विकसित देशांनी पुढाकार घेतलेला असला तरीही विकसनशील देशांनीही त्यांची जबाबदारी ओळखून ग्राहक, वस्तू, व्यापार व समाज या बाबतीत जाणीव जागृती करणे आवश्यक आहे.

पर्यावरणाला अनुकूल घटकांचे महत्त्व (Importance of Green Consumption)

१) पूर्वी केवळ पर्यावरणविषयक नियमांमध्ये प्रदूषण नियंत्रणाचाच विचार केला होता पण पर्यावरणाला आवश्यक अपायकारक घटकांचे उत्पादन व सेवा प्रतिबंधाचा विचार मात्र फारसा झाला नव्हता.

२) गेल्या काही वर्षात प्रदूषण व्यवस्थापन धोरणाचा भाग म्हणून स्वच्छ (पर्यावरणाच्या दृष्टीने) उत्पादन – प्रक्रियांना प्राधान्य मिळाले.

३) अशा प्रकारच्या स्वच्छ उत्पादनांमुळे प्रदूषणात घट होते. ज्यात पदार्थाचे प्रमाण कमी होते. तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने अपायकारक उत्पादने व सेवांना आळा बसतो.

४) स्वच्छ उत्पादन प्रक्रियांचा विचार करताना कच्चा माल, उत्पादन प्रक्रिया, वस्तूंचे वितरण, वापर, पुर्नवापर इत्यादी सर्व अवस्थांमध्ये पर्यावरणाचाच विचार प्राधान्याने होतो.

५) आर्थिक विकास व लोकसंख्येची वाढ यामुळे वस्तूंचे उत्पादन, ऊर्जा व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापर वाढत आहे.

६) पर्यावरणाला अनुकूल घटकांचा वापर अधिक प्रमाणात होण्यासाठी ग्राहक, समाज यांची जाणीव, जागृती स्थानिक प्रादेशिक, राष्ट्रीय व जागतिक पातळीवर होणे आवश्यक आहे.

७) चिरंतन विकासाच्या दृष्टीने पर्यावरणाला अनुकूल घटकांचा वापर अधिक प्रमाणात होणे आवश्यक आहे.

१५.४.४ पर्यावरणाला अनुकूल घटकांचा वापर कसा सुरु करता येईल ?

समाजातील सर्वघटकांच्या मदतीने याबाबतची माहिती सर्व समाजाला देणे व पर्यावरणाला अनुकूल घटकांचा अधिक प्रमाणात वाढविणे शक्य आहे. याबाबतीतील

प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१) **सरकारचे कार्य** - विविध धोरणे व नियंत्रण यांच्यामार्फत सरकारने उत्पादन प्रक्रियांवर निंयत्रण ठेवून पर्यावरणास अनुकूल उत्पादनास प्राधान्य द्यावे.

२) **उद्योग व व्यापार यांचे कार्य** - पर्यावरणास अनुकूल घटकांचा वापर करण्यासाठी पुढील घटक आवश्यक आहेत.

अ) साधनसंपत्ती व ऊर्जेचा अधिक कार्यक्षम वापर.

ब) स्वच्छ उत्पादने व तंत्रज्ञानाचा वापर.

क) अधिक कार्यक्षम उत्पादन प्रक्रिया.

ड) सुधारित पुर्नवापर.

इ) सुरक्षित साठवणूक, वाहतूक व मालाची हाताळणी.

३) **अशासकीय संस्थाचे कार्य** - सरकार व समाज यांच्या सहकार्याने या विषयाची माहिती जमा करुन तिचा प्रसार करणे, ग्राहकांना मार्गदर्शन करुन सरकारवर अंकुश ठेवणे, जनजागृतीत पुढाकार घेणे.

४) **सर्वसामान्य ग्राहकांचे कार्य** - ग्राहक हाच राजा मानला जातो. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांनी काळाची गरज ओळखून पर्यावरणास अनुकूल घटकांचा, वस्तूंचा वापर करणे आवश्यक आहे.

अ) त्यासाठी प्रचलित जीवनपध्दती व सवयींमध्ये बदल करणे व अधिक प्रमाणात पर्यावरणास अनुकूल घटकांची खरेदी करणे आवश्यक आहे.

ब) साधनसंपत्ती व ऊर्जेचा मर्यादित वापर व घरी तसेच कामाच्या ठिकाणी त्याज्य पदार्थाचे प्रमाणावर नियंत्रण ठेवणे.

१५.५ सारांश

"मानवाच्या सभोवताली असलेल्या वातावरणास पर्यावरण असे म्हणले जाते." मानव हा देखील या पर्यावरणाचाच एक भाग आहे असे म्हटल्ास वावगे ठरु नये. मानवाबरोबरच इतर पशू, पक्षी, प्राणी, जीव, जंतू, वनस्पती, नद्या, पर्वत, हवामान इ. सर्वांचा समावेश 'पर्यावरण' या संकल्पनेमध्ये होतो. थोडक्यात "पृथ्वीवरील सजीव व निर्जीव घटकांच्या समुच्चयास पर्यावरण असे म्हणतात."

या पर्यावरणाच्या माध्यमातून प्रत्येक सजीव स्वत:च्या गरजा भागवून घेत असतो. मानव हा बुद्धीशील प्राशी असल्यामुळे त्याने आपल्या सोईनुसार पर्यावरणातील घटकांचा वापर करण्यास सुरवात केली. प्रत्येक सजीवास प्राथमिक गरजा असतातच परंतु मानवाने मात्र प्राथमिक गरजांबरोबरच दुय्यम गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणाचा अधिक प्रमाणात वापर करण्यास सुरूवात केली. एक प्रकारे मानवाने स्वार्थासाठी पर्यावरणावर आक्रमण केले व येथूनच पर्यावरणाच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. वाढत्या लोकसंख्येमुळे नागरीकरणाची प्रक्रिया घडून आली व त्यातून पुढे औद्योगिकीकरणास चालना मिळाली आरि यातूनच पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत असलेली परिस्थिती निर्माण झाली.

झंगलतोड, सांडपाणी, सुका व ओला कचरा, कारखान्यातील दुषित व रसायनयुक्त पदार्थ, वाहनांमधून निघणारा धूर या सर्व बाबी पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरल्या.

१५.६ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) पर्यावरण म्हणजे काय ? पर्यावरणाची व्याप्ती विशद करा.

२) पर्यावरणाचा ऱ्हास कोणत्या कारणांमुळे होतो ते स्पष्ट करा.

३) कृषि क्रियांमुळे व औद्योगिकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कसा होतो, स्पष्ट करा.

४) नागरीकणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कोणत्या समस्यांमुळे होतो सविस्तर स्पष्ट करा.

५) पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम स्पष्ट सविस्तर करा.

६) साधनसंपत्तीचे संवर्धन म्हणजे काय ते सांगून, संवर्धनासाठी जागतिक उपाययोजना स्ष्टष्ट करा.

७) संवर्धन का करावे ? संवर्धनाच्या पद्धती व संवर्धनाच्या प्राधान्य कृती विशद करा.

८) पर्यावरण म्हणजे काय ? पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम स्पष्ट करा.

९) टिपा लिहा.

१) पर्यावरण.

२) पर्यावरण ऱ्हासाचे परिणाम.

३) वाळवंटीकरण.

४) जंगलतोड.

५) आम्लपर्जन्य व सरोवराची शुष्कता.

❖❖❖❖

१६

तणाव आणि संघर्षाचे आकलन

पाठाची रचना :

१६.० पाठाची उद्दिष्ट्ये
१६.१ प्रास्ताविक
१६.२ संघर्ष
१६.२.१ संघर्षाची कारणे
१६.३ तणाव
१६.३.१ तणावाची कारणे
१६.३.२ तणावाचे परिणाम
१६.४ नीतीतत्वे, मूल्ये, चाकोरीबद्ध विचारसरणी, पूर्वग्रह यांची वैयक्तिक विकासातील भूमिका.
१६.४.१ नीतीतत्वांचे वर्गीकरण
१६.४.२ मूलभुत मानवी मूल्ये
१६.४.३ साचेबंद कल्पना / चाकोरीबद्ध विचारसरणी
१६.४.४ पूर्वग्रह आणि त्यांची वैयक्तिक विकासातील भूमिका
१६.५ तणाव आणि संघर्ष यांची सार्वजनिक अभिव्यक्ती म्हणजे आक्रमक वृत्ती आणि हिंसाचार
१६.६ सारांश
१६.७ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१६.० उद्दिष्ट्ये

- संघर्ष ही संकल्पना समजावून घेऊन त्याच्या कारणांचा अभ्यास करणे.
- तणाव ही संकल्पना समजावून घेऊन तिच्या कारणांचा व परिणामांचा अभ्यास करणे.
- नीतीतत्वे समजावून घेणे.
- मुलभूत मानवी मूल्ये समजावून घेणे.
- चाकोरीबद्ध विचार किंवा साचेबंद कल्पना समजावून घेणे.
- पूर्वग्रह ही संकल्पना समजावून घेणे.
- आक्रमक वृत्ती आणि हिंसाचार या संकल्पना समजावून घेणे.

१६.१ प्रास्ताविक

जगातील प्रत्येक व्यक्तिला सध्याच्या काळात ताण, तणाव, वैफल्य आणि संघर्ष यांचा सामना करावा लागतो. संघर्ष हे वैफल्याचे, निराशेचे कारण आणि परिणाम आहे. वैफल्य आणि संघर्ष नियंत्रणात ठेवण्यासाठी व्यक्ती तणावावर नियंत्रण मिळविले पाहिजे.

१६.२ संघर्ष

जेव्हा एकाचवेळी दोन उद्दिष्ट्ये पूर्ण होऊ शकत नाहीत, एकाबाबत समाधान तर दुसऱ्या उद्दिष्ट्याबाबत निराशा येते. ज्याचे हितसंबंध एकमेकांच्या विरोधात आहेत आणि ते परस्परांना शह काटशह देतात अशा घटकांमध्ये संघर्ष असतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या आकांक्षा दुसऱ्या व्यक्तीमुळे विफल होतात तेव्हा ती संघर्षाला प्रवृत्त होते. संघर्षामध्ये एकमेकांचा नाश करण्याचा किंवा एकमेकांचे शारीरिक व मानसिक नुकसान करण्याचा प्रयत्न केला जातो. जसा संघर्ष दुसऱ्या व्यक्तीबरोबर असू शकतो तसा तो व्यक्तीच्या ठिकाणी अंतर्गत स्वरूपाचा असू शकतो. व्यक्तीच्या दोन किंवा अधिक आकांक्षा, प्रेरणा यातील परस्परविरोधामुळे जी शारीरिक व मानसिक तणावाची स्थिती अनुभवास येते तिला व्यक्तीचा अंतर्गत संघर्ष असे म्हणतात. या ठिकाणी दोन व्यक्ती आणि व्यक्तीसमूह यांच्या दरम्यानच्या संघर्षाचा विचार करावयाचा आहे. या संघर्षाचे स्वरूप कुटुंब, शेजारी यापासून ते आंतरराष्ट्रीय घडामोडीपर्यंत असू शकते. निंदानालस्तीपासून युद्धापर्यंत संघर्षाचे विविध प्रकार आढळतात.

संघर्षाच्या सनातनवादी दृष्टीकोनानुसार कोणताही संघर्ष दोन्ही घटकांना हानिकारक असतो. त्यामुळे संघर्ष निवारण्याच्या दृष्टीकोनावर सनातनवादी भर देतात. संघर्षाच्या वर्तनवादी दृष्टीकोनानुसार परस्परविरोधी हितसंबंधामुळे संघर्ष पूर्णपणे टाळता येत नाही. त्याची तिव्रता कमी करणे एवढेच शक्य असते. संघर्ष अपरिहार्य आणि आवश्यकही आहे. संघर्ष हा प्रगतीचा पाया आहे. त्यामुळे समस्येची चिकित्सा होते आणि त्यामुळे दुरुस्ती शक्य होते.

१६.२.१ संघर्षाची कारणे

१) आक्रमण :

व्यक्तिला आपल्या प्रेरणांच्या आड येणाऱ्याबद्दल राग येतो. त्यातुन आक्रमण घडते. संघर्षाने हेतू साध्य होतात असा अनुभव आला की व्यक्ती आक्रमणाने ते साध्य करायला शिकते. युद्ध हा त्याचाच प्रकार आहे. हेतू साध्य होतो हे लक्षात आल्यानंतर आक्रमणाचे अनुकरण होते.

२) शारीरिक अस्वस्थता :

गर्दी, कर्कश आवाज, कडक उष्णता, स्पर्धा, दमणूक यामुळे लोक वैतागतात. त्यांच्यात साध्या साध्या कारणावरून भांडणे लागतात. शारीरिक अस्वस्थता हे सुद्धा संघर्षाचे प्रमुख कारण आहे.

३) स्पर्धा :

अतिरेकी स्पर्धा आणि त्यातुन हरण्याची भिती यामुळे व्यक्ति संघर्षाला प्रवृत्त होते. सत्ता, पैसा आणि स्त्री यांच्या संदर्भातील स्पर्धा संघर्षाला कारणीभूत ठरते. दुर्मिळ गोष्ट मिळविण्यासाठी स्पर्धा आणि त्यातून द्वेष व संघर्ष निर्माण होतो.

४) साचेबद्ध प्रतिमा आणि पूर्वग्रह :

एखाद्या समुहाबाबत अपूऱ्या माहितीवर आधारित प्रतिकूल मत म्हणजे पूर्वग्रहातून द्वेष, मत्सर, राग, संशय निर्माण होतो. त्याची परिणती संघर्षात होते. दुसऱ्या समुहातील लोकांच्या स्वभावाबद्दल आपल्या मनात ज्या कायमच्या प्रतिमा तयार होतात त्यांना साचेबद्ध प्रतिमा म्हणतात. त्यातून निर्माण होणाऱ्या द्वेषामुळे संघर्ष उद्‌भवतात.

५) अन्यायाची भावना :

आपल्यावर एखाद्या व्यक्तिने अगर समाजाने अन्याय केला आहे ही भावना संघर्षाचे कारण ठरते आपल्या मार्गात अनेक अडथळे आहेत आणि दुसऱ्याला सहज फायदा मिळतो आहे अशावेळी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची चीड संघर्षात परावर्तीत होते.

६) भूमिकांमधील आंतरविरोध :

बऱ्याचदा एकाच व्यक्तीला परस्परविरोधी भूमिका बजावाव्या लागतात. भूमिकांमध्ये निर्माण झालेला आंतरविरोध संघर्षाचे कारण ठरते. तर काही वेळा दोन व्यक्तींच्या भूमिका परस्परविरोधी असतात. उदा. चोर आणि पोलिस.

७) संवादाचा अभाव :

दोन व्यक्ती किंवा दोन समुह यांच्यामध्ये संवादाचा अभाव असेल तर परस्परांच्या भूमिका एकमेकांना समजत नाहीत. एकमेकांबद्दल संशय वाढत जातो. संवाद साधण्यामध्ये प्रतिष्ठा आड येते. दुसऱ्याच्या प्रत्येक कृतीचा चुकीचा अर्थ लावला जातो. त्यामुळे संघर्ष घडून येतात.

आपली प्रगती तपासा.

१) संघर्ष म्हणजे काय ? संघर्षाची कारणे सांगा.

_____

_____

_____

_____

१६.३ तणाव (Stress)

तणाव हा सध्याच्या दैनंदिन जीवनाच्या अविभाज्य भाग आहे. आधुनिक औद्योगिक आणि तांत्रिक समाजव्यवस्थेत टाळता न येणारी बाब म्हणजे तणाव होय. तणावाचे स्वरूप वेगवेगळे असू शकते. परंतु तणावातून कोणाचीही सुटका नाही. सध्याच्या स्थितीत ताण तणाव हे अनेक आजारांचे कारण आहे. काही कौटुंबिक, व्यावसायिक किंवा दैनंदिन जीवनातील काही प्रसंग असे असतात की, ज्यामुळे माणसाचे स्वास्थ बिघडून जाते. जेव्हा ही परिस्थिती व्यक्तीच्या क्षमतेच्या बाहेर जाते तेव्हा व्यक्ती शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या आजारी पडते. त्याच्या नित्य संपर्कात येणाऱ्या सर्वांवर त्या आजाराचे वाईट परिणाम होतात. अशा व्यक्तीला त्याच्या सामाजिक जीवनात समयोजन साधणे अवघड होते.

तणाव संकल्पना :

एखाद्या परिस्थितीमुळे निर्माण होणारा दबाव व्यक्तीच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेल्यामुळे व्यक्तीच्या भावना, विचारप्रक्रिया आणि शारीरिक स्थिती याबाबतीत सदैव ताण जाणवणे म्हणजे तणाव होय.

जोसेफ मॅकग्राथ :

"व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक क्षमता आणि त्याच्याकडे उपलब्ध असणारी साधनसामुग्री याच्यापेक्षा एखादी परिस्थिती मोठे आव्हान निर्माण करते की जे त्याला पेलणारे नसते. त्यावेळी त्याची जी मानसिक स्थिती निर्माण होते तिला तणाव असे म्हणतात."

मॉर्गन :

तणाव म्हणजे अशी मानसिक स्थिती की जी आजुबाजूची परिस्थिती आणि सामाजिक स्थिती यांनी निर्माण केलेली असते. ही परिस्थिती हानीकारक, नियंत्रणाबाहेर आणि आपल्या संसाधन क्षमतेच्या बाहेर असते.

वरील व्याख्येवरून तणावाची काही वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतात.

तणावाची वैशिष्ट्ये

तणाव आणि सर्वसाधारण समयोजन लक्षणे :

सेल्से यांच्या मते तणावाचा सामना करण्यासाठी शरीर आपली सर्व साधने गोळा करून सज्ज होते. यामध्ये रक्तदाब वाढणे, जोराचा श्वास, स्नायु सज्जता यांचा समावेश होतो. याला त्याने क्रमवार सर्वसाधारण समयोजन लक्षणे असे म्हटले. त्यातील तीन टप्पे याप्रमाणे-

१) धोक्याची सूचना देणारी प्रतिक्रिया

याच्या धक्का अवस्था आणि प्रतिधक्का अवस्था अशा दोन अवस्था असतात. धक्का अवस्थेत शरीर आपोआप स्वत:चे रक्षण करायला सज्ज होते. रक्तदाब, हृदयाचे ठोके वाढणे, स्नायु सज्ज होणे हे शारीरिक बदल घडून येतात. तर प्रतिधक्का अवस्थेत शरीर तात्पुरत्या स्वरूपात या लक्षणातून पून्हा पूर्व-स्थितीला येते.

२) प्रतिकार अवस्था :

जर तणाव निर्माण करणारी स्थिती तशीच पुढे चालू राहात असेल तर व्यक्ती त्या स्थितीशी समयोजित होते. शरीर मूळच्या समतोल स्थितीला आणण्याचे प्रयत्न होतात. व्यक्तीला सामान्य स्वास्थ्य मिळवुन देण्याचा प्रयत्न शरीर करते.

३) थकवा :

प्रतिकार अवस्था गाठून तणाव तसाच पुढे राहिला तर शरीरातील ताकद कमी होत जाते. थकवा जाणवू लागतो. ॲड्रनेल ग्रंथी मोठ्या होतात. मुत्रपिंडांना हानी पोहोचते. आजारपणाची लक्षणे दिसू लागतात.

४) तणाव आणि मानसिक बदल :

सेल्से यानी तणाव प्रसंगीच्या शारीरिक आणि मानसिक लक्षणांवर भर दिला. प्रमुख मानसिक लक्षणांमध्ये असाहाय्यतेची भावना, स्वत:च्या दर्जामध्ये घसरण, काम पूर्ण करण्याची अक्षमता यांचा समावेश होतो. भीती, चिंता, काळजी, राग या नकारात्मक भावनांचा अनुभव येतो.

५) समयोजनात्मक वर्तन :

तणावाच्या स्थितीतही त्या स्थितीबद्दल अधिक माहिती मिळवून पूर्वानुभवाच्या आधारे काही मार्ग निघतो का ? याचा विचार व्यक्ती करते. काही मार्ग वास्तव तर काही केवळ धीर देणारे असतात.

६) व्यक्तीसापेक्ष घटना :

तणाव ही व्यक्ती सापेक्ष घटना आहे. कारण तणाव सहन करण्याची प्रत्येक व्यक्तीची क्षमता वेगवेगळी असते. व्यक्तीमत्वाचे अ आणि ब असे दोन प्रकार पडतात. 'अ' प्रकारच्या व्यक्ती तणावाखाली वावरतात व शारीरिक व मानसिक आजाराची शिकार होतात तर 'ब' प्रकारच्या व्यक्ती तणावापेक्षा परिस्थितीशी तडजोड पसंत करतात.

१६.३.१ तणावाची कारणे :

तणावांच्या कारणांचे अनेक प्रकारे वर्गीकरण करता येते जसे की शारीरिक आणि मानसिक, अल्पावधी तणाव आणि दिघविधी तणाव, आपल्या कुवतीतील आणि कुवती बाहेरील तणाव इ. आपण त्यांचे प्रमुख तीन प्रकारात वर्गीकरण करू शकतो.

१) दैनंदिन ताणतणाव :

आपल्या दैनंदिन जीवनात आपल्याला अनेक ताणतणाव अनुभवाला येतात. हे ताणतणाव पुन:पुन्हा अनुभवाला येतात. यात कामातील चिडचिड, मुलांकडून अवांछित वर्तन, पत्नीच्या मोलकरणीबाबतच्या तक्रारी यांचा समावेश होतो. दैनंदिन धक्का धकीच्या जीवनाचा व्यक्तिच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होतो.

२) वैयक्तिक तणाव घटक :

वैयक्तिक जीवनात काही तणाव घटक अपरिहार्य तर काही तणाव घटक अपघाताने, दुर्दैवाने व्यक्तीच्या जीवनात येतात.

३) विरह (Seperation)

आईच्या प्रेमाचे महत्त्व लहान मुलांच्या बाबतीत विशेष असते. लहान मुलांच्या बाबतीत अल्पकाळासाठी सुद्धा आईवडिलांचा विरह तणाव निर्माण करतो. सकाळी उठल्यानंतर पहिल्यांदा ते आपली आई कोठे आहे हे ते विचारते.

४) संक्रमण तणाव (Transition Stress) :

आपण अर्भक ते लहान मुल, लहान मुल ते किशोरावस्था, किशोराव्यस्था ते प्रौढत्व या संक्रमणातून जातो. व्यक्तीच्या प्रत्येक टप्प्यावरील मागण्या बदलतात. महत्त्वाचे संक्रमण शालेय अवस्था पूर्ण होऊन प्रौढावस्थेमध्ये पदार्पण होते या कालात होते. घर सोडून महाविद्यालय, लग्नानंतर दूसरे घर किंवा सेवानिवृत्ती या काळात मानसिक तणाव निर्माण होतो.

५) बेरोजगारी :

बेरोजगारीची अवस्था व्यक्तीच्या जीवनात तणाव निर्माण करते. भारतासारख्या देशात तर बेरोजगारीची अवस्था आणखी तणावपूर्ण असते. बेकारी हा घटक व्यक्तीच्या जीवनात कमालीचा तणाव निर्माण करतो.

६) घटस्फोट :

पाश्चिमात्य देशात घटस्फोट हे तणावाचे प्रमुख कारण आहे. घटस्फोटाचा मुलांच्या जीवनावर होणारा परिणाम फार गंभीर आहे. घटस्फोटीत स्त्री आणि पुरूष यांनाही खूप त्रास होतो. त्यांच्या बाबतीत शारीरिक व्याधी आणि गंभीर मानसिक आजार निर्माण होतात. ते मद्यपानाच्या आहारी जाण्याची शक्यता असते. अशांच्या बाबतीत घटस्फोट आणि आत्महत्या यांचे प्रमाण अधिक असते.

७) प्रिय व्यक्तीचा वियोग :

जीवनातील जोडीदाराचा मृत्यू हा फार मोठा तणाव घटक असतो. पतीचा मृत्यू या बाबतीत आर्थिक आणि सामाजिक आधार नष्ट करणारा असतो. सोबती, घर आणि कामप्रेरणा या सर्वांचा एका व्यक्तीच्या जाण्याने नाश होतो. पुरूषापेक्षा विधवा स्त्रियांचे दुःख फार मोठे असते. त्यामुळे पाठीमागे राहणारा फार काळ टिकत नाही.

८) संघर्ष :

वैयक्तिक जीवनात उद्दिष्टांबाबत असणारा संघर्ष हा फार मोठा तणाव निर्माण करणारा घटक आहे.

९) स्पर्धात्मक कार्यजीवन :

स्पर्धात्मक कार्यजीवन हा अनेक उच्च पदस्थांच्या बाबतीत तणाव निर्माण करणारा घटक आहे. अधिक तास काम, मालकांच्या मोठ्या अपेक्षा, काल निर्बंधीत उद्दिष्ट्ये यामुळे हा तणाव निर्माण होतो.

१०) महासंकटाचे प्रसंग :

महासंकटामूळे मोठ्या प्रमाणात हानी होते. त्याची तीव्रता अधिक असते. जेव्हा आपल्या सामान्य जीवनात असे प्रसंग येतात तेव्हा त्याचा दीर्घकालीन परिणाम होतो. आपत्ती अचानक उदभ्वते. त्याचा पूर्वअंदाज करता येत नाही. त्यामुळे त्यातून सुटका नसते. महापूर, वादळे, भूकंप याचा यामध्ये समावेश होतो. आपत्तीचा व्यक्तीच्या जीवनावर फार मोठा परिणाम होतो.

१६.३.२ तणावाचे परिणाम :

तणावाचे अल्पकालीन तसेच दीर्घकालीन परिणाम होतात. तणावाचे काही चांगले परिणाम होतात तसेच काही वाईट परिणाम होतात. ताण-तणावाचे वाईट परिणामच अधिक आहेत. ते याप्रमाणे-

दैनंदिन कामावर वाईट परिणाम :

तणावाचा दैनंदिन कामकाजावर वाईट परिणाम होतो. निष्क्रिय वृत्ती, वरिष्ठांवर सतत टीका करणे, जबाबदाऱ्या टाळणे, सतत माघार घेण्याचे धोरण, अर्थशून्य कृती, हटवादीपणा असे काही वाईट परिणाम होतात. तणाव जसजसा वाढेल. तसतसे रजेवर जाण्याची आणि काम टाळण्याची प्रवृत्ती वाढत जाते.

तर्कशुद्ध विचारपद्धतीचा भंग :

तणावामूळे व्यक्तीची तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता भंग पावते. कोणत्याही विषयाच्या सर्व अंगांचा तर्कशुद्ध विचार न करता व्यक्ती एकदम निष्कर्षावर येते. एखाद्या विषयाची मांडणी अत्यंत कमकुवत असते.

शारीरिक परिणाम :

तणावामुळे शरीराचे संतुलन बिघडते. तणावामुळे मोठ्या प्रमाणात शक्ती खर्च झाल्यामुळे माणूस थकत जातो. माणसाला शारीरिक व्याधी जडतात. यामध्ये हृदयविकार, रक्तदाब, पेटीक अल्सर, अपचन, निद्रानाश, डोकेदुखी अशा अनेक तक्रारी निर्माण होतात.

मानसिक परिणाम :

मानसिक परिणामांमध्ये काळजी, चिंता, निराशा, थकवा, त्रासिकपणा, चिडचिडेपणा, ही लक्षणे आढळतात. व्यक्तीचा आत्मसन्मान कमी होतो. स्वतःला क्लेश करून घेण्याची, आत्मदूषणाची प्रवृत्ती वाढते. कामामध्ये अपयश आल्याने कार्यप्रेरणा कमी होते. व्यक्तीला वैफल्य येते. जीवनावरील श्रद्धा कमी होते.

वर्तनावरील परिणाम :

तणावामूळे व्यक्ती आक्रमक होते. मद्यपान व मादक द्रव्यांच्या आहारी जावू शकते. भावनिक उद्रेक होऊ शकतो. व्यक्तीकडून भावनावश वर्तन होऊ शकते. व्यक्ती अस्वस्थ होते. थरथर कापू लागते. असंबद्ध बडबड करते.

आपली प्रगती तपासा.

१) तणावाचे परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१६.४ नीतीतत्वे, मूल्ये, चाकोरीबद्ध विचारसरणी, पूर्वग्रह यांची वैयक्तिक विकासातील भूमिका.

नीतीतत्वाची वैयक्तिक विकासातील भूमिका :

नीती म्हणजे मानवाची कृती चूक की बरोबर हे ज्या निकषांच्या आधारे ठरविले जाते ते निकष होय. नीतीचा संबंध काय बरोबर आणि काय चूक याच्याशी असतो. नीतीतत्वे ही तत्वज्ञानाची शाखा आहे. पण त्याचा वापर अलीकडे समाजशास्त्र, वर्तनशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यामध्ये केला जातो. अनेक व्यक्ती आणि व्यवसायिक यांचा विविध नैतिक मुद्यांशी संबंध येतो. अनेक व्यवसायिक संघटनांनी वैयक्तिक वर्तनाचे नियमन आणि आंतरक्रीया यासाठी आचारसंहिता विकसित केली आहे. नीती निकष आपले आचरण, वर्तन आणि आपली दुसऱ्यांशी होणारी आंतरक्रिया यावर परिणाम करतात. नीती निकषांचा मुलभूत मानवी मूल्ये, कर्तव्ये, नैतिक जबाबदाऱ्या आणि कायदा यांच्याशी संबंध येतो. मानवी वर्तनाचे मूल्यमापन करण्यासाठी व्यक्तीकडून अपेक्षित वर्तनाची स्थिती म्हणजे मूल्य होय. मूल्याला दोन बाजू आहेत. एक काय बरोबर आणि काय चूक तर दूसरी, आपल्या दैनंदिन वर्तनाचे नियमन करण्याचे नियम. नीतीतत्वे मूल्यांशी अतिशय घनिष्ठ संबंधीत आहेत.

१६.४.१ नीतीतत्वांचे वर्गीकरण

१) प्रमाणक/मापनदंड (Norms) :

प्रमाणक म्हणजे समाजगटाकडून मान्यताप्राप्त आचारसंहिता होय. या आचारसंहिते वरुन काय केले पाहिजे याची माहिती मिळते. काय करणे अपेक्षित आहे हे दर्शविणारा निकष म्हणजे प्रमाणक होय.

२) मूल्ये (Values) :

व्यक्तीने अगर गटाने अंगिकारलेल्या श्रद्धा आणि आदर्श म्हणजे मूल्ये होय. यावरून कल्पना, उद्दिष्ट किंवा कृती याबाबतीत काय चांगले आहे, काय बरोबर आहे, अपेक्षित आहे याबाबत प्रवृत्त करतात.

३) कायदे (Laws):

सरकारकडून किंवा एखाद्या अधिमान्यता प्राप्त संघटनेकडून सामाजिक नियमांची सक्तीची केलेली व्यवस्था होय. या नियमांचे उल्लंघन म्हणजे गुन्हा ठरतो; असे नियम म्हणजे कायदा होय.

४) शास्त्र (Science):

शास्त्रीय पद्धतीचा वापर करून पद्धतशीर, एकीकृत आणि स्वदुरुस्ती प्रक्रियेद्वारे उद्दिष्टाभिमुख माहिती तयार केली जाते. अशी ज्ञानशाखा (Body of Knowledge) होय.

१६.४.२ मूलभुत मानवी मूल्ये (Basic Human Values) :

मूलभूत मानवी मूल्ये म्हणजे अशी मूल्ये की जी आपल्याला योग्यतापूर्ण जीवन जगायला मदत करतात. ही मूल्ये सुव्यवस्था, स्थैर्य, वैयक्तिक आणि सामाजिक कल्याण निर्माण करतात.

१) सत्य (Truth)
२) सद्वर्तन (Right Conduct)
३) शान्ती (Peace)
४) सहकार्य (Co-operation)
५) समता (Equality)
६) न्याय (Justice)
७) राष्ट्रभक्ती (Patriotism)
८) उत्कृष्टता (Excellence)
९) धमर्निरपेक्षता (Secularism)

❖ वैयक्तिक विकासातील मानवी मूल्यांचे महत्त्व

मानवी व्यक्तिमत्वाला योग्य आकार देण्यात मूल्ये महत्त्वाची भूमिका पार पडतात. मूल्ये आपल्या दृष्टीकोनावर परिणाम करतात. अधिक तर्कशुद्ध आणि सूयोग्य निर्णय घ्यायला मदत करतात.

१) व्यक्तीच्या अभिवृत्तीचा पाया : एखाद्या घटनेबाबत एखाद्या वैयक्तिक दृष्टीकोनाबाबत त्याच्या मूल्याचा फार मोठा परिणाम होतो. त्याच्या मूल्याचा त्या सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीशी घनिष्ट संबंध असतो.

२) संघर्षाचे कारण समजण्यास उपयोगी : मूल्यांसाठी असणारी भिन्नता संघर्षाचे कारण असते. एखाद्या गटाची मूल्ये समजून घेणे आणि मूल्ये समजावून घेणे यामूळे तर्कशुद्ध मार्गाने आणि चांगल्या मार्गाने संघर्ष मिटविणे शक्य होते.

३) सापेक्ष अंदाज : मूल्ये ही व्यक्तिसापेक्ष अंदाज असतात. ते तर्कशुद्ध निर्णयावर किंवा निरपेक्ष अंदाजावर परिणाम करू शकतात.

४) आपली समज व वर्तनावर परिणाम : मूल्यावर व्यक्तीचे वर्तन ठरते. एखाद्याच्या वर्तनात बदल करणे आवश्यक असते. मूल्ये आपल्या आकलनावर परिणाम करतात. आपण अनेक घटना पाहतो पण आपण आपल्या मूल्यांनुसार कृती करतो.

आपली प्रगती तपासा :

१) वैयक्तिक विकासातील मानवी मूल्ये व नीतीतत्त्वाचे महत्त्व स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१६.४.३ साचेबंद कल्पना / चाकोरीबद्ध विचारसरणी :

एखाद्या विशिष्ट सामाजिक समुहाबद्दल वैशिष्ट्यपूर्ण अशा श्रद्धा, समजुती किंवा ज्ञान म्हणजे साचेबंद कल्पना होय. एखाद्या व्यक्ती किंवा बऱ्याचदा समुहाच्या संदर्भात असलेली चाकोरीबद्ध विचारसरणी (Congnitive Frame Work) म्हणजे साचेबंद कल्पना होय. याला स्थिर प्रतिमा असेही म्हणतात. लिपमन (१९२२) यांनी प्रथम ही संज्ञा वापरली. साचेबंद कल्पना म्हणजे एखाद्या विशिष्ट समुहातील लोकांच्या वैशिष्ट्यांबद्दल किंवा गुणदोषांबद्दल स्थिर झालेल्या कल्पना असतात. उदा. मारवाडी चिक्कू असतात, देशस्थ अव्यवस्थित असतात, मराठा लढवैय्ये असतात, केरळी कृतीशील असतात, आदिवासी किंवा खेड्यातील लोक अंधश्रद्धाळू असतात वगैरे. अशा साचेबंद कल्पना विशिष्ट जातीविषयी, धर्माविषयी, सामाजिक संघटनांविषयी (युनिसेफ, रक्तपेढी, इत्यादी) व्यवसायांविषयी, स्त्री-पुरूषांविषयी, तसेच विशिष्ट वयाच्या व्यक्तिविषयीही असतात. उदा. वृद्ध व्यक्तीबद्दल ते विसराळू, निष्क्रिय, अशक्त, आजारी, असामाजिक असतात असे साचेबंद विचार दृढ झालेले असतात. आपण कितीतरी वृद्ध क्रियाशील, खेळकर वृत्तीचे, सामाजिक व राजकीय कार्य करणारे, चपळ असे पाहतो. परंतु साचेबंद कल्पनेपेक्षा वेगळा अनुभव आला तर तो अपवाद समजला जातो व ती कल्पना तीच राहते. तरूणाईतील वर्तनाबद्दलही आपली साचेबंद कल्पना असते. इतकेच नव्हे तर विशिष्ट दिवस, प्रसंग, याबद्दलच्या ही साचेबंद कल्पना तयार झालेल्या असतात. अमावस्या, सूर्य व चंद्र ग्रहणकाळ यात कसे वागायचे, याविषयीच्या ही साचेबंद कल्पना असतात.

व्यक्ती बऱ्याचदा आपल्या भोवतालच्या संकीर्ण सामाजिक वातारणाचा अर्थ लावण्यासाठी अशा साचेबंद कल्पनांचा उपयोग करीत असते. त्यामुळे एखादी व्यक्ती विशिष्ट समाजाची आहे. हे जाणून त्या समाजाविषयीच्या साचेबंद कल्पनेच्या अपेक्षेतून आपण त्या

व्यक्तीशी संबंध साधतो. उदा. एखादी व्यक्ती पंजाबी किंवा शीख आहे हे समजल्यास आपण हिंदीत व विशिष्ट विषयांवरच संभाषण करतो.

किंबल यंग याच्या मते "पसंती-नापसंती किंवा मान्यता-अमान्यता" यासारख्या भावभावनांनी रंजित झालेली वर्गीकरणात्मक व भेदभावात्मक संकल्पना म्हणजे साचेबंद कल्पना, साचेबंद कल्पनामूळेही पूर्वग्रहांप्रमाणेच सामाजिक दुरावा निर्माण होतो. त्यामूळे तिही एक सामाजिक समस्याच आहे.

बोगार्डस यांनी अभिवृत्ती व साचेबंद कल्पनांवर संशोधन केले. त्यात साचेबंद कल्पनांमुळे सामाजिक अंतर व दुरावा निर्माण होतो, असे त्यांना आढळले. १९२३ साली कार्टझ व ब्रेली यांनी एका अभ्यासामध्ये राष्ट्रीय समाजाची विशेष लक्षणे सांगण्यास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सांगितले. अमेरिकन मुलांनी निग्रोंच्या बाबतीत 'अंधश्रद्धाळू, आळशी, अडाणी' अशी विशेषणे वापरली तर अमेरिकन हे 'उद्योगप्रिय' आहेत असा स्वकीय समूहाबद्दल धनात्मक साचेबंद विचार व्यक्त केला. तसेच निग्रो मुलानी निग्रोंच्या बाबतीत 'संगीतप्रेमी, आनंदी बदके', अशी विशेषणे वापरली. अशा साचेबंध कल्पनांचे मूळ प्रत्येक समुहाच्या 'स्वकीय केंद्रिततेमध्ये' (Ethnocentrism) सापडू शकते.

साचेबंद कल्पनांची लक्षणे :

साचेबंद कल्पनांमध्ये पुढील सामान्य लक्षणे दिसून येतात.

१) साचेबंद कल्पनांच्या साहाय्याने व्यक्ती किंवा समुहांचे सुनिश्चित व दृढ असे त्वरित वर्गीकरण केले जाते. ते बरोबर किंवा चुकीचेही असू शकते.

२) साचेबंद कल्पनांचा स्वीकार त्या समाजातील व्यक्ती अंधश्रद्धेनेच करतात. ते विचार प्रमाण मानून त्याची तार्किक चिकित्सा फारसे कोणी करीत नाही.

३) साचेबंद विचार हे भावना, अभिरूची व पूर्वग्रहांनी प्रभावित झालेली असते व पूर्वग्रहांनी प्रभावित झालेली असते. ते आग्रही स्वरूपाचे, ठाम असतात. म्हणून साचेबंद कल्पनात बदल करणे पूर्वग्रहांपेक्षाही अवघड असते.

४) साचेबंद कल्पना पारंपरिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. त्यामूळे नवीन पिढीला एक तयार दृष्टीकोन/वैचारिक चौकट मिळते.

५) साचेबंद विचारात वास्तवता कमी असून ते अलंकारीक शब्दात, विशेषणात व्यक्त केले जाते.

६) साचेबंद विचार दुसऱ्यांच्या अनुभवावर आधारलेले असतात. साचेबंद कल्पना बदलू शकतात. व्यापक अनुभवांमुळे साचेबंद कल्पना थोठ्याफार बदलल्या तरी त्यांचा साचेबंदपणा स्थिर व टिकाऊ असाच असतो. २०-२५ अमावस्यांना प्रवास करूनही काही त्रास झाला नसला तरी व्यक्तीची 'अमावस्येच्या रात्री अपघात जास्त होतात' ही साचेबंद कल्पना कायम असते. अनेक उदार मारवाड्याची उदाहरणे ऐकूनही व्यक्ती बोलताना मारवाडी चिक्कू असतात असेच म्हणते. काही साचेबंद कल्पनांचा तर व्यक्तीच्या वैशिष्ट्यांवर प्रभाव पडतो असे अमेरिकेतील एका पाहणीत आढळले. 'वृद्ध विसराळू असतात' ह्या विस्तृत साचेबंद कल्पनेचा प्रभाव वृद्धांच्या स्वतःच्या वर्तनाच्या

स्पष्टीकरणात दिसून येतो. वृद्धत्वाकडे झुकलेल्या व्यक्ती माहिती, घटना, तारखा, प्रसंग वगैरे गोष्टी लक्षात ठेवण्याचा पुरेसा प्रयत्न करीतच नाहीत. जणू विसरण्याचा त्यांना परवाना मिळालेला असतो. (त्यांच्या विषयीच्या साचेबंद कल्पनेमुळे)

साचेबंद कल्पनांचे परिणाम व निर्मुलन :

साचेबंद कल्पना या पूर्वग्रहासारख्याच सामाजिक दूरावा निर्माण करणाऱ्या असतात काही साचेबंद कल्पनांमुळे एखाद्या समुहाचे अति सामान्यीकरण केले जाते. त्यामुळे त्या समुहातील व्यक्तीचे यथातथ्य संवेदन होऊ शकत नाहीत. तसेच खुल्या मनाने त्या गटातील व्यक्तींचा स्वीकार केला जात नाही. उदा. कुष्ठरोग, मानसिक विकृती बरे झाल्यावरही समाजात त्यांचा मोकळेपणाने स्वीकार केला जात नाही. त्यांना समान वागणूक दिली जात नाही.

साचेबंद कल्पनांचे परिणाम पूर्वग्रहांइतकेच सामाजिक दृष्टीने हानीकारक असतात. तेसच या दृढ विचारांच्या निर्मुलनासाठी पूर्वग्रहांच्या निर्मुलनाचे मार्गच उपयुक्त असतात. अशा या सामाजिक अस्वास्थ्यदर्शक साचेबंद कल्पना समाजातील विद्वानांनी, बुद्धिवाद्यांनी दूर करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. तसेच प्रसार माध्यमांचाही त्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग करावा.

आपली प्रगती तपासा :

१) साचेबंद कल्पना म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

१६.४.४ पूर्वग्रह आणि त्यांची वैयक्तिक विकासातील भूमिका :

पूर्वग्रह ही भारतातील वाढती समस्या आहे. पूर्वग्रह ही आपली मुल्ये व आपली अभिवृत्ती यांच्याशी संबंधीत असतात. पूर्वग्रह आपल्या वर्तनावर आणि आंतरक्रियांवर परिणाम करतात. पूर्वग्रहाचे स्वरूप आणि प्रमाण आपल्या वैयक्तिक विकासावर परिणाम करतात. आपल्या व्यक्तिमत्त्व विकासात पूर्वग्रहाची भूमिका महत्त्वाची आहे. व्यक्तीच्या सामाजिक समायाजनात पूर्वग्रह परिणाम करतात. पूर्वग्रह ही भारतातील मोठी समस्या आहे. कारण बहुसंख्य सामाजीक गट वेगवेगळ्या परिस्थितीतून आलेला असतो. त्यांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात. पूर्वग्रहावर आधारित भेदभाव ही वाढती समस्या आहे. धर्माबाबत अनेक पूर्वग्रह आहेत. भेदभावाच्या वागणुकीचा प्रत्यय वारंवार येतो. जातीभेद, धर्मभेद, लिंगभेद आणि त्यानुसार असणारे पुर्वग्रह ही सामान्य बाब आहे. शहरी भागामध्येही अशा प्रकारचा भेदभाव अस्तित्वात असलेला दिसून येतो.

दूसऱ्या वंशाच्या, धर्माच्या आणि लिंगाच्या व्यक्तीबाबत असणारा नकारात्मक दृष्टीकोन म्हणजे पूर्वग्रह आहे. पूर्वग्रह सकारात्मकसुद्धा असू शकतात. व्यक्तीच्या विशिष्ट समाजाविषयी, धर्माविषयी, वर्णाविषयी, वंशाविषयी, लिंगभेदावर आधारित गटाविषयी असणारा दृष्टीकोन म्हणजे पूर्वग्रह आहे. या आधारे तो दुसऱ्या गटाचे मुल्यमापन करतो. जेव्हा व्यक्ती समाजाच्या विशिष्ट गटाविषयी पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन ठेऊन असतो, एखाद्या व्यक्तीच्या पूर्वग्रहाबाबतची माहिती सुसंगत असू शकते. पण अशी माहिती अर्धसत्य असते. पूर्वग्रह एक दृष्टीकोन म्हणून दृष्टीकोनाच्या सर्व वैशिष्ट्यांवर परिणाम करतो. त्यामध्ये जाणीव, भावना आणि वर्तन घटकांचा समावेश होतो. विशिष्ट गटाविषयी असणारा पूर्वग्रह विश्वास आपण अपवाद याभोवती केंद्रीत झालेला असतो. त्याचे स्वरूप साचेबद्ध असते. ते एकदा तयार झाले की परत बदलत नाही. जरी ते वाईट नसले तरी त्यानुसार व्यक्ती जीवन व्यक्तीत करतात. पूर्वग्रहामध्ये समाजातील विशिष्ट गटाबाबतची व्यक्तीच्या मनामध्ये नकारात्मक भावना तयार होते. ज्या गटाबाबत व्यक्तीचा नकारात्मक दृष्टीकोन तयार झालेला असतो. त्या गटातील व्यक्ती आणि गटाबाबत व्यक्ती नकारात्मक वर्तन करते. त्यातून भेदभाव निर्माण होतो.

व्यक्तीची भावना आणि जाणीव यामध्ये महत्त्वाचा संबंध असतो. विशिष्ट गटाबाबत व्यक्तीची नकारात्मक भावना तयार झालेली असते. त्या गटाचा त्या व्यक्तीचा संबंध आला की त्याच्याशी त्याचे वर्तन नकारात्मक भावनेतून होते. अशा व्यक्तीच्या बाबतीत असे वर्तन आपोआपच होते. सामाजिक जाणीवेच्या विशिष्ट अंगाबाबत पूर्वग्रह सुद्धा असू शकतो. माहितीवर प्रक्रिया होण्याची क्रिया मानवाची क्षमता मर्यादीत असल्याने विचारांच्या प्रयत्नाने तो जवळचे मार्ग स्विकारतो. सामाजिक जाणिवेबाबत तो याच मार्गाचा अवलंब करतो. आपली दुसऱ्या बाबतीत प्रवृत्ती साचेबद्ध असते. या धोरणामुळे व्यक्ती त्याबाबत सखोल विचार न करता दृष्टीकोन तयार करते.

पूर्वग्रह हा एक दृष्टीकोन असतो. व्यक्ती किंवा विशिष्ट समाजाबद्दल त्यामध्ये नकारात्मक भावना असते. पूर्वग्रहामध्ये श्रद्धा, विश्वास यांचा जसा समावेश असतो, तसा विविध गटाबद्दल अपवादही असतो. पूर्वग्रहामध्ये विशिष्ट समाजगटाबद्दल नकारात्मक वृत्तीचा समावेश होतो.

पुर्वग्रहाचे प्रकार :

१) धार्मिक पूर्वग्रह :

भारतात अनेक जातीधर्माचे लोक राहतात. सरकार लोकांच्या धार्मिक बाबीमध्ये सहसा हस्तक्षेप करीत नाहीत, त्यामध्ये भारत निरपेक्ष आहे. तरीही एका धर्माच्या लोकांचा दुसऱ्या धर्माच्या लोकांबाबत असणारा पूर्वग्रह संघर्षाचे कारण ठरतो. या पूर्वग्रहांमध्ये विशिष्ट धर्माचे लोक देशहितवादी आहेत. ते विश्वासार्ह नाहीत. ते आक्रमक आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात. ते निर्बुद्ध आणि कामचुकार असतात. अशा पुर्वग्रहांचा समावेश होतो.

२) जातीबाबत पूर्वग्रह :

भारतीय समाज विविध जाती धर्माच्या लोकांमध्ये विभागला जातो. या जाती पुन्हा अनेक उपजातीमध्ये विभागल्या जातात. जन्मानुसार व्यक्तीची जात ठरते. व्यक्तीची जात केव्हाच बदलत नाही. जातीची उच्च जातीकडून कनिष्ट जातीकडे अशी पदसोपान रचना आहे. जातीबाबतचा पुर्वग्रहांचा सामना कनिष्ठ जातीतील करावा लागतो. भारतीय राजकारण आणि

समाजकारणात जात महत्त्वाची भूमिका पार पाडते. जातीबाबत पूर्वग्रह जातीभेदातून व्यक्त होतात.

३) लिंगभेदावर आधारित पूर्वगृह :

लिंगभेदावर आधारित पूर्वगृह स्त्री आणि पुरुष या दोन्ही गटामध्ये अस्तीत्वात असते. पण स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी भेदभावाची वागणूक दिली जाते. हीन वागणूक, स्त्रियांना समान मोबदला दिला जात नाही, कामाच्या ठिकाणी बढतीची संधी न देणे असे भेदाचे स्वरूप असते.

४) वर्ग पूर्वग्रह :

भारतातील ग्रामीण आणि शहरी समाज वर्गव्यवस्थेवर आधारित आहे. विशिष्ट समाज गटाला दुसऱ्या समाजगटापेक्षा उच्च किंवा कनिष्ट दर्जा समाजगटातील सदृष्यांकडून दिला जातो. आर्थिक स्थिती, अधिकार, सभा, संपत्ती, शिक्षण या आधारावर समाजामध्ये उच्च वर्ग, मध्यम वर्ग, आणि कनिष्ठ वर्ग अशी विभागणी केली जाते. प्रत्येक दुसऱ्या वर्गात पूर्वग्रह असतात. त्यामुळे संघर्ष निर्माण होतो.

५) वयावर आधारित पुर्वग्रह :

आस्थापनेमध्ये वयावर आधारित वरीष्ठ (सिनीयर), कनिष्ठ(ज्युनियर) असा भेदभाव केला जातो. वृद्धांची स्मृती कमकुवत असते. लहान मुलांना समज कमी असते. या पूर्वग्रहांचा समावेश होणे.

६) प्रदेशावर आधरित पूर्वग्रह :

विशिष्ट प्रदेश मागासलेला आहे. त्या प्रदेशातून शहरात येणारे लोक असंस्कृत आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात. अशा सर्व पूर्वग्रहांचा यात समावेश होतो.

पूर्वग्रहांची कारणे :

१) प्रसारमाध्यमे : दूरदर्शनवरील विविध वाहिन्या चित्रपट या माध्यमातून मुलांमध्ये अनेक पूर्वग्रह निर्माण होतात. विशिष्ट वर्णाचे आणि वंशाचे लोक दूरदर्शन आणि चित्रपटांमध्ये वारंवार दिसून येतात. त्यामूळे पूर्वग्रह निर्माण होतो.

२) सामाजिक मापदंड : सामाजिक मापदंडानुसार कोणती कृती योग्य, कोणती अभिवृत्ती योग्य आहे हे शिकविले जाते. प्रत्येक समाजात जे मापदंड असतात त्यानुसार पूर्वग्रह निर्माण होतात.

३) आंतरक्रियेचा अभाव : व्यक्तीचा समाजातील इतर लोकांबरोबर आणि समाजाबरोबर अतिशय मर्यादित संपर्क असेल तर त्यातूनही त्या समाज घटकाबाबत व्यक्तीच्या मनात पूर्वग्रह निर्माण होतो. आपला विशिष्ट जात, धर्म, वर्ग अशा समाज घटकाबाबत मर्यादित संपर्क असल्यामूळेच त्याबाबत आपल्या मनात अनेक पुर्वग्रह निर्माण होतात.

४) शिकवण : आपण लहानपणामध्ये आई-वडील, शिक्षक, समवयस्क यांच्याकडून अनेक गोष्टी शिकतो आणि त्यानुसार आपले मत तयार होते. अशा व्यक्तींच्या वर्तनातून व्यक्ती अनेक पूर्वग्रह शिकते. विशिष्ट समाजगटाबाबत नकारात्मक पूर्वग्रह या लोकांकडूनच व्यक्तीमध्ये निर्माण केले जातात.

५) व्यक्तीपुढील आदर्श : लहान मुलाचे आपले आईवडील, शिक्षक, समाजातील वरिष्ठ व्यक्ती आदर्शस्थानी असतात. या लोकांच्या वर्तनातून व्यक्तीमध्ये अनेक पूर्वग्रह निर्माण होतात.

६) स्पर्धा : दोन गटातील संघर्ष हा सुद्धा पूर्वग्रहाचे उगमस्थान असते. दोन समाजगटातील स्पर्धेतून अनेक पूर्वग्रह निर्माण होतात. एखाद्या समाजगटाला गुणवत्ता नसतांना शिक्षण, नोकरी आणि इतर ठिकाणी संधी दिली जात असेल तर दुसऱ्या समाजगटावर अन्याय होतो त्यामुळे दुसऱ्या समाजगटाच्या व्यक्तीमध्ये अनेक पूर्वग्रह निर्माण होतात.

७) पक्षपाती ज्ञानप्रक्रिया : पक्षपाती ज्ञानप्रक्रियेमध्ये आपल्याकडे गोळा होणाऱ्या माहितीचा सहसंबंध लावताना जर पक्षपाती प्रक्रियेचा अवलंब केला तर निष्कर्षही पक्षपाती येतात. त्यामुळे काही समाजगटाबाब पूर्वग्रहदुषित दृष्टीकोन प्रसारित होतो. साचेबद्ध विश्वास आणि दृष्टीकोन या पूर्वग्रहांना मजबुती आणतात.

८) सामाजिक श्रेणीकरण : समाजातील लोक समाजाची विविध गटात विभागणी करतात. आपल्या गटात लोकांना ते आमचा दूसऱ्या गटातील लोकांना त्यांचा असे ते संबोधतात. वंश, धर्म, लिंग, वय, वर्ण किंवा व्यवसाय असे कोणतेही कारण या श्रेणी करण्यास पुरेसे असते. आपल्या लोकांबाबत नकारात्मक भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते.

९) व्यक्तिमत्व भिन्नता : अधिकारी प्रवृत्तीचे व्यक्तिमत्व आक्रमण वर्तनाचे आणि स्वतःबद्दल तसा पूर्वग्रह असणारे असते. काही व्यक्तिमत्व ही अत्यंत ताठर असतात. हे किंवा ते यापैकी एकाच मार्गाचा ते अवलंब करतात. मध्यमार्ग त्यांना मान्य नसतो. काही व्यक्ति पक्षपाती विचार करणाऱ्या असतात.

१०) समवयस्क : काही पूर्वग्रह समवयस्क व्यक्तिकडून व्यक्तीमध्ये येत असतात. विशिष्ट समाज गटाबाबतचा दृष्टीकोन हे याचे उदाहरण आहे. विशिष्ट जात, जमात, धर्म अशा गटाबाबतचे प्रसंग आणि अनुभव यांचे आदान प्रदान आपण आपल्या समवयस्क व्यक्तीबरोबर करीत असतो. त्यातून अनेक पूर्वग्रह वाढीला लागतात.

पूर्वग्रहावर मात करण्यासाठी उपाययोजना :

१) योग्य शिकवण : सर्वधर्म समभाव, सहिष्णुता, मानवतावाद याद्वारे दुसऱ्या समाजगटाबाबतचे पूर्वग्रह आपण नाहिसे करू शकतो. मुलांना शालेय पातळीवर तशी शिकवण देऊन आपण पूर्वग्रह नाहीसे करू शकतो. पालकांचे प्रबोधन वर्ग घेऊन मुलांमध्ये पूर्वग्रह निर्माण करणारे आचार-विचार जाणीवपूर्वक दूर ठेवण्याबाबत आपण त्यांचे प्रबोधन करू शकतो. त्याचप्रमाणे पूर्वग्रहामुळे दोघांचेही नुकसान होते याची जाणीव पालकांना करून दिली पाहिजे. पूर्वग्रह व्यक्तीमध्ये उत्सुकता, भिती आणि द्वेष भावना निर्माण करतात याची जाणीव पालकांना करून दिली पाहिजे.

२) समाजगटामध्ये सुसंवाद वाढविणे : दोन समाज गटातील सुसंवाद एकमेकांबद्दलचे पूर्वग्रह दूर करण्यास मदत करतो. यासाठी दोन गटांमध्ये विधायक संबंध विकसित झाले पाहिजे. दोन गटातील सुसंवाद आणि सहकार्य यामुळे नकारात्मक भावना कमी होते. दोन समाजातील साम्य एकमेकांना समजते. एकमेकांतील समाज आणि परस्परांबद्दल आकर्षण वाढीला लागते. साचेबद्ध

पूर्वग्रहामध्ये अर्थ नाही. हे नवीन माहितीच्या आधारे व्यक्तीला समजते. पुनः पुन्हा येणाऱ्या सबंधांमूळे नकारात्मक भावना कमी होत जाते.

३) प्रसार माध्यमे : दूरदर्शन, चित्रपट, वर्तमानपत्रे या माध्यमांनी धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन स्वीकारून कार्यक्रम प्रसारित करावेत. चित्रपटांच्या बाबतीत सेन्सॉर बोर्ड महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते. पूर्वग्रह दुषित चित्रण काढून टाकायला भाग पाडू शकते. संपूर्ण प्रसार माध्यमांच्या बाबत अशा आचारसंहितेची गरज आहे.

४) आदर्श : समाजातील आदर्श व्यक्तिमत्व व्यक्तीच्या वर्तनावर परिणाम करतात. आई-वडील आणि शिक्षक हे आपले आदर्श असतात. याशिवाय समाजातील उच्च पदावर असणाऱ्या व्यक्ती उदा. राजकीय व्यक्ती, समाजसुधारक आणि धार्मिक क्षेत्रातील व्यक्तीही आदर्श असू शकतात. या व्यक्तीकडून पूर्वग्रहदूषित वर्तन होवू नये. कारण या आदर्श व्यक्तीकडूनच आपण बऱ्याचदा अनुकरणामुळे पूर्वग्रह दुषित वर्तन करतो.

५) भेदभाव : समाजाची विभागणी करताना आपला आणि दुसऱ्याचा अशी विभागणी किंवा अशा प्रकारचा समज निर्माण करणे हे पूर्वग्रहाचे प्रमुख कारण आहे. जर आपण हा समज दूर केला तर पूर्वग्रह अस्तित्वात राहणार नाही. समाजामध्ये आपला अगर परका असे वर्गीकरण न करता सर्वच आपले आहेत अशी भावता निर्माण करता आली पाहिजे.

६) विचारपूर्वक बदल : पूर्वग्रहदूषित वर्तनाचे मूळ आपल्या विचारांमध्ये असते. आपण आपल्या विचारांचा तर्कशुद्ध पुनविचार केला पाहिजे. समोरच्या व्यक्तीला त्याच्या भूमिकेतून समजून घेतल्यास आपले पूर्वग्रह दूर होऊ शकतात.

आपली प्रगती तपासा.

१) पूर्वग्रह म्हणजे काय ते सांगुन पूर्वग्रहाचे प्रकार स्पष्ट करा.

२) पूर्वग्रहाची कारणे सांगून पूर्वग्रह निवारणासाठी उपाय योजना सूचवा.

_____

_____

_____

_____

१६.५ तणाव आणि संघर्ष यांची सार्वजनिक अभिव्यक्ती म्हणजे आक्रमकवृत्ती आणि हिंसाचार

प्रास्ताविक :

आक्रमकता आणि हिंसाचार ही मानवी समाजाची अटळ वैशिष्ट्ये आहेत. ऐतिहासिक घटनांवरून असे लक्षात येते की आक्रमकतेमुळे अनेक युद्धे घडून आली, मानवी अस्तित्व धोक्यात आले. दोन महायुद्धे, वाढता दहशतवाद, जात आणि वर्ग संघर्ष, अणुयुद्धाची भिती इ. हे

सर्व मानवाच्या आक्रमकतेचे निदर्शक आहेत. तणाव आणि संघर्ष ही केवळ वैयक्तिक बाब नाही. कधी कधी त्याचा सार्वजनिक स्वरूपात उद्रेक होऊ शकतो. काही वेळा एकूण गट किंवा जातीय गटाला सामुदायिक संघर्षाचा अनुभव येतो. असा गट आपल्यावरील तणावाचे जाहीर प्रदर्शन करतांना आक्रमकता व हिंसाचार घडवून आणतो. याचा अर्थ सार्वजनिक तणाव आणि संघर्षाचे सार्वजनिक प्रदर्शन म्हणजे आक्रमकता आणि हिंसाचार होय. आक्रमकता आणि हिंसा या सध्याच्या काळातील सामान्य घटना होय.

डोलार्ड यांच्यामते आक्रमकता म्हणजे असे वर्तन की ज्याचा उद्देश निर्देशित व्यक्तीस इजा पोहचविणे हा असतो. यामध्ये शारीरिक आणि मौखिक अशा दोन्ही आक्रमकतेचा समावेश होतो. आक्रमकता प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असू शकते.

❖ **कारणे :**

१) **चिथावणी :** सामाजिक नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीकडून दिली जाणरी प्रत्यक्ष चिथावणी हे सार्वजनिक आक्रमकतेचे प्रमुख कारण असते. इतरांना सातत्याने मारलेले सौम्य टोमणेसुद्धा आक्रमकतेला कारण ठरतात. इतरांकडून दिली जाणारी चिथावणी हे आक्रमकतेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. जेव्हा इतरांकडून आक्रमकतेचा अनुभव येतो तेव्हा आपण त्यापेक्षा अधिक प्रमाणात आक्रमक होतो. रागाला चिथावणी देणाऱ्या घटकांमध्ये शारीरिक आक्रमकता, मौखिक आक्रमकता, अतिसंवेदनशिलता, तुच्छता, अप्रामाणिकपणा, अकार्यक्षमता यांचा समावेश होतो. स्त्री आणि पुरूषांमध्ये शारीरिक आणि मौखिक आक्रमकता रागाला प्रामुख्याने चिथावणी देते. तुच्छ लेखल्यामुळे पुरूषापेक्षा स्त्रियांना अधिक राग येतो. प्रत्येक जण चिथावणीला बळी पडतोच असे नाही. जर आपण चिथावणी प्रक्रिया म्हणून आक्रमक झालो तर त्याचे आपल्यावर अनेक वाईट परिणाम होतात.

२) **वैफल्य :** विफलता, निराशा ही नेहमी आक्रमकतेला चालना देणारी असते. आक्रमकतेचा उदय नेहमी वैफल्यातून होतो. वैफल्याने ग्रासलेल्या व्यक्ती नेहमी आक्रमकतेला कारण शोधत असतात.

३) **विस्थापित आक्रमता :** जेव्हा एखाद्या सबळ व्यक्ती किंवा गटाविरूद्ध आक्रमक होणे आपल्याला पेलणारे नसते तेव्हा त्याचा राग आपण आपल्यापेक्षा दूर्बल व्यक्ती किंवा गटांवर काढतो. त्याला विस्थापित आक्रमकता असे म्हणतात. आपण ज्याच्यावर हा राग काढतो तो आपला कनिष्ठ, आपली पत्नी, मुले यापैकी असू शकतो, की जो जशास तसे प्रत्युत्तर देऊ शकत नाही.

४) **माध्यमातून दाखविला जाणारा हिंसाचार :** दूरदर्शन आणि चित्रपटातून दाखविल्या जाणाऱ्या हिंसाचाराचा व्यक्तीच्या दृष्टीकोनावर, भावनांवर आणि वर्तनावर परिणाम होतो. तशाच प्रकारचे वर्तन दर्शकाकडून होते. संशोधन अभ्यासावरून असे दिसून आले आहे की, माध्यमांमधून दाखविल्या जाणाऱ्या हिंसाचारामूळे दर्शकांमध्ये हिंसाचाराची भावना वाढते.

५) **उत्तेजक वर्तन :** उत्तेजक मानसिक वर्तनामूळे मोठा आणि कर्कश आवाज, स्पर्धात्मक हावभाव, शक्ती प्रदर्शन यामुळे आक्रमकतेला चालना मिळते.

६) लैंगिक मत्सर : लैंगिक मत्सर हे एक आक्रमकतेचे महत्त्वाचे कारण आहे. यामध्ये व्यक्तीला असे वाटते की त्याची प्रिय व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीबरोबर अनैतिक संबंध प्रस्थापित करते आहे. या स्थितीत त्याला प्रिय व्यक्तीचा भयंकर राग येतो आणि प्रिय व्यक्ती किंवा प्रतिस्पर्धी किंवा दोघांना शिक्षा करण्याची योजना आखतो.

७) बिभत्स चित्रण : हिंसक स्वरूपाच्या बिभत्स चित्रपटांमूळे पुरूषांची स्त्रियांना इजा पोहोचवण्याची आक्रमकता वाढते. बिभत्स चित्रपट पाहिल्यानंतर व्यक्ती तशा प्रकारचे चित्रपट जास्तीत जास्त पाहू लागते. बलात्कारासारख्या गुन्ह्याचे त्यांना फारसे गांभिर्य वाटत नाही. बलात्काराला बळी पडलेल्या व्यक्तीबद्दल त्यांना फारशी सहानुभूती वाटत नाही.

८) मद्यपान : मानस शास्त्रज्ञांच्या मते मद्यपान आणि आक्रमकता यामध्ये निकटचा संबंध आहे. बिअर बार, हॉटेल्स, परमिट रूम अशा ठिकाणी लोक मद्यपाप करतात आणि आक्रमक प्रवृत्ती निर्माण होते.

९) प्रादेशिक असमतोल : भारतातील काही भाग विकसित तर काही भाग अविकसित आहेत. अशावेळी मागास राज्यातून आपल्या राज्यात येऊन आपल्याशी लोक स्पर्धा करू लागले की त्यांचा आपल्याला राग येतो. त्यातून भूमिपूत्र ही संकल्पना पुढे येते. नोकऱ्या आणि इतर संधीमध्ये बाहेरच्या लोकांना डावलले जाते. त्यामुळे संघर्ष सुरू होतो.

१०) राजकीय घटक : अनेक राजकीय पक्ष आणि गट समाजातील विशिष्ट गरजा किंवा एखादा मुद्दा उचलून धरतात त्याला जातीय स्वरूप दिले जाते. संबंधीत मुद्दा अधिक संवेदनशील करून त्याचे जाहिर प्रदर्शन केले जाते. त्यामुळे आक्रमकतेला चालना मिळते.

११) धार्मिक व जातीय घटक : अनेक धार्मिक व जातीय घटक आक्रमकतेला चालना देतात. धार्मिक भेदभाव जमातवादाला चालना देतो. स्वतःचा धर्म आणि जात याबद्दलच्या अवास्तव कल्पना आक्रमकतेला चालना देतात.

१२) चिडखोर वृत्ती, सूडभावना : थोड्याश्या चिथावणीनेसुद्धा फार मोठी उत्तेजक कृती करणे. भावनिक प्रतिक्रियेचे अतिरेकी प्रदर्शन आणि सूड भावनेने चिथावणी देणे यामुळे आक्रमकता वाढते.

१३) शत्रूत्वाची भावना : दूसऱ्याबद्दल अंतर्मनामध्ये असणारी शत्रूत्वाची भावना सुद्धा आक्रमक प्रवृत्तीला चालना देते. पुरेशा माहितीशिवाय दूसऱ्यावर केलेल्या आरोपामूळेसुद्धा आक्रमकता निर्माण होते.

१४) आत्मपूजा आणि अहंगंड : काही व्यक्ती फार मोठ्या प्रमाणात स्वयंकेंद्रित व आत्मपूजक असतात. स्वतःच्या दृष्टिकोनावर त्यांची अतिरेकी श्रद्धा असते. या प्रवृत्तीचा अतिरेक आक्रमकतेला कारणीभूत ठरतो.

आपली प्रगती तपासा.

१) तणाव आणि संघर्ष यामुळे आक्रमकता आणि हिंसाचार कशा प्रकारे होतो ? स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१६.६ सारांश

आजच्या युगामध्ये प्रत्येकाला तणाव आणि संघर्षाला सामोरे जावे लागते. आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये प्रत्येक व्यक्ती यशस्वी होण्यासाठी सतत धडपडत असते. त्याचबरोबर आपले वर्चस्वही स्थापित करण्यसाठी प्रयत्नशील असते. तणाव ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील वास्तविकता आहे. प्रत्येकाला कमी-अधिक प्रमाणात तणावाला सामोरे जावे लागते. विविध कारणास्तव जेव्हा ताण निर्माण होतात तेव्हा परिस्थितीला सामोरे जाणे हाच एक पर्याय असतो. तणाव व संघर्ष ह्या केवळ वैयक्तिक बाबी नसून त्याचा कधी-कधी सार्वजनिक स्वरूपातही उद्रेक होऊ शकतो. काही वेळा एकूण गट किंवा जातीय गटाला सामुदायिक संघर्षाचा अनुभव येतो. असा गट तणावांचे जाहीर प्रदर्शन करताना आक्रमकता आणि हिंसाचार घडवू शकतो. आक्रमकता आणि हिंसा या सध्याच्या काळातील सामान्य घटना असल्या तरी त्यावर उपाययोजना करणे गरजेचे असते. आपण तणाव आणि संघर्षाची कारणे विचारात घेतल्यास मोठ्या प्रमाणावर आपल्याला विविध समस्यांची सोडवणुक करता येऊ शकते. तसेच पूर्वग्रह व चाकोरीबद्ध विचारसरणीमूळे उद्‌भवणाऱ्या समस्यांचे आकलन करून त्या समस्या सोडविण्यासाठी व्यक्ती प्रयत्न करू शकते.

१६.७ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१) संघर्ष म्हणजे काय ? संघर्षाची कारणे लिहा.

२) तणाव ही संकल्पना स्पष्ट करून तिची कारणे व परिणाम सविस्तर लिहा.

३) साचेबंद कल्पना म्हणजे काय ?

४) पूर्वग्रह आणि त्यांची वैयक्तिक विकासातील भूमिका स्पष्ट करा.

५) आक्रमकवृत्ती आणि हिंसाचार म्हणजे काय ?

६) टिपा लिहा.

१) नीतीतत्वे

२) मुलभूत मानवी मूल्ये

३) साचेबंद कल्पना

४) आक्रमक वृत्ती

५) हिंसाचार

❖❖❖❖

१७

समकालीन समाजातील तणाव आणि संघर्षाचे व्यवस्थापन

पाठाची रचना :

१७.० पाठाची उद्दिष्ट्ये
१७.१ प्रास्ताविक
१७.२ संघर्षाचे प्रकार
१७.३ तणावाला यशस्वीपणे तोंड देण्याच्या उपाय-योजना
१७.४ मॉस्लोचा आत्मपूर्ती सिद्धांत
१७.५ संघर्ष नियंत्रणाच्या उपाय-योजना
१७.६ सामाजिक ऐक्य आणि शांततेच्या दृष्टीने संघर्ष निवारण्याचे प्रयत्न.
१७.७ सारांश
१७.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न.

१७.० पाठाची उद्दिष्ट्ये

- संघर्षाचे विविध प्रकार समजावून घेणे.
- तणावाला यशस्वीपणे तोंड देण्याच्या उपाय-योजना समजावून घेणे.
- मास्लोचा आत्मपूर्ती सिद्धांत समजावून घेणे.
- संघर्ष नियंत्रणाच्या उपाययोजना समजावून घेणे.
- सामाजिक ऐक्य व शांततेच्या दृष्टीने संघर्ष निवारणाचे उपाय किंवा प्रयत्न समजावून घेणे.

१७.१ प्रास्ताविक

संघर्ष आणि तणाव ह्या बाबी वास्तव म्हणून स्वीकारल्यास व्यक्ती त्यांना सामोरे जाऊ शकते. त्याचप्रमाणे त्यावर नियंत्रणही मिळवू शकते. ज्या व्यक्ती तणावाखाली दबून जातात किंवा संघर्षापासून पलायन करातात त्या व्यक्ती आपल्या जीवनात पराभूत होतात. अशा व्यक्तींचा व्यक्तीमत्व विकास व्यवस्थित होत नाही. म्हणून तणाव व संघर्ष नियंत्रण या मानसशास्त्रीय बाबींचा अभ्यास करणे अतिशय गरजेचे आहे.

१७.२ संघर्षाचे प्रकार

परस्पविरूद्ध अशी दोन किंवा त्याहून अधिक उद्दिष्ट्ये, वृत्ती, ध्येये ही जेव्हा एकाच वेळी मनात जागृत होतात त्यावेळी संघर्ष निर्माण होतो. तो एखाद्या व्यक्तीच्या मनात जसा निर्माण होतो, तसाच समाजातील दोन वर्गात, गटात तसेच एकाच संघटनेत वावरणाऱ्या व्यक्तींमध्येही उद्‌भवू शकतो. अमेरिकन मानसशास्त्रज्ञ कुर्ट ल्यूइन ह्यांच्या मते जवळपास समान ताकद असलेल्या शक्ती जेव्हा परस्पर विरूद्ध दिशांनी पुढे येऊ लागतात, तेव्हा संघर्षाची परिस्थिती निर्माण होते.

संघर्षाचे वेगवेगळे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) अभिगम अभिगम संघर्ष :

व्यक्तीला आकर्षून घेण्याची समान शक्ती असलेले दोन पर्याय तिच्या समोर असतात. त्यातून एकाची निवड करायची असते. उदा. एखाद्या व्यक्तीला सर्वच दृष्टींनी सारख्याच आकर्षक अशा दोन व्यवसायांपैकी कोणता व्यवसाय स्वीकारावा, असा प्रश्न जेव्हा पडतो, तेव्हा त्याच्या मनात संघर्षात्मक आंदोलने सुरू होतात. त्यामुळे कोणता पर्याय स्वीकारावा ह्याबद्दल त्याच्या मनात अनिश्चितता निर्माण होते. असे असले तरी ह्या चढउतारांच्या प्रक्रियेत एखादा पर्याय चटकन स्वीकारला जाऊ शकतो.

२) वर्जन-वर्जन संघर्ष :

हा संघर्ष व्यक्तीच्या मनात बरेच ताण निर्माण करणारा असतो. कारण समोर असलेले दोन्ही पर्याय त्याच्यासाठी अप्रिय असतात. उदा. एखाद्या विद्यार्थ्याला अभ्यासही करायचा नसतो, पण अनुत्तीर्ण झाल्याबद्दल घरच्यांची बोलणीही खायची नसतात. जीवनात असे अनेक प्रसंग येतात की जेव्हा अशा प्रकारे दोन अप्रिय गोष्टींपैकी एकीची निवड करणे भाग पडते.

३) अभिगम-वर्जन संघर्ष :

ह्या प्रकारच्या संघर्षात एखादी गोष्टी एकाच वेळी हवीशी वाटते आणि टाळावीशीही वाटते. झाडावर चांगल्या चिंचा लागलेल्या पाहून मुलाला झाडावर चढून त्या तोडण्याचा मोह होतो. परंतु लगेच असाही विचार त्याच्या मनात येतो की आपण झाडावरून पडलो तर काय होईल? पण विचार केल्यानंतर ज्या विचारशक्तीचा प्रभाव त्याच्यावर पडतो, त्याप्रमाणे त्याच्याकडून निर्णय घेण्यात येतो.

४) दुहेरी अभिगम संघर्ष :

समान आकर्षणयुक्त, पण परस्पर अपवर्जित अशी दोन उद्दिष्ट्ये समोर असतील तर व्यक्तीचे मन द्विधा मन:स्थितीत सापडते आणि त्यातून बाहेर पडण्याचा माग सापडत नाही. उदा. एखाद्या व्यक्तीला घरीच बसून मनोरंजनासाठी रेडिओ ऐकावासा वाटतो, पण उकाडा फार होत असल्यामुळे घरात बसवत नाही, बाहेर पडून वातानुकुलित थिएटरमध्ये बसून सिनेमा पहावा असे म्हटले तर खिशात त्या क्षणी पैसे नसतात. ह्यातून व्यक्ती वैफल्यग्रस्त होण्याची शक्यता असते.

५) दुहेरी वर्जन संघर्ष :

या प्रकारच्या संघर्षात समोर असलेले दोन्ही पर्याय अनाकर्षक असतात. त्यातून कोणताही पर्याय स्वीकारला तरी वैफल्य अटळच असते. एखादी व्यक्ती बेकारीला कंटाळलेली असते. पण तिला मिळू शकणारी नोकरीही कंटाळवाणी आणि कष्टाची असते.

आपली प्रगती तपासा.

१) संघर्षाचे वेगवेगळे प्रकार सांगा.

_____

_____

_____

_____

१७.३ तणावाला यशस्वीपणे तोंड देण्याच्या उपाय-योजना

तणावाचा यशस्वीपणे सामना केल्यास तणाव कमी होऊ शकतो. जीवनातील तणावांची अपरिहार्यता लक्षात घेता त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी किंवा तणावाला यशस्वीपणे तोंड देण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करता येऊ शकतात. ह्या उपाय-योजना पुढीलप्रमाणे आहेत-

अ) वैयक्तिक उपाय :

व्यक्तीने स्वत:ची वैयक्तिक पातळीवर काळजी घेतल्यास तणाव कमी करण्यास मदत होते किंवा तणाव निर्माणच होत नाही.

१) शारीरिक आरोग्य : शारीरिक दृष्ट्या कमजोर व्यक्ती तणाव सहन करू शकत नाही. त्यासाठी व्यक्तीचे शारीरिक आरोग्य सुधारणे हा एकमेव उपाय आहे. योग्य प्रकारे व्यायाम केल्यास व सकस आहार घेतल्यास तणाव सहन करण्याची शरीराची क्षमता वाढते. शारीरिक क्षमता चांगली राहिल्यास तणावांचे शारीरिक परिणाम नियंत्रणात ठेवता येतात.

२) सामाजिक संबंध : निकोप सामाजिक संबंधामुळे व्यक्ती इतरांबरोबर मैत्रीचे संबंध राखून असते. त्यामुळे त्याला इतरांच्या मदतीची हमी वाटते. इतरांपासून त्रास होणार नाही, याची त्याला खात्री वाटते त्यामुळे त्याच्या मनात एक आशावादी दृष्टीकोन तयार होतो. त्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होते.

३) काल व्यवस्थापन : अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्यासाठी काल व्यवस्थापन अतिशय महत्त्वाचे आहे. प्राधान्य क्रमाने पूर्ण क्षमतेने कामे केल्यास व दिवसभरातील कामाचे वेळापत्रक तयार केल्यास तणावाचा सामना करावा लागणार नाही.

४) स्वयं नियंत्रणा : तणावपूर्ण परिस्थितीत स्वत:वर नियंत्रण ठेवणे, मनावर नियंत्रण ठेवणे व वागणुकीवर नियंत्रण ठेवणे हे पूर्णपणे व्यक्तीच्या हातात असते. त्यामुळे स्वयं नियंत्रणामुळे ही तणाव टाळता येऊ शकतो.

५) मनाची पूर्वतयारी : भविष्यातील तणाव घटकांचा अगोदर अंदाज घेऊन कोणकोणत्या अडचणी उद्‌भवू शकतात, त्यावर कशी मात करता येईल, याबाबत अगोदर मनाची पूर्वतयारी करुन ठेवली तर तणावाची तिव्रता कमी होते.

६) तणावमुक्तीचे प्रशिक्षण : योग, प्राणायाम आणि ध्यानधारणा याद्वारे शरीरावरील ताण कमी करता येतो. ध्यानधारणेमुळे एकाग्रता वाढते, त्यामुळे मनावरील ताण कमी होतो. शांत बसून संगीत ऐकल्यास तणावापासून मुक्ती मिळू शकते.

७) वैयक्तिक दक्षता : वैयक्तिक पातळीवर दक्षता घेतल्यास तणावांची तीव्रता कमी होते. संतुलित आहार, सकारात्मक विचार, छंद, मित्र इ. मुळे तणाव कमी करण्यास मदत होते.

ब) संघटनात्मक उपाययोजना :

कामगारांना तणावाची परिस्थिती निर्माण होण्याचे कारण म्हणजे त्यांच्या नोकरी-संबंधीत समस्या होय. त्यामुळे संघटनेने आपल्या कामगारांचा तणाव कमी करण्यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे. ह्या उपाययोजना पुढील प्रमाणे करता येतील.

१) कामाच्या स्वरुपात अनुकूल बदल : संघटनात्मक उपाययोजनांमध्ये कामाच्या स्वरुपात अनुकूल बदल घडवून आणले जातात. कामाच्या स्वरुपात बदल केल्यास कामगाराच्या कामातील चाकोरीबद्धपणा कमी होऊन त्याला नवीन कामात नाविण्याचा अनुभव देता येतो. अशा प्रकारे कार्यबदल केल्यास तणाव कमी होऊ शकतो.

२) निर्णय प्रक्रियेत समावेश : कामगारांना व्यवस्थापन व निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेतल्यास त्यांना स्वातंत्र्याचा लाभ मिळेल. कामगारांना आवडीचे व योग्य ठिकाणी काम दिल्यास तणाव कमी होतो. कामाच्या ठिकाणी व्यवस्थापनाचे दळणवळण, माहितीचा खुलेपणा ठेवल्यास कामगार व व्यवस्थापन यात अंतर रहाणार नाही. गैरसमज कमी होऊन तणाव कमी होईल.

३) कामाच्या आदर्श पद्धतीचा अवलंब : कामाच्या रचनेचा अनेक अंगांनी विचार करून कामाची आदर्श पद्धती शोधून काढावी की जी अधिक उत्पादक आणि कामगारांना आनंद देणारी असेल. त्यामुळेही त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राहील.

४) सल्लामसलत : तणावग्रस्त कामगारांच्या बाबतीत मानसोपचार तज्ञांकडून सल्ला उपलब्ध करून घ्यावा. किंबहुना अस्थापनेमध्ये अशा प्रकारचे मानसोपचाराचे शिक्षण घेतलेली व्यक्ती नियुक्त करावी की जी कामगारांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेईल. त्यामुळे कामगारांचा आत्मविश्वास वाढेल व ते जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतील.

आपली प्रगती तपासा.

१) तणाव कमी करण्याच्या उपाययोजना सूचवा.

_____

_____

_____

_____

१७.४ मॉस्लोचा आत्मपूर्ती सिद्धांत

प्रेरणांची वर्चस्वश्रेणी किंवा पदसोपानरचना :

व्यक्तीच्या वर्तनकालीन वर्तनामागे प्रेरणा असते. प्रेरणा म्हणजे व्यक्तीला विशिष्ट दिशेने कार्यरत करायला लावणारी व उद्दिष्ट प्राप्त होईपर्यंत कार्याला शक्ती पुरवणारी एक मानसिक स्थिती आहे. माणसाच्या वर्तनाचा विकास समजावून घ्यायचा असेल तर त्याच्या जीवनातील प्रेरणा, त्यांचे तुलनात्मक महत्व आणि क्रम समजून घ्यावा लागतो. प्रेरणा ही व्यक्तीची अंत:प्रेरणा असते. ती वर्तनाद्वारे बाह्यरूप धारण करते. प्रेरणा-वर्तन-उद्दिष्ट यांना प्रेरणा चक्र म्हणतात. जोपर्यंत उद्दिष्ट साध्य होत नाही तोपर्यंत हे चक्र चालू राहते.

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ अब्राहम एच मास्लो यांनी प्रेरणांची वर्चस्वश्रेणी किंवा पदसोपानरचना हा (Hierarchy of Motives)सिद्धान्त मांडला. त्यांच्या मते मानवी गरजांमध्ये मूलभूत (basic) गरजांकडून उच्च प्रतिच्या गरजांकडे जाण्याचा पदसोपानरचना आकृतीबंध असतो. मास्लोने पाच प्रकारच्या गरजांचा क्रम याप्रमाणे सांगितला आहे.

१) **शारीरिक गरजा :** जीवंत राहण्यासाठीच्या गरजा- भूक, तहान, विश्रांती, कामभावना, निवारा इ.

२) **सुरक्षिततेच्या गरजा :** उपासमार, हल्ला, बेकारी, अपघात, अस्थैर्य इ.

३) **सामाजिक गरजा :** प्रेम, मैत्री, सहवास, स्वीकृती इ.

४) **स्वत्व जपण्यासाठीच्या गरजा :** प्रतिष्ठा गरजा स्वयंआदर, आत्मगौरव, प्रतिष्ठा, मान्यता इ. (Estem needs)

५) **आत्मपूर्तीची /स्वयंपूर्ण होण्याची गरज :** गुणांचा उच्च दर्जाची, श्रेष्ठत्वाची, कार्यक्षमतेची अभिमानयुक्त जाणीव, सर्जनस्वातंत्र्य. (Need for self actuaisation).

मास्लोच्या मते निम्न दर्जाच्या गरजा पूर्ण झाल्यानंतर माणूस वरच्या दर्जाच्या गरजांचा विचार करतो. एक गरज पूर्ण झाल्यावर त्याच्यापुढील गरज मानवी वर्तनाची प्रेरक ठरते. व्यक्तीची शारीरिक सुरक्षिततेची, सामाजिक व प्रतिष्ठाविषयक गरजांची ज्या प्रमाणात पूर्तता होत जाते. त्या प्रमाणात आत्मपूर्तीची प्रेरणा व्यक्तीच्या जीवनात प्रबळ होऊ लागतात. मास्लोच्या मते पूर्ण झालेली गरज ही प्रेरक नसते.

मानवी गरजांची श्रेणीरचना किंवा सोपान रचना :



जेव्हा निम्न दर्जाची गरज बऱ्यापैकी पूर्ण होते तेव्हा प्रत्येक उच्च गरज कार्यरत होते आणि पूर्ण करण्याची मागणी करते. माणसाच्या शारीरिक, सुरक्षा आणि सामाजिक गरजा एका पाठोपाठ एक पूर्ण होतात. प्रतिष्ठा गरजाही पूर्ण करता येतात पण आत्मपूर्तीच्या गरजा जसे की ज्ञानप्राप्ती, सर्जन स्वातंत्र्य, स्वयंआदर ह्या सुप्त क्षमताद्वारेच पूर्ण कराव्या लागतात.

आत्मपूर्ती म्हणजे व्यक्तीने आपल्या सुप्त गुणांचा अविष्कार करणे व सतत आत्मविकास साधत राहणे. परंतु यापूर्वीच्या गरजा भागविण्याच्या दडपणाखाली सुप्त सामर्थ्य पडून राहतात. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी सर्जनशीलता असते. नवनिर्मितीच्या क्षमता जाग्या होणे म्हणजे आत्मपूर्तीची आवश्यकता वाटणे एक प्रकारे व्यक्तीच्या विकासाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे आत्मपूर्ती होय. समाजात या टप्प्यापर्यंत पोहोचणाऱ्या लोकांचे प्रमाण २ ते ३ टक्के एवढेच असते. प्रत्येक क्षेत्रात आत्मपूर्तीची प्रेरणा प्रबळ असणारी मोजकीच माणसे नवनिर्मिती करीत असतात. जसजसे आत्मपूर्तीच्या प्रेरणेस वाव मिळेल तसतसे माणसाला समाधान, साफल्य जाणवू लागते. आत्मपूर्तीच्या प्रेरणा ज्या प्रमाणात पूर्ण होत जातील त्या प्रमाणात व्यक्तीला एक समृद्ध आंतरिक समाधान मिळत जाते त्या प्रमाणात ती प्रेरणा व्यक्तिच्या जीवनात अधिकाधिक महत्त्व मिळवत जाते. आत्मपूर्ती म्हणजे नवनिर्मितीची किंवा सर्जनशीलतेची प्रेरणा होय.

कर्तबगार माणसे सामान्य माणसापेक्षा कोणत्या बाबतीत वेगळी असतात.

मास्लो आणि सहकाऱ्यांनी अल्बर्ट आईन स्टाईन, जॉर्ज वॉशिंग्टन, कार्वर अशा अनेक कर्तव्यप्रेरणा प्रबळ असणाऱ्या व्यक्तींचा सखोल अभ्यास केला. काही वर्तमान कर्तबगार व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. त्यांना या माध्यमातून कर्तबगार माणसे सामान्य माणसापेक्षा कोणत्या बाबतीत वेगळी असतात हे शोधून काढायचे होते. निरीक्षणातून याबाबत मिळालेली उत्तरे अशी.

१) स्वत:विषयी वास्तव जाणीव : आत्मपूर्ती लाभलेल्या व्यक्ती स्वत: विषयी वास्तव जाणीव असणाऱ्या असतात. त्या कमी प्रतिकार करणाऱ्या आणि टिकेचा स्वीकार करणाऱ्या असतात.

कर्तव्य प्रेरणा प्रबल असणाऱ्या व्यक्तींना वास्तवाचे चांगले ज्ञान असते. एकूण जग जसे आहे तसे पत्करण्याची त्यांची तयारी असते. त्यांना अज्ञानाची भिती नसते. उलट जिज्ञासा असते.

२) स्वयंस्फुर्तता व स्वाभाविकपणा : आत्मप्रेरीत व्यक्ती त्यांच्या कृतीमध्ये स्वयंस्फूर्त असतात. ते आपल्या भावना दाबून टाकीत नाहीत. कर्तबगार व्यक्तीच्या वर्तनात स्वभाविकता असते. कोणतीही कृत्रिमता किंवा तणाव नसतो.

३) उच्च नैतिकता : आत्मप्रेरीत व्यक्तींचा उच्च नैतिक विकास झालेला असतो. मित्र आणि प्रिय व्यक्तींच्या कल्याणाचा ते विचार करतात. त्यांच्याबद्दल ते सहानुभूती दाखवित नाहीत.

४) निष्ठा : आत्मप्रेरित व्यक्ती आपल्या कार्याप्रति निष्ठावंत असतात ते पैशासाठी किंवा प्रसिद्धीसाठी कार्य करीत नाहीत.

५) समस्येवर केंद्रिभूत : कर्तबगार व्यक्ती स्वत:च्याच समस्यांत गुंतून पडत नाहीत. समस्येवर लक्ष केंद्रित करतात, जगाकडे तटस्थपणे पाहतात.

६) स्वायत्त व स्वावलंबी : कर्तबगार व्यक्ती स्वायत्त व स्वावलंबी असतात. कोणाचेही गुलाम बनणे त्यांना आवडत नाही.

७) उत्सुकता : कर्तबगार व्यक्ती साध्या विषयातही सौंदर्य टिपू शकतात. त्यांना जगाबद्दल कुतुहल असते. स्वत:बद्दल आणि जगाबद्दल अनाग्रही पण मूलगामी माहिती करून घेण्यास ते उत्सुक असतात.

८) उदारपणा : राग, उतावळेपणा या मानवी विकारांचा त्यांनाही अनुभव येतो. तरीही समजून घेऊन ते इतरांशी उदारपणे वागतात. त्यांना एकूण मानवजातीबद्दल सखोल सहानुभूती असते.

कर्तबगार व्यक्तीमध्ये वरील गुण आढळत असले तरी या व्यक्ती कोणी संतसाधू नसतात. त्यांच्या ठिकाणीही काही दोष असतात. मास्लोने निकोप व्यक्तिमत्वाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आत्मपूर्तीच्या प्रेरणेकडे पाहिले आहे.

आपली प्रगती तपासा.

१) मास्लोचा आत्मपूर्ती सिद्धांत स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१७.५ संघर्ष नियंत्रणाच्या उपाय-योजना

संघर्ष निवारण म्हणजे वस्तुस्थितीचे तटस्थ विश्लेषण करून निपक्षपातीपणे सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेने, कल्पकतेने परिस्थितीत समाधानकारक मार्ग काढणे होय. संघर्षाची तीव्रता कमी करणे किंवा संघर्ष होणारच नाही यासाठी संघर्ष नियंत्रराची उपाययोजना करणे

गरजेचे आहे. संघर्षाची तीव्रता कमी करण्यासाठी व्यक्तीगत व सामाजिक पातळीवर उपाययोजना करणे गरजेचे आहे. यातील काही उपाय पुढील प्रमाणे आहेत.

१) वाटाघाटी :

दोन्ही परस्पर विरोधी गटांचे संघर्षामुळे होणारे नुकसान विचारात घेऊन दोन्ही पक्ष वाटाघाटीसाठी एकत्र येतात. चर्चेतुन व वाटाघाटीच्या मार्गाने प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो.

२) सत्ता, अधिकाराने संघर्ष दडपणे : बऱ्याचदा सत्तेचा आणि अधिकाराचा वापर करून संघर्ष दडपून टाकला जातो. चीनमध्ये लोकशाही स्वातंत्र्यासाठी सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपशाहीच्या मार्गाने चिरडून टाकण्यात आले. परंतु असंतोष दाबून टाकणे म्हणजे संघर्ष सोडविणे नव्हे.

३) संघर्षाची तीव्रता कमी करणे : एखाद्या संघर्षात काही अर्थ नाही, तो किरकोळ स्वरूपाचा आहे असे वातावरण निर्माण केल्यास संघर्षाची तीव्रता कमी होऊ शकते. जातीय दंगल, बॉम्बस्फोट, सामुदायिक अत्याचाराच्या प्रसंगी संघर्षाची तीव्रता कमी करण्यासाठी सरकारकडून लगेच चौकशी समिती नेमली जाते. त्यामुळे लोकांचा राग कमी होतो. समिती वर्षानुवर्षे चौकशी व अभ्यास करत प्रश्नांचे घोंगडे भिजत ठेवते. संघर्षाचा प्रश्न लोकांच्या विस्मृतीत जातो.

४) संघर्षातून माघार घेणे : काही संघर्षामध्ये आपल्या बाजूचे युक्तीवाद फोल आहेत. हे लक्षात आल्यावर संघर्षातून माघार घेतली जाते.

५) तडजोड : संघर्षामध्ये जेव्हा दोन्ही पक्ष तुल्यबळ असतात तेव्हा दोघांनाही तडजोड सोयीची वाटते. तडजोडीमध्ये काही मागण्या मान्य होतात, तर काही मागण्यांचा अट्टहास सोडून द्यावा लागतो. अशी भूमिका ठेवल्याशिवाय तडजोड होत नाही. तडजोडीमध्ये जसा कुणीच जिंकत नाही तसाच पूर्णपणे कोणी हरत ही नाही. तडजोडीमुळे संघर्ष तात्पुरता का असेना पण थांबतो.

६) संघर्षाचा सामना : या उपायामध्ये संघर्षाचे कारण दाबून न टाकता किंवा तडजोड किंवा कारण न टाळता ते निर्भयपणे पुढे मांडले जाते. याठिकाणी संघर्षाचे प्रमुख कारण शोधुन काढून त्यावर व्यवहार्य उपाय काढला जातो. कोण बरोबर आहे यापेक्षा काय बरोबर आहे हे निश्चित केले जाते. त्यामुळे दोन्ही बाजूंना सारखेच समाधान मिळते.

आपली प्रगती तपासा.

१) संघर्ष निवारणाच्या उपाययोजना सांगा.

_____

_____

_____

_____

१७.६ सामाजिक ऐक्य आणि शांततेच्या दृष्टीने संघर्ष निवारण्याचे प्रयत्न

समाजातील दोन किंवा अधिक व्यक्ती अथवा दोन किंवा अधिक गट यात झालेला प्रकट झगडा म्हणजे संघर्ष होय. दुसऱ्यांच्या इच्छांना विरोध करून किंवा प्रतिकार करून आपल्या इच्छा बलपूर्वक मार्गाने साध्य करणे म्हणजेच संघर्ष होय.

हा संघर्ष जेव्हा विधायक कार्यासाठी केला जातो. त्यावेळी समाज प्रगती साध्य करतो. मात्र हाच संघर्ष स्वार्थ साध्य करण्यासाठी किंवा आपल्या अहंकाराची पूर्ती करण्यासाठी होत असेल तर त्याने समाजाचे अतोनात नुकसान होते. संघर्ष विकोपाला गेल्यास आक्रमक वृत्ती वाढून हिंसाचारास चालना मिळते. हा हिंसाचार व्यक्ती-व्यक्तीमधील असू शकतो किंवा दोन गटांमधील असू शकतो. त्यामुळे समाजात अशांतता आणि जातीय द्वेष निर्माण होतो. ही अशांतता आणि द्वेष कमी करण्यासाठी पुढील उपाय करता येतील.

१) कायदा आणि सुव्यवस्था : कायदा व सुव्यवस्था सांभाळणाऱ्या यंत्रणेने जातीवाद, जमातवाद, प्रदेशवाद लक्षात न घेता हिंसा, दंगली आटोक्यात आणण्यास व अपराध्यांना कठोर शिक्षा केल्यास पुन्हा हिंसाचार करण्याची हिम्मत कोणी करणार नाही. त्यामुळे शांतता प्रस्थापित होईल.

२) शिक्षण : देशात शांतता व जातीय सलोखा प्रस्थापित करण्यात शिक्षण महत्त्वाची भूमिका बजाऊ शकेल. लोकांमध्ये सहकार्याची व विश्वासाची निर्मिती झाल्यास हिंसाचाराचे प्रमाण कमी होऊन शांतता प्रस्थापित होईल.

३) प्रसारमाध्यमांची भूमिका : समाजाच्या सर्व जाती-धर्मात मित्रत्वाची भावना निर्माण करण्याचे काम प्रसार माध्यमे करु शकतात. मित्रत्वाची भावना निर्माण होण्यासाठी प्रसार माध्यमांनी समाजावर प्रभाव पडेल अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे.

४) जनजागृती : सरकार, स्वयंसेवी संघटना व प्रसार माध्यमे यांनी एकत्रितपणे जनजागृती केल्यास त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव दिसून येईल. लोकांना शांततेचे, स्थैर्याचे महत्त्व पटवून दिल्यास समाजात शांतता प्रस्थापित होईल.

५) जातीय सलोखा आणि शांतता : दोन गटातील एकमेकांबद्दलचे पुर्वग्रह दूर करून जातीय सलोखा आणि शांतता यांना चालना दिली पाहिजे.

६) निखळ आणि निरोगी स्पर्धा : समाजातील दोन किंवा अनेक गटात असणारी स्पर्धा निखळ आणि निरोगी असावी.

७) धर्मनिरपेक्ष आणि तर्कशुद्ध साहित्यनिर्मिती : निरोगी धर्मनिरपेक्ष आणि तर्कशुद्ध साहित्यनिर्मितीद्वारे आक्रमकता आणि हिंसा नियंत्रित करता येईल.

८) सामाजिक संस्थांची भूमिका : सामाजिक अंतर कमी करण्यात आणि निरोगी सामाजिक वातावरण निर्माण करण्यात स्वयंसेवी संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात.

९) सरकारची जबाबदारी : सरकार, स्वयंसेवी संस्था आणि शिक्षणतज्ञ यांनी समाजातील कोणत्याही घटकाला बाजूला टाकले जात नाही याची काळजी घेतली पाहिजे.

आपली प्रगती तपासा.

१) जातीय सलोखा आणि शांतता प्रस्थापित करण्याचे उपाय सूचवा.

_____

_____

_____

_____

१७.७ सारांश

जगातील प्रत्येक व्यक्तीला सध्याच्या काळात तणाव, वैफल्य, संघर्ष याचा सामना करावा लागतो. व्यक्तीच्या जीवनात अनेक घटना घडत असतात की ज्यामुळे तिच्या जीवनात तणाव आणि संघर्ष निर्माण होत असतात. मात्र अशा तणावांना किंवा संघर्षाला बळी न पडता, त्यावर वेळीच नियंत्रण मिळविणे गरजेचे असते. तसे न झाल्यास व्यक्तीला अनेक प्रकारच्या शारीरिक व मानसिक आजारांना सामोरे जावे लागते. तणावाचे व्यवस्थित निरसन केल्यास व त्यासाठी उपाय योजना आखल्यास अनेक समस्यांपासून व्यक्तीची मुक्तता होऊ शकते. सामाजिक संबंध, स्वनियंत्रण, शारीरिक आरोग्य इ. द्वारे आपण तणावावर नियंत्रण ठेवू शकतो. त्याचबरोबर तडजोडीने किंवा वाटाघाटी करून, संघर्षाचा प्रतिकार करून व्यक्ती संघर्षावर नियंत्रण मिळवू शकते.

१७.८ विद्यापीठस्तरीय प्रश्न.

१) संघर्षाचे विविध प्रकार सांगा.
२) तणावापासून मुक्ती मिळविण्यासाठी उपाय सुचवा.
३) मॉस्लोचा आत्मपूर्ती सिद्धांत स्पष्ट करा.
४) संघर्ष नियंत्रणाच्या उपाय-योजना सांगा.
५) सामाजिक ऐक्य आणि शांततेच्या दृष्टीने कोणते प्रयत्न करता येतील ?
६) टिपा लिहा.
   १) संघर्षाचे प्रकार
   २) मास्लोचा आत्मपूर्ती सिद्धांत
   ३) संघर्ष नियंत्रणाच्या उपाययोजना

❖❖❖❖

१८

समकालीन सामाजिक आव्हाने : भाग १
(Contemporary Societal Challenges)
(नागरीकरण, गृहसमस्या, आरोग्य व बदलणारी जीवन पद्धती आणि संस्कृती)

पाठाची रचना :

१८.० उद्दिष्टे

१८.१ प्रस्तावना

१८.२ वाढते नागरीकरण

१८.२.१ शहरी भागातील आरोग्याच्या समस्या

१८.२.२ आरोग्य आणि घरबांधणीवर जागतिकीकरण आणि शहरी करणाचा परिणाम.

१८.२.३ राहणीमानाच्या पध्दतींमध्ये सुधारणा करणारी वैश्विक योजना.

१८.३ बदलणारी जीवन पध्दती आणि संस्कृतीवर होणारा परिणाम

१८.३.१ संस्कृती म्हणजे काय ?

१८.३.२ भारतीय संस्कृती

१८.३.३ भारतीय संस्कृतीची वैशिष्टे

१८.३.४ वैश्विकरणामध्ये बदलणारी जीवन पध्दती

१८.३.५ माध्यमांच्या उद्रेकांचा भारतीय संस्कृतीवर परिणाम

१८.३.५ माध्यमांच्या उद्रेकांचा भारतीय संस्कृतीवर परिणाम

१८.३.६ वैश्विक माध्यम पध्दत.

१८.३.७ वैश्विकीकरण आणि भारतीय माध्यम.

१८.३.८ सर्वसामान्य लोकांना माहिती पुरवणारी (वृत्तपत्रे, रेडिओ,टी. व्ही. इ.) (Mass Media) माध्यमाचा भारतीय संस्कृतीवर परिणाम

१८.४ सारांश

१८.५ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१८.० उद्दिष्टे

- वाढत्या नागरीकरणाचा परिणाम घरबांधणी व आरोग्यावर कोणत्या प्रकारे होतो. हे समजावून घेता येईल.
- बदलत्या जीवन पध्दतीचा संस्कृतीवर होणारा परिणाम जाणून घेता येईल.
- माध्यमांच्या उद्रेकांचा भारतीय संस्कृतीवर होणारा परिणाम जाणून घेता येईल.
- वैश्विकरण व भारतीय माध्यम यांचा संबंध समजावून घेता येईल.
- सर्व सामान्य लोकांना माहिती पुरवणारी साधनांचा (Mass Media) भारतीय संस्कृतीवर होणारा परिणाम जाणून घेता येईल.

१८.१ प्रस्तावना

खरे पाहता भारत देश हा खेडयांचा देश आहे. शेतीप्रधान देश असल्याने ७०% लोक खेडयात राहतात. परंतु हे प्रमाण हळूहळू कमी होऊन लोक शहरात राहण्यासाठी येत आहेत. याला महत्त्वाचे कारण म्हणजे औद्योगीकरण (Industrilisation) आणि शहरातील जीवन पध्दतीकडे खेड्यातील लोक आकर्षित होत आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे गृहबांधणी, आरोग्यावर परिणाम होत आहेत.

१८.२ वाढते नागरीकरण

सद्य- परिस्थितीमध्ये देशांच्या समाजरचनेमध्ये आर्थिक दृष्टिकोनांचा विचार केल्यास शहरे महत्त्वाची भूमिका बजावतात. सर्वसाधारणपणे शहरे शिक्षण, रोजगार, सेवा, सांस्कृतिक समृध्दि आणि चांगले आरोग्य इत्यादी संधी मानवाला पुरवितात. परंतु वास्तवात शहरामध्ये या सर्व संधी अपेक्षा प्रमाणे शहरामध्ये सर्वांना समान प्रमाणात मिळत नाहीत.

एका बाजूने विचार करता राष्ट्रीय मिळकत आणि मानवी भौतिक विकासाची पातळी सकारात्मक दृष्टीने शहरीकरणाशी घनिष्ठ प्रकारे संबंधित आहेत. सर्वसाधारणपणे प्रत्येक देशांतील शहरी भागामुळे एकूण राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product) हे विजोडतेने (Disproportionately) विभागले गेले आहे.

संपूर्ण विकसित जगात सर्व शहरामूळे ५०% ते ८०% एकूण राष्ट्रीय उत्पादन (GNP) आहे. शहरातील अधिक आरोग्य केंद्रामुळे मुलांचे जतन होण्याचा दर खेड्यापेक्षा शहरामध्ये अधिक आहे.

दुसऱ्या बाजूने योग्य नियोजनाशिवाय शहरे प्रचंड प्रमाणात वाढत आहेत. शेतीसाठी उपयुक्त असलेली जमीन शहरीकरणांसाठी मोठ्या प्रमाणात वापरली जात आहे. वातावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे पिण्याचे पाणी, आरोग्य, कचऱ्याची विल्हेवाट लावणे इत्यादी अनेक प्रकारच्या समस्या उदभवत आहेत. प्रचंड लोकसंख्या

वाढीमुळे मजूरी समस्याही सर्वसाधारणपणे शहरामध्ये निर्माण होत आहे. प्रचंड प्रमाणांतील वाढत्या शहरीकरणांमुळे शहरातील दारिद्रयही वाढत आहे. दि युनाईटेड नेशन्स् इन्व्हारमेंट प्रोग्रॅम (UNEP) ने पुढील प्रमाणे नमूद केलेले आहे. "Managing the urban environment sustainable will therefore become one of the major challenges for future" तथापि राष्ट्रीय आणि वैश्विक अर्थशास्त्रामध्ये शहरांचे महत्त्व दुर्लक्षित करता येऊ शकत नाही.

नागरी किंवा शहरी क्षेत्राची व्याख्या निरनिराळया प्रकारे करण्यात आली आहे. क्रियाशिलतेच्या दृष्टिकोनांतून उपयुक्त व्याख्या पुढील प्रकारे केली जाते. ''नागरीकरण किंवा शहरीकरण म्हणजे अशी प्रक्रिया की ज्यामध्ये शेतीकरण्यासाठी उपयुक्त असलेल्या जमीनीचे घरबांधणी किंवा औद्योगिकी करणांसाठी वापर करणे आणि शेती करण्याचा व्यवसाय करणारे लोक बिगर –शेती व्यवसाय करायला लागतात''. ही प्रक्रीया औद्योगिकीकरणांशी घनिष्ठ प्रकारे संबंधित आहे. म्हणून समाजातील प्रचंड प्रमाणात वाढणारे नागरीकरण किंवा शहरीकरण हे आर्थिक विकासाचा दर्शक समजण्यात येत आहे.

२००१ च्या खानेसुमारी (census) नुसार नागरी केंद्राची व्याख्या पुढील प्रमाणे केली.

पुढील अटी पूर्ण करणारी ठिकाणे नागरी केंद्र म्हणून ओळखली जातात.

* कमीत कमी ५०००
* कमीत कमी ७५% पुरुष बिघर –शेती व्यवसायामध्ये गूंतलेले आहेत.
* लोकसंख्येची घनता कमीत कमी ४०० आहे.

२००१ च्या खानेसुमारी (census) नुसार शहरातील लोकसंख्या एकूण लोक संख्येच्या २७.७८% होती. शहरातील लोकसंख्या एकूण लोक संख्येच्या १९०१ मध्ये १०.८%, १९५१ मध्ये १७.३% आणि २००१ मध्ये २७.२८% याप्रकारे वाढलेली आहे. महारष्ट्र (४२.४%) गुजरात (३७.५५%) तामिळनाडू (४३.३८%) आणि कर्नाटक (३३.९८%) या राज्यामध्ये शहरी लोक संख्या ३०% पेक्षा आहे.

१९८० नंतर आपल्या देशांमध्ये औद्योगिकरण, खाजगीकरण आणि वैश्विकीकरण यामुळे लोकसंख्या झपाटयाने वाढली आहे. जास्तीत जास्त लोक खेडयातून नगराकडे, लहान नगरांकडून मोठया नगराकडे आणि मोठ्या शहराकडून मुंबई, दिल्ली, कोलकत्ता, चेन्नई, हैद्राबाद, बंगलोर इत्यादी राजधानीच्या शहराकडे लोक स्थलांतरीत होत आहेत.

जरी शहरीकरण हे आर्थिक वाढीचा दर्शक असला तरी देशांमध्ये शहरीकरणाच्या प्रचंड वाढीमुळे देशांत अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. जागेअभावी कमीत कमी जागेमध्ये जास्तीत जास्त लोक राहत असल्याने लोकसंख्येची घनता वाढत आहे. अनेक शहरी भागांमध्ये जीवनमान खालावलेले आहे. प्रचंड वाढवाऱ्या लोकसंख्येमुळे पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापण, कचरा व्यवस्थापण विद्युत पुरवठा, वाहतूक व्यवस्था, शिक्षण आणि आरोग्य या नागरी सुविधा वरती प्रचंड प्रमाणात ताण निर्माण होत आहे.

आपली प्रगती तपासा

(१) शहरीकरण किंवा नागरीकरणची व्याख्या सांगून शहरीकरण किंवा नागरीकरणाचे तोटे आणि फायदे सांगा.

१८.२.१शहरी भागातील आरोग्याच्या समस्या

जागतिक आरोग्य संघटना (WHO) नुसार आरोग्याची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. "Health is a state of complete physical, mental and social- well being and merely ann absence of disease or infirmity." (आरोग्य म्हणजे शारिरीक, मानसिक आणि सामाजिक दृष्टया पूर्णत्वाची अवस्था व रोगांचा अभाव या प्रकारच्या स्थितीला आरोग्य असे म्हटले जाते.)

शहरीकरणांमुळे भौतिक आणि सामाजिक आरोग्यावर परिणाम होऊन निरनिराळया प्रकारचे रोग उदभवतात. भारतासारख्या विकसनशिल देशांमध्ये शहरी भागातील वाढत्या औद्योगिरीकरणामुळे आणि वाढत्या लोक संख्येमुळे प्रदूषण सारख्या भयंकर समस्या निर्माण होत आहेत. आरोग्य विषयक धोकादायक समस्या उद्‌भवत आहेत.

१८.२.२आरोग्य आणि घरबांधणीवर जागतिकीकरण आणि शहरीकरणाचा परिणाम

(१) **हवेचे प्रदूषण -** शहरीभागामध्ये माणसाच्या आरोग्यावर परिणाम करणारे हवेचे प्रदूषण हे अतिशय धोकारदायक आहे. दमा, फुफुसासंदर्भातील जुनाट रोग, लेड आणि बेरिलियम विषबाधा हे वाढत्या हवेच्या प्रदूषणामुळे वाढत आहेत.

हवेचे प्रदूषण हे घरात आणि घराबाहेर या दोन्ही ठिकाणी होते. घराबाहेरील प्रदूषणामध्ये विशेष करुन सर्वप्रकारच्या वाहनामधून आणि कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे होते. मुंबईमध्ये आणि इतर मुख्य शहरांमध्ये हवेच्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाहनांतून बाहेर पडणारा धूर आहे. लेड विषबाधा ही काही शहरांमध्ये प्रमुख समस्या आहे.

घरातील हवेचे प्रदुषण मुख्यतः विकसनशील देशांमध्ये मोठया प्रमाणात आढळून येते. घरातील हवेची प्रदूषणाची समस्या ही कोळसा, लाकूड, गोवऱ्या, रॉकेल या इंधनाच्या वापरामुळे निर्माण होते. हे प्रदूषण प्रामुख्याने लोकसंख्येने कमी असलेल्या शहरांमध्ये आढळून येते. घरातील आणि घराबाहेरील हवेच्या प्रदुषणाच्या स्त्रोतामुळे श्वसनाच्या संदर्भातील संसर्ग दोषाचे रोग होतात. विकसनशील देशांतील १ते ५ वर्ष वयोगटातील मुलांच्या मृत्यूचे कारण हे हवेच्या प्रदुषणामुळे श्वसनाच्या संदर्भातील संसर्ग दोष हे आहेत.

(२) **पाणी प्रदूषण** – वाढत्या शहरीकरणामुळे पाण्याची मागणी मोठया प्रमाणात वाढते आणि नगरपालिका महानगरपालिका यांच्या पाणीपुरवठयातील पाणी मोठया प्रमाणात वापरले जाते. वापरलेल्या घाणपाण्याची व्यवस्था नीट न केल्यास अनेक प्रकारचे जंतु तयार होतात, साचलेल्या सांडपाण्यामुळे डास तयार होतात आणि वेगवेगळया प्रकारचे रोग फैलावतात. काही वेळेस नगरपालिका व महानगरपालिका यांच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतील पाणी वाहून आणणाऱ्या नलिका फुटल्या जातात त्यामध्ये सांडपाणी मिसळले जाते. त्यामुळे जठराच्या संदर्भातील (Gastrointenstinal Disease) रोग होतात. बऱ्याच वेळा यामुळे, रोगी दगावलाही जाऊ शकतो. नगरपालिका किंवा महानगर पालिकेच्या पाणी शुध्दीकरण केंद्रामध्ये पाणी व्यवस्थित शुध्द न केल्यास अशुध्द पाणी पिले जाते. त्यामुळे जुलाब (अतिसार) इत्यादी रोडा उदभवतात. पोटाचे निरनिराळया प्रकारचे विकार निर्माण होतात.

(३) **घनकचरा** – विकसनशील देशांमध्ये घन कचऱ्याची विल्हेवाट ही मुख्य समस्या आहे. घन कचऱ्याची विल्हेवाट ही मुख्य समस्या आहे. घन कचरा गोळा करण्याच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळे ज्या ठिकाणी कचरा टाकलेला असतो, तो इतस्ततः विखुरला जातो व वातावरण प्रदूषित होते. बऱ्याच वेळा लोकांच्या निष्काळजीपणामुळे, आळशीपणामुळे व दक्षतेच्या अभावामुळे लोक कचराकुंडीमध्ये कचरा न टाकता कुठेही कचरा टाकला जातो. तो वातावरणांमध्ये सगळीकडे पसरला जातो, त्यामुळेही वातावरण प्रदूषित होते. घन कचऱ्याची विल्हेवाट योग्य पध्दतीने न झाल्यास हवेतील प्रदूषण मोठया प्रमाणात वाढते.

असंतुलित घन कचरा हा सांडपाण्याचे नळ तसेच ड्रेनेजच्या पाईपलाइनमध्ये अडकला जातो. त्यामुळे सांडपाणी साचले जाते, ते पाणी जमिनीच्या पृष्ठभागावर पसरते त्यामुळे अनेक प्रकारच्या डासांची निर्मिती होऊन निरनिराळया प्रकारचे रोग होतात. अडस अल्बोपिक्टस (Aedes Albopictus) हा डास वरील प्रकारच्या सांडपाण्यामुळे तयार होतो व या डासांमुळे भारतांमध्ये डेंगू (Dengue) सारखे रोग होत आहेत.

(४) **आवाजाचे प्रदूषण** – जगातील विकसित आणि विकसनशील या दोन्हीप्रकारच्या देशांमध्ये वाहनांच्या प्रचंड वाढत्या संख्येमुळे आवाजाचे प्रदूषण आणि हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. विकसित देशांमध्ये ही समस्या मोठ्या प्रमाणांवर निर्माण होत आहे. औद्यागिकीकरणांमुळे निरनिराळया कारखान्यांची उभारणी शहराच्या जवळपासच शक्यतो असते. त्यामुळे कारखान्यांतील निरनिराळया यंत्राच्या कर्कश्य आवाजामुळेही आवाजाचे प्रदूषण होते.

(५) **हिंसक कृती** – ग्रामीण भागांतील लोक नोकरी, शिक्षण, मजूरी कारखान्यातील काम इत्यादी मिळवण्यासाठी शहरी भागांमध्ये स्थलांतरीय होतात. त्यामुळे शहरातील लोकसंख्या प्रचंड प्रमाणांत वाढते. प्रत्येकी ठिकाणी गर्दी वाढते. सर्व प्रकारच्या नागरी सूविधेवरती ताण पडतो. नागरी सूविधा अपुऱ्या पडतात. त्यामुळे ही सर्व प्रकारच्या नागरी सुविधा मिळवण्याच्या स्पर्धेमध्ये माणसांमाणसांमध्ये अनेक प्रकारच्या हिंसक घटना घडतात. काही ठिकाणी शहरांमध्ये नागरी सुविधांचा गैरवापरही केला जातो. याचप्रमाणे माणूस प्रमाणिकपणे काम करत नाही. आळशीपणा वाढत आहे. त्यामुळे कामचुकारपणा वाढत आहे. फुकट मिळवण्याची वृत्तीही वाढत आहे. यामुळे शहरामध्ये बेकारी व गरीबी वाढत आहे. त्यामुळे खून, मारामारी, दंगल, दरोडेखोरी,

चोरी इत्यादी हिंसक घटना शहरामध्ये वाढत आहेत. त्यामुळे शहरातील माणूस नेहमी मानसिक तणावाखाली वावरत असतो.

(१) **लठ्ठपणा आणि मधुमेह** – शहरीभागामध्ये ग्रामीणभागापेक्षा बऱ्याच मोठया मोठयाप्रमाणात एका ठिकाणी बसून (बैसे काम) करावे लागते. शारिरीक हालचाली खूप कमी प्रमाणात होतात. महत्त्वाचे म्हणजे काम करणारे आणि न करणोही पाव – भाजी, वडापाव, पिझ्झा, चायनीज फूड याप्रकारचे तळलेले, कमी जीवनसत्त्व असलेले अन्न खात असल्यामुळे लठ्ठपणा आणि मधुमेह हे विकार प्रमाणात आढळून येत आहे.

(२) **संसर्ग दोषयुक्त रोगांच्या फैलाव** – शहरांमध्ये झोपडपट्टीच्या वाढत्याप्रमाणे घरांची गर्दी होत आहे. त्याठिकाणी सांडपाणी, कचरा यांच्या विल्हेवाटीची व्यवस्था चांगल्या प्रकारे नसते. त्यामुळे त्याठिकाणी संसर्गदोष युक्त रोग (Infections Diseases) मोठया प्रमाणात पसरतात. न्यूमोनिआ (Pneumonia) टयूबरक्युलॉसिस (Tuberculosis) डाईऱ्हीया (Diarrhea) इत्यादी संसर्गदोषयुक्त रोग पसरतात.

(३) **भावनिक ताण** – शहरी जीवनांमध्ये भावनिक ताण निर्माण होतो. कौटुंबिक व्यवस्था बिघडते. वाहतूकीची गर्दी, आवाजाचे प्रदूषण, वातावरणीय प्रदूषण इत्यादी गोष्टीचा परिणाम माणसांच्या सर्व प्रकारच्या मिळकतीवर होतो. शहरवासियांना पिण्याच्या पाण्यासाठी, घरासाठी, कचरा व्यवस्थापन, वाहतूक आरोग्याची काळजी यासारख्या मूलभूत सार्वजनिक सेवेसाठी पैसे द्यावे लागतात. गरीबांनाही या सर्व मूलभूत सार्वजनिक सेवेसाठी पैसे दयावे लागतात. या सर्व गोष्टीमुळे भावनिक ताणाची निर्मिती होते.

(४) **गलिच्छ वस्तीची वाढ -** वैश्विकी करणाच्या विस्ताराबरोबर जागतिक अर्थव्यवस्था अतिशय वेगाने बदलत आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे किंवा अविकसित भागाकडून विकसित भागाकडे स्थलांतरीत होण्याऱ्या लोकांची संख्या वाढत आहे. या स्थलांतरामुळे शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे भारतातील शहरांमध्ये राहण्यासाठी घराची मागणी मोठया प्रमाणात वाढत आहे. दुर्देवाने राहण्यासाठी घराची मागणी आणि वाढणारी लोक संख्या यांमध्ये खूप मोठया प्रमाणात तफावत आहे. यामुळे गलिच्छ वस्तींची (झोपडपट्टी) निर्मिती होत आहे. सुमारे एक बिल्यन (Billion) लोक शहरांमध्ये गलिच्छ वस्तीमध्ये राहतात. २००६ मध्ये बृहन्मुंबईमध्ये झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या सर्वाधिक होती. ती संख्या अंदाजे ६४,७५,००० होती. कोलकत्ता, चेन्नई आणि हैद्राबाद या शहरांमध्येही झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. जगामध्ये असे एकही शहर नाही की ज्याठिकाणी झोपडपट्टी (गलिच्छ वस्ती)नाही.

(५) **घरांच्या किंमतीत वाढ -** शहरातील वाढत्या लोक संख्येमुळे घरबांधण्यासाठी लागणाऱ्या जमीन कमी पडत आहे. तसेच महागाई वाढत असल्यामुळे घर बांधण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांची ही किंमत वाढत आहे. एकंपरीत घरबांधण्यासाठी लागणारी किंमतही मोठया प्रमाणात वाढत आहे. २०६ – २००७ मध्ये राहण्यासाठी लागणाऱ्या घरांच्या किंमती मध्यम वर्ग आणि माध्यम वर्गाच्या खालील वर्ग यांच्या घर विकत घेण्याच्या क्षमतेपेक्षा मुख्य शहरांमध्ये खूपच वाढलेल्या होत्या. सद्य परस्थितीमध्येही अजून वाढतच आहेत.

(६) **खाजगी हॉस्पिटल आणि क्लिनिक यांचा** – विकास जागतिकीकरणामुळे शहरांत आरोग्याविषयीची जाणीव, दक्षता निर्माण होत आहे. लोक जास्तीत जास्त प्रमाणांत आरोग्याकडे लक्ष देता आहेत. याचा परिणाम म्हणून खाजगी हॉस्पिटल आणि क्लिनिक शहरी भागांमध्ये मोठया संख्येने विकसित होत आहेत. मुंबईमध्ये ॲपोलोवर्कहार्ड, टाटा, मॅक्स इत्यादी मोठी हॉस्पिटल आहेत. याशिवाय धिरुभाई अंबाणी हॉस्पिटल, गोदरेज मेमोरिअल हॉस्पिटल, बॉम्बे हॉस्पिटल, आणि अनक मुंबई महानगर पालिका आणि महाराष्ट्र सरकार यांच्या मालकींची अनेक आधुनिक सोयींनी युक्त अशी हॉस्पिटल मुंबईमध्ये आहेत. अशा प्रकारच्या हॉस्पिटलमुळे नवीन नोकरी, तसेच डॉक्टर,नर्सेस, तांत्रिक काम करणारे अकॉंउटंट, व्यवस्थापक यांनाही वेगवेगळया प्रकारची संधी मिळते.

(७) **वैद्यकीय पर्यटनाचे व्यवस्थापन (Medical Tourism)** – वैश्विकीकरणामुळे वैद्यकीय पर्यटन व्यवस्थापनाला चालना मिळत आहे. भारतातील मुख्य शहरांमध्ये वैद्यकीय उपचार पध्दती आणि शस्त्रक्रिया यांच्या सोयी अतिशय विकसित आणि स्वस्त या दोनही घटकांचा विचार करुन उपलब्ध आहेत. यामुळे, आफ्रीका मध्य आशिया, तसेच विकसित असलेले युनाईटेड् स्टेट, कॅनडा, युनाईटेड किंगडम्, इत्यादी देशांतील रुग्ण भारताकडे आकर्षित होत आहेत. वेगवेगळया दंत, डोळे, इतर अनक शस्त्र क्रियेसाठी आणि उपचारासाठी परदेशांतील लोक भारतात येत आहेत. आज मुंबई आणि पुणे अनेक पाश्चिमात्य आणि आफ्रिकन देशांसाठी या प्रकारच्या उपचारासाठी प्रसिध्द आहेत. पुणे येथील प्रसिध्द संचेती हॉस्पिटल मध्ये परदेशी रुग्णांच्या इलाजासाठी वेगळा विभाग आहे. या विभागातर्फे फक्त रुग्णांचीच नव्हे तर त्यांच्या कुटुंबियांचीही काळजी घेतली जाते. सांधे बदलीसाठी (Joint Replacement) हे हॉस्पिटल आंतरराष्ट्रीय सर्वोकृष्ट आहे. भारतांमध्ये मुख्य शहरांमध्ये असलेल्या उत्कृष्ट वैद्यकीय पर्यटन व्यवस्थापनाला (Medical Tourism) चालना मिळत आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - आरोग्य आणि घरबांधणीवर जागतिकीकरण आणि शहरी करणाचा परिणाम सांगा.

_____

_____

_____

_____

१८.२.३राहणीमानाच्या पध्दतींमध्ये सुधारणा करणारी वैश्विक योजना

वातावरण आणि विकास या विषयावर सन १९९२ मध्ये युनाईटेड् नेशस् कॉन्फरन्स् ("Earth summit" in Rio de Janeiro Brazil) यामध्ये २१ विषयांवर ४० प्रकरणे अशा कृतिशील आराखडा करण्यात आला होता, त्यामधील सर्व प्रकरणे ही मानवाच्या योग्यप्रकारच्या विकासासाठीच आहेत.

जून १९९६ मध्ये इस्तानबुल (Istanbul) येथे मानवी स्थैर्यसाठी (Human settlement) व द सेकंड युनाईटेड नेशन्स् कॉन्फरन्स् मध्ये वैश्विक आराखडा स्वीकारुन शहरातील राहणीमानाच्या अटीमध्ये सुधारणा करण्यासाठी एक निवेदन प्रसिध केले आणि राहण्यासाठी पुरेशी घरे बांधण्याच्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्णय घेतला गेला. १९९६ मध्ये जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) संचालकांनी 'अधिक चांगल्या जीवानासाठी निरोगी शहरे (Healthy cities for better life) या संकल्पनेवर लक्ष केंद्रित करुन ते आपल्या संदेशात म्हणतात. " The health of urban populations deserves our urgent attention. If we are continue to let our cities grow without proper planning, local government authorities will be overwhelmed and unable to provide ever the most basic amenitions for health, such as housing, employment and safe environment."

संप्टेबर २००० मध्ये मिलेनियम समीट डिक्लेरेशन ने (millennium summit Declaration) गलिच्छ वस्ती शिवाय शहरे (Cities without slums) या योजनांची आखणी करुन जगभर कमीत कमी १०० मिलियन गलिच्छ वस्तीत राहणाराचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार केला.

ऑगस्ट -सप्टेंबर २००२ मध्ये 'द जॉहनसन बर्ग प्लॅन ऑफ इम्प्लिमेंटेशन (The Johannesburg plan of Implementation) ने नागरिकरण्याच्या संदर्भातील समस्येची चर्चा केली. त्यामध्ये १० प्रकरणांपैकी सहा प्रकरणामध्ये आरोग्याची चर्चा केली आहे.

जागतिक आरोग्य संघटना (WHO) ने निरनिराळया संघटनेशी भागीदारी मध्ये काम करुनही आरोग्य दायक शहर बनविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

सद्यपरस्थितीमध्ये जगभर असणाऱ्या शहरीकरणामध्ये महत्त्वाची आव्हाने आणि अनेक प्रकारच्या संधीही आहेत. शहरातील दारिद्रय पर्यावरणाचा ऱ्हास, सामाजिक अध:पतन इत्यादी अनेक प्रकारची आव्हाने आहेत. याचा बरोबर काही चांगल्या शहरी योजनेचाही समावेश आहे. यामुळे काही प्रमाणात शहरातील निरनिराळया प्रकारच्या समस्या सोडवण्यासाठी यश येत आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - राहणीमानाच्या पध्दतींमध्ये सुधारणा करणाऱ्या वैश्विक योजना स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१८.३ बदलणारी जीवन पध्दती आणि संस्कृतीवर होणारा परिणाम.

१८.३.१संस्कृती म्हणजे काय ?

संस्कृती हा शब्द वेगवेगळया प्रकारच्या कला, संगीत इत्यादीसाठी वापरला जातो, परंतु हा मर्यादित अर्थ आहे. सामाजिक दृष्टिकोनांतून संस्कृती या शब्दाचा व्यापक अर्थ आहे. समाज शास्त्रज्ञ पुढील प्रमाणे संस्कृतीचा अर्थ करतात.

संस्कृती म्हणजे लोकांच्या राहण्याच्या पध्दतीतील प्रत्येक गोष्ट. निरनिराळया प्रकारच्या पोशाख परिधान करण्याची रीत, अन्न निर्मिती करण्याचा अथवा अन्न मिळवण्याचा मार्ग, विवाहाला मान्यता आहे किंवा नाही ? विवाहाला मान्यत असेल तर कोणत्या प्रकारच्या विवाह पध्दतीला मान्यता आहे ? (उदा. एक पत्नी, बहुपत्नी इत्यादी) विवाह करण्याची पध्दती आसरा मिळवण्यासाठी कोणत्या प्रकारची घरे बांधतात ? कोणत्या प्रकारची भाषा बोलतात ? जीवनांमध्ये कोणत्या धर्माचे पालन करतात ?जीवन जगत असतांना काही पाळीव प्राणी पाळतात का ? या सर्व घटकांवरुन समाजातील मानवांची संस्कृती निश्चित होते.

वरील सर्व घटाकांचा विचार केल्यास वेगवेगळ्या समाजातील मानवी संस्कृती भिन्न भिन्न प्रकारची असते. मानवांच्या वागणूकीचे सर्व प्रकारचे मार्ग आणि त्यांच्या व्यक्तीगत श्रध्दा भिन्न भिन्न असतात. समाज शास्त्रज्ञ विशिष्ट घटकांचा विचार करुन संस्कृतीची व्याख्या करतात ती पुढील प्रमाणे – मानवी वागणूकीच्या निरनिराळया गुणधर्माचा आणि श्रध्देचा समूह म्हणजे संस्कृती होय.”

आपली प्रगती तपासा

प्रश्न : संस्कृती म्हणजे काय ? ते स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१८.३.२भारतीय संस्कृती

कोणत्याही राष्ट्रबददल बोलतांना त्या राष्ट्राच्या भूतकाळाविषयी बोलणं, ही अत्यावश्यक गोष्ट ठरते. भारताचा भूतकाळ हा भारावून टाकणारा आणि मनोरंजक आहे. भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. तसेच जगातील सहाव्या क्रमांकाचा मोठा देश आहे. भारत हा १०,००० वर्षापूर्वीचा प्राचीन देश आहे.

हजारो वर्षाच्या इतिहासाचा विचार केल्यास भारताचा शोध हा मध्यपूर्व, केंद्रींय आशिया आणि पाश्चात्य यापासून लागलेला दिसून येतो या सर्वांचा परिणाम भारतीय वंग आणि संस्कृतीवर दिसून येतो. या सर्वांचे एकत्रीकरण भारत देशांमध्ये दिसून येते. आज भारतांमध्ये सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनांतून निरनिराळे धर्म, जाती आणि भाषा हे घटक जास्तीत

जास्त महत्त्वाचे आहेत. भारत सरकारने २२ भाषेला मान्यता दिली असून कार्यालयीन भाषा म्हणून सर्वत्र हिंदी जास्त प्रमाणात बोलली जाते. जगांमध्ये इंग्रजी भाषा बोलणारा म्हणून भारताचा द्वितीय क्रमांक लागतो. भारतात सुमारे १५० मिल्यअन् लोक इंग्रजी भाषा बोलतात.

आर्थिक आधुनिकीकरण आणि निरनिराळया प्रकारचे फायदे असतांना ही भारतांमध्ये जातीसंख्या आणि जातीभेद आहेत. हिंदू आणि हिंदू नसलेल्या समाजामध्येही सामाजिक ओळख ही जातीवरुनच ठरविली जाते.

भारतीय कोणत्याही गोष्टीमध्ये पाठीमागे नव्हते. अनेक प्रकारच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक घटनांमध्ये ते सर्वांच्या अग्रस्थानी होते. ६००० वर्षापूर्वी सिंधू नदीमध्ये जलपर्यटन या कल्पेचा जन्म झालेला होता. भारतीय गणित आणि खगोलशास्त्रामध्ये सर्वांच्या पुढे होते.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - भारतीय संस्कृती ची माहिती दया.

_____

_____

_____

_____

१८.३.३भारतीय संस्कृतीचे वैशिष्टये –

भारतीय संस्कृतीला स्वत:ची एकमेव वैशिष्टे आहेत. त्यापैकी काही महत्त्वाची वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

- भारतीय संस्कृती जगातील सर्वात प्राचीन संस्कृती पैकी एक आहे. सर्वसामान्येपणे १० हजार वर्षापूर्वीची ही संस्कृती आहे.
- भारतीय संस्कृतीला अनेक प्रकारची सांस्कृतिक परंपरा आहे. भारतीयांचे निरनिराळे उत्सव, भाषा, पोशाख, अन्न, गाणी, नृत्य इत्यादी बाबतीत निरनिराळया प्रकारच्या सांस्कृतिक परंपरा आहेत. या संदर्भामध्ये मोठया प्रमाणात भारतीय संस्कृती ही जीवंत संस्कृती आहे.
- भारतीय संस्कृती ही नविन्यपूर्ण आणि सर्जनात्मक आहे. उदाहरणार्थ रामायण आणि महाभारत त्यांच्या आंतरिक मूल्यांसाठी (Intrinsic Values) जागातिकपातळीवर त्यांचा स्वीकार करुन प्रशंसा केली आहे.
- भारतीय संस्कृती ही वैश्विक सहिष्णुता म्हणून ओळखली जाते. कारण भारतीय संस्कृती मध्ये जगांतील सर्व चांगल्या गोष्टीची स्वीकार उदारपणे केला जातो. ऋगवेदाची पुढील प्रमाणे गर्जनाच आहे. “ Let nobble thoughts come to us from every side”.
- भारतीय संस्कृतीचे तत्वज्ञान ‘साधी राहणी आणि उच्च विचारसरणी’ यासाठी प्रसिध्द आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - भारतीय संस्कृतीची वैशिष्टे सांगा.

१८.३.४ वैश्विकीकरणामध्ये बदलणारी जीवन पध्दती

आज विश्वातील सर्व माणसे एकमेकांना जोडलेल्या अवस्थेत आहेत. आजच्या आधुनिक काळातील दळणवळणाच्या साधनांमुळे क्षणार्धात जगात कुठेही संपर्क साधता येतो. मानवाच्या इतिहासामध्ये जगातील सर्व माणसे आजच्या इतकी जोडलेल्या अवस्थेमध्ये केव्हाही नव्हती. आज कोणत्याही स्वरुपाची माहिती आणि पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अतिशय जलदगतीने (काही क्षणाधीतच) पाठवली जाते. पूर्वी इतक्या जलद गतीने माहिती व पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवले जात नव्हते. वेगवेगळया प्रकारचा माल आणि वेगवेगळया प्रकारच्या सेवा यांची जगातील कोणत्याही भागात निर्मिती झाली असता, जगातील इतर कोणत्याही दुसऱ्या भागात ते मोठया प्रमाणात उपलब्ध होतात. जागतिक प्रवास हा वारंवार व नित्याचा झाला आहे. आंतरराष्ट्रीय दळणवळण हे अगदी सोपे झाले आह. आपण स्वतंत्रपणे अशा जगात राहत आहोत की ज्यामध्ये पृथ्वीवरील अत्यंत भिन्न भिन्न संस्कृतीचे लोक राहतात आणि प्रत्येकाचा ऐतिहासिक अनुभव एकत्र करुन थोड्याचवेळात जागतिक दळणवळणाच्या माध्यमातून एकमेकांना समजतो. या दृष्टिकोनांतून जगातील सर्वजण एकमेकांच्या खूपच जवळ आले आहेत. या लोकोत्तर, अपूर्व प्रक्रियेला (process) वैश्विकरण किंवा जागतिकीकरण (Globalisation) असे म्हटले जाते.

वैश्विकरणाच्या साहयाने आज राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक वातावरणाचे वर्णन केले जाते. प्राथमिक स्वरुपामध्ये काही लोक वैश्विकरण किंवा जागतिकरण म्हणजे 'जागतिक व्यवसाय' (Global Business) समजात, परंतु जागतिकीकरणाचा अर्थ याच्याहून खूपच व्यापक आहे. आज व्यवसाय जणूकाही राष्ट्राला सीमा नाहीतच या संकल्पनेने चालतो. तसेच आज वेगवेगळया सामाजिक कृती, मजूर संघटना, वर्तमानपत्र बौध्दिक देवाण –घेवाण इत्यादींना परवानगीही जणूकाही राष्ट्राला सीमा नाही. असे समजूनच परवानगी दिली जाते यालाच म्हणतात. "संपूर्ण जग हे एक खेडे झाले आहे."

आपली प्रगती तपासा

प्रश्न - वैश्विकीकरणामध्ये किंवा जागतिकीकरणांमध्ये बदलणारी जीवनपध्दती स्पष्ट करा.

१८.३.५माध्यमांच्या उद्रेकांचा भारतीय संस्कृतीवर परिणाम –

प्रसार माध्यमे आणि जागतिकीकरण या दोन गोष्टी सध्याच्या काळात सर्वात गतीमान अशा संकल्पना आहेत. आधुनिक समाजामध्ये या दोन्ही गोष्टी अटळ आहेत माणूस बंदिस्त जीवन जगू शकत नाही. तो नेहमी वेळेचे आणि ठिकाणाचे अडथळे ओलांडण्याच्या विचार करीत असतो. पूर्वी कधीही वेगवान झाले नाही. इतके जागतिकीकरण आज वेगवान झाले आहे. यामुळे सार्वजनिक आणि खाजगी जीवन बदलत चालले आहे.

जागतिकीकरण ही घटना नसून एक प्रक्रिया आहे. आर्थिक प्रक्रियेपेक्षा जागतिकिकरणाची प्रक्रिया जास्त व्यापक आहे. जागतिकिकरणामध्ये मानवांच्या सर्व अंगाचा (All Dimessions of Human Life) समावेश होतो. सध्याच्या परस्थितीमध्ये मानव ज्याला सामोरे जात आहे. असे सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे. प्रसार माध्यमांच्या नवीन तंत्रामुळे हे आज अधिकच आव्हानात्मक बनत आहे. आज जागतिकी करणाचा अनुभव प्रसार माध्यमांमुळेही आपणांस येत आहे. असे मानणे एक तर्कसंगत कारण आहे. आत रेडिओवरती पॉप संगीत ऐकून किंवा व्हॉलिवूडचा चित्रपट पाहून किंवा U.S. किंवा U.K. मधील आपल्या मित्राला ई-मेल पाठवून आपण जागतिकीकरण अनुभवत असतो या अर्थाने आपण जागतिकीकरण अनुभवत असतो या अर्थाने आपण जागतिकीकरणाची संस्कृती प्रसार माध्यमांच्या द्वारा वापरत असतो. ही प्रसार माध्यमांची प्रकट व अप्रकट (Potential)शक्ती आहे. याकडे आपणांस दुर्लक्ष करणे किंवा कमी महत्त्व देणे. हे परवडणारे नाही. या घटनेचा आपणांस विचार करावा लागेल, तसेच वेगवेगळया प्रकारच्या परिणामाला सामोरे जाण्यासाठी आपणा स्वत:ला तयार करहावे लागेल.

१८.३.६वैश्विक माध्यम पध्दत

जागतिकीकरणामध्ये प्रसार माध्यमे समजावून घेणे खूप महत्त्वाचे आहे, कारण माहिती आणि प्रतिमांची निर्मिती आणि संपूर्ण जगभर त्यांचे वितरण करण्यामध्ये माध्यमांची अतिशय महत्त्वाची मुख्य भूमिका आहे. जागतिकीरणांमध्ये प्रसार माध्यमांचे फायदे तसेच तोटेही आहेत. याची फायदयाची बाजू म्हणजे ही प्रसार माध्यमे मानवांस अमर्यादित निवड व स्वातंत्र्य देत आहेत. अगोदरच आपण निवडीचे स्वातंत्र्य अनुभवत आहोत.

सध्या वैश्विक प्रसार माध्यमांवरती विकसित देशांचा प्रभाव दिसून येत आहे. ते जागतिक बाजारपेठेवर स्वत:चे वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अर्थात काही विकसित देशांच्या हातामध्ये ही शक्ती असेल तर विशेष करुन विकसनशील देशाला ही घटना धोकादायक आहे.

१८.३.७ जागतिकीकरण आणि भारतीय प्रसार माध्यमे

आपण ज्याला साक्ष आहोत अशी ही प्रसार माध्यमे ही अलिकडचा विकास आहे. १९८० पर्यंत रेडिओ, वृत्तपत्रे दूरदर्शन, चित्रपट सृष्टी भारतांतील या प्रसार माध्यमांचा वापर फक्त घरगुती होता आणि यांचे नियंत्रण सरकारकडून होत होते. तथापि १९९० च्या सुरुवातीला भारतीय प्रसार माध्यमांमध्ये मोठया प्रमाणात बदल झाले. ह्या बदलामध्ये प्रथमत : U.S. , आणि जागतिक बँकेकडून आर्थिक क्षेत्रामध्ये खाजगीकरणांसाठी दबाव आणला गेला

आणि प्रसार माध्यमांच्या तंत्रज्ञानाचा विकास होय. या विकासाच्या परिणाम भारतीय प्रसार माध्यम. भारतीय समाज आणि संस्कृतीवर गंभीर परिणाम झालेला दिसून येतो.

भारतासाठी जागतिकीकरण हे संधी तसेच धोक्याची पूर्व सूचना आहे. सध्याच्या परस्थितीमध्ये जागतिकीकरणांचा अगदी थोड्या जणांना संधी तर खूप जणांना धोक्याची पूर्वसूचना आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - (१) माध्यमांच्या भारतीय संस्कृतीवरील परिणाम स्पष्ट करुन जागतिकीकरण आणि भारतीय प्रसार माध्यमे यांतील संबंध स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१८.३.८सर्वसामान्य लोकांना माहिती पुरवणारी (वृत्तपत्रे, रेडिओ, टी. व्ही. इ. (mass media) माध्यमांचा भारतीय संस्कृतीवर परिणाम –

समाजातील सर्व माणसांना प्रभावित करणारी सर्व सामान्य लोकांना माहिती पुरवणारी माध्यमे (mass media) ही अतिशय शक्तीशाली साधने आहेत भारतामध्ये गेल्या वीस वर्षामध्ये सर्व सामान्य लोकांना माहिती पुरवणारी माध्यमांमध्ये मोठया प्रमाणांत वाढ झाली आहे. भारतीय परंपरागत संस्कृतीवर छाप पाडण्यामध्ये वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, इंटरनेट यांची महत्त्वाची भूमिका आहे. भारतीय संस्कृतीवर वरील प्रसार माध्यमांचा झालेल्या परिणामाबाबत मतभेद आहेत. काही तज्ञांच्या मते वरील प्रसार माध्यमांचा भारतीय संस्कृतीवर सकारात्मक दृष्टिकोनांतून परिणाम झाला आहे. तर काही तज्ञांच्या मते वरील प्रसार माध्यमांचा (mass media) भारतीय संस्कृतीवर नकारात्मक दृष्टिकोनांतून परिणाम झाला आहे.

(अ) वरील प्रसार माध्यमांचा (mass media) सकारात्मक परिणाम

भारतीय संस्कृतीवर वरील माध्यमांचा (mass media) सकारात्मक परिणाम झालेली पुढील काही उदाहरणे आहेत.

- **राष्ट्रीय एकात्मता (National Integration) -** दूरदर्शन, चित्रपट इत्यादी प्रकारच्या मास रेडिआ (mass media) मूळे राष्ट्रीय एकात्मतेला चालना मिळते. ही माध्यमे निरनिराळया जातीतील, धर्मातील, संस्कृतीतील लोकांना एकत्र आणतात आणि समाजामध्ये शांतता व एकोपा (peace and Harmony) आणतात. उदाहरणार्थ झाशी की राणी, रामायण इत्यादी दूरदर्शन वरील कार्यक्रम, तसेच हिंदी चित्रपट 'गांधीजी,' जिस देश मे गंगा बहते है,' उपकार, 'पूरब –पश्चिम' इत्यादीमुळे देशभक्ती जागृत होऊन शांतता व एकोपा समाजामध्ये निर्माण होतो.

- **कौटुंबिक नात्यामध्ये बळकटी येते -** दूरदर्शनवरील काही कार्यक्रमामुळे कौटुंबिक नात्यामुळे बळकटी येते. या कार्यक्रमामुळे आनंदाने एकत्र राहणे, कौटुंबिक कार्यक्रम, तसेच सण, उत्सव एकत्रित आनंदाने साजरे करणे, याचे दिग्दर्शन होते. उदाहरणार्थ, 'सास भी कभी बहु थी', 'हम लोग,' 'कहाणी घर घर की' इत्यादी.
- **स्त्रीयांची सकारात्मक व कृतिशील भूमिका -** काही दूरदर्शनाच्या काही कार्यक्रमामधून व चित्रपटांतून स्त्रीयांची सकारात्मक व कृतिशील भूमिका समाजांसमोर मांडली जाते. उदाहरणार्थ हिंदी चित्रपट 'मदर इंडिया'.
- **आर्थिक विकास** – वर्तमानपत्रे, रेडिओ आणि दूरदर्शनवरील जाहिरातामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नोकरी व्यवसाय उपलब्ध झाल्यास विक्रीची शक्तीही लोकांची वाढते. यामुळे राहणीमानाचा दर्जा, आर्थिक तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून उंचावतो.
- **जाणीवेत वाढ -** दूरदर्शन व रेडिओवरील अनेक कार्यक्रमांमुळे आणि वर्तमानपत्रातील लेखांमुळे घटनात्मक अधिकार, सामाजिक आणि नैतिक मूल्ये, यांची जाणीव होऊन अधिकार आणि कर्तव्ये कळतात.
- **अनैतिक सामाजिक घटना रोखल्या जातात** – बालमजूरी, हुंडापध्दती, वृध्दावस्थेतील समस्या, एडस्, (AIDS) स्वाईन प्लू इत्यादी घटना रोखण्यासाठी रेडिओ, दूरदर्शन चित्रपट इत्यादी द्वारे जागृती निर्माण केली जाते.
- **काही खास घटनांच्या अहवालांचे सादरीकरण -** रोडिओ आणि दूरदर्शनवरील अनेक कार्यक्रमांतून तसेच वृत्तपत्रांतून अनेक खास कार्यक्रमांचे विशेष करुन विशेष दिन साजरे केलेल्या कार्यक्रमांचे अहवाल सादर केले जातात. उदाहरणार्थ बालक दिन, मातृदिन हे दिन साजरे करुन मुलांचे आणि आईचे महत्त्व यांवर प्रकाश टाकला जातो. प्रजासत्ताक दिन, तसेच स्वातंत्र्य सैनिक आणि महान व्यक्तीचे जयंती किंवा पुण्यतिथी साजरे करुन त्याचे अहवाल दूरदर्शन, रेडिओ, वृत्तपत्रांतून प्रसिध्द केल्यास इतरांना त्यांतून काही चांगले करण्यासाठी प्रेरणा मिळते.

(ब) रेडियो, दूरदर्शन, वृत्तपत्र इत्यादी प्रसार माध्यमांचा (mass media) नकारात्मक परिणाम –

- १९९१ मध्ये नागरी लोक संख्येच्या १०% लोकांच्याकडे दूरदर्शन होते. १९९९ मध्ये हे प्रमाण ७५% पर्यंत वाढले. सद्य परीस्थितीमध्ये केबल रेलिव्हिजन, इंटरनेट सुविधा अगदी स्वस्त दरांमध्ये शहराबरोबर ग्रामीण भागांमध्ये सहज उपलब्ध होत आहेत. या सर्वांद्वारे अश्लिल, चित्रपट, माहिती समाजांतील सर्व घटकांपर्यंत ग्रामीण व शहरी भागामध्ये पोहचत असल्याने भारतीय संस्कृती नष्ट होत आहे.
- या प्रसार माध्यमांच्या तंत्राज्ञानामुळे सामान्य लोकांची स्वप्ने व दृष्टिकोन ही विध्वसंक बनत आहेत. अविवाहित मुले आणि मुली यांच्यातील अनैतिक वर्तन वाढत आहे.
- हिंसक घटना जास्तीत जास्त घडत आहेत. विशेष करुन स्त्रीयांच्या विरुध्द हिंसक घटना जास्ती घडत आहेत.

- निरनिराळया प्रकारच्या केवल, डी.टी. एच् (DTH) दूरदर्शनमुळे अनेक प्रकारचे फ्रेंडशिप डे, व्हॅलेन टाईन डे (Valen tine Day) साजरे केले जातात. यातूनच अनैतिक शारिरीक संबंध वाढतात आणि अनेक प्रकारचे लैंगिक रोग निम्राण होतात.

एकंदरीत समाजांतील स्त्रीया आणि वृध्द लोक यांच्या बददल आदर नष्ट होऊन भोगवृत्ती, द्वेषवृत्ती वाढून सामाजिक मूल्यांचा –हास होऊन समाज अध: पतित होत आहे.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - सर्वसामान्य प्रसार माध्यमांचा (mass media) सकारात्मक व नकारात्मक परिणाम स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

१८.४ सारांश

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने ग्रामीण भागामध्ये जास्तीत जास्त लोक राहत असत. खेडयांचा सर्वांगीण दृष्टिकोनांतून विकास म्हणजे खऱ्या अर्थाचे भारताचा विकास होय. म्हणून गांधीजींनी ‘ खेडयाकडे चला’ ही गर्जना केली. परंतु शहराच्या आकर्षणामुळे लोक शहरांकडे जाऊ लागल्याने शहरांतील लोकसंख्या झपाटयाने वाढली. त्यामुळे पिण्याचे पाणी, आरोग्य, सांडपाण्याची व्यवस्था अशा अनेक प्रकारच्या समस्या उद्‌भवल्या आहेत. यामुळे हवेचे प्रदूषण, पाण्याचे प्रदूषण कचऱ्यामुळे प्रदूषण, आवाजाचे प्रदूषण, हिंसक वृत्ती, लठ्ठपणा, मधुमेह यासारखे रोग,संसर्गजन्य रोगांचा फैलाव, गलिच्छ वस्तीतील वाढ, घराच्या किंमतीतील वाढ इत्यादी समस्या शहरीकरणांमुळे निर्माण झाल्या आहेत. आणि माणसाचे राहणीमान खालावत आहे. म्हणून माणसांचे राहणीमान उंचावण्याासाठी अनेक वैश्विक योजना अमलात आल्या.

बदलणाऱ्या जीवन पध्दतीचा संस्कृतीवर परिणाम घडून येतो. भारतीय संस्कृती अतिशय प्राचीन असून मानवांचा सर्वांगीण विकास या संस्कृतीमळे शक्य आहे. आज भारतीय संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट म्हणजे ‘विविधतेत एकता’ हे आहे. तसेच भारतीय संस्कृतीकडे वैश्विक साहिष्णुता आहे.

जागतिकीकरणामुळे मानवांची जीवनपध्दती बदलली आहे.जागतिकी करणांमुळे जग हे खूप जवळ आले आहे.

वेगवेगळया माध्यमांचा भारतीय संस्कृतीवर विधायक तसेच विध्वंसक परिणाम झालेला दिसून येतो. विधायक परिणामापेक्षा विध्वसंक परिणाम मोठया प्रमाणात झालेला दिसून येतो.

१८.५ विद्यापीठस्तरीय प्रश्न

(१) शहरीकरण किंवा नागरीकरणांची व्याख्या सांगून शहरीकरण किंवा नागरीकरणांचे फायदे व तोटे सांगा.

(२) आरोग्य आणि घरबांधीवर (Health Housing) जागतिकीकरण व शहरीकरणांचा परिणाम सांगा.

(३) राहणीमानाचा दर्जा उंचावणाऱ्या वेगवेगळया वैश्विक योजना स्पष्ट करा.

(४) संस्कृती म्हणजे काय? हे स्पष्ट करुन भारतीय संस्कृतीची माहिती दया व भारतीय संस्कृतीचे वैशिष्टे सांगा.

(५) वैशिकीकरणांमुळे किंवा जागतिकीकरणांमुळे बदलणारी जीवनपध्दती स्पष्ट करा.

(६) प्रसार माध्यमांचा भारतीय संस्कृती वरील परिणाम माध्यमांचा भारतीय संस्कृती वरील परिणाम स्पष्ट करुन जागतिकीकरण आणि भारतीय प्रसार माध्यमे यातील संबंध स्पष्ट करा.

(७) सर्वसामान्य प्रसार माध्यमांचा (mass media) सकारात्मक व नकारात्मक परिणाम स्पष्ट करा.

❖❖❖❖

१९

समकालीन सामाजिक आव्हाने : भाग - २ (शेतकरी आत्महत्या, जुनकीय पिके, विकास प्रकल्प, मानवी हक्काची पायमल्ली आणि तरुणांमधील वाढती गुन्हेगारी)

पाठाची रचना :

१९.० उद्दिष्ट्ये
१९.१ प्रस्तावना
१९.२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या
१९.३ जनुकीयदृष्ट्या उन्नत पिके
१९.४ विकास प्रकल्प व मानवी हक्कांची पायमल्ली
१९.५ तरुणांमधील वाढती गुन्हेगारी
१९.६ सारांश
१९.७ विद्यापीठस्तरीय प्रश्न

१९.० उद्दिष्ट्ये

- शेतकरी आत्महत्या का करतात ? हे समजावून घेता येईल.
- जनुकीय पिकांचा अभ्यास करता येईल.
- मानवी हक्कांची पायमल्ली कशी केली जाते ते समजावून घेता येईल.
- तरुणांमधील वाढती गुन्हेगारी समजावून घेता येईल.

१९.१ प्रस्तावना

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय लोकसंख्येच्या ५४ टक्के लोक उदर-निर्वाहाचे साधन म्हणून शेती व संबंधित उद्योग करत आहेत. शेतीमधील रोजगार हा प्रामुख्याने शेतीचा हंगाम, शेती उत्पादनाचे चक्र यांना अनुसरणारा असा असतो. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. असे असूनही आज शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना खूप

मोठ्या प्रमाणात अपयश येत आहे. आज शेतीविषयक सरकारचे धोरणही चुकीचे आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतीमधील माल तयार करण्यासाठी शेतकरी काबाडकष्ट करतात. परंतु मालाची किंमत मात्र ते स्वतः ठरवू शकत नाहीत. शेतमालाची किंमत व्यापारी वर्ग ठरवतो. वास्तविक पाहता शेतीमध्ये काबाडकष्ट करून शेतकऱ्यांनी उत्पादन करावे आणि त्यची किंमत दुसऱ्यांनी ठरवणे. ही खूप मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे शेकऱ्यांची पिळवणूक होते. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत बनते. तो अधिकच गरीब बनत जातो. तो कर्जबाजारी होतो. यातूनच तो आत्महत्येसारख्या प्रवृत्तीला बळी पडतो. अर्थात शेतकऱ्यांच्या आत्महत्येला इतरही अनेक कारणे आहेत.

बालपण आणि तारुण्य यांमधील काळ थरारुन सोडणाऱ्या बदलांचा काळ असतो. लहान बालकांपासून प्रौढ बनेपर्यंतचा काळ हा संमिश्र (Complex) व आव्हानात्मक (Challenging) आहे. याच काळामध्ये मानवी जीवनाला दिशा मिळण्याच्या दृष्टिकोनांतून सृजनात्मक काळ असून मानवी जीवन घडण्याचा (Becoming) काळ असतो. नेमके जीवनांत कोणता मार्ग निवडायचा या संदर्भात मनामध्ये द्विधा अवस्था असते. त्यामुळे ह्या काळात मोठ्या प्रमाणात गोंधळ आणि नैराश्य असते. सामाजिक दृष्टिकोनांतून योग्य बनणे, योग्य शिक्षण मिळवणे, आणि जबाबदारीने वागणे या सर्व गोष्टींचा दबाव असतो. याच वयात लैंगिक जाणीवेची निर्मिती होत असते. स्व-प्रतिमा, स्वतःची ओळखायची भावना, स्वायत्ततेची गरज या सर्व बाबींमुळे इतरांकडून सांगितलेले नियम आणि इतरांच्या अपेक्षा यांमध्ये नेहमी संघर्ष होत असतो. परंतु याचवेळी तरुणांना कोणत्याही प्रकारचा अनुभव नसतो, त्यामुळे एखादी अवघड परिस्थिती त्यांना व्यवस्थित हाताळता येत नाही. अशा वेळी तरुणांचे जीवन नैराश्याने विफल होते.

१९.२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतजमीनविषयक विपत्ती

१९.२.१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या (Famer's suicides)

- १९७१ सालापासून २,००,००० (दोन लाख) शेतकऱ्यांनी आपल्या जीवनांचा अंत केलेला आहे.
  शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मूळ कारण म्हणजे त्यांच्यावरील अतिशय वेगाने वाढणारे कर्ज आहे. शेतीची सकारात्मक आर्थिक परिस्थिती (Positive Economy) निर्माण होण्याचे पुढील दोन प्रमुख घटक आहेत.
- शेतीमध्ये उत्पादन काढतांना भरमसाठ वाढणारी किंमत
- शेतमाल विकल्यानंतर मिळणारी कमी किंमत. आजच्या मुक्त व्यापार आणि सामुदायिक जागतिकीकरण या धोरणांच्या मुळाशी वरील दोन घटक आहेत.

सन १९९८ मध्ये जागतिक बँकेच्या रचनात्मक तडजोड धोरण (structural adjustment policy) द्वारे बीयाणांचे क्षेत्र कागील (cargill), मॉन्सँटो (Monsanto), सिंगेंटा (Syngenta) यासारख्या जागतिक महामंडळासाठी खुले केले गेले. यामुळे शेतीमधील बियाणांच्या वापराची जागा महामंडळाच्या बियाणांनी घेतली. ही बियाणे महाग असून त्यांना भरपूर प्रमाणात रासायनिक खते, किटकनाशके यांची गरज असते. यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढून त्यांची गरीबी वाढत गेली आणि आजही हा खर्च प्रचंड प्रमाणात वाढत आहे. महामंडळे एकस्व (Patents) च्या माध्यमातून कार्य करतात. एखादा नवीन शोध बनविण्याची किंवा विकण्याची

अधिकृत विशेषाधिकार पत्रिका म्हणजे एकस्व (Patents) होय किंवा थोडक्यात कायदेशीर अधिकार पत्र होय. "व्यापारविषयक बौध्दिक मालमत्ता हक्क" (TRIPs) हा करार जागतिक व्यापार संघटनेने (WTO) शेती क्षेत्रालाही लागू केला आहे. यामध्ये वनस्पतींच्या विविध जाती, सुधारी बी-बीयाणे इ. समावेश आहे. यामुळे भारतासारख्या विकसनशील देशावर हानीकारक परिणाम होत आहेत. विकसित राष्ट्रांकडे मुबलक पैसा, सुयोग्य प्रयोग शाळा व तज्ञ व्यक्ती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याने अधिकारपत्रे त्यांच्याच ताब्यात असल्याने त्यापासून धोका निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त महागडे बियाणे विकत घ्यावी लागत आहेत. त्यांतून शेतऱ्यांचा खर्च वाढत आहे, त्यातून गरीबी वाढून शेतकऱ्यांवरील कर्ज वाढत आहे.

शेतीतील बियाणांचा वापर करण्याऐवजी महामंडळांच्या बियाण्यांचा वापर केल्यास महामंडळाची बियाणांवर मक्तेदारी असते. ते जास्तीत जास्त फायद्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्पादन करतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांची शेतीमध्ये अनेक पिके घेण्याऐवजी (Biodiversity) एकच पीक घेण्यासाठी (Monoculture) भाग पाडतात. महामंडळे ज्या बियाणांची विक्री करतात, तेच एक पीक घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान होते. उदाहरणार्थ, आंध्रप्रदेशातील वारांगल जिल्ह्यामध्ये हिरव्या लांब शेंगा असलेली द्विदल पिके, ज्वारी, बाजरी, भुईमूग यासारखी निरनिराळी पिके घेत असत. सद्यपरिस्थितीमध्ये त्यांना कापूस हे एकच पिक घेण्यासाठी दबाव आणून भाग पाडले. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. एकच पिक घेत राहिल्याने जमिनीची सुपिकता कमी होऊन जमीन नापीक बनते. एकच पीक वारंवार घेतल्याने पिक न येण्याची जोखीम वाढते. पिक घेण्यामध्ये विविधता असल्यास ही जोखीम राहत नाही.

बाजारपेठेत कधी कधी चाचणी न घेतलेले (untested) बियाणे येतात. माँनसँटो (Monsanto) चे प्रथम पिक न आल्याने एक बिल्युअन (one billion) नुकसान झाले. माँनसॅटो (Monsanto) कंपनीने खात्री दिली होती की एका एकरमध्ये १५०० कि.ग्रॅ. कापसाचे उत्पादन होईल, परंतु प्रत्यक्षात अतिशय कमी म्हणजे एका एकरमध्ये २०० कि.ग्रॅ. झाले. एका एकरपाठीमागे १०,००० रुपये मिळायला पाहिजे होते, तेव्हा एका एकरपाठीमागे ६४०० रुपये मिळाले बिहार राज्यामध्ये जेव्हा माँनसँटो (Monsanto) कंपनीने संकरित मक्याचे बियाणे तयार केले, तेव्हा शेतकऱ्यांचे चार बिल्यअन् (four billion) नुकसान झाले. तेव्हा गरीब शेतकऱ्यांची गरीब वाढतच गेली. अशा प्रकारे बियाणांवरील कंपनीच्या मक्तेदारीमुळे काही वेळा अशा प्रकारचे नुकसान मोठ्या प्रमाणात होते, तेव्हा शेतकरी आत्महत्या करतात.

जागतिक व्यापारी संघटनेच्या (WTO) व्यापाऱ्याच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांच्या मालाला खूप कमी किंमत मिळते. जागतिक व्यापारी संघटना (WTO) ही डम्पींग रुल (Dumping Rule) चा उपयोग करते. डम्पींग रुल (Dumping Rule) म्हणजे स्वतःच्या देशांमध्ये मालाला मागणी नसल्यास दुसऱ्या देशामध्ये तोच माल स्वस्त दरात विकला जातो. जागतिक व्यापारी संघटना श्रीमंत देशांनाच शेती व्यवसाय वाढवण्यासाठी आर्थिक मदत देते, त्याचवेळी इतर देशांना स्वस्त दरात उत्पादन निर्माण करण्यास प्रतिबंध करते. याचा परिणाम म्हणून जागतिक पातळीवर शेतकरी जेव्हा माल विकतो तेव्हा किंमती कमी होतात. उदा. १९९५ मध्ये एक टन गव्हाला $२१६ मिळते होते. ते २००१ मध्ये एक टन गव्हाला $१३३ मिळले. १९९५ एक टन कापसाला $९८.२ तर २००१ मध्ये एक टन कापसाला $४९.१ मिळाले. ही घसरण उत्पादनाच्या गुणवत्तेत फरक पडला म्हणून नाही, तर महामंडळाच्या श्रीमंत देशांना दिलेल्या

आर्थिक मदतीमुळे (Economic subsidies) आणि काही मूठभर महामंडळांची बाजारपेठेतील मक्तेदारी (Monopolies) मुळे असे घडत.

भारतामध्ये महाराष्ट्रातील विदर्भ भागात शेतकरी जास्त आत्महत्या करतात. प्रत्येक वर्षाला ४०००, तर प्रत्येक दिवसाला १० शेतकरी आत्महत्या करतात. याच विभागात माँनसँटो (Monsanto) कंपनीने तयार केलेले या बियाणांचा जास्तीत जास्त वापर केलेला दिसून येतो. हे बियाणे वापरल्याने शेतकऱ्यांना पीक घेण्यामध्ये अपयश आल्याने शेतकऱ्यांचे अतिशय मोठ्या प्रमाणांवर नुकसान झाल्याने शेतकरी कर्जबाजारी होऊन शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

कंपनीचे बियाणे खूप महाग असतात. मूळच्या कापसाचे बियाणे एका किलोग्रॅमला रु. ७, तर त्याच वेळी Bt cotton एका किलोग्रॅम रु. १७०० विकले गेले. याच बरोबर मूळचे कापसाचे पिक हे आलटून पालटून घेतले जात असे, त्यामुळे जमीनीची सुपिकता टिकत असे. परंतु Bt cotton हे एकच पिक घेतले जात असल्यामुळे (Monocuture) जमीन नापीकही बनते. कापसाचे मूळचे बियाणे (Indigenous cotton) वापरल्यास पीक पावसाच्या पाण्यावरही येते. परंतु Bt cotton हे बियाणे वापरल्यास त्याला पाणी देण्याची गरज असते. कापसाचे मूळचे बियाणे (Indigenous cotton) हे किटक रोधक (Pest-resistant) असते. Bt cotton हे बियाणे वापरल्यास ते कापसाच्या बोंडावरील किटकांसाठी रोधक असते. परंतु त्यातून दुसरे किटक तयार होतात, ते नष्ट करण्यासाठी Bt cotton च्या वापरापूर्वी जेवढी किटकनाशक औषधे लागत त्यापेक्षा १३ पटीने जास्त किटकनाशक औषधं लागत यामुळे पिक घेण्यासाठीचा खर्च खूप वाढतो व विक्री किंमत अतिशय कमी येते. यामुळे ही शेतकरी कर्जबारी होऊन आत्महत्येच्या जाळ्यात अडकतो.

भारतातील गरीब शेतकऱ्यांकडून त्यांचा व्यापारी माल जागतिक व्यापारी धोरणांनुसार स्वार्थीपणाने इतक्या कमी किंमतीत विकत घेतात, की जणू गरीब शेतकऱ्यांचा माल जणू ते चोरतातच. Research Foundation for science, Technology and Ecology (RFSTE) या संस्थेच्या अभ्यासानुसार भारतीय शेतकऱ्यांचा माल कमी किंमतीत विकत घेत असल्यामुळे प्रत्येक वर्षाला शेतकऱ्यांचा $२६ बिल्यअन (billion) इतके नुकसान होते. त्यामुळे मूळातच गरीब असलेला शेतकरी गरीबच होत जातो. त्याला ही गरीबी सहन होत नाही. त्याचे कर्ज वाढतच जाते. ते इतके वाढते की तो ते कर्ज फेडूच शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला स्वत:ची किडनी वगैरे विकावी लागते किंवा आत्महत्या करावी लागते.

शेतीच्या औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणाने देशाचा विनाश ओढवणारे अश्या आर्थिक धोरणांमुळे (economic sucicide) आत्मनाशास कारणीभूत घटना तीन पातळ्यावर होत आहे.

- स्वत: शेतकरी आत्महत्या करीत आहेत.
- या शेतकऱ्यांच्या अन्नधान्यावर अवलंबून असलेले गरीब माणसे
- नैसर्गिक बी-बियाणे न वापरल्यामुळे, पिक घेण्यात विविधता नसल्यामुळे याठिकाणी असणाऱ्या परिसंस्थेतील जीवांचाही नाश होत आहे.

शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये यासाठीचे काही उपाय

- महागड्या कंपनीचे बियाणे वापरू नये.
- GMO आणि Non-renewable बियाणांचाही वापर करू नये.
- रासायनिक शेती (Chemical Farming) न करता सेंद्रिय शेती (Organic Farming) करणे गरजेचे आहे.
- खोट्या आणि फसव्या किंमतीवर आधारलेल्या व्यापारपेक्षा खऱ्या व वास्तव किंमतीवर आधारलेल्या व्यापाराचाच आश्रय घेणे.
- शेतकऱ्यांची एकजूटही होणे आवश्यक आहे.
- शेतकऱ्यांसाठी असलेल्या सरकारी योजनेचा संपूर्ण फायदा शेतकऱ्यांनाच व्हावा, अशी व्यवस्था उभी करणे यासाठी सरकारी योजना राबवणारे अधिकारी आणि राजकीय पुढारी यांचा भ्रष्टाचार थांबवण्याची योजना अत्यंत आवश्यक आहे.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न १ शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे सांगून त्यावरील उपाय सूचवा.

_____

_____

_____

१९.२.२ शेतजमीनविषयक विपत्ती (Agrarian distress)

१९६० नंतर म्हणजेच हरित क्रांतीनंतर (Green Revolution) शेतीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. उत्तम सुधारित बी-बीयाणे, सिंचनाच्या प्रमाणात वाढ, किटकनाशके व खतांचा वापर आणि आधुनिक तंत्रज्ञान यामुळे उत्पादनात वाढ झाली आहे. तरीसुद्धा काही घटक शेती उत्पादनात अडथळा ठरत आहेत की ज्यामुळे शेतीची प्रगती योग्य प्रमाणात होत नाही. भारतीय शेती विकासात अनेक प्रकारच्या खालील प्रमाणे मर्यादा किंवा समस्या आहेत.

- भारतीय शेती ही पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर पडत नाही.
- सार्वजनिक क्षेत्राकडून कृषी क्षेत्रासाठी होणारी गुंतवणूक अतिशय कमी आहे.
- जमीनदारांकडून जमीन कसणाऱ्या कुळांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत असते.
- शेती विकासातील असमतोलपणामुळे शेतीच्या समाधानकारक विकास झालेला नाही.

वरील समस्यांचा विचार केल्यास सध्या शेतजमीन विपत्तीच्या काळात असल्याचे दिसून येते, म्हणजेच शेतजमीनीला अतिशय कठीण समय आला आहे.

कठीण समय म्हणजे शेत जमीनीत फक्त शेतीवर अवलंबून राहणे अतिशय धोकादायक आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबी येतात.

- जमीनी संदर्भात मालकी आणि शेतजमीनीचे विभाजन
- विशेषत: शेती आणि शेतकरी
- शेतजमीनीची सुधारणा व शेतकऱ्यांची आवड इत्यादी

कठीण समय किंवा विपत्ती म्हणजे त्रासदायक परिस्थिती होय. भारतीय शेतजमीनीच्या विपत्ती समयांस कारणीभूत ठरणारे घटक पुढील प्रमाणे आहेत.

१) **शेती उत्पादनात घट :** नवव्या पंचवार्षिक योजनेत (१९९७-२००२) आणि दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या (२००२-०७) काळात शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. नवव्या पंचवार्षिक योजनेत शेती व संबंधित क्षेत्राच्या विकास दर २.१% इतका होता तर दहाव्या योजनेत २.३% इतका होता. भारताला कमीत कमी शेती उत्पादनाची वाढ ४% इतकी होणे आवश्यक आहे. शेती उत्पादनातील ही वाढ समाधान कारक नसल्याने भारताला २००४-०५ मध्ये मोठ्या प्रमाणात गव्हाची आयात करावी लागली.

२) **वित्तीय संकटकाळ :** ५०% पेक्षा जास्त लहान व अल्पभूधारक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली आहेत. त्यांना बँकाकडून रीतसर कर्ज मिळत नाही. अनेक बँका शेतीसाठी कर्जपुरवठा ५ ते ७% व्याजाच्या दराने करतात. परंतु याचा फायदा श्रीमंत व मोठ्या शेतकऱ्यांनाच होत आहे. अल्पभूधारक व लहान शेतकरी ग्रामीण सावकारांकडून ३८% ते ५०% इतक्या व्याजदराने कर्ज घेतात. या कर्जाच्या ओझ्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्या करीत आहेत. महाराष्ट्रातील विदर्भात तरी अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. २ जूलै, २००७ रोजी महाराष्ट्र सरकारने पुढील घोषणा केली. "ज्या शेतकऱ्यांनी जुने कर्ज फेडले नसेल त्यांना नवीन कर्ज मिळणार नाही." आणि जर या शेतकऱ्यांना वित्तीय संस्थाकडून कर्ज मिळाले नाही तर त्यांना पुन्हा सावकाराकडून कर्ज घ्यावे लागेल. आणि त्यांची परिस्थिती बिकटच होत जाईल.

३) **बळजबरीने जमीनीच्या ताबा :** जमिन विकसीत करण्याच्या नावाखाली सरकार मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांकडून जमीनी घेत आहे आणि त्या बिल्डर्सना मोठमोठे अपार्टमेंट बांधण्यासाठी देत आहे. त्यामुळे अनेक हिंसाचार घडत आहेत.

४) **ग्रामीण दारिद्य :** ग्रामीण भागाचा विकास हा शेतीवर अवलंबून असतो. शेतीची उत्पादन क्षमता कमी झाल्याने उत्पादनातही घट होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर दारिद्य आहे. तर दुसऱ्या बाजूला औद्योगिक व सेवा क्षेत्र तेजीत आहे. परंतु शेती क्षेत्रामध्ये सर्वत्र अन्याय, जुलुम दिसून येत आहे. शहरी लोक व ग्रामीण लोक यांच्यात उत्पन्न व राहणीमान मध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते. सर्वसामान्य बंगले व अपार्टमेंट मध्ये राहत आहे.

५) **शेतीमालाला योग्य भाव नाही :** शेतीकरण्यासाठी लागणारे बियाणे, औषधे, खते व इतर साधने यांच्या किंमतीमध्ये महागाईच्या प्रमाणात सतत वाढत आहेत. पंरतु शेतीत तयार झालेल्या मालाच्या किंमती त्या प्रमाणात वाढ दिसून येत नाही. म्हणून गेल्या २५ वर्षात सरासरी शेती उत्पादनातील वाढ कमी झालेली दिसून येते. त्यामुळे शेतीतील दरडोई मिळणारे उत्पन्न अतिशय कमी आहे. ११ व्या पंचवार्षिक योजनेत शेती उत्पन्नातील वाढ ४७% दरवर्षी होईल असे कागदोपत्री नमूद केले असले तरी प्रत्यक्षात एवढी वाढ होत नाही.

यामुळे देशातील अनेक राज्यात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. एकीकडे शेतमालाला किंमत मिळत नाही तर दुसरीकडे शेतकऱ्याला शेती करण्यासाठी मोठ्या किंमतीने साधनांची खरेदी करावी लागत आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना विविध सोयी व सवलती जाहीर होत आहेत. परंतु त्यांची कार्यवाही व्यवस्थितपणे होत नाही. सरकारने जाहीर केलेले अनुदान शेतकऱ्यापर्यंत पोहोचतच नाही. या अनुदानाचा सरकारी अधिकारी व राजकीय नेते दुरुपयोग व गैरवापर करीत आहेत.

६) **माफीया :** माफीया हे राजकारणी लोकांशी संबंधित आहेत. अनेक जमीनी बळकावण्याच्या ते प्रयत्न करतात. भारतामध्ये बेकायदेशीर रीत्या जमीनी ताब्यात घेण्याच्या अनेक तक्रारी नेहमी नोंदविल्या जातात. शक्यतो आदिवासी लोक या माफीयाविरुद्ध लढाही देऊ शकत नाहीत. त्यामुळे जमीनीच्या खरेदी संबंधात कडक कायदे करण्याची गरज आहे. शक्यतो आदिवासी व मागास वर्गातील लोकांच्या जमीनीविषयी चांगल्या कायद्याची गरज आहे.

७) **पाण्याचा गैरवापर :** देशाच्या विविध राज्यात बहुराष्ट्रीय कंपन्या (MNCs) मोठ्या प्रमाणावर पाण्याचा गैरवापर करत आहेत. कंपन्याच्या उत्पादनासाठी प्रचंड प्रमाणावर पाण्याचा गैरवापर होत आहे. उदा. केरळ राज्यात कोका-कोला कंपनीने मोठ्या प्रमाणावर शेजारील गावातून पाणी गोळा केले आहे व हे संपूर्ण पाणी ते उत्पादन प्रक्रियेसाठी व इतर कामासाठी वापरतात. त्यामुळे आसपासच्या गावात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्या आहेत.

आपली प्रगती तपासा :

१) शेतजमीन विषयक संपत्ती किंवा कठीण समय निर्माण होण्यासाठी कारणीभूत असणाऱ्या घटकांची तपशीलवार चर्चा करा.

१९.३ जनकीयदृष्ट्या उन्नत पिके (Genetically Modified)

बाहेरच्या जनुकाला एखाद्या पिकाच्या जनुकीय साच्यामध्ये टाकुन मिळविण्यात आलेल्या इच्छित गुणधर्माच्या पिकांना जनुकीयदृष्ट्या उन्नत पिके असे म्हणतात. या पद्धतीने पिकांच्या जास्त उत्पादन देणाऱ्या, रोग प्रतिकारक, क्षारता प्रतिकारक, तणनाशक प्रतिकारक, दुष्काळी परिस्थितीतही तग धरुन राहणाऱ्या, कडक थंडीतही टिकाव धरु शकणाऱ्या, नापिक जमिनीतही येणाऱ्या जाती निर्माण करता येतात.

- याचे उत्तम उदाहरण म्हणजे बी.टी. (B.T. Cotton) बॅसिलस युरेंजिनसिस नावाच्या जीवानूमधून एक विशिष्ट जणूक काढून तो कापसाच्या बियानामध्ये टाकला असता त्यापासून तयार झालेल्या कापसाच्या झाडावरील बोंड अळीने (ballwarm) कापसाची पाने खाल्ली तर हे जनुक तिच्या शरीरातील अन्ननलिका उध्वस्त करुन टाकतो व अळी मरते.

- भारतीय कृषी संशोधन संस्थेने (IARI) पुसा जयकिसान आणि पुसासोना या मोहरीच्या दोन जाती जैवतंत्रसानाच्या साहाय्याने विकसीत केल्या आहेत. त्यामुळे बिज उत्पादनात २०% तर तेल उत्पादनात ४०% वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

या नवीन धान्याविषयी सांगताना, रोग प्रतिकारक आहे. याच्या हल्ला करणारे कीटकच मरतात, जास्त उत्पादन देणारे आहे. खत कमी लागते, पाणी कमी लागते, दुष्काळास तोंड देने वगैरे, गुणांचा उल्लेख केला जातो. ज्या पद्धतीने या पिकांमुळे फायदा होतो त्याच पद्धतीने याचे काही तोटे सुद्धा असल्याचे काही तंज्ञाचे मत आहे. हि पिके शाकाहारी कि मांसाहारी यापासून या वादाला सुरवात होते. कारण ही पिके घडविण्यासाठी जनुकात बदल केला जातो. हे करत असताना काही शास्त्रज्ञ कोणतीही जनुके कुठेही टाकताहेत. असा आरोप डॅनिएल रुबेन या लेखकाने केला आहे. त्यांच्या मते काही ठिकाणी समुद्री माल्यांची जनुके धान्यात किंवा भाजीत घालुन मोकळे होतात. अशा भाजीची गणना शाकाहारात करायची की मांसाहारात? रानटी विषारी झाडांची जनुके भाजीत, फळ झाडात घालतात. अशी भाजी, फळे खायची की नाही? रोपे खाऊन जनावरे दगावलीत. भाजी फळे खाऊन लोकांना ॲलर्जी आली आहेत. अशी माहिती डॅनिएल रुबेल देतात. त्यामुळे जी.एम उत्पादनावर शंका घेतली जाते.

परंतु भारतामध्ये जैवतंत्रज्ञानाचा वापर अत्यंत प्रभावी ठरल्याचे बी.टी. कापसाने सिद्ध केले आहे. असा योग्य वापर इतर पिकांमध्ये शक्य आहे. यासाठी बी.टी. तंत्रज्ञानाव्यतिरिक्त जैवतंत्रज्ञ उदा. चिन्हांकित जनुकांचा वापर हा क अतिशय उत्तम पर्याय वाटतो.

जैवतंत्रज्ञानाचा पर्यावरणावर विपरित परिणाम होत असल्याचे सिद्ध होत असल्याने पर्यावरण संरक्षणासाठी योग्य ती काळजी घेण्याचे आव्हान जैवतंत्रज्ञान शास्त्रज्ञांवर येवून ठेपली आहे. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येची वाढत्या प्रमाणावरील अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढविण्याची गरज आज निर्माण झाली आहे. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा जो मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्याचेही दुष्परिणाम आज खारवटलेल्या जमिनी व जमिनींचा बिघडलेला पोत या रुपाने दिसुन येऊ लागले आहेत. पिकांवर पडणाऱ्या विविध किडींचा व रोगांचा नायनाट करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कीटकनाशकांचेही रासायनिक दुष्परिणाम आता ठळकपणे जाणवू लागले आहेत. थोडक्यात सांगायचे तर, रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या वापरामुळे आज नव्याच समस्या आपल्यापुढे उभ्या राहिल्या आहेत. परंतु अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे तर गरजेचे आहे आणि किडींचा बंदोबस्त करणे ही आवश्यक आहे. या त्रुट्यांवर एकच पर्याय पुढे येतो, तो म्हणजे जैविक तंत्रज्ञान होय.

जैविक तंत्रज्ञानांतर्गत जनुकीय तंत्रज्ञानाचा वापर करुन पिकांची गुणवत्ता वाढविता येते. काही पिके गुणवत्तेच्या दृष्टीने चांगली असतात. पण त्यांच्यात रोगप्रतिकार शक्ती कमी असते. त्यामुळे अशी पिके किडींचा व रोगांचा प्रतिकार करु शकत नाहीत. त्यामुळे अशी पिके रोगाला बळी पडतात. याउलट काही पिकांच्या जाती उत्पादनाच्या दृष्टीने कमी प्रतीच्या असतात. पण त्यांच्यात रोगप्रतिकारक क्षमता अधिक असते. अशा वेळी या दोन्हीं जातींचा संकर घडवून आणून रोगप्रतिकारक्षमता कमी दिवसांत तयार होणाऱ्या व सत्वयुक्त आणि अधिक उत्पादन देणाऱ्या अशा पिकांच्या जाती तयार केल्या जातात. उत्तम प्रतीची आणि जास्त दिवस टिकणारी फळे-फुले यांच्या उत्पादनात या पद्धतीने क्रांती घडवून आणली आहे. महाराष्ट्रात

कोकण कृषी विद्यापीठाने तयार केलेल्या बिनकोयीचा आंबा, सीडलेस द्राक्षे, बिनबियांची पपई ही सारी जैविक तंत्रज्ञानांतर्गत जनुकीय तंत्रज्ञानाचीच करामत होय.

आपली प्रगती तपासा :

१) जनुकीयदृष्ट्या उन्नत पिके म्हणजे काय जाणून घ्या.
२) जैवतंत्रज्ञान पिकांचे फायदे-तोटे जाणून घ्या.

_____

_____

_____

_____

१९.४ विकास प्रकल्प आणि मानवी हक्काची पायमल्ली

माणूस हा समाजशील प्राणी आहे. अशी व्याख्या ॲरिस्टॉटलने केली आहे. मानवाकडे अमूर्त संकल्पानांचा विचार करण्याची, विश्लेषण करण्याची आणि त्या आधारावर निर्णय घेण्याची विशेष क्षमता आहे. मानव हा भूतकाळ, भविष्यकाळ आणि वर्तमानकाळाचा विचार करु शकतो. भूतकाळातील अडचणींवर मात करुन अधिक चांगला भविष्यकाळ घडविण्याचा ते प्रयत्न करतात. हे सर्व प्रयत्न म्हणजेच विकास करण्यासाठी केलेली धडपड.

विकास कोणासाठी :

मानव विकास कोणासाठी करतो हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. मानवासाठी विकास कि विकासासाठी मानव या प्रश्नाचे उत्तर शोधणे खूप कठीण झाले आहे. विकासाच्या नावाखाली मानवाच्या जगण्याचा हक्क हिरावून घेतला जात असेल तर त्या विकासाला अर्थ आहे काय? विकासाच्या प्रक्रियेमध्ये पर्यावरणाची हानी होणे अपरिहार्य आहे. आणि त्या पर्यावरणाचे बरे-वाईट परिणाम मानवाला भोगावे लागणार असल्यामुळे विकासाची संकल्पना मानवी हक्काची पायमल्ली करणारी नसावी. ही माफक अपेक्षा सामान्यांकडून केली जाते.

मानवी हक्क :

शेकडो वर्षाहून अधिक काळ अनेक प्रकारचे बदल होऊन आजची 'मानवी अधिकार' संकल्पना तयार झाली आहे. इतर संकल्पनाप्रमाणेच 'मानवाधिकार' संकल्पनेला आकार देण्यात अनेक विचारवंतांचा वाटा आहे. मानवी हक्काची संकल्पना मानवजातीच्या इतिहासामध्ये अखंडरित्या सतत विकसित होत आली आहे. युगानुयुगे कायदे, रीतिरिवाज आणि धर्म इत्यादींबरोबर तिचा दृढ असा संबंध राहिलेला आहे.

मानवी हक्क आणि विकास :

मानवी हक्काची पायमल्ली करुन विकास साधता येत नाही. कोणत्याही प्रकारचा विकास हा मानवासाठीच असल्याने त्याचा फायदा संपूर्ण मानवजातीला व्हावा हा निसर्गदत्त हक्क आहे.

परंतु विशिष्ट्य लोकसमूहांच्या हक्काची पायमल्ली करुन त्याचा इतर मानवाला फायदा करुन देणे. हा बळी पडलेल्या लोकांच्या हक्काचे उल्लघंन म्हणता येईल.

विकासात्मक प्रकल्प हे नेहमी मानवाचे स्वास्थ, भविष्यातील संकटे, आणि त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम याचा विचार करावा लागतो. विकासासाठी वेगवेगळी प्रकल्प राबविताना सरकारची भूमिका ही खूप महत्त्वाची असते. विस्थापितांना योग्य मोबदला त्यांचे मानवी हक्कांचे उल्लघंन होणार नाही याची काळजी गरजेचे असते. बहुतेक वेळा अशा प्रकल्पांना विरोध होतो तो मुळातच योग्य मोबदला न मिळाल्यामुळे. त्यामुळे अनेकवेळा प्रकल्पाला विरोध न होता व्यवस्थेला विरोध होतो. त्यामुळे मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही. याची सर्व जबाबदारी सरकारवर येवून ठेपते. मानवी हक्काच्या लढ्यासंबंधी भारतातील महत्त्वाच्या दोन प्रकल्पांचा आणि त्या विरोधात लढल्या गेलेल्या आंदोलनाचा अभ्यास केल्यास आपल्याला विकासात्मक प्रकल्प व मानवी हक्क या संकल्पना समजण्यास मदत होईल.

नर्मदा बचाव आंदोलन :

नर्मदा बचाव आंदोलन ही अहिंसात्मक मार्गाने आंदोलन करणारी स्वयंसेवी संस्था आहे. मेधा पाटकर यांनी १९८५ साली या संघटनेची स्थापना केली. त्यांच्या कार्यकर्त्यामध्ये गरीब, निरक्षर, आदिवासी यांचाच मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. गुजराथमधील सरदार सरोवर प्रकल्पाला विरोध करण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली. या आंदोलनाबद्दल बोलताना मेधा पाटकर म्हणतात "मोठी धरणे, आदिवासींचे जीवन, त्यांच्या उदरनिर्वाहाची साधने, त्या साधनांची केली जाणारी लूट, शेती आणि उद्योगामधील दरी, खेडे आणि शहरातील फरक, भांडवलवादी बाजाराला पोषक अशी (शासनाची) उद्दिष्टये, तसेच सामाजिक न्याय आणि पया७वरणाला पोषक अशी विकासाची दृष्टीचा सर्वाबद्दलची आमची मते या अनुभवाच्या आधारावरच आम्ही ठरवली आहेत".

त्यांच्या मते हे धरण स्थानिक आदिवासींसाठी विनाशकारी ठरणारी आहे. त्यांच्या मते सरकारने विस्थापितांचे पुनर्वसन करण्याच्या योजनाही योग्य पद्धतीने आखलेल्या नाहीत. सुरवातीस जागतिक बँकेने या प्रकल्पाला आर्थिक सहाय्य दिले होते परंतु नंतर वाढती टीका लक्षात घेऊन बँकेने या प्रकल्पातून माघार घेतली. पण पुढे भारताच्या सर्वोच्य न्यायालयात भारत सरकारचा विजय झाला. आणि सर्वोच्या न्यायालयाने सर्व आक्षेप बाजुला सारुन धरण बांधायला आणि प्रकल्प पुढे चालू ठेवण्यास परवानगी दिली. परंतु सरदार सरोवर नर्मदा निगम मात्र आपली बाजू मांडतना पुढील स्पष्टीकरण देते कि याचा अर्थ असा नाही की माणसांकडे आणि पर्यावरणाकडे लक्ष नाही दिले तरी चालेल. त्यांचा विचार केला पाहिजे. परंतु सकारात्मक गोष्टीचा सुद्धा विचार व्हायला हवे. एखाद्या प्रकल्पामुळे भविष्यकालीन फायद्याचा सुद्धा विचार करावा लागतो. विकसनशील देशातील गरीबी, दुष्काळ, विज, पाणी या समस्यांना तोंड देण्यासाठी विकसाशिवाय पर्याय नाही ?

दोन्ही बाजूचा विचार केल्यास आपल्याला असे लक्षात येईल कि जितकी धरणाची आवश्यकता तितकीच विस्थापितांच्या हक्काच्या. त्यामुळे दोन्हींचा मध्य साधून अशा प्रकारची प्रकल्पे राबवली पाहिजे.

जैतापूर अणुउर्जा प्रकल्प आणि मानवी हक्क चळवळ

कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात जैतापुर (माडबन) येथील १०,००० मेगावॉट क्षमतेच्या प्रस्तावित अणुउर्जा प्रकल्पामुळे भारनियमनाचे युग समाप्त होण्याच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल सुरु झाली आहे. भारत सरकारची न्युक्लीयर पॉवर कॉर्पोरेशन (NPCIL) जैतापूर प्रकल्पामध्ये प्रत्येकी १६५० मेगावॉट क्षमतेची सहा एकके (अणुभट्ट्या) उभी करणार आहे. फ्रान्सच्या अरेवा या कंपनीकडून ही एकके घेण्याचा प्रस्ताव आहे.

परंतु या प्रकल्पाला सुद्धा स्थानिकांच्या प्रखर विरोधाला सामोरे जावे लागत आहे. शिवसेना सारखा पक्ष या प्रकल्पाच्या विरोधात आहे. या प्रकल्पाबाबत सुद्धा स्थानिकांच्या मनात अनेक शंका आहेत. मुख्यतः किरणोत्सर्जनाचा आयुष्यावर होणारा परिणाम. त्यामुळे वंध्यत्व येते. जन्माला येणाऱ्या संततीत दोष असतात इ. शंका स्थानिकाच्या मनात घर करुन आहेत. त्याचबरोबर इथल्या पर्यावरणावर होणारा त्याचा विघटित परिणाम याबाबतही स्थानिकांच्या मनात सांशकता आहे. त्याच बरोबर चेनॉबिल, व जपानच्या आठवणी अजूनही लोक विसरलेले नाहीत.

वरील सर्व गोष्टी विचारात घेतल्यानंतर इतर प्रकल्पाप्रमाणे जैतापूर अणुउर्जा प्रकल्पाबाबत सरकारने घेतलेली भूमिका ही उशिरा सूचलेले शहानपण या उक्तीप्रमाणे घेतले आहे. कोणताही प्रकल्प सुरु करण्यापूर्वी त्याबाबतची जागरुकता सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ही सरकारचे आद्य कर्तव्य आहे. कदाचित सरकारने यापूर्वी याची काळजी घेतली असली तर जैतापूर मधील आंदोलनाला हिंसक वळण लागले नसते व मानवी हक्काची पायमल्ली टळली असती.

जगभर आज ४३० अणुभट्ट्या कार्यरत आहेत. भारतात फक्त २० अणुभट्ट्या आहेत. त्यांची वीज निर्माण करण्याची क्षमता खूप कमी आहे. पण अणुभट्ट्यांमधून आपण अणुभट्ट्या कशा उभारायच्या आणि कशा वापरायच्या हे शिकलोय. आणखी एक आहे, थोरियमचे फार समृद्ध साठे भारतात आहेत. आपल्या कल्पक्कम येथील प्रायोगिक अणुभट्टीत आपण यशस्वीपणे थेरियम वापरलय. त्यामुळे जैतापुरा आपण फ्रान्समधून ज्या अणुभट्ट्या आणणार आहेत, त्यात तिसऱ्या टप्प्यात आपण भारतातील थोरियम वापरु शकू. आपले थोरियम आपल्याला महासत्ता बनवू शकेल.

तंत्रविज्ञानातील प्रत्येक प्रगतीत माणूस धडपडतो, पडतो, पण त्यातून काही नवे शिकून पुढे जातो. अमेरिकेत थ्री मायकर, आयलंड झाले, रशियात चेनॉबिक, पण या देशानी अणुउर्जेचा त्याग केला नाही. ते त्या अपघातातून शिकले आणि पुढे गेले. आज भारतात आपण एकत्रितपणे जेवढी वीज बनवतो. त्याहून अधिक हे दोन देश अणुउर्जेतून बनवतात. फ्रान्समध्ये ८७ टक्के वीज अणुउर्जेतून मिळते किंवा फ्रान्स ६३ हजार मेगावॉट वीज अणुभट्ट्यांमधून मिळवतो. या विकसित देशांशी स्पर्धा करायची असेल तर आपल्याला जैतापूरची आवश्यकता आहे. परंतु ती मानवी हक्काची पायमल्ली करुन नव्हे, तर ज्या लोकांच्या सहकार्याने त्यांच्या जगण्याचा हक्क अबाधित राहूनच केला पाहिजे. तर भविष्यातील विकसित भारताला अर्थ राहील. त्यामुळे स्थानिक लोकांच्या शंका दूर केल्याशिवाय जैतापूर प्रकल्प राबविल्यास लोकांमध्ये अंसतोष कधीही उफाळून येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

आपली प्रगती तपासा :

१) मानवी हक्कांची पायमल्ली आणि विकास जाणून घ्या.
२) नर्मदा बचाव आंदोलन व जैतापूर प्रकल्पाची माहिती जाणून घ्या.

१९.५ तरुणांमधील वाढती गुन्हेगारी

बालपणांपासून तरुण वयापर्यंत संस्कार मानवी जीवनामध्ये दृढ होत असतात. तरुण वयांपेक्षाही बालपण अतिशय संस्कारक्षम असते या वयात बालकाला योग्य संस्कार मिळाले नाहीत तर हळूहळू बालकांचे रुपांतर तरुणांत होत असतांना तरुण अध:पतनाकडे जातात. आजच्या सद्यपरिस्थीमध्ये कुटुंबातून संस्कार मिळत नाहीत. शैक्षणिक संस्थेला व्यापाराचे स्वरुप प्राप्त झाल्याने त्याठिकाणीही संस्कार मिळत नाहीत. आज धर्मांचे रुपांतर फक्त आणि फक्त कर्मकांडात झाल्यामुळे त्याठिकाणीही संस्कार मिळत नाहीत. अर्थात संस्कार म्हणजे सद्‌गुण मुलांने स्वत:हून उचलण्यासाठी परिस्थितीची निर्मिती करणे, म्हणजे संस्कार होय. परंतु हे बालपणांपासूनच होत नसल्याने तरुणपणी मुले बिघडलेली दिसतात. हळूहळू त्यांच्या पुढील प्रमाणे गुन्हेगारी निर्माण होते.

१. संस्काराअभावी तरुणांमध्ये प्रामाणिकपणे कष्ट करण्याची वृत्ती निघून जाते व तो फुकटचे मिळण्याच्या किंवा चोरी करण्याच्या प्रयत्न करतो.
२. संस्काराअभावी आई-वडिलांविषयी, गुरुजनांबद्दल समाजाबद्दलचा तरुणांच्या मनांमध्ये असलेला आदर नष्ट होतो. त्यामुळे अनेक हिंसक घटना घडतात.
३. याच वयात एका बाजूला लैंगिक जाणीव निर्माण होत असते, परंतु दुसऱ्या बाजूला वैचारिक दारिद्र्य असते. सद्‌गुणांचा अभाव असतो. चांगल्या विचारांचा पत्ता नसतो. त्यामुळे बलात्कारासारख्या भयंकर घटना घडतात.
४. याच वयात योग्य संस्काराच्या अभावामुळे मुले दारु, विडी, ड्रगज् इत्यादी विविध व्यसनामध्ये अडकतात.
५. तरुण जर विद्यार्थी असेल तर प्रामाणिकपणे अभ्यास न करता कॉपी वगैरे करुन गैर मार्गाने पास होण्याचा प्रयत्न करतो.
६. कामचुकारपणाली वृत्ती वाढते. इत्यादी अनेक प्रकारची गुन्हेगारी तरुणांमध्ये आढळते. हे गुन्हेगारीचे प्रमाण जसजसे वाढत जाते, तसतसे तरुणांच्या मनात नैराश्य येऊ लागते व तो आत्महत्येकडे प्रवृत्त होतो.

१९.५.१ तरुणांमधील आत्महत्या

आत्महत्या म्हणजे आत्मविनाशाकडे घेऊन जाणाऱ्या घटनेची व्याख्या पुढील प्रमाणे करता येते. "आत्महत्या म्हणजे जाणूनबूजून हेतु परस्पर एखाद्या नशेचा जादा डोस घेऊन किंवा मुद्दाम अपघात घडवून आणून किंवा इतर कोणत्याही मार्गाने स्वतःच्या जीवनांचा अंत करणे होय."

आत्महत्या ही व्यक्तिगत जीवनांमध्ये असलेली एक खुप मोठी शोकांतिका (Tragedy) आहे. तर सामाजिक आरोग्याच्या संदर्भात एक खुप मोठी समस्या समजली जाते. आध्यात्मिक दृष्टिकोनांतून 'आत्महत्या' हे पाप समजले जाते. कारण जन्म माणासाच्या हातात नसेल तर नैतिक दृष्टिकोनांतून मृत्यु सुद्धा माणसांला स्वतःच्या हातात घेता येत नाही. म्हणून आत्महत्या करणे, गुन्हा समजला जातो. म्हणून कायद्यानुसार आत्महत्या करताना माणूस जीवंत राहिला, तर त्याला शिक्षा (Punishment) होते.

आज तरुणांमध्ये जर नेहमी अपयश येत असेल तर मित्र, कुटुंब, समाज सर्व बाजूंनी अवहेलना, अपमान होतो. तेव्हा त्याच्या जीवनात नैराश्य येते. त्यामुळे तो आत्महत्येला प्रवृत्त होतो.

१९.५.२ तरुणांच्या आत्महत्यापूर्व इशाऱ्याची खुणा (Some common warning signs before youth suicides) :

- वागणूकीमध्ये अचानक होणारा बदल
- कोणत्याही कृतीपासून किंवा मित्रांपासून अलग राहणे.
- आवडी अभावा (Lack of interest)
- दारु किंवा इतर नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन वाढणे.
- कुंटुबातील सदस्यापासून अलग राहणे.
- एकलकोंडपणाचे जीवन जगणे.
- भावनेचा उद्रेक होणे, स्वभाव चिडचिडेपणाचा बनणे.
- निराशावादाची भावना निर्माण होणे.
- आत्महत्येच्या संदर्भात बोलणे उदा. मी मेलो किंवा जगलो तर कोणाला सोईरसुतक नाही इत्यादी.
- डायरीमध्ये वगैरे आत्महत्येच्या संदर्भात लिहिणे.
- जे आत्महत्या करुन मेले आहेत. त्यांचाच आदर्श बाळगणे.

अशा प्रकारे आत्महत्यापूर्व इशाराची यादी खुप मोठी होऊ शकते. महत्त्वाचे म्हणजे नैराश्य जीवनांत येऊन जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो.

१९.५.३ तरुणांमधील आत्महत्येची जोखीम वाढवणारे घटक :

- मानसिक समतोल ढासळला जातो.
- शाळा-कॉलेजमध्ये परीक्षामध्ये सतत येणाऱ्या अपयशांमुळे कुटुंबात तरुणांना मारहाण वगैरे केली जाते, अपमान केला जातो. यामुळे नैराश्य येऊन तरुण आत्महत्यकडे वळतात.

- आधी कधीतरी आत्महत्येचा प्रयत्न केलेला असतो.
- शारीरिक किंवा लैंगिक गैरवापर
- कोणाचाही (कुंटुबा, मित्रा नातेवाईक) इत्यादी आधार नसणे.

१९.५.४ तरुणांमधील आत्महत्या प्रतिबंधक उपाय :

- तणावग्रस्त तरुणांच्या सर्व समस्या शांतपणे ऐकूण घेणे.
- शांतपणे त्याच्यावर न रागावता, न चिडता तणावमुक्त होण्यासाठी प्रयत्न करणे.
- तरुणांला त्याच्या दुःखातून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करणे.
- त्याच्या भविष्याबद्दल सकारात्मक चर्चा करणे.
- लवकरात लवकर अशा तरुणांना इतर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.
- तरुणांतील असलेल्या दोषाबद्दल न बोलता त्याच्यामध्ये असलेल्या गुणांची स्तुती करणे.

अशा प्रकारे आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त झालेल्या तरुणांसोबत सकारात्मक वागणूक ठेवून त्याच्या जीवनांमध्ये काही विधायक ध्येय (Aim) निर्माण केल्यास त्याच्या मनातील आत्महत्येचे विचार समूळ नष्ट होऊन तो यशस्वी जीवन जगू शकतो.

आपली प्रगती तपासा :

१) तरुणांमधील गुन्हेगारी सांगून त्याच्या आत्महत्येची कारणे सांगा. तसेच आत्महत्या करु नये. यासाठीचे उपाय सूचवा.

_____

_____

_____

_____

१९.६ सारांश

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे भारताच्या सर्वांगीण विकासासाठी शेती खुप महत्त्वाची आहे. पर्यायाने शेतकऱ्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. पण आज सरकारचे शेती विषयक चूकीचे धोरण असल्यामुळे शेती यशस्वी होत नाही. तसेच बी-बीयाणांवरती अनेक कंपनीची मक्तेदारी (Monopoly) असल्याने ती अतिशय महागडी असतात. यामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात वाढच होत जाते. आणि शेतकऱ्यांचे कर्ज वाढतच जाते. ते कर्ज तो फेडूच शकत नाही. त्यामुळे त्यांना आत्महत्या करावी लागते.

शेतकऱ्यांची आत्महत्या थांबवण्यासाठी शेतीविषयीचे सरकारचे धोरण बदलले पाहिजे. सर्वात विचित्र गोष्ट म्हणजे शेतकऱ्याने स्वतः माल काबाडकष्ट करुन निर्माण करायचा आणि त्याची किंमत मात्र दुसऱ्यांनी म्हणजे व्यापारी वर्गांनी ठरवायची, ही खुप मोठी शोकांतिका आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची किंमत त्यांनाच ठरवण्याचा अधिकार पाहिजे. खोट्या व फसव्या बाजारपेठा समूळ नष्ट कराव्यात. तेव्हा शेती यशस्वी होऊन शेतकऱ्यांचे जीवन आनंदी होईल.

आज शेतजमीन विषयक विपत्ती म्हणजे शेतजमीनीला कठीण समय आला आहे. शेती उत्पादनात घट, वित्तीय संकटकाळ, बळजबरीने जमीनीचा ताबा, ग्रामीण दारिद्र्य, शेतमालाला योग्य भाव नाही. माफीया, पाण्याचा गैरवापर इत्यादी घटकांमुळे शेतजमीनविषयक विपत्ती निर्माण होऊन कठीण समय आला आहे.

माणसांच्या आयुष्यामध्ये बालपण व तरुणपण खूप महत्त्वाचे आहे. कारण बालपण हे संस्कारक्षम असते. आणि तरुणपणात आयुष्यात जे काही करायचे त्याचे ध्येय (Aim) मिळते म्हणजेच जीवनाला योग्य प्रकारची दिशा मिळते. परंतु तरुणपणाचा काळ आव्हानात्मकही आहे. तरुणपणीच अधोगती खूप लवकर होऊ शकते.

दुर्दैवाने आज बालपणीच योग्य संस्कार मिळत नाहीत. त्यामुळे तरुणपणी मुले अध:पतित मार्गाचा अवलंब करतात. त्यामुळे अनेक प्रकारची गुन्हेगारी वृत्ती त्यांच्यामध्ये वाढते. हळूहळू त्यांच्या जीवनांमध्ये नैराश्य येते. त्यांचे जीनव दिशाहीन व अर्थहीन बनते. जीवनात खूप वेळा अपयश येते. तेव्हा मित्रा, कुटुंब, नातेवाईक, समाजातील इतर अनेक व्यक्तीकडून त्याचा अपमान, अवहेलना होते व तो आत्महत्येसारख्या वाईट प्रवृत्तीकडे वळतो.

शक्यतो समाजांमध्ये अशा व्यक्तीबद्दल द्वेष व तिरस्कार बाळगतात. त्यामुळे त्याच्या नैराश्य वृत्तीत अधिक भर पडते. म्हणून आत्महत्येपासून या व्यक्तीला परावृत्त करण्यासाठी तरुणाला सकारात्मक वागणूक देऊन त्याच्या जीवनांमध्ये एखादे उदात्त ध्येय (Aim) निर्माण झाल्यास पुढील आयुष्य तो यशस्वीपणे जगू शकतो.

१९.७ विद्यापीठस्तरीय प्रश्न

(१) शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण सांगून त्यावरील उपाय सूचवा.
(२) शेत जमीन विषयक विपत्ती किंवा कठीण समय निर्माण करणाऱ्या घटकांची तपशीलवार चर्चा करा.
(३) जैविक तंत्रज्ञानाचे टिकात्मक परिक्षण करा.
(४) मानवी हक्कांची पायमल्ली आणि विकास यांवर चर्चा करा.
(५) तरुणांमधील वाढती गुन्हेगारीची कारणे सविस्तर स्पष्ट करा.
(६) आत्महत्येची कारणे सांगून आत्महत्या प्रतिबंधक उपाय सूचवा.
(७) टिपा लिहा.
१) नर्मदा बचाव आंदोलन २) जैतापूर प्रकल्प ३) शेतकरी आत्महत्या
४) मानवी हक्क आणि विकास ५) तरुणीच्या आत्महत्या

❖❖❖❖

संदर्भ सूची

१. पर्यावरण विज्ञान : प्रा. अहिरराव, प्रा. अलिझाड, प्रा. वराट, प्रा. भोस.

२. विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण : डॉ. जयसिंग पवार

३. पर्यावरणशास्त्र : शिंदे, तेलंग, कांबळे, महाजन.

४. मराठी विश्व कोश : ५

५. मराठी विश्व कोश : ८

६. कृषीशास्त्र प्रवेश आणि जमीन व पाण्याची व्यवस्था : वि. गो. वैद्य.

७. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन अंक.

८. पर्यावरण परिचय : डॉ. जयकुमार मगर.

९. पर्यावरण शिक्षण : डॉ.के. म. भांडारकर.

१०. पर्यावरणशास्त्र : डॉ. अरुण कुंभार.

११. पर्यावरण अभ्यास : प्रा. प्रकाश शिंदे, सचीन पेंडसे, डॉ. हेमंत पेडणेकर, प्राचार्य युवराज महाजन, डॉ. स. वि. चव्हाण, प्रा. राजेंद्र परमार

१२. भारतीय राजकीय व्यवस्था - डॉ. अशोक जैन

१३. पायाभूत अभ्यासक्रम - डॉ. अशोक जैन.

१४. पायाभूत अभ्यासक्रम - लिमन

१५. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - ना. य. गोटे.

१६. भारतीय संविधान - पी. जे. घांगरेकर.

१७. भारतीय संविधान - पी. टी. देशमुख.

१८. मानवी हक्क - व्ही. जी. पाटील.

❖❖❖❖